म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
ग्रं. क्र. 3220

सौ. वैदेही कोळेकर

# मराठी लोककथा

REFBK-0025427
REFBK-0025427

मीमांसा

संदर्भ निबंध
३२२८
२५४२८
२१।१।८८

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

22 NOV 1987

17 OCT 1992

17 MAR 1993

7 SEP 1994

( क्र. मा. पहा )
५०००–११–८६

# मराठी लोककथा
# स्वरूपमीमांसा

लेखिका

सौ. वैदेही शरद कोळेकर

REFBK-0025427

सविता प्रकाशन
औरंगाबाद

सविता प्रकाशन, औरंगाबाद.

© सौ. वैदेही शरद कोळेकर

**प्रकाशक :**
कु. सविता प्रभाकर मांडे,
सविता प्रकाशन,
' मंगलप्रभा ',
१०९, एन ५ ( दक्षिण ),
सिडको, औरंगाबाद - ४३१ ००३.

**मुद्रक :**
बाळासाहेब गटकळ,
प्रशांत प्रिंटिंग प्रेस,
समर्थनगर, औरंगाबाद.

**मुखपृष्ठ :**
शीतल शहाणे, औरंगाबाद.

पहिली आवृत्ती

**मूल्य : ऐंशी रुपये.**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शाखा (स्थळ प्रत)

# मराठी लोककथा : स्वरूपमीमांसा

# अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पृष्ठ क्र. |
| प्रकरण १ ले | : | लोककथा : एक लोकवाङ्मयप्रकार | १ ते १५ |
| प्रकरण २ रे | : | मराठी लोककथांचे वर्गीकरण आणि त्यांचे ठळक विशेष | १६ ते ३७ |
| प्रकरण ३ रे | : | मराठी लोककथांतील कथाविशेष आणि कल्पनाबंध | ३८ ते ६३ |
| प्रकरण ४ थे | : | लोककथांच्या रचनानुसारी अभ्यासाची दिशा | ६४ ते ७५ |
| प्रकरण ५ वे | : | मराठी लोककथांतील पात्रांचे सांकेतिक स्वरूप | ७६ ते ११० |
| प्रकरण ६ वे | : | मराठी लोककथांतील संकेतपालन | १११ ते १४७ |
| प्रकरण ७ वे | : | मराठी व्रतकथा – कहाणी | १४८ ते १६३ |
| प्रकरण ८ वे | : | मराठी दंतकथांचे स्वरूप | १६४ ते १८३ |
| प्रकरण ९ वे | : | मराठीतील इतर लोककथाप्रकारांचे स्वरूप | १८४ ते २०० |
| प्रकरण १० वे | : | मराठी लोककथांतून घडणारे समाजदर्शन | २०१ ते २६८ |
| संदर्भटीपा | : | | २६९ ते २७३ |
| संदर्भग्रंथ | : | | २७४ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२२५८

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३२२७
१२५४८५

# निवेदन

माझे हे पहिलेच पुस्तक वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. एका तपापूर्वी कुणी माझ्या हातून गंभीर स्वरूपाचे संशोधनात्मक लेखन होईल असे भाकित केले असते तर मी त्याच्यावर विश्वास ठेवला नसता. व्यक्तीच्या जीवनात कधी कधी अकल्पित घडते तसाच माझ्या जीवनातील हा योगही असा अनपेक्षितच म्हणावा लागेल.

माझे पती प्रा. शरद कोळेकर यांची बदली कराडहून औरंगाबाद येथील इंजीनिअरिंग कॉलेजात झाली आणि आम्हा सर्व कुटुंबीयांच्या जीवनात नव्या शैक्षणिक पर्वाला प्रारंभ झाला. माझे सासरे वामन मोरेश्वर कोळेकर उपाख्य अण्णा हे सातारा जिल्ह्यातील प्रख्यात निवृत्त शिक्षक. अध्ययनमग्नता हा त्यांचा विशेष. आम्हाला त्यांचे अभ्यासाच्या संदर्भात सतत प्रोत्साहन असे. परंतु कराडला असेपर्यंत मुले लहान असल्यामुळे मी काहीच करू शकले नव्हते. औरंगाबादला आल्यावर मात्र परिस्थिती बदलली. मुले मोठी होऊन उच्च शिक्षणाला लागली आणि थोडा निवांतपणा मिळाल्याने मीही अभ्यासाकडे वळायचे ठरविले. त्यातच मराठवाडा विद्यापीठाच्या मराठी विभागातील डॉ. प्रभाकर मांडे यांचा परिचय झाला. त्यांनी माझ्या इच्छेला चालना देऊन लोकवाङ्मयासंबंधी शोधकार्य करण्याचा सल्ला दिला. मार्गदर्शन आणि सहकार्य देऊ केले. संशोधक–छात्र या नात्याने त्यांच्या इतर संशोधक-छात्रांसमवेत संकलनाचा अनुभव आला. त्यांच्या संग्रही असलेले संकलनही त्यांनी मला अभ्यासासाठी उपलब्ध करून दिले. त्यामुळे लोकवाङ्मयाचा एखादा प्रकार निवडून त्यासंबंधी शास्त्रीय लेखन करता येईल असा आत्मविश्वास माझ्या मनात निर्माण झाला. त्यांचे मार्गदर्शन आणि साहाय्य यांमुळेच या ग्रंथाचे लेखन माझ्याकडून होऊ शकले. लोकवाङ्मयाच्या स्वरूपमीमांसेची दृष्टी लाभली. त्यांचे आभार मानून मोकळे होण्यापेक्षा त्यांच्या ऋणात राहण्यातच मला धन्यता वाटेल आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार पुढील शोधकार्य चालू ठेवण्याचे आश्वासन दिल्याने त्यांना आनंद वाटेल.

माझ्या या शोधकार्यामुळे माझे पती प्रा. शरद कोळेकर आणि मुले चि. भूषण आणि चि. भावना यांनाही खूप गैरसोय सोसावी लागली. प्रा. कोळेकर यांचे प्रोत्साहन आणि सक्रिय सहकार्य लाभले नसते तर हे लेखन शेवटास जाणे केवळ अशक्य होते.

मराठवाडा विद्यापीठाचे ग्रंथपाल आणि त्यांचे सहकारी, तसेच मराठी विभागाचे प्रमुख डॉ. यू. म. पठाण यांच्या प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष साहाय्याचाही उल्लेख करावा लागेल.

अशा स्वरूपाच्या–शास्त्रीय ग्रंथाच्या प्रकाशनाला एकूणच महाराष्ट्रातील आजचे वाङ्मयव्यवहाराचे वातावरण फारसे अनुकूल नाही. असे असताही सौ. मंगला मांडे व चि. सविता मांडे या मातापुत्रीच्या आणि आमच्या कौटुंबिक स्नेहामुळे प्रकाशनाची ही योजना फलद्रूप झाली. प्रकाशित मराठी लोककथांच्या कथाविशेषांची त्याचप्रमाणे त्यांत येणाऱ्या कल्पनाबंधांची सूची परिशिष्टांच्या स्वरूपात देण्याचे योजले होते. परंतु पुढे स्वतंत्र पुस्तिकेच्या रूपातच देणे योग्य वाटल्यावरून तसा निर्णय घेतला आहे. प्रशांत मुद्रणालयाचे श्री. बाळासाहेब गटकळ आणि त्यांचे कर्मचारी यांनी मुद्रण शक्यतो निर्दोष करण्याचा प्रयत्न केला. श्री. शीतल शहाणे यांनी मुखपृष्ठ साधे परंतु आकर्षक तयार करून दिले. या सर्वांसाठी माझ्या मनात कृतज्ञताभाव आहे.

प्रजासत्ताक दिन १९८७ **सौ. वैदेही शरद कोळेकर**

१२, शक्तीनगर,
औरंगाबाद ( ४३१००१ )

## प्रकरण १ ले

# लोककथा : एक लोकवाङ्मयप्रकार

बरीच वर्षे भाषाशास्त्र, मानवशास्त्र किंवा इतिहास अशा अन्य विषयांचा एक पोटविभाग म्हणून मानल्या जाणाऱ्या लोकसाहित्य (Folklore) या विषयाला आता २० व्या शतकाच्या उत्तरार्धात मात्र स्वतंत्र अभ्यासविषयाचे महत्त्व प्राप्त झालेले आहे. लोकसाहित्याच्याच (Folklore) अभ्यासाला जीवन वाहून घेणारे अनेक देशांतील लोकसाहित्यविशारद व त्यांनी लिहिलेले विद्वत्ताप्रचुर ग्रंथ, देशांदेशांतून स्थापन झालेली लोकसाहित्यमंडळे, त्या मंडळांद्वारे प्रकाशित होणारी नियतकालिके, आंतरप्रांतीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर भरविल्या जाणाऱ्या लोकसाहित्य परिषदा व त्यांद्वारे होणारी विद्वानांच्या विचारांची देवाणघेवाण, आणि लोकसाहित्य या विषयाचा अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत झालेला समावेश इत्यादी सर्व गोष्टी लोकसाहित्याच्या महत्त्वपूर्ण व स्वतंत्र स्थानाची ग्वाही देणाऱ्या आहेत. केनेथ आणि मेरी क्लार्क यांनी तर असे म्हटले आहे की, 'लोकसाहित्य हे वातावरणाप्रमाणे विश्वव्यापी असून त्याचा अभ्यास पध्दतशीरपणे करणे शक्य आहे. हवेप्रमाणेच त्याचा आपल्या जीवनावर खोलवर परिणाम होतो.–'[१] हवा आणि वातावरण यांची मानवी जीवनातील अपरिहार्यता कोण नाकारू शकेल ? हजारो वर्षे परंपरेने चालत आलेल्या लोकसाहित्यानेही मानवी जीवन असेच अंतर्बाह्य व्यापलेले आहे याबाबत आता कोणाला शंका उरलेली नाही.

### लोकसाहित्याचे (Folklore) स्थूल वर्गीकरण

लोकसाहित्याच्या क्षेत्रात आज दृश्यमान होणारा हा फुलोरा अर्थातच एकाएकी आलेला नाही. गेल्या दोनतीन शतकांतील लोकसाहित्याचे अनेक संकलक व अभ्यासक यांचे कठोर परिश्रम, चिंतन, लेखन या फुलोऱ्याच्या मुळाशी आहे. लोकसाहित्याची व्याख्या, प्रमुख लक्षणे, व्याप्ती, उपयोग, निर्मितिप्रक्रिया, प्रसारण इत्यादी अनेक मुद्यांवर बरेच सैध्दांतिक लेखन लोकसाहित्याच्या क्षेत्रात झालेले आहे.

लोकसाहित्याची व्याप्ती अत्यंत विस्तृत असून लोकसाहित्यात (Folklore) समाविष्ट होणाऱ्या व्यापक सामग्रीचे स्थूल वर्गीकरण पुढील चार विभागांत केले जाते –

(१) लोकवाङ्मय
(२) भौतिक संस्कृती
(३) लोकभ्रम, लोकसमजुती व लोकरूढी
(४) प्रयोगसिध्द लोककला

**लोककथा-सर्वाधिक लोकप्रिय लोकवाङ्मयप्रकार**

लोकवाङ्मय हा लोकसाहित्याचा एक उपविभाग किंवा खंड (Segment) आहे आणि तो शाब्दिक म्हणजे शब्दांशी निगडित आहे. लोककथा, लोकगीते, लोककथागीते, म्हणी, कोडीं, उखाणे इत्यादी शाब्दिक पारंपरिक सामग्रीचा त्यात समावेश होतो. लोकसाहित्यातील या लोकवाङ्मय–विभागानेच अभ्यासाचे लक्ष अधिक प्रमाणात वेधून घेतले आहे आणि या लोकवाङ्मय–विभागातीलही लोककथा हा प्रकार जास्तीत जास्त आकर्षक व अभ्यसनीय ठरलेला आहे. लोकसाहित्याच्या क्षेत्रात निर्माण झालेल्या सर्वाधिक अभ्यास–संप्रदायांची उभारणी लोककथांच्याच अभ्यासातून निर्माण झालेली आहे. ही बाब नक्कीच लक्षणीय आहे. ग्रिम बंधूंनी अनेक लोककथांचा भाषाशास्त्रीय अभ्यास केला आहे. मॅक्सम्युलर यांचे तौलनिक दैवतकथाशास्त्र आणि त्यांचा सूर्यसिद्धांत विविध राष्ट्रांतील दैवतकथांच्या अभ्यासाचेच फळ आहे. पंचतंत्र या संस्कृत कथासंग्रहाचे भाषांतर आणि अभ्यास करूनच थिओडोर बेनफे यांनी आपला भारतमूलक सिद्धांत मांडला. व्लाडीमिर प्रॉप यांनी आपली रचनानुसारी अभ्यासपद्धती विशद करताना आधार घेतला तो परीकथांचाच. ऐतिहासिक–भौगोलिक पद्धतीचा अवलंब देखील लोककथांच्या संदर्भातच विशेषत्वाने केला जातो.

**कथाप्रिय विश्व**

लोककथेच्या या लोकप्रियतेच्या मुळाशी अर्थातच माणसाची कथाप्रियता आहे. कथा ऐकणे किंवा सांगणे हे जणु मानवाचे दोन जन्मजात स्थायीभावच आहेत. 'कथाकथन आणि कथाश्रवण' हे सर्व प्राणिमात्रांच्या मनांत बीजभूत असलेल्या मूलभूत प्रेरणेचे फल आहे असे हार्टलंड म्हणतात.[२] तर लिंडा डेघ म्हणतात – कथा सांगण्याची प्रेरणा व कथा ऐकण्याची गरज या दोन्हींमुळे कथा ही मनुष्याच्या सांस्कृतिक इतिहासात, प्राचीन काळापासून ते आजपर्यंत, माणसाचा नैसर्गिक मित्र, सोबती बनली आहे.[३] या कथाप्रियतेला बंधन ना वयाचे, ना

शिक्षणाचे. आपल्याभोवती दिसणारे अनेक चमत्कार, वैचित्र्यपूर्ण दृश्ये, भिन्नस्वभावी व्यक्ती व प्राणी, विविध वस्तू व घटना यांच्याबद्दलचे अपार कूतुहल माणसाच्या मनात सतत जागृत असते आणि या कूतुहलापोटीच तो सतत कोणी, कसे, केव्हा व कुठे काय केले अशा प्रश्नांची उत्तरे शोधीत राहातो. या विविध प्रश्नोत्तरांतून सतत कथा निर्माण होत गेल्या आहेत आणि अगदी आदिम कालापासून ते आज-पर्यंत हे सत्र अव्याहतपणे चालूच आहे. कथाप्रियतेची ही ऊर्मी फक्त माणसालाच आहे असे नाही तर ती विश्वव्यापी आहे. सर्वज्ञ देवादिकांपासून ते मूक प्राण्यांपर्यंत सर्वांचा त्यांत समावेश झालेला आढळतो.

**देवांची कथाप्रियता**

शिवपार्वती या ईश्वरी दांपत्याची मदतशील वृत्ती जशी प्रसिध्द आहे तशीच त्यांची कथाप्रियताही. विशेषत: पार्वतीला कथा ऐकावयाची फार हौस. तिने सदैव कथा ऐकण्याचा हट्ट करावा आणि शंकराने तो हट्ट पुरवावा. त्यांनी पार्वतीला रामायणाची कथा ऐकवली आणि सात विद्याधरांच्या कथाही सांगितल्या (कथासरित्सागर).

**राज घराण्यांची कथाप्रियता**

राजेरजवाड्यांच्या पदरी गोष्टी सांगणारे चारण, भाट, सूत, विदूषक असत, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. राज्यकारभाराचा भार वाहून श्रांत झालेल्या राजांच्या मनाला पुन्हा उल्हसित करण्याचे काम या कथाकथकांचे असे. कथासरित्सागरातील उदयन राजाची पराक्रमी वृत्ती जागवण्यासाठीही कधीकधी त्याचा मंत्री यौगंधरायण व विदूषक वसंतक त्याला कथा सांगत. उदयनपत्नी वासवदत्ता हिला तर कथाश्रवणाचे अभिनव डोहाळेच लागले होते. तिचे डोहाळे यौगंधरायण आणि वसंतक यांनी पुरविले. 'अरेबियन नाईट्स' हा तर सर्व ग्रंथच कथाप्रियतेच्या परम महत्त्वाचा साक्षीदार आहे. रोज एका तरुणीशी विवाह करून दुसऱ्या दिवशी तिचा अमानुषपणे शिरच्छेद करण्याचा तीन वर्षे अखंड चाललेला शहरयार राजाचा आसुरी क्रम वजीर कन्या शहरयारच्या सुरस कथाकथनामुळेच खंडित झाला, 'ज्याला उत्कृष्ट गोष्ट सांगता येई त्याचे अधम व अक्षम्य अपराध देखील माफ होत,'[४] असे कालेलकर, चोरघडे म्हणतात. तर 'चाणक्याच्या अर्थशास्त्रात कथाकथनकाराकडे गुप्तहेराचे कामही सोपवलेले असावे',[५] असा उल्लेख मालतीबाई दांडेकर यांनी केला आहे.

**सामान्य माणसाची कथाप्रियता**

राजेलोकांप्रमाणे कथाप्रियतेपोटी माणसे चाकरीस ठेवणे सामान्य माणसांना शक्य नसले तरी कथाप्रियतेची त्यांची ऊर्मी देखील तितकीच प्रबळ असते. कथा

ऐकण्याची संधी सहसा कोणीच सोडीत नाही. घरातील व गावातील वडीलधारी माणसे व समाजातील कथाकथक यांच्याकडून त्यांची कथाश्रवणाची अपेक्षा पूर्ण होऊ शकते. सामान्य माणसांच्या कथाप्रियतेचे उल्लेख काही मराठी लोककथांतही आढळतात.

या मराठी लोककथेचे नावच मुळी 'सांगा सांगा कथा' असे आहे. एका मुलीला तिची आई रोज एक गोष्ट सांगे. त्या मुलीचे लग्न झाल्यावर ती नवऱ्याजवळ गोष्टीसाठी रोज हट्ट धरी. तिच्या या हट्टाने नवरा बिचारा कंटाळून गेला होता. (महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला, पुष्प १ कथा १०)

एक आंधळा गांजेकस रोज 'तुला चार चुत्यांची गोष्ट सांगेन' असे आपल्या बायकोला आश्वासन देई व तिच्याकडून आपली सेवा करून घेई. गोष्टीच्या आशेने बायको रोज त्याची सेवा करीत राही. पण तो मात्र गोष्ट न सांगताच झोपून जाई. तथापि तिची गोष्टीची आशा संपत नव्हती व ती त्याची सेवा करीतच राही. (महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला, पुष्प ४, कथा ११).

**प्राण्यांची कथाप्रियता**

माणसेच काय पण प्राणीसृष्टीही कथाप्रियतेच्या बाबतीत अपवाद नाही. गुणाढ्याच्या कथा ऐकताना रानातील वन्यप्राणी तहानभूक हरपून बसले होते आणि त्यामुळे त्यांचे मांस सुकून गेले होते. हा कथासरित्सागरातील कथाभाग प्रसिद्धच आहे. प्राण्यांच्या कथाप्रियतेमुळेच दुःखी गुणाढ्याच्या कथाहोमाची वार्ता सातवाहन राजापर्यंत पोचली आणि उरलेली एका विद्याधराची (नरवाहन दत्ताची) कथा अग्नीपासून वाचली. कथासरित्सागरात एकमेकांना कथा सांगून आपले मत-प्रतिपादन करणारेही अनेक प्राणी आहेत.

**कथाश्रवणाइतकेच कथाकथनही अनावर**

कथाश्रवणाइतकीच कथाकथन ही देखील माणसाची ऊर्मी आहे. मनाच्या या दोन्ही प्रवृत्ती प्रबळ असल्यामुळेच शंकराचा एक गण पुष्पदंत संकटात सापडला. एकदा शंकर पार्वतीला एकांतात सात विद्याधरांच्या कथा सांगत असल्यामुळे आत कोणालाच प्रवेश नव्हता. पुष्पदंत तेथे आला पण त्याला अडवले गेले. कथा ऐकण्याची उत्सुकता त्याला स्वस्थ बसू देईना. गुप्त रूपाने आत जाऊन त्याने त्या कथा ऐकल्या. त्याने आपली लबाडी निदान गुप्त तरी ठेवावी ? ताबडतोब घरी जाऊन त्याने त्या कथा आपली पत्नी जया हिला सांगितल्या व तिनेही तितक्याच उतावीळपणाने धावत जाऊन त्या पुन्हा पार्वतीलाच ऐकविल्या. स्वाभाविकच

शंकरपार्वतीच्या शापामुळे पुष्पदंताला वररुची नावाने मृत्युलोकी जन्म घ्यावा लागला. त्याच्या मानवजन्मी त्या कथांच्याच पुनःश्रवणानंतर त्याची मुक्ती होणार होती ही बाबही विशेष नमूद करण्यासारखी आहे. कथेच्या सामर्थ्याची महती निश्चितपणे वाढविणारी आहे.

'राजा धिंग, माथा शिंग' (मराठी लोककथा, भाग २ कथा ६, संपादक – शं. ग. दाते) या मराठी लोककथेत तर स्वतःला माहीत असलेली गोष्ट गुप्त ठेवणे ही बाब शरीरव्याधी निर्माण करण्याइतकी जाचक ठरविलेली आहे. आपल्या डोक्याला असलेले शिंग, डोके सदैव बांधून ठेवून, राजा सर्वांपासून गुप्त ठेवी. पण न्हाव्याला ते कळणारच ! स्वतःला माहीत असलेली गोष्ट गुप्त ठेवली तर न्हाव्याचे म्हणे पोट फुगायचे. राजाच्या व शिक्षेच्या भयाने न्हावी काही दिवस गप्प बसला. पण शेवटी नाइलाजाने त्याने हे गुपित निर्जन अरण्यातील एका सुरमाडाच्या झाडाला सांगितले. योगायोगाने राजाच्या वीणेला त्याच सुरमाडा-पासून बनविलेल्या तारा जोडल्या गेल्या. तेव्हा त्या तारांतून एकच आवाज निघू लागला, 'राजा धिंग, माथा शिंग'. म्हणजे त्या तारांनाही गोष्ट गुप्त ठेवणे शक्य झाले नाही. अशाच तऱ्हेच्या कथा युरोपातही प्रसृत झालेल्या आहेत असा उल्लेख दुर्गा भागवत यांनी केला आहे.[६]

**प्रत्यक्ष कथेचीच प्रसारणप्रियता**

प्रत्यक्ष कथेलाही एकाच ठिकाणी राहणे आवडत नाही, आपला खूप प्रसार व्हावा अशीच तिचीही प्रबळ इच्छा असते असे प्रतिपादन करणारी एक मराठी लोककथा आहे. (मराठी लोककथा भाग १, कथा ७, संपादक – शं. ग. दाते) या कथेत कथेला साक्षात् अतिमानवी व्यक्तित्त्व प्रदान केलेले आहे. एक राजपुत्र आणि प्रधानपुत्र एकदा वनात मुक्कामाला असताना प्रधानपुत्र गोष्टी ऐकण्याची इच्छा व्यक्त करतो. स्वतःला गोष्टी येत असूनही राजपुत्र गोष्टी न सांगता तसाच झोपून जातो. तो झोपला असता, त्याला माहीत असलेल्या पाच गोष्टी त्याच्या पोटातून बाहेर पडतात, झाडावर चढतात, आपापसांत बोलतात. आपल्याला गुप्त ठेवले म्हणून राजपुत्रावर त्या कमालीच्या संतप्त झालेल्या आहेत. त्यांचे उद्गार असे आहेत की, 'अशांच्या उदरात राहणे नको'. गोष्ट न सांगण्याच्या त्याच्या अपराधाला त्यांच्या मते देहदंडाचीच शिक्षा हवी व ती देण्याचे संगनमतही त्यांनी केले. प्रत्यक्ष कथांच्या अंगी वसत असलेली स्वयंप्रसाराची आवड या कथेतून उत्तम तऱ्हेने व्यक्त केलेली आहे.

उपरोक्त कथांतील अतिशयोक्तीचा भाग क्षणभर बाजूला ठेवला तरी कथेचे आणि कथाप्रसाराचे महत्त्व पूर्वापार सर्वत्र मान्य झालेले होते एवढे अनुमान

काढावयास हरकत नाही. काही लोककथांचा शेवट 'इटुकली मिटुकली गोष्ट सरो, तुमचे आमचे पोट भरो'–[७] असा किंवा 'आमची कहानी संपली, तिनं स्वर्ग–लोकाची गोष्ट दिली', 'आमची कहानी संपली, तुमची तहानभूक हरपली'–[८] अशा अर्थपूर्ण तऱ्हेने केला जातो. कथेचे सामर्थ्य त्यांतून अत्यंत समर्पक शब्दांत व्यक्त झालेले आहे.

**कथाकथनकाराला मानाचे स्थान**

माणसाच्या कथाप्रिय स्वभावामुळे आणि त्याला कथांच्या सामर्थ्याची जाण असल्यामुळे कथाकथन करणारे कथाकथकही समाजात लोकप्रिय असले तर नवल नाही. कथाकथकांची ही लोकप्रियता लोककथांइतकीच प्राचीन आहे. जगातील जवळजवळ प्रत्येक जातीजमातींत कथाकथनाची कला जोपासली गेलेली दिसून येते. राजेरजवाड्यांच्या पदरी तर कथाकथक नोकरीस ठेवलेले असतच, परंतु गावोंगावी हिंडून कथा सांगणारे लोकही असत. रेडिओ, चित्रपट, नाटके आदी मनोरंजनाची साधने नव्हती. तेव्हा कथाकथन हेच लोकानुरंजनाचे प्रमुख साधन होते. अर्थात रंजनाबरोबरच ज्ञानदानही केले जाई व धार्मिक शिकवणही दिली जाई. हार्टलंड यांनी आपल्या (Science of Fairy tales) या ग्रंथात अशी माहिती दिली आहे की केल्टिक राष्ट्रात कथाकथकाला फार मान मिळे. शिंपी आणि चांभार हे प्रमुख कथाकथक असत. ते कामाच्या शोधार्थ गावोगावी हिंडत. काम करीत आणि कथाही सांगत. एखाद्या गावी कोणी पाहुणा आला तर गावातील लोकांनी एकत्र जमून त्याच्या गोष्टी ऐकण्याची प्रथा रूढ होती. आपण त्या गावात उपभोगलेल्या पाहुणचाराची अंशतः फेड त्याने गोष्टी सांगून करावी अशी सर्वांची अपेक्षा असे. अशा वेळी ज्या कथा सांगितल्या जात त्या बहुधा लोककथाच असत. परंपरेने चालत आलेल्या या कथा थंडीच्या दिवसात शेकोटीभोवती बसून अजूनही सांगितल्या जातात व ऐकल्या जातात. गोष्टी सांगणारी माणसे नेहमीच लोकप्रिय होतात. म्हणूनच लोकवाङ्मयातील लोककथेचे दालन अत्यंत विस्तृत व समृद्ध असून केवळ श्रोत्यांचे व कथकांचेच नव्हे तर अभ्यासकांचेही लक्ष वेधून घेण्याइतके आकर्षक आहे.

**लोककथांची भारतीय परंपरा**

लोककथेच्या क्षेत्रात भारताला सर्व जगात अत्यंत मानाचे स्थान आहे. ज्यू प्राच्यविद्याविशारद थिओडोर बेनेफे यांनी भारताला दिलेले सर्व जगातील लोककथांचे जनकत्व जरी सर्व विद्वानांना मान्य झालेले नसले तरी लोककथांच्या विद्या क्षेत्रातील भारताची समृद्धी कोणी नाकारीत नाही.

आपला भारत देश फार प्राचीन काळापासून अत्यंत कथाप्रिय देश म्हणून प्रसिद्ध आहे आणि त्यामुळे भारतात लोककथांची परंपरा अत्यंत प्राचीन असल्याचे आढळते. कथेकडे पाहण्याची भारतीयांची दृष्टी अनादी कालापासून धार्मिकतेची व भाविकतेची आहे. कथांत दैवी शक्ती असते अशी श्रद्धा भारतात पिढ्यान्-पिढ्या जोपासली गेलेली आहे. व्रतकहाणी ऐकल्याने संकटाचा नाश होतो, संतती संपत्ती लाभते आणि वाढते, कहाणीचा अवमान केल्याने संकटपरंपरा ओढवते अशी धारणा वर्षानुवर्षे समाजात दृढ झालेली आहे. वैदिक कालापासून भारतात कथांना लोकांच्या धार्मिक जीवनाशी बद्ध केले गेले आहे. वेदांमध्ये व ब्राह्मण वाङ्मयात बरीच कथात्मक सूक्ते आढळतात. या सर्व कथा यज्ञविधी, देवतांची स्तोत्रे, तपःसाधना यांच्यांशी संबंधित आहेत. ऋत्विज सामान्य लोकांना पारंपरिक कथांच्या रूपाने अनेक प्रकारचे ज्ञान देत असत.

उपनिषत्कालापासून कथांचा धर्मविधींशी असणारा दुवा बराच क्षीण होत जाऊन त्यांच्यामागची प्रेरणा धार्मिकतेऐवजी अधिक जीवनाभिमुख बनली. देवदेवतांच्या ऐवजी राजे, ऋषी आदि व्यक्तींना कथावाङ्मयात प्राधान्य मिळाले. पुराणवाङ्मय आणि रामायणमहाभारतादी महाकाव्ये यात अशाच वृत्तीचा परि-पोष झालेला आढळतो. पुराणांत कथांचे प्राबल्य खूप आहे आणि रामायण-महाभारतामध्येही मूळ कथेच्या अनुषंगाने किंवा बोधरूपाने अनेक कथा गोवलेल्या आहेत.

**बौद्ध जातके व जैन चूर्णी**

भारतीय इतिहासात नंतरच्या काळात भिन्न भिन्न धर्मसंप्रदाय निर्माण झाले. त्या धर्मसंप्रदायांनी समाजात प्रसृत असलेल्या पारंपरिक कथांचा उपयोग आपापल्या धर्माच्या प्रसारासाठी करून घेतला. अर्थात हे कार्य करताना त्यांना त्या कथा जशाच्या तशा स्वीकारणे काहीसे कठीण होते. त्यामुळे त्यांनी त्या कथांना स्वतःच्या धर्मपंथाच्या चौकटीत बसवून त्यांचा धर्मप्रसारासाठी उपयोग केला.

बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी संकलित केलेल्या कथा 'जातककथा' म्हणून ओळखल्या जातात. या जातककथा हा भारतीय लोककथांच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. जातककथा म्हणजे भगवान बुद्धाच्या पूर्वजन्मीच्या कथा. परंपरेने समाजात प्रसृत असणाऱ्या अनेक अद्भुत कथा, नीतिकथा, प्राणीकथा, विनोदी कथा यांचा उपयोग, आपल्या धर्माच्या चौकटीत बसवून, बौद्ध भिक्षूंनी धर्म-प्रसारासाठी केला. एकूण ५४७ कथा उपलब्ध असून त्यातून नीतीची शिकवण देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी जसा जातककथांचा उपयोगझाला तसा जैन धर्माच्या प्रसारासाठी जैन चूर्णींचा उपयोग केला गेला. या कथांना चूर्णी, चूर्णक, चूर्ण, अवचूर्ण अशी विविध नावे दिलेली आढळतात. भगवान महावीरांनी देखील प्रचलित पारंपरिक कथांना, आपल्या धर्माच्या तत्त्वज्ञानाच्या मुशीत ओतून, आपल्या धर्माच्या प्रसारार्थ राबवून घेतले, आणि जैन तत्त्वज्ञान सामान्य लोकांपर्यंत पोचविण्याचे कार्य साध्य केले.

या दोन्ही धर्मपंथांचे आणखी एक वैशिष्टच असे की त्यांनी हा धर्मप्रसार लौकिक भाषेत केला. तसेच त्यांनी, विशेषतः बौद्धधर्मीयांनी या कथा फक्त येथील समाजातच खेळत्या ठेवल्या असे नव्हे तर त्यांचा दूरवर भारताबाहेरही प्रसार केला. प्रा. ऱ्हीस डेव्हिडस् यांनी आपल्या 'The Buddhist Stories' या ग्रंथात जातककथांची जगभरच्या लोककथांत कशी उसनवारी झाली आहे याचे साधार विवेचन केले आहे.

या दोन धर्मपंथाबाबत आणखी एक वैशिष्टच श्रीमती दुर्गा भागवत यांनी नमूद केले आहे. 'धर्म हा अतिमानवी वा दैवी सृष्टी आणि मानव यांना जोडणारा, आचार व विचार यांच्या विशिष्ट पद्धतीने बनलेला दुवा असे न मानता, मानवी आचारांचे व वासनांचे उदात्तीकरण म्हणजे धर्म अशी भावना या दोन पंथांची आहे व म्हणूनच धर्मकथांचा त्यांचा साठा फार प्रचंड असून त्या कथांचे स्वरूपही बहुधा त्रोटक व उपदेशपर आहे.'[९]

### पारंपरिक कथांचे संग्राहक

पारंपरिक कथाचे संग्राहक म्हणून काही लोकांची नावे भारतात प्रसिद्ध आहेत. वररुची, गुणाढय, महीदास ऐतरेय, मार्कंडेय, व्यासपुत्र शुक यांची नावे या संदर्भात घ्यावी लागतात.

### वररुची आणि गुणाढ्य

वररुची आणि त्याचा शिष्य गुणाढय हे दोघेही अतिशय विद्वान व वैय्याकारणी होते. या दोघांची जीवनकथा कथासरित्सागरात आलेली आहे. सात विद्याधराच्या कथा वररुचीने काणभूती पिशाच्चाकडून ऐकल्या आणि त्याने त्या गुणाढ्याला ऐकविल्या. गुणाढ्याने त्या कथा स्वतःच्या रक्ताने पैशाची भाषेत लिहून काढून स्वतःच्या शिष्यांकरवी सातवाहन राजाकडे पाठविल्या. सातवाहनाने शिष्यांचा व कथेच्या बाडाचा धिक्कार केल्याने शिष्यांनी त्या पुन्हा गुणाढ्याकडे परत आणून दिल्या. दुःखी गुणाढ्याने त्या अग्नीत टाकण्यास सुरुवात केली.

सहा कथा अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडेपर्यंत सातवाहन राजाकडे वार्ता पोहचली. त्याने क्षमायाचना करून उरलेली एक नरवाहनदत्ताची कथा स्वीकारली. तीच प्रसिद्ध बृहत्कथा. त्यात नरवाहनदत्ताच्या चारित्राबरोबरच अनेक अनुषंगिक कथांचे संकलन केलेले आढळते.

**महीदास**

महीदास हा त्या 'इतरा' या आईच्या नावावरून 'महीदास ऐतरेय' या नावाने ओळखला जातो. त्याने ऐतरेय ब्राह्मणाची रचना केलेली असून त्यात अनेक जुन्या पारंपरिक कथांचे सकलन आढळते.

**मार्कण्डेय**

मार्कण्डेयाने मार्कण्डेय–संहिता, मार्कण्डेय स्मृती, वराह पुराण, मार्कण्डेय स्तोत्र असे अनेक ग्रंथ लिहिलेले असून त्यांत अनेक कथा आढळतात. विशेषतः प्रचलित असलेल्या अनेक व्रतकथांचे श्रेय त्याला देण्यात येते.

**व्यासपुत्र शुक**

शिवाने पार्वतीला सांगितलेल्या बीजमंत्राची कहाणी ऐकल्याने अमरत्व लाभलेला शुक हा पुराणकथाकथक मानला जातो.

**लोककथांचे संस्कृतीकरण**

समाजात प्रचलित असलेल्या कथांना ग्रंथनिविष्ट करून ठेवण्याची प्रवृत्ती देखील भारतामध्ये फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. त्यामुळे निर–निराळ्या लोकभाषेतील कथासंपदा संस्कृतमध्ये रूपांतरित झालेली दिसून येते.

**बृहत्कथा**

भारतीय लोककथांच्या क्षेत्रात गुणाढ्यविरचित मूळ पैशाची (पिशाचांची भाषा) भाषेत रचलेला बृहत्कथा हा कथासंग्रह अत्यंत मानाचे स्थान अलंकृत करतो. लोककथांचा संग्रह करण्याचा हा प्रयत्न अनेक दृष्टींनी अपूर्व होता. कथांच्या मागच्या धार्मिक पार्श्वभूमीचा येथे पूर्ण निरास झालेला आढळतो. श्रीमती दुर्गा भागवत म्हणतात, "सांप्रदायिक धर्मकथा हे त्यांचे रूप संपवून कथेचे लौकिक स्वरूप कायम ठेवणे, कथेकडे कथा म्हणून पाहणे हे बृहत्कथेचे वैशिष्टय–धर्म नव्हे, नीती नव्हे तर अद्‌भुततेचे मानवी आकर्षण हा या कथा–वाङ्मयाचा प्राण आहे.–[१०] सर्वसामान्य लोकांचे मनोरंजन व्हावे या हेतूनेच या कथांचे संकलन झाले असावे. राजांच्या, विद्याधरांच्या कथा त्यात तुलनेने

अधिक असल्या तरी त्यात सर्वसामान्य लोकांच्या कथाही आहेत, प्राणीकथाही आहेत आणि मूर्खांच्या कथाही आहेत.

या मूळ पैशाची भाषेतील ग्रंथाची तीन संस्कृत भाषांतरे उपलब्ध आहेत.

**१) बृहत्कथाश्लोकसंग्रह**

नेपाळ देशाचा रहिवाशी बुधस्वामी याने हे भाषांतर केले आहे. संपूर्ण भाषांतर उपलब्ध नाही.

**२) बृहत्कथामंजिरी**

११ व्या शतकात काश्मीरच्या अनंत राजाच्या पदरी असणाऱ्या क्षेमेंद्राने हे भाषांतर केलेले आहे.

**३) कथासरित्सागर**

क्षेमेन्द्राने अनुवादित केलेला ग्रंथ अनंताची पत्नी सूर्यवती हिला विशेष पसंत न पडल्याने तिच्या आज्ञेवरून सोमदेवाने हे भाषांतर केले. हेच भाषांतर सर्वाधिक प्रसिद्धी पावलेले आहे. अद्‌भुतरसप्रधान असा हा ग्रंथ फारच मनोरंजक आहे. जगातील बऱ्याच अद्‌भुतकथांवर कथासरित्सागराचे परिणाम झालेले आहेत असे मानले जाते. या ग्रंथातील अनेक कथाबीजे व कल्पनाबंध विविध देशांतील लोक-ग्रंथांत सापडतात.

**पंचतंत्र**

या संस्कृत ग्रंथाला जगातील अनेक भाषांत भाषांतरित होण्याचे भाग्य लाभलेले आहे. या ग्रंथाचा कर्ता विष्णू शर्मा असून तीन विवेकशून्य व अज्ञानी राजकुमारांना नीती व व्यवहार यांचे पाठ देणे हा या ग्रंथाचा मूळ हेतू आहे. पाच तंत्रांत या गोष्टींची विभागणी केलेली असून एकूण ८७ कथा कथन केलेल्या आहेत. त्यांतील बऱ्याच प्राणीकथा असून काही कथा महाभारतातील आहेत. नीतिशिकवण हा या कथांचा उघड हेतू असला तरी ही शिकवण अत्यंत सहजपणे दिलेली असल्यामुळे त्यांची रचना फार आकर्षक व परिणामकारक स्वरूपाची झालेली आहे. स्वाभाविकच पंचतंत्राचा प्रसार भारताबाहेर सर्वाधिक प्रमाणावर झालेला आढळतो. 'सुटसुटीत कथानक, चटकदार आणि मुद्देसूद निवेदनपद्धती, वाक्प्रचारांनी मढलेली भाषा, आणि आटोपशीर रचना ही पंचतंत्राची खास वैशिष्टये होत'.–[११] लोककथांचा साखळीरचना म्हणून जो प्रसिद्ध रचनाप्रकार असतो त्याचा अवलंब पंचतंत्राच्या रचनेत केलेला आहे.

**हितोपदेश**

बंगालचा राजा धवलचंद्र याचे पदरी असणाऱ्या नारायण पंडिताने या ग्रंथाची रचना १४ व्या शतकात केली. यात पंचतंत्रातील काही कथांचाही समावेश आहे.

**वेताल पंचविंशतिका**

चतुर व बुद्धिमान राजा विक्रम याच्या चातुर्याची प्रचीती आणून देणाऱ्या २५ कथा या संग्रहात संकलित केलेल्या आहेत. मराठीत हा ग्रंथ 'वेताळ पंचविशी' या नावाने ओळखला जातो. शिवदास नामक विद्वानाने याची रचना केलेली असून कथासरित्सागरात या कथांचा अंतर्भाव केलेला आढळतो.

**सिंहासन द्वात्रिंशिका**

'सिंहासनबत्तिशी' या नावाने मराठीत ओळखल्या जाणाऱ्या या कथा फार मनोरंजक आहेत.

**शुकसप्तती**

या कथांचा कथनकार एक पोपट आहे. या ग्रंथात ७० कथा असून त्या खूप लोकप्रिय आहेत. 'तूतीनामा' या नावाने झालेला त्यांचा फारसी भाषेतील अनुवादही खूप प्रसिद्ध आहे.

**जातिपुराणकथा**

भारताच्या विस्तृत क्षेत्रात अनेक जातिजमाती राहतात. काही जमातींच्या पुराणकथांच्या धर्तीवर रचलेल्या काही प्रादेशिक जातिपुराणकथा रूढ आहेत, आणि या कथा परंपरेने टिकविलेल्या असतात. या कथांत पारंपरिक पौराणिक कथांतील कल्पनाबंधांपेक्षा निराळे कल्पनाबंध काही वेळा आढळून येतात. काही जमाती परंपरेने देवादिकांच्या कथा सांगण्याचेच काम करतात.

उपरोक्त सर्व प्रकारच्या कथांच्या जोडीला भारतीय समाजात काही चतुर लोकांच्या (बिरबल, नाना फडणवीस, तेनालीराम) कथा तसेच काही ठकसेनांच्या कथा प्रचलित आहेत, लोककथांची भारतीय परंपरा अशी प्राचीन असून अत्यंत समृद्धतेने नटलेली आहे.

**लोकसाहित्याच्या अभ्यासाचा श्रीगणेशा इंग्रजी राजवटीत**

भारतात लोककथांची परंपरा अशी प्राचीन आणि समृद्ध असली तरी

संकलनांच्या मानाने कथांचा अभ्यास मात्र फारसा झालेला आढळत नाही. प्राचीन काळी अमर, भारत, दंडी, विश्वनाथ अशा काही साहित्यशास्त्रज्ञांनी कथेच्या स्वरूपाची थोडीफार चर्चा करण्याचा प्रयत्न केला, तर हरिभद्राचार्य, दिघनिकाय यांनी कथावर्गीकरणाचा प्रयत्न केला. तथापि हे प्रयत्न फारच त्रोटक होते. 'ज्या जिव्हाळ्याने काव्य रीति, अलंकार, छंद वगैरेंची चर्चा, मीमांसा आढळते, तो जिव्हाळा कथेच्या बाबतीत आढळत नाही. असे मत दुर्गाबाई भागवत यांनी नमूद केले आहे.[१२]

अर्वाचीन काळातही युरोपात लोकसाहित्याच्या क्षेत्रात अनेक विद्वान भरीव कार्य करीत असतानाही भारतात मात्र या अभ्यासाचा श्रीगणेशा इंग्रजी राजवट सुरू झाल्यावर झाला व त्याचे श्रेय ब्रिटिश राजवटीस द्यावे लागते. त्यावेळी अनेक इंग्लिश अधिकारी प्रशासनासाठी इकडे आले. धर्मप्रसारासाठी मिशनरीही आले. थोड्याफार कूतुहलापोटी, व बऱ्याचशा स्वार्थापोटी का होईना, त्यांनी एतद्देशीय लोकांचे जीवन, आचारविचार, रूढी, समजुती, कथा, गीते यांची, म्हणजेच भारतीय लोकसाहित्याची संकलने करण्यास सुरुवात केली. आपल्या साम्राज्याचा वा धर्मप्रसाराचा पाया दृढ होण्यासाठी येथील लोकांच्या जीवनवैशिष्ट्यांचे ज्ञान करून घेणे त्यांना आवश्यक होते. त्यासाठी त्यांनी संस्था सुरू केल्या. विल्यम जोन्स, रिचर्ड टेंपल, श्रीमती स्टील, ग्रियर्सन इत्यादी विद्वानांनी या क्षेत्रात बहुमोल कामगिरी केली.

काही काळानंतर भारतीयांनीही लोकसाहित्याच्या अभ्यासक्षेत्रात पाऊले टाकावयास सुरुवात केली. काही लोकांनी इंग्रज विद्वानांना साथ दिली तर काहींनी स्वतंत्रपणे कार्य केले. डॉ. दिनेशचंद्र सेन, पं. राम नरेश त्रिपाठी, वासुदेवशरण अग्रवाल अशा काहीजणांची नावे या संदर्भात उद्धृत करता येतील. लोकसाहित्य-संशोधनासाठी संस्था सुरू झाल्या. त्या संस्थांची नियतकालिके निघू लागली.

**मराठी लोककथांचा अभ्यास**

भारतात लोकसाहित्याचा अभ्यास सुरू झाल्यावर त्याचा एक प्रवाह स्वाभाविकच महाराष्ट्राकडेही वळला. प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रात लोकगीतांच्या संकलनांचे प्राचुर्य दिसून आले तरी कालांतराने लोककथांची संकलनेही प्रसिद्ध झाली. मेरी फ्रियर यांनी संकलित केलेल्या 'Old Deccam Days' या संग्रहात प्रामुख्याने महाराष्ट्रातील कथा होत्या. छत्रे यांनी इसापकथांचे भाषांतर केले. वैद्य यांनी कहाण्यांचे तर दाते यांनी मराठी लोककथांचे दोन संग्रह प्रसिद्ध केले 'भारत इतिहास संशोधक मंडळ' आणि 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' यांच्यातर्फे प्रसृत

होणाऱ्या नियतकालिकांतून राजवाडे, चापेकर, दुर्गा भागवत अशा काही लेखकांनी स्फुट लेखन केले. 'लोककथा' हा रूढ शब्द सुचवण्याचे श्रेय राजवाडे यांचे आहे.

१९५६ साली महाराष्ट्रात लोकसाहित्याच्या विकासासाठी व अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती स्थापन होऊन तिच्यातर्फे लोकसाहित्याची अनेक पुष्पे प्रकाशित होऊ लागली. त्या पुष्पांतून अनेक लोककथा प्रसिद्ध झाल्या. त्यांतून अभ्यासपूर्ण लेखनाचेही काही प्रयत्न झाले. तथापि त्या लोककथांचा शास्त्रीय दृष्टीने अभ्यास करण्याचा प्रयत्न झाला असे मात्र म्हणता येणार नाही. 'भारत इतिहास संशोधक मंडळ', आणि 'महाराष्ट्र साहित्य पत्रिका' यांच्या नियतकालिकांच्या लिखाणातून दिसून येणारे शास्त्रीय लेखनाचे प्रयत्न पुढे खंडित झालेले दिसतात.

### लोककथाविषयक मराठी ग्रंथ

मराठीत आता लोकसाहित्यावरील बरेच लेखन ग्रंथरूपाने प्रसिद्ध झालेले आहे. त्यांतील काही ग्रंथ लोककथाप्रकारांवर प्रकाश पाडतात. दुर्गाबाई भागवत यांच्या 'लोकसाहित्याची रूपरेखा' या विद्वत्तापूर्ण शास्त्रीय ग्रंथात लोककथांच्या सर्व प्रमुख प्रकारांचा विस्तृत परामर्श घेतलेला आहे. मालनीबाई दांडेकर यांनी 'लोककथा कल्पलता' या ग्रंथांत लोककथांची उत्पत्ती, विविध प्रकार, पात्रे वातावरण अशा सर्व विषयांना स्पर्श केलेला आहे. मराठी लोककथांचे संदर्भ या दोन्ही ग्रंथांच्या विवेचनांत मधूनमधून येत असले तरी या दोन्ही ग्रंथांचा वर्ण्य-विषय 'लोककथा' हा आहे, 'मराठी लोककथा' हा नाही. डॉ. सरोजिनी बाबर यांचा 'मराठी लोककथा' हा ग्रंथ मात्र मराठी लोककथांच्या स्वरूपाचे विवेचन करतो. तथापि त्यातही शास्त्रीय अभ्यासाची दृष्टी आढळत नाही. मराठी लोककथांतील कथाविशेष, कल्पनाबंध, त्यांतील पात्रे, समाजचित्रण, लोकसमजुतींचे दर्शन इत्यादी पैलूंवर प्रकाश टाकण्याचे काम अद्याप व्हावयाचे आहे. अशा तऱ्हेचा प्रयत्न प्रस्तुत पुस्तकात केलेला आहे.

### प्रक्षिप्त लोककथांचा अडथळा

प्रारंभीच्या काळात लोककथांच्या तुलनेने लोकगीतांचीच संकलने मोठ्या प्रमाणावर झाल्याने लोककथांकडे विद्वानांचे दुर्लक्ष झाले. अभ्यासकांच्या रसिकवृत्तीच्या वर्चस्वामुळेही शास्त्रीय अभ्यासाची उपेक्षा झाली. आजकाल प्रक्षिप्त लोककथांचे प्रमाण वाढू लागल्यानेही शास्त्रीय अभ्यासाच्या मार्गात अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत. जर्मनी, चीन, रशिया, अशा काही देशांत जसे त्या त्या शासनाच्या विचारसारणीच्या प्रचारार्थ अनुकूल असे लोकवाङ्मय मुद्दाम निर्माण केले जाते, तसे लोककथा मुद्दाम निर्माण करण्याचे वा मूळची लोककथा आपल्या

स्वत:च्या खास शैलीत पुर्नलिखित करून प्रसिद्ध करण्याचे प्रयत्न आज काही मान्यवर लेखक करताना दिसतात. अशा लोकसाहित्याला Falklore या (प्रक्षिप्त लोकसाहित्य ) असे नामाभिधान दिले जाते. मराठी लोककथांच्या संदर्भातही असा प्रकार उद्‌भवू लागला आहे. शास्त्रीय दृष्टीने लोककथांचा अभ्यास करणाराने त्यामुळे सावधगिरी बाळगणे जरूर आहे.

**अभ्याससामग्री**

ज्या प्रकाशित वा अप्रकाशित मराठी लोककथांना आधारभूत मानून व त्यातील उदाहरणे उद्‌धृत करून या पुस्तकाचा प्रपंच मांडला आहे त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे, आणि काही संकलनांची पुढील प्रकरणात वापरलेली संक्षिप्त रूपे त्या त्या संकलनाच्या नावापुढे दिली आहेत.

| प्रकाशित संग्रह | | संक्षिप्त रूप |
|---|---|---|
| १) महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला पुष्प १ | | पुष्प १ |
| २) महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला पुष्प २ | | पुष्प २ |
| ३) महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला पुष्प ३ | | पुष्प ३ |
| ४) महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला पुष्प ४ | | पुष्प ४ |
| ५) मराठी लोककथा भाग १ (सं. शं. ग. दाते) | | दाते १ |
| ६) मराठी लोककथा भाग २ (सं. शं. ग. दाते) | | दाते २ |
| ७) मराठी लोककथा (डॉ. सरोजिनी बाबर) | | |
| ८) मराठवाड्यातील लोककथा (डॉ. यू. म. पठाण) | | |
| ९) एक होता राजा | (महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती प्रकाशन) | |
| १०) तीर्थांचे सागर | ( ,, ,, ,, ,, ,, ) | |
| ११) राजविलासी केवडा | ( ,, ,, ,, ,, ,, ) | |
| १२) सांगीवांगी | ( ,, ,, ,, ,, ,, ) | |
| १३) सुंबरानं मांडीलं | ( सं. डॉ. सरोजिनी बाबर) | |
| १४) खानदेशी लोककथा | (सं. य. भि. पाटील) | |
| १५) सासुरवास | (सं. राम काळे) | |
| १६) वैजयंती (महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती प्रकाशन) | | पुष्प २३ |
| १७) सचित्र कहाण्या भाग १ | | |
| १८) सचित्र कहाण्या भाग २ | | |

**अप्रकाशित संग्रह**

१) डॉ. प्रभाकर मांडे यांच्या संग्रहातील अप्रकाशित लोककथा. हस्तलिखित

**अभ्यासाची स्वीकृत दिशा**

लोकसाहित्याच्या क्षेत्रात जागतिक पातळीवर रूढ असणाऱ्या कोणत्याही, विशिष्ट पद्धतीचा अवलंब न करता दोन वेगळ्याच दृष्टिकोनातून मराठी लोककथांच्या अभ्यासक्षेत्रात पाऊल टाकण्याचा हा प्रातिनिधिक प्रयत्न आहे.

अ) मराठी लोककथांची विश्वात्मकता तपासून पाहणे म्हणजेच मराठी लोककथांचे जागतिक पातळीवरील लोककथांच्या रचनेशी असणारे साम्य शोधण्याचा प्रयत्न करणे आणि हे साम्य शोधताना मराठी लोककथांच्या काही विश्लेषण दिशांचा निर्देश करणे.

ब) मराठी लोककथांच्या अंतरंगाचा शोध घेणे आणि मराठी लोककथा विश्वात्मक असली तरी तिच्या अंतरंगातून तिची प्रदेशविशिष्टताही कशी प्रकट होते याचा ऊहापोह करणे.

पुढील प्रकरणांतून उपरोक्त दुहेरी दृष्टिकोनातून मराठी लोककथांचा परामर्श घेतला आहे.

## प्रकरण २ रे

# मराठी लोककथांचे वर्गीकरण आणि त्यांचे ठळक विशेष

शास्त्रीय अभ्यासात अभ्याससामग्रीचे वर्गीकरण ही अभ्यासाची कोणत्याही विषयाची पहिली पायरी असते. लोकवाङ्मयातील कोणत्याही विभागाचा पद्धतशीर अभ्यास करावयाचा असल्यास अभ्यासाची दिशा कशी असावी याबद्दल केनेथ आणि मेरी क्लार्क यांनी केलेले प्रतिपादन असे आहे – १) मौखिक परंपरेचे नमुने गोळा करणे, २) व्यवस्थित अभ्यासासाठी त्यांचे वर्गीकरण करणे आणि ३) सामग्रीच्या प्रामाणिक मूल्यमापनातून निष्कर्ष काढणे.–[१] प्रस्तुत ग्रंथासाठी उपयोगात आणलेल्या अभ्याससामग्रीचा तपशील पहिल्या प्रकरणात दिलेला आहेच. आता त्या लोककथांच्या अभ्यासासाठी त्यांचे योग्य वर्गीकरण करणे जरूर आहे.

### लोककथेच्या वर्गीकरणाचे प्राचीन व अर्वाचीन प्रयत्न

प्रत्यक्ष अभ्याससामग्रीचे वर्गीकरण करण्यापूर्वी लोककथा या लोकवाङ्मयप्रकारांचे वर्गीकरण करण्याचे जे प्रयत्न प्राचीन व अर्वाचीन काळात झाले आहेत त्यांचा संक्षिप्त आढावा घेणे योग्य ठरेल. कथावस्तूंच्या तुलनेने त्यांचे पर्याय अनेक सापडत असल्यामुळे सर्वसमावेशक, निर्दोष असे वर्गीकरण करणे काहीसे कठीण असले तरी त्या दिशेनें अनेक विद्वानांनी प्रयत्न केलेले आहेत. लोककथांचे वर्गीकरण करताना कथेचा आशय आणि कथेची रचना असे दोन निकष मानले जातात. तथापि आशयाधिष्ठित वर्गीकरणाचे प्रयत्न जास्त झालेले असून त्यांच्या अनुषंगाने रचनेची चर्चा केलेली आढळते.

### प्राचीन प्रयत्न

लोककथांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न फार प्राचीन काळापासून भारतात झाला आहे. त्याकाळी कथेचे दोन प्रमुख विभाग मानण्यात आले.

**१) कथा**

जिला वास्तवाचा आधार नाही, जी कल्पनेतून निर्माण होते तिला कथा म्हणावयाचे. कथेच्या या अवास्तव रूपाकडेच प्राचीन भारतीय साहित्यशास्त्रज्ञांनी

अधिक निर्देश केलेला आढळतो. भरताने कथेचे रूप सांगताना 'बव्हनृता स्तोकसत्वा' (खूपशी खोटी व अगदी थोडी खरी) असे प्रतिपादन केले आहे. अमर, कोलाहलाचार्य यांनीही या मताला पुष्टी दिली आहे.

२) **आख्यायिका**

'आख्यायिका' या कथेच्या दुसऱ्या विभागात कथेला सत्याचा आधार असतो. केवळ कल्पनाकथा असे तिचे स्वरूप नसून कुठली तरी सत्यघटना, व्यक्ती यांचा तिला आधार असतो.

### हरिभद्राचार्य यांनी केलेले वर्गीकरण

हरिभद्राचार्य यांनी कथांचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन भिन्न भिन्न उद्दिष्टांनुसार कथांचे वर्ग मानलेले आहेत. – १) अर्थकथा, २) कामकथा, ३) धर्मकथा, ४) संकीर्णकथा. अर्थप्राप्तीच्या उद्देशाने सांगितलेल्या त्या अर्थकथा, तर प्रेमविषयावर आधारित त्या प्रेमकथा. माणसाच्या धार्मिक भावनांचे पोषण करणाऱ्या त्या धर्मकथा होत आणि संकीर्ण कथा या सामान्य लोकांचे मनोरंजन करणाऱ्या असून त्यांच्या कथनामागे वा श्रवणामागे धार्मिक हेतू नसतो.

### आनंदवर्धन यांनी केलेले वर्गीकरण

आनंदवर्धन यांनी कथांचे तीन विभाग मानले आहेत. १) परीकथा, २) सकलकथा ३) खडकथा. परीकथा हा विभाग अद्भुतरसप्रधान व दैवी सृष्टी वर्णन करणारा आहे. सकलनकथेत पूर्णकथा (पूर्ण वर्णन) असते तर खंडकथेत कुठल्यातरी विशिष्ट प्रदेशातील विशेष प्रकट केले जातात.

### दिघनिकाय यांनी केलेले वर्गीकरण

दिघनिकाय यांनी लोककथांचे ब्रह्मजालसूत्रांत वर्गीकरण केले आहे. त्यावरून त्यांच्या अभ्यासाची प्रगल्भता व सखोलपणा दिसून येतो. त्यांनी एकूण सर्व प्रकारच्या कथांना 'भवाभवकथा' अशी संज्ञा देऊन त्यांचे एकूण २७ उपविभाग कल्पिले आहेत. १) राजकथा, २) चोरकथा, ३) महामात्रकथा, ४) सेनाकथा, ५) भयकथा, ६) युद्धकथा, ७) अन्नकथा, ८) पानकथा, ९) वस्त्रकथा, १०) शयनकथा, ११) मालाकथा, १२) गंधकथा, १३) ज्ञातिकथा, १४) यानकथा, १५) ग्रामकथा, १६) निगमकथा, १७) नगरकथा, १८) जानपदकथा, १९) स्त्रीकथा, २०) पुरुषकथा, २१) शूरकथा, २२) विशिखाकथा, २३) अद्भुतकथा, २४) पूर्वकथा, २५) निरर्थककथा, २६) लोकाख्यायिका, २७) समुद्राख्यायिका. प्रस्तुत वर्गीकरणावरून असे म्हणावयास हरकत नाही की लोककथा सकलजीवन समावेशक असून समाजातील सर्व थरांचे चित्रण त्यांत येत असे.

### अर्वाचीन प्रयत्न

प्राचीन काळी लोककथांचे वर्गीकरण करण्याचे प्रयत्न भारतात जसे झाले तसे पाश्चात्य देशांत झालेले आढळत नाहीत. तथापि अर्वाचीन काळात मात्र पाश्चात्य विद्वानांनी या बाबतीत आघाडी मारलेली असून आता भारतीय अभ्यास–कांनाच त्यांच्या वर्गीकरणाचा आधार घ्यावा लागलेला दिसतो. काही पाश्चात्य विद्वानांनी सादर केलेली वर्गीकरणे पुढीलप्रमाणे आहेत.

### लिंडा डेघ

लिंडा डेघ या विदुषीने लोककथांचे तीन प्रकार मानले आहेत. – १) लोककथा, २) दंतकथा आणि ३) अनुभवकथा. रचनादृष्ट्याही लिंडा डेघ यांनी कथेचे १) संमिश्र कथा आणि २) साधी कथा असे दोन विभाग केले आहेत.

### सर जॉर्ज गॉम

सर जॉर्ज गॉम यांनी लोककथांना ऐतिहासिकदृष्ट्या महत्वपूर्ण स्थान देऊन त्यांचे चार प्रकार मानले आहेत. १) लोककथा, २) पराक्रमकथा, ३) लोककथा-गीत, ४) स्थानांसंबंधी दंतकथा व आख्यायिका.

### अँटी आन

अँटी आर्ने या सुप्रसिद्ध लोकसाहित्यविशारदाने लोककथांचे तीन प्रमुख प्रकार मानले आहेत. १) प्राणिकथा, २), लोककथा, ३) परिहासकथा किंवा विनोदी चुटके. त्यांनी या प्रत्येक विभागाचे कथेच्या आशयानुसार उपविभाग पाडले आहेत.

### स्टिथ थॉम्पसन्

स्टिथ थॉम्पसन् यांचा लोककथांचा अभ्यास अत्यंत विस्तृत व सखोल आहे. त्यांनी लोककथांचे ५ विभाग केलेले आहेत. १) लोकगीतकथा, स्थानिक दंतकथा किंवा आख्यायिका, ३) प्राणीकथा, ४) नीतिकथा, ५) दैवतकथा.

भारतामध्ये लोककथांचा अभ्यास सुरू झाल्यावर येथील काही मान्यवर विद्वानांनी लोककथांचे वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

### डॉ. सत्येंद्र

डॉ. सत्येंद्र यांनी लोककथांचे वर्गीकरण ७ विभागांत केले आहे. १) लोक–गीतकथा, २) प्राणीकथा किंवा पंचतंत्रीय कथा, ३) परीकथा, ४) पराक्रमकथा, ५) कूटकथा, ६) निरीक्षणगर्भितकथा, ७) बालकथा.

**डॉ. दिनेशचंद्र सेन**

डॉ. दिनेशचंद्र सेन या बगाली अभ्यासकांनी लोककथांचे वर्गीकरण चार विभागांत केले आहे.

१) रूपकथा (Supernatural Tales), २) हास्यकथा, ३) व्रतकथा, ४) गीतकथा.

**डॉ. कृष्णदेव उपाध्याय**

डॉ. कृष्णदेव उपाध्याय यांनी प्रस्तुत केलेले वर्गीकरण पुढीलप्रमाणे आहे – १) उपदेशकथा, २) व्रतकथा, ३) प्रेमकथा, ४) मनोरंजन कथा, ५) सामाजिक कथा, ६) पौराणिक कथा.

**रचनाधिष्ठित वर्गीकरण**

कथेतील वर्ण्यविषयाच्या अनुरोधाने आणि कथेचा हेतू लक्षात घेऊन लोककथांचे वर्गीकरण करण्याचे अनेक प्रयत्न झाले. रचनाधिष्ठित वर्गीकरणाचा प्रयत्न फारसा झाला नाही हे खरे, तथापि रचनादृष्टया लोककथांचे काही प्रकार सर्वमान्य झालेले आहेत. कथाबीजांची आणि कल्पनाबंधांची गुंफण कथेत कशा तऱ्हेने होते याचा विचार येथे प्रामुख्याने केलेला आहे.

रचनादृष्टया लोककथांचे स्थूलमानाने वर्गीकरण – १) गद्यकथा, २) पद्यकथा किंवा लोककथागीत आणि ३) गद्यपद्यांच्या सीमेवर असणाऱ्या चूर्णिकेसारख्या कथा, असे करावे लागेल. एकापेक्षा अधिक कथा जेव्हा एकत्रितपणे गुंफलेल्या आढळतात तेव्हा त्या कथांच्या विशिष्ट गुंफणीतून आणि रचनेतून जे वेगवेगळे रचनाप्रकार संभवतात ते असे –

१) कोणत्यातरी एका सूत्राभोवती रचलेल्या कथा अनेक व्यक्ती एकानंतर एक अशा सांगतात. काही वेळा त्यांचा एकमेकींशी संबंध देखील नसतो. मालतीबाई दांडेकर यांनी या प्रकाराला 'स्तबक कहाणी' असे नाव दिले असून एका काश्मिरी लोककथेचे (The Shipwrecked Prince) उदाहरण दिले आहे. त्यात चार राण्या एकाच हकीगतीचा एकेक भाग कथन करतात आणि त्यामुळे कथा पूर्ण होते.

२) हा कथारचनाप्रकार 'साखळीकथा' किंवा 'श्रृंखलाकहाणी' या नावाने ओळखला जातो. यात पहिल्या कथेतून दुसरी, दुसरीतून तिसरी याप्रमाणे कथांची साखळी सुरू होते. हा रचनाप्रकार अत्यंत लोकप्रिय असून पंचतंत्र, अरेबियन नाइट्स्, बृहत्कथा आणि जैन वाङ्मयांत हे साखळी – कथेचे तंत्र अवलंबिलेले आहे.

३) या रचनाप्रकारात पहिल्या कथेमध्ये एक तत्त्व प्रतिपादन केलेले असते व त्यातून सलग परंतु नवीन कथांची मालिका सुरू होते. वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी अशा काही ग्रंथांत हे तंत्र आढळते. मूळ तत्त्वबोधाकडे निर्देश करण्याच्या कथेच्या वैशिष्टयामुळे या तंत्राला मालतीबाई दांडेकर यांनी 'बूमरँग कहाणी' असे नाव दिलेले आहे.

४) हा रचनाप्रकार साखळी रचनेच्या तंत्राचाच असतो तथापि यातील प्रत्येक कथेला स्वतंत्र अस्तित्व असते.

५) कोणत्याही एका कथाबीजाभोवती इतर कथांची गुंफण केलेली या प्रकारात आढळते. जी मुख्य कथा अनेक पोटकथांनी खुलते तिला चौकटकथा (Frame Story) असे म्हटले जाते.

**मराठी लोककथांचे वर्गीकरण आणि परस्परप्रमाण**

उपरोक्त काही ठळक वर्गीकरणाच्या प्रयत्नांवरून लोककथांचे काटेकोर वर्गीकरण करणे किती अवघड आहे याची सहज कल्पना येऊ शकते. एकच कथा काही वेळा दोन वेगवेगळ्या प्रकारांतही अंतर्भूत होणे शक्य असते. वर्गीकरणातील सर्व अडचणी गृहीत धरूनही अभ्यासार्थ घेतलेल्या मराठी लोककथांचा आशय, उद्देश, परिणाम आणि रचना यांच्या दृष्टीने वर्गीकरण केल्यावर असे दिसून आले की, लोककथांचे जागतिक पातळीवर मानले जाणारे सर्व प्रमुख प्रकार मराठी लोक-कथांत आढळतात. अर्थात् या सर्व प्रकारांचे प्रमाण मात्र एकसारखे आहे असे नाही. काही प्रकारांचे प्रतिनिधित्व अत्यल्प आहे, तर काही प्रकारांचे प्रावल्य आहे. मला उपलब्ध झालेल्या मराठी लोककथांचे वर्गीकरण व त्यांतील प्रकारांचे परस्परप्रमाण साधारणतः पुढीलप्रमाणे मांडता येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| १) दैवतकथा | दैवतकथा | – | २ |
| | उत्पत्तिकथा | – | १८ |
| | व्रतकथा | – | ३१ |
| २) अद्‌भुतकथा | | – | १२८ |
| ३) दंतकथा | | – | १०१ |
| ४) वास्तवकथा | | – | ४५ |
| ५) स्पष्टीकरणकथा | | – | २० |
| ६) प्राणीकथा | | – | ३४ |
| ७) हास्यकथा | | – | ६४ |
| ८) मालाकथा | | – | ५ |
| ९) संकीर्ण | | – | ५ |

## लोककथाप्रकारांची लक्षणे आणि त्यांची मराठी उदाहरणे

लोककथांचे वर्गीकरण करताना प्रमुख लोकथाप्रकारांची जी सर्वसामान्य लक्षणे व वैशिष्टचे बहुमान्य झालेली आहेत त्यांचा परिचय असणे जरूरीचे आहे. उपलब्ध मराठी लोककथांचे वर्गीकरण ज्या प्रकारांत केले आहे त्या प्रकारांचा मराठी लोककथांतील उदाहरणांसह परिचय येथे करवून दिलेला आहे.

### दैवतकथा (Myth)

दैवतकथा हा लोककथांचा एक महत्त्वपूर्ण व वैशिष्टयपूर्ण प्रकार आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासाचा श्रीगणेशा दैवतकथांच्या अभ्यासानेच झालेला आहे. दैवतकथेला पुराकथा, पुराणकथा, पवित्राख्यान, दिव्यकथा असेही पर्यायी शब्द वापरले जातात. तथापि दैवतकथा हाच शब्द मान्य व रूढ झालेला आहे.

'देव, यक्ष, गंधर्व किंवा संस्कृतिवीर यांच्यांशी संबंधित असलेल्या कथा म्हणजे दैवतकथा होत. जगाची उत्पत्ती आणि त्याच्या वर्तमान स्थितीची स्थापना, मानव, समूह किंवा संस्कृतिवैशिष्टय यांचा उगम यांच्यांशी त्यांचा संबंध असतो.-[२] मानवसमाजाच्या आद्यतम कथा दैवतकथा आहेत. हा लोकसाहित्यशास्त्रातील महत्त्वाचा सिद्धांत आहे. या अफाट विश्वातील चमत्कारांनी आदिम मानवाचे मन किती भयचकित झाले असेल याची कल्पना आजच्या विज्ञानयुगात येणे अवघड आहे. प्राचीन काळी या चमत्कृतींची संगती कथारूपाने लावण्याचा माणसाने प्रयत्न केला. या कथा म्हणजेच दैवतकथा होत. त्यामुळे प्राचीनता हे दैवतकथांचे एक प्रमुख वैशिष्टय मानले जाते. दैवतकथा हा मानवजातीचा प्रारंभकालचा इतिहास आणि अधिभौतिक शास्त्र आहे', असे अँड्रयू लँग यांचे मत आहे तर 'दैवतकथांच्या रूपाने प्राचीन विज्ञान कथावेषात सामोरे येते'–[३] असे मालतीबाई दांडेकर यांनी म्हटले आहे.

या विश्वाचे चक्र सुरळीतपणे चालू ठेवणाऱ्या विविध शक्तींना माणसाने कालांतराने देवतांची रूपे कल्पिली, आणि या विविध देवतांबद्दलही कथा निर्माण होऊ लागल्या. दैवतकथा या जगाचा, मानवजातीचा आणि मृत्यूचा उगम, पक्षी, प्राणी, भौगोलिक स्वरूप, निसर्गचमत्कार इत्यादींची वैशिष्चे यांचो माहिती देतात. देवांच्या कृती, त्यांची प्रेमप्रकरणे, त्यांचे कौटुंबिक संबंध, त्यांचे मित्रत्व व शत्रुत्व, त्यांचे जयपराजय, यांचीही हकीगत त्या कथन करतात.–[४] विश्वाच्या निर्मात्याबद्दल वाटणाऱ्या वर्धिष्णू कूतुहलाबद्दल निर्माण झालेल्या देवतांची कृपादृष्टी आपल्यावर असावी या प्रबल हेतूने विविध धर्मसंप्रदाय पृथ्वीवर निर्माण झाले. या धर्माधिष्ठित आचारविचारांच्या प्रतिपादनासाठी दैवतकथांचा उपयोग

होऊ लागला आणि त्याही धर्मासारख्याच पवित्र मानल्या जाऊ लागल्या. प्रत्येक धर्मातील वेगवेगळी दैवते, त्यांचे जन्म, अवतारकार्य, शत्रू, मित्र, पराक्रम इत्यादी विषयांवर हजारो दैवतकथा निर्माण झाल्या आहेत आणि त्या परंपरेने जतन केल्या जात आहेत. पूज्य व पवित्र दैवतकथांना लोक काल्पनिक मानीत नाहीत तर त्यांच्या सत्यतेवर त्यांची दृढ श्रद्धा असते.

दैवतकथेभोवती धार्मिकतेचे व पावित्र्याचे असे वलय असल्यामुळे तिच्यात बदल करणे निषिद्ध मानले जाते. 'धार्मिक भावनेच्या प्रभावामुळे अत्यंत परिवर्तनशील जमाती देखील अतिशय पुराणमतवादी बनतात आणि त्यामुळे पवित्र व्यक्तींबद्दलच्या परंपरा, पित्याकडून मुलाकडे, अगदी अपरिवर्तित स्वरूपातच संक्रांत केल्या जातात,–[५] असे हार्टलंड यांनी म्हटले आहे. केवळ कथाकथकच नव्हे तर श्रोतेही कथेतील बदलाला अनुकूल नसतात असेही त्यांनी नमूद केले आहे. प्राचीन काळापासून, नेमक्या ज्या शब्दांत कथा सांगितल्या जात आहेत, नेमक्या त्याच शब्दांत आपल्या कथाकथकांनीही कथा सांगाव्यात अशी काही लोकांची अपेक्षा असते. त्यांत बदल करण्यास त्यांची अनुज्ञा नसते. ते त्यांच्या परंपरा निर्दोषपणे आणि कमीतकमी बदल होईल अशा तऱ्हेने जतन करतात.-[६] कथाकथकाने कथेमध्ये स्वतःच्या कल्पनेचा भाग किंवा काही स्थानिक संदर्भ मिसळले तर त्याला Gag असे म्हणतात. दैवतकथांत Gag ला मज्जाव असतो. बरेच वेळा कथेची केवळ संहिताच नव्हे तर कथाकथनात कथाकथकाच्या होणाऱ्या हालचाली मुद्राभिनय इत्यादींबद्दलचे संकेतही कथाकथक व श्रोते या दोहोंच्याही मनात पक्के रुजलेले असतात. दैवतकथांना अबाधित राखणाऱ्या या प्रवृत्तीचे परिणाम मात्र काही वेळा फार विचित्र होतात. 'ऐच्छिक बदलाच्या अनिच्छेमुळे ज्या सिद्धांतसंग्रहांचे (Formularies) आकलन होणे केव्हाच खंडित झाले आहे त्यांतही सुधारणा करण्यास मज्जाव होतो आणि त्यांचा अर्थ नष्ट झाल्यामुळे ते बरेच वेळा हास्यास्पदही होतात.'–[७]

दैवतकथांच्या उपरोक्त लक्षणांवरून ही गोष्ट ओघानेच येते की दैवतकथांत अद्‌भुततेचे विपुल प्रमाण असते. देवतांच्या अंगी स्वयंभू अद्‌भुतता मानली जाते. तसेच निसर्गातील वरुण, अग्नी, सूर्य, चंद्र, वायू, नक्षत्रे, पशुपक्षी यांचे एकीकडे मानवीकरण केले जाते तर दुसरीकडे त्यांच्या अंगी अतिमानवी शक्ती प्रदान केलेली आढळते.

उत्पत्तिकथा हा दैवतकथांचाच एक विभाग मानला जातो. त्यांत स्त्री–पुरुषभेद, माणसाच्या शरीरावरील खाणाखुणा अशांसारख्या गोष्टी कशा निर्माण

झाल्या याबद्दल कथा सांगितली जाते. भारतात असणाऱ्या विविध जातीजमाती कशा निर्माण झाल्या यांसंबंधीच्या उत्पत्तिकथाही रूढ आहेत. उत्पत्तीकथांतील अद्भुतताही विश्वसनीय मानली जाते.

काही दैवतकथांचा संबंध धार्मिक विधींशी जोडलेला असतो. एखादा धार्मिक विधी का करावा, कसा करावा, केव्हा करावा याचे स्पष्टीकरण तर त्या विधिकथेत असतेच, शिवाय ती विधिकथा त्या विधीचाच एक अविभाज्य घटक असते. आपल्या महाराष्ट्रात प्रसृत असणाऱ्या धार्मिक कहाण्या हा विधि-कथांचाच प्रकार आहे.

मराठी लोककथांत शुद्ध दैवतकथा अत्यल्प प्रमाणात आहेत. त्यामानाने उत्पत्तिकथांची संख्या थोडी अधिक आहे आणि विधिकथांची (व्रतकथा वा कहाणी) संख्या सर्वांत जास्त असून त्या खूप लोकप्रिय आहेत.
उदाहरणे :

**१) आकाश उंच कसे गेले ?**

पूर्वी आकाश खूप खाली होते. एकदा कांडताना एका बाईचे मुसळ लागल्याने ते घाबरून वर गेले. (दाते १ – कथा ११).

**२) गव्हावर खूण का ?**

गहू व हरबरा यांच्यात श्रेष्ठ कोण असा वाद – देवाने हरबरा श्रेष्ठ असा निर्णय दिला कारण हरबरा तसाच खाता येतो पण गहू खाता येत नाही. गव्हाने दुःखाने उरावर घाव घालून घेतला – घावाची खूण अद्याप गव्हावर दिसून येते. (दाते १ – कथा १४).

**३) रात्रंदिनबाई**

सूर्य, चंद्र, ताराबाई रात्रंदिनबाईची मुले – मुलांना दुसऱ्याकडे जेवणाचे आमंत्रण – सूर्याने आईसाठी अन्न आणले नाही म्हणून त्याचे घर सतत उन्हात राहते व लोकही त्याच्याकडे पाहात नाहीत — चंद्राने थोडे अन्न आणले म्हणून त्याचे घर सावलीत आहे तरी त्याचे तोंड सतत पाहिले जात नाही. ताराबाईने पुरेसे अन्न आणले म्हणून ती मात्र सतत आईजवळ राहते (पुष्प १ कथा ३).

**परीकथा किंवा अद्भुत कथा** (Fairy Tales)

अद्भुतकथा हा जगात विपुल प्रमाणावर आढळणारा एक लोककथाप्रकार आहे. त्यासाठी परीकथा (Fairy tales) असा शब्द बराच रूढ असला तरी परी

म्हणजे एक विशिष्ठ अतिमानवी योनी डोळ्यासमोर येत असल्यामुळे परीकथेपेक्षा अद्‌भुतकथा हीच संज्ञा अधिक समर्पक वाटते.

'प्रारंभी गरीब आणि निराश्रित असलेल्या, परंतु नंतर, अद्‌भुतशक्तीचा महत्त्वपूर्ण वाटा असलेल्या काही साहसमालिकांनंतर आपले ध्येय साध्य करून नंतर सदैव सुखात राहणाऱ्या नायक वा नायिकेभोवती केंद्रीभूत झालेली, विनोद वर्ज्य नसला तरी सामान्यतः गंभीर स्वरुपाची आणि ठराविक लांबीची गद्यकथा म्हणजे परिकथा होय.'[८] अद्‌भुतकथेची जवळ जवळ सर्व लक्षणे या प्रदीर्घ वाक्यात व्यक्त झालेली आहेत. अद्‌भुतता हा अद्‌भुतकथेचा प्राण आहे. किंबहुना 'अदभुतकथा' या शब्दातच या प्रकाराचे वर्णन आहे. अद्‌भुतकथेचे जग नेहमीच्या जगापेक्षा फार फार भिन्न असते. अतिमानवी स्वरूपाचे असते. या कथा प्रामुख्याने मनोरंजनासाठी सांगितल्या जातात. दैवतकथेसारखी समाजाला वळण लावण्याची जबाबदारी त्यांच्यावर नसते. त्यांतून बोध काढताच येणार नाही असे नसले तरी तो त्यांचा हेतू नव्हे. करमणूक हेच त्यांचे मुख्य प्रयोजन. दैवतकथांतील अद्‌भुततेवर लोकांचा पूर्ण विश्वास असतो तथापि अद्‌भुतकथेच्या सत्यतेची कोणी चिकित्सा करीत नाही. किंबहुना त्या खऱ्या नाहीतच याबद्दलच सर्वांची खात्री असते. बरीचशी खोटी व अगदी थोडीशीच खरी ही कथेची व्याख्या अद्‌भुतकथेला सर्वात जास्त लागू पडते. त्यांत कल्पनाशक्तीचा वारू स्वैर उधळत असतो. कथेची सर्व सूत्रे कल्पनाशक्तीच्या हातात असल्यामुळे तर्कशास्त्र किंवा अनुभूती यांना अद्‌भुतकथेच्या संदर्भात मुळीच महत्व नसते. कथाकथन व श्रोते या दोघांनाही या जगाच्या कल्पिततेची पूर्ण जाणीव असते.

अद्‌भुतता हीच या कथांची संजीवनी असल्यामुळे अदभुततेचे आणि अतिमानवी शक्तींचे वैचित्र्यपूर्ण दर्शन या कथांतून होते. कल्पनाशक्तीला कुठलेच बंधन नसल्यामुळे त्यांतील पत्रांचीही मानवी बंधनातून आपोआपच सुटका होते. त्यांच्या संचाराला स्थलकालाची मर्यादा नसते. त्यातील माणसे सर्वसंचारी (स्वर्ग पाताळात जाऊन परत येतात.) असतात. चिरतरुण असतात. या बंधनरहिततेमुळे अद्‌भुतकथांत अतिशयोक्ती सहजपणे प्रवेश करते. अतिसद्‌गुणी नायक वा नायिका, अत्यंत दुर्गुणा खलपात्रे स्थळांची अतिशयोक्त वर्णने यांचे दर्शन घडोघडी होते. अर्थात् अतिसुष्ट आणि अतिदुष्ट पात्रांच्या चित्रणातील विरोधाभासामुळे अद्‌भुतकथेत नाट्यात्मकता आणि कारुण्यपूर्ण वातावरण निर्माण होते. जादूचे प्राबल्य, रूपांतराची प्रचुरता यांच्यामुळे या वातावरणाला आणखी रंगत चढते, आणि या वातावरणाचीच मानवी मनाला अतिशय ओढ असते.

अद्भुतकथांची रचना सरळमार्गी सहसा नसते. तिच्या रचनेत घटनांचा ओघ सरळ न राहता त्यात वारंवार वळणे व गुंतागुंत दिसून येते. तथापि हा रचनाबंध बराचसा सांकेतिक व ठराविक स्वरूपाचा असतो. त्यातील पात्रांतही विशेष विविधता आढळत नाही. सद्गुणी परंतु संकटग्रस्त नायक वा नायिका, दुर्गुणी खलपात्रे आणि नायक–नायिकेला मदत देऊन संकटमुक्त करणारी अतिमानवी पात्रे असे ठराविक चित्रण या कथांत आढळते. कथेचे सुखान्त रूप हेही अद्भुतकथेचे आणखी एक वैशिष्टय आहे. दुःखान्त अद्भुतकथा ही अपवादानेच आढळेल. काव्यगत न्याय ( Poetic Justice ) हे लोककथेचे वैशिष्टय अद्भुतकथेत प्रकर्षाने दिसून येते.

मराठी लोककथांत अद्भुतकथांचे प्राबल्य आढळते. अद्भुततेचे आणि अतिमानवी शक्तीचे वैचित्र्यपूर्ण दर्शन या कथांतून प्रचुरतेने घडते. दुखी नायक–नायिकांना त्यांच्यावरील संकटातून पार करण्यासाठी मिळणारी अद्भुत व अतिमानवी मदत हे या अद्भुततेचे प्रमुख सूत्र आहे. एखादी अतिमानवी शक्ती स्वतःच मदतीला धावते किंवा संकटग्रस्ताला अद्भुत वस्तू प्रदान करून संकटमुक्त करते. रूपान्तराचे साहय्यही अनेक वेळा घेतले जाते. उदा–

**१) म्हातारी**

हरिभक्त म्हातारी — पंढरपूरयात्रेला जायची इच्छा — मुले व मुली पैसे देईनात – मुले वाऱ्याने उडाली व मुली घारींनी पळविल्या — होते तेवढे पैसे घेऊन म्हातारीचे पंढरपूरला प्रयाण – नदीला मोठा पूर – पांडुरंगाने कोळ्याच्या रूपाने पाठीवरून तिला सुखरूप पार केले — खांद्यावरून पटकन् देवळात नेऊन ठेवले व गुप्त झाला – म्हातारी चेटकी अशी लोकांची समजूत – तिच्या द्वादशीच्या पारण्याला कोणी येईना – पांडुरंग स्वतः गुराखी रूपाने आले – ओल्या गोवऱ्या पेटवून दिल्या – जेवताना स्वतःचे खरे रूप प्रकट – जेवणाला खूप गर्दी – पांडुरंग-रुक्मिणी स्वतः वाढायला – म्हातारी तृप्त. (सुंबरान मांडीलं – कथा ३).

**२) गातेलं झाड**

दोन राजपुत्र व एक राजकन्या – या भावंडांना सावत्र आईने जन्मतःच – पळवून उकिरड्यावर फेकले व प्रत्येक वेळी त्यांच्या आईपुढे निर्जीव वस्तू व प्राणी ठेवला – मुले माळ्याघरी वाढली – मुलीने घर बांधले – गातेलं झाड, सोनेरी पाणी व बोलणारा पक्षी हवा – या गोष्टी आणायला मोठा भाऊ गेला – वाटेत मागे वळून पाहिल्याने त्याला शिळारूप – घरी अडकित्त्यावर रक्त जमा म्हणून भावंडांना संकटाची बातमी समजली – दुसऱ्या भावाची तीच तऱ्हा – घरी अडकित्त्यावर रक्त – बहीण स्वतः गेली – धीटपणाने व मागे वळून न पाहता वस्तू हस्तगत – सोनेरी पाणी शिंपडल्याने भाऊ पुन्हा मानवरूपात आले – घरी सर्वजण परत –

पित्याला आमत्रण – बोलणाऱ्या पक्षाच्या तोंडून सत्यकथन – सोनेरी पाण्यामुळे सुळी दिली गेलेली राणी पुन्हा जिवंत – सर्वांचे पुनर्मीलन – सावत्र आईला शिक्षा. ( राजविलासी केवडा – कथा १ )

३) **घूस नवरी**

एका म्हातारीने घुशीचा प्रेमाने प्रतिपाळ केला—एका माणसाशी घुशीचा विवाह–लोकापवादाला भिऊन त्याने आपल्या घूसपत्नीला सदैव उंच माडीवर सर्वांच्या द्रष्टीआड ठेवले—घूस घरातील निवडण रात्री करून ठेवी—शंकरपार्वतीनी घुशीच्या डोक्यातील टाचणी काढताच घुशीचे सुंदर तरुणीत रूपांतर–दोघांचा सुखाचा संसार (हस्तलिखित–कथा ५२).

दंतकता (Legends)

दंतकथा हा शब्द मराठीत बरेच वेळा असत्यकथा, भाकडकथा या अर्थाने वापरला जातो. तथापि दंतकथा या शब्दाचा लोकवाङ्मयात जो अर्थ अभिप्रेत आहे त्यात नेमकी उलट भूमिका गृहीत धरली जाते, अद्भुतकथा या सत्य नस–तात असे जितक्या ठामपणाने मानले जाते, तेवढ्याच ठामपणाने दंतकथा या सत्याधिष्ठित असतात असे मानले जाते. दंतकथांच्या मुळाशी लोकस्मृती हाच प्रमुख हेतू असतो.

'ज्या असामान्य घटना प्रत्यक्ष घडलेल्या आहेत असा विश्वास असतो त्यांच्याबद्दलची हकीगत सांगणे हेच या कथाप्रकाराचे तात्पर्य असते'[९] दैवत–कथाप्रमाणेच दंतकथा सत्य मानल्या गेल्या तरी दंतकथांचा काळ दैवतकथाइतका प्राचीन नसतो. दंतकथेतील जग आजच्या जगाला बरेचसे जवळ असते. ऐतिहासिक सत्यघटना, प्रसिध्द दिवंगत व्यक्ती, निरनिराळी महत्त्वपूर्ण स्थळे यांच्यांबद्दल परंपरेने रूढ असलेल्या या कथा अधिक घरगुती वाटतात. 'अद्भुतकथा हवेत उडते तर दंतकथा जमिनीवर चालते आणि तुमचा दरवाजा ठोठावते . . . . ती पृथ्वीतलावर घडते आणि तिला ऐतिहासिक आधार असतो.'[१०]

दंतकथांना सत्याचा आधार असला तरी त्यांना पूर्ण इतिहास मात्र म्हणता येणार नाही. सत्याचा धागा असला तरी त्यावर लोकमानसातील, कल्पिताचे अवगुंठन चढत राहते. ऐतिहासिक घटनेची परंतु 'कल्पितावगुंठित' स्मृती जागृत राहते. दतकथांतील व्यक्ती भूमीवरील असल्या तरी सामान्य नसतात. त्यांच्यांत असणाऱ्या लोकोत्तरत्वाला लोकमानस अधिक अलौकिक बनवून सोडते; त्यांना देवस्वरूप बनविण्याची पराकाष्ठा करते. त्यामुळे दंतकथेत नाट्यात्मकता

येते हे खरे, तथापि त्यातील ऐतिहासिक मूल्य कमी होणे अपरिहार्य असते. त्यामुळे फ्रेझरसारखे विद्वान अभ्यासक दंतकथेला खोटा इतिहास (False history) म्हणतात. सर जॉर्ज गॉम यांनी मात्र लोकसाहित्य हे इतिहासाच्या अभ्यासाला एक प्रभावी पूरक साधन असून इतिहासकाराने लोकसाहित्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे असे ठामपणाने प्रतिपादन केले आहे. दंतकथेच्या आधारे केलेल्या उत्खननात मोहन–जो–दोडोसारखे महत्वाचे स्थळ सापडले हा एक महत्त्वाचा उल्लेख या संदर्भात करता येतो.

दंतकथेचे दोन प्रकार आहेत. १) स्थानिक दंतकथा, २) भटकी दंतकथा. काही दंतकथा या विशिष्ट प्रदेशाशी निगडित असतात. अशा दंतकथांना स्थानिक दंतकथ म्हणतात. त्यांचा काल कदाचित निश्चित नसेल पण स्थळ निश्चित असते. एखाद्या गावाचे वैशिष्टय कोणते, ते वैशिष्टय कसे व कुणामुळे निर्माण झाले. एखादे देऊळ कोणी बांधले अशा विषयांवरील या दंतकथा असतात. जितका प्रदेश मोठा तितका स्थानिक कथांचा भरणा जास्त आढळतो. स्थानिक दंतकथेचे विस्तार-क्षेत्र मर्यादित असल्यामुळे तिच्यात फारसा बदल न होता ती परंपरेने चालू राहते. जी दंतकथा विशिष्ट प्रदेशाची, देशाची किंवा संस्कृतीची सीमा ओलांडून अन्य देशांतही प्रसृत होते तिला भटकी दंतकथा म्हणतात. पराक्रमी, गुणी माणसांच्या स्फूर्तीपर कथा बहुधा भटक्या दंतकथेचे रूप घेतात. श्रीमती दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्याची रुपरेखा' या ग्रंथात चंद्रहासाची कथा, नीडर्स राजाची कथा यांचा निर्देश भटकी दंतकथा म्हणून केलेला आहे.

दंतकथा ही केवळ मनोरंजनासाठी सांगितली जात नाही. समाजातील असामान्यत्वाचे कौतुकाने स्मरण ठेवणे हा हेतू तर निश्चित असतोच तथापि त्यातून लोकांना मार्गदर्शनही होऊ शकते. अवघड प्रसंगी कसे वागावे किंवा कसे वागू नये याचे सोदाहरण मार्गदर्शन दंतकथेच्या द्वारे आपोआप होते. अद्‌भुतकथेतील पात्रां–प्रमाणे दंतकथेतील पात्रांत परतंत्रता नसते, तर स्वत:च्या अलौकिक गुणांनी ते त्यांचे इप्सित साध्य करतात. त्या गुणांचा आदर्श सहजपणे लोकांसमोर ठेवला जातो.

दंतकथा सामान्यत: आकाराने छोटया असतात. रचनातंत्र, आरंभ शेवट यांचे विशिष्ट संकेत आढळत नाहीत व ती सांगण्याचे तंत्रही दैवतकथांप्रमाणे साचेबंद नसते. स्थानिक नायक वा नायिकेचे चरित्र त्या त्या प्रदेशातील लोकांना परंपरेने ज्ञात असते. त्यातील काही ठराविक भागच दंतकथेच्या स्वरूपात प्रचलित असतो त्यामुळे दंतकथेचे स्वरूप खंडित असते. (Fragmentary and unfinished form of the Lgends) [११] ती आकस्मिकपणे सुरू होते व तशीच आकस्मिकपणे

तिचा शेवटही होतो. मात्र दंतकथा सत्य घटना वाटावी अशी तिची कथनपद्धती असते. तिच्यात बहुधा संवादात्मकता असते. हा सत्याभास इतका प्रभावी असतो की नागरी जीवनपद्धतीच्या प्रभावामुळेही ती नष्ट न होता नवीन परिस्थितीशी जुळवून घेत घेत परंपरेने चालू राहते.

मराठी लोककथांत संख्येच्या दृष्टीने अद्भुतकथेच्या खालोखाल दंतकथांचा क्रमांक लागतो. त्यांत स्थानिक दंतकथांचाच समावेश असून त्यातील वर्णविषयाचे क्षेत्र खूप विस्तृत आहे. पुराणकाळापासून ते अर्वाचीन काळापर्यंतचा प्रदीर्घ काळ त्यात सामावलेला असून त्या काळातील अनेक व्यक्तींची, घटनांची, क्वचित काही प्राण्यांची व वनस्पतींचीही स्मृती लोकमानसाने कथांद्वारे जतन केलेली आहे. उदा.-

**१) जेऊर**

बायजाबाई कुलीन स्त्री – पतीसाठी न्याहारी घेऊन शेतात निघाली – वाटेत सैनिकांनी अडवले – जेवण्याचा हट्ट – टोपलीत फक्त दोन भाकरी व गाडगाभर ताक – सर्व सैनिकांना पोटभर जेवण देऊनही टोपलीत ताकभाकरी शिल्लक – तिचे सत्त्व पाहून सैनिकांचा पळ – बायजा टेकडीवर गुप्त – जेवूनही अन्न उरले म्हणून त्या गावाला 'जेऊर' नाव – पुतळ्याच्या रूपानें बायजाबाईची स्मृती – ( पुष्प ३–कथा ६१ )

**२) कोळ्याचे घाडगेबुवा**

विठ्ठलदर्शनासाठी पायी पंढरपूरला जायचा कोळ्याच्या घाडगेबुवांचा नेम – वृद्धावस्थेत नेम पाळणे अवघड – विठ्ठलच त्यांच्या गावी वस्तीस आले—घाडगे–बुवांना घरात मूर्ती सापडल्या. ( पुष्प ३ – कथा १८ )

**३) शंकराची कोकणातील १२ स्वयंभू लिंगे**

ऋषीच्या शापाने नदी बनून अपवित्र समजल्या जाणाऱ्या पश्चिम समुद्राकडे वाहत निघालेल्या ब्रह्मदेवपत्नी सावित्रीला शंकरानें वाटेत बारा ठिकाणी अड–विण्याचा प्रयत्न केला. परंतु ती शंकराना डावलून पश्चिम समुद्रालाच जाऊन मिळाली. शंकरानें जेथे जेथे तिला अडविले तेथे तेथे स्वमंभू लिंगे कोकणात तयार झालेली आढळतात. ( पुष्प ३ – कथा १९ )

**वास्तवकथा** ( Romantic Tales or Novella ).

वास्तवतेचे समान सूत्र असणाऱ्या विविध स्वरूपाच्या मिश्र कथांचा समावेश या प्रकारात होतो. वास्तवकथेचा आशय अद्भुतकथेप्रमाणेच असतो परंतु अद्भुत पैलूला त्यात गौण स्थान असतें. [१२] या कथांत काहीशी अतिशयोक्ती असतें परंतु

अद्भुतता नसते. त्यांतील पात्रे ही बहुधा साधीसुधी माणसे व घटना सत्य वाटाव्या अशा असतात. त्यांतील नायक–नायिका कशाच्या तरी प्राप्तीसाठी घरापासून दूर जाताना दिसतील, खलपात्रे त्यांचा छळ करताना दिसतील. तथापि हे सर्व मानवी मर्यादांच्या परिघात घडते. खलपात्रे मानवी नसतात, तर बहुधा दुष्ट, निर्दय माणसेच असतात आणि त्यांच्या दुष्टपणाच्या मुळाशी बहुधा मानवी प्रेरणाच असते. त्यामुळें वास्तवकथेचे विषय अद्भुतकथांच्या तुलनेने अधिक साहसपूर्ण. करुण आणि भावनात्मक असतात. चातुर्य, हुषारी, विनोदबुद्धी, चलाखी, सहनशीलता शांतपणा इत्यादी मानवी गुणांना या कथांत अधिक प्राधान्य दिलेले असते. एखादे कोडे चतुरपणाने सोडवणे किंवा अवघड प्रश्नांना चपखल उत्तर देणे असेही या कथांचें स्वरूप असू शकते.

मराठी लोककथांत वास्तवकथांच्या स्वरूपाची काही उदाहरणे आढळतात. उदा.–

**१) चतुरा**

राजपुत्राची विवाहासाठी अट, 'मुलगी सुंदर नसली तरी चालेल पण तिने आपल्या चतुराईने थक्क करून सोडले पाहिजे – चतुरा नामक ब्राह्मणकन्येने आव्हान स्वीकारले – तिला एकांतवासात ठेवले. पहारेकऱ्यांची मर्जी संपादन करून ती बाहेर जांऊयेऊ लागली – एका कलावंतिणीकडे नाचगाणे शिकू लागली. कलावंतिणीकडे येणाऱ्या राजपुत्राला मोहित केले – गर्भधारणेची चाहूल लागताच राजपुत्राकडून अंगठी मागून घेऊन ती एकाएकी गुप्त व आपल्या महालात परत – पुत्रप्राप्ती – राजपुत्राला वार्ता कळताच तो रागाने महालात – अंगठीची खूण दाखविली– तिच्या या चातुर्याची राजपुत्राकडून प्रशंसा–विवाह. (मराठवाड्यातील लोककथा–कथा २९).

**२) लिंबाजीराव**

लिंबाजीराव शेतकरीपुत्र–उत्तम प्रकृतीचा, सुंदर पण आळशी– एकच हट्ट, 'राजकन्येशी लग्न करावयाचे'– लोक 'राजाचा जावाई' म्हणून चिडवीत पण हट्ट कायम. राजकन्येला मागणी घातली – राजाने हाकलून दिले– पुन्हा पुन्हा मागणी – देहदंडाची शिक्षा– राजकन्येच्या मनात सहानुभुती व त्याच्या प्रेमाची खात्री – त्याच्याशी विवाह करावयाचा तिचा हट्ट – राजाराणी नाराज – कन्येच्या हट्टासाठी विवाह – आळशी पतीला उद्योगी बनविले – सुखाचे दिवस. (तीर्थाचे सागर–कथा १०)

**स्पष्टीकरणकथा**

एखादे सूत्र वा तत्त्व यांचे स्पष्टीकरण करणाऱ्या काही कथा असतात. किंबहुना अशा स्पष्टीकरणासाठीच त्या सांगितल्या जातात. अशा कथांना स्पष्टी-

करणकथा असे म्हणतात. 'जो तो आपल्या नशिबाचा' किंवा 'भवितव्य अटळ' अशा काही पारंपरिक समजुतींना बळकटी आणण्यासाठी कथारूपाने तत्संबंधी उदाहरणे दिली जातात. उदा.

१) **भवितव्य**

'शेजारच्या राजाच्या हातून मरण' असे एका मुलाचे भविष्य – पित्याने तळघरात बंगला बांधून त्याला एकांतात ठेवले – वेषांतराने आलेल्या राजाला नोकर म्हणून कामास ठेवले – ४० व्या दिवशी राजाच्या हातून मुलाच्या अंगावर सुरी पडून मुलाचा मृत्यू– भवितव्य अटळ हेच खरे. (पुष्प१–कथा ३९)

२) **ब्रह्मदेवाच्या विवाहगाठी**

राजकन्या वर – शोधनार्थ देशांतरास – बरोबर स्वयंपाकी भटजी – झऱ्यावर भटजीस, विवाहगाठी मारणाऱ्या ब्रह्मदेवाकडून कळले की त्याची विवाहगाठ या राजकन्येशीच – राजकन्येला कथन – राजकन्या संतप्त – भांडे फेकून मारले, हाकलून दिले. योगायोगाने भटजीस राजपद – राजकन्येला तोच पती पसंत – डोक्यावरील खुणेमुळे ओळख पटली. (पुष्प २–कथा १)

**प्राणीकथा, बोधकथा** (Animal Tales, Fables)

प्राचीन काळापासून मानवाला प्राणीमात्रांच्या जीवनाबद्दल, त्यांच्या विविध वैशिष्टयांबद्दल अपार कुतुहल होते. वेगवेगळ्या प्राण्यांचे शरीरविशेष, स्वभाववृत्ती, अन्न, निवारा यांचे ज्ञान माणसाला कालांतराने होत गेले आणि त्या ज्ञानाच्या अनुषंगाने कथा रचल्या गेल्या. त्यांनाच 'प्राणीकथा' असे म्हटले जाते. हा कथाप्रकार अत्यंत प्राचीन काळापासून भारतात लोकप्रिय असून परंपरेने चालत आलेला आहे. या कथांना वास्तवाचा वा ऐतिहासिक सत्याचा आधार नसतो म्हणून त्या 'कल्पितकथा' या नावानेही ओळखल्या जातात. प्राणीकथांच्या माध्यमातून जेव्हा एखादे नीतितत्त्व ध्वनित केले जाते तेव्हा त्या कथेला लोककथा (Fable) असे नाव दिले जाते. 'सामान्यत: प्राणीमात्रे असलेली आणि ध्वन्यर्थाने वा उघडपणे नीतीतत्त्व प्रतिपादन करणारी कथा म्हणजे बोधकथा होय.[१३]

प्राण्यांचे मानुषीकरण हा अशा कथांचा प्रमुख विशेष होय. या कथांतील प्राणी बोलतात, तर्कशुद्ध विचार करतात, माणसांच्या अनेक क्रियांचे अनुकरण करतात. मात्र हे सर्व करीत असताना त्यांची नैसर्गिक स्वभाववैशिष्टये दृष्टीआड केली जात नाहीत. त्या त्या प्राण्यांच्या सर्वज्ञात स्वभाववैशिष्टयांचेही नेमके दर्शन त्यांत घडते.

या कथा सामान्यत: आकाराने लहान असतात व त्यांतील पात्रे, घटना मर्यादित असतात. त्यांचे स्वरूप परीकथेसारखे गुंतागुंतीचे नसते. त्यांचा आशय पूर्णतया व्यावहारिक, लौकिक पातळीवरचा असतो. दैवतकथा आणि अद्‌भुतकथा यांच्यांतही प्राणी असतात, तथापि ते बहुधा अतिमानवी शक्तीने मंडित असतात. प्राणीकथा वा नीतिकथांतील प्राणी मात्र पूर्णपणे लौकिक असतात. त्यामुळेच हा प्रकार अत्यंत लोकप्रिय ठरलेला असून सर्वसामान्य माणसाला अधिक जवळचा वाटतो. पंचतंत्र, बौद्ध जातके, इसापनीतिकथा ही नीतिकथांची ठळक उदाहरणे आहेत. या सर्वांची, विशेषत: पंचतंत्राची जगभरच्या अनेक भाषांत भाषांतरे झाली आहेत हाच या लोककथाप्रकाराच्या लोकप्रियतेचा मोठा पुरावा आहे. पंचतंत्रातील कथांनीच प्रभावित होऊन बेनफे यांनी भारताला जागतिक लोककथांचे जनकत्व बहाल केले.

या कथांत विनोदाचा सूक्ष्म धागा बहुधा असतोच. विनोदनिर्मिती हा हेतू नसला तरी दोन प्राण्यांच्या स्वभावांतील विसंगती आणि उपरोध यांतून सहजपणे ही विनोदनिर्मिती होते. या कथांना असणारी ही विनोदाची झालर त्यांतील उपदेशाचा रुक्षपणा नक्कीच कमी करते. त्यांतील नीतिप्रतिपादन बोचत तर नाहीच, उलट अधिक परिणामकारक होते.

मराठी लोककथांत प्राणीकथांची संख्या तुलनेने कमी असून नीतितत्त्व-प्रतिपादन करणारी एकही कथा आढळत नाही. उदा. –

**१) सुसर व कोल्हा**

खायला आणून देण्याच्या बहाण्याने कोल्ह्याने सुसरीच्या पाठीवरून नदी पार केली – पाण्यातून जाताना सुसरीच्या स्वरूपाची खोटी स्तुती – काहीच न देता कोल्ह्याचे पलायन – सुसर संतप्त – कोल्ह्याला पकडायचेच असा सुसरीचा निर्धार – चिखलात लपून बसली – कोल्ह्याने ओळखलेच – एकदा मात्र त्याचा एक पाय पकडण्यात तिला यश – कोल्ह्याची बतावणी', पायाला एरंडाचा खुंट बांधला म्हणून बरे नाहीतर सुसरीने तोच पकडला असता', – सुसरीने फसून जाऊन पाय सोडला – कोल्ह्याचे पलायन – सुसरीची निराशा. (दाते २–कथा ४)

**२) माळकरी वाघ व कोल्हा**

पिंजऱ्यात अडकलेल्या वाघाची यात्रेकरूला विनंती, 'मला सोडव, मीही यात्रेला येतो' – यात्रेकरूने सोडवले – वाघ यात्रेकरूला खावयास धावला – यात्रेकरू नदीतून पोहत जाऊन पळाला – वाघाचे यात्रेकरूचे सोंग – चिखलात, राखेत लोळला – उंबराची माळ गळ्यात – खांद्यावर पताका – कोल्ह्याने

फसून पायावर डोके ठेवले – वाघाने पकडले – कोल्ह्याची बतावणी, 'तुमची पताका पडली' – वाघाची पकड सैल – कोल्ह्याचे पलायन. (पुष्प ४–कथा ४).

**हास्यकथा** (Merry Tales)

मनोरंजन हे जसे अद्भुततेच्या दर्शनाने होते तसेच विनोदनिर्मितीने व त्यामुळे निर्माण होणाऱ्या हास्यानेही होते. लोककथेला विनोदी स्वरूप देऊन हास्यनिर्मिती करण्याचे कार्य परंपरेने वर्षानुवर्षे चालू आहे. याच हास्यकथा होत आणि त्यांचे प्रचुर प्रमाण सर्वत्र आढळते. 'हास्यकारक परिस्थिती निर्माण करणाऱ्या प्रसंगाची प्रसंगमालिक वर्णन करणाऱ्या गद्य वा पद्य कथेस हास्यकथा म्हणतात. त्यांचा विषय रोजच्या जीवनातून घेतलेला असतो. अद्भुत पैलूचे अस्तित्व क्वचितच असते आणि असले तरी त्याचा उपयोग परिस्थिती निर्माण करण्यासाठी पायाभूत म्हणून होतो. प्रत्यक्ष घटना अद्भुत नसते'.[१४]

हास्यकथा ही आकाराने सामान्यत: लहान, चुटकेवजा असते आणि वर्ण्य–विषय लौकिक पातळीवरचा असतो. विनोदनिर्मितीच्या हेतूसाठी विनोदसाधने मात्र विविध वापरली जातात. शारीरिक व्यंग, मानसिक व्यंग, विनोदी घटना, दुराग्रही स्वभाव, मूर्खपणा अशा अनेक मार्गांचा अवलंब केला जातो. मूर्ख जावई व त्याची सासुरवाडीला जाताना व सासुरवाडीला गेल्यावर होणारी फजिती हा हास्यकारक लोककथांचा आवडीचा विषय आहे. स्त्रियांमधील काही स्वभावदोषही विनोदी कथांच्या रूपाने प्रकट केले जातात. समाजातील वेगवेगळ्या जातींना दुर्गुणांची जोड देऊन त्यांच्या दुर्गुणांची कथांद्वारे चेष्टा, टर उडविली जाते.

हास्यकथांचे आणखी एक वैशिष्ट्य असे की एरवी त्याज्य मानल्या जाणाऱ्या अवगुणांचे उदात्तीकरण करून विनोदाची पखरण केली जाते. चोरी करणे हा गुन्हाच परंतु चोरी करून त्यातून सहीसलामत सुटून जाणे ही बाब कौतुकाची ठरते आणि त्यातून हास्यनिर्मिती होते. हास्यकथांचा लहान आकार आणि त्यांची सार्वकालीन लोकप्रियता या कारणांनी त्यांचा प्रसार फार झपाट्याने होतो.

मराठी प्राणिकथांच्या मानाने मराठी हास्यकथांचे प्रमाण अधिक असून त्यांतील वर्ण्यविषयात विविधता आढळते. उदा. –

**१) विचित्र संस्कृत**

मुलगा पित्यासह सासुरवाडीस गेला – सासुरवाडीच्या लोकांना संस्कृत भाषेची फार आवड – संस्कृतात बोलणे आवडीचे – मुलाची फजिती होऊ नये म्हणून वडिलांची ताकीद, 'तेथे मुळीच बोलू नकोस'– जेवताना भात फार गरम –

मुलाला खाता येईना – पटकन् वडिलांना म्हणाला, 'बाबं भातं उष्णम्' – वडि-लांना तरी कुठे संस्कृत येत होते – ते मुलावर ओरडले, 'काटं पोटं गप्पम्!' (पुष्प-१ – कथा ३५)

२) **भिकंभटाचे मंत्र**

भिकंभट व त्याचा मुलगा केशव ऊस चोरायला शेतात गेले – केशव उसात शिरला व भिकंभट पहारा देत बसला – तेवढ्यात काही शेतकरी तेथे आले – चोरी पकडली जाण्याची भीती – भिकंभटाने बसल्या जागेवरूनच मंत्र म्हटल्या-सारख्या सुरात मुलाला गुपचुप सूचना दिल्या – मुलाने त्या नीट ऐकल्या – चोरी पचली – भिकंभटाच्या मंत्रगानाबद्दल शेतकऱ्यांना आदर वाटला. (पुष्प १ – कथा २९)

**मालाकथा** (Cumulative Tales)

मालाकथा हा लोककथेचा एक अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण प्रकार आहे. यात कथा-भागापेक्षा त्याची रचना अधिक वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाची असते. मालाकथेचा कथक कथेच्या आशयाकडे फारसे लक्ष देत नाही आणि आशयाचा फारसा विचार करीत नाही. परंतु कथनशैलीच्या ज्या वैशिष्ट्यांचा तो अवलंब करतो त्यांना भावनिक प्रतिसाद मिळावा अशी त्याची अपेक्षा असते.[१५] या कथा विनोदी, खेळकर किंब-हुना एखाद्या मनोरंजक खेळासारख्याच असतात. त्यांना ठराविक पद्धतीची, सुविहित अशी रचना आणि कथनशैली असते. त्यातून नाट्यपूर्णतेचा उत्कट भास निर्माण होतो. त्यातील पात्रांची सृष्टी माणसे, प्राणी, पक्षी, अचेतन वस्तू या सर्वांची मिळून तयार होते, आणि त्यांच्या संवादातून कथेची प्रगती होत जाते. प्रथम एक किंवा दोन पात्रे कथेत प्रविष्ट होतात आणि नंतर एक एक पात्रांची भर त्यात पडत जाते. संवादातील वाक्ये आणि घटना त्यांचे पुन्हा पुन्हा त्याच शब्दांत पुनरावर्तन होत जाते. वाक्यरचना गद्यपद्यमय असते. या रचनावैशिष्ट्यामुळे सहजपणे विनोदनिर्मिती होते. 'विनोदाची एक विशिष्ट जागतिक अभिरूची व परंपरा यांनी निर्माण केली.[१६] अनेक देशांत अशा कथा प्रचलित असून त्यांच्या वैशिष्ट्यपूर्णतेमुळे त्या अतिशय लोकप्रिय ठरलेल्या आहेत.

मराठी मालाकथांची उदाहरणे शं. ग. दाते यांनी संकलित व प्रकाशित केलेल्या संकलनात पाहावयास मिळतात.

**जागतिक लोककथांशी नाते**

भारतात प्रचलित असलेल्या लोककथा जगभरच्या देशांत सापडत असल्यामुळे थिओडोर बेनफे यांनी भारताला जागतिक लोककथांचे जनकत्व दिलेले आहे. म्हणूनच

जागतिक लोककथांच्या पार्श्वभूमीवर भारताचा एक प्रांत असणाऱ्या महाराष्ट्रातील मराठी लोककथांचे निरीक्षण करणे आणि त्या दोहोंतील साम्यभेदांचा आढावा घेणे ही एक आवश्यक व उत्सुकतेची बाब ठरते. याच दृष्टिकोनातून प्रथमत: जागतिक लोककथाप्रकारांच्या लक्षणांचा व वैशिष्ट्यांचा निर्देश करून मराठी लोककथांतील त्या त्या प्रकाराची प्रातिनिधिक उदाहरणे उद्धृत केलेली आहेत. जागतिक पातळीवर रूढ असणारे सर्व लोककथाप्रकार त्यांच्या लक्षणाविशेषांसह मराठी लोककथांतूनही दिसून येत असल्यामुळे त्या दोहोंतील नाते स्पष्टपणे प्रतीत होते आणि मराठी लोककथेतील विश्वात्मकतेचे प्रथम दर्शन होते.

**मराठी लोककथांचे ठळक विशेष**

मराठी लोककथांचा अभ्यास अधिक तपशीलाने केल्यावर त्यांचे जे ठळक विशेष लक्षात येतात त्यामुळे त्यांच्या विश्वात्मकतेची अधिकाधिक लक्षणे स्पष्ट होऊ लागतात आणि त्यांचे जागतिक लोककथांशी दिसून येणारे नाते अधिक दृढ होताना दिसते. पुढे दिलेल्या ठळक विशेषांतील काही विशेष त्यांची विश्वात्मकता प्रकट करतात तर काही विशेषांतून त्यांची प्रदेशविशिष्टता दिसून येते.

**१) अद्भुताचें प्राबल्य**

मराठी लोककथांतील लोककथाप्रकारांच्या परस्परप्रमाणावरून असे स्पष्ट दिसून येते की मराठी लोककथांत अद्भुताचे प्राबल्य आहे. अद्भुतकथांप्रमाणे दैवतकथा, दंतकथा, स्पष्टीकरणकथा आदि प्रकारांतही अद्भुतता असते किंवा असू शकते. लोककथांची ही सृष्टी जणु अद्भुताने भारून गेलेली आहे. या अद्भुतशक्तीचे वाहक – देवदेवता, पऱ्या, अप्सरा, नाग, राक्षसपिशाच्चादी योनी, सिद्ध माणसे, प्राणी, वनस्पती वगैरे – विविध तऱ्हांनी व हेतूंनी आपली अंगभूत अद्भुतशक्ती प्रकट करतात. येथे स्थलकालाचे बंधन अत्यंत शिथिल झालेले आढळते. अद्भुत घटना, शाप व उ:शाप, रूपान्तर, प्रचुरता, जादूच्या विविध वस्तू अशा अनेक पैलूंतून अद्भुताचे मनोहारी दर्शन सतत होत राहते. लोककथेतील संघर्ष व नाट्यात्मकता बव्हंशी या अद्भुतशक्तीमुळेच निर्माण होते.

**२) कथाविशेष व कल्पनाबंध – साम्य**

मराठी लोककथांतील कथाविशेष, कल्पनाबंध आणि जागतिक सूचीतील कथा, कथासरित्सागर व भारतातील अन्यप्रांतीय लोककथांतील कथाविशेष व कल्पनाबंध यांच्यांत बरीच साम्यस्थळे आहेत.

**३) पात्रचित्रण सांकेतिक स्वरूपाचे**

मराठी लोककथांत विविध व्यवसायांच्या विविध स्वभावांच्या व्यक्तींची चित्रणे पाहावयास मिळतात तथापि त्यांतील बरीचशी व्यक्तिमत्त्वे ही सांकेतिक

आणि ठरीव नमुनापात्रांच्या स्वरूपाची असतात. अनेक पात्रांचे ठराविक संकेत रूढ झालेले असून, ती पात्रे तशाच सांकेतिक चेहऱ्यामोहऱ्याची असतात. तसेच त्यांचे व्यक्तिमत्व नेहमी स्थिर स्वरूपाचे असते. त्यांत विकास वा बदल होत नाही. पात्रांच्या क्रियांतीच लोककथेचा विस्तार होत जातो. कथेत त्याच्या मानसिक आंदोलनांचे चित्रण होत नाही.

### ४) ठराविक संकेतांचे पालन

जागतिक पातळीवर रूढ असणाऱ्या सुखान्तता, मदतनीस, रूपान्तर, जादूच्या वस्तू, विवाहपण यांसारख्या संकेतांचे पालन मराठी लोककथांतही यथायोग्यपणे केलेले आढळते.

### ५) अद्‌भुतकथांतील ठराविक कृती

अद्‌भुतकथांतील घटना वा पात्रांच्या कृती या बहुधा ठराविक स्वरूपाच्या असतात. मराठी अद्‌भुतकथेतील पात्रांच्या कृतींतही तसाच प्रकार आढळून येतो.

वरील सर्व विशेष मराठी लोककथांच्या विश्वात्मकतेकडे निर्देश करतात तर पुढील विशेष त्यांच्या प्रदेशविशिष्टतेचे प्रकटीकरण करतात.

### ६) हिंदुधर्मीय कथा

या सर्व कथा महाराष्ट्रातील हिंदुधर्मीय समाजात प्रचलित असलेल्या लोक-कथा आहेत. महाराष्ट्रातील समाज प्रामुख्याने हिंदुधर्मीय असला तरी अनेक शतके इतर लोकांची वस्तीही येथे आहे. तथापि या सर्व लोककथांतून महाराष्ट्रातील हिंदुधर्मीय समाजाचेच लोकमानस अभिव्यक्त होते. जे काही थोडे अन्यधर्मीयांचे उल्लेख आहेत ते पुढीलप्रमाणे आहेत –

अ) बुद्धमूर्ती, धर्मप्रसारासाठी होडीतून प्रवासाला जाणारे बुद्धभिक्षू यांचा त्रोटक उल्लेख (पुष्प ३ – कथा ६५) या कथेत आहे.

ब) पोर्तुगीजांच्या चर्चचा उल्लेख (पुष्प ३ – कथा ३०) या कथेत आहे.

क) इस्लामधर्मीयांचे उल्लेख त्यामानाने थोडे जास्त म्हणजे सुमारे ७–८ कथांत आढळतात. उल्लेख थोड्याच कथांत असले तरी तेवढ्या कथांतूनही हिंदू आणि इस्लाम या दोन्ही समाजाच्या लोकमानसांतील संघर्षाची झलक पाहावयास मिळते. अर्थातच हिंदुधर्मीय लोकमानसाच्या दृष्टिकोनातून या कथा निर्माण झाल्या असल्या-मुळे अपरिहार्यपणे हिंदुधर्मीय दृष्टिकोनाचे आणि आचाराचे श्रेष्ठत्व त्यांतून प्रकट झालेले आढळते.

### ७) राजपरिवारास प्राधान्य

मराठी लोककथांतील विविध व्यक्तिदर्शनाचे परीक्षण केल्यास असे दिसते

की या लोककथांत राजपरिवारास फार मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधित्व मिळालेले आहे. सुमारे १५० कथा राजपरिवाराचे चित्रण करणाऱ्या आहेत. या राज–परिवारात राजा, राणी (आवडती आणि नावडती), राजपुत्र, राजकन्या, प्रधान, प्रधानपुत्र, दासी, राजसेवक, राजसैनिक, राजाचा न्हावी, माळी अशा अनेक व्यक्तिरेखांचा समावेश होतो.

## ८) समाजातील सर्व स्तरांना प्रतिनिधित्व

मराठी लोककथांत राजपरिवारास प्राधान्य असले तरी समाजातील सर्व स्तरांचे, कमीअधिक प्रमाणात का होईना चित्रण दिसून येते. समाजातील विविध व्यावसायिकांचे प्रतिनिधी या कथांतून सापडतात. ब्राह्मण, सावकार, व्यापारी, शेतकरी, कुळवाडी, सोनार, कुंभार, चांभार, सुतार, गवळी, वाणी, न्हावी, परीट, माळी, विणकर, कासार, गुरव, फासेपारधी, मोळीविक्या, लाकुडतोड्या, कातकरी, गुराखी, धनगर, फेरीवाला, खाटीक असे विविध व्यवसाय करणारी माणसे आपल्याला या लोककथांत भेटतात. गारुडी, जादूगार, मांत्रिक, ज्योतिषी आपापली कौशल्ये प्रकट करतात. न्यायाधीश, पाटील, मामलेदार, किल्लेदार, सरदार, खोत, कोतवाल, सैनिक, दिवाणजी, राजगुरू, वेसकर आदि सरकारी अधिकारी आपापली चाकरी बजावताना दिसतात. गणिका, वेश्या, कलावंतीण, नायकीण अशा उपेक्षित आणि समाजात प्रतिष्ठा नसणाऱ्या व अप्रिय समजल्या जाणाऱ्या व्यक्तिरेखांचे चित्रणही या लोककथासृष्टीने त्याज्य मानलेले नाही.

सर्व समाजांचे प्रतिनिधित्व करणारी व्यक्तिचित्रणे या लोककथांत आढळली तरी विविध समाजगटांतील परस्परसंबंधांचे वा संघर्षांचे उल्लेख करणाऱ्या कथा तुलनेने कमी आहेत.

## ९) पात्रांच्या कौटुंबिक पातळीवरील संबंधांचे चित्रणास प्राधान्य

मराठी लोककथांच्या नमुनापात्रातील परस्परसंबंध कौटुंबिक पातळीवरच जास्त वर्णिलेले आहेत. राजपरिवाराचे प्रचुर चित्रण या कथांत असले तरी राजाचे राजकीय व सामाजिक जीवन पूर्णतया वर्ज्य असून त्याच्या फक्त कौटुंबिक जीवनाचेच चित्रण या कथांत आढळते. राजाच्या वा सामान्य माणसाच्याही कौटुंबिक संबंधांचे चित्रण मात्र बऱ्याच अंशी वास्तववादी आहे असे म्हणावयास हरकत नाही. पतिपत्नी, सापत्नभाव, मातापिता आणि मुले, भाऊबहीण, सासू सून, नणंद-भावजय इत्यादी अनेक नात्यांतून उत्पन्न होणाऱ्या संघर्षाचे प्रचुर चित्रण मराठी लोककथांत आढळते. हा संघर्ष क्वचित केवळ मानसिक पातळीवर राहतो तर बरेच वेळा त्याला व्यावहारिक रूपही प्राप्त झाल्याचे आढळते.

१०) महाराष्ट्रीय समाजाच्या संस्कृतीचे दर्शन

मराठी लोककथांतून महाराष्ट्रीय समाजाच्या संस्कृतीचे यथार्थ दर्शन घडू शकते. त्यातून महाराष्ट्रीय समाजाची जडणघडण स्पष्टपणे प्रतिबिंबित होते. चातुर्वर्ण्यव्यवस्था, ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व, स्पृश्यास्पृश्यता, आंतरजातीय विवाह, पूर्वास्पश्यांचा वेदाभ्यासाबाबतचा अनधिकार, पुरूषप्रधान संस्कृती, पुरुषांचे बहुपत्नीकत्व अशा अनेक संस्कृतिवैशिष्टयांवर या लोककथांच्याद्वारे प्रकाश पडतो. समाजातील गटांच्या परस्परसंबंधांचे आकलन होते. समाजाच्या धार्मिक समजुती विविध देवतांच्या उपासना, भक्तीच्या पद्धती, सदाचाराचे संकेत, त्याज्य व निषिद्ध मानल्या जाणाऱ्या कल्पना इत्यादी बाबींचे यथार्थ दिग्दर्शन या कथांद्वारे केलेले आढळते.

मराठी लोककथांच्या उपरोक्त ठळक विशेषांतील काही विशेषांचा विस्तृत व सोदाहरण परामर्श पुढील काही प्रकरणांतून घेतलेला आहे.

## प्रकरण ३ रे

# मराठी लोककथांतील कथाविशेष आणि कल्पनाबंध

जागतिक पातळीवर रूढ असलेले सर्व लोककथाप्रकार त्यांच्या विशेषांसह मराठी लोककथांत कसे दिसून येतात आणि त्यांमुळे मराठी लोककथेचे जागतिक लोककथेशी असलेले नाते कसे प्रतीत होते याचा सोदाहरण परामर्श गेल्या प्रकर–णात घेतलेला आहे. आता मराठी लोककथांच्या अंतरंगात थोडे अधिक डोकावून त्यांच्या आशयांचा विचार करता, त्यांचे जागतिक लोककथांशी दिसणारे नाते खंडित होते की अधिक दृढ होते याचा शोध घ्यावयास हवा. या शोधासाठी लोककथां–तील कथाविशेष आणि कल्पनाबंध या दोन महत्त्वपूर्ण लोकसाहित्यकशास्त्रातील संज्ञांचा आणि त्यांच्या सूचींचा परिचय करून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

### वर्गीकरण – स्थूलाकडून सूक्ष्माकडे

कोणत्याही ज्ञानशाखेच्या शास्त्रीय आणि सखोल अभ्यासासाठी त्या ज्ञान–शाखेच्या अभ्याससामग्रीचे प्रथमतः स्थूल वर्गीकरण केले जाते. परंतु परिपूर्ण अभ्यासासाठी केवळ स्थूल वर्गीकरण पुरे पडत नाही असे दिसून येते. त्या सामग्री-तील साम्यभेदांनुसार तिची अधिक तपशीलावर छाननी आणि सूक्ष्म वर्गीकरण करावे लागते. लोककथांच्या क्षेत्रातही प्रथमतः दैवतकथा, परीकथा, दंतकथा यांसारखे स्थूल वर्गीकरण केले गेले. तथापि लोककथांचा अभ्यास करण्याची विद्वानांची प्रवृत्ती जसजशी वाढत गेली, जसजशी जगातील वेगवेगळ्या देशांतून लोककथांची अनेक संकलने तयार होऊ लागली, तसतसे लोककथेच्या अभ्यासाच्या सामग्रीचे स्वरूप अधिकाधिक विस्तृत होऊ लागले. लोककथांचे रचनावैचित्र्य जाणवू लागले. ऐतिहासिक–भौगोलिक दृष्टचाही सामग्रीचा विचार वाढू लागला, त्यामुळे या सामग्रीचे अधिक तपशीलाने वर्गीकरण करण्याची जरूरी कालांतराने अभ्यास–कांना जाणवू लागली. या गरजेतून कथाविशेष आणि कल्पनाबंध या दोन संकल्पना मांडल्या गेल्या.

### लोककथांतील कथाविशेष

विविध देशांतील लोककथांच्या संकलनांची संख्या जसजशी वाढू लागली, तसतसे जगभरच्या कथांत असलेले विलक्षण साम्य अभ्यासकांच्या लक्षात येऊ लागले. भौगोलिक दृष्टया दूरदूर असणाऱ्या प्रदेशांतील कथांतही साम्य आढळल्याने लोककथाप्रसाराच्या वेगवेगळया उत्पत्ती आणि भूमिका सिद्धांतरूपाने मांडल्या जाऊ लागल्या. अभ्यासदृष्टी एकाच भौगोलिक किंवा भाषिक प्रदेशापुरती सीमित न राहता तुलनात्मक अभ्यासाची प्रवृत्ती अपरिहार्य ठरू लागली. वेगवेगळया प्रदेशांत प्रचलित असणाऱ्या सारख्या कथांचा एकत्रित अभ्यास करून त्यांच्यांत प्रतीत होणारा कथेचा समान गाभा, समान कथासूत्र तपासले जाऊ लागले. कथेच्या या समान गाभ्यालाच मूलकथा किंवा कथाविशेष (Tale type) असे नाव दिलेले आहे. 'कथाविशेष' या पारिभाषिक शब्दाची व्याख्या स्टिथ थॉम्पसन यांनी दिलेली आहे ती अशी, – 'स्वतंत्र अस्तित्व असलेली पारंपरिक कथा म्हणजे कथाविशेष होय. ती पूर्ण कथा म्हणून सांगितली जाऊ शकते आणि तिच्या अन्वयासाठी इतर कुठल्याही कथेवर ती अवलंबून रहात नाही, ती दुसऱ्या कथेबरोबरही सांगितली जाऊ शकते. परंतु स्वतंत्रपणे सांगितली जाऊ शकते ही बाब तिच्या स्वतंत्र अस्तित्वाचा पुरावा असतो. तिच्यात एक वा अनेक कल्पनाबंध असू शकतात.' [१] कथाविशेषाच्या या व्याख्येवरून त्याचे स्वरूप स्पष्ट होते. स्वतंत्रपणे सांगितल्या जाऊ शकणाऱ्या ह्या कथाविशेषाला लांबीचे बंधन नाही. स्वतंत्र अस्तित्व हाच निकष महत्त्वाचा असतो.

लोककथांचे कथाविशेषांनुसार वर्गीकरण केल्यामुळे लोककथांच्या अभ्यासाला फार मोठी मदत होते. भिन्न देशांतील लोककथांचा तुलनात्मक अभ्यास सुकर होतो. विशेषत: लोकसाहित्याच्या ऐतिहासिक भौगोलिक अभ्यासपद्धतीत त्यांचा विशेष उपयोग होतो. पुढे समान कथाविशेषांच्या मुळाशी असू शकेल अशी एक आदिरूपकथा किंवा प्राक्‌रूपकथा अनुमानाने तयार करण्यात येऊ लागली. या आदिरूपकथेला Archtype असे नामाभिधान देण्यात येते, आणि त्या समान कथाविशेषांना तिचे पर्याय मानण्यात येते.

### लोककथांतील कल्पनाबंध

लोककथांच्या तुलनात्मक अभ्यासाला कथाविशेषांचा विशेष उपयोग होऊ शकतो. विशेषत: ज्या दोन संस्कृतींमध्ये बरेच साम्य आहे त्यांच्यांत प्रचलित असणाऱ्या कथांच्या अभ्यासाला त्यांच्यामुळे योग्य दिशा प्राप्त होते. परंतु जे प्रदेश संस्कृतिदृष्टया भिन्न आहेत. ज्यांच्या लोककथांत कथाविशेषांचे साम्य फारसे नाही, त्यांच्या लोककथांचा तुलनात्मक अभ्यास करावयाचा असेल तर तेथे केवळ

कथाविशेषांच्या वर्गीकरणापर्यंतच थांबून चालत नाही तर ते कथाविशेष ज्या मूल-घटकांचे बनलेले असतात त्या मूलघटकांधारित वर्गीकरणाचा प्रयत्न करावा लागतो. कथाविशेषांच्या वर्गीकरणातून अनुमानाने काढलेल्या आदिकथेपेक्षाही लहान आणि स्वतंत्र अस्तित्व असलेला मूलघटक लोककथेत असतो आणि या मूलघटकांच्या विविध रचनेतून लोककथा निर्माण होतात. लोककथेतील या मूलघटकालाच कल्पनाबंध (Motif) असे नाव आहे. स्टिथ थॉम्पसन यांनी कथा-विशेषाप्रमाणेच कल्पनाबंधाचीही व्याख्या दिलेली आहे. ती व्याख्या अशी – 'ज्याच्यात परंपरेने टिकून राहण्याचे सामर्थ्य असते असा कथेचा लहानातील लहान घटक म्हणजे कल्पनाबंध होय. हे सामर्थ्य देण्यासाठी त्यात काहीतरी असामान्यत्व किंवा वेधकता असावी लागते. २

**कल्पनाबंध तीन प्रकारचे मानले जातात**

१) कथेतील पात्रे – देवदेवता, राक्षस, प्राणी, वनस्पती, माणसे वगैरे

२) वस्तू आणि कथेच्या पार्श्वभूमीतील काही बाबी – जादूच्या वस्तू, रूपांतर, श्रद्धा, विश्वास वगैरे.

३) घटना – कथेत घडणाऱ्या घटना.

कल्पनाबंधांच्या या तीन प्रकारांवरून कल्पनाबंधांच्या स्वरूपाची कल्पना येऊ शकते. लोककथेच्या सर्व घटकांना व्यापणारे त्यांचे स्वरूप आहे, आणि त्या-मुळेच कल्पनाबंधांशिवाय लोककथा संभवतच नाही असे म्हणावयास हरकत नाही. घटना हा जो कल्पनाबंधांचा एक प्रकार आहे तो अधिक व्यापक असून बरेचसे कथाविशेष हे या घटनांवरच आधारित असतात. एकाच कथाविशेषांचे अनेक पर्याय आढळतात याचे कारण कल्पनाबंधांशी जोडावे लागते. एका कथाविशेषाच्या अनेक पर्यायांत बरेच कल्पनाबंधही समानच असतात असे दिसते तथापि त्या कल्पना-बंधांची रचना बदलते आणि त्या रचनेनुसार नवीन पर्याय वा लोककथा निर्माण होते. पर्याय निर्माण होणाऱ्या या प्रक्रियेला शोभादर्शकाचे उदाहरण दिले जाते. शोभादर्शकाच्या नळीतील काचा त्याच वा तेवढ्याच असतात, परंतु शोभादर्शक थोडाही हलवला तरी आतील काचांची रचना बदलते आणि नवीन आकृतिबंध तयार होतो. अर्थात् पर्याय निर्माण होण्याची आणखीही काही कारणे आहेत. त्यातील एक आहे सांस्कृतिक आणि प्रादेशिक भिन्नता, कथा ज्या प्रदेशात सांगितली जाते तेथील सांस्कृतिक वैशिष्ट्यांचे रंग त्या कथेत नकळतपणे व सहजपणे मिसळले जातात. तसेच कथानिवेदकाच्या कथनातही, मूळ कथा बदलली नाही, तरी तप-शीलात फरक होणे स्वाभाविक असते. अनेक धर्मसंप्रदायांनी, प्रचलित लोक-कथांना आपल्या धर्मप्रसारासाठी आपल्या धर्माच्या चौकटीत बसविण्याआधी त्यात थोडेफार बदल केलेले आहेत.

### कथाविशेष व कल्पनाबंध यांतील भेद

वरील विवेचनावरून कथाविशेष आणि कल्पानबंध यांच्या स्वरूपांतील फरक स्पष्ट व्हावयास हरकत नाही. कथाविशेष हा एक वा अनेक कल्पाबंधांचा बनलेला असतो. बरेच वेळा कथाविशेष हा एकाच कल्पनाबंधाचाही असू शकतो, आणि त्या वेळी तो कल्पनाबंध व कथाविशेष मानला जातो. तथापि कथाविशेषात अनेक कल्पनाबंधही असू शकतात. स्टिथ थॉम्पसन यांनी या दोहोंतील आणखी असलेला फरक पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे, 'कथाविशेषवस्तूची एका कथाविशे-षाच्या सर्व पर्यायांत, त्यांची उत्पत्ती आणि प्रसार याबाबत, काहीतरी नाते आहे असे सूचित करते, कल्पनाबंधसूचीत असे गृहीत धरले जात नाही'. [३]

### प्रमाणभूत कथाविशेषसूची

पारंपरिक कथांतील कथाविशेष शोधून काढण्याचे काम सुरू झाल्यानंतर दिवसेंदिवस कथाविशेषांच्या संख्या झपाट्याने वाढत होती. हळुहळू अभ्यासकांना सर्वसमावेशक व विस्तृत सूचीची उणीव भासू लागली. जागतिक पातळीवर ज्याला अभ्यास करावयाचा असेल तर त्याला वर्गीकरण आणि सूचीकार यांची मदत फारच आवश्यक असते. त्याविना त्याचा अभ्यास कष्टमय, ध्येयहीन होण्याची शक्यता असते. ज्याचा अभ्यास एखाद्या विशिष्ट प्रदेशापुरताच मर्यादित असतो त्यालाही प्रचंड जगाच्या तुलनेत त्यांच्या विषयविभागाचे नेमके स्थान कोणते आहे याबाबतच्या आकलनासाठी, एखाद्या आराखड्याची, सूचीची गरज भासते. लोक-कथांच्या अभ्यासक्षेत्रात त्या दिशेने प्रयत्न सुरू झाले. व्हॉनहॉन, कोहलर, जेकॉब्ज आदि काही विद्वानांनी सूची करण्याचे प्रयत्न केले. तथापि ते परिपूर्ण उतरले नाहीत. जे. क्रोह्न यांनी ही अवघड कामगिरी आपला शिष्य अँटी आर्ने यांच्यावर सोपविली. आर्ने यांनी मोठ्या परिश्रमपूर्वक हे काम पार पाडले, त्यांच्या सूचीला मान्यता प्राप्त झाली. कलांतराने स्टिथ थॉम्पसान् यांनी त्या सूचीचे, मूळ रचनेत फेरफार न करता, परिष्करण केले. आर्ने-थॉम्पसन् यांच्या परिश्रमातून तयार झालेली ही कथाविशेषसूची आज जगात प्रमाणभूत मानली जाते.

### कथाविशेषसूचीचे स्वरूप

कथाविशेषांच्या दृष्टीने कथांचे वर्गीकरण करताना आर्ने यांनी कथांची विभागणी तीन प्रमुख विभागांत केली असून नंतर या तीन प्रमुख विभागांचे उप-विभाग केलेले आहेत.

प्रमुख विभाग :- १) प्राणिकथा, २) लोककथा, ३) हास्यकथा

उपविभाग

(अ) प्राणिकथा

(१) वन्य प्राणी (Wild animals)

(२) वन्यप्राणी आणि पाळीव प्राणी (Wild animals and domestic animals)

(३) वन्यप्राणी आणि मानव (Wild animals and man)

(४) पाळीव प्राणी (Domestic animals)

(५) पक्षी (Birds)

(६) मासा (Fish)

(७) इतर प्राणी (Other animals)

(ब) लोककथा :– कथांचा हा विभाग सर्वात मोठा आहे.

(१) अद्भुतकथा (Supernatural Tales) :– अद्भुतकथेमध्ये अद्भुत पैलूचे अस्तित्व अनेक रूपांनी प्रकट होते. त्या अद्भुत पैलूच्या स्वरूपानुसार या उपविभागाचेही पोटभेद केले जातात –

| | |
|---|---|
| अतिमानवी शत्रू | Supernatural Adversary |
| अतिमानवी पती, पत्नी किंवा इतर नातेवाईक | Supernatural or other relatives. |
| अतिमानवी कामगिरी | Supernatural Tasks |
| अतिमानवी मदतनीस | Supernatural Helpers |
| अद्भुत वस्तू | Magic Objects. |
| अद्भुतशक्ती वा ज्ञान | Supernatural power or knowledg |
| अद्भुततेच्या इतर कथा | Other tales of Supetnatural |

२) धार्मिक कथा (Religious Tales) :– धर्मसंबंधीच्या कथा या उपविभागात समाविष्ट करण्यात येतात. या कथांतही अद्भुततेला स्थान असू शकते.

३) वास्तवकथा (Novella or Romantic tales) या कथा मानवी वास्तवतेच्या परिघात फिरणाऱ्या असतात. अद्भुततेला स्थान जवळजवळ नसतेच.

(४) मूर्ख राक्षसांच्या कथा (Tales of the Stupid Ogre) :– कथाविशेषांचा हा उपविभाग फार वैशिष्ट्यपूर्ण आहे. एकीकडे या कथा अद्भुतकथांच्या स्वरूपाच्या असतात तर त्याबरोबरच त्यांचे स्वरूप हास्यकथेसारखेही असते. एखाद्या अतिमानवी शक्तीला चातुर्याने वा बुद्धिसामर्थ्याने हास्यास्पद बनविण्याचा सफल प्रयत्न यांत चित्रित केलेला असतो. (देवाबरोबर पिकाची वाटणी, भुताला नमविणे यासारख्या कथा).

३) हास्यकथा

कथांमधील हा सर्वात लोकप्रिय विभाग आहे असे म्हणावयास हरकत नाही. त्यांचे उपविभाग पुढीलप्रमाणे आहेत.

**मूर्खांच्या कथा** (Numskull Stories) :– या उपविभागांत शेती, मासेमारी, शिकार अशा धंद्यांशी संबंधित मूर्खकथा समाविष्ट करतात. (मीठ पेरणे यासारख्या)

| | |
|---|---|
| पति–पत्नींच्या हास्यकथा | Stories about married couples |
| पुरुषविषयक हास्यकथा | Stories about a man (boy) |
| स्त्रीविषयक हास्यकथा | Stories about a woman (girl) |
| असत्यकथा | Tales of lying Formula tales |
| संकीर्ण कथा | Unclassified tales |

**कथाविशेष ठरविण्याचा निकष**

कथाविशेषसूचीच्या वरील आराखड्यावरून वर्गीकरणाची एकूण पद्धती लक्षात येते. कोणत्याही कथेचा कथाविशेष ठरविताना आर्ने यांनी पूर्ण कथा हा पाया मानला. जे कथाविशेष एकाच कल्पनाबंधाचे बनलेले असतात त्यांच्या वर्गीकरणात फारशा अडचणी येत नाहीत. अडचणी येतात त्या संकीर्ण कथांच्या संदर्भात. संकीर्ण कथांत एकापेक्षा अधिक कथाविशेष एकत्र गुंफलेले असतात. अशा वेळी कोणत्या कथाविशेषाला प्राधान्य द्यायचे ? एखाद्या कथेत अतिमानवी शत्रू नायक वा नायिकेला अतिमानवी कामगिरी सांगेल आणि ती कामगिरी एखाद्या अतिमानवी मदतनिसाच्या साहाय्याने वा अद्भुत वस्तूच्या साह्याने पार पाडली जाईल. अशा वेळी जो कथाविशेष एकूण कथेच्या दृष्टीने अधिक प्रभावशाली असेल त्या विभागात त्या कथेचा समावेश केला जातो. उदाहरणार्थ – हस्तलिखित (कथा ६६) – या कथेत वाघाची दोनदा फजिती होते. प्रथम गाढवाकडून व नंतर शेतकरीपत्नीकडून. म्हणजे या कथेत (वन्यप्राणी व पाळीव प्राणी) आणि (वन्यप्राणी आणि मानव) असे दोन कथाविशेष आहेत. यांत पहिल्या कथाविशेषाला जास्त महत्व द्यावे लागते कारण 'वाघ गाढवाला घाबरतो' हे माहीत असल्यामुळेच शेतकरीपत्नी वाघाला धाक दाखवू शकली की, 'माझ्या नवऱ्याच्या तोंडून रोज बारा गाढवे निघतात'. दुसरे उदाहरण 'मल्हारीची बानू (सुंबरान मांडीलं – कथा २१) या कथेचे घेता येईल. या कथेत अहंकारी पित्याची गैरमर्जी, दयाळू जासूद, अद्भुत मदतनीस शंकर, मल्हारीचे म्हाळसाशी कपटवर्तन, मल्हारीची अद्भुत शक्ती असे अनेक कथाविशेष आहेत. बानू आणि मल्हारी यांचा विवाह होण्यास मात्र मल्हारीच्या अद्भुत शक्तीचे दर्शन हा कथाविशेष निर्णायक प्रभावी ठरल्याने त्या विभागात या कथेचा समावेश करावा लागतो.

## मराठी कथाविशेषांची काही प्रातिनिधिक उदाहरणे

कथाविशेषसूच चा तपशील वर उद्धृत केलेला आहेच. या सूचीच्या आधारे मराठी लोककथांत आढळणाऱ्या कथाविशेषांची सूची परिशिष्टरूपाने या पुस्तकाला जोडलेली असून मराठी कथाविशेषांचे स्वरूप थोडक्यात स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रथम येथे मराठी कथाविशेषांची काही प्रीतिनिधिक उदाहरणे उद्धृत करीत आहे.

### अ) प्राणीकथा

**वन्यप्राणी – चतुर कोल्हयाकडून वाघिणीचा उपभोग** (पुष्प १ – कथा ३०)

शेतातली फुले कोल्हयाकडून ओल्या अंगावर चिकटली. त्याला वाटले आपल्याला रोग जडला — त्याने सांबाला नवस केला, 'अंगावर उठले ते नष्ट कर, तुझ्या देवळात आणून वाघीण भोगीन'. अंग वाळल्यावर फुले पडून गेली. कोल्हयाने विघिणीच्या मुलांजवळ आईसाठी निरोप दिला, 'कोलूमामाने तुला देवळात भोगण्या-साठी बोलावले.' वाघीण चवताळून देवळात गेली. कोल्हा तिला पाहताच मोरीतून घुसून पलीकडून बाहेर पडला. वाघीण मात्र मोरीत अर्धवट अडकून बसली. कोल्हयाने वाघिणीचा उपभोग घेऊन नवस फेडला. वाघिणीची कशीबशी सुटका झाली.

**वन्य प्राणी आणि पाळीव प्राणी** – वाघ आणि गाढव (हस्तलिखित कथा ६६)

गाढव व वाघ यांच्यांत एकमेकांना आठ पंजे मारण्याची शर्यत लागली. गाढवाने चिखलात लोळून आपल्या अंगावर चिखलाची पुटे चढविली म्हणून त्याला वाघाचे पंजे लागलेच नाहीत. परंतु गाढवाच्या लाथांनी वाघाला मात्र पळ काढावा लागला.

**वन्य प्राणी आणि मानव** – दोन वाघांची शेतकऱ्याकड्न फजिती (कथा पुष्प१-३१)

एका शेतकऱ्याच्या परसात दोन वाघ एकमेकांकडे पाठ करून बसले होते. शेतकरी घाबरला होता. पण त्याने प्रसंगावधान राखून त्यांच्या जुळलेल्या शेपटयां-वर जळता ढोण ठेवला. दोघे वाघ भांडू लागले, 'तूच मला भाजलेस'. ती संधी साधून शेतकरी पळून गेला.

**पाळीव प्राणी** – मांजराने खीर खाल्ली, (दाते २ – कथा ३)

मांजर, उंदीर, वानर, कांडेचोर, चानी यांनी सर्वांनी मिळून खीर केली. खीर करून सर्वजण फिरायला गेले. मांजराने मधूनच परत येऊन खीर खाल्ली.

**पक्षी** – टिटवीची साद (पुष्प १ – कथा १३)

वाघ आणि टिटवी पक्षी शेजारी. टिटवीला आपल्या हिंसक शेजाऱ्याची सदैव शंका येई. एकदा ती चाऱ्यासाठी गेली असता तिचे कुटुंब कडा पडून गाडले गेले, टिटवीला वाघाचाच संशय आला. तेव्हापासून वाघ शिकारीला निघाला की टिटवी साद घालून सर्वांना सावध करते.

**ब) लोककथा – अद्भुतकथा**

**अतिमानवी शत्रू – आक्काबाईचा फेरा** (सांगीवांगी; कथा – १८)

एका ब्राह्मणावर आक्काबाईचा फेरा – पैसा टिकत नसे – विक्रमादित्य राजाने तीनदा मुलीच्या लग्नासाठी पैसे दिले – तीनही वेळा आक्काबाईने पैसे पळवून नेले – विक्रमादित्य राजाने फेरा स्वतःवर घेतला – त्याच्यावर संकटे – राज्यत्याग करावा लागला – चोरीचा आळ – हातपाय तोडले गेले – तेलघाण्यावर नोकरी – फेरा संपल्यावर सुखप्राप्ती.

**अतिमानवी नातेवाईक** – खडका कोथिंबीर (दाते १ – कथा १)

दोघे बहीणभाऊ – सावत्र आईकडून छळ – विषप्राशनाने भाऊ मृत – बहिणीच्या पोटापाण्याच्या सोयीसाठी भावाची खडका कोथिंबीर, मोर, पोपट, मासा अशी विविध रूपे – बहिणीच्या स्वप्नात जाऊन तिला आपल्या रूपाची माहिती देई.

**अतिमानवी कामगिरी** – भिक्षा (सुंबरानं मांडिलं; कथा ६)

एका राजाने एका ब्राह्मणाला एक अवघड काम सांगितले, 'तीन रंगांचे, तीन गुणांचे व सप्तपाताळातही नसतील असे मोती आण'. समुद्रदेवाने तसे मोती दिले. त्यातील एक सन्य देणारा, दुसरा पोषाख, हत्यारे व घोडे देणारा तर तिसरा अन्न देणारा होता. ब्राह्मण श्रीमंत

**अतिमानवी मदतनीस** – जाई (एक होता राजा – कथा २)

पोरक्या जाईला सावत्र आईचा जाच – शंकराकडून सदैव मदत – दोन जादूच्या टाचण्या – सावत्र आईने खड्ड्यात ढकलताच टाचणीमुळे जाईचे पाखरात रूपांतर – टाचणी निघताच पूर्वरूप – पतीमुलाशी पुनर्मीलन.

**अद्भुत वस्तू** – कवडी (खानदेशी लोककथा – कथा ४)

कवडीची पूजा करण्यामुळे गरीब दांपत्याला सुखाचे दिवस – त्यात खंड पडल्यामुळे पुन्हा दारिद्र्य.

**अद्‌भुत शक्ती किंवा ज्ञान** – मी माझ्या नशिबाची (दाते१ – कथा १०)

'पित्याच्या नशिबाने' खाते हे अमान्य करणाऱ्या मानी राजकन्येचा एका दरिद्री व ज्याच्या पोटात सर्पाने वस्ती केली होती अशा माणसाशी विवाह – पतीच्या पोटातील सर्प आणि दुसरा एक धनरक्षक सर्प यांचे बोलणे राजकन्येला समजत होते. त्यांच्या भाषणातून दोघांच्या मृत्यूचे मार्ग तिला कळले. तिने पतीची सर्पा–पासून सुटका करून धनही मिळविले.

**अद्‌भुततेच्या इतर कथा**

१) **तोडा पण तोडा – हळूच तोडा** (एक होता राजा – कथा ८)

सातव्या राणीच्या सहा मुली व एक मुलगा, तिच्या सहा सवतींनी जन्मतःच पळवून नेऊन एका झाडाखाली पुरून टाकला. त्याजागी सहा जाईचे वेल व एक गुलाबाचे झाड उगवले. सर्वांना खूप फुले, खूप गोड वास तथापि फुलांवर फुल–पाखरू वा मधमाशी बसत नसे. फुले तोडू लागले की आवाज येई, 'तोडा पण तोडा हळूच तोडा'. राणीला विचित्र वस्तू होतात म्हणून राजा खूप आजारी – फुलांच्या वासाने आजार नष्ट – वेलींच्या गाण्यातून सत्यकथन – पुनर्मीलन.

२) **धार्मिक कथा – ईश्वराची भीती** – (पुण्य १ – कथा ३८)

दोन शिष्य – गुरूने कोणाला कळणार नाही अशा तऱ्हेने पक्षी मारून आणण्यास सांगितले. एकाने अरण्यात एकांत जागी जाऊन पक्षी मारून आणला दुसऱ्याने तसाच जिवंत पक्षी परत आणला कारण कुठेही पक्षी मारला तरी ईश्वर पाहाणारच !

३) **वास्तवकथा – चतुरा** (मराठवाड्यातील लोककथा – कथा २९)

राजपुत्राला चतुर बायकोच हवी – चतुरा नामक मुलीने आव्हान स्वीकारले. तिला एकांतात ठेवले – पहारेकऱ्यांची मर्जी संपादन करून बाहेर जाऊयेऊ लागली. एका कलावंतिणीकडे नाचगाणे शिकली – तेथे येणाऱ्या राजपुत्राला भुलवले – गर्भवती – राजपुत्राची अंगठी मागून घेतली – एकांतमहालात गुप्त – पुत्रप्राप्ती – राजपुत्राला खूण दाखविली – चातुर्याची प्रशंसा – विवाह.

**मूर्ख राक्षसांच्या कथा – शेरास सव्वा शेर** – (सांगीवांगी कथा १६)

तोंडाळ पत्नी – म्हातारा पती घाबरून पळाला – विहिरीत लपला – विहिरी–तील पिशाच्चाशी मैत्री – पत्नी तेथे येताच घाबरून पळाले – पिशाचाने पिशाच–बाधेच्या सुटकेचा मंत्र दिला – एकदाच वापरण्याची अट – प्रधानकन्येला

पिशाच्चाने झपाटायचे, म्हाताऱ्याने तिची सुटका करून पैसे मिळवायचे हा कट – म्हातारा श्रीमंत – पिशाच्चाने नंतर राजकन्येला झपाटले – राजाचे म्हाताऱ्याला आमंत्रण – म्हाताऱ्याची पंचाईत, राजाचाही धाक – पिशाच्चाचा धाक, 'राज–कन्येला सोडवलेस तर तुलाच झपाटीन' – तेवढ्यात म्हाताऱ्याची पत्नी हजर – पिशाच्चाला तिचा धाक घातला – पिशाच्च राजकन्येला सोडून पळाले – राजा कडूनही मोठे बक्षीस.

(क) हास्यकथा

**मूर्खकथा – पसाटी** (खानदेश लोककथा – ११)

बिसमिल्ला खाटीक – शेती करावयाची इच्छा – शेतीकामास बुद्धीची, ज्ञानाची जरुरी नाही असे त्याचे ठाम मत – शेजारी बाबाजी यांना ते अमान्य – बिसमिल्लाने आव्हान स्वीकारले – शेतीची अवजारे घेतली – धडधाकट गडी कामास लावले – काम काय सांगावे हे कळेना – पहिल्या दिवशी सुट्टी – दुसऱ्या दिवसापासून बाबाजी जे काम आपल्या नोकरांना सांगत ते चोरून ऐकून तेच काम आपल्या नोकरांना सांगे – कापूस तयार – बिसमिल्लाचे कपट बाबाजींना कळले – नोकरांना सांगितले, 'उद्या मी काम सांगताना तुम्हाला वाटेल ते सांगीन, पण तुम्ही कापूस वेचायचा'. दुसऱ्या दिवशी बाबाजींची गड्यांना आज्ञा, 'काट्यां–च्या पसाट्या कपाशीवर फिरवा'. बिसमिल्लाची नोकरांना तशीच आज्ञा – गड्यांची नाराजी – गड्यांना दमदाटी – कपाशीचा सत्यानाश बाबाजींचे म्हणणे मान्य.

**पतिपत्नींच्या हास्यकथा – धूर्त पत्नी –** (मराठवाड्यातील लोककथा कथा ५)

गुंडोबा भट रोज एका ब्राह्मणास भोजन घाली – पत्नी नाराज – एकदा एका ब्राह्मणाला तिने सांगितले, 'माझा नवरा असाच रोज एकाला जेवायला बोलावून दाव्याने बांधतो व मुसळाने मारतो'. अतिथी घाबरला मागच्या दरवाजाने पळाला गुंडोबा घरी येताच त्याला सांगितले,' अतिथीने दावे व मुसळ मागितले. मी नाही म्हणताच पाहुणे पळाले.' अतिथी नाराज होऊ नये म्हणून गुंडोबा दावे व मुसळ घेऊन त्याच्यामागे धावला. अतिथी आणखी घाबरून वेगाने पळून गेला.

**पुरुषविषयक हास्यकथा – खोल किती आहे?** (खानदेशी लोककथा – कथा १०)

मारुती कामसू, सालस परंतु आहार मोठा – कामकरून काढून टाकीत – खादाड पण मानी – दिल्याशिवाय खात नसे – खाण्यावरुन कोणी बोलले तर

काम सोडून देई – एका भटजीकडे जमीन कसायला राहिला – भटजीच्या बायकोची तक्रार – भटजीची युक्ती – रोज गोड वाढायचे आणि युक्ती – रोज म्हणायचे, 'थोडसच आहे पण गोड कसं आहे?' – मारुतीची उपासमार – मारुतीही थोडेशेच शेत नांगरायचे – भटजीची कुरकूर – मारुतीचे उत्तर, 'थोडंसच आहे पण खोल किती आहे!' मारुतीचे हाल बंद.

**स्त्रीविषयक हास्यकथा – सासूसुना** (तीर्थांचे सागर – कथा ११)

प्रेमळ सासू – कामचुकार सून – सासूने औषध उगाळायला सहाण मागितली – 'सहाण उचलत नाही' असे सुनेचे उत्तर – सासूची युक्ती – सहाणेला सोन्याचा मुलामा देऊन आणला – सून ती सहाण दागिना म्हणून गळ्यात घालून मिरवू लागली. सासूने पुन्हा सहाण मागितली – सुनेचे तेच उत्तर – सासूने गळ्यातील सहाणेकडे बोट दाखविले – सून खजील.

**असत्य कथा** – सर्वात मोठा कोण ? (पुष्प ४ – कथा ७)

कोळीपुत्राला शक्तिचा गर्व – अधिक शक्तीवान् माणसाच्या शोधार्थ भ्रमण – खुप जड फळ्या उचलणारा सुतार व मोळीविक्या – दहापंधरा गाड्या ओढणारा माणूस – कोळीपुत्रासह त्या सर्वांना तळहातावर उचलून नेणारी शेतकरी पत्नी – त्या सर्वांना चोचीत उचलून नेणारी घार – सर्वांना खाण्यासाठी महालावर उतरवल्याने महालाला हादरा – महालातील कलावंतिणीने स्वतःच्या केसाचा टेंगा देऊन महालाचे हादरणे थांबविणे.

**मालाकथा** – चिमणी व कावळा (दाते १ – कथा ४)

चिमणी व कावळा – चिमणीला मोती सापडला – कावळ्याला हरबरा सापडला – कावळ्यानें हरभरा खाऊन टाकला – चिमणीचा मोती पहावयास मागितला – ती देईना – शेवटी दिला – मोती घेऊन कावळा उडून झाडावर बसला – झाड पाडावे म्हणून चिमणी सुताराकडे – त्याचा नकार – सुताराला शिक्षा करावी म्हणून राणीकडे – राणीचे लुगडे पळवावे म्हणून उंदराकडे — उंदराला खावे म्हणून मांजराकडे – मांजराला चावावे म्हणून कुत्र्याकडे – असेच सोटा, अग्नी, समुद्र, हत्ती व शेवटी मुंगीकडे – मुंगी हत्तीच्या कानात शिरायला तयार – हत्ती समुद्र पिण्यास तयार – अग्नी झाड जाळायला तयार – कावळ्यानें घाबरून मोती परत दिला... (दाते १)

**मराठी कथाविशेषाची जागतिकता**

कथाविशेषांचे साकल्याने अवलोकन केल्यास असे निश्चितपणे म्हणता येते

की, प्राणिकथांतील 'मासा' या उपविभागाचा अपवाद सोडला तर, (महाराष्ट्राच्या कोकण विभागातील लोककथा संकलित झाल्यास त्याही उपविभागातील कथा सापडणे शक्य आहे) मराठी लोककथा कथाविशेषांच्या बाबतीत समृद्ध असून सूचीतील तिन्ही प्रमुख विभागांचे व त्यांच्या उपविभागांचे प्रतिनिधित्व त्यात दिसून येते. ही बाब मराठी लोककथांचे जागतिक लोककथांशी असणारे नाते अधिक दृढ करणारी आहे. मराठी कथाविशेष, कथासरित्सागरातील कथाविशेष, भारतातील अन्यप्रांतीय कथाविशेष आणि स्टिथ थॉम्पसन यांनी दिलेल्या कथाविशेष-सूचीतील कथाविशेष (थॉम्पसन यांनी The Folktale या ग्रंथात अभ्यासिलेले) यांच्यांतील काही साम्यस्थळे उद्धृत केल्यास हे नाते अधिक स्पष्ट होऊ शकेल. या संदर्भासाठी घेतलेली भारतातील अन्यप्रांतीय संकलने पुढीलप्रमाणे आहेत. त्यासाठी पुढील विवेचनात जे संक्षेप वापरले आहेत कंसात दिले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Folktales of Kerala | सं. K Jacab | (केरळ) |
| 2) | Folktales of Tamilnadu | सं. Seethalakshmi | (ता. नाडू) |
| 3) | कर्नाटककी लोककथाएँ | सं ज्ञानेन्द्रकुमार भटनागर | (कर्नाटक) |
| 4) | Folktales of Gujrat | सं Tara Bose | (गुजरात) |
| 5) | Folktales of Madhya Pradesh | सं Sham Parmar | (मध्य प्रदेश) |
| 6) | Folktales of Rajastan | सं B. R. Choudhari | (राजस्थान) |
| 7) | Folktales of Orissa | सं Shanti Mahanty | (ओरिसा) |
| 8) | Folktales of Bengal | सं G. Mujumdar | (बंगाल) |
| 9) | Folktales of Assam | सं Borooach | (आसाम) |
| 10) | Folktales of Assam | सं रमेशचंद्र प्रेम | (आसाम) |
| 11) | Folktales of Uttar Pradesh | सं Bahadur | (उत्तर प्रदेश) |
| 12) | Folktales of Himachal Pradesh | सं Seethalakshmi | (हिमाचल प्रदेश) |
| 13) | Folktales of Kashmir | सं S. L. Sadhu | (काश्मीर) |
| 14) | पंजाबी लोककथा भाग १ | सं दुर्गा भागवत | (पंजाबी भाग १) |
| 15) | पंजाबी लोककथा भाग २ | सं दुर्गा भागवत | (पंजाबी भाग २) |

(या शिवाय मराठी लोककथांच्या संकलनांचे संदर्भ देतानाही संक्षेपानेच दिले आहेत. अभ्यासकांना ही संकलने परिचित असल्यामुळे त्यासंबंधीचा तपशील दिला नाही.)

**साम्यस्थळे**

१) सवतीमत्सर आणि सावत्र मुलांचा छळ हा लोककथांचा एक जागतिक विषय आहे. सवतीचा छळ करणे, सवतीची मुले जन्मतः पळवून दूरवर नेऊन

टाकणे, वा पुरून टाकणे आणि त्या जागी एखादी निर्जीव वस्तू वा प्राणी ठेवणे, सावत्र मुलांवर विषप्रयोग करणे, त्यांची आश्रयस्थाने वा मदतकारणे नष्ट करणे, त्यांना कष्टाची कामे करावयास लावणे, सावत्र भावंडांत सतत तेढ असणे इत्यादी कल्पनाबंध कमीअधिक फरकाने अशा कथाविशेषांत सर्वत्र दिसून येतात.

संदर्भासाठी घेतलेल्या लोककथांच्या संकलनांत अनेक कथांतून कथाविशेषां-तील साम्य स्पष्ट होते. युरोपात सिंड्रेलाची कथा प्रसिद्ध आहे. कथासारित्सागरा-तील लंबक ७, तरंग ५ व ८ यांतही या स्वरूपाचे कथाविशेष आढळतात. उपरि-निर्दिष्ट निरनिराळ्या प्रांतांच्या लोककथांच्या संकलनात पुढीलप्रमाणे सवतीमत्सर आणि सावत्र मुलाचा छळ यासंबंधीचे कथाविशेष दिसून येतात.

| | | | |
|---|---|---|---|
| काश्मीर | कथा | क्र. | १९ |
| हिमाचल प्रदेश | ,, | ,, | १६ |
| मध्यप्रदेश | ,, | ,, | ३ |
| पंजाबी | ,, | ,, | ३, ११ |
| बंगाली | ,, | ,, | १ |
| गुजराथ | ,, | ,, | ६ |
| आसाम | ,, | ,, | ८ |
| उत्तरप्रदेश | ,, | ,, | ९ |
| राजस्थान | ,, | ,, | १९ |

**मराठी लोककथा**

मराठी लोककथांतही हा कथाविशेष आढळतो. संकलित आणि अप्रकाशित लोककथांत या कथाविशेषांच्या एकूण नऊ कथा उपलब्ध झाल्या. त्याशिवाय पुढील प्रकाशित संपादनांत विपुल कथा आढळतात.

पुष्प १ – कथा ४१, ४२; पुष्प २ – कथा ५, ९; पुष्प ४ – कथा २; दाते भाग१ – कथा १; दाते भाग २ – कथा ७, १०; एक होता राजा – कथा २, ३, ७, ८, १०; सांगीवांगी – ३, ६; वैजयंती – कथा १७; मराठी लोककथा पुष्प १ कथा – १, ९.

२) जादूच्या वस्तूंची प्राप्ती, वस्तू पळविली जाणे, पुन्हा प्राप्त होणे. संकटा-तून मुक्तता व्हावी किंवा जीवन सुकर व्हावे म्हणून जादूची वस्तू मिळणे, कुणी-तरी ती लोभाने पळविणे आणि एखाद्या प्रतिकूल वस्तूच्या साह्याने ती परत मिळणे हा कथाविशेषही फार लोकप्रिय आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

युरोप (कथाविशेष क्र. ५६३)
काश्मीर कथा क्र. ७
हिमाचल प्रदेश ,, ,, ६
केरळ ,, ,, ४
पंजाबी ,, ,, ३
ओरिसा ,, ,, २
उत्तर प्रदेश ,, ,, २०
तामिळनाडू ,, ,, ८
मराठी पुष्प १ कथा २५, ३२; पुष्प२ – कथा ३
तीर्थांचे सागर – कथा ७; वैजयंती कथा १२
अप्रकाशित संकलनातही एका कथेत जादूच्या वस्तूसंबंधीचा एक कथाविशेष उपलब्ध झाला.

**३) प्राणी – मानव विवाह**

प्राणी–मानव–विवाह याची कल्पना करणेही रोजच्या व्यवहारात अवघड वाटते; तथापि लोककथांत असे विवाह ठायीठायी आढळतात. अर्थात् यांतील प्राणी कायम प्राणीरूप राहात नाहीत. कालांतराने प्राणी–मानव रूपांतर हमखास घडून येते. काही कथांत मूळचे प्राणी मानवरूपाने विवाह करतात, काही काळ पुन्हा प्राणीरूपाने वावरतात व नंतर त्यांना कायमचे मानवरूप लाभते.

स्टिथ थॉम्पसन यांनी The Folktale या ग्रंथांत 'Animal wives and husbands' या प्रकरणात अशा कथांची उदाहरणे दिली आहेत. (बेडूक, कोल्हा, गरूड, व्हेलमासा)

काश्मीर – कथा ३ (सर्प - मानव)
पंजाबी भाग १ – कथा १ (मगर - मानव)
भाग २ – कथा २ (मानव - सर्पिणी)
भाग २ – कथा ८ (उंदिर - मानव)
गुजराथ – कथा ५ (गाढव - मानव)
आसाम – कथा – १४ (मासा - मानव)
मराठी – सांगीवांगी – २० (नाग - मानव)
अप्रकाशित संकलनात 'घुस नवरी' ही कथा याच स्वरूपाची आहे.
मराठवाड्यातील लोककथा – कथा २ (वाघ - मानव)
पुष्प ४ – कथा ३ (नाग - मानव)

४) पिकाची वाटणी

शेतात पीक लावण्यापूर्वी दुसऱ्या कोणाला तरी पिकाचा खालचा, वरचा किंवा खालचा आणि वरचा भाग द्यायचा कबूल करणे आणि जसे ठरले असेल त्यानुसार विशिष्ट पीक काढून चातुर्याने स्वतःचा फायदाच फायदा करून घेणे ही कथाही बऱ्याच प्रदेशांत रूढ आहे.

| | | |
|---|---|---|
| The crop Division | — | कथाविशेष क्र. १०३० |
| काश्मीर | — | कथा क्र. २ |
| मराठी | — | पुष्प ४ कथा ९ |

५) मूर्ख जावई

हास्यकथांत मूर्ख जावयाच्या कथांचा वाटा फार मोठा आहे. अडाणी, भोळसर, सांगकाम्या, निर्बुद्ध जावयाची सासुरवाडीला जातांना वाटेत झालेली फजिती आणि प्रत्यक्ष सासुरवाडीला झालेली फजिती या कथांत वर्णन केलेली आढळते.

| | |
|---|---|
| The Foolish bridegroom | कथाविशेष क्र. १६८५ |
| उत्तर प्रदेश | कथा क्र. १३, २० |
| तामिळनाडू | कथा क्र. २ |
| हिमाचल प्रदेश | कथा क्र. ७ |
| केरळ | कथा क्र. ५, १२, २४ |

मराठी पुष्प ४ – कथा १०
मराठवाड्यातील लोककथा – कथा ३
खानदेशी लोककथा – कथा ९

६) दैवाचा शोध

दैवाचा, नशिबाचा किंवा धर्माचा शोध लावण्यास नायक निघणे, वाटेत अनेक संकटग्रस्तांची भेट, दैवाची भेट व कृपा, देवाने संकटग्रस्तांच्या संकट निवारणाचे मार्ग कथन करणे, संकटे नष्ट होणे व त्यांतून नायकाला अमाप संपत्ती मिळणे आणि नायकाचा भाग्योदय अशा कल्पनाबंधांनी गुंफलेल्या कथा लोकप्रिय आहेत.

Journey in search of Fortune — कथाविशेष क्र. ४६० व
तामिळनाडू कथा क्र. १६
हिमाचल प्रदेश " " १५
मराठी – एक होता राजा – कथा ९
वैजयंती – कथा ३१,

७) **मालाकथा**

मालाकथा हा लोकप्रिय लोककथाप्रकार सर्व देशांच्या लोककथांत आढळतो. The Folktale या ग्रंथात थॉम्पसन यांनी काही मालाकथांची उदाहरणे दिली आहेत. (How the Mane Regained Its Tail, The Death of the Cock).

पंजाबी भाग १ – कथा क्र. ४
भाग २ – कथा क्र. ५
तामिळनाडू – कथा क्र. २०
आसाम – कथा क्र. ४, ५
मराठी – दाते भाग १ – कथा क्र २, ३, ४, ५, ६.

**मराठी लोककथा, कथासरित्सागर व अन्यप्रांतीय लोककथांतील साम्यस्थळे.**

१) पेटीतील अदलाबदल
कथासरित्सागर – खंड १, लंबक ३, तरंग १
काश्मीर – कथा ६ (Editor – Sadhu)
कथा १२ (Editor – Bani Choudhary)
मराठी – ६, ३१, ६१; सुंबरान मांडिले – कथा ७

२) ब्राह्मणाचे खोटें अंतर्ज्ञान
कथासरित्सागर – लंबक ६ तरंग ४
हिमाचल प्रदेश – कथा क्र. ३
उत्तर प्रदेश – कथा क्र. १
आसाम – कथा क्र. १३
मराठी – पुष्प ४ – कथा १

**मराठी लोककथा आणि कथासारित्सागर**

१) राजसंतानाबरोबर मैत्री अवघड
कथासरित्सागर – लंबक ६, तरंग १
मराठी – अप्रकाशित संकलनातील एक कथा अशीच.

२) पूर्वजन्मस्मरण
कथासरित्सागर (कर्पूरिका, नरदत्तवाहन)
मराठी – एक होता राजा – कथा ५.

३) चोराचे चातुर्य
कथासारितत्सागर (घट, कर्पर)

मराठी – चोरांच्या चातुर्याच्या अनेक कथा मराठी मौखिक परंपरेत प्रचलित आहेत.

**मराठी लोककथा व युरोप**

कांही मराठी लोककथांचे युरोपमधील कथांशी विलक्षण साम्य आढळते. जसे–

१) युरोप – Jack and Beanstalk
मराठी – सारंगी (म. लो. सा. माला पुष्प – कथा ३३)

२) युरोप – The magician & his pupil (Transformation combat)
मराठी – काही अप्रकाशित कथा आढळतात.

३) युरोप – Love the salt
मराठी – मीठ (राजविलासी केवडा – कथा ९)

**मराठी लोककथा व भारतातील अन्य प्रांतीय लोककथा**

१) मेघी राजा – मराठी सांगीवांगी – कथा २
– मध्येप्रदेश – कथा १०

२) सात आयांचा लेक – मराठी – दाते भाग २ – कथा ७
पंजाबी भाग २ – कथा १२

३) दगडी राजवाडा – मराठी – म. लो. सा. माला; पुष्प – कथा ९
बंगाली–कथा ४

४) श्रमाच्या पैशांचे झाड – मराठी– मराठवाड्यातील लोककथा–कथा ७
उत्तर प्रदेश – कथा ११

५) पतीकडून रोज एका माणसाला जेवण, पत्नीची नाराजी — मराठी – मराठवाड्यातील लोककथा; कथा क्र. ५
तामिळनाडू – कथा क्र.

७) भुताची फजिती – मराठी – सांगीवांगी – कथा १६
तामिळनाडू – कथा क्र. २८

८) बायकोकडून ब्राह्मणाला दागिने, नवऱ्याकडून घोडा – काही अप्रकाशित कथा आढळतात.
दाते भाग २ – कथा १३
तामिळनाडू – कथा क्र. ८

९) वाघाकडून एकीला माहेरसुख, दुसरीला दंश – मराठी – मराठवाड्यातील लोककथा – कथा २८
बंगाल – कथा क्र. ५

१०) सुसरीची फजीती – मराठी – दाते भाग २ – कथा ४
पंजाबी भाग २ – कथा क्र. ११

११) कोल्ह्याचा निवाडा – मराठी – पुष्प ४ – कथा ४
पंजाबी भाग १ – कथा ५

१३) मेल्यावरही लोकांचा छळ – मराठी – म.लो.सा.माला पुष्प ३ कथा ९७
खानदेशी लोककथा – १२
केरळ – कथा क्र. १

१३) भावजयीचा जाच – मराठी – राजविलासी केवडा – कथा क्र. २
काश्मीर – कथा क्र २३
मध्यप्रदेश – कथा क्र. २

१४) मोलाचा उपदेश – मराठी – म. लो. सा. माला
पुष्प २ – कथा ४; पुष्प ४ कथा ११.
काश्मीर – कथा क्र. २१
हिमाचल प्रदेश – कथा क्र. ३४
उत्तर प्रदेश – कथा क्र. ३

१६) राजकन्येचा पराक्रम – मराठी – राजविलासी केवडा – कथा क्र. १
मध्यप्रदेश – कथा क्र. ८

१७) पाण्यासाठी बळी – मराठी – म. लो. सा. माला, पुष्प १ – कथा २०
सासुरवास – कथा क्र. ३
आसाम – कथा क्र. ३

प्रत्येक प्रदेशाची एक किंवा दोन प्रातिनिधिक संकलने संदर्भासाठी घेतली असता त्याने एवढी साम्यस्थळे आढळून येतात. त्या त्या प्रदेशातील विस्तृत संकलनांचा अभ्यास केल्यास ही साम्यस्थळे खूपच वाढतील यात शंका नाही. असा तुलनात्मक अभ्यास हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरेल.

### मराठी कथाविशेषांसाठी नवीन उपविभागांची गरज

मान्य सूचीतील उपविभागांनुसार मराठी कथाविशेषांचे वर्गीकरण करताना असे लक्षात येते की अद्‌भुत कथाविशेषांत दैवी वा अतिमानवी कोप असा एक स्वतंत्र उपविभाग असावयास हरकत नाही. राक्षस, राक्षसी, पिशाच्च. मांत्रिक, चेटकी, जादूगार, अतिमानवी शक्ती धारण करणारे दुष्ट साधू हे स्वभावतःच दुष्ट असतात. त्यांच्याशी सामना चालू असला तर 'अतिमानवी शत्रू' हा कथाविशेष समर्पक ठरतो. तथापि देवदेवता या अतिमानवी शक्ती मुळात दुष्ट तर नाहीतच, किंबहुना त्यांचा दयाळू स्वभावच परंपरेने जास्त वर्णन केलेला आहे. एखाद्याकडून त्यांचा प्रमाद घडला तर मात्र त्यांचा कोप होतो, आणि अपराध्याशी त्यांचे शत्रुत्व सुरू होते. परंतु शत्रुत्व हा त्यांचा मूळ स्वभाव नव्हे. अशा दैवी कोपाची अशी

उदाहरणे विशेषतः व्रतकथांत व स्थानिक दंतकथांतही प्रचुरतेने आढळतात. व्रतात खंड पडला की देवतेचा कोप होतो. उदा. आदित्य राणूबाईची कहाणी, ललिता-पंचमीची कहाणी. एखाद्या विशिष्ट गावात प्रचलित असलेले बंधन मोडल्यास तेथील देवतेचाही कोप होतो. अशा कथांना कथाविशेषसूचीत 'अतिमानवी शत्रू' या विभागात समाविष्ट करणे प्रशस्त वाटत नाही. त्यामुळे 'दैवी कोप' असा स्वतंत्र उपविभाग करणे अधिक समर्पक ठरेल.

वास्तवकथा या उपविभागात कोणतेही पोटप्रकार मूळ सूचीत दिलेले नाहीत. तसे करणे काहीसे अवघडही आहे. तथापि या कथाविशेषांत कौटुंबिक संबंधातील कथाविशेष प्रामुख्याने आढळतात, आणि हे संबंध बहुधा तणावपूर्ण, प्रतिकूल स्वरूपाचे असतात. त्यामुळे 'परपीडन' असा एक पोटप्रकार त्यात करावयास हरकत नाही. 'पर' म्हणजे स्वतःपेक्षा वेगळा. सासू, सासरा, नणंद, भावजय, आई, वडील, पती, पत्नी, सावत्र आई, सावत्र भाऊ वा बहीण अशा अनेकविध नातेवाईकांकडून व क्वचित् परक्या माणसापासूनही ही पीडा उत्पन्न होऊ शकते.

### कल्पनाबंधांची सूची

कथाविशेषांच्या सूचीच्या प्रस्तावनेतच आर्ने यांनी अशी शक्यता प्रकट केली होती की कालांतराने कल्पनाबंधांची सूची करण्याचे कामही कोणीतरी हाती घेईलच. कथाविशेषांची सूची परिष्कृत केल्यानंतर काही दिवसांनी स्टिथ थॉम्पसन् यांनीच कल्पनाबंधांच्या सूचीचे अवघड काम पार पाडले. त्यांनी हे काम जमेल तेवढ्या जास्तीत जास्त विस्तृत पायावर आधारित व्हावे, यासाठी जास्तीत जास्त प्रदेशांतून लोककथा गोळा केल्या. सामग्रीचा विस्तार एवढा प्रचंड होता की अनेक लोकांचे परिश्रम कामी येत असले तरी हे काम बरेच लांबले. १९३६ साली हे काम पूर्ण स्वरूपात प्रकाशित झाले.

### कल्पनाबंधांच्या सूचीचे स्वरूप

कल्पनाबंधांच्या या सूचीत जगातील जवळजवळ सर्व कल्पनाबंधांची सामग्री एकत्र केली गेली आणि तिची तर्कशुद्ध व सुसंगत पद्धतीने पुनर्रचना करण्यात आली. थॉम्पसन यांनी कल्पनाबंधांची विभागणी एकूण २३ गटांत केलेली असून त्यांना रोमन वर्ण दिलेले आहेत. हिंदीमध्ये डॉ. सावित्री सरिन यांनी थॉम्पसन् यांचीच सूची प्रमाणभूत मानून, परंतु रोमन वर्णाऐवजी नागरी वर्ण योजून कल्पनाबंधांची सूची तयार केली आहे. 'लोकसाहित्याचे अंतःप्रवाह' या ग्रंथात डॉ. प्रभाकर मांडे यांनी मराठीत प्रथमच या स्वरूपाचे कल्पनाबंधांचे वर्गीकरण दिले असून त्यांनी

सावित्री सरिन यांचीच वर्णयोजना स्वीकारली आहे. कल्पनाबंधांच्या सूचीचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

१] (क) दैवतकथांतील कल्पनाबंध ( A – Mythological motifs )

या विभागात दैवतकथात्मक कल्पनाबंधांचा समावेश होतो. हा विभाग बराच विस्तृत असून त्यातील वर्ण्यविषयावर आधारित असे त्याचे बरेच उपविभाग पाडले आहेत.

निर्माता – Creator
देव – Gods
यक्ष, गंधर्व आणि संस्कृतिवीर ( Demigods and culture — Heroes)
विश्वोत्पत्ती आणि विश्वघटना (Cosmogony and Cosmology)
पृथ्वीची स्थलवर्णनविषयक वैशिष्टये ( Topographical features of the Earth).
जगावरील आपत्ती ( World Calamities )
नैसर्गिक व्यवस्थेची स्थापना (Establishment of Natural Order )
मानवी जीवनाची निर्मिती व व्यवस्था ( Creation and ordering of Human Life )
प्राणीजीवनाची निर्मिती (Creation of Animal Life)
प्राण्यांची वैशिष्टये (Animal Characteristics)
झाडे व वनस्पतीचा उगम ( Origin of trees and plants )
वनस्पति – वैशिष्टयांचा उगम (Origin of characteristics)

२] (ब) प्राणीविषयक कल्पनाबंध ( B – Animals )

प्राण्यांविषयीचे कल्पनाबंध या विभागात येतात. प्राण्यांच्या वेगवेगळ्या प्रकारांनुसार या विभागाचेही उपविभाग केलेले आहेत.

प्राणी ( Mythical Animals )
अद्भुत प्राणी ( Magic Animals )
मानवी गुण असलेले प्राणी (Animals with Human Traits)
मित्र प्राणी ( Friendly Animals)
प्राणी-मानव – विवाह (Marriage of Person to Animal)

३] (ग) निषेधपर कल्पनाबंध ( C - Taboo)

लोककथांत अनेक प्रकारचे निषेध आढळतात. खाण्यापिण्याचे, मागे पाहाण्याचे व बोलण्याचे अशा अनेक तऱ्हेचे निर्बंध कथांतील पात्रांवर घातलेले आढळतात.

या सर्वांचा समावेश या विभागात केला जातो. काही निर्बंध जसे नकारात्मक असतात तसे काही निर्बंध सक्तीच्या (अमुक एक केलेच पाहिजे) स्वरूपाचेही असतात.

४] (घ) **यातुविषयक कल्पनाबंध** ( D – Magic )

कल्पनाबंधांचा हा विभाग सर्वांत मोठा असतो असे म्हणावयास हरकत नाही. अद्भुत शक्तीच्या विविध स्वरूपांनुसार याचे उपविभाग केलेले आहेत.

रूपांतर ( Transformation )
यातुनाश ( Disenchantment )
जादूच्या वस्तू ( Magic Objects )
यातुशक्ती व तिचे प्रकटीकरण ( Magic Power and Manifestation )

५] (च) **मृत्यूविषयक कल्पनाबंध** ( E – The Dead )

मृत्यूविषयीचे कल्पनाबंध या विभागात समाविष्ट केले जातात. याचे उपविभाग पुढीलप्रमाणे केले जातात.

पुनर्चेतना ( Resuscitation )
भुते आणि इतर ( Ghosts and Other Revenants )
पुनर्जन्म ( Reincarnation )
आत्मा ( The Self )

६] (छ) **चमत्कार** ( F – Marvels )

लोककथांत चमत्कृतिपूर्ण गोष्टींची, घटनांची प्रचुरता आढळते. या सर्वांचा समावेश या विभागात होतो. त्याचे उपविभाग पुढीलप्रमाणे आहेत.

परलोकातील प्रवास ( Otherworld Journeys )
चमत्कृतिपूर्ण पात्रे ( Marvelous Creatures )
असामान्य स्थळे आणि वस्तू ( Extraordinary Places and Things )
असामान्य घटना ( Extraordinary Occurances )

७] (ज) **चेटूक** (G – Ogres and witches)

लोककथांत राक्षस, चेटकी इत्यादी पात्रांचे प्राचुर्य असल्याने त्यांच्यासाठी हा वेगळा विभाग योजलेला आहे. त्याचे उपविभाग असे आहेत.–

राक्षसांचे प्रकार ( Kinds of Ogres )
राक्षसांचा पराभव ( Ogres defeated )

८] (झ) **परीक्षा, पण** ( H – Test )

( वर दिलेल्या सर्व विभागांत अद्‌भुततेचे प्रावल्य जास्त होते. या विभागा-पासून अद्‌भुततेचे अस्तित्व थोडेफार असले तरी तिचे महत्त्व दुय्यम आहे.)

परीक्षा या विभागात लोककथांतील पात्रांना ज्या विविध कसोटचांना तोंड द्यावे लागते त्यांचा समावेश केला जातो. त्यांचे उपविभाग पुढीलप्रमाणे आहेत.

ओळख – परीक्षा ( Identity tests, Recognition )
विवाहपण ( Marriage tests )
चातुर्य – परीक्षा ( Tests of Cleverness )
पराक्रम – परीक्षा – कामगिरी ( Tests of Prowess )
पराक्रम – परीक्षा – शोध ( Tests of Prowess, Quests )
इतर परीक्षा ( Other Tests )

९] (ट) **चतुर आणि मूर्ख** ( J – The wise and Foolish )

हुषारी, चातुर्य आणि मूर्खपणाबाबतचे कल्पनाबंध या विभागात समाविष्ट केले जातात. या क्रियांमागील पात्रांची प्रेरणा बहुधा मानसिक असते. चातुर्या-बद्दलचे बरेचसे कल्पनाबंध नीतिकथांतून आढळतात, तर मूर्खपणाबद्दलचे कल्पना-बंध बहुधा हास्यकथांतून आढळतात. ( Acquisition and Possession of wisdom knowledge ). ( Wise and unwise conduct )

चातुर्य ( Cleverness )
मूर्ख ( Fools and other unwise Persons )

आणि त्यांचे उपविभागही पाडलेले नाहीत.

१०] (ड) **फसवणूक** (K – Deceptions)

वरील J विभागात पात्रांच्या मानसिक गुणावगुणांचा विचार अधिक केलेला होता, तर या विभागात त्यांच्या क्रियांना जास्त महत्त्व दिलेले आहे. लोककथांत फसवणुकीच्या खूप घटना दिसून येतात. या विभागाचे उपविभाग असे आहेत.

फसवणुकीने जिंकलेल्या स्पर्धा (Contests won by deception)
फसवा सौदा (Deceptive bargain)
चोऱ्या आणि लबाडचा (Thefts and cheets)
फसवणुकीने सुटका (Escape by dleception)
फसवणुकीने अटक (Capture by deception).
घातक फसवणूक (Fatal deception).

स्व-घातक फसवणूक (Deception is to self injury)

फसवणुकीने अपमानित अवस्था (Deception into humiliating position).

शीलभ्रंश किंवा फसवा विवाह (Seduction or deceptive marriage)

फसवल्या गेलेल्याच्या मालमत्तेचा, संपत्तीचा नाश ( Depe's property destroyed.)

व्यभिचारसंबंधित फसवणूक (Deceptions Connected with Adultery)

फसवणारा स्वतःच्याच सापळ्यात अडकणे (Deceives fall into own trap)

पोकळ घमेंडीतून फसवणूक (Deception through bluffing)

वेषांतरातून किंवा मोहजालातून फसवणूक (Deception by disguise or illusion).

ठकबाजी (Impostures).

खोटा दोषारोप (False accusation).

खलनायक आणि विश्वासघातकी (Villains and traitors).

अन्य फसवणूक (Other deceptions ).

कल्पनाबंधसूचीत आतापर्यंत आलेले विभाग बरेच विस्तृत आहेत, आता या नंतरचे विभाग तुलनेने लहान आहेत.

११] (ड) **दैवपालट** ( L - Reversal of Fortune )

लोककथांतील पात्रांच्या दैवाची उलटापालट होणे हा नेहमीच दिसून येणारा कथाभाग आहे. वरकरणी मूर्ख मानल्या जाणाऱ्या पात्राच्या पदरात यशप्राप्ती घडते तर गुणी समजल्या जाणाऱ्याची फजिती होते. अशा प्रकारचे कल्पनाबंध या विभागात समाविष्ट केले जातात.

१२] (ढ) **भविष्य - निर्देशन आणि शाप** (M - Orduing the future & curses)

भविष्यकथन, वचन, करार, शपथ, शाप यांचे कल्पनाबंध या विभागात येतात.

१३] (त) **संधी आणि दैव** ( N – Chance and Fate )

लोककथांतील घटनांत दैवाचा, नशिबाचा, संधीचा वाटा फार मोठा असतो. जुगार, दैवाने दिलेल्या इष्टानिष्ट देणग्या यासंबंधींचे कल्पनाबंध यात समाविष्ट केले जातात.

१४] (थ) **सामाजिक कल्पनाबंध** ( P - Society )

समाजस्थितीचे दर्शन घडविणारे कल्पनाबंध या विभागात मोडतात. राज्यपदासंबंधी पद्धती, समाजातील श्रेष्ठकनिष्ठ श्रेणी, विविध श्रद्धाविषयक समजुती इत्यादीविषयक कल्पनाबंधांचा विचार येथे करावा लागतो.

१५] (द) **पुरस्कार आणि शासन** (Q - Rewards and Punishments)

या विभागात पुरस्कार किंवा बक्षिसे आणि शिक्षा किंवा दंड यांची नोंद केली जाते.

१६] (ध) **कैदी व पळून जाणारे** ( R – Captures and fugitives )

१७] (न) **अनैसर्गिक क्रौर्य** ( S - Unnatural Cruelty )

लोककथांतील दुष्ट व्यक्तिरेखा बहुधा अतिक्रूर असतात. त्यामुळे क्रौर्याची अनेक कृत्ये पाहावयास मिळतात. सावत्र आईच्या क्रोर्याची उदाहरणे यात प्राचुर्याने आढळतात. तत्संबंधी कल्पनाबंधांचा समावेश या विभागात होतो.

१८] (प) **कामविषयक** ( T – Sex )

प्रेमाराधन, विवाह, वैवाहिक जीवन, अपत्यजन्म अशा विषयातील कल्पनाबंध या विभागात येतात.

१९] (फ) **जीवनाचे स्वरूप** ( U – Nature of Life )

जीवनाचे स्वरूप दाखविणारे आणि विशेषत: नीतिकथांत आढळणारे कल्पनाबंध या विभागात समाविष्ट केले जातात. या कथांची संहिता ' जग हे असे असते ' अशा स्वरूपाची असते. हा विभाग तुलनेने लहान आहे.

२०] (ब) **धर्मविषयक** ( V – Religion ).

धार्मिक पूजेच्या पद्धती, वस्तू, धार्मिक मतभेद यांच्यावर आधारित असलेल्या घटकांतील कल्पनाबंधांचा समावेश या विभागात करतात.

२१] (भ) **चरित्रविषयक** (W – Traits and Characters)

कथापात्रांच्या वैशिष्टयांचे उदाहरण देण्यासाठी ज्या कथा रचल्या जातात त्यांतील कल्पनाबंध या विभागात घालतात.

२२] (म) **हास्यविषयक** (X – Humour)

हास्यनिर्मिती हेच उद्दिष्ट असणाऱ्या प्रसंगांतील कल्पनाबंध या विभागात येतात.

२३] (य) संकीर्ण (Z – Miscellaneous groups of Motifs).

या विभागात ज्यांना स्वतंत्र विभागाचे स्थान देता येत नाही असे छोटे छोटे उपविभाग (न संपणाऱ्या कथा, अपूर्ण कथा, मालाकथा वगैरे), आणि इतर संकीर्ण कल्पनाबंध येतात.

कल्पनाबंधांच्या सूचीचे हे स्वरूप लक्षात घेतले की थॉम्पसन यांच्या सखोल आणि सूक्ष्म अभ्यासपद्धतीचा प्रत्यय आल्याशिवाय राहात नाही. त्यामुळेच त्यांनी मांडलेली कल्पनाबंधांच्या वर्गीकरणाची ही पद्धती आता विद्वन्मान्य झालेली आहे. दैवतकथा आणि अद्‌भुततेकडून वास्तवतेकडे आणि हास्यरसाकडे जाणारे विभाग त्यांनी पाडलेले आहेत. काही कल्पनाबंध कथाविशेषांचे स्वरूपातही पाहावयास मिळतात. त्यामुळे कथाविशेषांची सूची आणि कल्पनाबंधांची सूची यांच्यांत बऱ्याच ठिकाणी साम्य आढळते. अमुक एक कल्पनाबंध लोककथेच्या नेमक्या कोणत्या उपप्रकारात सापडतो याचा निर्देश कल्पनाबंधसूचीत नसतो. अद्‌भुतकथा, नीतिकथा, हास्यकथा या कुठल्याही प्रकारांत हे कल्पनाबंध असू शकतात. एकमेकांपुढे लिहिलेल्या कल्पनाबंधांत उत्पत्ती आणि प्रसारदृष्टचा काही नाते आहे असे मानण्यात येत नाही याचा उल्लेख केला आहेच. असे कल्पनाबंध तात्त्विकदृष्टचा एकमेकांचे शेजारी असतात. कल्पनाबंधांचे स्थान सहज सापडावे यासाठी प्रामुख्याने हे वर्गीकरण आणि रचना आहे. स्टिथ थॉम्पसन यांनी ही गोष्ट अत्यंत समर्पक उदाहरण देऊन स्पष्ट केली आहे – 'त्या बाबतीत याचे ग्रंथालय विभागणीशी अत्यंत साम्य असते. तेथे जुनी–नवी, चांगली-वाईट, लहान-मोठी अशी पुस्तके एका मांडणीवर ठेवलेली असतात, फक्त ती एकाच मानवी ज्ञानशाखेची किंवा उपशाखेची असावीत एवढेच महत्वाचे असते.'[४]

भारतामध्ये आता हीच सूची प्रमाण मानली जाते. व्हेरियर एल्विन यांनी Folktales of Orissa आणि Folktales of Mahakoshal या संकलनांच्या शेवटी कल्पनाबंधांची सूची दिलेली आहे.

**कल्पनाबंधांचे साम्य**

मराठी कथाविशेष आणि अन्य प्रांतीय वा जागतिक कथाविशेष यांच्यांतील साम्यस्थळांचा उल्लेख याआधी केला आहेच. कथाविशेषांतील हे साम्य कल्पना–बंधांतही आपोआपच संक्रांत होत असले तर नवल वाटावयास नको. कल्पना–बंधांच्या साम्यांची यादी देणेच अवघड होईल. तथापि काही प्रातिनिधिक उदाहरणे सांगता येतील जसे –

१) आसवांचे मोती होणे

२) विशिष्ट वस्तूत प्राणी
३) ठराविक फळे नशिबात
४) संकटाच्या खुणा घरी उमटणे
५) विवाहासाठी पण लावणे
६) गाणारा, सोनेरी पक्षी
७) बहीणभाऊसंबंध त्याज्य
८) पतिव्रत्यामुळे फूल न सुकणे
९) फळाने पुत्रप्राप्ती
१०) कळीचा घोडा

मराठी लोककथांतील कथाविशेष आणि कल्पनाबंध या दोहोंची जगन्मान्य सूचीनुसार सूची तयार केल्यास त्यांचा जागतिक आणि भारतांतील अन्यप्रांतीय लोककथांशी तुलनात्मक अभ्यास करता येईल आणि मराठी लोककथांची अन्य प्रादेशिक लोककथांशी दिसून येणारी जवळीक अधिक स्पष्ट करता येईल.

प्रकरण ४ थे

# लोककथांच्या रचनानुसारी अभ्यासाची एक दिशा

मराठी लोककथांचे वर्गीकरण वेगवेगळ्या लोककथाप्रकारांत आणि कथा-विशेष, कल्पनाबंध यांच्या सूचींनुसार कसे करता येते, आणि तदनुषंगाने मराठी लोककथांचे जागतिक लोककथांशी असलेले साम्य कसे स्पष्ट होते याचा परामर्श गेल्या दोन प्रकरणांत घेतलेला आहे. या प्रकरणात लोककथांच्या अभ्यासाच्या एका वेगळ्याच दिशेचा ऊहापोह करावयाचा आहे.

## कथांच्या आकलनाचे प्रयत्न

लोकसाहित्याच्या (Folklore) महत्त्वाची जाण समाजात निर्माण झाल्यावर लोकवाङ्मयाच्या – विशेषत: लोककथांच्या व त्यांतही प्राधान्याने दैवतकथांच्या – संकलनांना प्रारंभ झाला. काही संकलने तयार झाल्यावर स्वाभाविकच त्यांच्या आकलनाचे प्रयत्न होऊ लागले. दैवतकथांच्या आशयाकडे वेगवेगळ्या दृष्टि-कोनांतून पाहिले जाऊ लागले; व त्या वेगवेगळ्या दृष्टिकोनानुसार स्वतंत्र अभ्यास-संप्रदाय लोकसाहित्यात रूढ झाले. प्रथम लोकव्युत्पत्तीवर आधारित असा मॅक्सम्युलरचा भाषाशास्त्रीय संप्रदाय सुरू झाला. दैवतकथांत निसर्गरूपके प्रतीत झाल्याने एऱ्हेन ऱ्हाईससारख्या विद्वानांनी ती निसर्गरूपके शोधण्याचा प्रयत्न केला. ह्युमरेस, बेनियर, लांग्रियर आदी विद्वानांनी दैवतकथांतील भ्रांतकल्पनेचे प्राबल्य दाखवून दिले, तर डॅनहार्ट, राईबर्स यांनी दैवतकथा या स्पष्टीकरणासाठी असतात असे प्रतिपादन केले. लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या प्रारंभीच्या या सर्व दिशा प्रामुख्याने दैवतकथांच्या फक्त आशयावर अधिष्ठित झालेल्या होत्या.

## रचनानुसारी अभ्यासाची गरज

जसजशी लोककथांची अधिकाधिक संकलने तयार होऊ लागली, तसतसे जगभरच्या लोककथांत असलेले साम्य सर्वांच्या कुतूहलाचा प्रमुख विषय बनले. दोन देशांतील, दोन संस्कृतींतील लोककथांच्या तुलनेचे प्रयत्न होऊ लागले आणि

विशेषतः या आश्चर्यकारक साम्याच्या कारणांची चिकित्सा होऊ लागली. त्यासंबंधी सिद्धांत मांडले जाऊ लागले. लोककथा या एका ठिकाणी जन्माला येतात व नंतर त्यांचा दूरवर प्रसार होतो असा महत्वाचा सिद्धांत थिओडोर बेनफे या ज्यू प्राच्यविद्याविशारदाने मांडला. त्याने जगातील सर्व लोककथांचे जनकस्थान भारताला दिले असून व्यापारी योध्दे यांच्याद्वारे त्यांचा युरोपात प्रसार झाला, असे त्याचे मत आहे. त्यांच्या या सिद्धांताला 'भारतमूलक सिद्धांत' (Indianist Theory) असे म्हणतात. अँड्र्यू लँग याच्या मते कथांतील या साम्याच्या मुळाशी मानवशास्त्रीय एकता आहे. एकाच मानसिक अवस्थेचा अनुभव सर्व जमातींनी घेतला असावा म्हणून जगभर सारख्या कथा निर्माण झाल्या. लँगने या मानसिक अवस्थेला Mythopoeic म्हणजे दैवकथांतून संवेदित होणारी मानसिक अवस्था असे नाव दिलेले आहे. त्याच्या या सिद्धांताला बहुदेशोत्भूततेचा सिद्धांत (Polygenesis Theory) असे म्हणतात. साम्याच्या अशा कारणांचा ऊहापोह होत असताना कथांच्या तुलनात्मक अभ्यासाचे प्रयत्न चालू होते. लोककथांच्या तुलनात्मक अभ्यासासाठी उपयुक्त व्हावे यासाठी कथाविशेषसूची आणि कल्पनाबंधसूची तयार केली गेली.

लोककथांच्या अभ्यासाचे हे तुलनात्मक प्रयत्नही लोककथांच्या फक्त आशयाशीच निगडित होते. लोककथांच्या रचनातंत्राकडे अजून कोणाचे लक्ष गेले नव्हते. प्रसिद्ध रशियन लोकसाहित्यविशारद व्लाडीमिर प्रॉप यांनी लोककथांच्या साम्याचे कारण शोधण्यासाठी लोककथांच्या रचनातंत्राचा अभ्यास(Morphological Study) आवश्यक आहे असे आग्रहाने प्रतिपादन केले. ज्याप्रमाणे सर्व नद्या समुद्राकडेच वाहतात, तसेच लोककथांच्या कुठल्याही अभ्यासाचा रोख हा अतिशय महत्त्वपूर्ण परंतु अद्याप न उकललेल्या अशा, जगातील लोककथांत दिसणाऱ्या साम्याची समस्या सोडवण्याकडेच असला पाहिजे. त्यासाठी रचनेचा अभ्यास आवश्यक आहे.[१] प्रॉप यांनी रचनानुसारी अभ्यासाचे महत्त्व केवळ प्रतिपादन केले असे नाही तर त्यांनी परीकथा या प्रकाराचे रचनातंत्र आपल्या The Morphology of Folktale या ग्रंथात सोदाहरण उकलून दाखविले आहे.

### परीकथांचे चल आणि अचल घटक

प्रॉप यांनी अभ्यासासाठी १०० रशियन परीकथांची निवड केली व त्यांचे पृथक्करण करण्यास सुरुवात केली. त्यांची तुलना करण्यासाठी त्यांचे घटकावयव किंवा मूलघटक शोधून काढणे आणि त्या मूलघटकांचे एकमेकांशी व एकूण कथेशी असलेले नाते शोधून काढणे म्हणजेच परीकथांच्या रचनेचा अभ्यास होय असे त्यांचे मत होते. परीकथांचा मूलघटक शोधून काढताना त्यांना असे आढळले की

कथांतील काही घटक स्थिर आहेत तर काही घटक चल आहेत. कथांतील पात्रांच्या कृती ( Functions ) हा घटक स्थिर व अचल आहे असे त्यांचे ठाम मत झाले. त्यांच्या मते, 'पात्रांची नावे (आणि त्या पात्रांनुसार त्यांचे स्वभावगुण) बदलतील परंतु त्यांच्या कृती वा क्रिया बदलत नाहीत.[२]

**पात्रे ' भूमिकापात्र ' स्वरूपाची**

परीकथातील कृती कोण करते आणि कशा तऱ्हेने करते हा भाग प्रॉप यांना दुय्यम महत्वाचा वाटतो, कारण परीकथांतील पात्रांचा विचार करताना प्रॉप यांना असे आढळले की ही पात्रे अत्यंत सांकेतिक स्वरूपाची आहेत. त्यांचे स्वभाव संकेतबध्द असून त्यांना स्वतःचे वेगळे व्यक्तिमत्व नसते. देव, राक्षस, चेटकी, परी राजा, राणी अशा तऱ्हेची ही पात्रे ठराविक सांकेतिक भूमिका कथेत वजावतात. म्हणूनच परीकथांतील या पात्रांना प्रॉप यांनी नुसते पात्र (Person) न म्हणता Dramatis Personae असे नामाभिधान दिलेले आहे. त्यासाठी डॉ. प्रभाकर मांडे यांनी त्यांचे स्वरूप लक्षात घेऊन या ग्रंथात 'भूमिकापात्र' ही संज्ञा सुचविली आहे. या भूमिकापात्रांनी केलेल्या कृती (Funetoins of Dramatis Personae) या परिकथांच्या रचनेतील स्थिर मूलघटक आहेत हा प्रॉप यांच्या सिध्दांताचा प्रमुख गाभा आहे.

**तुलनावश्यक नवीन मूलघटक**

कोणत्याही अभ्यासक्षेत्रात यथायोग्य तुलनात्मक अभ्यासासाठी लहानात लहान अशा प्रमाणभूत मूलघटकाची जरूरी असते. लोककथांच्या क्षेत्रात असा प्रमाणभूत मूलघटक शोधून काढण्याचे श्रेय अॅलन डंडेस यांनी प्रॉप यांना दिले आहे. बऱ्याच काळापर्यंत कथाविशेष आणि कल्पनाबंध हे मूलघटक तुळनात्मक अभ्यासाठी वापरले जात होते. या दोहोंच्या सूचीचे अपार महत्व मान्य करूनही 'कथाविशेष' किंवा 'कल्पनाबंध' हे मूलघटक काहीसे अपुरे पडतात याची जाणीव प्रॉप यांना झाली.

'परंपरेने स्वतंत्र अस्तित्व' हा कथाविशेषाच्या अस्तित्वाचा निकष मानला जातो. कथाविशेषाच्या या व्याख्येत रचनेचा उल्लेख अजिबात नाही. कथाविशेष हा अनेक कल्पनाबंधांच्या गुंफणीतून तयार होतो म्हणजेच कथाविशेष हा अनेक पर्यायांतील दिसून येणाऱ्या कथेचा गाभा असतो. कथाविशेषांतील कल्पनाबंधांची रचना सामान्यतः ठराविक असली तरी प्रत्यक्ष कल्पनाबंधच बदलू शकतात किंवा इतर कुठल्याही कथाविशेषांत मिसळून जाऊ शकतात. याचा अर्थ असा की कथाविशेषसूची ही कथेतील बदलत्या आशयावर अधिष्ठित असते. कथेतील आशय

एकच असला तरी फक्त पात्रे बदलली की कथाविशेष बदलतो आणि एकच कथाविशेष दुसऱ्या गटातही समाविष्ट होऊ शकतो. म्हणूनच कथाविशेषाला स्थिर प्रमाणघटकाचे स्थान देणे योग्य वाटत नाही.

कल्पनाबंध हा कथेतील लहानात लहान मानला जाणारा घटक आहे. तथापि कल्पनाबंधांत तीन वेगवेगळे प्रकार (पात्रे, घटनांच्या पार्श्वभूमीतील बाबी आणि घटना) असल्याने त्यांना एकाच परिमाणाचे प्रमाण मानता येत नाही. त्यांची आपापसात तुलना होणेही कठीण असते. पात्राची तुलना घटनेशी कशी होऊ शकेल? म्हणूनच अचल, स्थिर असा मूलघटक म्हणून लोककथांच्या तुलनात्मक अभ्यासाला कल्पनाबंधांचीही पुरेशी मदत होत नाही. परीकथांचे वर्गीकरण आणि पृथक्करण करीत असताना प्रॉप यांना कथाविशेष आणि कल्पनाबंध यांच्यातील या अपूर्णतेची जाणीव झाली. त्यांनी अभ्यासार्थ घेतलेल्या कथांतील भूमिकापात्रांच्या कृतींची दखल घेऊन पृथक्करण केले आणि 'भूमिकापात्रांच्या कृती' या नवीन लहानात लहान प्रमाणभूत स्थिर मूलघटकाची जाणीव अभ्यासकांना करून दिली.

लोककथांच्या अभ्यासाला नवीन क्रांतिकारी दिशा प्राप्त करून देण्याचे फार मोठे श्रेय अॅलन डंडेस यांनी प्रॉप यांना प्रदान केलेले आहे. वास्तविक स्वतः प्रॉप यांनी आपल्या ग्रंथात 'लोककथेत चल आणि अचल घटक असतात' हे प्रथम ओळखल्याबद्दल जोसेफ बेडियर यांना धन्यवाद दिलेले आहेत. तथापि बेडियर यांनी ही महत्वपूर्ण बाब ओळखली तरी त्यांना अचल घटकाचे नेमके स्वरूप स्पष्ट करता आले नाही. प्रॉप यांनी त्यांचे तंत्र लक्षात घेऊन स्वतःच ते काम पार पाडले.

**मूलघटकांना केनेथ पाईक यांनी दिलेल्या दोन संज्ञा**

कल्पनाबंध आणि कृती हे जे दोन लहानात लहान प्रमाणभूत मूलघटक आपण पाहिले त्यांच्यातील फरक स्पष्ट होण्यासाठी केनेथ पाईक यांनी सुचविलेल्या दोन संज्ञा उपयोगी पडतात– Etic आणि Emic. Etic दृष्टिकोणात रचनेचा विचार केलेला नसतो (Non-structural). Emic दृष्टिकोणात रचनेचा विचार केलेला असतो (Structural). कल्पनाबंधांचा मूलघटक म्हणून विचार करणे हा Etic दृष्टिकोण झाला तर कृतीचा मूलघटक म्हणून विचार करणे हा Emic दृष्टीकोन झाला.

या दृष्टिकोणातून घटनांचा विचार करताना ज्या पूर्णकथेशी त्यांचा संबंध असतो (आणि ज्या संबंधामुळे त्यांना अर्थ प्राप्त होतो) त्या पूर्णकथांचा एक अंश म्हणून विचार केला जातो. याउलट Etic दृष्टिकोणातून विचार करताना

कथेतील घटना काही विशिष्ट हेतूने, विशेषत: त्यांना जागतिक पातळीवरच्या गटात समाविष्ट करण्यासाठी, त्यांच्या प्रादेशिक घटनासमूहातून किंवा संदर्भा-पासून वेगळ्या काढल्या जातात आणि त्यावेळी कुठल्याही भाषेच्या किंवा संस्कृतीच्या रचनेचा संदर्भ ध्यानात घेतला जात नाही. याच गोष्टीबाबत प्रॉप यांचा आक्षेप आहे. घटनांना त्यांच्या संदर्भापासून, कथेच्या ओघातील त्यांच्या स्थानापासून असे अलग करता येत नाही असे त्यांचे मत आहे. म्हणूनच Emic मूलघटक हे एखाद्या पोकळीत अधांतरी राहणारे मूलघटक नसतात तर ते एखाद्या रचनापद्धतीवरचे बिंदू असतात आणि त्या रचनेशी संबंध असल्यामुळेच त्यांचा विचार केला जातो.

**कृतींची मर्यादित संख्या**

परिकथांचे कृतींच्या पायावर विश्लेषण केल्यानंतर प्रॉप यांना असे आढळले की परीकथांत असणाऱ्या कृती संख्येने अत्यंत मर्यादित आहेत. त्यांनी त्या कृतींची यादी तयार करून त्यातील प्रत्येक कृतीला विशिष्ट संकेतचिन्ह दिले. ते प्रथम क्रियेचे संक्षेपाने वर्णन करतात, नंतर त्याची एक शाब्दिक व्याख्या करतात आणि नंतर त्या कृतीला संकेतचिन्ह देतात. त्या कृतींचा तपशील पुढीलप्रमाणे आहे –

**प्रारंभिक परिस्थिती** – कथेच्या प्रारंभिक परिस्थितीसाठी – ∝ हे चिन्ह दिलेले आहे (काही व्यक्तीचा परिचय, भावी नायकाची ओळख वगैरे). येथून पुढे कृतींची मालिका सुरू होते

१) कुटुंबातील कुठल्यातरी व्यक्तीची अनुपस्थिती.
(व्याख्या – अनुपस्थिती. संकेतचिन्ह β )

२) नायकाला मनाईची, निषेधाची जाणीव देणे
(व्याख्या – मनाई. संकेतचिन्ह r )

३) मनाईचा भंग होतो
(व्याख्या – मनाईभंग. संकेतचिन्ह S )

४) खलनायक टेहळणी करण्याचा प्रयत्न करतो.
(व्याख्या – टेहळणी. संकेतचिन्ह F )

५) खलनायकाला आपल्या लक्ष्याची (Victim) माहिती मिळते.
(व्याख्या – पोच (Delivery). संकेतचिन्ह ٧ )

६) लक्ष्यावर वर्चस्व गाजविण्यासाठी किंवा त्याच्याजवळील चीजवस्तूंचा ताबा घेण्यासाठी खलनायक त्याला फसवण्याचा प्रयत्न करतो.
(व्याख्या – फसवणूक. संकेतचिन्ह n )

७) लक्ष्य फशी पडते आणि अप्रत्यक्षपणे शत्रूला मदत करते.
(व्याख्या – गुन्हृयात भागीदारी. संकेतचिन्ह θ )

या पहिल्या सात कृतींना लोककथेच्या पूर्वतयारीच्या कृती असे म्हणावयास हरकत नाही. येथपर्यंत प्रत्यक्ष हालचालींना फारशी सुरुवात होत नाही. येथून पुढे ती सुरुवात होते व त्या दृष्टीने पुढील कृती विशेष महत्वाची असते.

८) खलनायक कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला जखमी करतो किंवा उपद्रव देतो.
(व्याख्या – दुष्टावा. संकेतचिन्ह A )
काही लोककथांची सुरुवात कुठल्यातरी उणीवेच्या किंवा अपूर्णतेच्या परिस्थितीपासून होते. दुष्टाव्यामुळे ज्याप्रमाणे शोधाला प्रेरणा मिळते तशीच येथे उणीवपरिस्थितीमुळे मिळते.

८ अ) कुटुंबातील एखाद्या व्यक्तीत काहीतरी उणीव असते किंवा त्या व्यक्तीला काहीतरी हवे असते.
(व्याख्या – उणीव. संकेतचिन्ह a )

९) दुर्दैव किंवा उणीवेची नायकाला माहिती दिली जाते.
(व्याख्या – मध्यस्थी. संकेतचिन्ह B )

१०) प्रतिक्रियेसाठी शोधकाची (Seeker) संमती मिळते किंवा निर्णय घेतला जातो.
(व्याख्या – प्रतिक्रियेची सुरुवात संकेतचिन्ह C )

११) नायक घर सोडतो.
(व्याख्या – निर्गमन. संकेतजिन्ह ↑ )

१२) जादूचे साधन किंवा मदतनिसाच्या प्राप्तीपूर्वी नायकाची परीक्षा घेतली जाते, कसून चौकशी केली जाते किंवा त्याच्यावर हल्ला होतो.
(व्याख्या – दात्याची पहिली कृती. संकेतचिन्ह D )

१३) भावी दांपत्याला नायकाचा प्रतिसाद मिळतो.
(व्याख्या – नायकाचा प्रतिसाद. संकेतचिन्ह E )

१४) जादूचे साधन नायकाला प्रदान केले जाते.
(व्याख्या – जादूच्या साधनाची प्राप्ती. संकेतचिन्ह F )

१५) शोधस्थळाच्या आसपास नायक स्थानांतरित केला जातो, नेला जातो किंवा पोचतो.
(व्याख्या – दोन राज्यांतील अवकाश स्थानांतर, मार्गदर्शन. – संकेतचिन्ह G )

१६) नायक आणि खलनायक यांचे प्रत्यक्ष द्वंद्व.
(व्याख्या – धडपड. संकेतचिन्ह H )

१७) नायकाला ओळखचिन्ह दिले जाते.
(व्याख्या – ओळखचिन्ह, खूण. संकेतचिन्ह J )

१८) खलनायकाचा पराभव होतो.
(व्याख्या – विजय. संकेतचिन्ह I )

१९) प्रारंभीचे दुर्दैव किंवा उणीव यांचा निरास
(व्याख्या – निरास. संकेतचिन्ह K )

२०) नायक परत येण्यास निघतो.
(व्याख्या – आगमन. संकेतचिन्ह L )

२१) नायकाचा पाठलाग होतो.
(व्याख्या – पाठलाग. संकेतचिन्ह Pr )

२२) नायकाची पाठलागातून सुटका होते
(व्याख्या – सुटका. संकेतचिन्ह Rs )

२३) नायक ओळखला न जाता घरी किंवा इतर कुठल्यातरी देशात परत येतो.
(व्याख्या – अनोळखी स्थितीत आगमन. संकेतचिन्ह O )

२४) नायक परत आल्यावर दोन मार्ग अवलंबितो. माळी, शिंपी, चांभार यांच्यासारख्या माणसाकडे नोकर म्हणून राहतो किंवा गावात स्वयंपाकी वा उपवर तरुण म्हणून राहतो. (या कृतीची व्याख्या व संकेतचिन्ह प्रॉप यांच्या पुस्तकात, देण्याचे राहून गेले असावे.)

२५) नायकाला अवघड कामगिरी सांगितली जाते.
(व्याख्या – अवघड कामगिरी. संकेतचिन्ह M )

२६) अवघड कामगिरी पूर्ण केली जाते.
(व्याख्या – निरसन. संकेतचिन्ह N )

२७) नायकाची ओळख पटते.
(व्याख्या – ओळख. संकेतचिन्ह Q )

२८) खोटा नायक किंवा खलनायक यांचे कपट उघडे होते.
(व्याख्या – प्रकटीकरण. संकेतचिन्ह Ex )

२९) नायकाला नवीन रूप दिले जाते.
(व्याख्या – रूपपालट. संकेतचिन्ह T )

३०) खलनायकाला शिक्षा होते.
(व्याख्या – शिक्षा. संकेतचिन्ह U )

३१) नायकाचा विवाह होऊन त्याला राज्यपदप्राप्ती होते.
(व्याख्या – विवाह. संकेतचिन्ह W )

**प्रत्येक कृतीच्या तपशीलाचे पर्याय**

उपरोक्त सर्व कृतींचा विस्तृत तपशील प्रॉप यांनी आपल्या पुस्तकात दिलेला आहे. ' कुटुंबातील व्यक्तींची अनुपस्थिती ' याचा विचार करताना ती व्यक्ती कोणत्याही पिढीतील असू शकेल, किंवा मृत्यू, देशांतर, शिकार अशा कुठल्याही कारणाने अनुपस्थिती निर्माण होऊ शकेल. अशा वेळी त्या कृतीचे संकेतचिन्ह कायम ठेऊन कृतीच्या प्रत्येक नवीन पर्यायासाठी शिरोभागी नवीन आकडा घालण्यात आलेला आहे. उदा. वडील पिढीच्या अनुपस्थितीसाठी β हे मृत्यूमुळे घडलेल्या अनुपस्थितीसाठी $\beta^2$, तर लहान पिढीसाठी $\beta^3$ हे संकेतचिन्ह वापरले जाते. ' खलनायकाला शिक्षा होते ' या कृतीत (संकेतचिन्ह U) जर शिक्षा न होता क्षमा केली गेली तर त्या कृतीची मांडणी Uneg अशी केली जाते. 'नायकाचा विवाह व त्याला राज्यप्राप्ती' (संकेतचिन्ह W ) या कृतीत नायकाला कधी दोहोंची एकदम प्राप्ती झाली तर त्यासाठी $W^{\circ}_{\circ}$ असे चिन्ह वापरतात. वधू मूळची राजकन्या नसेल तर नुसताच विवाह होतो त्यासाठी $W^{\circ}$ हे चिन्ह वापरतात आणि नायकाला नुसतेच बक्षीस मिळाले ( राज्य व राजकन्या दोन्ही न मिळता ) तर $W^{\circ}$ असे चिन्ह वापरतात. अशाच तऱ्हेने दुष्टाव्याच्या तऱ्हा, कसोटीच्या तऱ्हा, मदतींचे विविध स्वरूप, द्वंद्वाचे प्रकार, ओळखचिन्हांचे प्रकार यांचा विस्तृत ऊहापोह प्रॉप यांनी प्रत्येक कृतीसंबंधात केलेला आहे.

काही वेळा कथेच्या प्रारंभी असलेले दुर्दैव वा उणीव यांचा निरास झाल्यानंतर नायक घरी यावयास निघतो. त्यानंतर काही परीकथा वेगळे वळण घेतात. खलनायकाकडून पाठलाग, सुटका असा कथाभाग न येता, नायक पुन्हा दुसऱ्या संकटात पडतो. म्हणजे पुन्हा संकट, मदतनीस, मदत, संकटातून सुटका अशी कृतींची मालिका पुन्हा सुरू होते. अशा वेळीही मूळच्या संकेतचिन्हाबरोबर नवीन अंक घातला जातो.

प्रॉप यांच्या प्रतिपादनानुसार सर्व परीकथांतील कृती या ठराविक ३१ कृतींतच समाविष्ट असतात. प्रत्येक परीकथेत या सर्वच्या सर्व कृती असतीलच असे नाही. काही परीकथांत त्यांतील काही नसतीलही. तथापि उपरोक्त कृतींच्या बाहेर परीकथेचे पाऊल सहसा पडत नाही. चिन्हांकित स्वरूपात परीकथांची मांडणी केली तर रचनातंत्राच्या दृष्टीने त्यांचा तुलनात्मक अभ्यास करणे सुकर होईल.

### कृतींचा क्रम कायम

उपरोक्त कृतींचा परीकथेतील क्रम सारखाच असतो असेही प्रॉप यांचे निरीक्षण आहे. अधल्यामधल्या काही कृती एखाद्या परीकथेत नसल्या, तरी ज्या असतील त्यांचा क्रम प्रॉपप्रणीत कृतिक्रमाच्या सारखाच असतो. त्यात बदल होत नाही.

### परीकथांचा समान गट

कथाविशेषसूचीमध्ये समान कथाविशेषांचे गट कल्पिलेले आहेत, आणि हे गट कथांच्या आशयाशी संबंधित असतात. प्रॉप यांच्या मते लोककथांत गट निश्चितपणे असतात तथापि ते आर्ने यांनी आलेखिलेल्या स्तरावर ( Level ) अवलंबून नसतात तर लोककथांच्या रचनाविशेषांच्या स्तरावर अवलंबून असतात.[३] म्हणजेच लोककथांतील पात्रांच्या कृतींवरून त्यांची गटविभागणी करावी लागेल. रशियन परीकथांचे भूमिकापात्रांच्या कृतींनुसार पृथःकरण केल्यावर प्रॉप यांना असे आढळले की या सर्व परीकथा रचनातंत्राच्या दृष्टीने एकाच गटात समाविष्ट होतात.

### रचनेतील सारखेपणाची मीमांसा

रचनातंत्रदृष्ट्या परीकथांत विलक्षण साम्य असते हे प्रॉप यांनी सोदाहरण पटवून दिले. फ्रेंच लोकसाहित्यविशारद लेव्ही स्ट्रॉस यांनी दैवतकथांतील रचनातंत्राचा विचार करून दैवतकथांतही रचनेचे साम्य आढळते असे सिध्द करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी या साम्याची मीमांसा करताना त्याचा संबंध आदिम मानवी मनाशी (Savage Mind) जोडला आहे. त्यांच्या मते आदिम मनातच अशी काही तर्कसंगत विचारसरणी अस्तित्वात असते की त्यामुळे दैवतकथांची रचना आपोआप बध्द होते. दैवतकथांतील मूलभूत घटकांच्या परस्परसंबंधांची रचना दैवतकथेला खरा अर्थ देते. दैवतकथांचे पर्याय तिच्या अर्थात वरकरणी फरक दाखवू शकतील, पण रचना व मूलभूत संबंध बव्हंशी कायम राहतात. आदिम मनाच्या रचनेत हे महत्त्व नेणीव वा सुप्त अवस्थेत का होईना पण असले पाहिजे व त्यामुळे दैवतकथांतील रचनातंत्रांची संगती स्पष्ट होऊ शकते.

### रचनाप्रधान अभ्यासपध्दतीची मौलिकता

प्रॉप यांची ही रचनानुसारी अभ्यासपध्दती बरीच श्रमाची, तशीच थोडीशी कंटाळवाणीही आहे. ऐतिहासिक भौगोलिक पध्दतीप्रमाणेच लोककथेच्या कलात्मकतेकडे दुर्लक्ष होण्याचा आक्षेपही त्यावर घेता येईल. तथापि तिच्या मौलिकतेकडे दुर्लक्ष करता येणार नाही. पध्दतीत कथेचा अत्यंत वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून

अभ्यास केला जातो. दोन संस्कृतींच्या लोककथांच्या तुलनात्मक अभ्यासाला या पध्दतीचा चांगला उपयोग होतो. दोन भिन्न संस्कृतिगटांच्या कथांचे रचनातंत्र जर अभ्यासकाला ज्ञात असेल तर एका संस्कृतिगटातील कथा दुसऱ्या संस्कृतिगटाने स्वीकारली तर त्या कथेत काय बदल होऊ शकेल हे सांगणे शक्य होईल.

प्रसिध्द लोकसाहित्यविशारद ॲलन डंडेस यांनी उत्तर अमेरिकन इंडियन लोककथांचा अभ्यास त्यांच्या रचनातंत्राच्या दृष्टीने केलेला आहे. प्रॉप यांचे रचनातंत्र आणि पाईक यांची परिभाषा यांचा संगम करून त्यांनी वेगळ्याच संज्ञा तयार केल्या आहेत. प्रॉप ज्यांना कृती म्हणतात त्यांना ते Motifeme असे नाव देतात. दोन कृतींत जे कल्पनाबंध येऊ शकतात त्यांना Allomotif म्हणतात. अमेरिकन इंडियन लोककथांत दिसून येणारे कृतींचे वेगवेगळे गट डंडेस यांनी दाखवून दिलेले आहेत. उदा. काही कथांचा गट फक्त उणीव (Lack) व उणीवेचे निराकरण (Liquidation of lack) म्हणजे (LL) अशा स्वरूपाचा असतो, तर काही कथांचा गट मनाई (Interdiction), मनाईभंग (Violation of interdiction), परिणाम (Consequence), परिणामापासून सुटकेचा प्रयत्न (Attempted escape from the consequences) अशा तऱ्हेचा असतो.

रचनाप्रधान अभ्यासपध्दतीचा उपयोग लोकवाङ्मयातील इतर प्रकारांच्या (लोकगीते, उखाणे, वगैरे) परस्परतुलनेसाठी उत्तम तऱ्हेने करता येणे शक्य आहे. या भिन्न लोकवाङमयप्रकारांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न अजून झालेला नाही. त्यांचे रचनातंत्रदृष्ट्या पृथक्करण केले तर त्यांतही समान रचनासूत्रे आढळणे अशक्य नाही.

#### दोन अभ्यासपद्धतींचा समन्वय

लोककथांचा अभ्यास रचनातंत्रदृष्ट्या व्हावयास हवा हे खरे तथापि लोककथांचे कथाविशेष आणि कल्पनाबंध यांचा विचार पूर्णतया दृष्टीआड करता येणार नाही. अभ्यासाची ती दृष्टीही तितकीच महत्वाची आहे. दोन्ही पध्दती एकमेकांऐवजी वापरणे योग्य नव्हे तर दोन्ही पध्दतींचा समन्वय व्हावयास हवा. रचनादृष्ट्या वर्गीकरण होण्यापूर्वी आशयदृष्ट्या वर्गीकरण व्हावयास हवेच.

#### मराठी परीकथांतील कृती

प्रॉपप्रणीत ३१ कृतींच्या पार्श्वभूमीवर मराठी परीकथांची स्थूलपणाने तपासणी केल्यास असे आढळते की मराठी परीकथांतही जवळजवळ त्याच सर्व कृती दिसून येतात. त्या कृतींच्या बाहेर मराठी परीकथांचेही पाऊल सहसा जात नाही.

परीकथा चिन्हांकित मांडणीत कशी सादर करता येते त्याचा निर्देश करण्यासाठी प्रातिनिधिक उदाहरणे म्हणून दोन मराठी परीकथांची चिन्हांकित मांडणी या प्रकरणाच्या शेवटी करून दाखविलेली आहे.

**मराठी लोककथांच्या अभ्यासकांसाठी नवीन क्षेत्र**

मराठी लोककथांच्या संदर्भात या अभ्यासपद्धतीचा प्रयोग अद्याप व्हावयाचा आहे. प्रस्तुत पुस्तकात या पद्धतीचा अत्यावश्यक एवढाच ऊहापोह केलेला आहे. प्रॉप यांचे पुस्तक बारकाईने वाचल्यास या पद्धतीतील तपशील अधिक चांगल्या तऱ्हेने स्पष्ट होऊ शकेल. परीकथा आणि दंतकथा यांच्यांतील कृतीत आणि कल्पनाबंधात बरेच साम्य आढळते. मराठी व्रतकथांतही परीकथासदृश रचना आढळते. त्यामुळे कृतींच्या संदर्भानुसार परीकथांप्रमाणेच या दोन्ही प्रकारांच्या रचनातंत्रांचा अभ्यास करता येईल काय याचाही विचार करावयास हवा. अभ्यासाचे हे एक वेगळेच आणि बरेच विस्तृत क्षेत्र मराठी लोककथांच्या अभ्यासकांसाठी खुले आहे. तूर्त मराठी परीकथा ही जागतिक परीकथांचीच सहप्रवासी असल्याने मराठी लोककथांच्या विश्वासकतेत मोठी भर पडते एवढाच निष्कर्ष काढणे शक्य आहे.

**हायपंचकुल्ला** (राजविलासी केवडा – कथा ६).

∝ – जान्या अंबीर राजा – त्याच्याजवळ बोलणारा पोपट.
B – पोपटाने हायपंचकुल्लाच्या सौन्दर्याची तारीफ केली, माहिती दिली.
C – राजा तिच्या प्राप्तीसाठी जावयाचे ठरवितो.
↑ – राजा घरातून निघतो.
$W^1$ – फुलावंती राजकन्येचे राजाशी स्वयंवरण होते.
F – सासरा राजाला जादूची छडी देतो.
$W^2$ – हायपंचकुल्लाच्या सात बहिणींशी राजाचा विवाह होतो.
G – छडीच्या साहचाने राजा समुद्रात सूपदेवाच्या राज्यात जातो.
$I^5$ – सूपदेवाचा पराभव (त्याच्यावर सहा महिने झोपेचा मंत्र घातला.)
K – हायपंचकुल्लाची सोडवणूक.
↓ – परत प्रवास सुरू.
$W^3$ – हायपंचकुल्लाशी राजाचा विवाह.

**कथेची मांडणी**

$\propto B\ C \uparrow W^1\ F\ W^2\ G\ I^5\ K \downarrow W^3$.

**काळशिंग राजा** (सांगीवांगी – कथा ९)

| | | |
|---|---|---|
| $\propto$ | – | राजाला दोन राण्या – आवडती, नावडती. आवडतीला दोन पुत्र, नावडतीला एक पुत्र काळशिंग राजाला अपूर्व स्वप्न – झाडाला चांदीची मुळं, सोन्याच्या फांद्या, मोत्याचे घस. |
| a | – | (उणीव) राजाला त्याच्या स्वप्नातील अपूर्व झाड हवे. |
| B | – | राजपुत्राना राजाची बेचैनी कळणे, राजाने अर्धे राज्य कबूल करणे. |
| C | – | राजपुत्र जाण्याचे ठरवितात. |
| ↑ | – | तिघे राजपुत्र निघतात. |
| $A_1$ | – | दोन मोठे भाऊ कलावंतिणीचे कैदी बनतात. |
| F | – | अनोळखी पतिपत्नीकडून काळशिंगाला जादूचा पिंजरा प्रदान |
| G | – | कळशिंग नागलोकात जातो. |
| H | – | नाग व काळशिंग यांचे युद्ध. |
| I | – | काळशिंगाचा विजय. |
| W | – | तीन नागकन्यांशी काळशिंगाचा विवाह. |
| ↓ | – | नागकन्यासह परत फिरणे |
| $K_1$ | – | वाटेत दोघा भावांची कैदेतून सुटका |
| $A_2$ | – | दोघा भावांनी काळशिंगाला विहिरीत ढकलणे, निघून जाणे. |
| $K_2$ | – | काळशिंगाची विहिरीतून सुटका, गोसावीरूपाने प्रयाण. |
| O | – | अनोळखी स्थितीत (गोसावीरूपात) काळशिंगाचे राजधानीत आगमन. |
| M | – | सर्व गोसाव्यांना काळशिंगाची गोष्ट विचारली जाणे. |
| N | – | काळशिंगाने अचूक गोष्ट सांगणे. |
| Q | – | काळशिंगाची ओळख पटणे. |
| Ex | – | भावांचे कपट उघड. |
| Uneg | – | भावांना फाशीची शिक्षा (काळशिंगाने रद्द करणे) |
| K | – | उणीव दूर होणे (नागकन्या राजाचे स्वप्न साकार करून दाखवितात) |

**कथेची मांडणी**

$\propto$ a B C ↑ $A^1$ F G H I W ↓ $K_1$ $A_{-}$ $K_2$ O M N Q Ex Uneg K

## प्रकरण ५ वे

# मराठी लोककथांतील पात्रांचे सांकेतिक स्वरूप

मराठी लोककथांच्या अंतरंगाचा शोध घेताना आपण मराठी लोककथांतील कथाविशेष, कल्पनाबंध आणि परीकथांतील पात्रांच्या कृती यांचा विचार केला. आता त्यांच्या अंतरंगाचा अधिक परिचय करून घेण्यासाठी त्यांत भेटणाऱ्या विविध पात्रांच्या स्वरूपवैशिष्टयांचा शोध घ्यावयास हवा.

'व्यक्ती तितक्या प्रकृती' ही म्हण सुपरिचितच आहे. दोन माणसांचा स्वभाव कधीच एकसारखा नसतो. प्रत्येकाची जीवनाची कक्षा काहीशी मर्यादितच असते. त्या कक्षेबाहेरील जग व त्यातील व्यक्ती यांच्याबद्दल माणसाला नेहमीच कूतुहल वाटत असते. या कूतुहलाचा आशय अंशतः साहित्यवाचनातून आणि कथाश्रवणातून होतो. लोककथांतील पात्रपरिचय करून घेतल्यानंतर लोककथांतून असे समाधान मिळू शकते का असा प्रश्न विचारल्यास त्याचे उत्तर नकारार्थी द्यावे लागेल. कारण लोककथांतील पात्रचित्रणात व्यक्तिवैचित्र्याला दुय्यम स्थान असून त्यांतील बऱ्याच पात्रांच्या जीवनाबद्दलचे, स्वभावाबद्दलचे संकेत वर्षानुवर्षे परंपरेने बद्ध झालेले दिसून येतात. हे असे का घडते ? याचे उत्तर लोकवाङ्मयाच्या निर्मिति-प्रक्रियेत शोधावे लागते.

### ललितवाङ्मय व लोकवाङ्मय यांच्या निर्मितीमागील भिन्न प्रेरणा

ललितवाङ्मय व लोकवाङ्मय यांच्या निर्मितीमागील प्रेरणा मूलत:च भिन्न असतात. ललितवाङ्मयाच्या निर्मिति-प्रक्रियेत लेखकाचे अनुभव कल्पनाशक्ती व प्रतिभाशक्ती यांच्या एकत्रित रसायनातून त्याची लेखनप्रेरणा स्फूर्ती घेते आणि लेखकाच्या वैयक्तिक शैलीतून आत्माविष्कारस्वरूपाचे प्रकट होते. लोकवाङ्मयाची प्रेरणा, स्त्रियांची ओवीगीते अपवाद मानली तर, आत्माविष्कारस्वरूपाची कधीच नसते. लोकवाङ्मय हे व्यक्तिनिर्मित न मानता उलट 'अज्ञात निर्माता' हे त्याचे वैशिष्टय मानले जाते. लोकवाङ्मयाच्या आणि विशेषतः लोकगीतांच्या निर्मिती-

बाबत ग्रिम, गुमेर, स्टाईनथाल, पर्सी, श्लेगेल, चाइल्ड आदी विद्वानांनी अनेक उपपत्ती मांडल्या आहेत. त्यांच्या मनांत काही साम्यभेद असले तरी लोक-वाङ्मयातून रचनाकाराचे स्वतंत्र अस्तित्व किंवा स्वतंत्र व्यक्तिमत्व प्रकट होत नाही, तर समूहाचे किंवा लोकांचे वैशिष्टच वा मानस प्रकट होते याबाबत मतैक्य आढळते.

ग्रिम, गुमेर अशा काही विद्वानांच्या मते तर समूहातील सर्वांचाच प्रत्यक्ष निर्मितीत सहभाग असतो. तथापि नंतर हे मत मागे पडून, मुळात एखादी निर्मिती व्यक्तीची असली तरी नंतर ती त्या विशिष्ट व्यक्तीची न राहता समूहाची बनते असे मत मान्यता पावले. निर्मात्याला त्याचे स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्व असले तरी निर्मितीच्या वेळी ते महत्त्वाचे न राहता, निर्मात्याचे मत तो ज्या समूहाचा अविभाज्य घटक असतो त्या समूहाच्या लोकमानसाशी एकरूप झालेले असते. साक्षर आणि आधुनिक मत समाजव्यक्तींच्या तुलनेने अप्रगत समाजातील व्यक्तींच्या मनात समाजमनाशी एकरूप होण्याची प्रक्रिया अधिक सहज व स्वाभाविकपणे घडू शकते.

**समूहनिर्मितीमुळे सामर्थ्यप्राप्ती**

लोकमानसाशी, समूहमानसाशी एकरूप असणाऱ्या अशा व्यक्तीची निर्मिती समूहाला परकी न वाटता आपलीच वाटते. अशा तऱ्हेने लोकवाङ्मय ही 'सांधिक निर्मिती' असल्यामुळे त्याच्यात जी शक्ती निर्माण होते त्याबद्दल दुर्गाबाई भागवत यांनी असे म्हटले आहे की, 'पारंपरिक अभिरूची व मानवजातीला प्रतीत झालेल्या सार्वत्रिक भावनांचे संस्कार यांचा परिणाम अनुभूतीवर कळत वा नकळत होत असतो. समान अनुभव हाच पाया असल्याने एक विशाल सृजनशील बैठकही या भावनांना मिळालेली असते. सार्वत्रिक उपयुक्ततेमुळे एक प्रकारची भव्यताही त्याच्यात असते. गांभीर्य असते, वजन असते, तालाचे भान अचूक असते, कारण त्याच्यातील सत्य सार्वत्रिक अनुभवाच्या एकवाक्यतेमुळे झुगारून देण्यास कठीण जाते.'[१]

**समूहनिर्मितीमुळे संकेतबद्धता**

दुर्गा भागवत यांनी,समूहनिर्मितीमुळे लोकवाङ्मयाला जसे सामर्थ्य येते तसेच लोकवाङ्मयाला निर्माण होणाऱ्या मर्यादांचीही जाणीव करून दिलेली आहे. 'पारंपरिक वाङ्मयात व्यक्तिगत जाणीवा व सामाजिक जाणीवा समरूप होतात. या समरूपतेतच पारंपरिक ललितकृतींच्या मर्यादाही सामावतात. स्वतंत्र प्रतिभेचे अनिर्बंध उड्डाण, वैयक्तिक अनुभवांचे वैविध्य, भावनांची सखोलता, भाववृत्तीच्या

अपरिमित आविष्कृत व त्यांची चंचलता, स्वैर व स्वच्छंद अभिव्यक्ती यांचा आढळ या बंदिस्त पण मजबूत पाया असलेल्या ललितकृतींच्या क्षेत्रात येणे दुरापास्त आहे. अभिव्यक्तीचे ठराविक संकेत व बंध निर्माण झालेले आढळतात. [२]

**लोककथांतील भूमिकास्वरूप पात्रे**

उपरोक्त सांकेतिकतेचा प्रत्यय लोककथांतील पात्रांच्या चित्रणात प्रकर्षाने आढळतो. परीकथांचे पृथक्करण करीत असताना ब्लाडोमिर प्रॉप यांना पात्रांच्या संकेतबद्धतेची चांगलीच जाणीव झाली. पारंपरिक कथावाङ्मयाला स्वतंत्र व्यक्तिमत्वाचा कर्ता नसल्यामुळे त्यातील पात्रांना परंपराप्रिय समूहमनाचे बंधन पाळावे लागते. त्यामुळे पारंपरिक कथांतील पात्रांना ललितकथांतील पात्रांप्रमाणे स्वतःचे असे वेगळे व्यक्तिमत्व नसते, तर परपरेने ठरविलेल्या सांकेतिक, सूत्रबद्ध चौकटीतच जणू ते बद्ध केलेले असते. ललित कथावाङ्मयातील पात्रे ही लेखकाच्या विविध अनुभवांतून साकार झालेली असतात. त्यामुळे प्रत्येक लेखकाच्या पात्रांची, नावे, स्वभावविशेष पूर्णतया भिन्न असतात. शंकर पाटील, द. मा. मिरासदार, व्यंकटेश माडगूळकर हे तिघेही ग्रामीण वातावरणातील कथा लिहितात, परंतु त्यांच्या कोणत्याही पात्राचे स्वभाविशेष दुसऱ्या पात्राशी अगदी तंतोतंत कधीच जुळणार नाही. परंतु पारंपरिक कथावाङ्मयाला असा कोणी स्वतंत्र व्यक्तित्त्वाचा कर्ता नसल्यामुळे त्यातील पात्रांना परंपराप्रिय समूहमनाचे बंधन पाळावे लागते. त्यामुळे ठराविक पात्रे, त्यांचे ठराविक स्वभावविशेष, ठराविक घटना असे सांकेतिक स्वरूप लोककथेला प्राप्त होते. त्यामुळेच की काय लोककथांतील पात्रांना प्रॉप यांनी नुसते Person (पात्रे) न म्हणता Dramatis Personae (भूमिका-पात्र) असे म्हटले आहे. लोककथांतील पात्रांना बहुधा व्यक्तिनामेच नसतात याचे कारण हेच असावे. कारण व्यक्तिनाम दिले किंवा एखाद्याचे व्यक्तिनाम बदलले तरी त्याच्या स्वभावविशेषात सहसा बदल होत नाही. त्याला त्याचे वेगळे व्यक्तिमत्व नसतेच, तर त्याला दिलेली ती भूमिका (राजाची, राणीची, राक्षसाची, परीची वगैरे), श्रोत्यांच्या वा समूहाच्या ज्या अपेक्षा त्या भूमिकेकडून असतात त्यानुसार पार पाडीत असतो.

**पात्रांच्या भूमिकास्वरूपामुळे मानसिक आंदोलनाचा अभाव**

लोककथांतील पात्रांच्या या भूमिकास्वरूपामुळे लोककथा या बव्हंशी घटनाप्रधान असतात. ललित कथावाङ्मयात पात्रांना जसे त्यांचे स्वतःचे वेगळे व्यक्तिमत्व असते, तसेच कथेत त्यांची मानसिक आंदोलनेही व्यक्त केली जातात. परंतु पारंपरिक कथावाङ्मयात तसे आढळत नाही. तसेच व्यक्तिमत्वविकासासही

त्यात वाव नसतो. त्यातील पात्रांचे स्वभाव जितके संकेतसध्द असतात तितकेच ते स्थायी व स्थिर स्वरूपाचे असतात. एखाद्या पात्राचे जे व्यक्तिमत्व ठरते ते ठरते. त्यात सहसा बदल होत नाही. लोककथा पुढे सरकते ती कथेतील संकेतबध्द घटनांनी कथेच्या सुरवातीपासून शेवटपर्यंत ही पात्रे ठरीव साच्याची भूमिका पार पाडीत असतात.

### मराठी लोककथांतील पात्रस्वरूपाबाबतचे काही निष्कर्ष

मराठी लोकथांचे अंतरंग जाणून घेण्यासाठी वरील विवेचनाच्या प्रकाशात मराठी लोककथांची स्वरूपवैशिष्टचे जाणून घ्यावयास हवीत. तशा दृष्टिकोनातून मराठी लोककथांची पाहणी केल्यावर त्यातील पात्रस्वरूपाबाबत जे काही निष्कर्ष काढता आले ते पुढीलप्रमाणे आहेत.

१) मराठी लोककथांत सर्व थरांतील पात्रांचे प्रतिनिधित्व आढळते. त्यात देव-देवता, राक्षसादी अतिमानवी योनी आहे, राजपरिवार आहे, सामान्य माणसे आहेत. एवढेच काय प्राणी व वनस्पतीही आहेत. राजपरिवारास प्राधान्य असले तरी समाजातील सर्व स्तरांचे चित्रण दिसते. विविध व्यवसाय करणारी माणसे भेटतात, आणि गणिका, वेश्या, कलावंतीण, नायकीण अशा उपेक्षित आणि समाजात प्रतिष्ठा नसणाऱ्या व्यक्तिरेखांचे चित्रणही मराठी लोककथांनी सर्वथा त्याज्य मानलेले नाही.

२) सांकेतिकतेच्या दृष्टिकोनातून या पात्रांचे निरीक्षण केल्यास असे आढळते की मराठी लोककथांतील अधिकतम पात्रांत सांकेतिकतेचे व भूमिकास्वरूपाचे वैशिष्टच निश्चितपणे आढळते.

३) लोककथेच्या प्रकारानुसार पात्रांच्या सांकेतिकतेत व भूमिकास्वरूपाच्या श्रेणीत बदल होतो. जास्तीत जास्त भूमिकास्वरूप पात्रे परीकथांत आढळतात. संकटग्रस्त नायक वा नायिका (बहुधा राजपुत्र किंवा राजकन्याच), दैवी मदतनीस, रूपांतर, जादूच्या वस्तू, दुःखातून सुटका या वर्तुळाबाहेर पात्रे सहसा पडत नाही. प्राणि-कथेतही सांकेतिकताच पात्रचित्रणात प्रभावी आहे. (लबाड कोल्हा, मूर्ख वाघ) आणि हास्यकथांतही मूर्ख जावई, चतुर स्त्री वा पुरुष अशा ठराविक पात्रांनाच प्रमुख स्थान असते. दंतककथांत मात्र सांकेतिकता प्रभावी असली तरी व्यक्ति-वैचित्र्याचे नमुने इतर प्रकारांच्या मानाने अधिक पाहावयास मिळतात. दंतकथांना सत्याधार असतो त्यामुळे त्यांतील पात्रांना नावेही दिलेली असतात.

४) मराठी लोककथांतील पात्रांचे चित्रण भूमिकास्वरूपाच्या निकषातून अजमा-वल्यास असे आढळते की,-

अ) काही पात्रे पूर्णतया भूमिकास्वरूप आहेत.

ब) काही पात्रांची भूमिका दुहेरी स्वरूपाची (बहुधा सुष्ट व दुष्ट) असते. भूमिका कुठलीही असली तरी ती स्थायी स्वरूपाची असते. दुष्ट पात्र दुष्टच राहते व सुष्ट सुष्टच राहते.

क) काही पात्रे बव्हंशी भूमिकास्वरूपाची असतात. म्हणजे त्या पात्रांतील जास्तीत जास्त पात्रे सांकेतिक स्वरूपाची असतात; परंतु त्यापेक्षा वेगळे चित्रणही आढळते.

ड) व्यक्तिमत्वविकासास लोककथांतील पात्रचित्रणाच्या संदर्भात फारसा वाव नसला तरी व्यक्तिमत्वविकासाचे दर्शन घडविणारी काही तुरळक उदाहरणे मराठी लोककथांत आढळतात.

५) मराठी लोककथांतील पात्रांची गटवार विभागणी पुढीलप्रमाणे करता येते.

अ) अतिमानवी योनी – देवदेवता राक्षसपिशाच्चादी योनी,

ब) माणसे – सिद्ध माणसे, राजपरिवार, सामान्य माणसे

क) प्राणीसृष्टी – प्राणीकथांतील प्राणी, अन्य कथेतील प्राणी

ड) वनस्पतिसृष्टी –

मराठी लोककथांतील या गटपात्रांच्या स्वभाववैशिष्टयांचा सोदाहरण निर्देश केल्यास वरील निष्कर्षांचा खुलासा होऊ शकेल.

**मराठी लोककथांतील देवदेवतांची जगत्कल्याणकारी भूमिका**

फार प्राचीन काळापासून देवदेवतांच्या दयाळूपणाचा ठसा आपल्या मनावर उमटलेला आहे, 'अनाथांचा नाथ', 'दीनांचा दयाळू' असे देवाचे वर्णन अनेक संतांनी आपल्या काव्यात केलेले आहे. परंपरेने मान्य केलेल्या देवदेवतांच्या स्वभाववैशिष्टयांची सार्थकता मराठी लोककथा पुरेपूर पटवून देतात. त्यातील देवदेवतांची कामगिरी पाहिली तर असे निश्चित म्हणता येते की, त्यांचे चित्रण पूर्णतया भूमिकापात्राचे (Dramtic Personae) असून 'जगत्कल्याणकारक' ही एकमेव भूमिका त्या पार पाडतात. जगाचे मंगल व्हावे यासाठीच त्यांच्या अंगच्या अतिमानवी शक्तीचा उपयोग होतो. त्या कुणाचे दुःख दूर करतील, कुणाचे संकट निवारण करील, तर एखाद्याच्या आयुष्यातील उणीव दूर करतील.

उदा. १) नणंद गरीब – माहेरी भावजयीकडून आदरातिथ्य नाही – परतताना वाटेत शिदोरी म्हणून भाकरीऐवजी गोवऱ्या – शंकर पार्वती यांना दया – भोपळा दिला – घरी गेल्यावर शिजवला – भोपळ्याऐवजी पातेल्यात सोन्याचा गोळा – ऐश्वर्यप्राप्ती. (सुंबरानं मांडीलं – कथा ३)

२) आपल्या आईला, पत्नीच्या हट्टाखातर, जिवंत जाळण्यासाठी जयरामने नदीवर नेले – बांधून घातले – परंतु आगपेटी घरी विसरली – घरी परत – तो पुन्हा येईपर्यंत मरीआईकडून म्हातारीची बंधनातून सुटका. (तीर्थांचे सागर – कथा ३)

३) मुलीच्या तोंडून माणिकमोती – मुलीचा विवाह – धन अंतरणार म्हणून आईला दुःख – मुलगी जावई यांच्याविरुद्ध सतत कट – मारेकरी घातले, विषप्रयोग करण्याचा प्रयत्न, सापविंचू भांड्यात घालून पाठविले – नारायण व राणूबाई यांनी दुष्ट आईचे सर्व बेत उधळून लावले व संकटे दूर केली. (अप्रसिद्ध - कथा)

४) तळ्याला पाणी लागावे म्हणून बळी दिला गेलेला मुलगा जलदेवतेने त्याच्या आईला परत दिला. (पुष्प १ – कथा २०)

५) परोपकारार्थ पैसे हवे म्हणून राजपुत्राने पत्नीस गहाण ठेवले – कर्ज फेडण्यासाठी पैसे हवे म्हणून शंकराची आराधना – शंकराने त्याला अक्षय्य धनाची पिशवी दिली. (अप्रसिद्ध – कथा)

**अपवादस्वरूप भूमिका**

देवदेवतांच्या या कल्याणकारक भूमिकेला अपवाद असणारी आणि संकट–निवारणाऐवजी संकटनिर्माती असणारी एकमेव देवता म्हणजे आक्काबाई होय. तिचे हे संकटकारकाचे स्वरूपही काही मराठी लोककथांत दिसते. (सांगीवांगी – कथा १८) एका कथेत आक्काबाईच्या फेऱ्यामुळे प्रथम ब्राह्मणावर संकटे व नंतर तो फेरा स्वतःच्या अंगावर घेणाऱ्या राजावर संकटपरंपरा ओढवलेली आहे. आक्काबाईची करणी अशी दयाळू देवतांच्या विरुद्ध असली तरी परंपरेने तीच भूमिका तिला बहाल केलेली असल्याने तिची करणी तिच्या भूमिकास्वरूपाशी सुसंगतच म्हणावी लागते. तिची ही भूमिका स्थिर स्वरूपाचीही आहे. ती संकट–निवारण करताना कधी आढळणार नाही. त्यामुळे मराठी लोककथांतील देवदेवतांचे स्वरूप पूर्णतया भूमिकापात्रांचे आहे. या विधानाला बाधा तर येत नाहीच, उलट त्यास पुष्टी मिळते.

**मराठी लोककथांतील राक्षसादी योनींची दुहेरी भूमिका**

परंपरेने देवतांना दयाळू व जगत्कल्याणकारी मानले आहे तर राक्षसादी योनींना नेमके त्यांच्या उलट म्हणजे क्रूर आणि जगत्पीडक मानले आहे. देव–देवतांच्या अंगी असणाऱ्या अतिमानवी शक्तीचा माणसाला काहीसा धाक वाटला तरी त्यांच्याबद्दल वाटणारी विश्वासाची, आधाराची भावना अधिक प्रभावी असते. सदाचाराची कास सोडली नाही तर त्यांच्या कोपाचे भय मुळीच वाटत नाही.

परंतु राक्षसादी योनींचें भय मात्र सर्वांच्या जीवनाला सदैव व्यापून राहिलेले असते. मराठी लोककथांतील राक्षसादी योनींचा स्वभावविशेष काही कथांत या योनी–बद्दलच्या सर्वगृहीत पारंपरिक मतांशी जुळणारा म्हणजे दुष्ट आहे तर काही कथांत मात्र तो त्याउलट म्हणजे सुष्ट स्वरूपाचा आहे. म्हणजे राक्षसयोनीची मराठी लोककथांतील भूमिका केवळ एकेरी नाही तर दुहेरी स्वरूपाची आहे. दुष्ट प्रतिनिधित्व जास्त आहे हे खरे, तथापि सुष्ट प्रतिनिधित्वही अगदीच नगण्य नाही. व्यक्तिमत्वविकास मात्र त्यांत अजिबात नाही. जे राक्षस एकदा दुष्ट भूमिका घेतात ते शेवटपर्यंत दुष्टच असतात, आणि सुष्ट असतात ते आपला चांगुलपणा शेवटपर्यंत निभावितात. राक्षस आणि राक्षसी या दोघांत व विशेषत: राक्षसकन्या या विशेषत्वाने दयाळू असतात. राक्षसकन्यांच्या दयाळूपणाची प्रेरणा बहुधा कामभावनेतून निर्माण झालेली असते.

### दुष्ट भूमिका

१) एका मानवी राक्षसाने एका राजवाड्यातील सर्व माणसे, प्राणी यांचे दगडी पुतळ्यात रूपांतर करून ठेवलेले होते. ते दगडी पुतळे सजीव होण्यासाठी त्याच्या तीन अवघड अटी होत्या. अटी पूर्ण करण्याचे ज्यांचे प्रयत्न निष्फळ होते त्यांचेही तो दगडी पुतळे बनवी. (पुष्प २ – कथा ५)

२) मुलगा झाडावर बसून करंजी खात होता. राक्षसीने त्याला करंजी मागितली. मुलगा करंजी द्यायला खाली उतरताच त्याला पोत्यात घालून पळविले. (पुष्प १ – कथा ६)

### सुष्ट भूमिका

१) राक्षसकन्येचे राजपुत्रावर प्रेम – राक्षसाने विरोध न करता राजपुत्राचा जावई म्हणून स्वीकार – सन्मान – राजपुत्राला पित्याकडे परत जाता यावे म्हणून सर्वसंचारी खडावा दिल्या. (अप्रसिद्ध कथा)

२) कोळीपुत्राची तीन राक्षसांशी मैत्री – राक्षसांजवळ एक फूल – फुलात कोळीपुत्राचा प्राण ठेवला – राक्षसांजवळचे फूल सुकले की त्यांना संकटाची सूचना मिळे – रक्षणार्थ धावत. (सांगीवांगी – कथा १४)

### मराठी लोककथांतील मानवी पात्रांचे चित्रण

मराठी लोककथांत मानवी पात्रांचे तीन गट दिसून येतात. १) सिद्ध माणसे, २) राजपरिवार, ३) सर्वसामान्य माणसे. या तिन्ही गटांतील पात्रांचे चित्रण भूमिकापात्रांच्या दृष्टोकोनातून पाहिल्यास त्यांत भिन्नता दिसून येते.

### सिद्धमाणसांचे दुहेरी भूमिकास्वरूप

देवदेवता, राक्षस यांच्याप्रमाणे अतिमानवी शक्तीचा स्वयंभू वास माणसांत नसला तरी तप-मंत्रसाधना यांच्या बळावर माणूस ही सिद्धी प्राप्त करून घेऊ शकतो व 'सिद्ध' बनू शकतो. अशी माणसे अतिमानवी समजले जाणारे सर्व चमत्कार करू शकतात.

मराठी लोककथांत सिद्ध माणसाचे प्रतिनिधित्व करणारी अनेक पात्रे आढळतात. त्यांचे चित्रण राक्षसयोनीप्रमाणेच दुहेरी स्वरूपाचे (सुष्ट आणि दुष्ट) आहे. आपल्या सिद्धीचा सुष्टतेने उपयोग करणारी पात्रे जास्त असली तरी दुष्टतेने वापर करणारांचा गटही फार लहान नाही.

**सुष्ट भूमिका :–** १) गरिबीने गांजून घर सोडून निघालेल्या ब्राह्मणाला एका साधूने कुठेही घेऊन जाणारी सतरंजी, अदृश्य करणारी टोपी व अक्षय्य धन देणारी पिशवी दिली. त्या वस्तूंच्या साहृचाने त्याने एका राजकन्येचा, सतत सात दिवस पैसे मोजण्याचा, विवाहपण जिंकला. राजवैभव मिळविले. (अप्रसिद्ध कथा)

२) एका विनापत्य राजाला योग्याने सुवर्णहार दिला – तो प्रथम राणीनें सतत गळ्यात ठेवायचा – पुत्रप्राप्तीनंतर सतत राजपुत्राच्या गळ्यात ठेवायचा – पुत्रप्राप्ती – राजाचा मृत्यू – प्रधानाला हाराचे रहस्य माहीत – राजपुत्राच्या गळ्यातील हार काढला – राजपुत्र मृत – योगी तेथे आला – हार पुन्हा गळ्यात घालून राजपुत्रास जीवदान. (वैजयंती – कथा १४)

**दुष्ट भूमिका :–** (१) दुष्ट राणीच्या आज्ञेने जादूगाराने तिच्या सावत्र मुलांना पोपट बनवून दूर नेऊन सोडले. (पुष्प ४ – कथा २)

(२) एका गोसाव्याने आपल्या घरात अनेक लोकांना वेगवेगळ्या रूपांत रूपांतरित करून ठेवले होते. (मराठवाड्यातील लोककथा – कथा १०).

### राजपरिवारातील पात्रांचे चित्रण

मराठी लोककथांत ' राजपरिवार ' हा विशेष लोकप्रिय विषय आहे याचा उल्लेख मागे केलेला आहेच. हा प्रकार सर्वत्रच आढळतो. राजा ही एक जगभर आढळणारी ऐतिहासिक व्यक्तिरेखा आहे. राजाचे वैभव, मानमरातब, सत्ता या सर्व गोष्टींचे आकर्षण सर्वसामान्य माणसाला अनादी कालापासूनच वाटत आलेले आहे आणि त्यामुळेच ' एक होता राजा ' अशी कथेची सुरुवात झाली की श्रोते कान टवकारीत असावेत.

लोकवाङ्मयातील सांकेतिकेतचा प्रत्यय सर्वांत जास्त राजपरिवारसंबंधित कथांत येतो. राजपरिवारातील प्रमुख व्यक्तींच्या स्वभावाचे संकेत वर्षानुवर्षे लोककथांनी ठरवून ठेवलेले आहेत. म्हणजेच त्यांचे भूमिकास्वरूप निश्चित केलेले आहे. राजा, राणी (आवडती व नावडती), राजपुत्र (मोठा व धाकटा), राजकन्या (मोठी व धाकटी) यांच्या जीवनांत त्याच त्या घटना घडतात, आणि प्रत्येकजण जास्तीत जास्त प्रसंगी परंपरेने ठरवून दिलेल्या पद्धतीनेच वागतो. राजपरिवारातील काही पात्रे पूर्णतया भूमिकापात्रस्वरूपाची (Dramatic Personae) आहेत आणि काही पात्रांचे चित्रण बव्हंशी भूमिकापात्रस्वरूपाचे असून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे आणखी काही अनुकूल वा प्रतिकूल विशेष इतर काही कथांत प्रकट होतात. म्हणून राजपरिवारातील महत्वाच्या प्रत्येक पात्राची परंपरामान्य वैशिष्टये कोणती, त्यांचे प्रकटीकरण मराठी लोककथांतून कसे होते आणि या परंपरामान्य भूमिकेपासून त्यांना अलग करणारे कोणते स्वभावविशेष दिसतात या सर्वांचा परामर्श घेणे महत्वाचे आहे.

### मराठी लोककथांतील राजा

राजपरिवाराचा प्रमुख घटक म्हणजे राजा. एखाद्या विशिष्ट प्रदेशाचा स्वामी व प्रभू. तसेच आपल्या कुटुंबाचाही प्रमुख. कुटुंबप्रमुखाचीच सर्व कर्तव्ये, पण अधिक विस्तृत अर्थाने राजाला पार पाडावी लागतात. आदर्श राजा कसा असावा याबाबत काही विशिष्ट कल्पना व संकेत पूर्वापार आपल्या मनांत निश्चित झालेले असतात. राजा म्हणजे एक देखणे, रुबाबदार, शूर, धाडसी, प्रजापालनदक्ष, सावध, गुणग्राहक, कलाप्रेमी असे असामान्य व्यक्तिमत्त्व डोळ्यासमोर उभे राहते. या पार्श्वभूमीवर लोककथांतील राजांचे परीक्षण करू गेल्यास कुटुंबप्रमुखाची ही दुहेरी भूमिका तो क्वचितच पार पाडतो असे स्पष्टपणे दिसते. निदान बहुसंख्य राजांच्या बाबतीत त्यांची कर्तव्यच्युतीच जास्त ठळकपणे प्रतीत होते. याचे कारण शोधू लागल्यास आपल्याला लोककथांच्या सांकेतिकतेकडेच बोट दाखवावे लागेल.

### राजाच्या जीवनाबद्दलचे संकेत

लोककथांनी राजाच्या जीवनाबद्दलचे संकेत वर्षानुवर्षे ठरवून ठेवलेले दिसून येतात. ते संकेत आहेत – संततिहीनत्व, बहुपत्नीकत्व, दुजाभावी वृत्ती, पराक्रमशून्यता, अहंकार, तऱ्हेवाईकपणा वगैरे मराठी लोककथांतील राजाच्या चित्रणात हेच संकेत प्रभावी ठरलेले आढळतात.

**संततिहीनत्व** – सुदैवाने राजवैभवाची सर्व सुखे हात जोडून सेवेला उभी असतात. परंतु दुधात मिठाचा खडा पडावा त्याप्रमाणे अपत्यहीनतेचे शल्य राजाच्या सर्व

सुखांचा विरस करणारे ठरते. मराठी लोककथांत संततिहीन राजांची प्रचुर उदाहरणे आहेत. राजाला मुलगा नसणे म्हणून मुलीच्या विवाहाचा पण जिंकणाऱ्या मुलास वारस मानणे यासंबंधीच्या कथा प्रचलित आहेत. अपत्यहीन राजाचे चित्रण अनेक ग्रंथात आढळते. जसे – एक होता राजा (कथा ७, ८, १०), (राजविलासी केवडा – कथा ६, ७).

पुत्रप्राप्तीचा आनंद वैयक्तिक जीवनात तर हवाच असतो म्हणून राजा तपश्चर्येचा मार्ग अनुसरतो. अशी कथा आढळते. शिवाय पुत्रहीन राजाचे मुखावलोकन प्रजेला अपशकुनी वाटते हे कळल्यावरही एका राजाने कठोर साधना केलेली आढळते. (एक होता राजा – कथा ७)

**बहुपत्नीकत्व**

लोककथेतील राजा बहुधा बहुपत्नीक असतो. काही वेळा बहुपत्नीकत्व त्याच्या संततिहीनतेतून निर्माण होते. मराठी लोककथांतील राजाही बहुतांशी बहुपत्नीकत्व धारण करणारा आहे. (पुष्प १ – कथा ४१, ४२), (पुष्प २ – कथा ५), (दाते २ – कथा ७), (एक होता राजा – कथा ३), (सांगीवांगी – कथा ९), (सुंबरानं मांडीलं – कथा १४). याशिवाय कितीतरी अप्रसिद्ध कथांतून राजाचे बहुपत्नीकत्व दर्शविलेले असते.

**दुजाभाव**

मराठी लोककथांच्या निर्मितीचा संभाव्य काळ जर लक्षात घेतला तर राजाच्या बहुपत्नीकत्वाला आक्षेप घेण्याचे काहीच कारण नाही. या रूढीची लोकमान्यता नष्ट होण्यापूर्वी राजेलोकच काय पण सामान्य माणसेही बहुपत्नीक असत. बहुपत्नीक राजा पत्नींना समभावाने वागवीत नाही हे योग्य वाटत नाही. एकच राणी त्याची विशेष आवडती असते आणि दुसरी किंवा उरलेल्या राण्या नावडत्या असतात. आवडती, नावडती राणी हा राजपरिवाराचा नेहमीचा संकेत आहे. आवडतीला जवळ ठेवून तिच्या तालावर नाचावयाचे व नावडतीला दूर ठेवून तिची चौकशीही करावयाची नाही अशी त्याच्या वागण्याची तऱ्हा दिसते. अशा दुजाभावी राजांची उदाहरणे अनेक कथांत आढळतात. (पुष्प १ – कथा ४२), (पुष्प २ – कथा ५, ९), (दाते २ – कथा ७), (एक होता राजा – कथा ३, ७) या कथांत राज्याचे आवडत्या व नावडत्या राण्यांचे उल्लेख दिसून येतात.

राजाच्या या दुजाभावामुळे कुटुंबात नेहमीच संघर्षाचे काळे ढग भरून राह-

तात, नावडत्या राणीचा व तिच्या मुलांचा छळ होतो, त्यांच्या विरूद्ध जीवघेणे कटही होतात. पण या गोष्टींना विरोध करण्याचे सामर्थ्य राजाच्या अंगी नसते. त्याला त्याची मूक संमती तरी असते किंवा क्वचित तो त्यात सक्रिय भागही घेताना दिसतो.

**पराक्रमशून्यता**

राजा नेहमी क्षत्रिय वर्णाचा असतो. स्वतःच्या कुटुंबाचे, राज्याचे व प्रजेचे रक्षण ही फार मोठी जबाबदारी त्याच्यावर असते. राज्यात सुव्यवस्था, परचक्रनिवारण असे या जबाबदारीचे विविध स्वरूप असते. ही अवघड जबाबदारी पार पाडण्यास अर्थातच पराक्रम व धाडस हवेच परंतु लोककथांतील राजा संकटांचा मुकाबला करण्यास स्वतः निघालेला आहे, त्याने रणांगणावर शत्रूला खडे चारलेले आहेत, किंवा स्वतःचा जीव धोक्यात घालून राक्षसाला मारले आहे असे त्याचे मर्दानी रूप कधीच दिसत नाही. मराठी लोककथेत तरी अशी एकही कथा आढळली नाही.

राजाच्या या पराक्रमशून्य आणि निष्क्रिय भूमिकास्वरूपातून राजपरि-वारात काही घटना अपरिहार्यपणे निर्माण होतात. राज्यावर संकट आले तर ते दूर करण्याचा अभिनव मार्ग म्हणजे राजकन्या आणि बरेच वेळा तिच्याबरोबर अर्धे राज्यही पणास लावणे.

उदा. – १) सोंड्या राक्षसाच्या हातून प्रेमलेला सोडवील त्याला राजकन्या व अर्धे राज्य. (एक होता राजा – कथा ७)

२) कानसीपात्रेला हत्तींच्या तावडीतून सोडवील त्याला राजकन्या व अर्धे राज्य. (एक होता राजा – कथा १० )

काही वेळा एखादी अवघड कामगिरी राजपुत्रावरही सोपविली जाते. परंतु राजा स्वतः मात्र काही करीत नाही.

उदा. (१) राक्षसपतीच्या तावडीतून राजकन्येला तिच्या भावांनी सोडवून आणले. अशा कथा प्रचलित आहे.

२) राजाला अपूर्व स्वप्न शोधायला राजपुत्रच जातात. (सांगीवांगी – कथा ९.)

**अहंकारी वृत्ती**

लोककथेतील राजा पराक्रमशून्य, निष्क्रिय असला तरी त्याच्या अंगी अहंकाराचा वास प्रकर्षाने असतो. विशेषतः राजकन्या आपल्या नशिबाने

खातात असा आपल्या श्रेष्ठ नशिबाचा त्याला फार गर्व असतो. त्यामुळे त्याचा हा दुराग्रह मान्य न करणाऱ्या धाकट्या राजकन्येच्या नशिबाची तो खरोखरच परीक्षा पाहतो. तिची व राजवैभवाची फारकत करून तिला तो रोगी, दरिद्री, दुर्दैवी, पंगू पती शोधून देतो. (सांगीवांगी कथा ८),(दाते १ – कथा१०),(मराठवाड्यातील लोककथा – कथा १०) या सर्व कथांत हाच विषय आहे.

**तऱ्हेवाईकपणा**

तऱ्हेवाईकपणाच्या बाबतीत तर या राजाचा हात क्वचितच कोणी धरू शकेल. या तऱ्हेवाईकपणाचे त्याचे प्रकारही सांकेतिक आहेत.

**अ) अपूर्व स्वप्नांचा शोध**

राजाला अपूर्व स्वप्न पडते. ते कितीही आकर्षक असले तरी ते स्वप्न आहे हे तो लक्षात घेत नाही. त्याच्या पूर्तीसाठी तळमळतो व त्यासाठी राजपुत्रांना जावे लागते. स्वत: कधीच जात नाही.

उदा. १) राजाला स्वप्न – एक पार, पारावर मारुतीचें देऊळ, त्यावर चिंचेच्या झाडावर राघूमैनेचे जोडपे अशी एक कथा उपलब्ध झाली.

२) राजाला स्वप्न – झाडाला चांदीची मुळं, सोन्यांच्या फांद्या, मोत्याचे घस, ( सांगीवांगी – कथा ९)

**ब) राजकन्येसाठी तऱ्हेवाईक विवाहपण**

१) हातातील क्षुद्र किडा ओळखणाराला राजकन्या द्यावयाची असे राजा ठरवतो अशी कथा मराठवाड्यात सांगितली जाते.

२) राजकन्येने दहीभाताचे हात धुतल्याने उगवलेले दही भाताचे झाड ओळख – णाराला राजकन्या द्यावयाची. (मराठवाड्यातील लोककथा – कथा २)

**क) राजपुत्रांची परीक्षा**

सर्व राजपुत्रांना मोजके पैसे देऊन त्यांची परीक्षा पाहण्याची लोक–कथांतील राजाला फार हौस असते. वास्तविक रोजच्या सहवासातून आपल्या योग्य वारसाची निवड करणे सहज शक्य असते. तथापि राजा बरेच वेळा मुलांना देशांतरास पाठवून त्यांची कसोटी घेतो अनेक कथा अशा स्वरूपाच्या आहेत.

थोडक्यात लोककथांतील राजाच्या पात्राबाबतचे जे प्रमुख संकेत परंपरेने

सर्वत्र रूढ केलेले आढळतात त्या सर्वांचे दर्शन मराठी लोककथांतून अशा तऱ्हेने घडते. म्हणून बहुसंख्य मराठी लोककथांतील राजाचे चित्रण भूमिका-स्वरूपाचे ( Dramatis Personae ) आहे असे म्हणावयास हरकत नाही.

### राजाची अन्य स्वभाववैशिष्टचे

मराठी लोककथांतील राजा हा पूर्णतया भूमिकास्वरूप मात्र नाही कारण त्याच्या स्वभावाची काही अन्य वैशिष्टचेही काही लोककथांतून प्रकट होतात. त्यांतील काही वैशिष्टचांनी त्यांचे व्यक्तिमत्व उजळून निघते तर काही वैशिष्टचे त्याला काळिमा लावतात.

### सद्गुणी व प्रेमळ राजा

१) एका विशिष्ट ठिकाणाच्या पाण्याने राजाची धर्मव्याधी बरी – तेथे देवीचे देऊळ बांधायचा राणीचा नवस – नवस पूर्ण होईतो तिचे अन्नग्रहण वर्ज्य – राजानेही अन्न वर्ज्य करून जास्तीत जास्त वेगाने देवळाचे काम सुरू केले. ( राजविलासी केवडा – कथा ३ )

२) राजकन्येला स्वयंवरणाचा अधिकार देणारा राजा. ( सांगीवांगी – कथा ४)

३) आपल्या कुरूप मुलालाही विवाहसुख लाभावे म्हणून तळमळणारा राजा एका अप्रसिद्ध कथेत पाहावयास मिळतो.

### राजाचे दानशूरत्व

१) तोंडातून मोत्यापोवळ्यांचा पाऊस पाडणारी बकरी ब्राम्हणाला दान करणारा राजा एका अप्रसिद्ध कथेत आढळतो.

२) रोज सव्वा मणाचा दानधर्म करणारा राजा (एक होता राजा – कथा ९)

### चतुर राजा

(१) राजकन्येला पुरुषदर्शन वर्ज्य कारण गेल्या हरिणीच्या जन्मात ती पतीबरोबर जाळ्यात सापडली असता हरीण एकटाच जाळे तोडून पळाला – एका राजाने स्त्रीवेषाने तिच्या माळणीमार्फत त्याला तिच्याशी संपर्क साधून कारण ज्ञात करून घेतले – साधू वेष – त्याला स्त्रीदर्शन वर्ज्य – त्याचे कारण बरोबर तिच्या विरूद्ध – दरबारात ती वादासाठी का होईना पड्याबाहेर आली – नेम मोडला – विवाह रद्द. (एक होता राजा – कथा ९)

२) आपल्या अनुपस्थितीत एकटीने चांगलेचुंगले करणाऱ्या राणीचे कपट, लपून बसून सर्व पाहून तिच्या पदरात बांधले अशी कथा उपलब्ध झाली.

**गुण ग्राहक राजा**

वेषांतरित अवस्थेत राज्याची पाहणी करून गुणी माणसांची कदर करतो.
१) 'तीन दाण्यांवर संसार', 'फुटक्या कवडीवर' संसार करण्याची आत्मविश्वास - पूर्वक प्रतिज्ञा करणाऱ्या मुलीशी तो विवाह करतो. अर्थात् त्यांची परीक्षा घ्यायला चुकत नाही. अशा अनेक कथा रुढ आहेत.

**मदतशील राजा**

१) वनवासी जगदेव राजपुत्राला त्याच्या पत्नी मुलासह आश्रय (एक होता राजा – कथा ३)
२) सटवीकन्येने टाकून दिलेला पुत्र राजपुत्र म्हणून वाढला. (मराठवाड्यातील लोककथा – कथा ६), (पुष्प २ – कथा १०)

**दुर्गुणी राजा**

लोकपरंपरेने राजाच्या भूमिकेत दुर्गुणांचे भडक रंगच अधिक भरलेले आहेतच त्यांच्याशिवाय इतर काही दुर्गुणही त्याला चिकटवलेले दिसतात.

**राजाची कामातुरता**

बहुपत्नीक असूनही राजाची कामवासना शमत नाही.
१) सुंदर सावकारपत्नीवर वाईट नजर ठेवणारा.
२) प्रधानपत्नीवर वाईट नजर ठेऊन तिच्या उपभोगाच्या आशेने प्रधानाला कामगिरीसाठी मुद्दाम दूरवर पाठविणारा.
३) सावकारपत्नीच्या प्राप्तीसाठी तिला सात मजली महाल बांधून देणारा. (राजविलासी केवडा – कथा १०)
४) मेहुणीचा उपभोग घेणारा. (पुष्प ४ – कथा १३)
अशी राजाची अनेक रूपे लोककथांत पाहावयास मिळतात.

**राजाचा कपटीपणा**

१) राजकन्येचा विवाहपण जिंकूनही तिचा विवाह विजेत्या तरुणाशी करून देण्यात टाळाटाळ करणारा राजा एका कथेत दिसतो.

**राजाची स्तुतिप्रियता**

१) राजा जुलमी – न्हाव्याजवळ राज्यातील परिस्थितीची रोज चौकशी – न्हावी खुषामती – त्याचे रोज उत्तर 'राज्यात आबादी आबाद' राजा खूष – रोज पाच मोहरा बक्षीस देतो अशा आशयाचे चित्रण अनेक कथांत असते.

**दुराग्रही राजा**

१) राजाचे मत, 'मुलगा प्रिय', 'प्रधानाचे मत, 'स्वतःचा जीव प्रिय' या वादापायी गुणी प्रधानाची हकालपट्टी. (तीर्थाचे सागर – कथा ८)

२) पोरक्या राणीजवळ (कुत्रीने वाढविलेल्या) 'माहेर दाखवच' असा हट्ट (पुष्प १ – कथा ४३).

३) राणीशी झालेल्या शुल्लक वादापायी तिला गर्भवती अवस्थेतही वनवासात पाठविणारा राजा (पुष्प १ – कथा ४४)

**राजाचा विक्षिप्तपणा**

१) स्वतःच्या अनुपस्थितीत राणीला पुत्रप्राप्तीची अट घालणारा राजा (राजविलासी केवडा – कथा ७)

२) राणीच्या हातचे न खाता राजवाड्यावाहेरून जेवणाचे ताट मागविणारा राजा (पुष्प ४ – कथा ५)

अशा तऱ्हेने मराठी लोककथांतील राजाचे चित्रण हे बऱ्याच अंशी भूमिका-पात्राचे (Dranatis Personae) आहे, तथापि व्यक्तिमत्वाचे काही अन्य बरे-वाईट विशेषही कांही लोककथांतून प्रकट होतात. ज्या राजाला देवाचा अंश मानले जाते, त्याच्या व्यक्तिमत्वाला लोककथांत लोकमानसाने असा अनादरणीय रंग का दिला असावा ? त्याला असे काहीसे हास्यास्पद का बनविले असावे ? याचे संभाव्य कारण लोकशाहीच्या स्थापनेपूर्वी आपल्या देशात शतकानुशतके प्रचलित असणाऱ्या दुष्ट राजेशाहीच्या परंपरेत असावे असे वाटते. आपल्या देशाचा इतिहास हा अनेक राजघराण्यांचा, अनेक संस्थानिकांचा इतिहास आहे. राजाच्या गुणावगुणांवर राज्यातील प्रजेचे सौख्य अवलंबून असते. इतिहास प्रजेवर जुलूम करणाऱ्या अनेक राजांची साक्ष देतो. राजधानी बदलताना प्रजाजनांची ससेहोलपट करणारा लहरी महंमद कोण विसरू शकेल ? हे इतिहासाने नमूद केलेले एक ठळक उदाहरण झाले. अशा अनेक जुलुमी, लहरी राजांचा उपद्रव शतकानुशतके या समाजाने सोसला आहे. प्रत्यक्ष व्यवहारात सर्व सत्ता राजदंडात एकवटलेली असल्याने विरोध करण्याचे सामर्थ्य सामान्य माणसांत नसते. तेव्हा या अन्यायाची चीड, सुप्तरूपाने मनात दडलेला असंतोष राजाच्या अशा काहीशा प्रतिकूल चित्रणातून व्यक्त होत असावा.

**मराठी लोककथांतील राणी**

राजा हा राज्यकुटुंबव्यवस्थेचा पिता मानला तर स्वाभाविकच मातृत्व

राणीकडे येते. राजाच्या सर्व कर्तव्यात राणीचे सहकार्य व क्वचित प्रसंगी सहभागही असावयास हवा. तथापि लोककथांतील राजाचा संबंध जिथे राज्याच्या राज्य-कारभाराशी फारसा येत नाही, तिथे राणीपासून अपेक्षा करणे कसे शक्य आहे ? स्वाभाविकच राणीच्या स्वभाववैशिष्टयांचे दर्शन तिच्या खाजगी परिवाराच्या वर्तुळातच सीमित झालेले दिसते.

**राजाच्या बहुपत्नीकत्वामुळे राणीची दोन भूमिकास्वरूपे**

राजाच्या बहुपत्नीकत्वामुळे राणीचे दोन प्रकार लोककथांत दिसतात. एक आवडती व दुसरी नावडती. या दोघींच्याही भूमिकांचे संकेत पूर्णतया भिन्न, किंबहुना दोन टोकांचे आहेत.

**आवडत्या राणीचे चित्रण पूर्णतया भूमिकास्वरूप**

आवडत्या राणीचे मराठी लोककथांतील चित्रण पूर्णपणे भूमिकास्वरूप असेच आहे. तिचे चित्र पूर्णतया काळे, अनुदार असे असून तिच्या सांकेतिक स्वभाव-विशेषांचे सवतीमत्सर आणि सापत्नभाव हे प्रमुख पैलू आहेत.

**प्रखर सवतीमत्सर**

राजाची 'आवडती' राणी हे स्थान जिला मिळते तिच्या हाती स्वाभाविकच कुटुंबातील सर्व अधिकार एकवटतात. आपल्या या स्थानाला धक्का पोचू नये यासाठी ती नावडतीला सतत पाण्यात पाहते, तिचे नावडते स्थान कायम राहील याची काळजी घेते.

१) नावडती छळाला कंटाळून आत्महत्येस प्रवृत्त – साधूने परतवले – मोरंबीचे, तुळशीचे झाड यांची तिच्याकडून सेवा – त्यांनी तिला जादूची पिशवी, अंगठी दिली – उत्तम वस्त्रे, दागिने घालून घरी परत – राजाला तिच्याबद्दल प्रेम उत्पन्न होण्याची आवडतीला भीती – पतीच्या मनातील संशयात्मा जागृत केला. अशी एक कथा मराठवाड्यात सांगितली जाते.

२) राजाची आवडती राणी मूळची राक्षसी परंतु तरुणीवेषाने राणी बनली. तिने रोज राजाच्या बागेतला घोडा खावा व आळ सवतीवर घ्यावा – पहिल्या सात राण्या हद्दपार (दाते २ – कथा ७)

३) राजाच्या सहाव्या राणीने पहिल्या पाच राण्यांना डोळ्यांत बिब्याचे तेल घालून आंधळे करविले व हद्दपारही केले. अशीही एक कथा आढळते.

**पुत्रवती नावडतीबद्दल मत्सर**

प्रसादफळ आवडतीने फेकून दिले. नावडतीने खाल्ले – नावडती गर्भवती – आवडतीने मूल पळविले किंवा उकिरड्यावर फेकले – त्याच्याजागी निर्जीव वस्तू ठेवणे. अशा आशयाच्या अनेक कथा प्रचलित आहे.

**सावत्र मुलांचा छळ**

नावडती पुत्रवती असेल तर आवडतीची द्वेषबुद्धी व दुष्टता सावत्र मुलांकडे वळते. ती त्यांना कधीच सुखाने जगू देत नाही.

१) सावत्र मुलांवर विषप्रयोग, मारेकरी.

२) मदन व गोरधन या सावत्र मुलांना विषप्रयोग करून ठार मारले. (पुष्प २ – कथा ९). याप्रमाणे पुढील कथा अशाच आहे.

३) सावत्र मुले खेळत आवडतीच्या महालात – राजाकडे तक्रार, 'सवतीची कार्टी अंगाला येऊन झोंबली, दुखणं आलं, त्यांना ठार मारा'. (पुष्प २ – कथा ५)

४) नावडतीचा पुत्र जगदेव याच्यावर मात्रागमनाचा खोटा आळ घेऊन हद्दपार करविले, मारेकरी पाठवले. (एक होता राजा – कथा ३)

५) पोरक्या सावत्र मुलांकडून खूप कष्ट – अपुरे अन्न तेही कोंड्याची भाकरी – रानात गुरे चारण्याचे काम (दाते २ – कथा १०)

**द्वेषबुद्धीचा वारसा मुलांना प्रदान**

आपल्या द्वेषबुद्धीचा वारसा आवडती राणी आपल्या मुलांनाही देते. सावत्र मुलांचा छळ करण्यात ती त्यांनाही सहभागी करून घेते. विशेषत: सावत्र भावंडांना मिळणाऱ्या मदतीचे रहस्य शोधून काढून आईला सांगण्याचे काम ती मुले करतात.

**नावडत्या राणीचे चित्रण पूर्णतया भूमिकास्वरूप**

लोककथांतील नावडत्या राणीचे सांकेतिक व्यक्तिमत्व केवळ सोशिकतेची मूर्ती या एका शब्दातच वर्णन करावे लागेल. पतीच्या उपेक्षेला, सवतीच्या मत्सरी स्वभावाला आणि छळाला निमूटपणे तोंड देणें एवढीच भूमिका ती करीत असते. तिचा निवास मुख्य राजवाड्यात सहसा नसतोच. दूरवर राहून एकलेपणाचे दु:ख तिला सहन करावे लागते. या तिच्या दुर्दशेतही ती सद्‌गुणांचा वारसा जतन करताना आढळते.

**नावडत्या राणीची नम्रता व पातिव्रत्य**

पतीने आणलेली प्रसादफळे आवडीने फेकली तरी नावडती नम्रपणे व भक्ति-

भावाने ग्रहण करते, असे एका कथेत दर्शविले आहे. तर दुसऱ्या एका कथेत पत्नी-कडून उपेक्षा होत असली तरी तिचे पातिव्रत्य ढळत नाही.

नावडतीचा चंद्रहार पळविणाऱ्या आणि तिच्याबद्दल कामबुद्धी बाळगून चंद्र-हारासाठी तिला घरी बोलावणाऱ्या सावकराकडून ती तो चंद्रहार आपले शील भ्रष्ट होऊ न देता परत आणते. सावकाराकडे जाण्यासाठी भुयार – राणीने मुद्दाम उशीर केला – वाट पाहता पाहता सावकाराला झोप लागली – तेवढ्यात राणी हार घेऊन गेली – सावकार निराश – तो राजाचा मित्रच – राजाला कोडे घातले.

सहा महिनें सुरुंग खांदित जाई

त्यात पेरली केतक जाई

फूल आलं पण हुंगलं नाही.

राज्याला कोडे सुटेना – नावडतीने सोडवून दिले. असे वर्णन आढळते.

### मुलांवर सुसंस्कार

आवडतीची मुले नेहमी उद्धट, गर्विष्ट, दुष्ट असतात परंतु नावडतीची मुले अशा भावांशीही स्नेहाने वागतात, एवढेच नव्हे तर वेळप्रसंगी त्यांची सेवा करतात. प्रवासात साथ करून रक्षण करतात.

मराठी लोककथांतील नावडतीचे चित्रण हे असे पूर्णतया भूमिकापात्राच्या स्वरूपाचे आहे.

### राजपरिवारातील सवतीमत्सराचा आणखी एक प्रकार

जेव्हा दोघींपेक्षा अधिक राण्या राजपरिवारात असतात तेव्हा सवतीमत्स-राचा प्रकार एक विरुद्ध अनेक अशा प्रकारचा होतो. त्यातील एक राणी – बहुधा धाकटीच – आवडती असते व बाकीच्या नावडत्या असतात. हा प्रकार बहुधा फक्त धाकटीच गर्भवती होण्याने निर्माण होतो. या परिस्थितीचे परिणाम मात्र सांके-तिकच असतात – तिची मुले पळविणे, मारून टाकणे वगैरे. (पुष्प १ – कथा ४२) (एक होता राजा — कथा ८), (पुष्प ४ – कथा २) या कथा अशा प्रकाराच्या आहेत.

### राणीची अन्य स्वभाववैशिष्टचे

राजपरिवारात राजाच्या बहुपत्नीकत्वामुळे निर्माण होणारी अशी संघर्षमय सांकेतिक परिस्थिती जरी मराठी लोककथांतूत प्राचुर्याने वर्णन केलेली असली

तरी काही अन्य कथांतून राणीच्या स्वभावातील इतर काही गुणदोष वर्णन केलेले आढळतात.

**गुणवती राणी**

**प्रेमळपणा – १)** पतीची व्याधी पूर्ण बरी व्हावी म्हणून देवीला नवस करून देवीचे देऊळ पूर्ण बांधून होईपर्यंत अन्नग्रहण न करणारी राणी (राजविलासी केवडा – कथा ३)

२) आपल्या श्वानमातेचे उत्तम स्वागत करणारी राणी (पुष्प १ – कथा ४३)

**पातिव्रत्य**

१) आपल्या पातिव्रत्याने राणीने राजाच्या छातीवरचा गुलाब उमलता ठेवला. देशांतराला जाताना त्याने घातलेली पुत्रप्राप्तीची अटही चतुराईने पूर्ण केली (राजविलासी केवडा कथा ७)

२) कोतवालपुत्राने जगदेवपत्नी वीरमतीला फसवून कैद केले. तिने खरो-खरच वीरमती बनून विषयांध कोतवालपुत्राचा शिरच्छेद करण्याचे धाडस दाखविले. (एक होता राजा – कथा ३)

**बाणेदारपणा**

१) तीन दाण्यावर संसार करण्याचो प्रतिज्ञा करणाऱ्या मुलीशी राजाने विवाह केला – तिला मुद्दाम वनवासात ठेवले – तिने दाणे पक्ष्यांना दिले. त्यांनी मोती दिले – ती हळुहळू श्रीमंत झाली. अशा आशयाच्या कितीतरी कथा रुढ असल्याचे दिसते.

**दुर्गुणी राणीचे चित्रण**
**व्यभिचार**

राणीच्या व्यभिचारासंबंधीच्या पुढील प्रमाणे कथा उपलब्ध झाल्या.

१) माहेरच्या प्रधानाशी राणीचा चोरटा संबंध – राजा पाळतीवर गेला – पतीला कैदेत टाकले, फाशीची शिक्षा देण्याचा डाव.

२) नवऱ्याच्या नाकाला चुना लावून पळून जाण्याची 'प्रतिज्ञा' केलेल्या मुलीशी राजाचा विवाह – तिला उंच माडीवर ती दिसेल अशा जागी ठेवले – स्वतःचा पुतळा तयार करून ठेवला – स्वतःच्या जागी पुतळा ठेवून प्रियकराकडे जाई – भुयार खणून पळून गेली.

**सौंदर्याभिमान**

राणीला सौंदर्याचा अभिमान – आपल्या मैनेला व पोपटाला विचारी, 'माझ्या-

पेक्षा सुंदर कोण ?' मैनेने दुसऱ्या सुंदर स्त्रीबद्दल सांगताच तिला मारून टाकले. (राजविलासी केवडा – कथा ६)

राजपरिवारातील राणीची व्यक्तिरेखा, काही थोडे अपवाद वगळता बव्हंशी भूमिकापात्राचीच आहे असे म्हणावयास हरकत नाही. राजाच्या बहुपत्नीकत्वातून उत्पन्न होणाऱ्या तणावांचे आणि प्रखर, कटू संघर्षाचे हे चित्रण अत्यंत वास्तवदर्शी आहे. 'सवतीला बहीण मानून रहा' हा कण्वांनी शकुंतलेला केलेला उपदेश व्यवहारात कधीच उतरलेला आढळत नाही. या रूढीतील अनिष्टता पुराण काळापासून दृष्टीस पडते. रूक्मिणी आणि सत्यभामा, म्हाळसा आणि बानू अशी काही उदाहरणे परिचित आहेतच. घरातील आवडतीचा सतत वरचष्मा. आणि त्यामुळे नावडतीची होणारी कुचंबना व अगतिकता या वास्तवतेतून आवडतीबद्दल असणारी चीड व दुसरीबद्दल वाटणारा कळवळा लोककथांतून स्वाभाविकच प्रकट होतो. आवडतीला एकही सद्गुण प्रदान होत नाही तर नावडतीत दुर्गुणाला स्थान नाही, सुखाचा झरा शेवटी नावडतीच्या दारात नेऊन सोडण्यात काव्यगत न्यायाची लोकमानसाची प्रवृत्ती प्रकट होते.

**मराठी लोककथांतील राजपुत्र**

लोककथांतील राजे बरेच वेळा संतति हीन असल्यामुळे राजपुत्रांच्या जन्मा ची प्रतिक्षा दीर्घकाळ करावी लागते. राजकुलात जन्म ही गोष्ट भाग्याची तशीच जबाबदारीचीही. त्यामुळे कोडकौतुकात बालपण, शिक्षणात किशोरवय, आणि राजकारणाचे धडे घेण्यात राजपुत्राचे तारूण्य व्यतीत व्हावयास हवे. परंतु लोक–कथांत असे काहीही घडत नाही. राणीच्या व्यक्तिरेखेबाबत ज्याप्रमाणे आवडती व नावडती असा व्दिधा विचार करावा लागतो, तसाच येथेही आवडतीची मुले व नावडतीची मुले किंवा सख्खी भावंडे असली तर मोठे भाऊ व धाकटा भाऊ असा विचार करावा लागतो. आवडतीचे मुले व मोठे भाऊ सदैव पीडकाची भूमिका करतात तर नावडतीची मुले वा धाकटा भाऊ नेहमी पीडित असतो. मराठी लोककथांत असे सांकेतिक चित्रण प्रचुरतेने दिसते.

**दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकलेला राजपुत्र**

नावडतीचा पुत्र दुर्दैवाशी सामना करीतच जन्माला येतो. सावत्रआई त्याला जन्मतःच कशी पळवून नेते याचा उल्लेख केलेला आहेच. नावडतीच्या मुलांना फेकून दिल्यावरही ती कुठे वाढतात याच्या मागावरही सावत्रआई असतेच. राज–पुत्राचे ते अश्रयस्थान नष्ट करण्याचा आणि शक्यतो त्याला मारून टाकण्याचा प्रयत्न केला जातो. तो राजगृही वाढत असला तर कष्टमय जीवन वाट्यास येते.

उदा .–

१) राजाची परित्यक्त संताने कुंभाराघरी वाढली – सावत्र आईला पत्ता लागताच कुंभाराला पत्नीसह फाशी – नंतर एका माळ्याच्या घरी आश्रय – त्यालाही पत्नीसह फाशी (पुष्प ४ – कथा २)

२) राजसंततीचे कुंभाराघरी पालन – सावत्र आईला कळले – तिच्याकडून विषारी लाडूची शिदोरी – मुले मृत (अप्रसिद्ध कथा)

३) राजपुत्र सतत गुरे चारी – शंकराकडून वाळकाचा वेल – सावत्र आईने वेल उपटला – अन्न देणारी कपिला मारायचा बेत. (दाते २ – कथा १०)

४) सावत्र आईने राजपुत्राला प्रथम वाघिणीचे दूध आणण्यास पाठविले. ते आणल्यावर आपल्या राक्षसकुलाच्या माहेरी पाठविले. व निरोप दिला 'खाऊन टाका'. (अप्रसिद्ध कथा)

**सावत्र भावांशी सामना**

आवडतीची मुले आईकडून द्वेषाचा वारसा घेतात. ही मुले बहुधा नावडतीच्या मुलापेक्षा वयाने वडील असतात. आळशी आणि उध्दटही असतात. स्वतः निष्क्रिय राहून धाकटया सावत्र भावाला सतत छळणे, वेळप्रसंगी त्यांच्या जीवावरही उठणे एवढी एकच भूमिका ते पार पाडतात. या उलट नावडतीचा पुत्र वयाने लहान असला तरी नम्र, सद्‌गुणी, सेवाभावी वृत्तीचा असतो. सावत्र भावांवरही प्रेम करतो, त्यांना संकटात साथ देतो, त्यांचे रक्षण करतो.

उदा. १) सेतूराजाने पाताळातील कानसीपात्रा राजकन्येला सोडविले, तिला घेऊन तो समुद्राबाहेर पृथ्वीवर येण्यास निघाला. बाहेर त्याचे दोन मोठे सावत्र भाऊ – प्रथम पेटीतून कानसीपात्र बाहेर – सेतूराजाच्या भावांनी पेटी परत पाताळात सोडलीच नाही. कानसीपात्रेला घेऊन ते दोघेही राजधानीत परत. (एक होता राजा – कथा १०)

२) राजपुत्र बळीवंत प्रेमलेसह राजधानीत परत येत असता वाटेत एका कलावंतिणीचे कैदी होऊन पडलेल्या आपल्या दोन सावत्र भावांना त्याने सोडवले. त्यांच्यासह पुढे जात असता वाटेत दोघा भावांनी बळीवंतला विहिरीत ढकलून दिले. (एक होता राजा – कथा ७ )

**पित्याच्या लहरीपणाचा, निष्क्रियतेचा उपद्रव**

पित्याच्या निष्क्रिय राहण्यामुळे सावत्र आईकडून होणार राजपुत्राचा छळ प्रत्यक्ष कृतीत येऊ शकतो. तिच्या कट, कारवायांना तो आळा घालू शकत नाही.

राजाला राजपुत्रांना मोजके पैसे देऊन नशिबाच्या शोधार्थ देशांतराला पाठविण्याची लहर कशी येते याचाही उल्लेख केलेला आहेच. तसेच राजाला विचित्र स्वप्न पडलेच तर त्याचा अर्थ शोधण्यास राजपुत्रालाच जावे लागते.

### राजपुत्राच्या दुर्दैवाची अन्य कारणे

सावत्र आई वा निष्क्रीय पिता याखेरीज अन्य कारणांनीही राजपुत्र दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडतो असे वेगळे चित्रणही मराठी लोककथांत आढळते. या दुर्दैवास कधी त्याची ललाटरेखाच तर कधी त्याचे स्वतःचे दुर्गुण कारणीभूत होतात. उदा. १) राजा राणीचा वाद – राणी वादात हरल्याने तिला गर्भवती अवस्थेत बारा वर्षे वनवास – वनवासात राजपुत्राचा जन्म – अंगावर वस्त्रे नसत, केस वाढलेले – पाला खावा लागे. त्याला वनदेवतांनी पांगळा बनवून ठेवलेले होते. (अप्रसिध्द कथा)

२) राजपुत्र अत्यंत कुरूप – पत्नी सोडून गेली. ( अप्रसिध्द कथा )

३) ऋषींचा तपश्चर्याभंग केल्याने सर्परूप. ( मराठवाड्यातील लोककथा – कथा २८)

४) राजपुत्र खोडकर – लोकांना खडे मारी – गरीब मुलीची खोडी काढली - तिच्या शापाने अंधत्व. (सांगीवांगी – कथा ५)

### दुर्दैवाच्या फेऱ्यातून राजपुत्राची सदैव सुटका

लोककथांतील हा राजपुत्र जितक्या सांकेतिकतेने दुर्दैवाच्या फेऱ्यात अडकतो, गुरफटतो, तितक्याच सांकेतिकतेने त्याच्या सर्व संकटांचा निरास होऊन त्याचे जीवन शेवटी सुखी होते. संकट कितीही मोठे असले तरी सुटकेचा मार्ग हमखास निघतोच. सावत्र आईने जन्मतःच पळवून नेले तरी आश्रयदाता कोणीतरी असतोच. मारून पुरून टाकले तरी दैवी कृपेमुळे जमिनीतही तो जिवंत राहू शकतो. भावांनी संक–टात टाकले तरी त्यातूनही सुखरूप पार पडतो. पित्याच्या अपूर्व स्वप्नाचे उत्तर देणारे, ते स्वप्न साकार करणारे कोणीतरी भेटतेच. मोजक्या पैशातही स्वतःचे कर्तृत्व सिध्द करूनच राजपुत्र स्वगृही परततो. त्याच्या कुरूपपणामुळे सोडून गेलेल्या पत्नीचे परिवर्तन होते. जिच्या शापाने अंधत्व आले तिची क्षमायाचना केल्यावर अंधत्व जाते. दुर्दैव त्याला सतत बद्ध करून ठेऊ शकत नाही.

अशा तऱ्हेने प्रथमतः संकटग्रस्त आणि शेवटी संकटमुक्त असेच राजपुत्राचे भूमिकापात्र मराठी लोककथांत पाहावयास मिळते.

**राजपुत्राच्या स्वभावाचे अन्य विशेष**

राजपुत्राची मराठी लोककथांतील व्यक्तिरेखा बव्हशी भूमिकास्वरूप असली तरी त्याच्या स्वभावाचे अन्य विशेष प्रकट करणाऱ्याही काही लोककथा आहेत. जसे–

**१) चातुर्य**

१) चतुराईने भुतावर मात – पिशवीत कोंडले – स्वतः शेंगदाणे, सुपारी खाल्ली – भुताला मात्र दगड, वाळू खावयास दिली – भुताने घाबरून हवे ते देणारी पिशवी दिली – नंतर त्या पिशवीत यमाला कोंडून आयुष्य ३०० वर्षे वाढवून घेतले. (अप्रसिध्द कथा)

२) बहिणीचा पती राक्षस – त्याच्या तावडीतून बहिणीला सोडवले – स्वतःचा दात म्हणून नांगराचा फाळ दाखविला – दह्याचे मडके ओतले व राक्षसाला 'माझ्यासारखे ओतून दाखव' असे आव्हान दिले. 'तू राक्षस तर मी ब्रह्मराक्षस' अशी भीती दाखविली. राक्षस घाबरला – बहिणीची सुटका. (अप्रसिध्द कथा)

**२) गुणग्राहकता**

१) जगात सर्वात गरीब कोण व श्रीमंत कोण ? या प्रश्नाचे योग्य उत्तर देणारीशी विवाह करावयाचा राजपुत्राचा पण. ( अप्रसिध्द कथा )

**३) स्वाभिमान**

१) विवाहाचा पण जिंकूनही विवाहास राजी न होणाऱ्या राजकन्येची व राजाची खोड मोडून त्यांना विवाहास राजी केले. ( अप्रसिध्द कथा )

२) जगदेव राजपुत्र हद्दपार – दयनीय परिस्थितीत सासुरवाडीस आला – पत्नी माहेरीच – सासुरवाडीस जास्त राहणे अमान्य – नशीब काढण्यास पत्नीसह निघून गेला. (एक होता राजा – कथा ३)

सारांश, असे अन्य स्वभावविशेष दाखविणाऱ्या कथा वगळता, अन्य जवळजवळ सर्व कथांतील राजपुत्रांचे चित्रण भूमिकापात्राचेच (Dramatis Personae) आहे. मराठी लोककथांतील राजपुत्रांची दोन्ही भूमिकास्वरूपे (आवडतीचा व नावडतीचा) समाजमानसाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकतात. मोठ्या राजपुत्राचे कर्तृत्वशून्य व्यक्तिमत्व राजेशाहीच्या वंशपरंपरागततेचे असमाधान प्रकट करीत असावे. अंगात कर्तृत्व असो वा नसो, केवळ राजकुलात ज्येष्ठत्वाचा जन्म लाभल्याने विनासायास मिळणारे राजपद व सत्ता हे एकूण समाजजीवनाला विनाशाप्रत नेणारे

ठरल्याची अनेक उदाहरणे इतिहासात सापडतील. केवळ योग्य वारस न मिळाल्याने मोठमोठी राज्ये लयास गेलेली आहेत. या अनिष्ट रूढीबद्दलची नापसंती मोठ्या राजपुत्रांना नालायक, भित्रे बनविण्यात होत असावी. धाकट्या राजपुत्राला दिलेला अनुकूल कौल हा काव्यगत न्यायाचाच प्रकार मानावा लागेल.

### मराठी लोककथेतील राजकन्या

राजकन्या हा राजपरिवारातील घटक राजा, राणी, राजपुत्र यांच्याइतका महत्त्वाचा आहे की नाही हा मतभेदाचा विषय ठरेल. परंपरेने पुत्र हवाच अशी समजूत रूढ आहे. तशी कन्येबाबत नसल्याने राजपुत्राच्या जन्मासाठी जशी साधना केली जाते, नवस केले जातात तसा हा प्रकार राजकन्येबाबत मुळीच आढळत नाही. लोककथांतील राजकन्येचा जन्म हा नैसर्गिकपणेच झालेला दिसतो. तिच्या जन्माबाबत नवलकथा सहसा आढळत नाहीत. तथापि लोककथांनी संकेतबद्ध केलेली राजकन्येची व्यक्तिरेखा ही बरीच आकर्षक आणि मुख्यत: राजपुत्रापेक्षा नेहमी प्रभावी स्वरूपाची असते. तिच्या जीवनाबद्दलचे बरेचसे संकेत राजा, राणी, राजपुत्र यांच्या विवेचनातून प्रकट झालेले आहेत. राजपुत्राप्रमाणेच तिचेही जीवन संघर्षमय असते. किंबहुना बरीचशी संकटे बहीणभावंडे जोडीनेच झेलत असतात. या संकटांच्या वाटा अनेक असतात.

### सापत्नपणाचा जाच

राजकन्या ही राजपुत्रासारखी राज्याचा भावी वारस नव्हे तथापि सापत्न-भावाच्या चक्रात तीही कधी भावाबरोबर तर कधी एकटी भरडली जाते. उदा.

१) मातृहीन राजकन्या – सावत्र आई रानात गुरे वळायाला पाठवी — शंकराकडून काठी मिळाली – ती फिरवताच काळी कपिला येऊन दूध देई – सावत्र आईने गाय मारून टाकली – नंतर विहिरीतून पक्वान्ने मिळू लागली – ती विहीरही बुजविली गेली. (पुष्प १ – कथा ४१)

२) जन्मत: गंगेवर फेकली गेलेली राजकन्या भावाबरोबर ब्राह्मणघरी वाढली. नशिबी भिक्षाटन (पुष्प १ – कथा ४२)

### पित्याच्या अहंकाराचा बळी

राजाला स्वत:च्या नशिबाचा असणारा अहंकार हा धाकट्या मानी राज-कन्येला जाचक ठरतो. याचा उल्लेख मागे केलेला आहेच. तिची सत्त्वपरीक्षा घेण्याची राजाची वृत्ती त्याच्या अहंमन्यतेला साजेशीच आहे. तिची नेसत्या वस्त्रानिशी पाठवणी होते. माहेरचे सुख मिळत नाही. उदा. –

१) मानी राजकन्येचा एका वनवासी, दरिद्री व पांगळ्या मुलाशी विवाह-
( अप्रसिध्द कथा )

२) मानी राजकन्येचा एका गरीब मुलाशी विवाह (सांगीवांगी कथा ८, मराठवाड्यातील लोककथा – १०)

३) पोटात सर्पाची वस्ती असणाऱ्या वाटसरूशी विवाह (दाते २ – कथा १०)

**सावत्र व मोठ्या बहिणींची आईवडिलांना साथ**

सावत्र आई आणि पिता यांच्यांकडून होणाऱ्या जाचात राजकन्येची सावत्र बहीण किंवा मोठ्या बहिणी यांचा मोठाच हातभार लागतो. राजकन्येला मिळ–णाऱ्या रानातील सुविधांची माहिती सावत्र बहीणच आईला देते. राजकन्येच्या मोठ्या बहिणी पित्याच्या नशिबाची थोरवी मान्य करतात, त्यामुळे ते अमान्य करणाऱ्या धाकटीवर राजा जास्त संतापतो. मराठी लोककथांत अशी उदाहरणे विपुल आढळतात.

**विवाहासाठी पणांची नियुक्ती**

पित्याच्या पराक्रमशून्यतेमुळे आणि निष्क्रीयतेमुळे राजकन्येचा पण लावून राज्यावरील संकट दूर केले जाते याचा उल्लेख केलेला आहेच. अर्थात या पणांच्या पूर्ततेतून राजकन्येच्या आयुष्याचे नेहमीच नुकसान होते असे म्हणता येणार नाही. बऱ्याच पणांच्या पूर्ततेतून राजकन्येला बहुधा योग्य पती मिळतो. तथापि काही पणांमुळे मात्र तिचे जीवन उध्वस्त होऊन जाते. उदा. –

१) मुठीतला क्षुद्र किडा ओळखायचा. (अप्रसिध्द कथा) राक्षस पती मिळाला.

२) दहीभाताचे झाड ओळखायचे. (पुष्प १–कथा ३४) भिकारी पती मिळाला.

३) मळाचे झाड ओळखायचे. (मराठवाड्यातील लोककथा – कथा २) वाघ पती मिळाला.

**भावापेक्षा प्रभावी व्यक्तिमत्व**

सावत्र आईमुळे जी संकटे राजसंततीच्या वाट्यास येतात त्यांचे निवारण करताना राजकन्येचे व्यक्तिमत्व प्रभावी ठरते हाही एक संकेत लोककथांत दिसून येतो. त्याचीही उदाहरणे मराठी लोककथांत आढळतात. उदा. –

१) परित्यक्त राजसंततीला प्रथम कुंभाराकडे व नंतर माळ्याकडे आश्रय – तोही दुरावला – भिक्षाटन नशिबी – सावत्र आईने भिक्षेत विषारी लाडू घातले. पण राजकन्या १०० भावांपेक्षा अधिक हुषार – तिने ते लाडू खाऊ दिले नाहीत. (पुष्प ४ – कथा २)

२) परित्यक्त राजसंतती माळ्याकडे आश्रित – मुले एकदा राजाच्या दृष्टीस पडली – राजाला मुलांबद्दल ओढ – राजपुत्रांना त्याच्याकडे जाण्याचा मोह – त्यांनी राजवाड्यात जाऊ नये असा राजकन्येचा सल्ला – नवीन घरासाठी गाणारे पाखरू, बोलणारे झाड व सोनेरी पाणी आणताना मागे वळून न पाहण्याचा नियम मोडल्यामुळे दोन्ही भाऊ शिळारूप – राजकन्येने सर्व संकटे पार करून संयमाने त्या वस्तू हस्तगत केल्या. भावांना पाणी शिंपडून मानवरूपांत परत आणले. सर्व वस्तू घरात आल्यावर राजालाच घरी बोलावले. बोलणाऱ्या पाखराकडून राजाला सत्यकथन – सर्वांचे पुनर्मीलन. (राजविलाशी केवडा – कथा १)

## दुर्दैवाचा पूर्ण निरास

राजपुत्राप्रमाणेच राजकन्येवरील संकटांचाही पूर्ण निरास होतो. सावत्र आईच्या जाचातून बहुधा दैवी मदतीने सुटका होते, पित्याशी पुनर्भेट होते व बरेच वेळा एखाद्या राजपुत्राशी विवाहही होतो. पित्याने मुद्दाम शोधलेल्या रोगी पतीचा रोग नष्ट होतो, दारिद्र्य फिटते व पुन्हा राजवैभव प्राप्त होते. राजकन्येसाठी लावलेले अशक्यप्राय पण तर कोणीतरी जिंकतातच, परंतु विक्षिप्त पणांतून नशिबी आलेले दुर्दैवी वैवाहिक जीवनही शेवटी सुखी होते.

अशा तऱ्हेने मराठी लोककथांतील राजकन्येचे चित्रणही पारंपरिक संकेतांचे पालन करणारे असल्यामुळे तिची व्यक्तिरेखा भूमिकापात्रस्वरूपाची आहे असे म्हणता येईल. तथापि ती पूर्णतयाभूमिकास्वरूप नाही. कारण तिच्या व्यक्तिमत्वाचे अन्य विशेष इतर काही कथांतून बघावयास मिळतात.

## दुर्दैवाची वेगळी रूपे

राजकन्येच्या दुर्दैवाची सर्वसाधारणपणे पुढील रूपे मराठी लोककथांत आढळतात.

१) राजकन्येचा राजपुत्राशी विवाह – त्याच्याजवळच्या धारदार शस्त्राने ती चुकून मरण पावली. (अप्रसिध्द कथा)

२) एका राजकन्येचा पती रोज रात्री नाहीसा व्हावयाचा – परिणामतः तिचा रोज नवीन तरुणाशी विवाह. (अप्रसिध्द कथा)

३) मानवी राक्षसाकडून राजवाड्यातील सर्व माणसांचे दगडी पुतळे – त्यांत तीन एकसारख्या राजकन्या. (पुष्प १ – कथा ५)

४) चोरट्या माळीपुत्राकडून मोहिनीग्रस्त राजकन्येचा उपभोग. (अप्रसिध्द कथा)

५) राजकन्या राक्षसाकडून, चोराकडून पळविली जाते. अन्य तऱ्हेने येणाऱ्या संकटांचाही निरास हा होतोच.



मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. ३२२८
निबंध २५ ७२५
२ ५५५८

## राजकन्येच्या स्वभावाचे अन्य विशेष

राजकन्येच्या स्वभावाचे विविध विशेष मराठी लोककथांतून दिसून येतात. लोककथांतील राजकन्या मानी करारी, विवाहपण लावणारी, प्रभावी व्यक्तिमत्व असलेली तरीही कधी कधी दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडलेली आढळते. चातुर्य, गुणग्राहकता, विक्षिप्तपणा, कपटीपणा इत्यादी विविध विशेष राजकन्येच्या अंगी दर्शविणाऱ्या पुढील कथा महाराष्ट्रात प्रचलित असल्याचे दिसते.

### १) चातुर्य

१) आपला विवाहपण जिंकणाराशीच आपला विवाह व्हावा, अन्य कुणी ते श्रेय उपटू नये म्हणून जेत्याच्या शरिरावर किंचितशी जखम करून ठेवली. (अप्रसिध्द कथा)

२) राजकन्येचा नियोजित पती अंध - विवाहाच्या वेळी दुसराच डोळस मुलगा उभा केला – लग्नानंतर त्याला तिने दूधभात जेवावयास घातला – सासरी जाताना तो मुलगा निघून गेला – सासरी राजकन्येने अंध पतीला नाकारले – दूधभाताच्या खुणेवरून पती शोधून काढला. (अप्रसिध्द कथा)

### २) राजकन्येची गुणग्राहकता व कलाप्रेम

१) प्रश्नांची योग्य उत्तरे देणाराशी विवाह करण्याची राजकन्येची अट. (तीर्थांचे सागर - कथा ६)

२) उत्तम गाणाऱ्याशी विवाह हवा. (पुष्प २ – कथा ५)

३) आपल्या गाण्यामुळे दिवे लागणाऱ्या, पाऊस पाडणाऱ्या तुंड्याभुंड्या विक्रमराजाशी विवाह करणारी राजकन्या. (सांगीवांगी – कथा १९)

### ३) कपटीपणा

१) विवाहपण जिंकला जाऊनही विवाह करण्यास राजी न होणारी राजकन्या एका कथेत आढळते.

### ४) रागीटपणा

१) आपल्या स्वयंपाकी भटजी हाच आपला भावी पती हे कळल्यावर त्याच्या डोक्यात भांडे फेकून त्याला हाकलून देणारी राजकन्या (पुष्प २–कथा १)

### ५) विक्षिप्तपणा

१) पुरुषदर्शन वर्ज्य करणारी राजकन्या. (एक होता राजा – कथा ४)

२) एकच पती हवा असलेल्या सात बहिणी. (पुष्प ४ - कथा २)

३) सोनेरी केसांचा पती हवा. (दाते २ – कथा ४)

निष्कर्ष असा की मराठी लोककथांतील राजकन्येचे चित्रण बहुतांशी भूमिका-पात्रस्वरूपाचे (Dramatis Prsonae) आहे, तरीही तिच्या व्यक्तिमत्वाचे अन्य पैलूही काही कथांत प्रकट होतात. राजकन्येला कर्तृत्वपूर्ण व्यक्तिमत्व प्रदान करण्यातही काव्यगत न्यायाचाच पाठपुरावा केलेला आढळतो. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीच्या गुणांचा बळी जातो. ती कर्तृत्ववान, गुणी असूनही बरेच वेळा तिचे गुण मातीमोल ठरतात. कुठलेच स्वातंत्र्य तिला नसते. नावडत्या राणीप्रमाणेच राजकन्येविषयीची सहानुभूती तिला अधिक गुणवान बनवून, यशस्वी करून व्यक्त होत असावी.

### मराठी लोककथांतील प्रधानाची दुहेरी भूमिका

प्रत्यक्ष राजपरिवारातील नव्हे, परंतु राजपरिवारात व राजवाड्यात सदैव वावरणारी व्यक्ती म्हणजे प्रधान होय. राजा राज्याचा स्वामी असला तरी राजकारणाची सूत्रे बरीचशी प्रधानाच्याच हातात असतात. मराठी लोककथांतील प्रधानाची व्यक्तिरेखा त्याच्या स्वभावाचे दुहेरी स्वरूप प्रकट करते. कुठे तो राजाचा नम्र सेवक आहे तर कधी त्याने राजाला संकटात टाकले आहे.

### प्रधानाची सुष्ट भूमिका

मराठी लोककथांत कधीकधी प्रधान कर्तव्यदक्ष, नम्र, सुस्वभावी असा चितारलेला आढळतो. पुढील उदाहरणांत प्रधानाच्या सुष्ट रूपाचे दर्शन घडते. जसे – १) शिकार साधल्याशिवाय न परतणाऱ्या राजाला 'पुरुषदर्शन वर्ज्य' करणाऱ्या राजकन्येची शिकार करावयाची होती; राजाला प्रधानाचे सर्वतोपरी साहृय - साधूचे सोंग घेऊन 'स्त्रीदर्शन' वर्ज्य करणाऱ्या राजाच्या शिष्य प्रधानाने वठवले. (एक होता राजा – कथा ५)

२) राज्याची वेषांतरीत रूपाने पाहणी करून, राजा पुत्रहीन म्हणून प्रजा कशी नाराज आहे याबद्दल राजाला माहिती देऊन त्याला पुत्रप्राप्तीसाठी तप करण्यास उद्युक्त केले. (एक होता राजा – कथा ७)

३) राजपुत्र मेघश्याम रोज कुठेतरी निघून जाई – प्राधानाने पाळत ठेवून छडा लावला – राजपुत्र एका खाणावळवाल्या मुलीच्या नादी लागलेला – तिच्या पाशातून सोडविण्यासाठी त्याचा लवकरात लवकर विवाह करणे जरून असा सल्ला. (वैजयंती – कथा १५)

४) राजाचा आठवा विवाह – पहिल्या सात राण्यांना देहदंडाची शिक्षा – प्रधानाने मारेकऱ्यांना लाल देऊन वश केले – राण्यांना जीवदान – नुसते रानात सोडून दिले. (दाते २ – कथा ७)

### प्रधानाची दुष्ट भूमिका

दुष्ट प्रधानाचे चित्रणही मराठी लोककथांत आढळते मत्सरी, राज्यलोभी, धनलोभी असे प्रधानाचे चित्र काही लोककथांत दिसून येते. जसे –

१) जगदेवच्या सावत्र आईचे व प्रधानाचे चोरटे संबंध – जगदेव व सावत्र आई यांचे परस्परांवर खूप प्रेम होते पण प्रधानाने राणीच्या मनात जगदेवाबद्दल द्वेष निर्माण केला – त्याला हद्दपार करवले. मारेकरी मागे पाठविले. (एक होता राजा – कथा १)

२) राजपुत्राच्या वनवासात हरिणीची तरुणीरूपाने साथ – राजपुत्र एका राजदरबारी चाकरीस – प्रधानाने राजाला सुंदर हरणावंतीबद्दल सांगितले – प्रधानाच्या चिथावणीमुळे हरणावंतीच्या प्राप्तीसाठी राजाने राजपुत्राला अवघड कामे सांगावयास सुरुवात केली. (एक होता राजा – कथा ४)

३) राणीवर पाळत ठेवण्यासाठी प्रधानाला राणीच्या माहेरी पाठवले गेले– राणीचे माहेरच्या प्रधानाशी चोरटे संबंध – पैशाच्या लालचीने प्रधानाने राणीचा व्यभिचार गुप्त ठेवून धन्याला फसवले.

४) योग्याने दिलेल्या सुवर्णहारामुळे राजाला राज्यप्राप्ती – तो हार सतत राजपुत्राच्या गळयात ठेवणे आवश्यक – हार काढला तर राजपुत्राचा मृत्यू – राजाचा देहांत – प्रधानाला राज्याचा लोभ– हाराचे रहस्य त्याला ज्ञात – राजपुत्र झोपल्यावर त्याचा हार काढून घेतला. राजपुत्र मृत. (वैजयंती – कथा १२)

### प्रधानाचे वेगळे दर्शन

प्रधानाच्या सुष्ट व दुष्ट रूपांपेक्षा निराळेच असे दर्शन एका कथेत होते.

राजात व प्रधानात वाद – 'मुलगा प्रिय की जीव प्रिय?' राजाचे मत, 'मुलगा प्रिय', प्रधानाचे मत, 'जीव प्रिय' प्रधान माघार घेईना – त्याला काढून टाकले – प्रधानाने माठाच्या भाजीचा लांब देठ शिजवून मळ केला व सापाप्रमाणे वेटोळे करून झोपलेल्या राजपुत्राच्या छातीवर ठेवला. सापाच्या भीतीने राजा व व इतर कोणीच उचलेना – प्रधानाला पाचारण – त्याने खिशातून मेलेला साप आणला होता. त्याने राजपुत्राजवळ जाऊन देठ खिशात टाकला व साप दूर फेकून दिला. त्याचे मत राजाने मानले. (तिर्थांचे सागर – कथा ८).

प्रधानाचा आत्मविश्वास व चातुर्य दर्शविणाऱ्या या कथेचा अपवाद वगळता मराठी लोककथांतील प्रधानाचे चित्रण दुहेरी भूमिकास्वरूप प्रकट करते.

### मराठी लोककथांतील दासींची दुष्ट भूमिका

मराठी लोककथांत राजपरिवाराचे प्राबल्य असल्यामुळे त्यांच्या कथाभागांत

दासीचा प्रवेश मधून-मधून होत असतो. या कथांतील दासीचे स्वरूप पूर्णतया भूमिकापात्राचे असून दुष्ट कार्यात मदतीचा हात देणारीची भूमिका ती पार पाडताना आढळते. उदा. —

१) नावडत्या राणीचा चंद्रहार पळविण्याचे काम आवडत्या राणीच्या दासीने केले. नावडती तो हार स्नानग्रहात विसरली असता तिने तो हस्तगत केला.

२) नावडतीची मुले जन्मतःच पळवून नेण्यास आवडतीस मदत केली.

३) धाकटया राणीची मुले दासीने इतर सहा राण्यांच्या साक्षीने झाडाखाली व गंगेवर नेऊन टाकली. (पुष्प १ – कथा ४२)

४) जगदेवाच्या सावत्र आईला त्याच्यावर मात्रागमनाचा आळ घेऊन हद्दपार करावयाचे होते. राजाजवळ तिची तक्रार – राजाला पटेना – राणीने दासीच्या मदतीने तो आळ सिद्ध करण्याचा देखावा करण्यास यश मिळविले. जगदेवाचा रोज दोन्ही मातांचे दर्शन घेण्याचा नेम – एके दिवशी दासीने त्याला राणीच्या दारा-जवळच अडवले – 'स्त्रियांखेरीज इतरांना बंदी' असा दासीचा बहाणा – आत जावे तर आईची आज्ञा मोडते, न जावे तर नेम मोडतो – दासीने पढवल्यानुसार त्याला सुचविले, 'स्त्रीवेष घेऊन जा' – जगदेव स्त्रीवेषाने महालात – राजा प्रचीतीसाठी तेथे हजर होताच – जगदेवावरचा आळ शाबीत. (एक होता राजा – कथा ३)

५) सोनेरी केसांची राजकन्या व कोळीपुत्र यांचा विवाह – तिच्यावर दुसऱ्या एका राजपुत्राची दृष्टी – त्याने आपल्या दासीला तिच्याकडे पाठविले. दासीने तिच्या आत्याचे सोंग वठविले. राजकन्येची मर्जी संपादन केली. ती रोज राजकन्येला पढवी, 'तुझ्या पतीचे मरण कशात आहे हे तुला माहित हवे.' राज-कन्येने पतीजवळ सारखा तगादा लावून त्याच्या मरणवस्तूची माहिती काढून आत्यालाही सांगून ठेवली. त्या माहितीनुसार राजपुत्राने कोळीपुत्राचा प्राण घ्यायचा प्रयत्न केला. (सांगीवांगी – कथा)

**अपवादस्वरूप दासी**

एका कथेत दासीने माणुसकीची जाणीव मालकिणीला करून दिलेली आहे.

हद्दपार झाल्यावर जगदेव सासुरवाडीला निघाला – वाटेत बहिणीचे घर – त्याची दीन अवस्था पाहून बहीण घरातही बोलावेना – दासीला सांगितले, 'त्याला निघून जायला सांग'. परंतु दासीला हे पटेना – तिने मालकिणीला समजावले – बहिणीने पत्रावळीवर अन्न वाढून त्याला बाहेर नेऊन पोचवायचे औदार्य दाखविले घरात त्यावेळी पुत्रजन्मोत्सव चालू होता. (एक होता राजा – कथा ३) एवढा अपवाद वगळता मराठी लोककथांतील दासीचे स्वरूप पूर्णतया भूमिकापात्राचे आहे. तिची विघ्नसंतोषी वृत्ती स्वाभाविकच मंथरा दासीची आठवण करून देते.

## मराठी लोककथांतील सामान्य माणसांचे चित्रण

मराठी लोककथांत सामान्य माणसांचे प्रतिनिधी आढळतात याचा उल्लेख केलेला आहेच. समाजातील या विविध व्यवसायी माणसांची स्वभाववैशिष्टये त्यांच्या चित्रणातून समजू शकतात. त्या सर्वांच्या स्वभावविशेषांची ओळख करून घेणे येथे प्रस्तुत ठरले असते तथापि त्यांच्या स्वभाववैशिष्टयांतून समाजातील समूहगटांची परस्परमते प्रामुख्याने प्रकट होत असल्याने त्यांचा परामर्श समाजदर्शनाच्या प्रकरणात घेणे अधिक औचित्यपूर्ण ठरेल म्हणून त्या प्रकरणात त्यांचा परामर्श घेतलेला आहे. तसेच कौटुंबिक जीवनात जी जी पात्रे परस्परप्रभावी ठरून कुटुंबांतील सुखदुःखास कारणीभूत होतात त्यांच्याही स्वभावविशेषांचा परिचय त्याच प्रकरणात करवून देण्यात आला आहे. येथे निर्देश एवढाच करावयाचा की या सर्वसामान्य माणसांच्या चित्रणांतूनही दरिद्री ब्राह्मण, लोभी सावकार, खाष्ट सासू, खाष्ट वा केविलवाणी सून, अनुदार भावजय, कृतघ्न मुले असे सांकेतिक नमुनेच जास्त आढळतात. मात्र त्यांच्या स्वभावाची दुसरी बाजूही पूर्णपणे दुर्लक्षित केलेली नाही.

## काही कथांतून व्यक्तिमत्वविकासाचे दर्शन

मराठी लोककथांतील बहुसंख्य पात्रे भूमिकास्वरूप असतात. त्यांचे चित्रण सांकेतिक असते आणि त्यांच्यांत व्यक्तिमत्वविकास नसतो हे आपण पाहिले. तथापि काही लोककथांत व्यक्तिमत्वविकासाची लक्षणे दिसून येतात. क्वचित मानसिक आंदोलनांचे चित्रण दिसते. उदा.–

१) कुरूप राजपुत्र – कुरूपतेमुळे वैवाहिक सौख्य मिळणार नाही याची त्याला जाणीव – त्याला वैवाहिक सौख्य मिळावे अशी राजाची खूप इच्छा – एका राजकन्येशी विवाह – लग्नानंतर सहा महिने त्याने पत्नीला तोंडच दाखवले नाही – त्याच्या अपेक्षेप्रमाणे त्याचे मुखावलोकन होताच पत्नी नाराज होऊन माहेरी निघून गेली – राजपुत्राचे सासुरवाडीच्या गावी प्रयाण – हलकीसलकी कामे करून निर्वाह – आपल्या पराक्रमाने सासऱ्याचे मन जिंकले – आपल्या कलेने पत्नीची करमणूक – तिचे मन पालटले.

२) देवरा व आणलदे यांचे परस्परप्रेम – परंतु आणलदे हिचा विवाह ढोलवा याच्याशी – पत्नीचे विवाहपूर्व प्रेम ढोलवाला समजले – तिच्यावर जबर–दस्ती न करता तिला बहीण मानले – देवराकडे तिला पोचते केले. (वैजयंती – कथा २)

३) ध्यानसिंग डाकू – पूर्वसूचना देऊन गावावर दरोडा घाली – एका गावाला सूचना – बायजाबाई म्हातारीची मुले – डोंगरात जाण्याचे ठरविले –

प्रत्येकाच्या हाती पोर व गाठोडे – म्हातारीला हात द्यायलाही कोणी रिकामे नाही- बायजाबाईचा बहाणा, 'मला म्हातारीला कशाची भीती – रहाते मी एकटीच', मुलांना बरेच वाटले – तिला एकटीला घरी सोडून सर्वजण गेले – ध्यानसिंग म्हातारीच्या घरी – म्हातारीने आंधळ्याबहिऱ्याचे सोंग घेतले – ध्यानसिंगाला म्हणाली, 'मी तुझ्या आईसारखी, तुझ्या तोंडावरून हात फिरवू दे.' ध्यानसिंगाने खरेच हात फिरवून घेतला व तो तिला त्रास न देता गेला – म्हातारीने बिब्याच्या तेलाचा हात फिरविल्याने तेल उतले – त्या खुणेवरून म्हातारीने त्याला पकडून दिले – राजासमोर उभे केले – मुले घरी परत आली होती. आता त्यांना म्हातारीला राजाकडून मिळणाऱ्या इनामाची हाव सुटली – ध्यानसिंगाला फाशीची सजा – म्हातारीला राजाने हवे ते द्यायची तयारी दाखविली – म्हातारी काहीच मागेना म्हणून मुलांचा संताप – ध्यानसिंगाची शेवटची इच्छा म्हातारीच्या पाया पडायची – पाया पडताना म्हणाला, 'काल, तू मला मुलगा मानलेस आणि आज फासावर कसे चढवतेस ? म्हातारीची राजाकडे मागणी, 'ध्यानसिंगाला सोडा व सैन्यात नोकरी द्या – मला काही नको' – मुले निराश. (खानदेशी लोककथा – कथा ६)

अशा काही लोककथांतून सांकेतिक बंधन चांगलेच शिथिल झालेले आढळते आणि व्यक्तिमत्वविकासाची व पात्रांच्या मानसिक आंदोलनांची चुणूक अनुभवास येते.

**मराठी लोककथांतील प्राणिपात्रांचे चित्रण**

प्राणीकथांतील प्राणी व अन्य लोककथांतील प्राणी असे प्राण्यांचे दोन प्रकार लोककथांत करावे लागतात. प्राणीकथांतील प्राण्यांच्या स्वभावविशेषांचा सोदाहरण परिचय तत्संबंधित प्रकरणात करवून दिला जाईल. मात्र त्यांच्या चित्रणातही लबाड कोल्हा, मूर्ख वाघ अशा तऱ्हेची सांकेतिकताच जास्त आढळते एवढे येथे नमूद केले पाहिजे.

अन्य प्रकाराच्या लोककथांत प्राण्यांचे अस्तित्व प्रचुर प्रमाणात आहे असे दिसते. लोकपरंपरेची प्राण्याच्या मानुषीकरणाची व बऱ्याच प्रसंगी अतिमानुषी-करणाची प्रबळ प्रवृत्ती त्यांच्या चित्रणात प्रकर्षाने आढळते. हे प्राणी माणसासारखे बोलतात, वागतात. अतिमानुषीकरणामुळे त्यांच्या अंगी अतिमानवी शक्ती वसत असते. मराठी लोककथांतील अशा प्राण्यांचे चित्रण अजमावल्यास त्यांचे स्वरूप पूर्णतया भूमिकापात्रांचे आहे असे दिसते आणि 'मदतनीस' एवढी एकच भूमिका ते पार पाडताना आढळतात. पुढील उदाहरणांवरून हे स्पष्ट होईल.

१) एका राक्षसाने राजपुत्राला वाघिणीचे दूध आणावयास पाठविले. योगायोगाने राजपुत्राने वाघिणीची संकटात सापडलेली पिलं वाचवली. वाघिणीने स्वखुषीने दूध दिले. नंतर त्या दुष्ट राक्षसाच्या मामाला कैद करण्यास मदत केली. (पुष्प १ – कथा ४५)

२) सावत्र आईच्या छळाला कंटाळून राजपुत्राचा कपिलेच्या साह्याने गृहत्याग – रानात वनगाईची सेवा – त्यांच्या दुधावर प्रतिपाळ – वनगाईनी त्याला सुखाचा व दु:खाचा असे दोन पावे दिले. दु:खाचा पावा वाजविला की त्या धावून येत. (दाते २ – कथा १०)

३) भाषाज्ञान व मनुष्यवाणी असलेल्या पोपटाने आपल्या धनी शेतकऱ्याला देवावर मात करण्यास मदत केली. शेतकरी व देव यांच्यात अर्ध्या पिकाचा करार – शेतकरी चतुरपणाने देवाला फसवी व सर्व पीक आपणच घेई – देवाची पावसाला आज्ञा, 'पडू नकोस, पडलास तर फक्त डोंगरावरच पड.' पोपटाने हे ऐकून शेतकऱ्याला सांगितले – शेतकऱ्याने डोंगरावरच पीक काढले – वाऱ्याचा व देवाचा कटही पोपटाने उधळला. (पुष्प ४ – कथा ३)

४) सुलकावतीचा पती विवाहानंतर १२ वर्षे वंजेला गेला – सुलकावती पतीभेटीसाठी झुरत होती – तिकडे पती नीळकंठही उदास – त्यांची व्यथा गरूड – पक्ष्यांनी जाणली – त्यांनी नीळकंठाला रोज आपल्या पंखांवरून पत्नीच्या महालात आणावे व दिवस उजाडण्यापूर्वी पुन्हा घेऊन जावे. (सासुरवास – कथा ५)

५) अतिशय छोटचा बांध्याच्या पुंटाक्का या मुलीचे एका पोपटाने, तिला बहीण मानून, अनेक प्राणिपक्ष्यांपासून व एका राक्षसापासून संरक्षण केले व शेवटी तिचा विवाह घडवून आणला. (सांगीवांगी – कथा १५)

**अपवादस्वरूप परपीडन**

मराठी लोककथांतील प्राण्यांचे चित्रण सांकेतिक स्वरूपाचेच आहे. काही कथांतील मदतनिसाच्या स्वरूपांत दिसतात. असे असले तरी कधी कधी प्राणी काहीही कारण नसताना छळ करतानाही काही कथांतून आढळतात. जसे –

१) सर्प वणव्यात सापडला – वाटसरूने वाचवले – थंडावण्यासाठी थोडा वेळ पोटात जागा दिली – पण तो बाहेर पडेचना – वाटसरू तहानभुकेने व्याकूळ - जे जे खावे वा प्यावे ते सर्पानेच गिळंकृत करावे. (दाते १ – कथा १०)

२) पाताळराजाची कन्या कानसीपात्रा हिला हत्तीच्या कळपाने पळविले व हत्तिणीच्या कानात ठेवले. (एक होता राजा – कथा १०)

अशी आपवादभूत उदाहरणे सोडली तर मराठी लोककथांतील प्राण्यांचे मदत-निसाचे भूमिकास्वरूप अन्य उदाहरणांतून उत्तम तऱ्हेने प्रतीत होते.

**मराठी लोककथांतील वनस्पतीसृष्टीचे चित्रण**

मराठी लोककथांत वनस्पतीसृष्टीचे प्रतिनिधित्व अगदी अत्यल्प आहे. प्राणी-सृष्टीच्या तुलनेने वनस्पतिसृष्टी फारच मर्यादित आहे. प्राण्यांप्रमाणेच वनस्पती-सृष्टीचेही मानुषीकरण वा अतिमानुषीकरणही केले जाते. ही झाडे उड्डाण करतात, बोलतात, आपोआप दुभंगतात, मिटतात, जादूच्या वस्तू देतात. मराठी लोककथां-तील वनस्पतीसृष्टीचे मोजके प्रतिनिधी मदतनिसाचीच भूमिका करताना दिसतात.

जसे – १) गोसाव्याचा मुलाला आशीर्वाद, 'राजाचा जावई होशील' – मुलगा आंबे तोडायला झाडावर – झाड ब्राह्मणपुत्रासह उडाले व दुसऱ्या राज्यात जाऊन थांबले – तेथे एका आंधळ्या राजपुत्राऐवजी भाड्याचा नवरा म्हणून त्याला उभे करण्यात आले – विवाहसमारंभानंतर वऱ्हाड त्याच झाडाखाली थांबले असता झाड त्याच्यासह पूर्वस्थळी परत – कालांतराने पत्नीची पुनर्भेट. (अप्रसिद्ध कथा)

२) आत्महत्येस निघालेल्या राणीने तुळशीला व मोसंबीच्या झाडास पाणी घातले. त्यानी तिला अनुक्रमे जादूची अंगठी व पिशवी दिली – श्रीमंती प्राप्त – राजाची गैरमर्जी संपली. (अप्रसिद्ध कथा)

३) राजकन्येच्या दहीभाताचा हात धुण्यामुळे तयार झालेले झाड भिकाऱ्याने ओळखले – राजकन्येला वर नापसंत – पळत सुटली – एका बोलणाऱ्या झाडाने आपोआप दुभंगून तिला आत घेतले, योग्य वेळी पुन्हा बाहेर सोडले. (पुष्प १ – कथा ३४)

अशा तऱ्हेने मराठी लोककथांतील वनस्पतिसृष्टीचे चित्रण एकाच भूमिका-स्वरूपाचे आहे. लोकमानसातून निर्माण होणाऱ्या मराठी लोककथांतील पात्र-निर्मितीमधून लोकमानसाची अनेक वैशिष्टये उत्तम तऱ्हेने प्रतीत होतात.

सर्वसाधारणपणे पुढील विशेष दिसतात.

१) देवदेवता आणि राक्षसादी योनी यांच्या चित्रणातून लोकमानसाने परंपरेचा यथायोग्य आदर केलेला आढळतो. देवदेवतांबद्दल माणसाला जी श्रद्धा, आदर व विश्वास वाटतो त्यांना धक्का बसेल असे कोणतेही चित्रण मराठी लोककथांत आढळत नाही. देवदेवतांबद्दलची ही श्रद्धा त्यांच्या मंगलमय जगकल्याण-कारक चित्रणातून वर्धिष्णु होण्यास मदतच होते. राक्षसादी योनीचे दुहेरी स्वरूपही आपल्या पुराणपरंपरेशी नाते जोडणारे आहे. पौराणिक वाङ्मयात दुष्ट राक्षसांची विपुलता तर आहेच तथापि कौरव-पांडव-युद्धात पांडवांना मदत करणारा घटोत्कच,

अन्यायी रावणाच्या राज्यातून न्यायी राजाच्या आश्रयाला आलेला बिभीषण असे काही राक्षसीवृत्तीचा त्याग करणारे राक्षसही आहेत. तसेच रामावर मोहित झालेली अहिरावणपत्नी, भीमाशी लग्न करणारी हिडिंबा यांच्या कथांतून दिसणारा राक्षसी मनातील प्रेमाचा धागा लोककथांनीही जतन केलेला आढळतो.

२) राजाच्या अतिसामान्य चित्रणातून जुलुमी राजेशाहीबद्दलची व मोठ्या राजपुत्राच्या कर्तृत्वशून्य चित्रणातून राजसत्तेच्या वंशपरंपरागततेबद्दलची लोक–मानसात सुप्त रूपाने दडलेली चीड, असंतोष प्रगट होतो.

३) पीडकाबद्दल राग, पीडिताबद्दल सहानुभूती व तदनुषंगाने येणारा काव्यगत न्याय हे लोकमानसाचे वैशिष्टय आवडती, नावडती राणी, ज्येष्ठ कनिष्ठ राजपुत्र, गुणी राजकन्या यांच्या चित्रणांतून दिसून येते.

४) वनस्पती आणि प्राणी यांच्या मानुषीकरणातून व अतिमानुषीकरणातून लोककल्पनाशक्तीची ( Falk Fantasy ) प्रभावी प्रेरणा स्पष्टपणे दिसून येते.

लोकमानसाची उपरोक्त सर्व वैशिष्टचे जमेस धरूनही त्याचे वास्तवाचे भानही पूर्णतया सुटलेले नाही ही बाबही लक्षात घेण्याजोगी आहे. सासू–सून, आईवडील अशा विविध कौटुंबिक संबंधांचे कटु आणि कठोर दर्शन जसे लोक–कथांतून घडते तसेच त्यांतील अपवादांची नोंदही घेतलेली आढळते. राजाचे चित्रण सांकेतिक आणि बरेचसे अनादरणीय खरे, तथापि काही सद्‌गुणमंडित राजांची चित्रणेही आहेत. ज्या प्रजाहितदक्ष राजांच्या कर्तृत्वाची फळे समाजाला चाखा–वयास मिळालेली आहेत, त्यांच्याबद्दलचा आदरही लोकमानसात कुठेतरी जागृत असला पाहिजे. बऱ्याच पात्रांच्या अशा अ-सांकेतिक स्वभावविशेषांची दखल घेण्यातून आणि काही पात्रांच्या व्यक्तिमत्वाचा विकास चित्रित करण्यातून लोक-मानसातील वास्तवाचे भान व व्यक्तिवैचित्र्याबद्दलची जाणीव स्पष्टपणे दिसून येते.

भारताच्या इतर प्रांतांतील जी संकलने प्रसिद्ध झाली आहेत त्यांतील लोक–कथांतील पात्रांचे स्वरूपही भूमिका–पात्रांचे ( Dramatis Personae ) आहे असे दिसून येते. ब्लाडीमिर प्रॉप यांनी त्यांच्या लोककथांच्या रचनानुसारी अभ्यास–पद्धतीची मांडणी करताना जगातील परीकथांमध्ये पात्रे भूमिकास्वरूप असल्याचे सप्रमाण दाखवून दिले आहे. देशोदेशींच्या परीकथांचे स्वरूप पाहिल्यावर त्यांच्या प्रतिपादनाची सत्यता पटते. मराठी लोककथांतील पात्रांच्या स्वरूपाची आपण आतापर्यंत चर्चा केली. त्यात दिसून येणाऱ्या उपरिनिर्दिष्ट विशेषांवरून जागतिक पातळीवर लोककथांतील पात्रांच्या स्वरूपात साम्य कसे आढळते हे स्पष्ट होईल. मराठी लोककथांच्या अशा बव्हंशी सांकेतिक पात्रचित्रणांतून त्यांची विश्वात्मकता आता आणखी एक पाऊल पुढे टाकते.

## प्रकरण ६ वे

# मराठी लोककथांतील संकेतपालन

सर्व जगभरच्या लोककथांत विलक्षण साम्य आढळते याचा उलेल्ख मागील सर्व प्रकरणांत केलेला आहे. लोककथांतील या साम्याच्या अनुषंगानेच काही विशिष्ट संकेतही जगभरच्या लोककथांत अपरिहार्यपणे दृढमूल झालेले आढळतात. हे संकेत कोणते आणि त्यांचे पालन मराठी लोककथाही करतात किंवा नाही याचा परामर्श या प्रकरणात घ्यावयाचा आहे.

### लोककथांचा प्रमुख संकेत सुखान्त रूप आणि काव्यगत न्याय

कथा, नाटक, कादंबरी आदी ललित वाङ्मयप्रकारांचा शेवट सुखदायी किंवा दुःखदायी यांपैकी कोणत्याही प्रकारे होऊ शकतो. शोकान्त नाटके (किंवा चित्रपटही) प्रेक्षक का पाहतात, शोकान्त कथा वाचक का वाचतात आणि त्यांतून त्यांना कोणते समाधान मिळते याचे गूढ सामान्य माणसाला पडणे स्वाभाविक आहे. या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्नही टीकाशास्त्रात केलेला आढळतो. तथापि लोककथांच्या बाबतीत हा प्रश्न सहसा उद्‌भवतच नाही कारण कथेचे सुखान्त रूप हा लोककथांचा प्रमुख संकेत आहे. दुःखान्त स्वरूपी कथा अत्यंत कमी प्रमाणात किंबहुना अपवादानेच आढळतात.

### व्यवहारात अप्राप्य असणारी इच्छापूर्ती

सर्वसामान्य माणसांची अशी इच्छा असते की सदाचरणी, सद्‌गुणी, गरीब निर्बल माणसांना सुखानें जगता यावे, त्यांच्यावर संकटे येऊच नयेत आणि आलीच तर ती दूर व्हावीत. त्यांना कुणापासून उपद्रव होऊ नये. प्रत्यक्ष व्यवहारात मात्र असे आढळतेच असे नाही, किंबहुना याच्या उलट प्रकारच अनुभवाला येतो. सुष्ट, दुर्बल माणसे दुष्ट प्रबल शक्तीकडून भरडली जातात. त्यांना न्याय मिळणे बहुधा दुरापास्तच असते. साहित्यिक सृष्टीत मात्र माणसाची ही आंतरिक अतृप्त इच्छा बहुधा पूर्ण केली जाते. ललित वाङ्मयाला सुखकारक शेवटाचे बंधन नसले

तरी बरेच वेळा शेवट तसाच असतो हे सर्वजण जाणतातच. लोककथांनी तर ते जवळ जवळ बंधनच स्वतःवर घालून घेतल्यामुळे इच्छापूर्तीचा भरपूर आनंद त्या श्रोत्यांच्या पदरात टाकतात. जे जे प्रत्यक्षात घडून यावे असे त्याला उत्कटतेने वाटते ते ते सारे या सृष्टीत सहजपणे घडते.

मराठी लोककथांची या संकेताच्या संदर्भात पाहणी केली तर असे आढळते की या संकेताची कास जवळजवळ सर्व मराठी लोककथांनी धरलेली असून दुःखान्त कथा तुलनेने फारच कमी आहेत. त्याचप्रमाणे काव्यगत न्यायाचीही प्रचुर उदाहरणे त्यांत सापडतात. कथांना प्राप्त होणारी ही सुखान्तता विविध प्रकारांनी व मार्गांनी साध्य केली जाते.

**अ) संघर्षात सुष्टांचा जय**

संघर्ष हा एकूण साहित्याचा आत्मा मानला जातो. संघर्षाशिवाय मग तो शारीरिक असो वा मानसिक, कथा संभवतच नाही. मराठी लोककथांतही सुष्ट आणि दुष्ट शक्तींचा संघर्ष प्रकर्षाने दिसून येतो. श्रोत्यांच्या मनात स्वाभाविकच पीडिकाबद्दल राग आणि पीडिताबद्दल सहानुभूती असते. पीडिताचा जय व्हावा असे वाटत असते आणि नेमके तसेच घडते. पीडा निश्चितपणे समाप्त होते. त्यासाठी अशक्यप्राय वाटणारे ते सहजी घडते.

लोककथांत चित्रित होणारा हा संघर्ष कुटुंबबाह्य व कौटुंबिक अशा दोन्ही प्रकारचा असू शकतो. या दोन्ही प्रकारच्या संघर्षांत सुष्टांच्या पदरात अनुकूल दान कसे पडते याची काही प्रातिनिधिक उदाहरणे पुढीलप्रमाणे देता येतील.

**कुटुंबबाह्य संघर्ष**

मराठी लोककथांत कुटुंबबाह्य संघर्षांत अनेक प्रकारचे संघर्ष दिसून येतात. त्यातही पुढील प्रकारच्या संघर्षांचे प्रमाण अधिक आढळते.

१) (राक्षस x माणूस) राजपुत्र बळीवंत हा अंध पित्यासाठी दुधानी तलावाचे पाणी आणण्यास निघाला – बळीवंतावर देवीची कृपा – संकटकाळी सोडवण्याचे देवीचे आश्वासन – वाटेत देवीच्या साह्याने राक्षसीचा वध – पुढे दुधानी तलावावर पहारा करणाऱ्या आणि प्रेमला नामक राजकन्येला पळवून तिला सतत स्वतःच्या खांद्यावर बाळगणाऱ्या सोंड्या राक्षसाशी संघर्ष – प्रेमलेच्या वजनाचा दगड त्याच्या खांद्यावर ठेवून प्रेमलेला सोडवले – सोंड्याचा पाठलाग – बळीवंत व प्रेमला सोंड्याच्या हद्दीबाहेर गेल्याने सोंड्या प्रभावशून्य – वर्षानंतर अजगररूपाने बळी-वंताला गिळण्यास आलेल्या सोंड्याला ठार केले. (एक होता राजा – कथा ७)

२) ( राजा X पोरका राजपुत्र ) एका देवीभक्त राजकन्येचा व एका पोरक्या राजपुत्राचा विवाह – राजपुत्र एका राजाच्या दरबारी नोकरीस – राजपुत्राच्या सुंदर पत्नीची राजाला लालसा – राजपुत्राचा काटा काढण्यासाठी राजाने त्याला एकापाठोपाठ अत्यंत अवघड कामे सांगितली. (लीलावतीस आणणे, हत्तीण व तिचे पिल्लू आणणे, एका रात्रीत बारव खणण वगैरे ) राजपुत्राने देवी, प्रथम पत्नी व द्वितीय पत्नी लीलावंती यांच्या साहचाने राजाच्या सर्व अटी पूर्ण करून सन्मान प्राप्त करून घेतला – राजाची मात्र फजिती झाली ( अप्रसिध्द कथा )

३) ( परकी स्त्री X निरपराध नायिका ) – एका राजपुत्राने एका सिध्द ऋषीच्या मदतीने देवांगना अन्नपूर्णा हिची प्राप्ती करून घेतली. तो तिला घेऊन घरी जात असता, एका दुष्ट चांभार स्त्रीने तिला विहिरीत ढकलून तिचे कपडे, दागिने स्वत: घातले व ती त्याच्याबरोबर राजवाड्यात गेली. अन्नपूर्णा विहिरीत पडताच तिचे फूल बनले. चांभार स्त्रीने ते फूल कुस्करताच तिला माठाच्या भाजीचे रूप प्राप्त झाले. अशी अनेक रूपे तिला प्राप्त होत गेली व शेवटी तिचे पतीशी पुनर्मीलन होऊन दुष्ट चांभार स्त्रीला सात पाट काढून गाढवावर बसवून घालवून देण्यात आले. ( पुष्प ४ - कथा ८ )

४) ( मांत्रिक जादूगार X राजकन्या ) – राजकन्या चंद्रप्रभेचे युवराज विक्रमाशी स्वयंवरण – शूरसेनाची तिच्यावर नजर – त्याचा वऱ्हाडावर हल्ला – शूरसेनाचा मांत्रिक मित्र कुमारील याने चंद्रप्रभेला माणकाच्या फुलात रूपांतरित करून पळवून नेले – कुमारीललाही तिची आशा – शूरसेनाचा काटा काढण्यासाठी त्याने त्या माणकाच्या फुलात भावना निर्माण केल्या – नावडते माणूस जवळ येताच जाळ निर्माण – शूरसेनाचा हात भाजला – कुमारील फुलासह चंद्रप्रभेच्या पतीकडे – तिला पूर्ववत करण्यासाठी अर्ध्या राज्याची मागणी – मागणी मान्य – पतीच्या रक्ताच्या टिळ्याने चंद्रप्रभा पूर्ववत – भस्माने कुमारीलची मंत्रशक्ती नष्ट – हाकलून दिले. ( सांगीवांगी – कथा ४ )

**कौटुंबिक संघर्ष**

एकाच कुटुंबात अनेक माणसे विविध नात्यांनी बध्द होऊन एकत्र राहत असतात. त्यांच्यांत तणाव निर्माण झाले की घरात संघर्ष निर्माण होतो. अशा संघर्षातून अनेक कथा निर्माण झालेल्या आहेत. या संघर्षातही सुष्ट प्रवृत्ती दुष्ट प्रवृत्तीवर विजय मिळवते किंवा संकट नष्ट होते. या संबंधी काही कथा अशा –

१) दारिद्र्याने गांजून लाकूडतोड्याने आपल्या सात मुलांना जंगलात नेऊन सोडले, ती मुले जंगलात एका राक्षसाच्या तावडीत सापडली. परंतु नशिबाने

राक्षस घसरून पडून तलवार छातीत घुसल्याने मरण पावला. राक्षसाला मारल्यामुळे मुलांना राजाची शाबासकी मिळाली. मोठे बक्षीस मिळाले. मुले बक्षिसासह घरी परत आली. (एक होता राजा – कथा १)

२) एकुलत्या एका नणंदेला सात भावजयांनी अवघड कामे सांगितली. (भोके पाडलेले रांजण भर, तेलकट कपडे धू, उखळामुसळाशिवाय राळे कांड वगैरे) बेडूक, बळीपक्षी, चिमण्या यांच्या मदतीने सर्व कामे पूर्ण – भावांच्या स्वप्नात जाऊन सर्व प्रकार कथन – भावांनी स्वतः डोळ्यांनी सर्व प्रकार पाहिला – आपल्या बायकांना मारपीट करून घराबाहेर हाकलून दिले. (राजविलासी केवडा - कथा २)

३) राजाच्या दोन राण्या आवडती व नावडती – तपश्चर्येने शंकर प्रसन्न – पुत्रप्राप्तीसाठी प्रसादफळे दिली – आवडतीने फळ फेकून दिले – नावडतीने खाल्ले नावडती गर्भवती – द्वेषात भर – नावडतीची अर्भके पळवून त्या जागी दगड, केरसुनी अशा वस्तू ठेवल्या – मुले गरिबाघरी वाढली - शेवटी सर्वांचे पुनर्मीलन आवडतीला देहदंड, ( अप्रसिध्द कथा )

### ब) दुर्दैवाचा निरास

काही प्रसंगी कोणाशी (घरच्या वा दारच्या) संघर्ष असतो असे नाही. तथापि दुर्दैवाची मगरमिठी आयुष्याला बसलेली असते. ही मगरमिठी कितीही जबरदस्त वा बळकट असली तरी कथेच्या शेवटी ती सैल होते व पूर्णतः सुटून जाते. काही मराठी लोककथांतून हा कथाविशेष आढळतो. जसे –

१) मूलतः नागराज असलेल्या परंतु राजपुत्ररूपाने एका राजाकडे वाढलेल्या राजपुत्राचा विवाह – पत्नीचा पतीजवळ नाव सांगण्याचा हट्ट – नाव सांगितले तर पुन्हा नागरूप होऊन नागलोकात जावे लागणार म्हणून त्याचा नकार – स्त्रीहट्टापुढे शरणागती – नागलोकी गमन – पत्नी पतीच्या विरहाने दुःखी – कपिला गाईच्या साहयाने तिचे नागलोकी गमन – मोठ्या नागराजाला विनंती करून पतीला मानवस्वरूपात कायमचे घरी परत आणले. ( पुष्प ४ – कथा ३)

२) परमविष्णुभक्त सुशील नामक ब्राह्मण – नैवेद्याने सुवर्ण ताट रोज वर उडे व विष्णूचे भोजन झाले की खाली येई – एकदा ताट उडेना – मीठ घातले की नाही हे पाहण्यासाठी सुनेने (जयंती) भाजी चाखून पाहिली होती – नैवेद्य उष्टा म्हणून ताट उडेना, – सुनेला शिळारूप होण्याचा शाप, – विनवणीमुळे उःशाप, विष्णूच्या करस्पर्शाने उध्दार – सून सरोवरात शिळारूप – प्रेमळ पती विजय याची सरोवराकाठी सूर्योपासना – सूर्य रोज त्याला कमळ देई ते तो शिळेच्या मस्तकी ठेवी – शंभर कमळे आपोआप गुंफली गेली – विष्णु शिवभेटीसाठी

कैलासावर जात असता त्यांनी ती माळ उचलून गळ्यात घातली – शिळेला स्पर्श– जयंती शिळेतून बाहेर – माळेचे नाव वैजयंती माळ – सदैव विष्णूच्या हृदयावर विराजमान. ( वैजयंती – कथा १ )

**क) सद्‌गुणांची भलावण, दुर्गुणाला शासन**

मराठी लोककथांत सद्‌गुणी माणसाची भलावण व दुर्गुणी माणसाची निंदा वा फजिती केलेली आढळते. काही उदाहरणे अशी –

१) चाकरी करताना चाकर वा मालक कोणीच रागवावयाचे नाही ही अट – जो रागावेल त्याचे नाक कापावयाचे – दोन भावांतील मोठ्या भावाला मालकाने खूप छळले – शेवटी मोठ्याचा तोल ढळला – नाक कापले – धाकट्या भावाने मालकाचा पुरा सूड घेतला – मालकाचे खूप नुकसान केले – मालकाच्या सासुरवाडीलाही त्याची पुरेपूर फजिती करवली – मालकाचा संयम संपला – त्याचेही नाक कापले. ( अप्रसिध्द कथा )

२) पतिव्रता स्त्री कांडत असताना तिने वर फेकलेले मुसळ अधांतरी राही – शेजारणीला हेवा – तिनेही मुसळ फेकले पण ती पतिव्रता नसल्याने ते डोक्यावर आदळले. ( अप्रसिध्द कथा )

३) राजाची सावकाराच्या सुंदर बायकोवर नजर – सोंगट्या खेळताना राजाची अट – राजाने डाव जिंकला तर सावकाराच्या घरातील ज्या वस्तूला राजा प्रथम स्पर्श करील ती वस्तु राजाला द्यायची – राजाने डाव जिंकला – राजाच्या हेतूची सावकाराला कल्पना होतीच – एका अनोळखी मामाचे त्याला साह्य – सावकारपत्नीला उंच माडीवर बसवले आणि एक शिडी भिंतीला लावून ठेवली – तिला स्पर्श करण्यासाठी राजा शिडीला धरून चढू लागला – शिडीला राजाचा पहिला स्पर्श – शिडी राजाला देऊन टाकली. ( अप्रसिद्ध कथा )

४) एका राजकन्येच्या विवाहाचा पण (सातव्या मजल्यावर राजकन्येच्या नकळत एकदम पोचणे) एका राजपुत्राने कळीच्या घोड्याच्या साह्याने पण जिंकला – राजकन्येला पती पसंत नाही – तो झोपला असता घोड्याच्या साह्याने ती पळून गेली – राजपुत्राने महादेवाला प्रसन्न करून घेऊन दोन पाले मिळविले – एक पाला हुंगल्याने माणसाचे वानर होई व दुसरा हुंगल्याने वानराचा पुन्हा माणूस होई – राजकन्या व तिचे वडील यांच्यावर पाल्याचा प्रयोग – राजकन्या विवाहास राजी. (अप्रसिध्द कथा)

राक्षस घसरून पडून तलवार छातीत घुसल्याने मरण पावला. राक्षसाला मारल्यामुळे मुलांना राजाची शाबासकी मिळाली. मोठे बक्षीस मिळाले. मुले बक्षिसासह घरी परत आली. ( एक होता राजा – कथा १ )

२) एकुलत्या एका नणंदेला सात भावजयांनी अवघड कामे सांगितली. (भोके पाडलेले रांजण भर, तेलकट कपडे धू, उखळामुसळाशिवाय राळे कांड वगैरे) बेडूक, बळीपक्षी, चिमण्या यांच्या मदतीने सर्व कामे पूर्ण – भावांच्या स्वप्नात जाऊन सर्व प्रकार कथन – भावांनी स्वतः डोळ्यांनी सर्व प्रकार पाहिला – आपल्या बायकांना मारपीट करून घराबाहेर हाकलून दिले. (राजविलासी केवडा - कथा २)

३) राजाच्या दोन राण्या आवडती व नावडती – तपश्चर्येने शंकर प्रसन्न – पुत्रप्राप्तीसाठी प्रसादफळे दिली – आवडतीने फळ फेकून दिले – नावडतीने खाल्ले नावडती गर्भवती – द्वेषात भर – नावडतीची अर्भके पळवून त्या जागी दगड, केरसुनी अशा वस्तू ठेवल्या – मुले गरिबाघरी वाढली - शेवटी सर्वांचे पुनर्मीलन आवड–तीला देहदंड, ( अप्रसिध्द कथा )

## ब) दुर्दैवाचा निरास

काही प्रसंगी कोणाशी (घरच्या वा दारच्या) संघर्ष असतो असे नाही. तथापि दुर्दैवाची मगरमिठी आयुष्याला बसलेली असते. ही मगरमिठी कितीही जबरदस्त वा बळकट असली तरी कथेच्या शेवटी ती सैल होते व पूर्णतः सुटून जाते. काही मराठी लोककथांतून हा कथाविशेष आढळतो. जसे –

१) मूलतः नागराज असलेल्या परंतु राजपुत्ररूपाने एका राजाकडे वाढलेल्या राजपुत्राचा विवाह – पत्नीचा पतीजवळ नाव सांगण्याचा हट्ट – नाव सांगितले तर पुन्हा नागरूप होऊन नागलोकात जावे लागणार म्हणून त्याचा नकार – स्त्रीहट्टापुढे शरणागती – नागलोकी गमन – पत्नी पतीच्या विरहाने दुःखी – कपिला गाईच्या साह्याने तिचे नागलोकी गमन – मोठ्या नागराजाला विनंती करून पतीला मानवस्वरूपात कायमचे घरी परत आणले. ( पुष्प ४ – कथा ३)

२) परमविष्णुभक्त सुशील नामक ब्राह्मण – नैवेद्याने सुवर्ण ताट रोज वर उडे व विष्णूचे भोजन झाले की खाली येई – एकदा ताट उडेना – मीठ घातले की नाही हे पाहण्यासाठी सुनेने ( जयंती ) भाजी चाखून पाहिली होती – नैवेद्य उष्टा म्हणून ताट उडेना, – सुनेला शिळारूप होण्याचा शाप, – विनवणीमुळे उःशाप, विष्णूच्या करस्पर्शाने उध्दार – सून सरोवरात शिळारूप – प्रेमळ पती विजय याची सरोवराकाठी सूर्योपासना – सूर्य रोज त्याला कमळ देई ते तो शिळेच्या मस्तकी ठेवी – शंभर कमळे आपोआप गुंफली गेली – विष्णु शिवभेटीसाठी

कैलासावर जात असता त्यांनी ती माळ उचलून गळयात घातली – शिळेला स्पर्श– जयंती शिळेतून बाहेर – माळेचे नाव वैजयंती माळ – सदैव विष्णूच्या हृदयावर विराजमान. ( वैजयंती – कथा १ )

**क) सद्‍गुणांची भलावण, दुर्गुणाला शासन**

मराठी लोककथांत सद्‌गुणी माणसाची भलावण व दुर्गुणी माणसाची निंदा वा फजिती केलेली आढळते. काही उदाहरणे अशी –

१) चाकरी करताना चाकर वा मालक कोणीच रागवावयाचे नाही ही अट – जो रागावेल त्याचे नाक कापावयाचे – दोन भावांतील मोठ्या भावाला मालकाने खूप छळले – शेवटी मोठयाचा तोल ढळला – नाक कापले – धाकटया भावाने मालकाचा पुरा सूड घेतला – मालकाचे खूप नुकसान केले – मालकाच्या सासुरवाडीलाही त्याची पुरेपूर फजिती करवली – मालकाचा संयम संपला – त्याचेही नाक कापले. ( अप्रसिध्द कथा )

२) पतिव्रता स्त्री कांडत असताना तिने वर फेकलेले मुसळ अधांतरी राही – शेजारणीला हेवा – तिनेही मुसळ फेकले पण ती पतिव्रता नसल्याने ते डोक्यावर आदळले. ( अप्रसिध्द कथा )

३) राजाची सावकाराच्या सुंदर बायकोवर नजर – सोंगटया खेळताना राजाची अट – राजाने डाव जिंकला तर सावकाराच्या घरातील ज्या वस्तूला राजा प्रथम स्पर्श करील ती वस्तु राजाला द्यायची – राजाने डाव जिंकला – राजाच्या हेतूची सावकाराला कल्पना होतीच – एका अनोळखी मामाचे त्याला साहय – सावकारपत्नीला उंच माडीवर बसवले आणि एक शिडी भिंतीला लावून ठेवली – तिला स्पर्श करण्यासाठी राजा शिडीला धरून चढू लागला – शिडीला राजाचा पहिला स्पर्श – शिडी राजाला देऊन टाकली. ( अप्रसिद्ध कथा )

४) एका राजकन्येच्या विवाहाचा पण (सातव्या मजल्यावर राजकन्येच्या नकळत एकदम पोचणे) एका राजपुत्राने कळीच्या घोडयाच्या साहयाने पण जिंकला – राजकन्येला पती पसंत नाही – तो झोपला असता घोडयाच्या साहयाने ती पळून गेली – राजपुत्राने महादेवाला प्रसन्न करून घेऊन दोन पाले मिळविले – एक पाला हुंगल्याने माणसाचे वानर होई व दुसरा हुंगल्याने वानराचा पुन्हा माणूस होई – राजकन्या व तिचे वडील यांच्यावर पाल्याचा प्रयोग – राजकन्या विवाहास राजी. (अप्रसिध्द कथा)

**ड) बोललेले बोल खरे करणे**

काही लोककथांत वरकरणी विचित्र किंबहुना अशक्यप्राय वाटणारे एखाद्याचे बोल सदैव खरे झालेले आढळतात.

१) आपण 'स्वतःच्या नशिबाने खातो' असे बाणेदारपणाने आपल्या अहंकारी पित्याला सांगणाऱ्या धाकट्या राजकन्येचे बोल सदैव खरे झालेले दाखविणाऱ्या बऱ्याच मराठी लोककथा आहेत. उपलब्ध झालेल्या एका अप्रसिद्ध कथेत तिचा विवाह एका पांगळ्या राजपुत्राशी होतो परंतु पऱ्यांच्या कृपेमुळे व राजपुत्राच्या दयाळू वृत्तीमुळे त्यांची सर्व संकटे दूर होऊन ऐश्वर्य प्राप्त होते. सांगीवांगी या कथेतहीं अशाच स्वरूपाची एक कथा आढळते. त्यात राजकन्येचा विवाह एका अतिदरिद्री मुलाशी होतो परंतु लक्ष्मीच्या कृपेने त्यांना श्रीमंती येते.

२) एका ब्राम्हणकन्येने 'फुटक्या कवडीवर संसार' करण्याचे आपले बोल सार्थ करून दाखवले. ( अप्रसिध्द कथा )

३) एका शेतकरीकन्येने 'तीन दाण्यांवर संसार' करण्याचा निर्धार यशस्वीपणे पार पाडला. ( अप्रसिध्द कथा )

**विचित्र विवाह सुखी**

बाह्यतः व व्यावहारिकदृष्ट्या विचित्र व दुःखकारक वाटणारे विवाह शेवटी सुखकारकच ठरतात. अशा प्रकाराचे कथाविशेष काहीं मराठीं लोककथांत आढळतात. त्या विवाहातील विचित्रपणा नष्ट होऊन दुःखाचा नरास होतो.

१) एका माणसाचा घुशीशी विवाह – तो तिला सदैव सर्वांच्या डोळ्याआड ठेवी – शंकरांनी घुशीच्या डोक्यातील टाचणी दूर करताच घुशीचे तरुणीत रूपांतर – दोघांचे जीवन सुखी ( अप्रसिध्द कथा )

२) एका वाघाने ब्राह्मणवेषाने राजकन्येचा विवाहपण जिकला – गुहेपाशी गेल्यावर आपले खरे रूप वाघाने प्रकट केले – दासदासींचा फडशा – राजकन्येने नारायणव्रत केल्याने तिच्या पतीचे व्याघ्ररूप जाऊन त्याला मनुष्यत्व प्राप्त. ( मराठवाड्यातील लोककथा – कथा २ )

**अपवादस्वरूप दुःखान्त कथा**

मराठी लोककथांत सुखान्त कथांची विपुलता आढळून आली तरी दुःखान्त स्वरूपाच्या काही अपवादात्मक कथाही दिसून येतात. जसे –

१) मथुरा नावाची मुलगी – नदीवरून पाणी आणताना मुलांना, कुत्र्यांना पुन्हा पुन्हा खेपा करून पाणी पाजी – थकून गेली – तिची काळशी स्वतः चालत घरी आली व तिची कामे करू लागली – कळशी मनुष्यवाणीने बोले, हवे ते आणून देई – 'ती चेटकी' अशी लोकांची राजाकडे तक्रार – तिला पकडावयास सैनिक रवाना – मथुरा पळून गेली व नदी ओलांडताना नदीतून वाहून गेली. (पुष्प १ – – कथा ३५)

२) गंगूलाचा भाऊ तिला भेटावयास तिच्या सासरी – पाहुणा ओटीवर— गंगुला घरात – पाहुणा कोण ही तिला उत्सुकता – परंतु पाहुणा कोण हे सांगण्या-पूर्वी सासूने तिच्याकडून खूप कामे करवून घेतली – गोवऱ्या थापताना तिला नाग-दंश – सासरा, सासू, दीर, नणंद, नवरा या सर्वांचा तिच्या नागदंशाबद्दल अविश्वास – गंगूला मृत – भावाला अपार शोक – तिच्यासाठी आणलेल्या भेट-वस्तू जागेवरच राहिल्या (सासुरवास कथा १)

## पारंपरिक समजुतींच्या ठाम प्रतिपादनार्थ दुःखान्त कथा

समाजात काही पारंपरिक समजुती रूढ झालेल्या असतात. त्या समजुती अधिक दृढ व्हाव्यात म्हणून त्या समजुतींवर अविश्वास दाखविणाऱ्या व्यक्तींना दुःखास सामोरे जावे लागते. असे दर्शविणाऱ्या कही कथा आढळतात.

१) मराठी लोककथांत सटवीकन्येच्या कथेचे जे चार पर्याय आढळतात त्या चारी कथांत सटवीकन्येने 'भवितव्य कोणी बदलू शकत नाही, ते अटळ असते' या समजुतीवर अविश्वास दाखवून स्वतःचे, प्रत्यक्ष पुत्राशी विवाह होण्याचे भवितव्य खोटे ठरविण्याचा निर्धार व्यक्त केलेला आहे. परंतु तिच्या पदरी अपयशच पडले, आणि तिने आत्मनाशाचा मार्ग पत्करलेला आढळतो. कधी पतीसह तर कधी पती आणि पुत्रासह. (मराठवाड्यातील लोककथा – कथा ६, पुष्प ३ – कथा ७९, ८०)

२) एका मुलाच्या नशिबात शेजारच्या राजाच्या हातून मरण होते. त्याला एकांतात ठेवूनही ते टळले नाही. (पुष्प १ – कथा ३९)

## दुःखान्तानंतर चिरंतन रूप

काही कथा दुःखांत स्वरूपाच्या असल्या तरी त्या दुःखाची धार काहीशी बोथट व्हावी म्हणूनच बहुधा त्याला सांत्वनपर रुपेरी कडा लावली जाते. काही जणांच्या आयुष्याच्या शेवट अतीव दुःखात होतो खरा तथापि त्यांना कुठेतरी उदात्त, चिरंतन रूप प्राप्त होते, व त्यायोगे त्यांच्या सद्‌गुणांचे स्मरण सर्वांना होत राहाते. काहीं कथा अशा –

१) आपला पती मूळचा महार आहे, वेदाधिकाराला तो पात्र नसूनही त्याने वेदाध्ययन केले हे कळल्यावर ब्राह्मणकन्या फार दुःखी – आत्मनाश हाच एक मार्ग – रात्री पतीमुलांसह झोपडीत झोपली असता तिने उठून झोपडी पेटवून दिली व स्वतः आगीत उडी घेतली – झोपडीच्या जागी उंच, मजबूत गवत – आत्मयज्ञ करणाऱ्या वंशाच्या जागी उगवले म्हणून त्यास 'वंशवृक्ष' नाव – वंशवृक्षाची मुरली बनवून श्रीकृष्णांनी कमरेस बांधली व ब्राह्मणकन्येचा उद्धार केला. (पुष्प ३ – कथा २४)

२) पतीला पत्नीचा विनाकारण संशय – रागाने घराबाहेर निघून गेला – रात्री पतीचा मित्र घरी आला – तिच्याजवळ निर्लज्जपणे सोबतीची इच्छा व्यक्त – ती घराबाहेर गेली पण राक्षसाला भिऊन परत घरी – साजशृंगार करून पतीच्या मित्राच्या खोलीत गेली – पतीचे नाव घेत छातीत खंजीर खुपसून आत्महत्या – तिचे पतिप्रेम पाहून मित्र खजील – त्याचेही खंजीर खुपसून प्राणार्पण – हे पाहून विश्वासू दासीचे प्राणार्पण – पती पश्चात्तापाने परत घरी तो हा प्रकार – त्याचीही आत्महत्या – चार जीवांचे नागवेलीचे पान, कात, सुपारी, चुना यांच्या रूपाने पुनर्मीलन – प्रेमाची किंमत विडा रंगल्यावर ठरते. (पुष्प २ – कथा २)

**सुखान्तासाठी इतर संकेतांची अपरिहार्यता**

श्रोत्यांना, व्यवहारात क्वचितच लाभणाऱ्या, इच्छापूर्तीचे समाधान लोककथांच्या अशा तऱ्हेच्या सुखकारक शेवटांतून लाभते. त्यामुळेच, वास्तवतेचे कठोर दर्शन घडविणाऱ्या काही अपवादात्मक कथा सोडल्या तर मराठी लोककथांनी सुखान्त कथेच्या संकेताचे पालन बव्हंशी केलेले आढळते. अर्थात लोककथेतील हा सुखान्त सहजासहजी घडून येत नाही. त्यासाठी इतर आणखी काही संकेतांच्या साहचाची लोककथेला गरज भासते. लोककथांतील पात्रांवर येणारी संकटे, त्यांच्या आयुष्यात निर्माण होणाऱ्या समस्यांचे स्वरूप व्यावहारिक सत्यापेक्षा इतके भिन्न असते की, त्या पात्रांना स्वतःच्या अंगभूत गुणांवर त्यांचा निरास करणे सर्वथैव अशक्य असते. बरेच वेळा सर्वसामान्य मदत पुरेशी न होता दैवी मदतीचीच गरज भासते. जादूच्या वस्तूंनी समस्या सुकर होते किंवा रूपांतरप्रक्रियेतून इच्छित साध्य होते. अशा तऱ्हेने मदतनीस, रूपांतरप्रक्रिया आणि जादूच्या वस्तू या संकेतांना लोककथांत विस्तृत स्थान असून त्यांच्या साहचाने कथेच्या सुखान्त स्वरूपाची वाटचाल अगदी सहजपणे होत राहते.

**मराठी लोककथांतील मदतनीस**

संघर्ष हा कथावस्तूचा पाया मानला जातो. लोककथांतील संघर्ष हा बहुधा सुष्ट, दुष्ट शक्तीतील वैर किंवा एखादे भयंकर संकट अशा स्वरूपाचा असतो.

कथेतील नाट्य या संघर्षाच्या कमीअधिक तीव्रतेवर अवलंबून असते. संकट वा समस्या जितकी उग्र तितक्या जास्त प्रमाणात श्रोत्यांची उत्सुकता वाढते व कथेची रंगतही. लोककथा (विशेषत: अद्‌भुतकथा) या संकटग्रस्त नायक वा नायिकेच्याच कथा असतात. तथापि संकटावर मात हमखास होतेच. याचे प्रमुख कारण हेच की संकट कितीही मोठे वा बिकट असले तरी नायक वा नायिकेला त्यांच्या अंगभूत गुणांच्या जोडीला कुठल्यातरी रूपाने मदत ही मिळतेच. आणि म्हणूनच लोककथेच्या सुखान्त-संकेताला आपण उद्दिष्टाप्रत नेणारा 'मदतीचा हात' वा 'मदतनीस' हाही एक महत्त्वाचा संकेत लोककथांत आढळतो. मराठी लोककथांनी या संकेताचे पालन अगदी प्रामाणिकपणे केलेले आढळते. संकटाचे स्वरूप जितके गहन वा सुलभ असेल त्या मानाने मदतीचे स्वरूपही ठरते. एखादी क्षुल्लक वस्तू पळवावयाची असेल किंवा कुणावर पाळत ठेवावयाची असेल तर साध्या दासीची किंवा म्हतारीची मदतही पुरेशी होईल. परंतु एखादी गोष्ट साध्य करण्यासाठी नायकाला जर सात समुद्र, सात पर्वत ओलांडायचे असतील तर अशा वेळी एखादा देव वा राक्षसच वश व्हावयास हवा, अर्थात ज्याच्या त्याच्या शक्तीनुसार मदतीच्या श्रेणीत फरक पडला तरी मदतीचे मोल मात्र उणे होत नाही.

### मराठी लोककथांच्या भूमिकापात्रांत मदतनिसांचे प्राबल्य

मराठी लोककथांतील भूमिकापात्रांचे स्वरूप तपासताना बहुसंख्य पात्रांचे भूमिकास्वरूप हे मदतनिसाचेच आहे हे स्पष्ट करण्यासाठी मराठी लोककथांतील विविध भूमिकापात्रांच्या मदतीची काही उदाहरणे तत्संबंधी प्रकरणात उद्‌धृत केलेली आहेत. देवदेवता व राक्षसादी अतिमानवी योनी, प्राणीसृष्टी, वनस्पतीसृष्टी, सिद्ध व सामान्य माणसे या सर्वांनी केलेल्या मदतीची अन्य उदाहरणेही मराठी लोककथांत दिसून येतात.

### देवदेवतांची मदत

संकटकाळी संकटग्रस्ताला परमेश्वराची आठवण व्हावी, आणि कोणावर संकट आले की परमेश्वराचे आसन हलावे असा काही विलक्षण योगायोग अनेक लोककथांतून दिसून येतो. मदतीचा हात पुढे करण्यात देवदेवतांना श्रेष्ठ स्थानावर बसवावे लागेल. उदा. –

१) शोभाला सावत्र आई – रानात गुरे राखण्याचे काम – एकदा रानात देवाने म्हाताऱ्याच्या रूपाने येऊन तिला भाकरी मागितली – स्वत: भुकेली असूनही भाकरी दिली – जाताना म्हाताऱ्याने तिला गाठोडे दिले – गाठोड्यात सोन्याच्या भाकरी ( अप्रसिद्ध कथा )

२) पुत्रप्राप्तीसाठी कठोर तपश्चर्या करणाऱ्या राजाला शंकराने पुत्रप्राप्तीसाठी प्रसादफळे दिली. ( एक होता राजा – कथा ७ )

३) एका कोळ्याने समुद्रात जाळे टाकले. परत ओढताना जाळे फार जड वाटू लागले तेव्हा देवीने त्याला जाळे ओढण्यास मदत केली. आणि नंतर त्याला रोज एका हत्तीचे बळ देऊ केले. ( सांगीवांगी – कथा १४ )

४) नागनाथाची पत्नी माहेरी प्रसूतीसाठी गेली असता तिच्या सावत्र आईने तिला मुलासह भुयारात कोंडले. भुयारातील आसरांनी तिचा व मुलाचा उत्तम प्रतिपाळ केला. (सांगीवांगी – कथा २०)

**राक्षसादी योनींची मदत**

देवदेवतांप्रमाणेच राक्षस, पिशाच्च, भूत, वेताळ, भैरव, झोटिंग इत्यादी योनीचे अतिमानवी सामर्थ्य मोठे असल्याने त्यांची मदतही आपत्कालात प्रभावी ठरू शकते. मराठी लोककथांतील राक्षसादी योनींचे भूमिकास्वरूप हे दुहेरी असते हे स्पष्ट केलेले आहे. त्यांतील विधायक भूमिकाच फक्त मदतीचा हात पुढे करणार हे उघड आहे. आणि तुलनेने स्त्रीपात्रांचे प्रमाण त्यांत अधिक आहे. उदा. –

१) आपल्या दारातील उंच झाडावरून मुलगा शेजारच्या राक्षसाच्या घरी गेला. राक्षस दुष्ट होता. तो मुलाला खाईल या भीतीने राक्षसीने मुलाला लपवून ठेवले. ( पुष्प १ – कथा ३३ )

२) दारिद्र्याने गांजून उदास मनाने वनात फिरणाऱ्या म्हाताऱ्याला भुतांनी धनाचा हंडा दिला. ( सांगीवांगी – कथा ७ )

३) परराज्यात नोकरी करणाऱ्या राजपुत्राला तेथील राजाने लीलावंती ही राक्षसकन्या आणण्याचे काम सांगितले. राजपुत्र राक्षसाच्या घरी गेला. लीलावंतीने त्याला लपवून ठेवले, पित्याचे मरण पोपटात आहे ही माहितीही पुरविली. त्यामुळे राक्षसाचा नाश करून लीलावंतीसह राजपुत्र परत आला. ( अप्रसिद्ध कथा )

४) मुलीच्या लग्नासाठी व मुलांच्या मुंजीसाठी द्रव्य हवे म्हणून भिकंभट भैरवसिद्धीची मंत्रसाधना करावयास गेला, वाटेत उशाशी शिदोरी ठेवून झोपला. त्याची चविष्ट शिदोरी खाऊन भैरव व वेताळ प्रसन्न झाले. त्याच्या उशाशी मंत्राने भारलेली सिद्धवाटी ठेवली. त्यातून अन्नाचा कोट निर्माण होई – सिद्धवाटीमुळे भिकंभटाची कार्ये पार पडली. ( पुष्प ३ – कथा ९२ )

पारंपरिक राक्षसवृत्तीशी विपरीत भासणाऱ्या या मदतशील वृत्तीची बरीच उदाहरणे मराठी लोककथांत सापडतात.

**सिद्ध माणसांची मदत**

तपोसाधनेच्या वा मंत्रसाधनेच्या बळावर माणसे सिद्ध बनतात असे मानले जाते. या दैवी सामर्थ्याचा विनियोग सिद्ध माणसे बरेच वेळा इतरांच्या मदती-साठीच करतात. उदा. –

१) पुत्रप्राप्ती न होणाऱ्या एका ब्राह्मणाला अमोघसिद्ध नामक साधूने तीन खारका दिल्या. त्यामुळे ब्राह्मणाला पुत्रप्राप्ती झाली. (पुष्प ३ – कथा १०१).

२) कानसीपात्रेला हत्तींपासून सोडवायला गेलेल्या सेतूराजाला एका साधूने एक कोळसा, कळकीचे बी, पट्टा. व खडा अशा जादूच्या वस्तू दिल्या. त्यांच्या साह्याने सेतूराजा सर्व संकटे पार करून आला. साधूच्या केवळ स्मरणाने भुयारावरील दगड दूर झाला, सेतूराजा समुद्राबाहेर पडू शकला. ( एक होता राजा – ७ )

३) पतीशी वादात हरलेल्या गर्भवती राणीस वनवास – वनवासात साधूचा आश्रय – तिच्या पुत्राच्या गळ्यात त्याची माहिती लिहिलेला ताईत बांधून ठेवला. ( अप्रसिद्ध कथा )

४) पोटच्या मुलाशी आपला विवाह होणार हे स्वतःचे भविष्य कळताच, ते खोटे ठरविण्याच्या इराद्याने विवाहाविना वनवास पत्करणाऱ्या सटवीकन्येला एका साधूने आश्रय दिला. ( पुष्प २ – कथा ५ )

**नातेवाईकांची मदत**

संकटकाळी कोणालाही प्रथमतः अपेक्षा असते ती निकटच्या नातेवाईकांच्या मदतीची. संकटग्रस्ताचे दुःख त्यांनाच अधिक तीव्रतेने कळू शकते. किंबहुना त्या दुःखाच्या थोड्याफार झळी त्यांनाही सोसाव्या लागतात. त्यामुळे आप्तांची मदत अधिक तातडीने मिळू शकते. उदा. –

१) राजपुत्राने आपल्या राक्षसी मातेवर मोठ्या शौर्याने व धैर्याने मात करून आपल्या परित्यक्त सहा मातांना पुन्हा राजवैभव प्राप्त करून दिले.

२) गवंडीकन्येवर वक्र नजर ठेवून तिच्या प्राप्तीसाठी तिच्या पित्याला पेचात पकडणाऱ्या राजावर गवंडीकन्येने चतुराईने मात करून त्याला निरुत्तर केले. पित्याची कुचंबना थांबवली.

३) राक्षसासी विवाह झालेल्या बहिणीला राजपुत्रांनी चतुराईने सोडवून आणले.

४) आळशी पतीला उद्योगी बनविले. त्याच्याकडून अवघड पण जिंकवून राजवैभव मिळविले. ( राजविलासी केवडा – कथा ८ ).

**परक्या सर्वसामान्य माणसाची मदत**

राजपरिवाराने कुणाला मदत करून संकटमुक्त केले तर त्यात फारसे आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही, तथापि अत्यंत सामान्य समजली जाणारी माणसे ही अनेक वेळा साहचार्थ धावतात ही बाब अधिक कौतुकाची आहे. विशेषत: समाजातील गरीब, कष्टकरी घटकांनीच संकटग्रस्ताला व विशेषत: परित्यक्त राजसंततीला आश्रय द्यावा हा सुद्धा लोककथांचा जणु एक संकेतच बनलेला आहे. परित्यक्त राजसंतती नेहमी माळी, कुंभार, तेली अशा गरीब लोकांच्या घरीच वाढते. मारेकरी, रामोशी अशी क्रूर माणसेही नाहक मारल्या जाणाऱ्या राणीला वा राजसंततीला सोडून देतात. अर्थात केवळ राजघराण्यालाच नव्हे तर इतरांनाही सर्वसामान्य माणसाची मदत होत असते. उदा. –

१) तुंडाभुंडा झालेल्या सेतूराजाची शुश्रुषा व सांभाळ एका माळ्याने केला. ( एक होता राजा – कथा १० )

२) परित्यक्त राजसंततीला कुंभाराघरी आश्रय – त्यामुळे फासी जावे लागले. ( पुष्प ४ – कथा २ ).

३) दुर्दैवाने तुंडाभुंडा बनलेल्या बळीवंताचा सांभाळ एका तेल्याने केला. ( एक होता राजा – कथा ७ ).

४) राक्षसी राणीने हाकलून दिलेल्या गर्भवती सहा राण्यांना जंगलात लाकूडतोड्याचा आश्रय. (दाते २ – कथा ७ ).

५) राक्षसीने मुलाला पोत्यात भरून पळवले. वाटेत तहान लागली – गुराख्यांना पाणी मागितले – त्यांनी तिला पाण्यासाठी दूरवर पाठविले. ती येईपर्यंत मुलाला सोडवून पोत्यात साप, किरडे भरून ठेवली. राक्षसीच्या मुलांचा सर्पदंशाने मृत्यू. ( पुष्प १ – कथा ६ ).

६) सटवाईकन्या नटवीने टाकून दिलेला नवजात पुत्र गुराख्यांनी नाळावारासकट एका निपुत्रिक राजाराणीकडे नेऊन पोचवला. ( पुष्प ३ – कथा ७९)

लोककथांतील म्हातारी ही व्यक्तिरेखा फार लोभस व मनोरंजक आहे. देह वार्धक्याकडे झुकला तरी तिची धडपड संपत नाही. कुणाच्या ना कुणाच्या मदतीला धावायची अनिवार हौस तिला असते. पुढील काही उदाहरणे पाहा —

१) सटवीकन्येला पुत्रत्यागानंतर म्हातारीचा आश्रय. (पुष्प ३ – कथा ७९).

२) सावकाराच्या गुरूने सावकाराच्या सुनेला पेटीत ठेऊन पळविले होते – म्हातारीने सुनेला सोडवून तिच्या जागी माकड ठेऊन गुरूची फजिती तर केलीच, शिवाय सुनेला आश्रयही दिला. ( अप्रसिद्ध कथा )

३) आग लागलेल्या घरात तान्हेबाळ अडकले. एका धाडसी तरुणाने स्वतःचे शरीर पाण्याने खूप भिजवले पाण्याची भांडी बरोबर घेतली. भिजलेल्या शरिरामुळे त्याला आगीचा त्रास कमी – घरात शिरला. मधूनमधून पाणी अंगावर ओतून घेई – मुलाला सुखरूप बाहेर आणले - बक्षीस नाकारले. ( अप्रकाशित कथा )

४) दुष्ट दिवाणजीच्या तावडीतून सुटलेल्या सावकाराच्या सुनेला गणिकेचा आश्रय – बारा वर्षे सांभाळले. तिची पुन्हा घरी पाठवणी केली. ( सुंबरान मांडीलं – कथा ७ ).

५) आगीत सापडलेल्या सर्पास एका वाटसरूने वाचवले. त्याला थंडावा मिळावा म्हणून स्वातःच्या पोटात जागा दिली. (दाते १ – कथा १०)

६) गावात लूटमार करावयास आलेल्या ध्यानसिंग डाकूच्या तोंडावरून बिब्याचा तेलाच्या हात फिरवून बाइजाबाई नावाच्या एका म्हाताऱ्या स्त्रीने सहज पकडून दिले. बिब्याचे तेल त्याच्या तोंडावर उतल्याने त्याला नेमके ओळखता आले. ( खानदेशी लोककथा – कथा ६ )

**प्राणीसृष्टीची मदत**

मराठी लोककथांतील प्राणीसृष्टीचाही मदतकार्यातील वाटा खूपच मोठा आहे वाघ, हत्ती, कोल्हा, इत्यादी बलवान, धूर्त प्राण्यांपासून क्षुद्र, किडामुंगीपर्यंत अनेकांनी मदतीचा भार वाहिलेला आहे. उदा. –

१) तरूणीरूपाने राजवैभव भोगणाऱ्या राक्षसीनें सावत्र मुलाला वाघिणीचे दूध आणण्यास पाठविले – वाघीण मुलाला वश – त्याला दूध दिले. ( अप्रसिद्ध कथा )

२) तेली आणि प्रवासी यांचा घोडीच्या शिंगरावरून झालेला वाद कोल्ह्याने मिटवला. ( दाते २ – १२ )

३) प्रवासात प्रधानाचा सोबती खेकडा – प्रधान झोपला असता नागाचा दंश व कावळा डोळे फोडायला आला – खेकड्याने कावळ्याची मान पकडली – कावळ्याचा मित्र नाग याला प्रधानाचे विष परत शोषून घेणे भाग पडले. प्रधानाला जीवदान. ( पुष्प ४ – कथा ११ )

४) राजपुत्राला मारण्यासाठी दुष्ट माणसाने त्याच्या गादीखाली तलवार लपवून ठेवली. मांजराने राजपुत्राला बिछान्यात जाऊच दिले नाही – गादी फाडून तलवार दाखविली. ( पुष्प १ – कथा २५ )

५) वसंताने आपल्या भावांना मुंग्याचे वारूळ फोडू दिले नाही, मधमाशांचे पोळे फोडू दिले नाही. मुंग्यांनी त्याला खड्डयात पडलेले १००० मोती शोधून दिले, तर मधमाशांनी तीन एकसारख्या रूपाच्या राजकन्यांच्या दगडी पुतळ्यांतून मधप्रिय राजकन्या शोधून दिली. ( पुष्प १ – कथा ५ )

६) दुष्ट भावजयीने नणंदेला गळक्या रांजणात पाणी भरण्यास सांगितले. बेडूक भोकात जाऊन बसले. रांजणाची भोके बंद होऊन रांजण भरता आला. ( राजविलासी केवडा – कथा २ )

**वनस्पतीसृष्टीची मदत**

मराठी लोककथांत अत्यल्प प्रतिनिधित्व असणाऱ्या वनस्पतीसृष्टीने मदतनीस एवढी एकच भूमिका केलेली आहे. याचा उल्लेख तत्संबंधित प्रकरणात केलेला आहेच. येथे केवळ एक उदाहरण देत आहे.

सवतीच्या छळामुळे नावडती राणी आत्महत्त्येस प्रवृत्त – तुळस व मोसंबीचे झाड यांना पाणी घालते – त्यांनी तिला जादूची अंगठी व पिशवी दिली – त्याच्या साहाय्याने ती श्रीमंत होऊन परत आली – नावडतीची आवडती झाली. ( अप्रसिद्ध कथा )

मराठी लोककथांतील मदतनिसाचे कर्तृत्व हे असे विस्तृत व वैचित्र्यपूर्ण स्वरूपाचे आहे. लोककथांच्या कथासूत्रात लोककथा सुखान्त स्वरूपाप्रत आणण्यात मदतनीस सिंहाचा वाटा उचलतो, देवदेवतांपासून ते क्षुद्र कीटकांपर्यंत जो जो आपापल्या शक्तीनुसार संघर्ष संपवण्यास मदत करीत राहतो. दैवी मदतीच्या अनुषंगाने अद्भुततेची निर्मिती होऊन कथेची आकर्षकता व नाट्यपूर्णता वाढते हे वेगळेच.

**मराठी लोककथांतील रूपान्तरकल्पना**

अद्भुततेची आवड आणि ओढ हा मानवी मनाचा एक ठळक विशेष आहे. लोककथांत अद्भुततेचे प्राबल्य आढळते याच्या मुळाशी हीच अद्भुततेची ओढ असते. लोककथांतील अद्भुतेतचे एक प्रभावी साधन म्हणून लोककथांतील रूपान्तर-कल्पनेकडे बोट दाखविता येईल.

ही रूपांतरकल्पना आपल्याकडे फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे अहिल्येने भोगलेले शिळारूप, मारीचाने घेतलेले सुवर्णमृगाचे रूप, विठ्ठलाने घेतलेले विठू महाराचे आणि संत सखूचे रूप अशी कितीतरी उदाहरणे सर्वांच्या परिचयाची आहेत. रूपांतरकल्पनेचा हा प्राचीन वारसा विशेषत: लोककथांत इतक्या प्राचुर्याने प्रकट होतो की त्याला संकेतस्वरूप प्राप्त झाले आहे. मराठी लोककथांतीही हा वारसा उत्तम प्रकारे जतन केलेला आहे.

## रूपांतरशक्तीचे वाहक व तिचे द्विधा स्वरूप

कोणत्याही सजीव प्राण्याची वा निर्जीव वस्तूची कुठल्यातरी कारणाने दुसरा प्राणी वा वस्तू तयार होणे म्हणजे रूपांतर होणे होय. हे रूपांतर होण्यासाठी जी काही अतिमानवी शक्ती अंगी असणे आवश्यक असते ती देवदेवता, राक्षस, यक्ष, गंधर्व, पऱ्या, अप्सरा, पिशाच्च, भूत आदी अतिमानवी योनींमध्ये नैसर्गिक रीतीनेच वास करते असे मानले जाते. सर्वसामान्य माणसात ही शक्ती नसते हे खरे, तथापि ती माणसाला पूर्णत: असाध्य आहे असे मानले जात नाही. तपोसाधना, मंत्रसाधना, शक्तिसाधना यांच्या बळावर माणसे ती प्राप्त करून घेतात. लोककथांतील प्राणी-देखोल रूपांतराचे प्रयोग करताना आढळतात. तथापि ही शक्ती त्यांच्या अंगी कशी येते याचा उलगडा केलेला नाही.

रूपांतरविद्या एकदा वश झाली की तिचा द्विधा उपयोग करता येतो. स्व-रूपांतर आणि पर-रूपांतर. काही वेळा रूपांतर न होता अंशत: रूपांतर होते. केस सोनेरी होणे, अंधत्व येणे. अशा प्रकारांचा समावेश त्यांत करता येतो.

## रूपांतरामागे विविध हेतू

मराठी लोककथांत देवदेवता, राक्षसादी योनी, सिद्ध माणसे आणि प्राणि-सृष्टी हे चारही रूपांतरशक्तिवाहक आढळतात आणि स्वरूपांतर आणि पररूपांतर या दोन्ही प्रकारांचा अवलंब केलेला आढळतो. या रूपांतरप्रक्रियेमागे त्या त्या वाहकाच्या स्वभाववैशिष्ट्यांनुसार वेगवेगळे हेतू असल्याचे दिसून येते. या हेतूंच्या अनुषंगाने प्रत्येक वाहकाने केलेल्या रूपांतराचे स्वरूप ठरते.

## देवदेवतांच्या रूपांतरशक्तीचा विनियोग

मराठी लोककथांतील देवदेवतांचे भूमिकास्वरूप जगत्कल्याणाचे असते हे आपण पाहिले आहेच. आपली ही भूमिका पार पाडण्यासाठी त्यांना रूपांतरशक्तीचे फार मोठे साहाय्य लाभते. जगत्कल्याणाबरोबरच अन्य काही हेतूही त्यांच्या रूपांतर-क्रियेला कारणीभूत होतात. पुढे निरनिराळ्या हेतूंची उदाहरणे दिली आहेत.

**दीनोद्धार**

दीनदुबळ्यांचा उद्धार करणे, भक्तजणांचे कल्याण करणे, त्यांचे रक्षण करणे इत्यादी उद्दिष्टांसाठी रूपांतरशक्तीचा उपयोग करण्यात आलेला मराठी लोककथांतून आढळतो. जसे –

१) सर्पदंशाने नीळ नामक राजपुत्र मृत – शंकरपार्वतीच्या कृपेमुळे तो पुन्हा जिवंत. ( अप्रसिद्ध कथा )

२) सावत्र आईने विषप्रयोग केल्यामुळे मरण पावलेल्या मदन आणि गोरधन या राजपुत्रांना, शंकरानी सर्परूपाने येऊन विष शोषून, जीवदान दिले. (पुष्प २ – कथा ९ )

**भक्तकल्याण**

१) भिकारणीच्या वेषाने देवी आली तरी तिचे प्रेमाने आतिथ्य करणाऱ्या गरीब बाईला देवीने स्वतः झोपल्या जागी सोन्याचा पुतळा प्राप्त करून दिला. देवीने उडविलेल्या अन्नाच्या तुकड्यांचे हिरेमोती झाले. ( अप्रसिद्ध कथा )

२) व्यापाऱ्यांची सून पोरकी पण देवभक्त – घागरीत आलेल्या सापांना दूध व लाह्या खाऊ घातल्या – सर्पांची देवीला विनंती, 'तिला आपल्या अद्भुत–रम्य दुनियेत आणावे' – देवीने म्हातारीचे रूप घेऊन तिला आपल्या राज्यात माहेरपण घडविले. ( मराठी लोककथा – कथा ४ )

**भक्तरक्षण**

१) राजकन्येचा वाघाशी विवाह – राजकन्येचे भक्तीने नारायणव्रत – नारायणाचे नामस्मरण करीत असता धुणे धूत असता धुण्याचे पाणी व्याघ्रपतीवर उडाले – वाघास मानवरूप – फक्त पंजा कोरडा – व्रताच्या उद्यापनाच्या पाण्याने त्या पंजाचाही मानवहस्त. ( मराठवाड्यातील लोककथा )

२) पांडुरंगाची अनन्यभक्त काशीबाई - तिच्या हातून ठिणगी पडून पाटलाची कोठी जळाली – पाटील रागावून बोलला – सकाळी पाहतात तो पांडुरंगकृपेने कोठी पूर्ववत् – पाटलाची क्षमायाचना. (मराठवाड्यातील लोककथा – कथा २०)

३) देवीची अनन्यभक्त असलेल्या राजकन्येस पुरुषदर्शन वर्ज्य – तिच्या दर्शनाच्या वेळी देवळात नेमका परराज्यातील राजा निद्रिस्त – पण मोडला म्हणून राजकन्या आत्मत्यागास प्रवृत्त – देवीने राजाच्या कपाळावर अंगठी ठेवून त्याला स्त्रीरूप दिले व राजकन्येला सांगितले, 'तेथे स्त्रीच झोपली आहे.' आपला नेम अभंग राहिला या आनंदात राजकन्या परतली. ( एक होता राजा कथा – ५ )

### भक्तपरीक्षा

१) श्रीकृष्ण सेवकरूपाने राधिकेच्या घरी राहिला – तिची भक्ती पाहून तिच्याशी विवाह – घरी जाताना तिची अनेक तऱ्हांनी परीक्षा – विंचू इंगळ्याचा पूर आणला – स्वतः हिंस्त्र प्राण्याचे रूप घेऊन तिला घाबरवले – तथापि राधिका कसोटीस पुरेपूर उतरली. ( अप्रसिद्ध कथा )

२) मायंबा नावाच्या गुराख्यांच्या देवाने भयंकर वाघाचे रूप घेऊन भवळा गाईची व तिच्या डुब्या वासराची सत्त्वपरीक्षा घेतली. ( पुष्प ३ – कथा ७४ )

३) आतिथ्यधर्माची कसोटी पाहण्यासाठी शनिदेवांनी गलित कुष्टयाचे व मारुतीने मुलाचे रूप घेतले होते. (संपत शनिवारची कहाणी, मारुतीची कहाणी)

### क्रोध व शाप

१) आपल्याला यज्ञाच्या पुण्याहवाचनाला बसू दिले नाही म्हणून ब्रह्मदेव–पत्नी सावित्री हिने संतापून यज्ञासाठी जमलेले सर्व देव, ऋषी यांना 'नदीरूप व्हाल' असा शाप दिला. नंतर ऋषींच्या शापाने सावित्रीही नदीरूप. (पुष्प३-कथा१९)

२) सूर्यनारायणाच्या कहाणीचा अवमान करणाऱ्या राणीला दारिद्र्य - तिच्या बहिणीने मदतीसाठी पाठविलेली होनामोहरांची शिदोरी सूर्यनारायणाने घारीच्या रूपाने येऊन तर, होनामोहरांनी भरलेली काठी गुराख्याच्या रूपाने येऊन पळवून नेली. ( सूर्यनारायणाची कहाणी )

### औत्सुक्य

इंद्रलोकीच्या दोन देवता खोडियाल व पिंपळाळा यांना तहान आणि भूक म्हणजे असते तरी काय ? याचा अनुभव घ्यावयाचा होता. केवळ या औत्सुक्यापोटी त्यांनी पृथ्वीवर वटवृक्ष व पिंपळवृक्ष यांच्या रूपाने जन्म घेतला. (पुष्प ३ -कथा ७८)

### राक्षसादी योनीच्या रूपांतरशक्तीचा विनियोग

मराठी लोककथांतील राक्षसपिशाच्चादी योनी आपल्या रूपांतरशक्तीचा विनियोग सुष्ट आणि दुष्ट अशा दोन्ही हेतूंनी करते. सुष्ट हेतूत बहुधा प्रेमभावना प्रबळ असते.

### दुष्ट हेतु

१) एका ब्राह्मणस्नुषेवर राक्षसाची वक्रदृष्टी – त्याने गोसावी रूपाने गावात वास्तव्य केले. ती सून त्याच्या मठात आली असता मठासकट तिला पळवून नेले. (अप्रसिद्ध कथा)

२) सोंड्या राक्षसाच्या तावडीतून प्रेमलेला पळवून नेणाऱ्या बळीवंताचा ससाणारूपाने सोंड्याकडून पाठलाग – तो निष्फळ – वर्षानंतर अजगररूपाने नगराबाहेर वस्ती – (एक होता राजा – कथा ७)

३) राजा वनात वाट चुकला, राक्षसीने त्याला खाल्ले, राजाचे रूप घेऊन राजवाड्यात – राणीला खाल्ले – राजसंततीवरही तिचा डोळा. (पुष्प १– कथा ४५)

४) एक हडळ रानात सुन्दर स्त्रीरूप घेऊन मुसाफिरांचे स्वागत करी – नंतर खाऊन टाकी. (मराठवाड्यातील लोककथा– कथा १७)

## सुष्ट हेतु

१) मानव प्रियकराला राक्षसकन्येने गोमाशीचे रूप देऊन लपवले – राक्षस घराबाहेर गेल्यावर पुन्हा मानवरूप. (अप्रसिद्ध कथा)

२) एका ब्रह्मराक्षसाला योनीमोक्षप्राप्ती हवी होती. त्यासाठी त्याने विद्वान पंडिताच्या रूपाने एका जुन्या वाड्यात वास्तव्य करून कठोर ज्ञानसाधना केली व इच्छित प्राप्ती करून घेतली. (पुष्प ३ – कथा ९४)

## प्राणीसृष्टीकडून घडणारे रूपांतर

प्राण्यांकडून होणाऱ्या या शक्तींच्या विनियोगात दुष्टत्वाची प्रेरणा क्वचितच आढळते. वात्सल्य, अपत्यस्नेह, स्वामीभक्ती, कृतज्ञता, प्रेमळपणा इत्यादी उदात्त हेतूंचेच प्राबल्य आढळते असे पुढील लोककथांच्या उदाहरणावरून स्पष्ट होईल.

उदा.– १) कुत्रीच्या अतिमानवी सामर्थ्यामुळे तिच्या व एका बाईच्या गर्भाची अदलाबदल. कुत्रीला दोन मानवी कन्या – एक राजाघरी व दुसरी प्रधानाघरी – कुत्री त्यांच्या सासरी – राणीकडून उत्तम स्वागत – तिने राणीला स्वत: झोपल्याजागी सुवर्णाचा गोळा मिळवून दिला. (पुष्प १–कथा ४३), (तीर्थांचे सागर-कथा २)

२) राजाराणीला खाणाऱ्या व राज्यसंततीला खाऊ पाहाणाऱ्या राक्षसीचे बेत स्वामीभक्त कुत्रीने फोल ठरवले – राजपुत्र राजकन्येला पाठीवर घेऊन पलायन – दमून तिचे प्राणोत्क्रमण – तिच्या मृतदेहाचा राजवाडा, कानांचे दोन कुत्रे – नंतर कुत्र्याची भावंडांना मदत. (पुष्प १– कथा ४५)

३) सावत्र आईकडून मुलीची हकालपट्टी – तिच्याबरोबर गायही दावे तोडून तिच्याबरोबर पळाली. सावत्र बहिणींचे एकमेकांवर खूप प्रेम – सावत्र बहिणीचा विवाह – विवाहप्रसंगी वधूला बहिणीची फार आठवण – भेटीसाठी तळमळ – कपिला गाय लक्ष्मीच्या रूपाने मुलीसह मंडपात प्रकट – दुरावलेल्या बहिणींची भेट. (सांगीवांगी - कथा ३)

४) अपवादरूप कथा– वाघाला राजकन्येच्या विवाहपणाचे रहस्य समजले. मानवरूपाने येऊन पण जिंकला – विवाह – गुहेजवळ गेल्यावर खरे रूप प्रकट – दासदासींना खाल्ले – राजकन्या सदैव मरणाच्या छायेत – आपल्या भुकेच्या वेळी तिला लपून बसण्याची आज्ञा – नारायणकृपेने कालांतराने वाघाला मानवरूप. (मराठवाड्यातील लोककथा – कथा २)

**माणसांच्या रूपांतरशक्तीचा विनियोग**

विविध देवता, राक्षसादी अतिमानवी योनी, प्राणी तसेच वनस्पती यांच्याकडून घडलेल्या रूपांतराची जशी अनेक उदाहरणे मराठी लोककथांत आढळतात त्याचप्रमाणे माणसांनी केलेली रूपांतरेही दिसून येतात. माणसांच्या स्वभावांतील वैचित्र्यानुसार माणसांनी केलेल्या रूपांतरामागेही बहुविध हेतू आढळून येतात. मराठी लोककथेचे स्वरूप पाहिले तर त्यात परपीडन, शाप, संकटनिवारण, दयाळूपणा, प्रेमळपणा अशा काही हेतूंचा समावेश झालेला दिसतो. पुढील उदाहरणे पाहा.

उदा.– १) एका साधूने मंत्रसिद्धीने अनेक माणसांना पशुपक्ष्यांची रूपे देऊन बंदिवान करून ठेवले होते. त्यांतील एक हिरवा घोडा म्हणजे एक राजपुत्र होता. (मराठवाड्यातील लोककथा – कथा १०).

२) एक कामातुर जादूगार स्त्री राजकन्येच्या पतीला रात्री बासरी वाजवून मोहित करी. नंतर त्याला पोपटाचे रूप देऊन स्वतः मैनारूपाने त्याचा उपभोग घेई व नंतर त्याला मारून टाकी. त्यामुळे रोज एका तरुणाशी विवाह होई व रात्री तिचा पती परागंदा होई. (अप्रसिद्ध कथा)

३) ऋषीची तपश्चर्या भंग केल्यामुळे राजपुत्रास शाप – शापामुळे तो सर्परूप. (सांगीवांगी – कथा ३२)

४) एक मुलगा स्वतःही धर्म करीत नसे व पित्यालाही करू देत तसेच. पित्याच्या शापाने तो अर्धमत्स्य – मान व मस्तक माणसाचे व धड माशाचे – डोक्यावरील मौल्यवान हिरा दान केल्यावर त्याला पूर्वरूप. (एक होता राजा – कथा ९)

५) दुष्ट साधूच्या तावडीतून सुटण्यासाठी त्याचा शिष्य असलेल्या मुलाने साधूच्या रूपानुरूप स्वतःची अनेक रूपे बदलून शेवटी साधूला खाऊन टाकले. (अप्रसिद्ध कथा)

६) सावत्र आईकडून मुलांना विषारी लाडू – भुकेपोटी राजपुत्र भावानेच दोन्ही लाडू खाल्ले. राजपुत्र मृत – मरणानंतर बहिणीच्या पोटापाण्यासाठी भावाची खडका कोथिंबीर, तळ्यातील मासा, पोपट, मोर अशी विविध रूपे (दाते १–कथा १)

७) दुष्ट राणीने जादूगाराच्या साहृयाने सात सावत्र मुलांना बगळे बनवून आकाशात सोडले – त्यांच्या डोक्यांवर सोनेरी टोप – रात्री टोप काढले की मानव रूप – सकाळी टोप घालून पुन्हा बगळ्यांचे रूप घ्यावे लागे. (वैजयंती – कथा १७)

दैवतकथा आणि अद्‌भुतकथेतील या रूपांतरामुळे दैवतकथेतील गूढता वाढते तर अद्‌भुतकथा किंवा परीकथा यातील रंजकता वाढते.

**रूपांतरस्वरूपाची आणखी कांही वैशिष्टचे**

रूपांतर कोणाकडून घडते, कोणत्या हेतूंनी घडते, त्यांचे स्वरूप कसे असते, लोककथेच्या स्वरूपावर त्यांचा कोणता परिणाम होतो हे पाहात असताना मराठी लोककथांतील रूपांतराची अनेक उदाहरणे पाहिल्यावर त्यांतून त्यांची आणखी काही वैशिष्टचे लक्षात येतात. जसे

अ) रूपांतरशक्ती संक्रमित करता येते. एका व्यक्तीकडून दुसरी व्यक्ती ही शक्ती प्राप्त करू शकते, किंवा ही शक्ती दिली घेतली जाऊ शकते.

उदा.– १) साधूकडे शिक्षणासाठी राहिलेला त्याचा शिष्य ही विद्या गुरूकडून शिकला होता. त्यामुळे तिचा उपयोग करून त्याने स्वसंरक्षण तर केलेच, शिवाय दुष्ट गुरूला ठार मारले. (अप्रसिद्ध कथा )

२) गोसाव्याने हिरव्या घोडचात रूपांतरित केलेला राजपुत्र ही विद्या जाणत होता, त्यामुळेच एका ब्राह्मणपुत्राच्या साहृयाने तेथून पळून जाता आले. (मराठवाडचातील लोककथा – कथा १०)

३) अमोघसिद्ध या चमत्कारसिद्धी प्राप्त असलेल्या म्हाताऱ्याने महादेव नावाचा पाटीलपुत्र सांभाळला होता, त्याने ती विद्या महादेवाला शिकविली. त्यामुळे महादेवाला मारून खाल्लेला बैल पुन्हा जिवंत करता आला.

ब) रूपांतर होण्यासाठी काही वेळा एखाद्या बाहृयवस्तूच्या मदतीची गरज असते. मंत्र, सुई, टोपी, छडी, काडी, विशिष्ट पाले, विशिष्ट ठिकाणचे पाणी, अमृत, भंडारा अशा अनेक गोष्टींचा उल्लेख या संदर्भात करता येईल. रूपांतरास कारणीभूत असणारी वस्तू ज्याच्याजवळ असेल त्याच्या अंगी ती शक्ती आपोआपच संक्रमित होते. जादूची टोपी घालील तो गुप्त होईल किंवा विशिष्ट पाला खाईल ती वानर होईल अशासारखा हा प्रकार असतो.

क) रूपांतर हे बहुतांशी कालिक स्वरूपाचे असते. कायम स्वरूपाचे सहसा नसते. शापामागे उःशाप हा अपरिहार्यपणे येतोच. उन्मादावस्थेत अपराध घडला तरी उन्माद ओसरला की पश्चात्ताप होतो, क्षमायाचना केली जाते, शाप देणाराचा रागही शांत होतो व उःशाप मिळतो.

उदा.– १) ऋषीचा तपश्चर्याभंग केल्याने सर्परूप बनलेला राजपुत्र विवाहानंतर पत्नीची भेट होताच पुन्हा मनुष्य (सांगीवांगी – कथा २०)

२) विठोबाराण्याच्या शापाने मृत झालेल्या पदुबाईच्या अस्थी भक्त माळीरायाने गंगेत टाकताच त्यांचे कमल – विठोबाराणाने कमल तोडताच त्यातून पदुबाई बाहेर. (पुष्प ३ – कथा ७६)

बाह्य गोष्टींचे साह्य होऊन झालेल्या रूपांतरालाही कुठेतरी शेवट असतोच. जादूचा मंत्र निष्प्रभ करणे, जादूचा दोरा वा सुई कुणीतरी काढून टाकणे असे या रूपांतरसमाप्तीचे स्वरूप असते.

ड) रूपांतरित अवस्थेतही रूपांतरिताला बरेच वेळा पूर्वजन्मस्मरण असते, मनुष्यवाणीही असते.

मराठी लोककथांगीतांतही रूपांतरासंबधीचे कल्पनाबंध आढळतात, 'घाटावरील श्रमिकांची गीते' या अनुसूया लिमये यांच्या ग्रंथात बाळाईची व राजाईची कथागीते दिली आहेत त्यांत रूपांतर तर आहेच शिवाय पूर्वावस्थेतील जीवनाचे स्मरणही आहे. मराठी लोककथांत अशी उदाहरणे विपुल आढळतात.

उदा.– १) दुष्ट शेजारणीने राणी बनलेल्या जाईला खड्डयात ढकलले. जाई पाखरू होऊन उडून गेली. दुष्ट शेजारणीची मुलगी जाईच्या मुलासह जाई बनवून राजाकडे पाठविली गेली. राजा पत्नीमुलासह राजधानीकडे जात असता पाखराने सतत आपल्या पंखाची सावली रथावर धरली होती. राजधानीत पोचल्यावरही पाखरू रोज राजाच्या परटाकडे मनुष्यवाणीने राजाची व बाळाची चौकशी करी. परीटदादा, बाळ काय करते ? राजा काय करतो ? त्या दोघांच्या आठवणीने अश्रू ढाळी. (एक होता राजा – कथा २)

२) राजगृही राजपुत्ररूपाने राहाणाऱ्या नागाला माहीत होते की आपले खरे नाव कोणाला न सांगायची अट पाळली जाईल तोपर्यंत आपल्याला मनुष्यरूपात राहता येईल. म्हणूनच पत्नीने त्याच्या नावाचा हट्ट धरला. त्याने परोपरीने तिला हट्ट सोडण्याची विनंती केली. ( पुष्प ४ – कथा ९ ).

३) सावत्र मातांकडून जन्मतःच पुरली गेलली राजसंतती वेलांच्या रूपाने अवतरली. कोणी फुले तोडायला आले तर वेलांतून आवाज येई, तोडा पण हळूच तोडा. ( एक होता राजा – कथा ८ ).

४) वरील सर्व उदाहरणांतील रूपांतर सजीवाचे असे आहे. परंतु माणकाच्या फुलासारख्या अचेतन वस्तूंत रूपांतरित झालेल्या चंद्रप्रभेच्या भावना अचेतनत्वातही जागृत होत्या. कोणी नावडती व्यक्ती जवळ आली की फुलाच्या

पाकळ्या एकमेकांवर आपटत व जाळ निर्माण होई. ( सांगीवांगी – कथा ४.)

रूपांतरासंबंधीचे हे विविध कल्पनाबंध थोड्याफार फरकाने अन्यप्रांतीय व अन्यदेशीय लोककथांत सुध्दा आढळतात. स्टिथ थॉमसन यांच्या जगविख्यात लोककथेवरील ग्रंथात जशी याची उदाहरणे आढळतात त्याचप्रमाणे बॅरियर एल्विन यांनी प्रसिद्ध केलेल्या ओडिसा, छत्तीसगड या प्रांतांतील लोककथांतही असे कल्पनाबंध दिसून येतात. कथासारित्सागरातील बऱ्याच कथा या रूपांतरित विद्याधरांच्याच आहेत. अरेबियन नाईटस्‌मध्येही इफ्रित, मरीद, जिन असा उल्लेख असलेल्या लोकांनी केलेली रूपांतराची अनेक उदाहरणे दिसून येतात. लोककथेला सुखान्त रूप देण्यात, त्यांची रंजकता वाढवण्यात या रूपान्तरकल्पनेचा फार मोठा हातभार लागतो.

**मराठी लोककथांतील जादूच्या वस्तू**

रूपांतराप्रमाणेच जादूच्या वस्तूही लोककथांच्या अद्‌भुततेत व रंजकतेत फार मोठी भर टाकतात. लोककथांत जादूच्या वस्तूंचा उपयोग प्रचुर प्रमाणात केला जात असल्यामुळे लोककथांचा हाही एक संकेत बनलेला आहे. जादूची वस्तू ही कल्पना सर्व जगभर फार प्राचीन काळापासून रूढ झालेली आहे. जगातील लोक–साहित्य–विशारदांनी व विशेषत: लोककथांच्या अभ्यासकांनी कल्पनाबंधांची जी सूची केली आहे त्यातील जादूच्या वस्तूंसंबंधीचा जो वर्ग आहे त्यावरून त्याची कल्पना येऊ शकेल. लोखंडाचे सोने करणारा परीस, अक्षय्य अन्न देणारी द्रौपदीची थाळी, श्रीकृष्णाचे सर्वसंचारी सुदर्शनचक्र, जीवदान देणारे अमृत, इच्छित पूर्ण करणारा कल्पवृक्ष अशी कितीतरी उदाहरणे सर्वांच्या परिचयाची आहेत. लोक–कथांतून जादूच्या वस्तूंचे साहच अद्‌भुतरम्यतेसाठी व संकटमुक्तीसाठी वारंवार घेतले जाते. अरेबियन नाईट्स मधील राक्षसाला प्रकट करणारा अल्लाउद्दीनचा जादूचा दिवा अजूनही आबालवृध्दांचे मन रिझवीत असतो. रूतांतरप्रक्रियेत बऱ्याच वेळा जादूच्या वस्तूंचे साहच आवश्यक असते याचा उल्लेख केलेला आहेच. या वस्तूंत ही जादूची शक्ती कशी येते हा प्रश्न लोककथांच्या बाबतीत अप्रस्तुत ठरतो, आणि त्याबद्दल प्रत्यक्ष लोककथांतही कधीच खुलासा केला जात नाही. त्यांतील जादूचे अस्तित्व गृहीतच धरावे लागते. लोककथांतील जादूच्या वस्तूंची त्याच प्रमाणे ज्यांच्यांत काहीतरी अत्यद्‌भुत शक्ती आहे अशी प्राणिमात्रांची सूची करण्याचा प्रयत्न केला तर ही यादी फार मोठी आहे असे लक्षात येते. त्यांचे एकूण स्वरूप पाहिले तर त्यांचे काही वर्ग करता येतात. मराठी लोककथांत प्राचुर्याने आढळणाऱ्या जादूच्या वस्तूंचेही त्यांच्या स्वरूपानुसार काही विभाग पाडता येतात.

**स्वर्गीय वस्तू**

अमृत, देवीचे कंकण, शंकराचे सुवर्णपात्र, रंभेचा केस, समुद्रदेवाने दिलेले मोती वगैरे.

- सर्पदंशाने मृत झालेल्या नीळाला शंकरांनी अमृत पाजून जीवदान दिले. (अप्रसिद्ध कथा)
- अंबादास ब्राह्मणाच्या सत्त्वरक्षणासाठी देवीने आकाशात रत्नकंगण फेकताच भर आमावास्येदिवशी सर्वांना चंद्रदर्शन (पुष्प ३ – कथा ५१)
- पापी माणसाच्या स्पर्शाने काळवंडणारे व पुण्यालयाच्या स्पर्शाने झळकणारे शंकराचे सुवर्णपात्र (मराठवाड्यातील लोककथा – कथा १९)
- मुलीच्या तोंडून माणिकमोती (अप्रसिद्ध कथा)

**माणसाच्या शरिरात जादूचे अस्तित्व**

- मूठ उघडली सूविधापूर्ण बंगला, मूठ मिटली की बंगला गुप्त (पुष्प १ – कथा ४३)

**प्राण्यांच्या शरिरात जादूचे अस्तित्व**

- पाखरू बनलेल्या राणीच्या अश्रूंचे माणिकमोती. (एक होता राजा – कथा २)
- विष्ठेतून सोने देणारा घोडा (पुष्प १ – कथा ३२)

**वनस्पतीत जादूचे अस्तित्व**

- मुलाला स्थलांतरित करणारे झाड. (अप्रसिद्ध कथा)
- गाणारे झाड. (राजविलासी केवडा – कथा १)
- माणसांना वानर बनविणारा पाला. (अप्रसिद्ध कथा)

**द्रवरूप पदार्थ**

- राजपुत्राच्या अंगाला सुवास निर्माण करणारे वनगाईचे दूध. (पुष्प १ – कथा ७)
- माणसाला वानर बनविणारे एक पाणी व त्याला पुन्हा मानवरूप देणारे दुसरे पाणी. (अप्रसिद्ध कथा)
- अंधत्व घालविणारे दुधानी तलावाचे पाणी. (एक होता राजा - कथा ७)

**शरिरावर धारण करावयाच्या वस्तू**

- एका रात्रीत सात ताळाची माडी बांधणारी अंगठी. ( अप्रसिद्ध कथा )
- गुप्त करणारी टोपी. ( अप्रसिद्ध कथा )
- सर्पसंचारी खडावा. ( अप्रसिद्ध कथा )
- जलद पळणारे बूट. ( एक होता राजा – कथा १ )
- अक्षय्य धन देणारी पिशवी. ( अप्रसिद्ध कथा )

**जादूची शस्त्रे**

- वडविणारा सोटा. ( पुष्प १ – कथा २५, ३२ )
- कोणाशीही लढणारी काठी. ( अप्रसिद्ध कथा )

**शस्त्रसम वापरल्या न जाणाऱ्या शस्त्रसम छोट्या वस्तू**

- बाग निर्माण करणारी सुई. ( एक होता राजा – कथा १ )
- अन्न देणारी छडी. ( अप्रसिद्ध कथा )
- समुद्र दुभंगणारी छडी ( राजविलाशी केवडा – कथा ६ )

**वाद्ये**

- कोणी पळवून नेऊ लागले तर आपोआप वाजणारी सारंगी ( पुष्प १ – कथा ३३ )
- सुखदुःखाचे पावे, बासरी, तुतारी. (दाते २ कथा १०, पुष्प – कथा ७)
- मारणाऱ्या चिपळ्या ( अप्रसिद्ध कथा )

**भांडी**

- हवे ते देणारे मडके ( पुष्प – १ कथा २ )
- अन्न देणारा ठिला (पुष्प १ – कथा ३२ )
- स्वतः चालणारी, हवे ते काम करणारी, मनुष्यवाणीने बोलणारी कळशी ( पुष्प १ – कथा ३५ )
- हवे ते देणारा, मनुष्यवाणीने बोलणारा फुटका हंडा. ( सांगीवांगी – कथा १७ )

**संकीर्ण वस्तू**

- फेकला जाताच काटेरी वन निर्माण करणारा कंगवा. (सांगीवांगी – कथा ६ )

० फेकला जाताच अग्नी निर्माण करणारा कोळसा (पुष्प १ – कथा ४५)
० जंगल निर्माण करणारे कळकीचे बी. ( एक होता राजा – कथा १० )
० पक्वान्न देणारी विहीर ( पुष्प १ – कथा ४१ )

या विविध स्वरूपाच्या विपुल जादूच्या वस्तूंमुळे लोककल्पनाशक्तीच्या सामर्थ्याची कल्पना येते. लोककथेत कल्पनारम्यता येते. मानवी मर्यादांवर त्यामुळे मात करता येते. अपेक्षापूर्तीचे सुख घेता येते. आबालवृद्धांना लोककथा सारखीच प्रिय होते. विशेषतः बालमनावर त्याचा विशेष प्रभाव पडतो.

मराठी लोककथांत आढळणाऱ्या जादूच्या या विविध वस्तूंच्या साह्याने प्रबल दुष्ट शक्तींवर सहज विजय मिळविता येऊन लोककथा सुखान्त होण्यास मदत तर होतेच, शिवाय अद्‌भुतरम्यताही प्रचुर प्रमाणात निर्माण होते.

**नाट्यपूर्णतेचा भार उचलणारे संकेत**

मदतनीस, रूपांतर, जादूच्या वस्तू हे संकेत प्रामुख्याने सुखान्तस्वरूपाला मदत करणारे असतात. तथापि लोककथेतील नाट्यपूर्णता आणि उत्कंठावर्धक वातावरण यांच्या निर्मितीसाठी निषेधकल्पना, विवाहपण आणि प्रतिज्ञा अशा काही इतर संकेतांची प्रामुख्याने मदत होते किंवा त्यांना संकटमूलक संकेतही म्हणता येईल. त्यांच्यामुळेच कथेमध्ये समस्या वा संघर्ष निर्माण होतो. कथेत नाट्य निर्माण होते.

**१) निषेधकल्पना**

पारंपरिक समाजजीवनात विधिनिषेधांना फार महत्त्वपूर्ण स्थान असते. त्यामुळे समाजव्यवहाराचे एकप्रकारे नियमन होते. समाजाचे प्रत्यक्ष – अप्रत्यक्षपणे चित्रण असणाऱ्या लोककथांत विधिनिषेधांचा विशेषतः उल्लेख असणे स्वाभाविकच आहे. निषेधकल्पना हा लोककथांत दिसून येणारा एक वेगळाच संकेत आहे. निषेधाला मनाई किंवा बंधन असेही म्हणता येते. इंग्लिश भाषेत त्याला Taboo अशी संज्ञा आहे.

निषेधकल्पना फार पुरातन कालापासून जगात प्रस्तुत झालेली आहे. युरोपीय संस्कृतीतील ॲडम ईव्हने खाल्लेल्या फळाचे उदाहरण प्रसिद्धच आहे. रामायणात सीतेला घातलेली लक्ष्मणरेषा, चतुर्थीला वर्ज्य असलेले चंद्रदर्शन सर्वांच्या परिचयाचे आहे. माणसावर निर्बंध घातला की त्या निर्बंधाचा भंग तो का करतो याचे कारण मानवी जडणघडणीत शोधावे लागते. बहिणाबाई चौधरी यांनी मनाला ओढाळ गुराची उपमा दिली आहे. माणसाचे मन नेहमी बंधन तोडायला उत्सुक असते.

बालपणापासून ते वार्धक्यापर्यंत आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यात ही बंडखोर प्रवृत्ती त्याची सदैव साथ करीत असते. प्रबल अनावर मनःप्रवृत्तीचे दर्शन लोककथांतून सदैव होत असते. मराठी लोककथांनीही या निषेधकल्पनेच्या संकेताचे पालन केलेले आढळते. लोककथेत या निषेधकल्पनेची मांडणीही बहुधा सांकेतिकच असते. निषेधाचा आदेश, निषेधभंग, आपत्ती आणि आपत्तीपासून सुटका. काही वेळा मात्र आपत्तीतून कधीच सुटका होत नाही. उदा. –

**अ) मागे वळून न पहाणे**

१) अन्नपूर्णा परीला मिळविण्यासाठी गेलेल्या मुलाने पऱ्यांची वस्त्रे पळविताना मागे पाहावयाचे नव्हते. मुलाने मागे पाहिल्याने त्याला पाषाणरूप – मार्गदर्शक साधूच्या मंत्राने पुन्हा मानवरूप. ( पुष्प ४ – कथा ८ )

२) सोनेरी पाणी, गाणारे झाड व बोलणारे पाखरू घेऊन जाताना मागे पाहिल्याने दोन राजपुत्र भावांना शिळारूप – राजकन्येने न पाहता दुर्मिळ वस्तू आणल्या. सोनेरी पाण्याने भावांना पुन्हा मानवरूप. (राजविलासी केवडा – कथा १ )

**ब) गुप्त गोष्ट उघड न करणे**

१) वाणीपुत्राला पक्ष्यांच्या बोलण्यातून राजपुत्रावर येणारी सर्व आगामी संकटे समजली – ही गुप्त गोष्ट उघड करणाराला शिळा होऊन पडण्याचे शासन– सर्व संकटे त्याने निवारली – राजपुत्राच्या हट्टामुळे गुप्त गोष्ट उघड करावी लागली – वाणीपुत्र शिळारूप – राजपुत्राच्या प्रथमपुत्राच्या बळीने त्याला पुन्हा मानवरूप ( अप्रसिद्ध कथा )

२) आपण पाहिलेल्या अजब गुहेबाबत कुणाला काही न सांगण्याची भोऱ्या गुराख्याला अट – लोकांच्या धाकाने सांगावे लागले – भोऱ्या गतप्राण. ( पुष्प ३ – कथा ५० )

३) भावजायीच्या जाचाला कंटाळून बाहेर पडलेल्या स्त्रीला देवीने इच्छित गोष्टी पूर्ण करण्यास हंडा दिला. त्याबद्दलची जादू उघड करावयाची नव्हती. ( ही अपवादात्मक कथा जादू उघड झाली नाही. कारण डोळ्यावर येईल अशी प्राप्ती तिने हंड्यापासून करून घेतली नाही. )

**क) विशिष्ट वस्तू न खाणे**

एक निषिद्ध केळ खाल्याने ब्राह्मणाला शिंगे प्राप्त – विशिष्ट पाला खाल्याने शिंगे नष्ट (अप्रसिद्ध कथा)

ड) संकीर्ण निषेध

१) घोड्याचे खोगीर विकावयाचे नाही :

गुरूकडून अतिमानवी विद्या शिकून आलेल्या मुलाने एक क्रम सुरू केला — तो रूपांतरित प्राणी होई — पिता बाजारात विकी, नंतर तो पुन्हा मानवरूपाने घरी येई — एका घोडा रूपाने विक्रीस खोगीर विकू नका असे मुलाने बंधन घातले होते — पित्याने पैशाच्या लोभाने खोगीरही विकले — विकत घेणाऱ्याचा मुलावर ताबा निर्माण (अप्रसिद्ध कथा)

२) कवडीवरचे वस्त्र काढावयाचे नाही :

लक्ष्मीने प्रसन्न होऊन एका गरीब बाईला एक कवडी दिली. तिची दरवर्षी नवीन कापड गुंडाळून पूजा करावयाची. पुढील वर्षी कापड गुंडाळताना पहिले काढायचे नाही अशी देवीची अट होती. (खानदेशी लोककथा— कथा ४)

३) राजपुत्रांना राजवाड्याबाहेर १२ वर्षे पाठवावयाचे नाही :

एक गोसाव्याने नावडत्या राणीला सांगितले — मुले आईचा डोळा चुकवून गेली. सावत्र आईच्या तावडीत सापडली. त्यांना हद्दपार करण्यात आले—(पुष्प २ कथा ५)

४) पूर्वी समुद्रकाठी भाकरीचे पीठ — हवे तेवढे न्यायचे पण घरी साठवावयाचे नाही. अशी अट — एका बाईने अट मोडली — आता समुद्रकाठी वाळू. (दाते १ कथा १२)

निषेधाच्या भंगामुळे संकटे येणे, आपत्ती येणे, दुःखी होणे अशा प्रकारचे चित्रण मराठी लोककथेत आढळते. अशा तऱ्हेचे विविध निषेध मराठी लोककथांत दिसून येतात. त्याचे स्वरूप सांकेतिक असते. मराठी कहाण्या वा व्रतकथांतही काही निषेधकल्पना आढळतात, नागपंचमीच्या दिवशी कुणी खणायचे, चिरायचे नसते, हरितालिकेच्या दिवशी स्त्रियांनी काही खायचे नसते अशा रूढी सर्वज्ञात आहेत.

स्वयंनिर्बंध

उपरोक्त सर्व बंधने ही कुणीतरी कुणावर तरी घातलेली होती काही वेळा माणूस स्वतःच बंधन घालून घेतो. ही बंधने स्वेच्छेने घालून घेतलेली असल्याने त्यांचा भंग सहसा होत नाही. हे पुढील मराठी लोककथांतून दर्शविले आहे.

उदा.— १) राजाची चर्मव्याधी एका ठिकाणच्या पाण्याने बरी — तेथे देवीचे देऊळ बांधावयाचा राणीचा नवस — देऊळ पुरे होईपर्यन्त अन्नग्रहण न करण्याचे

राणीचे स्वतःवर बंधन – पत्नीप्रेमामुळे राजाचाही अन्नत्याग. (राजविलासी केवडा- कथा ३)

२) रोज रूद्रावर्तनपूर्वक शिवपूजा झाल्याशिवाय जगन्नाथपंताचे अन्नग्रहण नाही. (पुष्प ३– कथा २)

३) राजकन्येचे स्वयंबंधन, 'पुरुषदर्शन वर्ज्य' (एक होता राजा–कथा ५)

स्वतःहून पाळलेले नियम, लादलेले किंवा स्वीकारलेले निर्बंध आणि रूढ निषेध यांतील सीमारेषा लोककथांत फारच विरळ असतात या तिहींचेही स्वरूप कमीअधिक प्रमाणात सांकेतिकच असते.

**सक्तीचे निर्बंध**

मराठी लोककथांतील बऱ्याचशा निर्बंधांचे स्वरूप हे निषेधपर असते म्हणजे 'करावयाचे नाही' असे असते. तथापि काही निर्बंध याउलट सक्तीच्या स्वरूपाचे असतात.

उदा.–१) नारायण आणि माऊली ही बहीण-भावंडे एकादशीला पंढरपूरला जात. रात्रीतून जाऊन यायचे बंधन ते पाळीत. (पुष्प ३– कथा ६४)

२) 'सूर्योदयापूर्वी विवाह झालाच पाहिजे' असे बंधन जोगाई देवीने घातले होते. (मराठवाड्यातील लोककथा– कथा २७)

निषेधकल्पनेने लोककथांच्या रंजकतेत फार मोठी भर पडते हे या अनेक उदाहरणांतून प्रतीत होते. मदतनीस, रूपांतर, जादूच्या वस्तू या संकेतांना लोक-कथेच्या कथासत्रात जसे अविभाज्य स्थान असते तसे निषेधकल्पनेला असतेच असे म्हणता येणार नाही किंवा लोककथांत ते संकेत जितक्या अपरिहार्यपणे येतात तशी निषेधकल्पना येईलच असे नाही. तथापि जेथे जेथे तिचा लोककथेत प्रवेश होतो तेथे कथेच्या रंजकतेत फार मोठी भर पडते हे नाकारता येणार नाही. कथेत नाट्य-पूर्णता निर्माण होण्यास निषेधकल्पनेला फार भरीव मदत होते. कथेतील घटनांच्या सरळ ओघाने आकस्मिक खंड पडून वळणे निर्माण होतात आणि कथेची आकर्षकता वाढते. श्रोत्यांचे श्वास रोखले जावेत असे चमत्कृतिपूर्ण व उत्कंठावर्धक वातावरण तयार होते आणि म्हणूनच अगदी अपरिहार्यतेने जरी नव्हे, तरी प्राचुर्याने लोक-कथांतील निषेधकल्पनेचा उपयोग केलेला आढळतो.

**मराठी लोककथांतील विवाहपणांचे व प्रतिज्ञेचे स्वरूप**

विवाह ही स्त्री-पुरुष दोघांच्याही आयुष्यातील एक महत्त्वाची घटना. दोघेही वैवाहिक जीवनाबद्दलची, जोडीदाराबद्दलची सुखस्वप्ने रंगवीत असतात.

सुन्दर, सद्गुणी, अनुरूप पत्नी प्रत्येक पुरुषाला हवी असते, तर श्रीमंत, सद्गुणी, पराक्रमी, सुस्वरूप पती मिळावा असे प्रत्येक तरुणीला वाटत असते. तथापि सर्व-सामान्य माणसांना तसा हट्ट वा पण करता येत नाही. त्यामुळे विवाहासाठी लावलेल्या पणांचे, अटींचे अस्तित्व वा प्राबल्य राजपरिवारातच आढळेल यात नवल नाही. लोककथांतील राजकन्यांचा विवाह पण लावूनच व्हावा असा संकेतच रूढ झालेला आहे. राजपरिवाराजवळ सत्ता असते, समृद्धी असते आणि या दोन्हींपोटी असणारा दुराग्रह व तऱ्हेवाईकपणाही असतो. त्यामुळे या विवाहपणाचे अवलोकन चांगलेच रंजक ठरते.

'स्वयंवरासाठी पण' ही कल्पना पुराणकालापासून भारतात रूढ झालेली आहे. सीतेच्या आणि द्रौपदीच्या स्वयंवरासाठी लावलेले पण सर्वांनाच माहीत आहेत. दमयंतीच्या स्वयंवराला पण नव्हता तर तिला खऱ्या अर्थाने स्वयंवरणाचा अधिकार मिळालेला होता. मराठी लोककथांत राजपरिवार प्राचुर्याने चित्रित केलेला असल्याने त्यात विवाहपणाचे अनेकविध दर्शन घडते. स्वयंवराचा पण लावण्यामागे नेहमीच काही ना काही विशिष्ट हेतू असतो. सीतास्वयंवराच्या पणातून शक्तीची कसोटी होती तर द्रौपदीच्या स्वयंवरपणातून एकाग्रतेची व अचूक नेमबाजीची. मराठी लोककथांतील विवाहपणांच्या मागेही विविध हेतू दडलेले असतात.

**पराक्रमाला आव्हान**

पुराणकथांप्रमाणेच मराठी लोककथांतील राजकन्येच्या विवाहासाठी लावलेल्या काही पणात पुरुषांच्या पराक्रमाला आणि साहसाला आव्हान दिलेले आढळते. जसे –

- घोड्यांच्या शर्यतीत पहिला येणे (पुष्प १ – कथा २)
- मोठा स्तंभ पाडणे

**संकट निवारण**

राज्यावर संकटे मधूनमधून येतच असतात. तथापि मराठी लोककथांतील राजाचे चित्रण पूर्णतया पराक्रमशून्य आणि निष्क्रिय स्वरूपाचे आहे. राज्यावर येणारी संकटे तो स्वपराक्रमाने किंवा सैनिकांच्या साह्याने कधीही दूर करीत नाही. राजकन्येला व बहुधा अर्धे राज्यही पणाला लावणे हा संकटनिवारणाचा एकमेव मार्ग त्याला ज्ञात असतो. धाडशी व पराक्रमी तरुणांना त्यांतून उत्तेजन मिळते हे अंशतः खरे असले तरी राजाची पराक्रमशून्यता व निष्क्रियता हे त्यातील मर्मस्थान आहे. राजजामात होण्याच्या आणि राजवैभवाच्या आशेने तरुण पणाची पूर्ती करण्यास उद्युक्त होतील अशी राजाला खात्री असते.

उदा. ० हत्तींनी पळविलेल्या कानसीपात्रेला हत्तींच्या तावडीतून सोडवून आणणाऱ्याला राजकन्या द्यायचा पाताळदेवाचा पण. (एक होता राजा– कथा १०)

० राज्यात धुमाकूळ घालणाऱ्या लावसटीला मारील त्याला राजकन्या द्यायची. (तीर्थांचे सागर – कथा ५)

**दुर्मिळ अलौकिक पतीची इच्छा**

राजा संकटनिवारणासाठी राजकन्येच्या विवाहपणाचा बहुतांशी उपयोग करतात. राजकन्येचे हेतू मात्र काहीसे वेगळे असतात. आपला पती काहीसा जगावेगळा, दुर्मिळ गुणांचा अलौकिक असावा अशी तिची इच्छा असते.

० डाळिंबा राणीला 'पायावर पद्म असलेला' पती हवा. (अप्रसिद्ध कथा)
० 'सोनेरी केसाचा' पती हवा. (अप्रसिद्ध कथा)
० 'सोनेरी अंगाचा' पती हवा. (पुष्प १ – कथा ७)

**कलाप्रियता**

काही कलाप्रिय राजकन्यांना कलावंत पती हवा असतो.
० चांगले गाणे म्हणणाराच पती हवा. (पुष्प २ – कथा ५)
० सोंगट्या खेळण्यात जो जिंकेल त्याच्याशी विवाह. (सांगीवांगी कथा ९)

**गुणग्राहकता**

० राजकन्येच्या प्रश्नांची योग्य उत्तरे देणाराला राजकन्या मिळणार होती. (तीर्थांचे सागर – कथा ६)

० अजिबात न बोलणाऱ्या राजकन्येला चतुराईने बोलायला लावील त्याला राजकन्या मिळणार होती. (सुंबरान माडीलं – कथा ६)

**तऱ्हेवाईकपणा**

विवाहासाठी लावलेले पण काही वेळा फारच विचित्र व बरेच वेळा अगदीच क्षुद्र असतात. त्यांबाबतीत काही वेळा राजकन्यांचा तऱ्हेवाईकपणा असतो तर कधी राजाचा.

० सात राजकन्यांना एकच पती हवा होता. (पुष्प ४- कथा २)

० राजाच्या हातातील क्षुद्र किडा ओळखणाराला राजकन्या द्यायचा पण. (अप्रसिद्ध कथा)

० यावरून मराठी लोककथांतून येणारे विवाहपण दोन प्रकारचे असतात असे दिसून येते. एक तर राजकन्येच्या वडिलांनी म्हणजे राजाने स्वतःच्या हेतू-

साठी लावलेला पण आणि दुसरा योग्य व स्वतःच्या इच्छेप्रमाणे पतीची निवड करण्यासाठी राजकन्येनें लावलेला विवाहपण.

त्यातून राजकन्येच्या भूमिकास्वरूप पात्रावर विशेष प्रकाश पडतो. राजपुत्र व राजकन्या यांच्या भूमिकापात्रांत एवढी तफावत का पडावी हा प्रश्नही चिंतनीय आहे.

**राजपुत्राचे पण**

राजपुत्राच्या विवाहासाठी राजाने पण लावलेला आढळत नाही तथापि स्वतः राजपुत्राने स्वतःच काही पण किंवा अटी घातलेल्या आढळतात.

- सात बहिणींशी विवाह करण्याचा पण. (पुष्प ४ – कथा २)
- आपल्या प्रश्नांची योग्य उत्तरे देणारीला पत्नीपद द्यायचे. ( अप्रसिद्ध कथा )
- चतुराईने थक्क करणारी मुलगीच पत्नी म्हणून हवी. (मराठवाड्यातील लोककथा – कथा २९ )

**सामान्य मुलाचा हट्ट**

आपल्याला जीवनात चांगला जोडीदार मिळावा अशी खूप इच्छा असली तरी सामान्य माणसाला तसा आग्रह धरता येत नाही. तथापि अशी आग्रही व्यक्तिरेखा सुद्धा, अपवादांनी का होईना, पण मराठी लोककथेत आहे. येथे विवाहाचा पण असे म्हणण्यापेक्षा विवाहासाठी हट्ट असा शब्दप्रयोग उचित ठरेल.

- एका सुंदर, सशक्त परंतु अत्यंत आळशी शेतकरीपुत्राचा राजकन्येशीच विवाह करावयाचा हट्ट. ( तीर्थांचे सागर – कथा १० )

**पणाची यशस्वी पूर्ती**

या पणांचे स्वरूप पाहिल्यावर त्यांतील काही पण कसे काय **पूर्ण होणार;** की ते पूर्ण होणारच नाहीत असे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु लोक**कथांत तसे** कधी घडत नाही, घडणार नाही. राजकन्या कधीही अविवाहित **राहत** नाही. पणाची पूर्ती करू पाहणारे बरेच उमेदवार फसतात, कैदेत पडतात किंवा क्वचित देहदंडासही पात्र ठरतात, परंतु कुणीतरी यशस्वी होतेच. जे दैवी गुण अपेक्षित असतात. ( सोनेरी केस, पायावर पद्म ) ते कुणाजवळ तरी असतातच. दैवी मदतीच्या साहाय्याने का होईना, पण अवघड कामेही पार पाडली जातातच. फार काय सात बहिणींना एकच पती हवा असेल तर सात बहिणींशीच विवाह करू

इच्छिणारा राजपुत्रही असतोच. तऱ्हेवाईक पणांची पूर्तीही तशीच विचित्र तऱ्हेने का होईना, परंतु निश्चित होते. राक्षस, वाघ, भिकारी, चांभार असा राजकुलाला न शोभेसा पती वाट्याला येतो, परंतु पण हा पूर्ण होतोच. राजकन्येशीच विवाह करू इच्छिणाऱ्या शेतकरीपुत्राच्या प्रेमाचाही विजय होऊन स्वत: राजकन्येने खुषीने त्याच्याशी विवाह केलेला आढळतो.

### विवाहोत्तर आयुष्याबद्दलच्या प्रतिज्ञा

विवाहपण हे विवाहपूर्व लावले जातात. विवाहोत्तर आयुष्याबद्दलच्या काही प्रतिज्ञा ही मराठी लोककथांत आढळतात या प्रतिज्ञा फक्त स्त्रियांनीच केलेल्या असून त्यात पतीबद्दलच्या अपेक्षा व्यक्त होण्यापेक्षा स्वत:च्या चातुर्याबद्दलचा आत्मविश्वास अधिक व्यक्त होतो. पती कसाही मिळो, कितीही गरीब मिळो. त्यातून यशस्वीपणे मार्ग काढण्याची त्यांची प्रतिज्ञा असते.

- तीन दाण्यांवर संसार करण्याची शेतकरीकन्येची प्रतिज्ञा. (अप्रसिद्ध कथा)
- एका कवडीवर संसार करण्याची एका ब्राह्मणकन्येची प्रतिज्ञा तर तिच्या बहिणीची नवऱ्याच्या नाकाला चुना लावून पळून जाण्याची प्रतिज्ञा. ( अप्रसिद्ध कथा )

अशा उदाहरणांतही या प्रतिज्ञा आपल्या चातुर्याच्या बळावर त्या त्या मुलीने पूर्ण केलेल्या आहेत.

विवाहपण वा प्रतिज्ञा करून त्या पूर्ण करून दाखवण्यात माणसाच्या इच्छाशक्तीची, चातुर्याची, पराक्रमाची, धाडसाची कसोटी लागते. जिद्दीचे दर्शन होते. अशा माणसांबद्दल इतरांना नक्कीच कौतुक वाटते. लोककथांतील विवाहपण आणि प्रतिज्ञा यांच्या अस्तित्वामुळे उत्कंठा वाढविण्याचे काम उत्तम तऱ्हेने होते.

### मराठी लोककथांतील यशस्वी धाकटे अपत्य

'नकटे व्हावे पण धाकटे होऊ नये' अशी मराठीत एक म्हण आहे. भावंडांत धाकटे असणे हा जणु दुर्दैवाचा भाग मानला जावा असा हा म्हणीचा रोख आहे. प्रत्यक्ष दैनंदिन जीवनात देखील धाकटे होण्याचे अनेक तोटे अनुभवाला येत असतात. आजीआजोबा, आईवडील यांच्यासारख्या ज्येष्ठ असणाऱ्या माणसांच्या गाठी अनुभवाची बरीच मोठी शिदोरी असल्याने त्यांच्यापुढे सतत नम्र राहणे, त्यांच्या आज्ञेला मान देणे यांत गैर वाटण्याचे काहीच कारण नाही. तथापि वयाने केवळ थोडी वर्षे ज्येष्ठ आहेत. म्हणून सतत वडील भावंडांची मर्जी सांभाळणे हे धाकट्या भावाला नक्कीच अपमानास्पद वाटत असेल. परंतु प्रत्यक्ष व्यवहारात ही ज्येष्ठ

भावंडांची कुरघोडी झुगारून देता येत नसली तरी मानवी मनाच्या अतृप्त इच्छांचे कोड पुरविणाऱ्या लोककथा मात्र यशाचे माप धाकट्याच्या पदरात टाकून त्याच्या कनिष्टत्वाची बोच नक्कीच कमी करतात. लोककथांत नेहमी धाकटे अपत्यच सरस, यशस्वी व्हावे असाच संकेत रूढ झालेला आढळतो. या संकेताला, कथा सुखान्त व्हावी म्हणून ज्या काव्यगत न्यायाची ( Poetic Justice ) कास धरली जाते, त्या न्यायाचाच प्रकार मानावा लागेल. पीडकाची फजिती आणि पीडिताला दिलासा हेच त्याचेही प्रमुख सूत्र असते.

**धाकटेपणा हीच प्रमुख पात्रता**

नेहमी यशस्वी होणाऱ्या धाकट्या अपत्याच्या व्यक्तिमत्वात मात्र वैचित्र्य आढळते. कधीकधी ते मोठ्या भावंडांपेक्षा अधिक सद्‌गुणी, चतुर असते म्हणून यशस्वी होते. तर काही वेळा मात्र ते बाह्यत: मूर्ख, व्यसनी किंवा क्वचित वेडसरही असते. तथापि त्याचे दुर्गुणच त्याला हितकर ठरतात किंवा कधी ते इतरांच्या मदतीने यशस्वी होते. स्टिथ थॉम्पसन् म्हणतात, 'सामान्यत: अशा प्रकारच्या कथांत धाकटे अपत्य, कधी त्याचे रूप व अयोग्य सवयी किंवा इतरांकडून वेळोवेळी त्याला मिळणारी वाईट वागणूक यांच्यामुळे विशेष निराशाजनक (Unpromising) दिसते. हे खरे आहे, परंतु अशा नायक वा नायिकांचा कनिष्ठ असणे हाच गुण असतो याचा विसर पडू दिला जात नाही'. धाकटे अपत्य गुणी असो वा अवगुणी, धाकटेपण हा त्याचा सर्वांत उपकारक पात्रतानिकष असतो. मराठी लोककथांतही या संकेताचे पालन केलेले आढळते.

**यशस्वी धाकटा मुलगा**

लोककथेतील धाकटा भाऊ शौर्य, धैर्य, उदारता, क्षमाशीलता या गुणांनी मंडित असतो. मराठी लोककथा याला अपवाद नाहीत. त्याला त्याचे नशीब, दैव सतत साथ देते. त्यामुळे तो अंती यशस्वी होतो असे दर्शविणाऱ्या कथा मराठी लोककथांतही आढळतात.

यशस्वी धाकट्या मुलाला चित्रित करणाऱ्या कथा अधिक प्रमाणात असतात. त्यांच्या तपशिलांत मात्र थोडेसे वैचित्र्य आढळते.

**अ) धाकट्या मुलाला दैवी गुणांची देणगी**

१) चार राजपुत्र – धाकट्याच्या पायावर पद्म – पायावर पद्म असणाऱ्या मुलाशीच लग्न करण्याचा पण असणाऱ्या राजकन्येशी त्याचा विवाह.(अप्रसिद्ध कथा)

२) साधूजवळ शिक्षणासाठी दोन भाऊ – साधूजवळची अतिमानवी शक्ती धाकटयाने ग्रहण केली व तिच्या साह्याने गुरूचा पराभव करून स्वतःची सुटका करून घेतली. (अप्रसिद्ध कथा )

**ब) गुणी आणि यशस्वी धाकटा भाऊ**

बरेच वेळा गुणी धाकटया भावाला दुष्ट, मत्सरी मोठया भावाशी सामना करावा लागतो.

१) राजाला तीन मुले – राजाचा अकाली मृत्यू – शेजारच्या राजाचे आक्रमण – भावांचा पराभव – धाकटयाने मोठया युक्तीने एका भुताला एका पिशवीत बंद करून त्याच्याकडून हवे ते देणारी पिशवी मिळविली व त्या पिशवीच्या साह्याने यम, विष्णू, शंकर यांच्यावरही मात करून स्वर्गवास मिळविला. (अप्रसिद्ध कथा )

२) राजाला अद्भुत स्वप्न – स्वप्नाचा अर्थ शोधण्यास सर्व राजपुत्र गेले – लहान राजपुत्राने म्हातारीच्या साह्याने ते स्वप्न साकार करणाऱ्या चार राक्षसींना आणले – मोठया भावांनी त्याचे श्रेय उपटण्याचा प्रयत्न केला परंतु मोठया भावांची फजिती – धाकटयाने पित्याला स्वप्नाचा अर्थ सांगितला. (अप्रसिद्ध कथा )

३) एका ब्राह्मणकन्येचे भविष्य 'लग्नात वैधव्य' – सातासमुद्रापलीकडील सोमा परटिणीस आणले तर संकट निवारण – ब्राह्मणाला सात मुले – सातासमुद्रापलीकडे जाण्यास सर्व नाराज – ब्राह्मण दुःखाने स्वतःला निपुत्रिक म्हणवून घेवू लागला – धाकटा तयार – हालअपेष्टा सोसून सोमेस आणले. (सोमवती अवसेची कहाणी - कहाणी भाग १)

४) दारिद्र्याने गांजून लाकूडतोडयाने सात मुलांना रानात नेऊन सोडले. त्याच्या धाकटया मुलाने चतुराईने राक्षसास मारले. भावासह घरी परत. (एक होता राजा – कथा १)

**क) बाह्यतः मूर्ख, वेडसर, तरीही यशस्वी धाकटा भाऊ**

१) राजाकडून तीन मुलांना समान पैसे – धाकटा अडाणी – पैशातून मांजर, कुत्रा, नाग विकत घेऊन परत घरी – राजाने रागावून हाकलून दिले – नागास सोडले – नागाने प्रसन्न होऊन हवे ते देणारी मुद्रिका दिली – तिच्या साह्याने राजकन्येचा विवाहपण ( रात्रीत सात ताळाची माडी बांधणे ) जिंकला. (पुष्प २ – कथा ३)

२) चार भावांतील धाकटा वेडसर – मोठे भाऊ हाल करीत – नीट अन्न-वस्त्रही नाही – धाकटयाला घोडा हवासा वाटला – मोठयांनी चेष्टा केली, घोडयांच्या शर्यतीत पहिला येऊन राजकन्या मिळवणार आहेस का ? – धाकटा रानात रडत बसला. देवाला दया – हवे ते देणारे मडके दिले – धाकटा खूप श्रीमंत घोडयांची शर्यत जिंकून अर्धेराज्य व राजकन्या मिळविली. (पुष्प १ – कथा २)

**अपवादात्मक कथा**

१) राजपुत्र जगदेवरात्र हा नावडतीचा मुलगा पण आवडतीच्या मुलापेक्षा ज्येष्ठ – सावत्र आई व प्रधान यांच्या कारस्थानामुळे मात्रागमनाचा आरोप व हद्दपार – वनवासात दिवस – अनेक संकटे पार करून आपल्यावरील आळ घालविला. (एक होता राजा – कथा ६)

२) ललितापंचमीचे व्रत थोरला भाऊ सातत्याने करी परंतु धाकटा व्रताची हेळसांड करी – त्याला दारिद्रय. (ललितापंचमीची कहाणी – कहाणी भाग २)

**यशस्वी धाकटी मुलगी**

धाकटया भावाप्रमाणेच धाकटी मुलगी ही देखील नेहमी यशस्वी ठरणारी व्यक्तिरेखा आहे. भावंडांत धाकटी बहीण हुषार असते किंवा सगळया बहिणीच असल्या तर त्यांच्यांत धाकटीच हुषार असणे हे लोककथांत आढळणारे नेहमीचेच चित्र आहे. ही धाकटी बहीण वा मुलगी मात्र नेहमी सद्‌गुणीच असते. लहान मुलगा बरेच वेळा असा वरकरणी मूर्ख असतो तसा प्रकार मुलीच्या बाबतीत मात्र आढळत नाही. आपल्या अंगच्या चतुराईचा, हुषारीचा उपयोग करूनच ती यशस्वी होते.

**बहिणींशी स्पर्धा**

मराठी लोककथांत ज्याप्रमाणे भावंडात संघर्ष होतो व त्यात लहान भाऊ गुणी असल्यामुळे यशस्वी होतो त्याचप्रमाणे बहिणींतही लहान बहीण अधिक कर्तृत्ववान व गुणी चितारलेली असते.

भावा-भावांत जशी तेढ असते तशी बहिणी-बहिणींतही असू शकते आणि त्यात धाकटी यशस्वी होते. जसे–

१) तिघी बहिणी - आपापल्या इच्छेनुसार राणी, प्रधानपत्नी, आचार्यपत्नी, झाल्या – धाकटी (राणी) गर्भवती – दोघींना द्वेष – तिची नवजात मुले पळविली – मुलांच्या जागी निर्जीव वस्तू – धाकटीला सुळावर चढविले – बोलणाऱ्या झाडा-कडून राजाला सत्यकथन – सुळी गेलेली राणी पुन्हा जिवंत – दोघी बहिणींना

शिक्षा. (राजविलासी केवडा – कथा १)

२) गरीब लाकूडतोड्याच्या सात मुलींत धाकटी हुषार – तिच्यावर वडिलांची जास्त माया – इतरांचा रागराग – गरिबीमुळे मुलींना रानात सोडले– राक्षसाच्या घरी पोचल्या, युक्तीने राक्षसाला मारले – त्याचे धन मोठ्या साही– जणींनी पोत्यात भरले, धाकटीने गोवऱ्यात लपवून घेतले – वाटेत चोरांनी पोती पळविली – हिच्या गोवऱ्या शाबूत – घरी पोचल्या – फक्त धाकटीजवळ धन – वडील आणखीच खूष. (तीर्थांचे सागर – कथा ९)

३) 'वडिलाच्या नशिबाने खाण्याचे' नाकारून 'स्वतःच्या नशिबाची' यशस्वी प्रचीती पित्याला आणून देणाऱ्या राजाच्या वा इतर कुणाच्याही मुली नेहमी धाकट्याच असतात, मोठ्या सर्वजणी 'पित्याचे नशीब' मान्य करतात, परतु धाकटी मान्य करीत नाही. आपला अहंकार दुखावल्याने तिला मुद्दाम दुर्दैवाच्या खाईत फेकणाऱ्या पित्याचा नेहमीच भ्रमनिरास होतो., (दाते १ – कथा १० ) ( मराठवाड्यातील लोककथा – कथा १० ), ( सुंबरान मांडील – कथा २१ ), ( सांगीवांगी – कथा ८ ), ( वर्णसटीची कहाणी – कहाणी भाग २ ) असे या कथाविशेषाचे सहा पर्याय मराठी लोककथांत आढळतात.

### धाकट्या बहिणीकडून वडील भावांची सुटका

वडील भावांच्या सुखासाठी वेळप्रसंगी आपल्या जिवाचीही पर्वा न करता धाकटी बहीण आपले लोकोत्तर गुण कारणी लावते व यशस्वी होते.

१) सोनेरी पाणी, गाणारे झाड व बोलणारे पाखरू आणण्याच्या उद्देशाने गेलेले दोन मोठे भाऊ 'मागे न पाहण्याची' अट पाळू न शकल्याने शिळारूप होऊन पडले. धाकटी बहीण अट पूर्ण करून सर्व गोष्टी घेऊन आलीच शिवाय सोनेरी पाणी शिंपडून दोन्ही भावांना जीवदान दिले. ( राजविलाशी केवडा – कथा १ )

२) सहा भाऊ, धाकटी बहीण – सावत्र आईने भावांना बगळे बनवून आकाशात सोडून दिले. धाकट्या बहिणीने अनेक वर्षे कठोर परिश्रम करून त्यांच्या साठी सात कोट विणून त्यांना रूपांतरित अवस्थेतून बाहेर आणले. ( वैजयंती – कथा १७ )

### सद्‌गुणी यशस्वी धाकटी सून

दुर्दैवाच्या फेऱ्यात सापडूनही अंगच्या बळावर किंवा दैवी साह्याने यशस्वी व सुखी होणारी धाकटी सूनही मराठी लोककथांत बरेच वेळा भेटते. येथे तिचा सामना मोठ्या भावांशी असतो. जावांच्या तुलनेत ती सद्‌गुणी चित्रित केली जाते,

तथापि बरेच वेळा घरात नावडती असते. शेवटी मात्र ती आवडती होते.

१) व्यापाऱ्याची धाकटी सून पोरकी – माहेर नाही – इतर सुना माहेराहून येताना सासूला दागिने आणीत – धाकटीवर सासू नाराज – सर्प व देवीच्या कृपेमुळे देवीने तिला आपल्या अद्भुतरम्य दुनियेत माहेरपणासाठी नेले – भरपूर धन दिले – सर्वजण प्रसन्न. ( मराठी लोककथा – कथा ४ )

२) ब्राह्मणाच्या चार सुनांपैकी धाकटी नावडती – दर रविवारी तिला घरातून बाहेर पाठवीत – देवी राणूबाईची तिच्यावर मर्जी – राणूबाई तिला न्हाऊ माखू घालते, तिची ओटी भरते हे एकदा सासऱ्याने पाहिले – तिच्यावरचा राग मावळला. ( अप्रसिद्ध कथा )

**अपवादक कथा**

**१) मोठ्या सुनेला पीडन**

मोठ्या सुनेला सासरी जाच – तळ्याला पाणी लागावे म्हणून बळी देणे आवश्यक होते – मोठ्या सुनेला गोड बोलून माहेरी पाठवले व इकडे तिच्या मुलाचा बळी दिला. ( पुष्प १ – कथा २० )

**२) धाकटी सून दुर्गुणी**

दोन जावा – धाकटी स्वच्छंद, नखरेल, उथळी – नवऱ्याला फसवून एकटीच चांगलेचुंगले खाई – त्याला घाबरवण्यासाठी भुताचे सोंग घेई – त्याने सोंग ओळखून खूप मारहाण केली – जावेने समजूत घातली – परिवर्तन. ( राजविलासी केवडा – कथा ११ )

**३) धाकटीला दुःख**

सावकाराच्या दोन सुना – मोठी भांडखोर, घमेंडखोर – धाकटी सोशीक, शांत, देवभोळी – मोठी भांडून वेगळी राहिली – सासूसासऱ्यांना अन्नांतून विष घातले – धाकटीची दुःखाने आत्महत्या. ( तिर्थांचे सागर – कथा १२ )

अशा काही अपवादस्वरूप कथा वगळता मराठी लोककथांत 'यशस्वी धाकटे अपत्य' या संकेताचे पालन यथायोग्यपणे केलेले आढळते.

**मराठी लोककथांच्या विश्वात्मकतेची चढती श्रेणी**

जागतिक लोककथांत रूढ असलेल्या प्रमुख संकेतांचे पालन मराठी लोककथांतही होत असल्याने लोककथांतील तपशिलाबाबतही त्यांचे जागतिक लोककथांशी असलेले साधर्म्य स्पष्टपणे प्रकट होते, आणि त्यामुळे स्वाभाविकपणेच या संकेतपालनातून मराठी लोककथेच्या विश्वात्मकतेची चढती श्रेणी अनुभवावयास मिळते.

●

## प्रकरण ७ वे

# मराठी व्रतकथा — कहाणी

गेल्या सर्व प्रकरणांतून मराठी लोककथेची विश्वात्मकता शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या शोधातून असे दिसले की लोककथांचे प्रकार, लोककथांतील कथाविशेष व कल्पनाबंध परीकथेतील ठराविक सांकेतिक कृती, भूमिकास्वरूप पात्रे आणि लोककथांचे काही ठळक संकेत या सर्व महत्त्वपूर्ण बाबींच्या संदर्भात मराठी लोककथेचे जागतिक लोककथांशी विलक्षण साम्य असून ती जागतिक लोककथांचीच सहप्रवासी आहे. स्वाभाविकच मग असा विचार कुणाच्याही मनात येईल की मराठी लोककथेत तिचे काही स्वतःचे वैशिष्टय किंवा प्रदेशविशिष्टता आढळते की नाही ? याचे उत्तर असे की जागतिक लोककथांशी जवळीक राखूनही मराठी लोककथा आपली प्रदेशविशिष्टताही उत्तम तऱ्हेने जतन करतात. असाच प्रकार कोणत्याही देशाच्या वा प्रांताच्या लोककथांच्या संदर्भातही दृष्टीस पडतो. हे कसे काय घडते ?

### लोककथेतील प्रदेशविशिष्टतेच्या खुणा

सर्व माणसांची शारीरिक अंतर्गत रचना बव्हंशी सारखीच असते तथापि चेहऱ्यामोहऱ्याने प्रत्येक माणूस वेगळा असतो. तसाच प्रकार लोककथेच्या प्रदेश-विशिष्टतेबाबत असतो. दोन एकसारखी माणसे फारच क्वचित आढळतात. तशाच दोन संस्कृतींत देशांत वा प्रांतांत ततोतंत सारख्या कथा फारच थोड्या असतात. अन्य कथांत घटना, पात्रे, कृती जवळजवळ सारख्या असतील परंतु कथांचा बाह्य पेहराव मात्र प्रदेशविशिष्टतेचा असतो. कथांचा जेव्हा प्रसार होतो तेव्हा नवीन प्रदेशातील संस्कृतीची वैशिष्टये त्यांत सहजपणे प्रवेश करतात. कथेतील पात्रांची व्यक्तिनामे, वस्तुनामे, स्थलनामे यांच्यांत बदल होऊ शकतो आणि या बदलामुळे त्या त्या प्रदेशाचे वातावरण आपोआपच कथेला लाभते. मराठी लोककथांत महाराष्ट्रातील गावांची नावे सापडतील तर तामिळनाडूच्या कथांत कांचीपुरम, नादपुरम अशी आढळतील. व्यक्तिनामांतही हिमाचल प्रदेशात बाना भाट, गिरीराज,

कोकुरावन अशी तर गुजराथी कथांत रूपालीबा, नागमदेवी अशी, तर तामिळ-नाडूच्या कथांत बिडामुंदन, अयाकप्पन, कोडामुंदन अशी आढळतील. काश्मीरच्या कथांत तेथील दल सरोवर, केशराचे मळे यांचा उल्लेख आढळतो तर ओरिसातील कथांत जगन्नाथपुरी, कोणार्क मंदिर यांचा निर्देश दिसतो.

'मिठासारखे प्रेम' हा समान कथाविशेष युरोपीय कथांत राजा लिपर व कॉर्डेलिया या पिता-पुत्रातील प्रेमाचे चित्रण करतो तर महाराष्ट्रात श्रीकृष्ण-रूक्मिणीच्या प्रेमाला मिठाची उपमा दिलेली आहे. (राजविलासी केवडा – कथा ९) 'मूर्ख जावई' हा हास्यकथांचा एक जागतिक आवडता विषय. जावई सासुर-वाडीला आवडलेल्या पदार्थाचे नाव घोकत घरी येत असतो, वाटेने चालताना ते नाव विसरतो व दुसरेच कुठलेतरी घोकत घरी येतो. हा कथाभागही बऱ्याच ठिकाणच्या कथांत सारखाच परंतु प्रांतपरत्वे पदार्थांची नावे बदलतात. केरळमध्ये पदार्थाचे मूळ नाव कोसुकही होते ते थिट्टथी झाले, तामिळनाडूमध्ये कोयाकट्टी होते ते पोट्टकडी झाले, तर महाराष्ट्रात ते धिरडे होते ते निसरडे झाले. प्रादेशिक-तेच्या खुणा लोककथांतून अशा प्रकारे सतत डोकावीत असतात. मराठी लोक कथांतही ती डोकावते. अशा स्वरूपाच्या लोककथांच्या प्रदेशविशिष्ट रूपाला व्हॉन सीडो यांनी Regional oikotype असे म्हटले आहे.

**अधिकतम प्रदेशविशिष्टता स्थानिक दंतकथांत**

सर्व प्रकारच्या लोककथांतून त्या त्या प्रदेशाची प्रदेशविशिष्टता डोकावीत असली तरी याबाबतीत स्थानिक दंतकथांचा सर्वाधिक हातभार लागतो. स्थानिक दंतकथा कुठल्यातरी विशिष्ट प्रदेशाशी निगडित असल्यामुळे पूर्णपणे प्रादेशिक असतात आणि त्या सत्याधिष्ठित असल्यामुळे त्यांच्या द्वारे त्या त्या प्रदेशाची वैशिष्टचे धार्मिक समजुती, सामाजिक समजुती, आचार-विचार, देवदेवता, उपासना-पद्धती, सण, उत्सव इत्यादी अनेक प्रकारांची माहिती सहजपणे मिळू शकते. महाराष्ट्रातील प्रदेशविशिष्ट सांस्कृतिक व सामाजिक दर्शनाच्या दृष्टीने मराठी लोककथांतील स्थानिक दंतकथांचे संदर्भ सतत लक्षात घ्यावे लागतात. त्या कथांतून महाराष्ट्रातील स्थळांचे, व्यक्तींचे, देवळांचे, डोंगरांचे वैशिष्टय आणि माहात्म्य कथन केले जाते. मराठी दंतकथांच्या प्रकरणातून त्याचा परामर्श घ्यावयाचा आहे.

**मराठी व्रतकथा किंवा कहाण्या – प्रदेशविशिष्ट लोककथा**

मराठी व्रतकथा वा 'कहाणी' या नावाने महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या कथा हा मराठी लोककथांच्या प्रादेशिकतेचा उत्तम नमुना आहे. ज्या दैवतकथा धर्म–

विधींशी अविभाज्यपणे जोडलेल्या असतात त्यांना विधिकथा असे म्हणतात, मराठी व्रतकथा वा कहाण्या महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या काही विधींशी अशाच अविभाज्यपणे जोडल्या गेलेल्या आहेत. महाराष्ट्राच्या धार्मिक जीवनात त्याचे स्थान अत्यंत मानाचे आहे. या व्रतकथांच्या स्वरूपविशेषांचा ऊहापोह या प्रकरणात करावयाचा आहे.

**विधिकथेला जागतिक लोककथांचे जनकत्व**

देशोदेशींच्या लोककथांतील साम्याची चिकित्सा कशी होत होती व या चिकित्सेतून बेनफे यांचा भारतमूलक सिद्धांत व अँड्रू लँग याचा बहुदेशोत्भूततेचा सिद्धांत कसा मांडला गेला याची चर्चा यापूर्वी केलेली आहेच. लॉर्ड रॅग्लन यांनी या साम्याची चर्चा अगदी वेगळ्या तऱ्हेने केली आहे. त्यांना असे आढळले की सृष्टीची उत्पत्ती, मानवाचा जन्म, जगप्रलय आणि जगाची पुर्निनिमिती यांच्याबद्दल ज्या कथा अनेक देशांत आढळतात त्यांत खूप साम्य आहे. त्यांनी अनेक पाश्चात्य पुराणवीराच्या कथांचो छाननी करून थोडीथोडकीच नव्हे तर बत्तीस साम्यस्थळे शोधून काढली. त्यांच्या मते या सर्व समान कथांचे मूळ एकच असावे आणि ते म्हणजे जगाच्या पुर्निनिमितीसाठी आणि अभिवृद्धीसाठी झालेल्या यज्ञविधीच्या वेळी होणारे विधिनाटच आणि त्यातून साकार होणारी विधिकथा हेच असावे. या नाटच-प्रसंगांतून आणि विधिकथेतून प्रकट होणाऱ्या अद्‌भुतातून लोककथांतील रूपांतर-कल्पना, पशुपक्ष्यांची भाषा, अद्‌भुत जन्म, जादूच्या वस्तू अशा अनेक कल्पनाबंधांचा उगम झाला असावा. या कल्पनाबंधांत नंतर सतत भर पडून त्यांच्या विविध रचनांतून वेगवेगळ्या लोककथा निर्माण झाल्या असाव्यात. लॉर्ड रॅग्लन यांच्या या सिद्धांताला ( Myth Ritual Theory ) असे म्हणतात. रॅग्लन यांचा हा सिद्धांत पूर्णतः मान्य झालेला नसला तरी धार्मिक विधींगभूत विधिकथेची परंपरा ही अशी प्राचीन आहे एवढे मान्य व्हावयास हरकत नाही. यासंबंधीची विस्तारपूर्वक चर्चा मराठीत ‘ लोकसाहित्याचे अंतःप्रवाह ’ या ग्रंथात आली आहे. अशा विधिकथांना लोकांच्या धार्मिक जीवनात अजूनही अत्यंत पवित्र व मानाचे स्थान मिळते. निदान महाराष्ट्रातील विधिकथांचे हे स्थान अद्यापही परंपरेने व्रतकथा वा कहाण्यांच्या रूपाने अबाधित आणि अढळ राखलेले आहे.

**व्रतकथांचे स्त्रीजीवनातील स्थान**

महाराष्ट्राच्या धार्मिक जीवनात व्रतकथांना अपार महत्वाचे स्थान आहे. त्यांतून वर्णिलेली व्रते अनेक भाविक लोक आचरिताना दिसतात. विशेषतः या व्रतांचा संबंध प्रामुख्याने स्त्रियांच्या धार्मिक जीवनाशी जोडला जातो. वास्तविक

दा. क्र. ३२२८ २५४२८ मुंबई २५५८८

व्रतकथांचे जर साकल्याने निरीक्षण केले किंवा त्यांच्या कथाभागाची छाननी केली तर असे आढळते की काही व्रते स्त्री आणि पुरुष अशी दोघांनीही केली आहेत. (सोळा सोमवारची कहाणी, आदित्यराणूबाईची कहाणी, ललितापंचमीची कहाणी) काही व्रते फक्त स्त्रियांनी केली आहेत. ( शिवामुठीची कहाणी, मंगळागौरीची कहाणी, हरितालिकेची कहाणी ) काही व्रतकथांत ही व्रते कोणी ( स्त्री किंवा पुरुष किंवा दोघांनी ) करावी याचा नेमका उल्लेख नाही, तर काही व्रतकथांत तर व्रताचा देखील उल्लेख केलेला नाही. ( संपतशनिवारची कहाणी, मारुतीची कहाणी, वसूबारसेची कहाणी ). असे असताना व्रतकथांना स्त्रीजीवनाशी निगडित असेच का मानले जाते आणि प्रत्यक्ष व्यवहारातही व्रतकथा या स्त्रियांच्याच जीवनाचा एक भाग बनलेल्या असून व्रतवैकल्ये करण्याकडे स्त्रियांचाच कल अधिक असतो असे का दिसते?

**स्त्रीजीवनाशी निगडित असण्याची संभाव्य कारणे**

१) ज्या व्रतकथांत व्रत कोणी करावे याचा ठाम उल्लेख नाही त्या व्रत-कथांचे कथाभाग आपण पाहिले तर ती कथासूत्रे मात्र स्त्रीपात्रांशीच निगडित आहेत. 'संपत शनिवारची कहाणी' किंवा 'मारुतीची कहाणी' या व्रतकथांत रूपांतरित देवाचे आतिथ्य करणाऱ्या स्त्रियाच आहेत. ज्या व्रतकथांत व्रतांचा उल्लेखच नाही त्या कथांतही तसाच प्रकार आहे. दुधाचा गाभारा भरण्याची किमया एका स्त्रीचीच आहे. अशा तऱ्हेने सर्वच व्रतकथांचे कथाभाग स्त्रीपात्रांशी निगडित असल्याने त्यांच्याच धार्मिक जीवनाचा तो एक भाग आहे असा समज झाला असावा. या सर्व व्रतकथांना अपवाद फक्त एकाच व्रतकथेचा व तो म्हणजे 'विष्णूची कहाणी' हिचा. या व्रतकथेत विष्णूशी एकरूपत्व मिळावे म्हणून ब्राह्मणाने केलेले व्रत वर्णिलेले आहे. तथापि ते व्रत इतके खडतर आहे ( ८८००० वर्षे तप ) की खुद्द व्रतकथेतही ते इतर कुणी पुरुषानेही करावे अशी अपेक्षा व्यक्त केलेली नाही. फक्त ती व्रतकथा सांगणे किंवा ऐकणे एवढेही पुण्यकारक आहे असा त्यात उल्लेख केलेला आहे.

२) व्रतवैकल्ये करण्याचे नियम असतात. काही व्रते विशिष्ट दिवशीच करावयाची असतात, काही व्रतांच्या बाबतीत खाण्यापिण्याचे, शुचिर्भूततेचे नियम पाळणे अत्यावश्यक असते. स्त्रियांचे कार्यक्षेत्र गृहव्यवस्था हेच असल्याने ( निदान आजपर्यंत तरी ) गृहिणीपदाची जबाबदारी सांभाळूनही व्रतपालन करणे आणि त्यांचे निर्बंध पाळणे स्त्रियांना फारसे अवघड जात नाही. पुरुषांचा वेळ बराचसा घराबाहेर जात असल्याने त्यांना ते काहीसे जाचक ठरते. व्रतात खंड पडण्याची शक्यताही नाकारता येत नाही आणि व्रतपालनात खंड झाल्यास होणारा देवदेवतांचा

कोप तर व्रतकथांत तपशिलाने वर्णन केलेला असतो. त्यामुळे पुरुषांच्या तुलनेने स्त्रियाच जास्त व्रते करीत असाव्यात.

३) उपरोक्त दोन कारणांपेक्षाही अधिक महत्वाचे कारण आपल्या समाजातील पुरुषप्रधान संस्कृतीत दडले असावे. पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषांच्या लहरीवर स्त्रियांचे जीवन सतत हेलकावे घेत राहाते.अनेक दुःखे तिच्या नशिबी वाढून ठेवलेली असतात. पतिनिवडीचे स्वातंत्र्य नसणे, सासरी नावडतेपण नशिबी येणे, परित्यक्तेचे जिणे, अशा तऱ्हेची अनेक दुःखे तिला सहन करावी लागतात आणि ती सुद्धा मूकपणाने, प्रत्यक्ष विरोध करण्याचे सामर्थ्य नसते, तेव्हा दैवी धार्मिक उपायांनी ती दूर करण्याच्या किंवा ती येऊच नयेत या दृढ आशेने स्त्रियांकडून व्रतपालन होत असावे, आणि व्रतकथांतून नेमकाच तसा दिलासा दिलेला असतो. एवढेच नव्हे तर त्याचे यशस्वी प्रत्यक्षीकरणही सादर केलेले असते.

इच्छित वरप्राप्ती व्हावी म्हणून, वैधव्य येऊ नये म्हणून त्याचप्रमाणे आपणास पतीचे नावडतेपण येऊ नये म्हणून व्रते केली जातात आणि त्यासंबंधीच्या व्रतकथा सांगितल्या – ऐकल्या जातात. परित्यक्तेचे जिणे संपावे म्हणूनही हाच उपाय केला जातो. पुढील उदाहरणावरून हेच स्पष्ट होईल —

**इच्छित वरप्राप्ती**

पार्वतीला शंकर हाच पती हवा होता. पण तिच्या पित्याने तिचा विवाह विष्णूशी ठरविला. तिने हरितालिकेचे व्रत करून शंकराला प्रसन्न करून घेतले व त्याला विवाहास राजी केले. (हरितालिकेची कहाणी)

**वैधव्य टाळणे**

१) सोमा परटिणीने केलेल्या सोमवती अवसेच्या व्रताचे पुण्य प्राप्त झाल्यामुळे गुणवंती नामक ब्राह्मणकन्येचे वैधव्य टळले. (सोमवतीची कहाणी)

२) मंगळागौरीच्या व्रताने मुलीचे वैधव्य टळले. (मंगळागौरीची कहाणी)

३) वर्णसठीच्या व्रतपुण्याने ब्राह्मणकन्येचे वैधव्य टळले. (वर्णसठीची कहाणी)

**नावडतेपण संपणे**

१) शिवामुठीच्या व्रतामुळे एका राजस्नुषेचे घरातील नावडतेपण संपले.

२) देवीचे बोडण भरण्याच्या व्रतामुळे नावडती सून आवडती. (बोडणाची कहाणी)

**परित्यक्त जिणे संपणे**

१) आदित्यराणूबाईच्या व्रताचा भंग केल्याने राणीच्या नशिबी आलेले परित्यक्त जिणे पुन्हा व्रतपालन केल्याने संपुष्टात आले. (आदित्यराणूबाईची कहाणी)

२) महालक्ष्मीच्या व्रतात खंड पाडल्याने परित्यक्त झालेली पाटमाधवराणी पुनश्च व्रतपालनाने सन्मानाने पुन्हा घरी. (महालक्ष्मीची कहाणी)

अशा तऱ्हेने व्रतकथा वा कहाण्यातील स्त्रीयादिकांची दुःखे दूर होतात, आणि त्याबरोबरच त्यांना 'संतत संपत' वाढण्याचा लाभही झालेला आढळतो. (एक विशेष गोष्ट लक्षात आली ती अशी की पुत्रहीनत्व वा वांझपणा या स्त्री-जीवनातील सर्वात क्लेशकारक दुःखाचे निराकरण करणारे एकही व्रत या कहाण्यात कसे नाही. ? पुत्रप्राप्तीसाठी तळमळणाऱ्या स्त्रीचे चित्रण फक्त मंगळागौरीच्या कहाणीमध्ये थोडेसे आढळते. परंतु त्या व्रतकथेचा प्रमुख गाभा 'मंगळगौरीच्या व्रतानें वैधव्य टळले' हाच आहे. तसेच या कथेत पुत्रप्राप्ती ही व्रतपालनाने झालेले नसून फलप्राशनाने झालेली आहे.)

४) काही व्रतांना सामूहिक रूप दिले गेल्याने रोज तीच ती साचेबंद आणि बरीचशी नीरस कामे करणाऱ्या स्त्रियांना घरप्रपंचाच्या रगाड्यातून थोडी सुटका मिळते. मंगळागौरीची, हरितालिकेची पूजा अनेकजणी एकत्र येऊन करतात, रात्री एकत्र जागरण करतात, खेळ खेळतात, गाणी म्हणतात. श्रावणी शुक्रवारी एक-मेकींच्या घरी हळदी-कुंकवास जातात. मैत्रिणींच्या भेटीगाठीतून मनाला विरंगुळा लाभतो, सुख-दुःखांची देवाण-घेवाण होते.

अशा काही कारणांमुळे व्रतपालनाकडे स्त्रियांची अधिक ओढ असावी. आणि त्यांच्यातील या जिव्हाळ्याच्या नात्यामुळे म. म. दत्तो वामन पोतदार यांनी व्रतकथांना 'स्त्रियांचे उपनिषद' अशी संज्ञा बहाल केली असावी.

**व्रतकथांची संहिता**

व्रतकथांच्या प्रत्यक्ष संहितेचा विचार केला तर असे आढळते की त्या संहितेत चार महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकलेला असतो.

१) व्रताच्या स्वरूपाचे विशदीकरण, २) फलनिष्पत्तीकथन,
३) व्रतपालनाचे आवाहन, ४) व्रतकथेची विध्यंगभूतता.

**१) व्रतकथेचे व्रतस्वरूपविशदीकरण**

एखादे व्रत कसे, केव्हा, कुठे करावे, त्याचे उद्यापन संपूर्ण कसे करावे याचा तपशील म्हणजे व्रतस्वरूपविशदीकरण होय. मराठी व्रतकथा वा कहाण्या

यांचा या दृष्टीने विचार केल्यास असे आढळते की काही व्रतकथांत व्रतांचा असा संपूर्ण तपशील उपलब्ध असला तरी सर्वच व्रतकथा याबाबतीत परिपूर्ण नाहीत. बऱ्याच व्रतकथांतील व्रततपशील अपुरा असतो, तर काही व्रतकथांत व्रतांचा तपशील मुळीच आढळत नाही. उदाहरणार्थ –

अ) आदित्यराणूबाईची कहाणी, फसकीची कहाणी, धरित्रीची कहाणी, पाच देवांची कहाणी, सोळा सोमवारची कहाणी या व्रतकथा परिपूर्ण आहेत.

ब) सोमवतीची कहाणी, ऋषिपंचमीची कहाणी अशा काही व्रतकथांत व्रतांचा तपशील आहे पण उद्यापनाचा नाही.

क) गणपतीच्या कहाणीत उद्यापनाचा तपशील आहे पण प्रत्यक्ष व्रताचा नाही. 'मनचा ज्ञानेश मनी वसावा' एवढाच उल्लेख आहे. (गणपतीपूजनासाठी परंपरेने आवश्यक मानल्या जाणाऱ्या दूर्वा, लाल फूल, शमीपत्रे यांचाही उल्लेख नाही, आणि गणपतीला प्रिय असणाऱ्या मोदकांऐवजी लाडूचा उल्लेख आहे.)

ड) मंगळागौरीची कहाणी, ललितापंचमीची कहाणी या व्रतकथांत व्रताचा वा उद्यापनाचा कसलाच तपशील नाही. अर्थात व्रतकथेत तो तपशील उपलब्ध नसला तरी वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरेमुळे तो सर्वज्ञात झालेला असतो. तसाच प्रकार, ज्या व्रतकथांत कोणत्याच व्रताचा उल्लेख नसतो काही व्रतकथांचा आहे अशा कथांतील कथानकांपासून काही व्रते आपोआप समाजात रूढ झालेली आहेत. 'संपत शनिवारची' किंवा 'मारुतीची कहाणी' या व्रतकथांत व्रताचा उल्लेख नाही. तथापि श्रावणी शनिवारी मुंजामुलाला घरी बोलावून स्नान घालण्याची व भोजन देण्याची प्रथा घरोघर रूढ झालेली दिसून येते. वसुबारशाच्या दिवशी सवत्स गाईची पूजा केली जाते. सारांश सर्वच व्रतकथा व्रततपशिलाच्या बाबतीत परिपूर्ण नाहीत, मात्र व्रतकथांत व्रततपशील असो वा नसो, प्रत्यक्ष व्यवहारात मात्र व्रतपालनात कोणतीच बाधा येत नाही.

**२) फलनिष्पत्तीकथन**

व्रतपालन केल्याने कोणते फळ पदरात पडते हे मात्र प्रत्येक व्रतकथेत सांगितले आहे. मनोकामना पूर्ण, निर्विघ्न कार्यसिद्धी, संतती-संपत्ती, अखंड सौभाग्य अशा अनेक आश्वासनांची पखरण व्रतकथांत दिसून येते. ज्या व्रतकथांत व्रतपालनाचा उल्लेख नाही त्यांतील पात्रांनाही काही ना काही लाभ होतोच. जसे म्हातारीच्या खुलभर दुधाने गाभारा भरला म्हणून तिला इनाम मिळाले, शिवभक्त मुलीसाठी रानात माहेर उत्पन्न झाले, आतिथ्यधर्मास जागणाऱ्या सुनेमुळे दरिद्री घरात समृद्धी आली वगैरे.

**३) व्रतपालनाचे आवाहन**

व्रतपालनाचे आवाहन हा तर व्रतकथांचा प्रमुख हेतू आहे. अधिकारवाणीने कथन केल्या जाणाऱ्या फलनिष्पत्तीतच व्रतपालनाचे आवाहन केले जाते असे म्हणावयास हरकत नाही. ‘मनी इच्छिले काम होते, संकटे नाहीशी होतात.-’ अशा-सारखे जेव्हा व्रतकथेत कथन केले जाते आणि त्यातही कथापात्रांच्या द्वारे त्याचे सोदाहरण प्रत्यक्षीकरण केले जाते तेव्हा कोणत्याही सश्रद्ध माणसाचे मन व्रत-पालनाकडे निश्चितच आकर्षित होते. संकट निवारणाच्या बाबतीत मात्र व्यवहारात बरेच वेळा संकटमुक्तीपेक्षा संभाव्य वाटणाऱ्या संकटाचा स्पर्शच न व्हावा अशा हेतूनेच व्रतपालन होत असते. विवाहानंतर ५ वर्षे शिवामूठ वाहून व्रत करणाऱ्या नवविवाहित तरुणी या प्रत्यक्षात घरात नावडत्याच असतील असे नाही. तसेच वैधव्याची शिक्षा कपाळी न यावी म्हणून मंगळागौर व्रत केले जाते. म्हणजे व्रत-कथेत संकटे प्रत्यक्ष दूर होत असतील तर व्रतपालनातून संकटांना दूर ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

व्रतकथांतील पात्रांना मिळणारी ‘संतत संपत’ हा तर व्रतकथांच्या आकर्षणाचा सर्वात वेधक भाग आहे. समृद्धीची, श्रीमंतीची आशा या जगात कोणाला नाही ? जास्तीतजास्त व्रतकथांत भाग्यलक्ष्मी लाभल्याचा कथाभाग चित्रित केलेला आहे. काही व्रतकथांत तशी प्रत्यक्ष इच्छाच प्रकट केलेली आहे. उदा. ‘जय महादेवा, घे फसकी दे लक्ष्मी –’ (फसकीची कहाणी), ‘धरित्रीमाय, तूच थोर, तूच समर्थ, काकणे भरलेल्या लेकी दे, मुसळकांडचा दासी दे, नारायणा-सारखे पाच पुत्र दे’ (धरित्रीची कहाणी) ज्या व्रतकथांत अन्य हेतूंची पूर्ती असेल तेथे इच्छापूर्तीबरोबरच भाग्यलक्ष्मीचाही लाभ झालेला दिसतो.

**व्रतभंगास जबर शासन**

माणसाने व्रतपालनास सुरुवात केल्यावर व्रतभंग करू नये, किंबहुना त्याला तसे धाडसच होऊ नये याची काळजीही व्रतकथांनी त्यांच्या कथासूत्रांतून घेतलेली आढळते. अनेक व्रतकथांत व्रत दुसऱ्याला सांगतानाच ‘उतशील, मातशील, घेतला वास टाकून देशील.’ अशी भीती व्यक्त होते व ‘उतत नाही, मातत नाही, घेतला वसा टाकत नाही’. असे आश्वासनही मिळते. असे असूनही कोणी व्रतभंग केलाच तर त्याचे भयंकर दुष्परिणामही व्रतकथांत वर्णन केलेले असतात. उदा. –

१) आदित्यराणूबाईची कहाणी वडिलांकडून न ऐकण्याचे पातक राणीकडून घडले व तिच्यावर संकटपरंपरा कोसळली. दारिद्र्य तर आलेच पण बहिणीने दिलेले द्रव्यसाहाय्यही तिच्यापर्यंत पोचू शकले नाही. (आदित्यराणूबाईची कहाणी)

२) नागपंचमीच्या दिवशी जमीन नांगरणाऱ्या शेतकऱ्याच्या कुटुंबातील सर्वांनाच नागिणीच्या दंशाने मृत्यू आला. ( नागपंचमीची कहाणी )

३) रजस्वलादोषामुळे त्या पापी स्त्रीचा पती पुढच्या जन्मी बैल झाला व तिला स्वतःला कुत्रीचा जन्म येऊन त्यांच्या मुलाच्याच घरी चाकरी करावी लागली. ( ऋषिपंचमीची कहाणी )

४) ललितापंचमीच्या व्रतात वारंवार खंड पाडणाऱ्या धाकट्या भावाला वारंवार दारिद्र्य. ( ललितापंचमीची कहाणी )

व्रतांत खड पडलेला तर व्रतसंबंधित देवतांना चालत नाहीच तथापि व्रत–पालनाचे जे नियम वा निर्बंध ठरलेले असतात त्यांचा भंग झाल्याचेही चालत नाही. त्यांचा कोप होतो. उदा. – सोळा सोमवारव्रताच्या उद्यापनाला पाच शेर कणकेचा तूपगूळ घालून चुर्मा करावयाचा असतो. या व्रताच्या पालनाने राज्यप्राप्ती होऊन राजकन्येशी विवाह झालेल्या ब्राह्मणपुत्राने व्रताच्या समाप्तीच्या वेळी देवळातून पत्नीला निरोप पाठविला. 'पाच शेर कणकेचा चुर्मा पाठवून दे'. पत्नी राजघराण्यातील. त्यामुळे तिला वाटले आपल्यासारख्या राणीने चुर्मा पाठविला तर लोक हसतील. तिने त्याऐवजी ५०० रुपये तबकातून पाठविले. व्रतभंगामुळे देवास राग आला व त्याने ब्राह्मणपुत्राला दृष्टांत दिला, 'राणीला घरात ठेवशील तर राज्यास मुकशील, दारिद्र्याने पीडशील. तिला पतीने घालवून दिले. ( सोळा सोमवारांची कहाणी )

अशा तऱ्हेने व्रतकथा या केवळ व्रतपालनाचे नव्हे, तर अखंड व्रतपालनाचे आणि तेही नेटक्या तऱ्हेनेच करण्याचे आवाहन भाविक जनांना करीत असतात.

### ४) व्रतकथेची विध्यंगभूतता

संबंधित व्रतकथेच्या पठनाशिवाय वा श्रवणाशिवाय व्रतपालन पुरे होत नाही असा पारंपरिक संकेत रूढ आहे. यालाच व्रतकथेची विध्यंगभूतता म्हणतात. व्रतकथा ही व्रताचा अविभाज्य घटक असते. कहाणी ही मौखिक परंपरेने, निदान मुद्रणपूर्वकालात तरी, प्रचलित राहात असल्यामुळे 'कहाणी वाचणे' याऐवजी कहाणी करणे' असा शब्दप्रयोग व्रतकथांच्या प्रत्यक्ष संहितेत आढळतो. तसा हा कहाणी करण्याचा प्रत्यक्ष उल्लेख चारच व्रतकथांत आढळतो. ( अदित्यराणूबाई, महालक्ष्मी, हरितालिका, महाविष्णू यांची कहाणी ) परंतु परंपरेने व्रतकथेची विध्यंगभूतता सर्व भाविकांनी मान्य केलेली आढळते.

व्रतकथा सांगण्याचे वा ऐकण्याचे महत्व आदित्यराणूबाईच्या कहाणीत प्रकर्षाने वर्णन केलेले आहे. ही व्रतकथा ऐकल्याने प्रधानपत्नीला ऐश्वर्य लाभले.

मोळीविक्याची लाकडी मोळी सोन्याची झाली, एका माळयाचा न पिकणारा मळा पिकू लागला, एका म्हातारीचे तीन बेपत्ता मुलगे परत मिळाले, एका तुंड्याभुंड्या माणसाला हातपाय येऊन दिव्य देह मिळाला. साहजिकच या सर्वांना वाटले, 'कहाणी ऐकण्याचे एवढे फळ, तर वसा घेतल्याचे काय फळ ? हे सर्व लोक व्रत करू लागले, व्रतपालनाच्या वृत्तीचा परिपोष व्हावा, व्रताचा प्रसार व्हावा म्हणून कहाणी करता म्हणणे व दुसऱ्यास ऐकवणे या गोष्टी प्रत्यक्ष व्रतपालनातच समाविष्ट केलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर व्रतसंबंधित देवतेलाही व्रतकथा ऐकण्याचे आवाहन कथेच्या प्रारंभी केले जाते. ( ऐका परमेश्वरा गणेशा तुमची कहाणी.)

**व्रतकथांतून दिसून येणारा हटवादी दृष्टिकोन**

व्रतकथांच्या अंतरंगाच्या स्वरूपाचा विचार केला असता जी एक विशेष गोष्ट लक्षात येते ती नमूद करण्याजोगी आहे. हिंदुधर्मीय जीवनपद्धतीनुसार मानवी जीवनाचे अंतिम ध्येय मोक्षप्राप्ती हेच मानले जाते, आणि त्यासाठी योगाभ्यास, धर्मपालन, ईश्वराची सगुण वा निर्गुण भक्ती आवश्यक मानली जाते. सगुण ईश्वर-भक्तीचेच एक रूप असणाऱ्या या व्रतकथांत माणसाच्या या पारलौकिक जीवनाचा वा मोक्षाचा उल्लेख अजिबात आढळत नाही. माणसाच्या पारलौकिक जीवनाशी संबंधित असलेल्या अध्यात्म तत्त्वज्ञानाचा वा अध्यात्मसाधनेचा धागा कुठल्याच व्रतकथेत गुंफलेला दिसत नाही. परमात्मा, आत्मा, दोहोंची एकरूपता दृश्य जगाचे मायावी स्वरूप यांचा ऊहापोह कुठेच केलेला आढळत नाही. याउलट व्रतकथांचे स्वरूप पूर्णपणे हटवादी आहे असेच अनुमान काढावे लागेल. आपले लौकिक जीवन सुखी व समृद्ध व्हावे ही प्रबल इच्छाच व्रतपालनाच्या मुळाशी दिसून येते. प्रत्यक्ष व्रतकथांतही त्याचेच प्रतिपादन केलेले आहे. विघ्ननिवारण, कार्यसिद्धी, संतति-संपत्ती वाढणे अशांसारख्या फलनिष्पत्तीतून माणसाचे लौकिक जीवनच बहरते. गीताप्रणीत निष्काम कर्मयोगाच्या ऐवजी काम्यकर्माचीच कास व्रतकथांत धरलेली आढळते.

अर्थात् व्रतकथांच्या या हटवादी रूपामुळेच या व्रतकथा माणसाला अधिक जवळच्या वाटत असाव्यात. अध्यात्मसाधना मोक्षप्रद खरीच, तथापि ती सामान्य माणसाच्या आवाक्यात सहसा बसत नाही व्रतकथांचे स्वरूप तसे असते तर त्यांचे 'लोकाभिमुखत्व' निश्चितच कमी झाले असते. विशेष म्हणजे व्रतकथांतील फक्त सामान्य माणसेच लौकिक सुखासाठी व्रतपालन करतात असे नव्हे तर प्रत्यक्ष जगन्माता समजली जाणारी पार्वती हरितालिकेचे व्रत करून इच्छित पती मिळविते. व्रतकथांना असे गृहस्थाश्रम सुखी करण्याचे साधन मानल्यामुळेच सामान्य माणसांची आपुलकी त्याला सहजपणे प्राप्त झालेली असावी. एरव्ही इतकी वर्षानु-वर्षे त्यांचा लोकमानसातील प्रवाह अखंडित राहिला नसता.

या हटवादी व्रतकथांत अपवाद फक्त एकाच व्रतकथेचा व तो म्हणजे विष्णूची कहाणी हिचा. ८८००० वर्षे तप करणाऱ्या माणसाला विष्णूने दर्शन देऊन वर मागायला सांगितले, ' राज्य माग, भांडार माग, संसारी सुख माग ' पण त्याला हे काही नको होते, फक्त विष्णूशी एकरूपता हवी होती. व्रतकथा हटवादी नाही हे खरे, तथापि प्रत्यक्ष व्रतकथेतच या व्रताचे पालन कोणी करील अशी अपेक्षा व्यक्त केलेली नाही, या व्रतकथेचे वाचन वा कथन एवढेही पुरेसे आहे

### लौकिक सुखेच्छा व भक्तिभावना यांचा मनोज्ञ संगम

लौकिक सुखाची आशा या व्रतकथांतून प्रकट होत असली तरी हा लौकिक सुखप्राप्तीचा मार्ग सगुण परमेश्वरभक्तीच्या आणि सदाचरणाच्या मार्गाशी एकरूप झालेला आहे. किंबहुना लौकिक सुखेच्छा आणि भक्तिभावना यांचा मनोज्ञ संगमच या कथांद्वारे साधला जातो. व्रतपालनातून जगन्नियंत्या ईश्वराचे स्मरण सतत होत राहाते, संकटमुक्त जीवनाची आशा मनात सतत जागृत राहाते. संकटे प्रत्यक्षात येऊन उभी राहिली तरी त्यांना तोंड देण्याचे धैर्य मिळते.

### व्रतकथांची भाषाशैली

मराठी व्रतकथांची भाषाशैली ही इतर लोककथाप्रकारांच्या तुलनेने बरीच भिन्न असते. ' संपूर्ण गद्यात्मक रचना जिला चूर्णाप्रमाणे वृत्ताचा गंध नाही, पण खुद्द गद्याच्याच बांधणीतून विशिष्ट नाद अंकुरित होत आहे, आणि ते गद्य म्हणतांना स्वरही गद्याची मर्यादा सोडून विशिष्ट गेयाची लकब धारण करतो. ' असे श्रीमती दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्याची रूपरेखा ' या ग्रंथात जिचे वर्णन केले आहे ती चूर्ण स्वरूपाकडे व गेयतेकडे झुकणारी व्रतकथेची भाषाशैली सर्वांचेच मन आकृष्ट करून घेते.

### छोटी वाक्ये

व्रतकथेला ही जी किंचित गेयता येते ती निर्माण होण्यास भाषाशैलीची काही वैशिष्टये कारणीभूत आहेत. त्यांतील पहिले वैशिष्टय आहे ते छोटया छोटया वाक्यांची जुळणी. अगदी छोटया छोटया वाक्यांची मालिका कथेच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत आढळून येते व त्यामुळे कथेला सहजपणे गेयता प्राप्त होते. संकीर्ण वा मिश्र वाक्य फारसे आढळतच नाही. कर्ता, कर्म, क्रियापद एवढेच बहुधा वाक्यांत असते.

उदा. १) एक म्हातारी बाई होती. तिनं घरचं कामकाज आटोपलं. मुलाबाळांना खाऊ घातलं. लेकी-सुनांना न्हाऊ घातलं. गाईवासरांना चारा घातला.

त्यांचा आत्मा थंड केला. चार तांदुळाचे दाणे घेतले. दोन बेलाची पानं घेतली. खुलभर दूध घेतलं. बाई देवळात गेली. मनोभावे पूजा केली. (सोमवारची कहाणी)

२) चालत्या पावली घरी आला. गुरुजीनी पाहिलं. बरोबर एक मुलगी आहे. त्या दोघांचं लगीन लावलं. त्यांना एक घर दिलं. त्यानंतर काय झालं ? श्रावणी सोमवार आला. (सोमवारची कहाणी)

३) बोवाचा नेम टळला. नेम मोडला. बाईवर फार रागावला. मूलबाळ होणार नाही असा शाप दिला. (मंगळागौरीची कहाणी)

४) तो क्षणी उठे, क्षणी बुडे. क्षणी स्वर्गात जाई.– क्षणी पाताळात जाई– (महालक्ष्मीची कहाणी)

५) तुला येताना वाळू देईन ती साऱ्या घरभर टाक. हांड्यावर टाक. मडक्यांवर टाक, पेटीत टाक, फडताळात टाक, गोठ्यात टाक– (ज्येष्ठागौरीची कहाणी)

**संवादाची सलगता**

छोट्या छोट्या वाक्यरचनेमुळे व्रतकथेत निर्माण होणारी गेयता फारशी खंडित होऊ नये म्हणूनच बहुधा व्रतकथेत सलग संवाद आढळतात. एकाचे भाषण संपले की लगेच दुसऱ्याचे सुरू होते. ( अमुक एक म्हणाला किंवा म्हणाली असे शब्दप्रयोग न घालता.) हे संवाद सर्वसाधारणपणे प्रश्नोत्तरात्मक असतात.

उदा. १) (ब्राह्मण म्हणाला) आमच्या मुली गरिबाच्या. तुमच्या घरी कशा द्याव्या ? तुम्ही त्यास दासी कराल, बटकी कराल. दासी करीत नाही, बटकी करीत नाही. राजाची राणी करू. (आदित्यराणूबाईची कहाणी)

२) गूळ खात नाही. पाणी पीत नाही. आधी माझी कहाणी करावयाची आहे ती तू ऐक. तुमची कहाणी ऐकायला मला वेळ नाही, राजा पारधीला जाणार आहे. त्याला जेवायला उशीर होईल. (आदित्यराणूबाईची कहाणी)

३) अग अग दासींनो, तुम्ही दासी कोणाच्या ? आम्ही दासी प्रधानाच्या राणीला जाऊन सांग, तुमच्या बहिणीचा मुलगा आला आहे. तो कसा आला आहे? फाटके नेसला आहे, तुटके पांघरले आहे. मळच्याच्या पाळीला उभा आहे. परसदारात घेऊन या. (आदित्यराणूबाईची कहाणी)

४) पलंगाखाली उजेड दिसला. हा उजेड कशाचा ? ताटी भरल्या रत्नांचा ही रत्ने कोठून आणली ? माझ्या माहेरच्यांनी दिली. तुझं माहेर कोठे आहे ? वेळूच्या बेटी आहे. (सोमवारची कहाणी)

## व्रतकथांतील पुनरावर्तन

व्रतकथारचनेत पुनरावर्तनाचे ठळक वैशिष्टय दिसून येते. गेयसदृश वाक्यरचना आणि पुनरावर्तन यांच्यामुळे काव्यात ज्याप्रमाणे कडवी असतात तत्सदृश रचना व्रतकथेत तयार होते. व्रतकथा ही मुखोद्गत म्हणावयाची अपेक्षा असल्याने आणि मौलिक परंपरेने ती प्रचलित राहात असल्यामुळे पुनरावर्तनाची मदत होत असावी.

## सांकेतिक आरंभ आणि शेवट

व्रतकथांचा आरंभ आणि शेवट हा सांकेतिक पद्धतीने होतो. व्रतसंबंधित देवतेला आवाहन करून ' आटपाट नगर होते ' असा प्रारंभ केला जातो. तर शेवट ' साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण ' असा केला जातो. व्रतकथेच्या सांकेतिक रचनेचा आराखडा पुढीलप्रमाणे मांडता येईल.

आवाहन → स्थलनिर्देश → व्यक्तिनिर्देश → आपत्ती → आपत्तीचे कारण → निरसनाचा उपाय → सहाय्यकर्ता किंवा सहाय्यकर्ती → व्रतपालन → आवर्तन → फलश्रुती → सदिच्छा प्रकटन → कथासमाप्ती.

## परीकथा सदृश रचना

व्रतकथांची रचना, व्लाडीमिर प्रॉप यांनी परीकथांच्या रचनेची जी चौकट Morphalogy of Falktales या ग्रंथात आखून दाखविली आहे, त्या चौकटीशी बरीच मिळती जुळती आहे. परीकथांत नायक वा नायिका ही आयुष्यातील काहीतरी उणीवेमुळे वा संकटामुळे दुःखी असणे, अतिमानवी शक्तीच्या मदतीमुळे ती उणीव वा संकट दूर होणे व कथा सुखान्त होणे असाच कथाभाग असतो. व्रतकथांतही बरेचसे कथाभाग अशाच प्रकारचे आहेत. अर्थात परीकथांत बहुधा अपरिहार्यपणे दिसून येणारी खलप्रवृत्ती पात्रे काही व्रतकथांत असली तरी सर्वच व्रतकथांत आढळत नाहीत. व्रतसंबंधित देवतेचा अपमान झाल्याने तिचा कोप ओढवून घेण्याची जबाबदारी स्वतःच्या स्वभावधर्मावरच पडते, तर काही वेळा आयुष्यातील उणीव वा संकट ललाटरेषेबरोबरच रेखलेले असते. बऱ्याच व्रतकथांत अतिमानवी शक्तीच्या मदतीची वाट दाखवून देणाऱ्या मार्गदर्शकाची भूमिकाही कोणीतरी पार पाडताना आढळते. या परीकथासदृश रचनेचा आराखडा (उणीव, खलपात्रे, मार्गदर्शक, अतिमानवी मदत, उणीवेचा निरास ) तयार करून या प्रकरणास जोडलेला आहे.

**व्रतकथांचे भवितव्य**

संस्कृत व्रतकथांतून उगम पावलेल्या आणि पुराणकालापासून प्रचलित असलेल्या या व्रतकथा आजपर्यंत तरी टिकून आहेत. त्यांचे हे लोकमानसातील स्थान असेच अबाधित राहील का असा प्रश्न आजच्या विज्ञानयुगात निर्माण होणे अगदी स्वाभाविक आहे. विज्ञानयुगामुळे मानवी मनाला पूर्वापार पडलेल्या अनेक रहस्यांचा उलगडा झालेला असला, माणसाचे लौकिक जीवन अधिक सुखकर झालेले असले, सश्रद्ध माणसांचे प्रमाण काहीसे कमी झाले असले, तरी श्रद्धेचे लोकमानसातून समूळ उच्चाटन होणे कधीच शक्य नाही. विज्ञानाच्या साह्याने माणसाचे जीवन सुकर झालेले असले तरी जीवनातील भयस्थाने मात्र कमी न होता उलट वाढलेलीच आहेत. आणि भीतिपोटी श्रद्धाही निर्माण होतेच. तसेच जोपर्यंत अधिकाधिक समृद्धीची माणसाची ओढ खंडित होत नाही, तोपर्यंत श्रद्धास्थानांची गरज त्याला सतत भासतच राहील. ईश्वरी शक्तीच्या कृपादृष्टीचे आकर्षण कायमच रहाणार, आणि म्हणूनच विघ्नांचा नाश करण्याची आणि संतत संपत वाढण्याची ग्वाही देणाऱ्या, सर्वसामान्य माणसाला सहजसाध्य असलेल्या सगुण भक्तिरूप व्रत-वैकल्यांच्या वाटा कदाचित पूर्वीइतक्या गजबजलेल्या राहिल्या नाहीत तरी निर्मनुष्य नक्कीच होणार नाहीत, आणि या व्रतवैकल्यांचा घटकावयव असणाऱ्या व्रतकथांचे वा कहाण्यांचे आकर्षणही नष्टप्राय होणार नाही.

व्रतकथांचे अंतरंग जसे आकर्षण आहे तसेच त्याचे चूर्णस्वरूप बहिरंगही आकर्षक आहे. व्रतकथांच्या या चूर्णीस्वरूप शैलीची मोहिनी केवळ अशिक्षित, असाक्षर माणसावरच नव्हे तर विद्वानावरही पडते. डॉ. ना. गो. नांदापूरकर यांनी आपल्या 'मायबोलीची कहाणी' या ग्रंथात या चूर्णीशैलीचा वापर करूनच मराठीची कहाणी लिहिली आहे. मराठी वाङ्मयात प्राचुर्याने वापरली गेलेली ओवी आणि अभंग या चूर्णीस्वरूप शैलीतून विकसित झाली असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. अर्थात तो एका स्वतंत्र अभ्यासाचा विषय ठरेल. एक प्रदेशविशिष्ट मराठी लोककथाप्रकार म्हणून त्याचे विवेचन येथे केलेले आहे.

## प्रकरण ८ वे

# मराठी दंतकथांचे स्वरूप

दंतकथा हा लोककथांचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकार असून प्रदेशविशिष्टतेच्या दृष्टीने त्यांना मोठे महत्व द्यावे लागते. कोणत्याही देशाच्या वा प्रांताच्या लोक–कथांचा अभ्यास करीत असताना त्या त्या देशाच्या वा प्रांताच्या प्रदेशविशिष्टतेचा शोध घेताना अन्य लोककथाप्रकारांपेक्षा दंतकथांची अधिक मदत होऊ शकते. सत्याधार हा दंतकथांचा सर्वात महत्त्वाचा विशेष – 'लोकस्मृतीचे वाहक' म्हणून संबोधल्या जाणाऱ्या दंतकथा एखाद्या विशिष्ट प्रदेशातील असामान्य माणसे, घटना यांच्याबद्दलची स्मृती कथांद्वारे परंपरेने जतन करतात. ही स्मृती बरेच वेळा कल्पनावगुंठित असली तरी तिला सत्याधार हा निश्चितपणे असतोच. त्यामुळे स्थानिक दंतकथांतून एखाद्या विशिष्ट प्रदेशातील गावांचे, व्यक्तींचे स्थानिक रूढींचे विशेष समजू शकतात. मराठी दंतकथांतूनही महाराष्ट्राबाबतची अशी माहिती मिळू शकते. किंबहुना मराठी दंतकथांतूनच महाराष्ट्रातील एकूण धार्मिक, सामाजिक वातावरणाचे सम्यक् दर्शन होते. या समाजदर्शनाचा आढावा पुढील एका प्रकरणात घेतला जाईल तेव्हा जास्तीत जास्त संदर्भ दंतकथांचेच घ्यावे लागतील.

### मराठी दंतकथांतील वर्ण्यविषयाचे विस्तृत क्षेत्र

मराठी दंतकथांतील वर्ण्यविषयाचे क्षेत्र अत्यंत विस्तृत आहे. पुराण–कालापासून ते अर्वाचीन कालापर्यंतचा प्रदीर्घ काळ त्यांत सामावलेला असून त्या काळातील अनेक व्यक्तींची, घटनांची व क्वचित काही प्राण्यांची व वनस्पतींचीही स्मृती लोकमानसाने कथांच्या रूपाने कायम ठेवलेली आहे.

### दंतकथांच्या सत्यतेच्या विद्यमान खुणा

अनेक वेळा दंतकथांच्या सत्याधिष्ठिततेच्या खुणा, अवशेष अद्यापही विद्यमान असतात. त्यांमुळे त्यांच्या सत्यतेबद्दल शंका घेण्यास जागा राहात नाही. अनेक मराठी दंतकथांत अशा विद्यमान खुणांचे उल्लेख केलेले आहेत. शिवपिंडीवर घावाची खूण,

देवतेचे पाठमोरे दर्शन, देवीच्या पाठीवर बाणाची खूण, तडकलेली किंवा अपुरी लेणी, मशिदीशेजारी शिवपिंड अशा अनेक बाबींचा उल्लेख या संदर्भात करता येईल. काही दंतकथा देवता, गाणे, डोंगर, कडा, नदी इत्यादींच्या नावांचे स्पष्टीकरण करणाऱ्या असतात आणि त्या नामांच्याद्वारे स्मृती चिरंतन राहाते.

**मराठी दंतकथांतील इतिहासाच्या अत्यल्प खुणा**

सर जॉर्ज गॉम यांनी लोककथा ऐतिहासिकतेच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या असतात असे प्रतिपादन केलेले आहे. दंतकथांत ऐतिहासिक उल्लेख आढळतात हे खरे, तथापि मराठी दंतकथांना मात्र ऐतिहासिक दृष्टया विशेष स्थान देता येईल असे वाटत नाही. कारण प्रकाशित झालेल्या दंतकथा पाहिल्यास असे दिसते की त्यांतून इतिहासाच्या खुणा फारशा दिसतच नाहीत. ज्या काही अत्यल्प खुणा आहेत त्याही फारशा महत्वपूर्ण ऐतिहासिक घटनांच्या साक्षी आहेत असे म्हणता येणार नाही. काही ऐतिहासिक सरदारांचा काही कथांत उल्लेख असला तरी त्यांच्या खाजगी जीवनांतील घटनाच वर्णन केलेल्या असल्याने त्यांना ऐतिहासिक महत्व देता येणार नाही. मराठी दंतकथांतील काही ऐतिहासिक उल्लेख पुढील-प्रमाणे आहेत.

१) पेशव्यांचे नांदवीचे ( कुलाबा जिल्हा ) कारभारी कोकणे यांनी एका स्वयंभू शिवपिंडीवर देऊळ बांधले. ( पुष्प ३ – कथा २९ )

२) महादेवाच्या कृपेमुळे पेशव्यांचे सिल्लोड येथील सरदार ढापरे यांच्या मागे लागलेला दरोडेखोरांचा उपद्रव थांबला. महादेवाने स्वप्नात आदेश दिल्यानुसार केळगांवच्या किल्यातील एकाकी शिवपिंडीची पूजा सुरू करून तेथे देऊळ व वाडा बांधल्यामुळे त्यांच्यामागची शारीरिक पीडा नष्ट होऊन ते रोग-मुक्त झाले. ( मराठवाड्यातील लोककथा – कथा १६ )

३) हैद्राबादच्या निजामाच्या दरबारी अंबादास नामक बीड जिल्ह्यातील विद्वानाला मानाचे स्थान होते. एकदा देवीच्या कृपेमुळे त्याने आमावास्येच्या दिवशीही सर्वांना चंद्रदर्शन घडविले. त्याबद्दल निजामाने खूष होऊन देवीचे देऊळ बांधले व अंबादासला रोज योमिया नावाचे दहा मोहरांचे बक्षीस देऊ केले. अंबा-दासच्या वंशजांना अजूनही दोन रुपये ‘ योमिया ’ मिळतो. (पुष्प ३ – कथा ५१)

४) अहिल्याबाई होळकर यांनी वेरूळ जवळच्या झऱ्याकाठी आठ देवळे बांधली व त्या झऱ्याला कुशाव्रत असे नांव दिले. ( पुष्प ३ – कथा ५२ )

५) बालाघाटचे चिखली गाव – भोऱ्या नावाचा गुराखी एका अनोळखी गाईपाठोपाठ गुहेत शिरला – गाईने शिंगाने जड शिळा दूर केली. गुहेत सहा ऋषी-भोऱ्याला प्रसाद म्हणून शेण दिले, ( पुढे त्या शेणाचे सोने झाले. ) आणि सवाई माधवरावांना देण्यासाठी एक चिठ्ठी दिली. गुहेबाबत कोणाला काही सांगावयाचे नाही अशी सक्त अट - भोऱ्याने चिठ्ठी सवाई माधवराव यांना दिली. त्यात लिहिले होते. 'ऐश्वर्यात गुंतू नकोस. कार्य संपत आले निघून ये' चिठ्ठी वाचल्यावर सवाई माधवरावांनी राजवाड्याच्या पाठीमागच्या गच्चीवरून खाली उडी घेतली व पळत जाऊन ते बालघाटच्या गुहेत अदृष्य झाले. गुहेवर पूर्ववत शिळा ठेवली गेली. लोकांनी ती काढण्याचा खूप प्रयत्न केला पण भोऱ्याला कैद – भीतीने त्याने सर्व सांगितले. भोऱ्या गतप्राण. ( पुष्प ३ – कथा ·० )

उपरोक्त कथांतील ऐतिहासिक उल्लेखामधील सवाई माधवराव पेशवे व अहिल्याबाई होळकर एवढ्याच व्यक्तिरेखा ऐतिहासिकदृष्टचा महत्त्वाच्या आहेत. अहिल्याबाईचा प्रसिध्द दानशूर स्वभाव दंतकथेत प्रकट झाल्यास ते योग्यच म्हणावे लागेल. सवाई माधवरावांच्या मृत्यूची किंवा गुहेत अंतर्धान पावण्याची कथा ऐतिहासिक सत्याशी जुळत नाही. त्यांचा मृत्यू पुण्याच्या इतिहासप्रसिध्द शनिवार वाड्यातील एका इमारतीच्या गच्चीवरून उडी घेऊन झाला असे इतिहास सांगतो. वरील कथेतील बालाघाट डोंगर पुण्यापासून कितीतरी दूर आहेत तेव्हा या कथेची संगती ऐतिहासिक सत्याशी लावण अवघड वाटते. थोडक्यात मराठी दंतकथांतील ऐतिहासिक उल्लेख फारच थोडे असून जो एक महत्वाचा उल्लेख आहे तोही विश्वसनीय वाटत नाही.

**मराठीतील पौराणिक दंतकथा**

मराठी दंतकथांतील काही स्थानिक कथांची कथासूत्रे पौराणिक व्यक्तींशी निगडित आहेत. अशा कथांना Myth, Legend असेही नाव दिले जाते. अशा मराठी कथांची संख्या ऐतिहासिक कथांच्या मानाने बरीच अधिक आहे.

उदा. – १) नगर जिल्ह्यातील वांबोरी या गावाचे नाव कसे पडले यासंबंधीची ही कथा देवासुराच्या समुद्रमंथनाचा आधार घेते. समुद्रमंथनानंतर मोहिनीरूपाने विष्णूंनी अमृताची वाटणी सुरू केली. राहूने देवांच्या पंक्तीत बसून अमृत मिळविण्याचा प्रयत्न केला. चंद्राने त्याचे कपट उघडकीस आणले. विष्णूंनी सुदर्शन-चक्राने त्याचा शिरच्छेद केला. त्याचे वाम ऊर जेथे पडले त्या गावाला वामऊरी-वांबोरी असे नाव पडले. (पुष्प ३ – कथा ६०)

२) परशुरामाकडून निःक्षत्रिय पृथ्वी ब्राह्मणांना दान – ब्राह्मण त्याचा मान ठेवीनात. परशुरामाने चिडून समुद्र हटवून कोकणभूमी तयार केली - तेथे सर्व सोयी-

पण पापमुक्त करणारे एकही क्षेत्र नाही. देवांना विनंती --'एखाद्या स्थानी अंशरूपाने राहा' – त्याच्या रागाला भिऊन विनंती मान्य पण एक अट घातली, 'योग्य क्षेत्र एका रात्रीत तयार झाले तर राहू'. चोल येथे क्षेत्रनिर्मितीस सुरुवात – देवांचा कट हिंगुळजा देवीने पहाटेपूर्वीच कोंबड्याचा आवाज काढून परशुरामास फसविले– परशुराम निराश – कट कळल्यावर देवीचा पाठलाग – पाठीत बाण मारला – पाठलागात वेळ गेल्याने क्षेत्र अपुरे – देवीच्या पाठीवर बाणाची खूण. (पुष्प ३ – कथा २२).

३) हिरण्यकश्यपूच्या मृत्यूनंतर अतीव दुःखी झालेल्या कयाधूला नृसिंहाने दयाबुध्दीने नदीरूप देऊन अमर केले व तिला लोकांची पापे नष्ट करण्याचे सामर्थ्य दिले. (मराठवाड्यातील लोककथा – कथा २५)

**रामायणसंबंधित कथा**

१) नारदांच्या उपदेशानंतर वाल्याचा वाल्मिकी – त्याच्या पापाच्या खड्यांनी भरलेल्या सात रांजणांवरून त्या खेड्याला रांजणगाव हे नाव – त्या सात रांजणांचे डोंगर बनले. वाल्मिकीने तपाचरणानंतर जेथे स्नान केले ते ठिकाण वालझिरी हे पवित्र क्षेत्र बनले – निपुत्रिक जोडप्यांनी त्यात स्नान केल्यास वाल्मिकीच्या तपःसामर्थ्यामुळे मूल होते अशी श्रध्दा. (पुष्प ३ – कथा६९).

२) दशरथपत्नींना मिळालेल्या पिंडाचा भाग घारीने पळविला – नाशिकजवळ अंजनेरी डोंगरावर पुत्रप्राप्तीसाठी तप करणाऱ्या मर्कटीच्या हातात पिंडाचा तो भाग नेमका पडला – पिंडप्राशनाने तिला भीमपराक्रमी पुत्र हनुमान प्राप्त झाला. (पुष्प ३ – कथा ७१)

३) रामाने वनवासातून अयोध्येला परत जाताना सर्वांना आश्रमातील वस्तू वाटून टाकल्या – सर्व वस्तू संपल्यावर कातकरी लोकांचा पूर्वज रामभेटीस आला. रामाला त्याने खूप मदत केली होती. रामाने आपले धनुष्य त्याला बक्षीस दिले. त्यामुळे कातकरी समाज धनुर्विद्येत प्रवीण असून त्याच्या साहाय्याने अद्यापही आपली उपजीविका करतो. रामाच्या या देणगीवर त्याची अपूर्व श्रध्दा असते. (पुष्प ३ – कथा १०).

**महाभारतसंबंधित कथा**

१) पांडवांना एका रात्रीत लेणी पूर्ण करायची होती. सहा मजले पूर्ण – सातवा चालू – पांडवांचा निश्चय पूर्ण झाल्यास परमेश्वराचे त्यांना अधिक पाठबळ मिळेल, कौरव अधिक संकटात सापडतील या काळजीने गांधारीने स्वतः कोंबडारूप घेऊन – पहाटेपूर्वीच बाग दिली – तिचे कपट लक्षात येताच भीमसेनाने

तिचा पाठलाग केला तेव्हा ती नदीरूप होऊन सतत वाहातच राहिली. (पुष्प ३ – कथा ४).

२) पांडवांचा अश्वमेध यज्ञ – यज्ञाच्या अश्वाचे रक्षण करण्याचे काम पार्थाकडे – अश्व फिरत फिरत मणिपूरच्या हद्दीत – तेथे पार्थपुत्र बभ्रुवाहन याचे राज्य – बभ्रुवाहनाने घोडा अडविला – पितापुत्रांचे युद्ध – पार्थाचा व पार्थ-सेनेचा पराभव – पराभवामुळे पार्थ जेथे रडला त्या गावाचे नाव पाथर्डी पडले. (पुष्प ३ – कथा ३८)

३) पार्थ–बभ्रुवाहन युद्धात अर्जुनाचे शिर पाताळात उडाले – मानेपासून खालचा भाग पाथर्डीजवळ एका ठिकाणी पडला, म्हणून त्या गावाला मान + ऊर = मानूर असे नाव पडले. पुढे बभ्रुवाहनाने अमृत आणून पार्थाला जिवंत केले. अर्जुनाने पराजयाच्या रागाने ती नगरी (मणिपूर) पालथी केली. तेथे जमिनीमध्ये अद्यापही उलटचा गाडग्यांच्या उतरंडी सापडतात.

४) पार्थाच्या अश्रूंनी पाथर्डीजवळ बारव तयार – रडताना पश्चात्तापाने त्याने शाप दिला, जो नर या बारवेचे पाणी प्राशन करील तो नपुंसक होईल. ही बारव हिजड्यांचे उगमस्थान समजले जाते. (पुष्प ३ – कथा ३५)

**विठ्ठलासंबंधी कथा**

१) भक्त माळीरायाचे आतिथ्य न केल्याबद्दल विठोबारायाच्या पत्नी पदुबाई हिला भयंकर शाप – ती वेडी होऊन वनात वणवण भटकली, मरण पावली – प्रेताची विटंबना झाली – हाडे पावसाने वाहून समुद्रात गेली – भक्त माळीराया हे ऐकून दुःखी – तप करून समुद्राकडून हाडे परत मिळविली – गंगेत टाकली – अस्थींचे कमल – विठोबाराणा याने ते तोडताच त्यातून पदुबाई बाहेर – पत्नीच्या पुनर्भेटीने विठोबास आनंद पण प्रतिज्ञा केल्यामुळे (तुझी माझी जोडी तुटली) पुन्हा तिच्याबरोबर संसार नाही – त्याचे पंढरपुरास स्थलांतर व तिचा स्वतंत्र संसार माळशिरसलाच – भेटीगाठी चालू. (पुष्प ३ – कथा ७६)

२) पित्याने घराबाहेर काढलेल्या तुळशीला विठोबाचा आश्रय – एका गावात घर केले – पंढरपूरला परत जाताना तिला सोबत म्हणून मांजर ठेवले – रुक्मिणीला असूया – करंडीतून फळाफुलाऐवजी सर्प पाठविले – सर्पदंशाने मांजर मृत – तुळशीला वाटले ही विठोबाचीच थट्टा – ती उदास, निराश – मौनव्रत – विठोबाने नाना तऱ्हा केल्या तरी ती गप्पच – शेवटी तिला विनंती, 'काहीतरी बोल' ती बोलली, 'धरणीमाते मला पोटात घे' – तुळशी भूमीत गुप्त – विठोबाने केस धरून ओढताच हातात तुळशीच्या मंजिऱ्या – तुळशीच्या झाडाशी विठोबाचा विवाह – तुळशीविवाहाची प्रथा अद्यापही रूढ. (पुष्प ३ – कथा ७७)

**श्रीकृष्णासंबंधी कथा**

१) श्रीकृष्णाचे फक्त रुक्मिणीवर 'मिठासारखे प्रेम' – अन्य पत्नींवर गोड प्रेम – रुक्मिणी फार नाराज – आजारी पडली – समजूत पटता पटेना – देवकीने मेजवाणीचा बेत आखला – कुठल्याच पदार्थात मीठ नाही – सर्व पदार्थ बेचव – रुक्मिणीला कळले आपणच श्रीष्णाला जास्त प्रिय. ( राजविलासी केवडा – कथा ९)

२) श्रीकृष्णाने वैराळाचे (कासाराचे) रूप घेतले व तो गावोगावी बांगड्या विकू लागला – बांगड्या फार तेजस्वी व सव्वालाख मोलाच्या – कंस–पत्नी कमळजा हिला उत्सुकता – वैराळाला पाचारण – चुडा भरताना हाताला भयंकर कळ – कंस झोपलेला म्हणून तिला ओरडताही येईना – कृष्णाने सांगितले, 'सुरी आण, विळा आण, चुडा सैल करतो' – तिने पटकन कंसाच्या उशाखालचे खड्ग आणून दिले – खड्ग हातात येताच चुडा सैल – कृष्ण मूळ रूपात उभा – कंसाला ठार मारले – शिर घेऊन आईकडे गेला व म्हणाला, 'आई, उसनं फेडलं मी'. (सुंबरान मांडीलं – कथा १६)

**सावित्रीची कथा**

डाळशिनी राजाची कन्या सावित्री हिचा विवाह कातोडी जातीच्या अग्निराजाशी झाला – एकदा कंदमुळे आणताना अग्निराजा मृत – सावित्रीने त्याचे शरीर डोक्यावर घेतले – शरीर खाली टाकल्याशिवाय आत्मा काळयमाला नेता येईना – कावळ्याकडून डोक्यावर चोच मारविली – शव पडले – आत्मा काढून घेतला – सावित्री यमदूताच्या पाठोपाठ स्वर्गात – काळयम जेवून हात धुण्यासाठी जात असता दार अडवून सावित्री उभी – 'माझाही प्राण घ्या नाहीतर माझा नवरा परत द्या' – अग्निराजाचा आत्मा मुक्त – शवाला स्नान घालताच अग्निराजा पुन्हा जिवंत – अमृतसिंचनाने ओसाड जागी राजवैभव. (वैजयंती – कथा २०)

**मल्हारी – बानू यांची कथा**

बानू मूळची इंद्रकन्या – 'पित्याच्या नशिबाने खाते' हे कबूल करीना – इंद्राने तिला बालरूप देऊन, पेटीत घालून जासूदाकरवी अरण्यात नेऊन सोडले – धनगरांनी पालन केले – चांगला पती मिळावा म्हणून १२ वर्षे शंकराची अखंड पूजा – शंकर प्रसन्न – वर देऊन खडावा दिल्या – खडावांनी जेजुरीला नेले – मल्हारीला पदरावर काजळाने पत्रिका लिहून पाठविली – मल्हारीने म्हाळसाबरोबरच्या

सारीपाटाच्या डावात मुद्दाम हार पत्करून १२ वर्षे वनवास पत्करला – बानूच्या माहेरी चाकरी – मल्हारीबानूविवाह – जेजुरीस परत – सवत पाहताच म्हाळसा रागावून शिळारूपाने डोंगरावर राहिली – आता तेथे अर्धा डोंगर म्हाळसाचा व अर्धा बानूचा. (सुंबरान मांडलं – कथा २१)

**पौराणिक दंतकथांतील वेगळे कल्पनाबंध**

पुराणांतील व्यक्तिरेखांचे स्वभाव आणि बऱ्याचशा पौराणिक घटना समाजातील बहुसंख्य लोकांना माहीत असतात. दंतकथा या सत्याधिष्ठित असतात हे खरे, तथापि पौराणिक दंतकथांत रूढ कथानकांपेक्षा काही वेगळे कल्पनाबंध काही ठिकाणी आढळतात. उपरोक्त मराठी पौराणिक दंतकथांतही या वेगळे-पणाची जाणीव काही वेळा होते. जसे –

१) गांधारीने कृत्रिम अंधपणाचे असिधाराव्रत जन्मभर पाळले. कौरवपांड-वांच्या यादवीत तिने सक्रिय भाग घेतलेला आढळत नाही. येथे मात्र तिने पांडवांना परमेश्वरी पाठबळ मिळू नये म्हणून स्वत: घराबाहेर पडून पांडवांच्या बेतात विघ्न आणले.

२) श्रीकृष्णचरित्रात कंसाने अक्रूराला पाठवून कृष्णाला मुद्दाम आमंत्रित करून मथुरेत नेलेले आहे व नंतर कंसवध झाला. मराठी दंतकथेत कृष्ण स्वत:च त्याला मारण्यासाठी वैराळरूपाने कंसाच्या राजवाड्यात गेलेला आहे.

३) सावित्रीच्या रूढ कथेत व मराठी दंतकथेत तिने 'पतीचा प्राण परत आणला' या व्यतिरिक्त कुठलेच साम्य नाही. पतीचे नाव वेगळे आहे – रूढ कथेत तिने आपल्या पतीचा प्राण नेणाऱ्या यमाला पृथ्वीवरच आपल्या वाक्-कौशल्याने पेचात पकडून त्याला पतीचा प्राण परत द्यावयास भाग पाडलेलें आहे. परंतु दंतकथेत ती थेट स्वर्गात गेली आहे व तेथून त्याचे प्राण परत घेऊन आली आहे. आग्रराजाच्या कातोडी जातीचा उल्लेख कथेत आहे. कदाचित त्या जातीत अशी कथा रूढ असणे शक्य आहे. वेगळ्या कल्पनाबंधांचे हे अस्तित्व लोकप्रतिभेची चुणूक दाखवते.

**अर्वाचीन माणसांचे अत्यल्प उल्लेख**

मराठी दंतकथांत अर्वाचीन माणसांचे उल्लेख अगदीच अल्प आहेत. गावोगाव आढळणाऱ्या विपुल दंतकथांचे पुरेसे संकलन झाले नाही. अशी संकलने झाली तर व्यक्तींचे अनेक उल्लेख आढळतील. आज ज्या दंतकथा प्रकाशित झाल्या आहेत त्यांतील व्यक्तींचे उल्लेख कशा स्वरूपात आढळतात ते पुढील उदाहरणांवरून समजू शकेल.

१) औंढा गावाच्या दक्षिणेला दाट जंगलात आनंदीमहाराजांची समाधी - करतलभिक्षा मागण्याचे त्यांचे वृत - करतलभिक्षा म्हणजे मिळेल ती गरम, गार भिक्षा हातावर घ्यायची व लगेच भक्षण करावयाची - एकदा एका काचाऱ्याने काचेचा उकळता रस भिक्षा म्हणून हातावर वाढला - महाराजांनी तो रस लगेच भक्षण केला व जंगलात पळत जाऊन देहत्याग केला. (पुष्प ३ - कथा ८५).

२) शिरडीच्या साईनाथांचे गुरू नारायणमहाराज - पिसाटासारखे वागत - काशीला गेल्यावर आंबा सोडला म्हणून आंबा न पिकण्याचा शाप असलेल्या चांदोरी गावी राहात. एकदा नदीचे पाणी गळ्यापर्यंत आले तरी हलले नाहीत म्हणून पुरानेच ती मर्यादा पत्करली - याच कथेत गोंदवलेकर महाराज, गुलाब-राव महाराज यांचा उल्लेख आहे. ते दोघे नारायणमहाराजांना मान देत, साईनाथांनी तर त्याना गुरू मानले होते. (पुष्प ३ - कथा ९३ ).

**मराठी दंतकथांतील स्पष्टीकरणकथा**

मराठी दंतकथांतील बऱ्याच कथा या स्पष्टीकरणकथेच्या स्वरूपाच्या आहेत. त्या कथांतील प्रमुख विभाग नामस्पष्टीकरण असून अन्य काही कथांतून एखाद्या समाजमान्य रूढीचे किंवा एखाद्या कुटुंबरूढीचे स्पष्टीकरण केलेले आढळते

**नामस्पष्टीकरण कथा**

नामस्पष्टीकरणकथांतून देवतांची नावे, गावांची नावे, डोंगरकड्यांची नावे नद्यांची नावे, नवसांची नावे, माणसांची आडनावे अशा अनेक नावांचे स्पष्टीकरण कथारूपाने केले जाते. जसे -

**देवतांची नावे**

१) ओझर गावी बंगला बांधताना सागवानी लाकडात भुंगा आढळला - गवंड्याचे मत, 'या लाकडात भूत आहे', बंगल्यात लोकांना राहू देणार नाही. व लाकूड वापरू नये - त्याचे न ऐकता लाकूड वापरले - भूत त्रास देऊ लागले - प्रथम ते लोकांना एकदम मारीत असे - नंतर फक्त मान धरी - काही काळाने माणूस मानमोडीने मरून जाई. म्हणून त्या भुताला 'मानमोड्या बाबा' नाव पडले - परंतु नंतर त्या भुताला देवस्वरूप मिळाले व ते आता दयाळू बनले असून विंचूदंश उतरविते अशी श्रध्दा रूढ . (पुष्प ३ - कथा ४९).

२) सावंतवाडी वेंगुर्ला रस्त्यावरील पाल गावी शेतकऱ्याला नदीकाठी खाजणात (दलदलीचा भाग) नांगरताना मूर्ती सापडली. त्याने ती कोरड्या जागी नेऊन ठेवली - पूजाअर्चा सुरू - खाजणात सापडली म्हणून तिला 'खाजणाई' हे नाव पडले. (पुष्प ३ - कथा ६३)

३) बुध्दासारखी दिसणारी मूर्ती समुद्राकाठी – खवणे या कोळीण स्त्रीच्या लोकांना मूर्ती कशाची हे ओळखेना – एकमेकांना विचारू लागले, 'हे कवण बा ? त्यातील 'कवण बा' याचा खवणोबा होऊन तेच नाव देवाला दिले गेले. (पुष्प ३ – कथा ६५).

**गावांची नावे**

काही गावांच्या नावांमागे काहीतरी संयुक्तिक कारण असते. त्या नावांतून बहुधा एखादी असामान्य व्यक्ती वा त्या परिसरातील असामान्य घटना यांची स्मृती राखली जाते.

१) पूर्व खानदेशातील एक कलावंतीण देवीची भक्त – पुत्रप्राप्तीसाठी 'निंबसाडा नेसून दंडवत घालीत जायचा' नवस – पुत्रप्राप्ती – नवस फेडला – तिच्या देवभक्तीमुळे ती 'माई' म्हणून प्रसिध्द – तिच्या नावावरून गावाला 'माहिजी' हे नाव. (पुष्प ३ – कथा ७)

२) रामाला युध्दात त्रस्त करून सोडणाऱ्या अहिरावणाच्या नावावरून नाशिकजवळील एका खेड्याला 'अहिरवाणी' हे नाव. (पुष्प ३ – कथा ६०)

३) ब्राह्मणाला खणताना हंडा मिळाला – हंड्यात विंचू – विंचवाची माळ करून दाराला टांगली – एका चांभारणीला तेथे पुतळ्याची माळ दिसली – ब्राह्मणाला चांभारणीशी विवाह करून धनलाभ – चांभारणीच्या नशिबाने धन मिळाले म्हणून गावाला ' चांभारगोदे ' हे नाव. (पुष्प ३ - कथा १५)

४) कुलाबा जिल्ह्यातील उंबर्डीच्या विश्रामगडावर कडेलोटाची सोय – एका सरदाराचा कडेलोट – त्याच्या आयुष्याची दोरी बळकट म्हणून तो एकदम खाली न पडता कड्यात उगवलेल्या झुडुपात अडकला व घसरत खाली जिवंत पोचला – तेथून त्याने ओरडून क़िल्लेदाराला सांगितले, ' मी जिता आहे ' – सरदार जिवंत रहावा ही ईश्वरेच्छा समजून देहांताची शिक्षा रद्द – जवळच्या वाडीला ' जिते ' हे नाव. (पुष्प ३ – कथा २७)

५) शिराळे गावच्या ब्राह्मणाला खणताना हंडा सापडला – हंड्यात विंचू – एका चांभारणीला विंचवाची माळ पुतळ्यांची दिसली – ब्राह्मणाचा तिच्याशी विवाह – आंतरजातीय विवाहामुळे लोकांचा बहिष्कार – श्राद्धाला ब्राह्मण मिळेनात– दूरच्या ब्राह्मणांना पैशाच्या आमिषाने बोलावले – श्राद्धकर्मानंतर त्या ब्राह्मणांना सत्यस्थिती कळली – परगावच्या ब्राह्मणांची संख्या बत्तीस होती म्हणून गावाला ' बत्तीस शिराळे ' हे नाव. (पुष्प ३– कथा १४)

**कडा, डोंगर यांची नावे**

१) दोन सवती कडयाच्या तोंडावर एकापुढे एक बसलेल्या – दोघींचे मुळीच पटत नसे – धाकटीला वाटले, ' हिने मला आता ढकलले तर ती एकटीच संसार-सुख भोगेल '– तिने आपल्या व सवतीच्या पदराची गाठ मारून ठेवली – मोठीच्या मनात दुष्टता होतीच – तिला वाटले, ' आता हिला ढकलले तर कोणाला कळणार? ' तिने सवतीला ढकलले – पदर बांधलेले – त्यामुळे दोघीही खाली पडून मरण पावल्या. कडयाला ' सवत कडा ' हे नाव. (पुष्प ३– कथा ६)

२) बीड जिल्ह्यातील खांबे गावच्या डोंगरावरील देवीची मूर्ती प्रथम सोन्याची होती – चोर आले – देवीच्या सत्त्वाने आंधळे – क्षमायाचनेनंतर दृष्टी परत – परंतु चोरांचा राग येऊन देवीची सुवर्णमूर्ती दगडी बनली व तिने तोंड फिरविले – देवीचे दर्शन अजूनही पाठमोरे – ' डोंगरास सोन्यारी आईचा डोंगर ' हे नाव. (पुष्प ३– कथा ४४)

**नवसांची नावे**

१) वस्त्राऐवजी निंबाचा पाला अंगावर गुंडाळून (भर उन्हातही) देवीला अनवाणी साष्टांग दंडवत घालीत जाणे या प्रकाराला ' निंबसाडा ' म्हणतात. असा नवस कलावंतिणीने केला होता. (पुष्प ३ – कथा ७)

२) नाशिक जवळच्या उंच वणी डोंगरावर देवीचे देऊळ – एका बाईचा पुत्रप्राप्तीसाठी तिला ' शीतखडा ' खेळावयाचा नवस – शीतखडा खेळावयाचा नवस म्हणजे देवीचे नाव घेऊन तेथील कडयावरून उडी घ्यावयाची – कडयावरून पडल्यास इतके बारीक तुकडे होतात की शीतही सापडत नाही. म्हणून त्याला ' शीतखडा ' म्हणावयाचे. (पुष्प ३ – कथा ७३)

**सामाजिक, धार्मिक रूढींचे स्पष्टीकरण**

काही दंतकथांतून समाजात प्रचलित असणाऱ्या रूढींचे स्पष्टीकरण दिले जाते. या कथा अंधश्रद्धेवर आधारित आहेत हे निराळे सांगावयास नको. परंतु आहे या स्थितीत मानसिक समाधान मिळविण्यासाठी या कथांची निर्मिती झाली असावी किंवा इतरांनी जाणीवपूर्वक निर्माण करून या कथा रूढ केल्या असाव्या काहीही असो त्या रूढ आहेत हे खरे. त्यांपैकी काही कथा अशा –

१) पूर्वास्पृश्य महार दरिद्री व अस्पृश्य का होते याबद्दलची ही कथा आहे. देवाने जाती निर्माण करून कामे वाटून दिली. महारांची हुषारी पाहून त्यांना पालखीचा मान देण्यासाठी दरबार भरवला. परंतु महारांनी तंबाखू चोळण्यात खूप

वेळ घालवला. दरबारात खूप उशिरा पोचले. त्यामुळे त्यांचा पालखीचा मान बुडून दारिद्र्याचा व अस्पृश्यतेचा शाप मिळाला. (पुष्प ३– कथा ५)

२) स्त्रियांनी गोंदून का घ्यायचे व पुरुषांनी गोंदे का घ्यायचे ? (स्वयं-प्रेरणेने अंगावर स्वतःच डाग घ्यायचे) – मृत्यूनंतर पापपुण्यनिवाडा – स्त्रीपुरुषांच्या अंगावर ही योग्य चिन्हे असतील तर देव प्रसन्न होऊन स्वर्गात पाठवतो व तसे नसेल तर नरकवास भोगावा लागतो. (पुष्प ३– कथा १७)

३) देवांगना खोडियाल व पिंपळाला यांना भूकतहान म्हणजे कशी असते हे पाहावयाचे होते - दोघी पृथ्वीवर वड, पिंपळ वृक्षाने राहू लागल्या – पिंपळाला तरुण नरबळी फार प्रिय – कालांतराने तरुणांचा अभाव – फक्त एक तरुण व वृद्ध आजोबा – नातू आजारी म्हणून वृद्ध बळी जाण्यास तयार – पण पिंपळाला तरुणच हवा – खोडियालने संतापून पिंपळागला बांधून घातले – अन्नपाण्यावाचून हाल - बहिणीला शरण – खोडियालचा उःशाप 'माणसे नैवेद्य देतील, पण मारलेले पुरुष तुला परत द्यावे लागतील – बहिणीच्या बंधनाची साक्ष म्हणून स्त्रिया सूत गुंडाळतील' तेव्हापासून वांझ स्त्रिया पिंपळाला प्रदक्षिणा घालतात, सूत गुंडाळतात त्यामुळे त्यांना पुत्रप्राप्ती होते अशी श्रद्धा रूढ. (पुष्प ३ – कथा ७८)

**घराण्याच्या रूढीचे स्पष्टीकरण**

एखाद्या कुटुंबात इतरांपेक्षा अगदी वेगळी अशी एखादी प्रथा रूढ असते.

१) कोकणातील क्षत्रिय सावंत घराण्यात एका शेंडीऐवजी दोन शेंड्या ठेवतात – एक मानेवर, एक डोक्यावर – विवाहसमयी मानेवरची शेंडी विधिपूर्वक काढली जाते. त्यांच्या एका पूर्वजाने संकटसमयी देवाला 'मुलगा बळी' देण्याचा नवस केला – संकट दूर – पण मुलगा बळी देणे जिवावर आले – एका माणसाच्या सल्ल्यावरून मुलाच्या मानेवर शेंडी ठेवली – मुलाच्या विवाहसमयी नवस पुरा करण्याचे देवाला कबूल केले – नवस फेडताना देवाजवळ बोकड व खाटिक व बाहेर अंगणात मुलगा व न्हावी – सावंताने हुंकार देताच न्हाव्याने मुलाची दुसरी शेंडी काढावी, लोकांनी जोरात हुंकार द्यावा व त्याच क्षणी बोकडाचा बळी आत देऊन त्याच्या रक्ताची धार देवावर धरावी असे ठरले. त्याप्रमाणे सर्व केले – नवस फेडूनही मुलगा जिवंत – देवाचाही कोप झाला नाही. तेव्हापासून त्या घरण्यात दोन शेंड्या ठेवण्याची प्रथा रूढ . (पुष्प ३ – कथा १३)

**काही विद्यमान खुणांचे स्पष्टीकरण**

काही ठिकाणच्या वैचित्र्यपूर्ण खुणांचे स्पष्टीकरण करणाऱ्या काही मराठी दंतकथा आहेत. त्यांचे स्वरूप वैशिष्टयपूर्ण आहे. काही उदाहरणे अशी –

१) नारायण व माऊली बहिणभाऊ – देवाचे अवतार व देवभक्त – दर एकादशीला रात्रीतून पंढरपूरला जाऊन येत – एकदा परतताना माऊलीला खूप तहान लागली – पाणी आणायला नारायण गेला – एका घरी मुंज चालू – तेथे भोजनास बसला – बहिणीचा विसर – भोजनानंतर पाणी घेऊन गेला – माऊलीने थोबाडीत मारली – रात्रीतून परतले नाहीत म्हणून दोघे तेथेच मूर्तीरूपाने स्थिर – नारायणाच्या मूर्तीच्या डाव्या गालावर पाच बोटे उमटलेली आहेत. (पुष्प ३ - कथा ६४)

२) जिंतूरच्या देवळातील नंदी – एका भक्त स्त्रीने आणलेला कोंडा जिवंत होऊन खाई – पतीला शंका – पत्नीपाठोपाठ देवळात गेला – बाईचा पती पाहतो हे नंदीने पाहिले – कोंडा खाणे बंद – बाईने खूप विनवणी केली तेव्हा नंदीने मान चळवून पतीकडे निर्देश केला – नंदीचे तोंड अजूनही तसेच तिरके आहे. (मराठवाड्यातील लोककथा – कथा २२)

३) अंबाजोगाईची देवी व परळीच्या वैजनाथाचा विवाह ठरला – 'सूर्योदयाच्या आत विवाह झाला पाहिजे' अशी जोगाईची अट – वऱ्हाडास येण्यास थोडा उशीर – कोंबडा आरवला – जोगाईने संतापून कोंबड्यास जमिनीवर – आपटले – कोंबडा मृत – फुलांनी डवरलेला मंडप दगडी बनला – कोंबड्याच्या वधाची खूण दगडावर दिसते. (मराठवाड्यातील लोककथा – कथा २७)

**वनस्पतिवैशिष्ट्यांचे स्पष्टीकरण**

१) मेहरूणची बोरे रामाने खाल्लेल्या शबरीच्या उष्टया बोरांच्या बियापासून उत्पन्न झाली म्हणून फार गोड असतात. (पुष्प २ – कथा ६)

२) एका भुकेल्या यवनाला गाय मारून खायची होती. तो एका रानात एका झाडाखाली गाय मारू लागला. पण त्याला त्या झाडाने सांगितले, 'गोहत्या हे पाप, माझ्या छायेखाली हे दुष्कर्म करू नकोस' – तेव्हा तो दुसऱ्या झाडाखाली गेला. तेथेही प्रतिबंध – फक्त सागाच्या झाडाने अडवले नाही – तेथे त्याने गाय मारून खाल्ली. सागाची मूक संमती वनदेवीला आवडली नाही. सागाला शाप, – 'गाईचे रक्त तुझ्या कोवळ्या पानांतून वाहील'. म्हणून सागाच्या पानांत लाल रस वाहतो. (पुष्प ३ – कथा २३)

दंतकथांतील स्पष्टीकरणकथांचे स्वरूप हे अशा विविध प्रकारांचे असते. अशा मराठी कथांची संख्याही पुष्कळ आहे.

### माहात्म्यकथा

दंतकथांतील दुसरा एक मोठा वर्ग हा माहात्म्यकथांचा असतो. काही माहात्म्यकथा स्थानिक देवतांचे माहात्म्य वर्णन करतात, काही कथांत तेथील कुणातरी व्यक्तीचा महिमा गायिलेला असतो. तर काही कथा विशिष्ट ठिकाणाचे, स्थानाचे वैशिष्टच कथन करतात.

### क्षेत्रमाहात्म्यकथा

१) पाथर्डी तालुक्यातील वडगावचा उघडचा पारावरचा मारुती प्रसंगी कौल देतो, नवसास पावतो. कर्तव्यात कसूर झाल्यास मूर्तीचा रंग काळवंडतो. सर्व सुरळीत झाल्यावर मूर्ती पूर्ववत होते. (पुष्प ३ – कथा ३६)

२) औंढा नागनाथाच्या देवळाच्या आवारातील नागतीर्थाला बारा वर्षांनी कपिलाषष्ठीच्या मुहूर्तावर गंगा भेटायला येते. तीर्थाचे पाणी पांढरे होते व काही क्षणच तसे टिकते. (पुष्प ३ – कथा ८३)

३) वाळणकोंडीच्या देवीच्या देवापुढच्या कुंडातील मासे मारायचे नाहीत असा दंडक – मारल्यास मारणाराचा हमखास मृत्यू – हीच देवी पूर्वी डोहातून भांडी काढून देई – भांडी परत करावयाची अट – अट मोडल्यावर भांडी मिळणे बंद झाले. (पुष्प ३ – कथा १)अशी कथा गावोगाव प्रचलित असल्याचे आढळते.

४) जितूरजवळ मैनावती देवीचे देऊळ – जवळच मशीद – तेथील मिस्किदखान देवीची चेष्टा करी – देवीला सामर्थ्य दाखविण्याचे आव्हान त्याने दिले – तावडतोब जोरदार वादळ, विजांचा कडकडाट, नदी उलटी वाहू लागली व मशिदीशेजारी पिंड तयार झाली – देवीचे सामर्थ्य मान्य – नदी अजूनही उलटी वाहते – मशीद व शिवपिंड एकत्र आहेत. (मराठवाड्यातील लोककथा – कथा२६)

### व्यक्तिमाहात्म्यकथा

एखाद्या ठिकाणच्या व्यक्तीचे माहात्म्य प्रकट करणाऱ्या काही दंतकथा असतात. ही माणसे सिध्द वा अतिमानवी गुणांनी मंडित झालेली असतातच असे नव्हे. अगदी सामान्य माणूसही कधीतरी आपल्या गुणांची चुणूक दाखवून जातो. त्याच्या व्यक्तिमत्वाचा हा उजळ भाग कथारूपाने समाजात प्रचलित राहातो. प्रकाशित मराठी व्यक्तिमाहात्म्यकथांत परमभक्त व्यक्तींचा वर्ग मोठा आहे. रोजचा देवदर्शनाचा वा नियमित वारीचा केलेला नेम तरुणपणी सहज पाळला गेला तरी वार्धक्यात तो तडीस जाणे अवघड होऊन बसते. तेव्हा देवच भक्ताच्या निकट

वस्ती करतो. अशा आशयाच्या बऱ्याच मराठी दंतकथा आहेत. अर्थात अन्य संकटांतही देव मदत करतातच.

१) डोंगरमाथ्यावरील महादेवाची रोज रूद्रावर्तनपूर्वक पूजा करण्याचा जगन्नाथपंतांचा नेम – वार्धक्यात पाऊलही टाकवेना – देवाची प्रार्थना, तुझ्या पूजेसाठी येताना हा जीर्ण देह गळून जावो' – त्यांची प्रार्थना ऐकून देवच त्यांच्या घराजवळ डोंगरपायथ्याशी वस्तीस आले. (पुष्प ३ – कथा २)

२) कोळयाच्या घाडगेबुवांसाठी विठ्ठलाचे स्थलांतर. (पुष्प ३ – कथा १८)

३) तिलोरे येथील एका गवळयासाठी खंडोबाचे जेजुरीहून स्थलांतर. (पुष्प ३ – कथा २१)

४) अंबादास ब्राम्हणासाठी भर आमावास्येला देवीने चंद्रदर्शन घडविले. (पुष्प ३ – कथा ५१)

५) कर्णीराम मारवाडयासाठी न्यायालयात बालाजीने प्रकाशझोताच्या रूपाने साक्ष दिली. (पुष्प ३ – कथा ९५)

६) अंबडच्या तानाजीला पकडावयास सैनिक आले असता देवीने त्याला आपल्या चरणी शिव करून घेतले. (मराठवाडयातील लोककथा – कथा २१)

**असामान्य गुणी व्यक्तींच्या कथा**

१) कराड गावातील एका विहिरीत नकटा रावळा पिशाच्चरूपाने राहतो व तावडीत सापडल्यास काटा काढतो असा समज – वाळसे गावच्या यल्लोने त्याची फजिती केली – ती विवस्त्र होऊन विहिरीवर गेली – नकटया रावळाच्या आज्ञे-प्रमाणे त्याचे पाय धुतले, पण पुसण्यासाठी वस्त्रच नव्हते. पिशाच्चाला ओल्या पायांनी चालता येत नाही. त्याच्या तावडीत न सापडता यल्लो परत आली. (पुष्प ३ – कथा ७).

२) पन्हाळगडच्या डोंगरात शत्रूबरोबर पराक्रमाने सामना देणाऱ्या सावंत बंधूंवर परमेश्वर संतुष्ट दगडी आकृतींच्या रूपाने स्मारक. (पुष्प ३ – कथा ९)

**स्थानमाहात्म्यकथा**

एखाद्या स्थानाची काही वैशिष्टचे परंपरेने मानली जातात. या कथांचे हे माहात्म्य बरेच वेळा तेथील देवतेशी संबध्द असू शकते.

१) पाथर्डी तालुक्यातील नागदेवतेच्या ( साळसिदबाबा ) देवळात सर्पदंश झालेल्या व्यक्तीस आणून 'चांगभला' घोषणा केल्यास सर्पदंश उतरतो. सर्पदंश झालेला मनुष्य तर प्रदक्षिणा घालतोच, पण जनावरे प्रदक्षिणा घालतात. ( पुष्प ३ –कथा ३७).

२) ओझर गावातील मानमोडया बाबा विंचूदंश उतरवितो. ( पुष्प ३ – कथा ९१ ).

३) सोलापूर जिल्ह्यातील मजेरगांवच्या एका विहिरीच्या पाण्याने कुत्र्याचा दंश उतरतो. ( पुष्प ३ – कथा ९१ ).

४) लवंगच्या मारुतीच्या देवळात गंडमाळेसारखा रोग बरा होतो. ( पुष्प ३ – कथा ८९ )

**संपूर्ण गावाची वैशिष्टये कथन**

वरील सर्व उदाहरणे गावातील एखाद्या विशिष्ट स्थानाशी निगडित आहेत. तथापि काही कथांत मात्र संपूर्ण गावाची काही आगळी वैशिष्टये कथन केलेली असतात.

१)बार्शीजवळच्या सासुरे गावी विहीर खोदत नाहीत. हट्टाने एका माणसाने खगली तर महिन्याच्या आत कुटुंब नष्ट – तेथे विहिरीचे पाणी नसले तरी शेते सदैव हिरवीगार असतात व गाव धनधान्याने समृध्द आहे. ( पुष्प ३ – कथा ८७ )

२) बार्शीजवळच्या काळेगावी तर खूप बंधने पाळली जातात. गावात कुठलेच चक्र चालत नाही त्यामुळे पिठाची गिरणी नाही. कुंभारही नाही, मुसल–मानाचे एकही घर गांवात नाही, राहिल्यास निर्वंश होतो. गावाचे दैवत नरसिंह – त्याच्या यात्रेत खूप भजने होतात, पण तमाशा व नायकीण येऊ शकत नाही. बैलांच्या गळयात घुंगुरमाळा घालण्यास बंदी आहे. परगावचे कुणी आले तर त्यांनाही आपल्या बैलांच्या गळयातील घुंगुरमाळा काढाव्या लागतात. ( पुष्प ३ – कथा ८६ )

वरील कथांना कथा म्हणणे अवघड आहे कारण त्या फारशा कथारूप नसून फक्त निवेदन करणाऱ्या आहेत. बऱ्याचशा प्रथांचे कारणही त्यांत दिलेले नाही. त्या प्रथांच्या मुळाशी काहीतरी कथा असण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यांचा शोध घ्यावयास हवा.

**मराठी दंतकथांतील पात्रांचे स्वरूप**

मराठी दंतकथांत वर्ण्यविषयांची किती विविधता आहे याचा प्रत्यय उपरोक्त सर्व उदाहरणांवरून येईल. या कथांतील पात्रांची ओळखही तदनुषंगाने सहजच

होते. मराठी दंतकथांतील पात्रांत राक्षसादी योनी, वनस्पती, प्राणी यांना विशेष स्थान मिळालेले नाही. देवदेवता आणि सामान्य माणसे असे दोनच प्रकार प्राधान्याने दिसून येतात. राजपरिवारालाही या कथांत स्थान दिलेले आढळत नाही.

लोककथांतील पात्रांचे स्वरूप पाहताना लोककथांतील बरीचशी पात्रे ही भूमिकापात्राच्या (Dramatis Personae) स्वरूपाची असतात हे आपण पाहिले आहेच. दंतकथांतील पात्रांचे स्वरूप पाहताना असे निश्चित म्हणता येते की दंतकथांतही भूमिकापात्राच्या स्वरूपाची पात्रे अधिक असली तरी व्यक्तिवैचित्र्यांचे दर्शन अन्य लोककथाप्रकारांच्या तुलनेने दंतकथांत अधिक प्रमाणात होते. दंतकथांतील देवदेवतांचे स्वरूपही बव्हंशी जगत्कल्याणकारकाची भूमिकाच करणारे आहे. त्या परोपकार करतात. भक्तांना संकटांतून सोडवतात, नवसास पावतात वगैरे. तथापि क्वचित का होईना, या भूमिकेपासून ढळल्याचे उदाहरणही सापडते. परशुरामाचा कोकणात क्षेत्र निर्माण करण्याचा हेतू उदात्तच होता. परंतु देवांनी कट करून तो निष्फळ ठरविला. हिंगुलजा देवीने त्यासाठी कपट केले. परशुरामाची फसवणूक केली. (पुष्प ३ – कथा २२)

देवदेवतांनी घालून दिलेली बंधने पाळली गेली नाहीत तर देवतांचा कोप होऊन शासन भोगावे लागते असा कथाभाग व्रतकथा व दंतकथा दोहोंत सापडतो. परंतु व्रतकथेत व्रतपालनानंतर कोपाचे शमन होते, परंतु दंतकथांत मात्र हा कोप कायमचाच ठरतो. उदा. डोहातून भांडी मिळण्याचे कायमचेच बंद होते. जोगाईचा विवाह संपन्न झालाच नाही. त्यामुळेच दुःखान्ताचे प्रमाणही दंतकथेत अधिक प्रमाणात आढळते.

मराठी दंतकथांतील मानवी पात्रांत थोडीच पात्रे सिद्ध स्वरूपाची आहेत. बाकीची बरीच माणसे सर्वसामान्य आहेत. त्यांच्यांत मात्र वैचित्र्य आढळते. वास्तव जीवनात सतत भेटणाऱ्या भिन्नप्रवृत्तीच्या माणसांचे दर्शन त्यांच्याद्वारे होते. त्यांच्यांत भूमिकास्वरूपाचे प्रमाण अत्यल्प असल्याचे आढळते. ' परीकथा ह्या हवेतून उडतात आणि दंतकथा जमिनीवरून चालतात. ' या विधानाची प्रचीती या पात्रस्वरूपावरून येते.

**मराठी दंतकथांतील लोकप्रतिभेचे किंवा लोककल्पनेचे स्वरूप**

दंतकथा ' कल्पनावगुंठित ' अशा स्वरूपाच्या असतात याचा उल्लेख केलेला आहेच. दंतकथा या निव्वळ सत्यकथन करीत नाहीत तर सत्याला लोकप्रतिभाशक्तीची आणि लोककल्पनाशक्तीची जोड दिली जाऊन त्यांच्या संयोगातून दंतकथेचे

अंतिम स्वरूप ठरते. परीकथांच्या बाबतीत कल्पनाशक्तीचे लगाम खूपच सैल सुटलेले असले आणि दंतकथांच्या बाबतीत तिची धाव तितकी नसली तरी ती अगदीच मंद नसते. ऐतिहासिक आणि सत्य मानल्या जाणाऱ्या घटना व व्यक्ती यांचे सामान्य पातळीपासून उन्नयन करण्यासाठी अशक्यप्राय वाटणारे कल्पनाबंध प्रत्यक्ष सत्य-कथनात बेमालूम मिसळले जातात. मराठी दंतकथांतूनही लोकप्रतिभाशक्तीचे व लोककल्पनाशक्तीचे नमुने प्राचुर्याने दिसून येतात.

### काही स्थलांना देवत्व प्रदान

देवमूर्ती नसणाऱ्या काही स्थलांना दंतकथांत देवत्व प्रदान केले जाते. जसे—

१) संगमनेरजवळील ओझरपाशी असणाऱ्या एका डोहाजवळ एक शेंदूर लावलेला खडक – तिला जगुबाई देवी मानतात – तो खडक एका पवित्र बाईचे स्मारक. (पुष्प ३ – कथा ४५)

२) ओझरमधील एका बंगल्यात शेंदराने माखलेला दगड म्हणजेच ' मान-मोड्या बाबा ' हा देव – पूर्वी तो भूतस्वरूप होता – नंतर त्याला देवत्व प्रदान. (पुष्प ३ – कथा ३९)

३) पंचवीस ते तीस फूट खोल व बारा ते पंधरा फूट रुंद चरावरून उडी घेताना सरदार देसाई हा घोड्यासह गतप्राण – दोघांच्या हांची दोन झाडे – त्यांना गवळदेव व वांद्या हे नाव – जागृत देव मानतात – गावाचे रक्षणकर्ते मानतात. (पुष्प ३ – कथा ६६ )

### देवतांत नाते कल्पिणे

ठिकठिकाणी प्रचलित असलेल्या दंतकथांवरून असे दिसते की वेगवेगळ्या गावांतील देवतात नाते असते असे लोकमानसाने कल्पिले आहे.

१) गोंदवीर व बहिरीबुवा हे भाऊभाऊ. (पुष्प ३ – कथा ३)

२) जगुबाई व निमबाई या बहिणीबहिणी. (पुष्प ३ – कथा ४७)

३) भटाई ही धुळे जिल्ह्यांतील एका देवीची बहीण. (पुष्प ३ - कथा ७२)

### देवतांना एकमेकांच्या दर्शनाची ओढ

दंतकथांतून देवदेवतांचे केवळ नाते दर्शविलेले नसते तर वेळीप्रसंगी परस्प-रांना भेटण्याची त्यांची ओढही प्रकट केलेली असते.

१) बहिरीबुवाच्या उत्सवाच्या वेळी गोंदवीराला आमंत्रण द्यावे लागते.

२) हरिहरेश्वरचा काळभैरव यांचा महिमा प्रसिद्ध - त्याचे दर्शन घेण्यासाठी काशीचा काळभैरव निघाला – रात्रीतून परतायचा विचार – हरिहरेश्वराचा काळभैरव त्याच्या स्वागतासाठी उत्तराभिमुख घेऊन उभा राहिला – श्रीवर्धनपर्यंत पोचेतोपर्यंत व पहाट झाली – काशीचा काळभैरव तेथेच स्थिर व हरिहरेश्वरचा काळभैरव अजूनही उत्तराभिमुख उभा. (पुष्प ३ – कथा २८)

**एका ठिकाणचे नवस दुसऱ्या ठिकाणी फेडण्याची सोय**

निरनिराळ्या ठिकाणच्या देवदेवतांना नवस बोलावेत, ते कसे पूर्ण करावेत किंवा 'फेडावेत' यासंबंधीचा तपशील आणि मार्गदर्शन काही दंतकथांतून मिळते. नवस पूर्ण करण्यास सोपे जावे म्हणून काही योजना करून दंतकथांच्याद्वारे त्याला समर्थन प्राप्त करून दिले जाते. जसे –

१) काशीच्या काळभैरवाला केलेले नवस श्रीवर्धन येथे फेडले तरी चालतात.

२) जेजुरीच्या खंडोबाला केलेले नवस तिलोऱ्याच्या खंडोबाजवळ फेडले तरी चालतात.

**अलौकिकीकरण**

माहात्म्य निर्माण करण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी कधीकाळी घडलेल्या घटनेच्या अंशमात्र बीजाचा वृक्ष बनविण्याची किमया दंतकथांतून आढळते. काही प्रकाशित दंतकथांतील अशा स्वरूपाच्या तपशिलातून लौकिकाचे आलौकिकीकरण करणे, त्याभोवती गूढतेचे व अद्‌भुताचे वलय निर्माण करणे ही प्रवृत्ती विशेषत्वाने दिसून येतो. जसे —

१) महाड तालुक्यातील वाळणकोंडीच्या कुंडातील मासे देवाचे – आकार रेडयासारखा – कपाळाला शेंदूर फासलेला – त्यांच्यांकडे फार काळ पाहिल्यास शुद्ध जाते – एक मासा पूर्ण गावातील लोकांना आप्तेष्टासह भोजनास पुरला. (पुष्प ३ – कथा १)

२) चांभाराने एका रात्रीत बिन घडलेल्या दगडांचा पूल बांधला. (पुष्प ३ – कथा ११)

३) भृष्णेश्वर मंदिरात रोज रात्री १२ वाजता सभामंडपातील दोन बोटे रुंदीच्या चिऱ्यातून वाघ दर्शनास येतो. बाहेर चाहूल लागते, वास सुटतो, मंत्राप्रमाणे गुरगुरल्याचा आवाज येतो, वाघ परतल्यावर चिरा पूर्ववत् होतो. (पुष्प ३ – कथा ५८)

४) जिंतूरचे संताबुवा महाराज गादीखाली हात घालून अक्षय्य पैसे काढीत तेथे त्यांची गादी असून व किल्लेवजा बिनपायाची इमारत बांधलेली असून 'बिन-पायाची गादी' म्हणून प्रसिद्ध – रांगोळीच्या पिठाने संताबुवांनी लिंगाकृती काढली व त्यावर इमारत रचली. ती सात पिढ्या टिकून आहे. (मराठवाड्यातील लोककथा – कथा २४)

५) पाटोदे तालुक्यातील एका देवळाच्या बाहेर असलेली बारव खालून वर बांधलेली नसून वरून खाली तळाकडे बांधत नेलेली आहे. (पुष्प ३ – कथा ४१)

लोकप्रतिभाशक्ती व लोककल्पनाशक्ती दंतकथांना अद्‌भुताचा साज कसा चढविते याचे सम्यक् दर्शन वरील उदाहरणांवरून होण्यास मदत होते. या अद्‌भुतते-मुळे व अलौकिकीकरणामुळे या कथांची ऐतिहासिकता कमी होण्याचा संभव असला तरी दंतकथांना त्यामुळे निश्चितपणे आकर्षक, रोचक, रंजक स्वरूप प्राप्त होते.

**लोककल्पनाशक्तीतून काही समजुती, भ्रम निर्माण**

दंतकथांत दिसून येणारे लोककल्पनाशक्तीचे दर्शन या कथांत मधनमधून प्रकट होणाऱ्या काही समजुती किंवा भ्रम यांतूनही होते. पुढील उदाहरणांवरून हे स्पष्ट होईल.

१) बहिरीबुवाच्या उत्सवात गोंदवीराला आमंत्रण द्यावे लागते. उत्सवाच्या वेळी परडी घेऊन गोंदवीराला आमंत्रण देताच परडी जड वाटू लागते. गोंदवीर परडीत येऊन बसतो. ही सर्वांची समजूत. (पुष्प ३ – कथा ३)

२) कर्तव्यात कसूर होताच वडगावचा मारुती काळवंडतो. अशा वेळी देव कोपून रानात गेला असे समजतात. ब्राह्मणाकडून देवाचा ठिकाणा काढतात. वाजत-गाजत त्याला परत आणतात. त्यावेळी घोड्यास भरपूर घाम येतो.
(पुष्प ३ - कथा ३५)

३) पहलगावी डोंगरात दरड कोसळून लग्नाचे वऱ्हाड गडप – त्याजागी पहाडावर आकृती उमटल्याचा भास होतो. (पुष्प ३ – कथा ३२)

४) पिंपळवंडीच्या नदीचे तोंड थोडेसे पूर्वेकडे झुकलेले – त्याचे तोंड पूर्णपणे पूर्वेकडे झुकेल तेव्हा जगबुडी. (पुष्प ३ – कथा ४२)

५) वेरूळच्या वाटेवर चिंचा वेचताना गुप्त झालेली मुसलमान तरुणी हाक मारल्यास प्रतिसाद देते. (पुष्प ३ – कथा ५४)

अशा तऱ्हेच्या अनेक समजुती, भ्रम या दंतकथांतून प्रकट होतात. मराठी दंतकथा या प्रामुख्याने देवदेवता व सामान्य माणसे या पात्रांच्या वर्तुळातच फिरत असल्याने या कथांतून समाजाच्या धार्मिक, सामाजिक समजुती प्राचुर्याने आणि सहजपणे प्रकट होतात. त्यामुळे या प्रदेशातील एकूण वातावरणाची कल्पना येऊ शकते.

महाराष्ट्र राज्याचा विस्तार लक्षात घेतला तर अजून कितीतरी दंतकथा संकलित व्हावयास हव्या आहेत असे म्हणता येईल. जसजशी दंतकथांची संकलने प्रसिध्द होतील आणि दंतकथांची नोंद होईल. तसतशी त्यांची आणखी वैशिष्टये प्रकट होऊ शकतील. या कथांच्या क्षेत्रातही अभ्यासास खूप मोठा वाव आहे. ●

## प्रकरण ९ वे

# मराठीतील इतर लोककथाप्रकारांचे स्वरूप

मराठी व्रतकथा व कहाण्या आणि मराठी दंतकथा या प्रकारांचे स्वरूपाचा परामर्श गेल्या दोन प्रकरणांत घेतलेला आहे. आता या प्रकरणात मराठी लोक–कथांतील इतर प्रकारांचा – हास्यकथा, चातुर्यकथा, प्राणीकथा यांचा विचार करावयाचा आहे. प्रदेशविशिष्टतेच्या दृष्टीने हे प्रकार खास महत्त्वाचे नसले तरी त्यांतील एकूण वातावरण प्रादेशिक स्वरूपाचे असते व त्यांतूनही मधूनमधून प्रदेशविशिष्टता डोकावताना आढळते.

**मराठी हास्यकथा**

लोककथा या हेतुगर्भ असतात असे मानणारा अभ्यासकांचा एक गट आहे. लोककथाकथनाच्या मुळाशी अनेक हेतू असतात. लोकानुरंजन हा त्या हेतूंतील प्रमुख व महत्त्वाचा हेतू असला पाहिजे. कथाश्रवणातून श्रोत्यांना ज्ञान होवो न होवो, नीतिनियमांची शिकवण मिळो न मिळो, श्रोत्यांचे मनोरंजन हे व्हावयास हवेच. लोकानुरंजनाचा हा हेतू हास्यकथांतून पूर्णतः सफल होतो. हास्यकथा हा माणसाचा एक जन्मजात स्थायीभाव असल्यामुळे स्वभाविकच त्याला हास्यकथांची प्रबळ ओढ असते. हास्यविनोदाने दुसऱ्यांना रमविणारी माणसे सर्वांनाच प्रिय होतात. जीवनात पदोपदी कराव्या लागणाऱ्या संघर्षातून माणसाच्या मनावर पडणारा ताण कमी करून त्याला पुन्हा ताजेतवाने करण्याचे काम हास्यकथा करू शकतात आणि म्हणूनच हास्यकथा हा एक अत्यंत लोकप्रिय लोककथाप्रकार असून त्याचा प्रसारही फार झपाट्याने होतो.

मराठी लोककथांत हास्यकथांचे प्रमाण दंतकथांच्या खालोखाल असून कथाविशेषसूचीत अंतर्भुत असणाऱ्या सर्व उपप्रकारांचा त्यांत समावेश होतो असे दिसून येते. माणसाचे शारीरिक व्यंग, मानसिक व्यंग, विनोदी घटना, शाब्दिक विनोद, अश्लीलता अशा विनोदनिर्मितीच्या अनेक साधनांचा अवलंब, कमीअधिक

प्रमाणात का होईना, मराठी हास्यकथांतून केलेला आढळतो. समाजातील विविध जातीजमाती एकमेकांबद्दलची मते (बहुधा हेटाळणीची) विनोदाच्या माध्यमातून प्रकट करीत असतात. तथापि अशा कथा समाजदर्शनाच्या दृष्टीने अधिक महत्त्वाच्या असल्यामुळे येथे त्यांचा केवळ उल्लेख करून त्यांचा परामर्श समाज–दर्शनाच्या प्रकरणात घेणे अधिक उचित ठरेल.

### शारीरिक व्यंगाची एकमेव हास्यकथा

शारीरिक व्यंग हे माणसाचे केवळ दुर्दैव म्हणावे लागेल त्यामुळे शारीरिक व्यंगाना हास्यनिर्मितीसाठी उपयोग करणे काहीसे अयोग्य मानले जाते. तरीही बहिरेपणा, लंगडेपणा, कुरूपता, अंधत्व अशा शारीरिक व्यंगावरच्या हास्यकथा निर्माण होतात. मराठीत मात्र शारीरिक व्यंगावरची एकच कथा आढळली.

एका गृस्थाला तीन बोबड्या बायका. (त्याने तिन्हीही बोबड्या बायका पत्करल्या हाच मोठा विनोद म्हणावा लागेल) – पाहुण्याचे आगमन – तिघींना नवऱ्याची ताकीद, 'अजिबात न बोलता दारामागे लपून बसा' – पाहुण्यांना जेवणातील कढी फार आवडली व त्याने तसे बोलून दाखविले – नवऱ्याची सूचना विसरून तिघी कढी चांगली का झाली याची चर्चा करू लागल्या – संसारातील व्यंग पाहुण्यांना शेवटी कळलेच. (पुष्प १ – कथा २२)

### मानसिक व्यंगातून हास्यनिर्मिती

मानसिक व्यंगाकडे बोट दाखवून हास्यनिर्मिती करण्यात काही गैर मानण्याचे कारण नाही. शारीरिक व्यंगावर मात करण्यात माणूस परावलंबी असू शकेल, पण मानसिक व्यंग घालविणे हे निश्चितच त्याच्या इच्छाशक्तीवर अवलंबून असते. मानसिक व्यंगात मूर्खपणा, कपट, खादाडपणा, भांडखोरपणा, आळशीपणा अशा अनेक दुर्गुणांना हास्यविषय बनविणाऱ्या मराठी हास्यकथा आढळतात. त्यांत मूर्ख कथांचे प्राचुर्य असून मूर्खकथांतही मूर्ख जावई ही व्यक्तिरेखा प्रामुख्याने आढळते.

### सांकेतिक मूर्ख जावाई

'मूर्ख जावई' हा कथाविशेष जवळजवळ सर्व जगभराच्या लोककथांत आढळतो. 'मूर्ख जावई' हे पात्र लोककथांतील एक सांकेतिक पात्र बनलेले दिसून येते. इतकेच नव्हे तर त्याच्या मूर्खपणाचे व फजितीचे प्रकारही सांकेतिकच आहेत. जावयाच्या होणाऱ्या फजितीचे तीन विभाग पाडणे उचित ठरते. १) सासुरवाडीला जाताना रस्त्याने होणारी त्याची फजिती वा मारपीट. २) प्रत्यक्ष सासुरवाडीच्या

मुक्कामात होणारी त्याची फजिती ३) सासुरवाडीहून परत आल्यावर विसराळ-पणाने त्याला दिलेला दगा. मराठीतील मूर्ख जावयाच्या कथांत हे सर्व प्रकार आढळतात. पुढील उदाहरणे पहा-

१) सासुरवाडीला निघताना आईची सूचना 'लवून जा' (म्हणेज नम्र-पणाने वाग) रस्त्याने ज्वारीच्या भरलेल्या ताटांतून वाकून जाऊ लागला - शेत-कऱ्याला वाटले हा कणसे चोरतो - त्याने मारहाण केली व 'हुसूक हुसूक' म्हणत जाण्याची आज्ञा - त्यामुळे पारध्याच्या जाळ्यात हरणे येईनात - मारहाण व 'अशीच गुंतो' म्हणायची आज्ञा - नंतर चिखलात गाडी फसलेल्या गाडीवाल्याकडून मारहाण व 'असे कधी न होवो' असे म्हणण्याची आज्ञा - लग्नाच्या वऱ्हाडयांचा मार व 'असे नेहमी होवो' असे म्हणण्याची आज्ञा - प्रेत यात्रेतील लोकांकडून मारहाण - मार खात सासुरवाडीस पोचला. (अप्रसिद्ध कथा ६०)

२) या कथेतही उपरोक्त कथेसारखीच रस्त्याने फजिती - सासुरवाडीला काकवी चोरून खाताना मडके फुटून काकवीने अंग माखले - कापसात लोळल्याने कापूस अंगाला चिकटला - सासुरवाडीला धिरडे खूप आवडले - घरी परतल्यावर पदार्थाचे नांव आठवेना - त्या पदार्थासाठी बायकोला मारहाण - तिच्या सुजलेल्या पाठीवरून पदार्थाचे नांव आठवले. (मराठवाडयातील लोककथा - कथा ३)

३) सासुरवाडीला निघताना आईची सूचना, फार खाऊ नकोस. 'नको नको म्हणत जा.' सासुरवाडीला पोचल्यावर मेहुण्याने चिवडा दिला - नको नको म्हणाला - मेहुणा चहा आणायला घरात गेला - भूक तर लागलेली - चहा आणीपर्यन्त चिवडा खावा म्हणूण मोठा बकाणा भरला - मेहुणा चहा घेऊन येतो तो जावईबुवांचे गाल सुजलेले - काही बोलेनात - सर्वजण घाबरले - धाकटया मेहुण्याला शाळेत शिकवले होते, 'नाक दाबले की तोंड उघडते' - त्याने जावयाचे नाक दाबताच चिवडा सपकन बाहेर पडला - काकवी आवडत असून जेवताना खाल्ली नाही - रात्री चोरून खायचा प्रयत्न. (अप्रसिद्ध कथा)

**दोन वेगळया जावईकथा**

उपरोक्त सांकेतिक कथासूत्रांखेरीज वेगळा प्रकार दोन मराठी जावईकथांत दिसून येतो.

१) पित्याबरोबर मुलगा सासुरवाडीला - सासुरवाडीच्या लोकांना संस्कृत भाषेची फार आवड - संस्कृतात बोलणे आवडे - वडिलांची मुलाला ताकीद, अजिबात बोलायचे नाही' - जेवताना भात फार गरम - मुलगा पटकन वडिलांना

म्हणाला, 'बात्रं भातं उष्णम्।' वडिलांना तरी कुठे संस्कृत येत होते? ते मुलावर ओरडले, काटं पोटं गप्पम्'। (पुषप १ – कथा ३६).

२) शंभू निर्बुध्द – दिवाळीस सासुरवाडीचे आमंत्रण – तेथे कसे वागावे याची चिंता – गड्याचा सल्ला,' जातानाच वजनदारपणे जावे म्हणजे आपले वजन पडते (म्हणजे बालिशपणा करू नये, प्रौढासारखे वागावे) – घरातील मोठा पाटा घेऊन तो निघाला – वाटेत मुलांनी टिंगल केली – सासूबाईही चकित – 'पाटा का आणला? ही विचारणा – पत्नी प्रसंगावधानी, तिने सांगितले – 'आपल्याकडे मोठा पाटा नव्हता म्हणून आणला' – तो खरे सांगण्यासाठी तोंड उघडणार तोच तिची आज्ञा, 'आता जाईपर्यंत तोंड बंद' – आता तो खुणांनी बोलू लागला – यापुढे कथेला धिरड्याचा कथाभाग जोडलेला. (खानदेशी लोककथा – कथा ९).

जावयाची ही अशी मूर्ख, निर्बुध्द भूमिका रंगविण्याचा अन्वय येथील समाजात प्रचलित असणाऱ्या बालविवाहाच्या प्रथेशी लावता येणे शक्य आहे. या प्रथेचे उच्चाटन अजूनही पूर्णतया झालेले नाही. विशेषत: खेडेगावांतून ही प्रथा अजूनही दिसून येते. वागण्याचा पोच अजून आलेला नाही. अशा किशोरवयात सासुरवाडीला निघालेला मुलगा गोंधळून जाणे, घाबरून जाणे अस्वाभाविक वाटत नाही. त्यामुळेच त्याला दिलेल्या सूचना तो सारासार विचार न करता शब्दश: पाळतो आणि त्याचे हे आज्ञापालनच त्याच्या अंगलट येते.

**इतर मूर्खकथा**

मूर्खपणाचा दुर्गुण लोककथांत जावयाला जास्त चिटकवितात हे खरे पण मूर्खपणाचे प्रकार इतर माणसेही करतात. जसे

१) दोन शूर माणसे व दोन मूर्ख माणसे – शूरांच्या शौर्याची परीक्षा घ्यावयाची ठरली – 'एका मैलावरील आंब्याच्या झाडाला शिऊन यायचे' – तलवारी घेऊन शूर माणसे निघाली – दोघे मूर्ख त्यांच्याआधी पायवाटेने झाडाजवळ पोचली व दोघांनी स्वत:ला उलटे टांगून घेतले – त्यांना मारल्याशिवाय झाडाला शिवणे अशक्य – दोघांची कत्तल. (अप्रसिद्ध कथा)

२) राजदरबारी दोन मूर्खांची नोकरी – गाईसाठी आणलेला भारा राजाच्या आईच्या डोक्यात टाकला कारण ती चिडून म्हणाली होती 'टाक माझ्या बोडख्यात' – आई मृत – तिला राजाज्ञेने पुरण्यास नेले – वाटेत दुसरी म्हातारी दिसली – त्यांना वाटले मेलेली म्हातारीच जिवंत झाली – तिलाही मारून पुरले – कडब्याची गाडी आणण्यास राजाची आज्ञा – तेल नसल्याने गाडीचा आवाज – याची कल्पना गाडीला थंडी वाजते म्हणून गाडी पेटवून दिली. (अप्रसिद्ध कथा)

## अन्य मानसिक व्यंगांतून हास्यनिर्मिती

### खादाडपणा

१) शेतकऱ्याची सून राधा – शेतावर कामाला जाताना चुलीत कणकेचा गोळा भाजायला ठेवून जायची - तासाभराने सासऱ्याला विचारायची,

कीर कोकिळा, दीर भुकेला
बाळ अरपला, लोळा करपला
मामूजी, मी जाऊ का हो घराला ?

सासऱ्याला व नवऱ्याला संशय - तिच्यावर पाळत ठेवून तिची चोरी पकडली. (वैजयंती – कथा ११)

२) एक बाई एकटीच चांगलेचुंगले खावयाची – नवऱ्याने मागितलेच तर 'रात्री भूत भेटण्याची' भीती घालायची – त्यातूनही त्याने तो पदार्थ खाल्लाच तर खरोखरीच रात्री भुताचे सोंग घेऊन त्याला घाबरून सोडायची – नवऱ्याला बिंग कळलेच – एकदा त्याने तिचे सोंग उघडकीस आणून तिला बदडून काढले. (राजविलासी केवडा – कथा १०)

### आळशीपणा

अबदुल रहिमान हा गावातील एकमेव पिंजारी – फार आळशी – पोटापुरते कसेबसे काम करी – एकदा कापसाच्या खूप गाड्या दृष्टीस पडल्या – एका शेतकऱ्याला विचारले 'एवढा कापूस कोण पिंजणार ?' – त्याच्या आळशीपणाची सर्वांनाच चीड – शेतकरी चेष्टेने म्हणाला, 'तुलाच पिंजावा लागेल' – अबदुल भीतीने मूर्च्छित – 'मुझे अितनी कपास पिंजनी पडेगी ?' हेच सारखे बडबडत होता – एकाने सांगितले, 'अबदुल, सब कपास जल गयी' – त्याच्या मनावरचे दडपण दूर – शुद्धीवर येऊन हसू लागला. (खानदेशी लोककथा – कथा ३)

### हट्टीपणा

पाच भाकरी न मोडता दोघात सारख्या कशा वाटणार ? पतिपत्नीत त्यासाठी वाद – प्रत्येकाला मोठा वाटा हवा – दोघे गुपचुप बिछान्यावर जाऊन झोपले – जो आधी बोलेल त्याने लहान वाटा घ्यायचा असे ठरले – उपाशीपोटी गप्प पडून राहिले - शेजाऱ्यांना सामसुमीमुळे संशय – दार फोडले – लोकांची समजूत, दोघेही मेले' – तिरडीवर बांधायची तयारी – तरी मौन सुटेना – स्मशानाच्या वाटेला लागल्यावर मात्र घाबरगुंडी – एकमेकांना म्हणू लागले, 'मी दोन खाईन, तू तीन खा' चार खांदेकरी व एक आग्या (अग्नि धरणारा) यांना वाटले

दोघांची भुते झाली व आपल्या पाचजणांच्या वाटणीबद्दल भांडतात – तिरडी टाकून पळाले – भांडण अनिर्णितच. (खानदेशी लोककथा – कथा ८)

**विघ्नसंतोषीपणा**

वडगावच्या रामराव पाटलांना ऊठसूट बारीकसारीक घटनेचाही पंचनामा करावयाची फार हौस – त्यामुळे गावास फार उपद्रव – मरताना मुलाजवळ इच्छा प्रकट, 'गावकऱ्यांना फार त्रास दिला – प्रायश्चित्त म्हणून प्रेत तिरडीवर पालथे ठेवा व पाठीवर दगड ठेवा' – इच्छा पूर्ण केली – मामलेदार अंत्यदर्शनाला आले तर हा विचित्र प्रकार - पंचनाम्याची मागणी केली – लोकांचे ऐकून न घेता चौकशीचा आदेश – जित्याची खोड मेल्यावरही गेली नाही – मरणानंतरही पाटलांनी गावकऱ्यांना कोर्टकचेरी दाखविली. (खानदेशी लोककथा – कथा १२), (पुष्प ३ – कथा ९७)

**प्रसंगनिष्ठ विनोद**

विनोदाचे प्रसंगनिष्ठ व शब्दनिष्ठ असे दोन प्रकार मानले जातात. प्रसंगनिष्ठ विनोद हास्यकारक घटनांतून सहजपणे निर्माण होतो.

१) म्हाताऱ्याच्या पत्नीला चोरून खाण्याची सवय – म्हाताऱ्याने लपून बसून तिची लबाडी जाणली – अंतर्ज्ञानी असण्याचा बहाणा करून लबाडी तिच्या पदरात घातली – नवऱ्याच्या भविष्यज्ञानाबद्दल बायकोची खात्री – त्याच्या भविष्यकथनाचा तिने बोभाटा केला – राजाची अंगठी हरवली – राजदरबारात बोलावले – मनातून घाबरला – पत्नीला शिव्या देतच दरबारात गेला – भविष्यकथनास अनुकूल वेळेची गरज असे सांगून वेळ थोडी पुढे ढकलली – त्याचा आविर्भाव पाहून चोराने स्वतःच त्याच्याजवळ येऊन चोरीची कबुली दिली – चोरीचा तपास लागला – भविष्यकथनाबद्दल बक्षीस. (पुष्प ४ – कथा १)

२) जावयाला सासुरवाडीहून खूप आमंत्रणे – शेवटी निर्वाणीचा निरोप, 'स्वतः आल्याशिवाय मुलीला पाठविणार नाही' – आपण स्वतः गेलो तर मोठा भाऊ नाराज होईल म्हणून भावाला निरोप सांगितला – मोठा भाऊ त्याच्या सासुरवाडीस गेला – सासूबाईंनी दोघांनाही नीट पाहिलेले नव्हते – त्यांना वाटले जावईबापूच आले – स्वागताची उत्तम तयारी – शेवायाच्या खिरीसाठी आधण ठेवण्याची सुनांना आज्ञा – दाराआडून सासूबाईचा प्रश्न, 'इतक्या निरोपानंतर येणे केले?' भावाने उत्तर दिले, 'मला एकच निरोप मिळाला' – सासूबाईंना कळाले हे जावयाचे भाऊ – सुनांना फर्मान, 'आधण उतरवा, पिठलं भाकरी करा'

भावाने हे सर्व ऐकलेले – तो त्वरित परत निघाला – लोक चकित – कोणी विचारले तर भाऊ म्हणे, 'आम्ही आव्रणउतरे जावई – खरा जावई पाठवतो' – सासूबाईची चांगलीच फजिती. (खानदेशी लोककथा – कथा १ )

३) सोम्या व गोम्या खूप श्रीमंत पण पक्के दारुडे – व्यसनापायी कंगाल – दारूचाच धंदा करावयाचे ठरविले – बायकांजवळचे पैसे घेताना शपथ, 'आम्ही रोज एकच बाटली पिऊ व तीही रोख पैसे देऊन' – बैलगाडीतून दारूचे पिंप आणले – बाजार करून एक रुपया शिल्लक – वाटेने गोम्याला राहवेना - जवळचा रुपया सोम्याला देऊन एक बाटली घेऊन धंद्याची भवानी केली – थोड्या वेळाने सोम्याने एक रुपया गोम्याला देऊन बाटलीभर दारू घेऊन पिऊन टाकली – रस्ताभर हाच क्रम – पिंप रिकामे – बायकांना जोरात ठणकावले, 'आम्ही मुळीच शपथ मोडली नाही – एकाच वेळी एकच बाटली व तीही रोख पैसे देऊन घेतली' उरलेला रुपया त्यांच्यापुढे फेकला. (खानदेशी लोककथा – कथा ५)

४) दीपा व लाला दोघे भाऊ – त्यांचे वडील अप्पा यांना लाकडी तुळयावर चढविण्यास मदत हवी होती – नुसते बोलावून कोणी येईना – दोन्ही मुलांना कडाक्याचे भांडण करण्याचे सोंग करावयास सांगितले – दोघे हमरीतुमरीवर येऊन भांडू लागले – गर्दी जमली – अप्पा गप्प उभे – भांडण खूप वाढले – खूण करताच भांडण एकदम बंद – भांडणाच्या नाटकाचे कारण कथन व मदतीची विनंती – काम फत्ते. (खानदेशी लोककथा – कथा १५)

**शब्दनिष्ठ विनोद**

शब्दांच्या करामतीतून निर्माण होणारा शब्दनिष्ठ विनोद काहीसा कनिष्ठ दर्जाचा मानला जातो. अशा विनोदाची थोडीच उदाहरणे मराठी हास्यकथांत आढळतात. त्यांच्या तुलनेत प्रसंगनिष्ठ विनोदांची उदाहरणे अधिक आहेत.

१) एक मुलगा आईवडिलांचा फार लाडका – आईवडिलांना उलटसुलट हाका मारी – वडिलांचे मित्र घरी आले – त्यांनी विचारले, 'बाबा काय करतात?' मुलाचे उत्तर, 'बाबा स्वयंपाक करीत आहेत' – 'मग आई काय करते?' 'आई हजामत करते आहे.' (पुष्प १ – कथा २३)

२) या उदाहरणातील विनोद शब्दनिष्ठ असला तरी त्याला बुद्धिचातुर्याची जोड मिळालेली आहे. त्यामुळे विनोदाची पातळी एकदम उंचावते.

शंकर व शेवंता पतिपत्नी – शंकरला घरी यायला उशीर – शेवंता नाराज – त्यात शंकर म्हणाला, 'ती नाही म्हणून मला जेवणच नको' – 'ती' कोण हे

शेवंताला कळेना – आणखी नाराज – तशात दोघांचा वाद, 'पुरुष चतुर की स्त्री चतुर' - स्त्रियांचे चातुर्य शंकरला अमान्य – थोड्या वेळाने शेवंता सारखे म्हणू लागली 'तो नाही म्हणून मला झोप येत नाही' – शंकरचा प्रश्न, 'तो' कोण ? – ती म्हणाली 'ती कोण ते सांगा' शंकरची 'ती' म्हणजे भूक व शेवंताचा 'तो' म्हणजे वारा – दोघांचा समेट - स्त्रियांचे चातुर्य शकरने मान्य केले. (खानदेशी लोककथा – कथा १३)

### अश्लील कथा

मराठी लोककथांत एकूणच अश्लीलतेचे प्रमाण अगदीच थोडे आढळते. हास्यनिर्मितीसाठी देखील अश्लीलतेचा उपयोग अपवादानेच केलेला आढळतो. सद्‌भिरुचीची कास क्वचितच सोडलेली दिसते. चुटके मात्र याला अपवाद आहेत.

१) पाटलाची सून वास्तविक बदफैली होती पण तिची 'पतिव्रता' म्हणून प्रसिध्दी – घरच्या गड्याशी अनैतिक संबंध – एकदा देवीच्या देवळात दोघांचे कुकर्म – देवीने चकित होऊन तोंडात बोट घातले – गावकरी व्यथित – अनेक उपाय पण बोट तसेच – पाटलाची सुन वहाणा ओटीत लपवून देवळात गेली व देवीला चपलेच्या माराची भीती घातली – देवीने तोंडातले बोट काढले – महापतिव्रता म्हणून सुनेची कीर्ती वाढली. (पुष्प १ – कथा २१)

२) कुंभाराची मडकी अजिबात विकली जाईनात – म्हसोबाला नवस, मडकी खपली तर विवस्त्र होऊन तुझ्यापुढे नाचू' बाजारात सगळी मडकी विकली गेली – नवस फेडण्यासाठी देवळात जाऊन विवस्त्र नाचण्यास सुरुवात – हा प्रकार एका गवळ्याच्या नजरेस पडला – तोही तसाच नाचू लागला – जवळ्यास पाहताच कुंभारणी ओरडू लागल्या तेव्हा तो गवळी पळून गेला. (पुष्प १ – कथा २४)

मराठी हास्यकथांचे स्वरूप हे अशा तऱ्हेचे आहे. त्यांतील काही पात्रांचे स्वरूप (विशेषत: जावईकथा) काहीसे सांकेतिक असले तरी इतर पात्रांतून मानवी स्वभावाच्या वेगवेगळ्या विशेषांचे ( विशेषत: त्याच्या दुर्गुणांचे ) दर्शन होते. दुर्गुणांचा धनी बनविण्यात स्त्रियांना प्राधान्य दिले जात असले तरी काही कथांत पुरूषांनाही विनोदविषय बनविले गेलेले आहे. मनोरंजनाचा हेतू या सर्वच कथांद्वारे उत्तम तऱ्हेने साध्य होतो.

### मराठी चातुर्यकथा

चातुर्यकथा हा वास्तविक हास्यकथांचाच एक प्रकार आहे. परंतु त्यांचे प्राचुर्य आणि लोकप्रियता यांमुळे त्यांचा वेगळा वर्ग करणे अप्रस्तुत होणार नाही..

माणसांत दिसून येणाऱ्या शारीरिक वा मानसिक व्यंगांनाच विनोदविषय बनविण्याचा प्रकार हास्यकथांत अधिक आढळतो. तथापि चातुर्यासारखा दुर्मिळ गुणही हास्यनिर्मितीचा उत्तम विषय बनू शकतो, हे अनेक देशात व प्रांतांत रूढ असणाऱ्या चातुर्यकथांवरून दिसून येते. इसाप, बिरबल तेनालीराम, नाना फडणवीस या चतुर माणसांच्या कथा अजूनही खूप लोकप्रिय आहेत.

मराठी हास्यकथांत चातुर्यकथांचा वाटा मोठा आहे. आपल्या अंगच्या चतुराईने इतरांवर मात करणारी अनेक पात्रे – स्त्री आणि पुरुष दोन्ही – त्या कथांतून दिसतात.

**चतुर स्त्रिया**

१) एका बाईचा पती सालस व प्रेमळ परंतु अत्यंत हिशोबी होता – बायकोला पै पैशाचा हिशोब विचारून भंडावून सोडी – एकदा तिला सतरा रुपये देऊन नवरा गावाला गेला – आल्यावर हिशेब विचारला – तिने एक एक रुपया कसा खर्च केला हे सांगण्यासाठी एक रुपयासाठी एक अशी काव्याची कडवी रचली व त्याला काव्यातून हिशोब दिला – तिचे लांबलचक काव्य त्याला ऐकावे लागले. (पुष्प १ – कथा ११)

२) एका पाटीलबुवांना पत्नीची किंमत कळत नव्हती – तिला तो तुच्छ लेखी – पत्नी म्हणे, 'अस्तुरीच्या बळाने पुरुषाला महिमा येतो' – त्याला हे अमान्य – एकदा तो त्याच्या मामलेदाराबरोबर चावडीत बसला असता तिने मुलाबरोबर निरोप पाठविला, 'घाटा (शिरु) थोडा आहे, वाटे पाडायला या' – मामलेदाराचा समज पाटील उगाचच बाता मारतो, पण घरात दारिद्र्यच दिसते. पाटील घरी येऊन बायकोला खूप रागावला – तिने त्याची समजूत घालून त्याला पुन्हा परत चावडीवर पाठविले – मुलांना हातात शिऱ्याचे गोळे देऊन पुन्हा पाठविले व निरोप दिला, 'घाटा चांगला शिजला. जेवायला या' – मामलेदारासह घरी – मामलेदाराचा गैरसमज दूर – पाटलाची बायकोजवळ कबुली, 'ज्याची चांगली अस्तुरी, तीच सगळे निस्तरी. ज्याची अस्तुरी धडी, त्याची नीट पगडी'. (पुष्प २ – कथा ८)

**चतुर पुरुष**

१) भावजयीने माहेरी भावाला भेटायला आलेल्या नणंदेला 'जागा वली' म्हणून बसावयासही जागा दिली नाही आणि 'तवा वाळूनं खाल्ला' असा बहाणा करून जेवावयासही घातले नाही. हे कळल्यावर भाऊ रागावला. त्याने बायकोला

खोटेच सांगितले, तुझ्या माहेरचे घर जळाले, तो सामान गाडीत भरू लागला – आपल्या माहेरसाठी द्यायचे म्हणून तिनेही बरेच सामान देऊ केले. भावाने गाडीसह सर्व सामान बहिणीकडे नेऊन दिले. घरी आल्यावर बायकोला सांगितले, 'बैल वाऱ्याने उडाले, गाडी पावसाने वाहून गेली' – पत्नीचा खोटेपणा तिच्या पदरात बांधला. (सुंबरान मांडीलं – कथा १७)

२) बिसमिल्ला खाटीक – शेती करायची इच्छा पण कष्ट कोणी करावे ? तसेच शेतीच्या धंद्याला बुद्धीची, ज्ञानाची जरूरी नाही असे त्याचे मत – शेजारी शिवराम बाबाजी यांना ते अमान्य – बिसमिल्लाने शेतीची सर्व अवजारे घेतली, धडधाकट गडी कामास लावले – गडी धडधाकट पण सांगकामे – पहिल्या दिवशी काय काम सांगावे हे कळेना म्हणून सुट्टी – दुसऱ्या दिवसापासून बाबाजी जे काम त्यांच्या नोकरांना सांगत ते चोरून ऐकून बिसमिल्लाने आपल्या गड्यांना सांगावे – कापूस तयार - बिसमिल्लाचे कपट बाबाजींना कळले – त्यांनी नोकरांना सांगितले, मी उद्या काम सांगताना काय वाटेल ते सांगीन पण तुम्ही कापूस वेचायचा' – बाबाजींची दुसऱ्या दिवशी आज्ञा, 'काटयांच्या पसाटया कपाशीच्या शेतावर फिरवा' – बिसमिल्लाची तीच आज्ञा – त्याच्या कपाशीचा सत्यानाश – बाबाजींच्या चतुराईने 'शेतीलाही बुद्धी हवी' हे त्याला पटले. (खानदेशी लोककथा – कथा ११)

### दुर्गुणाची भलावण

लोककथांत सर्वसामान्यपणे सद्गुणांची भलावण आणि दुर्गुणांची निंदा वा फजिती असाच प्रकार आढळतो. परंतु एखाद्या दुर्गुणाला चातुर्याची जोड मिळाली तर त्या निंदनीय दुर्गुणापेक्षा चातुर्याच्या प्रभावाचे पारडे अधिक जड होते आणि दुर्गुणाची दखल घेण्यापेक्षा चातुर्याचे कौतुक अधिक वाटू लागते आणि जणू दुर्गुणाची भलावणच केली जाते. दुसऱ्याला फसविणे, चोरी करणे, दुसऱ्याचे नुकसान करणे आदि प्रकार निंद्यच होत. परंतु त्याचा अवलंब करीत असताना त्यातून माणसाचे चातुर्य प्रकर्षाने प्रकट होत असले तर तेच प्रकार क्षम्य मानले जातात. या दोन परस्परविरुद्ध गुणांच्या मीलनातून प्रचुर हास्यनिर्मिती होते. मराठी चातुर्यकथांतही अशा प्रकारच्या कथा आहेत.

१) भिक्षुक ब्राह्मण नशीब काढायला घराबाहेर – गवळ्याची भेट – गवळ्याने विचारले, 'कुठून आलात' ? – 'आलो लंकेहून' – गवळ्याने तिथली हालहवाल विचारली – ब्राह्मणाने लंकादहनासारख्या दोनचार झोपड्या पेटवून दिल्या व पळून गेला – गवळणीची भेट – तिने सांगितले," चालायचे कष्ट होणार

नाहीत, भूक लागणार नाही व वाट लवकर संपेल असे काहीतरी सांगा '– ब्राह्मणाने तिच्या डोक्यावरचे मडके काठीने फोडले व पळून गेला – दही अंगावर सांडल्याने तिला गारवा वाटून कष्ट कमी – दही वाया जाऊ नये म्हणून तिने ते खाऊन टाकले म्हणजे तिची भूक भागली – त्याचा पाठलाग करण्यामुळे रस्ता लवकर संपला – असेच एका तेलिणीचे नुकसान – राजधानीत राजाराणीची सोंगटयाचा आवाज चिडाचिड व दोत्रे तलवार उपसून उभे – कोणी मेले तरी वाईट – म्हणून ब्राह्मणाने नगारा वाजवण्यास सुरुवात केली व नंतर पळून गेला – गवळी गवळण तेलीण यांच्या साह्याने त्याला कैद – ब्राह्मणाने सांगितले, ' माझा काही दोष नाही, मी त्यांच्याच सांगण्यावरून ते सर्व केले. आणि तुमच्या दोघांचे लक्ष संतापावरून दुसरीकडे वेधण्याकरिता नगारा वाजविला ' – त्याच्या चातुर्यावर खूष होऊन राजाकडून त्याला मोठे बक्षीस. (वैजयंती – कथा १८)

२) आठ पैशात बायको मिळवून आणायची प्रतिज्ञा आईजवळ करून ठकसेन निघाला – वाटेत एक पैशाचे मडके व एका पैशाचे तांदूळ घेतले – एका म्हातारीकडे मुक्काम – तिला मडक्यात भात शिजवावयास सांगून नदीवर आंघोळीस गेला – म्हातारीने चार नातवांच्या हट्टाखातर त्यांना भाताचा एकेक घास दिला – जेवताना ठकसेनाने सांगितले, 'माझ्या मडक्याला चोरी खपत नाही तुम्ही नातवांना भात दिला हे खरे ना ?'– म्हातारीची कबुली – सुनांचे चोरटेपण उघडकीस आणण्याच्या हेतूने त्याचे मडके शंभर रुपयास विकत घेतले – जाता जाता त्यात मापटेभर तांदूळ शिजविण्याचा सल्ला – एक घोडा खरेदी करून एका सावकाराकडे मुक्काम – घोडयाला हरबरे खायला घातले – सकाळी जवळचे रुपये घोडयाच्या विष्ठेत मिसळून ठेवून सावकाराला सांगितले, ' माझा घोडा विष्ठेतून रुपये देतो – एक मापटे हरबऱ्याला १०० रुपये देतो – सावकाराने ३००० रुपये देऊन घोडा खरेदी केला – जाता जाता सल्ला, तुम्ही पायलीभर हरबरे घोडयाला खायला घाला ' – पुढे वाटेने एका म्हातारीची नातसून पळवून नेली व आईला सांगितले, ' तुला सून आणली ' – तिकडे म्हातारीचे गाडगे मापटेभर तांदूळ शिजविल्याने फुटले आणि सावकाराचा घोडा हरबऱ्यांनी पोट फुगून मेला. (वैजयंती – कथा १९)

चातुर्याने अवगुण कसे झाकले जातात हे वरील दोन कथांतून स्पष्ट होते. लहान मुलांच्या खोडयांकडे जसे कौतुकाने पाहिले जाते तसाच हा प्रकार मानावा लागेल.

**मराठी प्राणिकथा**

प्राणिकथा हा लोककथांचा प्रकार फार प्राचीन काळापासून चालत आलेला असून एक अत्यंत लोकप्रिय लोककथाप्रकार म्हणून त्याचे स्थान अद्यापही अबाधित

आहे. चालू काळात माणसांचा रोजचा संबध फक्त पाळीव प्राण्यांशीच येत असला तरी प्राचीन काळी त्याला वन्य प्राण्यांशीही सतत सामना करावा लागे. प्राण्यांच्या पक्ष्यांच्या निरीक्षणातून त्यांची शारीरिक, मानसिक वैशिष्टचे आता ज्ञात झालेली आहेत. हे ज्ञान आणि माणसांची कल्पनाशक्ती यांच्या संयोगातून प्राणिकथांची जडणघडण झालेली दिसते.

मराठी लोककथांत प्राणिकथांचे प्रमाण बरेच कमी असून वर्ण्यविषयांतही विविधता आढळत नाही. कोल्ह्याचे चातुर्य आणि वाघाची फजिती हे दोनच प्रमुख वर्ण्यविषय दिसून येतात. नीतितत्त्वप्रतिपादन करणाऱ्या प्राणिकथेला बोधकथा म्हणतात. परंतु अशा तऱ्हेची बोधकथाही मराठी प्राणिकथांत आढळत नाही. नीतीचे प्रत्यक्ष प्रतिपादन तर नाहीच; परंतु ओढून ताणून काढू म्हटले तरी गंभीर असे फारसे कुठलेच नीतितत्व त्यांतून निष्पन्न होईल असे वाटत नाही. मराठी प्राणिकथा या केवळ प्राणिकथाच आहेत असे म्हणणे गैर होणार नाही.

**फारच थोडचा वन्यप्राण्यांचे प्रतिनिधित्व**

जंगलात अनेक वन्य प्राणी राहतात. परंतु त्यांतील फारच थोडचा प्राण्यांना मराठी प्राणिकथांत प्रतिनिधित्व मिळालेले दिसते. वर उल्लेख केल्याप्रमाणे कोल्ह्याचे चातुर्य आणि वाघाची फजिती हेच दोन प्रमुख वर्ण्यविषय त्यांत आढळतात. वनराज समजला जाणारा सिंह किंवा बलशाली हत्ती, दुष्ट लांडगा यांचा कोठे निर्देश सुद्धा केलेला नाही.

**लबाड कोल्ह्याचे चातुर्य**

कोल्ह्याची लबाडी व चातुर्य हा सर्व जगभर आढळून येणारा कथाविशेष आहे. जर्मन विद्वान ग्रिम यांनी संकलित केलेल्या रेनार्ड नावाच्या कोल्ह्याच्या कथांना फार मोठी लोकप्रियता लाभली. कोल्ह्याच्या चातुर्याचे पोवाडे अनेक देशांच्या लोककथांनी गायिलेले आहेत. मराठी प्राणिकथाही त्याला अपवाद नाही. जसे–

१) घोडेवाल्याचा तेल्याकडे मुक्काम – रात्री घाण्याजवळ बांधलेली घोडी तेथेच व्याली – तेल्याच्या मनात पाप – तो म्हणू लागला, ‘ माझा घाणा व्याला शिंगरू माझे. – ’ दोघांचा तंटा – कोल्ह्याला न्यायासाठी पाचारण – कोल्हा डुलक्या घेऊ लागला – सर्वांनी कारण विचारले, – कोल्हा म्हणाला, रात्री समुद्राला लागलेली आग विझवावयास गेलो होतो म्हणून जागरण झाले – सर्वांचा अविश्वास – कोल्हा म्हणाला, ‘ मग लाकडाचा घाणा कधी वितो का ?– तेल्याने मुकाटचाने माघार घेतली. (दाते २ – कथा १२)

२) भुकेल्या कोल्ह्याने मृत उंट ढुंगणापासून खावयास सुरुवात केली – पोटापर्यंत जाताच ढुंगण वाळून मिटले – कोल्ह्याचा श्वास कोंडला – माणसाला विनंती, ' मुक्त केल्यास लाख रुपयाची गोष्ट सांगेन ' – गोष्टीच्या आशेने माणसाने त्याची सुटका केली – एक फालतू गोष्ट सांगून कोल्हा पळून गेला. (पुष्प १ – कथा २८) कोल्ह्याचा धूर्तपणा आणि लबाडी दर्शविणाऱ्या अनेक कथा आढळतात.

**कोल्ह्यांच्या फजितीची एकमेव कथा**

म्हातारीला माहेरी जाताना कोल्ह्यांनी अडविले – तिचे वचन, – ' माहेरी जाऊन लठ्ठ होऊन येते, मग तुम्ही मला खा ' – परतताना भोपळा कोरून त्यात बसून म्हातारी निघाली – पण कोल्ह्यांनी तिला अडवलेच – तिने कोल्ह्यांना राखेचा ढीग करावयास सांगितला – खाताना रक्त सांडेल ते वाया जायला नको – म्हातारी राखेत बसली – कोल्हे भोवताली उभे – म्हातारीच्या जोरात पादण्यामुळे राख उधळली – कोल्ह्यांच्या डोळ्यात गेली – ते डोळे चोळीत असता म्हातारी भोपळ्यात बसून घरी पळून गेली. (दाते २ – कथा ५)

**वाघाची सदैव फजिती**

मराठी प्राणिकथांतील वाघाचे पात्र सदैव फजीत पावणारे आहे. त्याला फजीत करण्यात लबाड कोल्ह्याचा वाटा मोठा आहे. माणसानेही वाघावर मात केलेली आढळते. माणसाला बुद्धीची देणगी असल्याने त्याच्या चातुर्याने वाघावर मात करणे एक वेळ शक्य मानता येईल, पण वाघाच्या मानाने अगदी दुर्बळ अशा पाळीव प्राण्याकडूनही त्याची फजिती होते. पुढील लोककथा पहा-

१) वाघ शिकारीसाठी गेल्यावर कोल्ह्याने वाघाची गुहा बळकावली. वाघ गुहेशी येताच कोल्हीने मोठ्याने बोलून आपल्या मुलांना आश्वासन दिले, ' थांबा आता तुम्हाला वाघाचे मांस मिळेल ' – वाघ घाबरून पळाला – दिवेलावी मावशीला सर्व कथन – तिचा अविश्वास - दोघे शेपट्यांनी एकमेकास बांधून घेऊन पुन्हा गुहेजवळ – आता कोल्हीने, जोराने बोलून दिवेलावी मावशीची, वाघाची शिकार आणल्याबद्दल स्तुती केली – वाघ पुन्हा घाबरून पुन्हा पळू लागला – शेपट्या बांधल्याने दिवेलावी मावची मरण पावली. (पुष्प ४ – कथा ३)

२) कोल्हा व वाघ मित्र – दोघे मिळून शिकार करीत – एकदा शिकारीचे वाटे घातले – लांब लांब बसून खावयाचे ठरले – एकमेकाकडे बघावयाचेही नाही – वाघाचे खाणे लवकर संपले – कोल्ह्याचे सावकाश चालू – लांबून वाघाने विचारले, कोल्हेभाऊ, तू आता काय खातोस ? – कोल्हा म्हणाला ' हातपाय

खातोय' – वागाने स्वतःचेच हातपाय खाऊन टाकले – आता त्याला हालताच येईना – कोल्ह्याने त्यालाही खाऊन टाकले – आणि वर बतावणी केली, 'मीच केलो बुद्धीन् भोलो, वाघोमामाचो केलो गोळो'. (दाते २ – कथा ११)

३) माळकरी बनून यात्रेला निघालेल्या वाघाबरोबर कोल्हा, ससा, कासव, मुंगुस निघाले – रात्री गुहेत मुक्काम – कोल्हयाने डाव ओळखला – तमाशाचा फड उभारला – नाचता नाचता ससा वाघाच्या पायांतून पळला – कोल्हा ओरडला, 'वाघोबा तुमचा बापूस पळालो' – वाघ सशाच्या मागे पळताच सर्व पळाले – फक्त कासव हाती लागले – त्याची विनवणी, 'माझी पाठ कठीण – पाण्यात भिजत ठेवतो, संध्याकाळी मऊ होईल तेव्हा परत येतो. मग मला खा'. वाघाने कासवाला नदीत सोडले – संध्याकाळी ते कुठले परत येणार? (दाते २ – कथा ८).

४) एका कुळवाडयाने एक नाही, दोन नाही तर बारा वाघांना दावणीला बांधून त्यांची फटफजिती केली.

शेतकरी शेताच्या राखणीसाठी माळयावर – वाघ खायला आला – वाघाच्या तोंडावर डाग दिले – दुसऱ्या वाघाच्या पार्श्वभागावर डागले – त्यांची फजिती पाहूण आणखी दहा वाघ जमा – त्यांना तो म्हणाला, 'मी दहाजणांना कसा पुरणार? माझी नाचणी पिकली आहे. ती वेचा, मळणी करा. मी भाकरी खाऊन लठ्ठ होतो. मग मला खा' – दहा वाघांना मळणीच्या दावणीत एकमेकांशी बांधून अडकविले – दोन वाघ कणसे सारू लागले – कुळवाडयाने आरडाओरडा करून लोक जमवले – दहा वाघ मारून टाकले – दोन मोकळे वाघ पळून गेले – त्यांनी मेलेल्या वाघांच्या उतरक्रियेसाठी वानर भटजी आणला पण तोही डाव कुळवाडयाने उधळून लावला – वाघ घाबरून पळाले. (दाते २ कथा – ९)

५) गाढव व वाघ यांच्यांत एकमेकांना आठ पंजे मारण्याची शर्यत – गाढवाने चिखलात लोळून अंगावर पुटे चढविली – गाढवाला वाघाचे पंजे लागलेच नाहीत – गाढवाच्या लाथांनी वाघाला मात्र पळ काढावा लागला. (अप्रकाशित कथा)

६) मांजरीने बाहेर जाताना पिलांना सांगितले, 'वाघमामा लबाड आहे, त्याला दार उघडू नका' – वाघाने हे ऐकले – मांजरीसारखा आवाज काढून पिलांना फसवले – दार उघडताच पिले गिळली – एक लंगडे पिलू चुलीत बसलेले – त्यामुळे सुरक्षित – आईला सर्व कथन – मांजरीने वाघाला श्राद्धासाठी आमंत्रण दिले – वाघाच्या तोंडात गरम वडे टाकले – त्याला पिले ओकायला लावूण मगच त्याचे तोंड सोडले – पिले मिळताच त्याच्या तोंडात विस्तव टाकून मारून टाकले (दाते – २ कथा ८) महाराष्ट्रातील सर्व विभागात वाघासंबंधीच्या अशा स्वरूपाच्या कथा आढळतात.

प्राणिकथांतील वाघाच्या या मूर्ख आणि काहीशा भोळया स्वरूपाकडे पाहिले की लोककथांतील राजाच्या व्यक्तिरेखेचे स्मरण झाल्याशिवाय राहत नाही. लोककथेतील राजाचे व्यक्तिमत्व जसे सांकेतिक आणि बरेचसे प्रतिकूल स्वरूपाचे आहे तसेच वाघाबाबतही म्हणता येईल. सत्ताधीश आणि ऐश्वर्यशाली माणसाच्या जीवनाबद्दलची असूया सर्वसामान्य माणसाच्या मनात कुठेतरी सुप्त रीतीने दडलेली असली पाहिजे आणि हीच असूया त्या व्यक्तीला अतिसामान्य बनविण्यातून व्यक्त होत असावी. अन्यथा एवढा शक्तिशाली वाघ, सामान्य मांजरीकडून कसा पराभूत होईल ?

**अन्य प्राण्यांच्या कथा**

मराठी लोककथांत पाळीव प्राण्यांच्या कथा, पक्ष्यांच्या कथा अत्यल्प आहेत. ज्या काही आहेत त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

१) रामरावाच्या घरी चोरी – चोरांनी माल आडात टाकला – रामरावाच्या कुत्र्याने सर्व पाहिले – दुसऱ्या दिवशी त्याने मालकाला तेथपर्यंत ओढत नेले व भुंकू लागला – चोरीचा माल परत मिळाला. (अप्रकाशित कथा)

२) वाघ व टिटवी शेजारी – टिटवीला हिंसक शेजाऱ्याची सदैव शंका – एकदा ती चाऱ्यासाठी गेली असता तिचे कुटुंब कडा पडून गाडले गेले – टिटवीला वाघाची शंका – तेव्हापासून वाघ शिकारीला निघाला की टिटवी साद घालून सर्वांना वर्दी देते. (पुष्प १ – कथा १३)

**प्राण्यांचे मानुषीकरण**

वरील सर्व उदाहरणांवरून प्राण्यांचे मानुषीकरण करण्याची प्रवृत्ती प्राणिकथांत कशी दिसून येते याची उत्तम प्रचीती येते. प्राणिकथांतील आपले स्वभावविशेष प्रकट करीत असतानाही प्राणी माणसासारखे वागतात, माणसांच्या क्रियांचे तंतोतंत अनुकरण करतात. त्यांच्या या मानुषीकरणाचे पुढीलप्रमाणे स्वरूप मराठी प्राणिकथांत आढळते.

१) प्राणी मनुष्यवाणीने बोलतात. ( अनेक कथांत त्यांचा व माणसांचा संवाद वर्णन केलेला आहे.)

२) प्राणी घर बांधतात, भाड्याने देतात. (सांगीवांगी – कथा १)

३) प्राणी खीर शिजवितात. (दाते २ – कथा ३)

४) प्राणी पोहे कांडतात, पाखडतात. (पुष्प १ – कथा १५)

५) प्राणी नवस करतात, नवस फेडतात. (पुष्प १ – कथा ३०)

६) प्राणी यात्रेला जातात, यात्रेकरूंचे सोंग घेतात, अंगाला राख फासतात, खांद्यावर पताका घेतात, गळ्यात लिंग बांधतात. (पुष्प ४ – कथा ३), (दाते २ – कथा ८)

७) प्राणी मृतांची उत्तरक्रिया करतात – उत्तरक्रियेसाठी भटजी आणतात – पितरांना स्वर्गातून बोलावण्यासाठी भटजी मंत्र म्हणतो. (दाते २ – कथा ९)

८) प्राणी श्राद्ध करतात. त्यासाठी इतरांना जेवायला बोलावतात, फार काय श्राद्धाचे वडे देखील तळतात. (दाते २ – कथा ११)

९) प्राणी तमाशाचा फड उभा करतात. त्यासाठी एकजण दिवटी धरतो, एकजण ढोल वाजवितो, एकजण नाच करतो. (दाते २ – कथा ८)

१०) प्राणी न्याय देतात. (दाते २ – कथा १२)

या उदाहरणांवरून प्राण्यांच्या मानुषीकरणात लोकमानस किती बारीकसारीक बाबींचाही अंतर्भाव करते हे स्पष्ट दिसून येते. अशा तऱ्हेने प्राणिकथांतील हे प्राणी एकीकडे प्राणिस्वरूप असतात व त्याबरोबरच ते मानवसदृशही असतात. मराठी प्राणिकथांची सृष्टी मर्यादित स्वरूपाची असली तरी प्राणिकथांचे हे मानुषीकरणाचे वैशिष्टय त्यात निश्चितपणे दिसते. विस्तृत महाराष्ट्रभर ठिकठिकाणी विखुरलेल्या आदिवासी लोकांच्या समाजात प्रचलित असणाऱ्या लोककथांचे संकलन अद्याप फारसे झालेले नाही. त्यांच्या रोजच्या जीवनात प्राण्यांचा संबंध येतो. त्यांच्या कथा संकलित झाल्यास आणखी प्राणिकथा उपलब्ध होणे शक्य आहे.

### भटक्या जातीजमातींच्या कथा

महाराष्ट्रात अनेक भटक्या जाती गांवोगाव हिंडून आपले जीवन जगत असतात. मांगगारूडी, गोपाळ, डक्कलवार, रायरंद अशी त्यांची अनेक जातिनामे असून प्रत्येकाचे व्यवसायही ठराविक असतात, या जातीजमातीत रूढ असणाऱ्या लोककथांचा वर्ग वेगळा करावा लागेल.

### जातिपुराणकथा

अनेक जाती आपल्या जातीच्या उत्पत्तीविषयीच्या कथा परंपरेने सांगत असतात. ती जात कशी उत्पन्न झाली, त्यांचा मूळ पुरूष कोण होता, त्यांचा व्यवसाय कसा ठरला, ' त्यांच्या जातीतील रूढी कशा निर्माण झाल्या याबद्दलच्या या कथा त्या त्या समाजात परंपरेने प्रचलित राहतात. मांग लोक दरिद्री का ? डक्कलवारांचे डक्कल हे नाव कसे पडले, वडार लोक दगड फोडण्याचा व्यवसाय का करतात किंवा वडार स्त्रिया चोळीबांगडी का घालीत नाहीत यांचे स्पष्टीकरण करणाऱ्या अनेक कथा रूढ आहेत.

## जातिपंचायतीतील कथा

जातिपंचायत हे भटक्या जातींचे फार मोठे वैशिष्टच आहे. या पंचायती त्या त्या जातीत न्यायदानाचे काम करतात. त्या त्या समाजाचे अलिखित कायदे असतात. या जातिपंचायतींचे वर्चस्व कुणालाही झुगारून देता येत नाही कोणाविरूद्ध तक्रार झाली की पंचायत भरते – आरोपप्रत्यारोप होतात. दोन्ही बाजूकडील काही लोक कथांच्या माध्यमातून आपले म्हणणे सांगतात. न्यायदान जास्तीत जास्त निस्पृह व्हावे म्हणून या कथा सांगितल्या जातात. त्यांनांच जातिपंचायतीच्या कथा म्हणतात. सर्व उत्तरे, प्रतिउत्तरे कथांतून दिली जातात. यांतील काही कथा परीकथांच्या स्वरूपाच्या असतात. काही प्राणिकथांच्या स्वरूपाच्या असतात तर कधी विनोदी चुटकेही असतात. या कथा बऱ्याचशा अश्लीलतेकडे, ग्राम्यतेकडे झुकतात.

या जातिपुराणकथा आणि जातिपंचायतींच्या कथा यांचे संकलन व अभ्यास व्हावयास हवा. त्यातून त्या त्या समाजाची जडणघडण समजून घेता येणे शक्य आहे. श्री. कचरू ओंकारराव गिरे यांनी आपल्या एम्. फिल् च्या प्रबंधिकेत गोपाळ या भटक्या जातीच्या जातिपंचायतीतील मौखिक कथांच्या स्वरूपवैशिष्टचांच्या अभ्यास केलेला आहे. त्यात त्यांनी त्या कथांतून घडणारे स्त्रीदर्शन, कथांच्या रचनेची वैशिष्टचे, दोन कथांतून होणारे सांकेतिक संवाद अशा अनेक बाबींचा परिचय करवून दिलेला आहे. अशा तऱ्हेचा अभ्यास अन्य जमातींच्या संदर्भातही व्हावयास हवा. मराठी लोककथांचा एक प्रकार म्हणून येथे त्यांचा केवळ निर्देश केलेला आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

## प्रकरण १० वे

# मराठी लोककथांतून घडणारे समाजदर्शन

लोकवाङ्मयाच्या निर्मितीमागे लोकमानसाची प्रेरणा असते याचा उल्लेख यापूर्वी केलेला आहेच. लोकमानसाला स्वतंत्र अस्तित्व नसून ते प्रत्येक व्यक्तीच्या मनात घटकरूपाने असते आणि हे लोकमानस त्याला परंपरेने प्राप्त झालेले असते. समूहमनाशी एकरूप असलेल्या अवस्थेतील व्यक्तीची निर्मिती ही या परंपराप्राप्त, एकूण व्यक्तिमनात घटकरूपाने वास्तव्य करणाऱ्या लोकमानसाचीच असते. त्यामुळे या निर्मितीतून, म्हणजेच लोकवाङ्मयातून त्या त्या लोकसमूहाची वैशिष्टये, भावभावना, श्रद्धा, समजुती, रूढी यांचे प्रकटीकरण अपरिहार्यपणे होते. निर्मात्याच्या आत्माविष्काराशी लोकवाङ्मयाचे नाते नसते. ‘समाजमनाशी एकरूप अवस्थेत त्याच्या व्यक्तिमनाचा आविष्कार न होता समाजाच्या भावभावनांचा सुखदुःखांचा, आशाआकांक्षांचा त्यातून आविष्कार होतो.’ त्यामुळे लोकवाङ्मयाचा एक खंड असणाऱ्या लोककथांच्या अंतरंगांतून प्रकट होणाऱ्या लोकमानसाची दखल घेणे आवश्यक ठरते. लोकांना प्रतीत होणारी, प्रत्यक्ष अनुभवाला येणारी, त्यांच्या कल्पनाशक्तीतून निर्माण होणारी आणि परंपरेने रूढ होणारी धर्मविषयक सामाजिक वैशिष्टये, समजुती, रूढी, सण, व्रतवैकल्ये, कुटुंबव्यवस्था, कौटुंबिक व्यक्तींचे परस्परसंबंध, समाजातील विविध जातीजमातीचे परस्परसंबंध व एकमेकांबद्दलची मतमतांतरे यांची माहिती लोककथांतून सहजपणे उपलब्ध होते. ललित वाङ्मय हे कलावंताच्या वैयक्तिक आत्माविष्काराची परिणती असली तरीसुद्धा कलावंत एक समाजघटक म्हणून समाजात वावरत असल्याने, त्याच्या कलाकृतीतही असे सामाजिक, सांस्कृतिक दर्शन घडतेच. मग लोकमानसनिर्मित लोककथांत हे दर्शन घडणे अगदी स्वाभाविक आणि अपरिहार्य आहे. त्यात समाजाच्या प्राचीन जीवनाचे अवशेष सापडतील. लोकमानसांतील कल्पित आणि अद्‌भुत सृष्टीचे दर्शन घडेल, तसेच वर्तमानकालीन जीवनाचा धागाही मधुनमधून गुंफलेला आढळेल.

कोणत्याही प्रदेशाच्या लोककथांतील प्रदेशविशिष्टतेच्या दृष्टीने त्या कथांतून घडणारे हे समाजदर्शन अत्यंत महत्वाचे ठरणे स्वाभाविक आहे. कारण त्यामुळे त्या त्या प्रदेशातील धार्मिक, सामाजिक किंवा एकूणच सांस्कृतिक वातावरणाची यथायोग्य कल्पना येऊ शकते. महाराष्ट्रातील सांस्कृतिक, धार्मिक पैलूंचे दर्शन मराठी लोककथांतूनही कसे घडते याचा विचार या प्रकरणात करावयाचा आहे.

**हिंदुधर्मीय कथा**

मराठी लोककथांची ठळक वैशिष्ट्ये नमूद करताना या कथा महाराष्ट्रातील हिंदुधर्मीय समाजात प्रचलित असणाऱ्या कथा आहेत. याचा उल्लेख पूर्वी केलेला आहेच. महाराष्ट्रातील गेली अनेक शतके बौद्ध, इस्लाम, ख्रिस्ती, पार्शी असे अनेक धर्म प्रचलित आहेत; तथापि इस्लाम धर्माचे काही उल्लेख, आणि बौद्ध धर्माचे पुसटते उल्लेख सोडले तर इतर कुठल्याही धर्माचा उल्लेख या कथांत आढळत नाही. त्यामुळे या मराठी लोककथांतून फक्त हिंदुधर्मीय समाजाचेच लोकमानस व्यक्त होते. महाराष्ट्रातील अन्यधर्मीय समाजात प्रचलित असणाऱ्या लोककथा आणि त्यांच्यांतील व मराठी लोककथांतील साम्यभेद हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकेल.

**मराठी लोककथांतील धार्मिक समजुती**

या प्रचंड विश्वाच्या नियंत्रणाबद्दल माणसाला वाटणारे कुतुहल अजूनही संपलेले नाही. या विश्वनिर्मात्या व विश्वनियंत्रक शक्तीबद्दल मानवाला किंचितसे भयही वाटते व बराचसा आदर आणि श्रध्दाही वाटते. या श्रध्देतूनच अतिमानवी शक्ती युक्त अशी देवदेवतासृष्टी निर्माण झाली असावी. मर्त्य विश्वखंडाचा संबंध या देवदेवतांशी धर्मरूपाने जोडला जाऊन धर्माचरणाच्या साहृयाने देवदेवतांची कृपादृष्टी प्राप्त करून घेऊन जीवनाचे सार्थक करण्याचा प्रयत्न वर्षानुवर्षे होत असताना दिसून येतो. त्यामुळे धार्मिक समजुतीमध्ये देवदेवतांचे स्वरूप, विविध उपसनापध्दती, व्रतवैकल्ये, रूढी यांचा परिचय घडून येतो. परंपरेने हिंदुधर्माची जी काही वैशिष्टये व समजुती रूढ झालेल्या आहेत त्यांचे दर्शन मराठी लोककथांतून ठिकठिकाणी घडून येते.

**काही उदाहरणे**

१) **ईश्वर सर्वव्यापी** – जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी ईश्वर भरलेला आहे ही रूढ समजूत मराठी लोककथेत आढळते.

दोन शिष्य – गुरूने त्यांना 'कोणी पहात नाही' अशा ठिकाणी जाऊन पक्षी मारून आणण्यास सांगितले – एकाने अरण्यात जाऊन पक्षी मारून आणला – दुसऱ्याने तसाच परत आणला कारण 'सर्व ठिकाणी परमेश्वर पहाणारच –' (पुष्प १ – कथा ३८)

२) **ब्रह्मदेवाने जग निर्माण केले** असा उल्लेख आढळतो. (पुष्प २ – कथा १०)

३) **ललाटरेखा** – नूतन बालकाच्या कपाळावर ललाटरेखा लिहिली जाते. ही रूढ समजून काही मराठी लोककथांत प्रकट झालेली आहे.

अ) ब्रह्मदेव, सटवाई पतिपत्नी – ब्रह्मदेव भविष्य सांगतो, सटवाई लिहिते अशी समजूत आढळते. (पुष्प ३ – कथा ७९)

ब) ब्रह्मदेव, सटवाई पतिपत्नी – सटवाई भविष्य सांगते, ब्रह्मदेव लिहितात असाही उल्लेख आढळतो. (मराठवाड्यातील लोककथा – कथा १)

क) सटवाई ललाटरेखा लिहिते (ब्रह्मदेव, सटवाई पतिपत्नी नात्याचा उल्लेख नाही.) (मराठवाड्यातील लोककथा – कथा ६) (पुष्प ३ – कथा ८०)

ड) **भविष्य अज्ञात** – सटवाई ब्रह्मदेव अदृश्य रूपाने येऊन बालकाचे भविष्य लिहितात. त्यामुळे कोणालाच ते दिसत नाहीत व त्यामुळे कुणालाच आपले भविष्यही कळत नाही. फक्त पुण्यवान माणसाला ते दिसतात. (मराठवाड्यातील लोककथा – कथा १) एका कथेतील वेसकर पुण्यवान असल्यामुळे त्याला त्याच्या मुलाचे भविष्य लिहून जाणारे ब्रह्मदेव सटवाई दिसले – त्याला आपला मुलगा व पाटीलकन्या भावी पतिपत्नी हे भविष्य कळले – सटवाईच्या मुलीने स्वतःचे भविष्य जाणून घेण्याचा हट्ट धरल्याने तिच्या आईने तिला भविष्य सांगितले, 'राणी होशील पण मुलाशीच विवाह होईल.(पुष्प २ – कथा १०) या कथेचे चार पर्याय आहेत. असे काही अपवाद सोडले तर स्वतःचे भविष्य माणसाला नेहमीच अज्ञात असते.

४) **ब्रह्मदेव विवाहगाठी मारतो** – माणसाचे भविष्य ठरविण्यात जसा ब्रह्मदेवाचा सहभाग आहे तसाच तो विवाह जुळविण्यातही आहे – स्वयंपाकी भटजीच्या सोबतीने राजकन्या वरसंशोधनासाठी देशांतरास – भटजी पाण्यासाठी झऱ्यावर गेला – एक म्हातारा दर्भाच्या गाठी मारीत होता – उत्सुकतेने चौकशी – 'मी ब्रह्मदेव, पतिपत्नीच्या गाठी मारतो आहे' असे उत्तर. (पुष्प २ – कथा ११)

सटवाईसंबंधी लोकमानसात अनेक प्रकारच्या समजुती रूढ आहेत. या सर्व समाजात प्रचलित असलेल्या समजुती मराठी लोककथांतूनही दिसून येतात. दैव पूर्वकर्मानुसार जन्मल्याबरोबर निश्चित होते आणि त्यानुसारच व्यक्तीचा पुढील जीवनक्रम चालतो अशी श्रद्धा समाजात रूढ असल्याचे दिसते.

५) **भवितव्य अटळ** – भवितव्य कधीही खोटे ठरत नाही. ते चुकून ज्ञात झाले. मनपसंत नसले आणि म्हणून ते टाळण्याचा कितीही निकराने प्रयत्न केला तरीही ते खोटे कदापि ठरणार नाही असे दर्शविणाऱ्या काही कथा वाढळतात जसे–

अ) सटवीकन्येचे भविष्य, 'राणी होणार पण मुलाशीच विवाह होईल' – तिचा निर्धार, 'मी अविवाहितच राहीन म्हणजे भविष्य खोटे ठरेल' – अरण्यात वास्तव्य – साधूचा आश्रय – साधूची लंगोटी धुताना गाठ सुटेना – दाताने सोडवली – त्यावरील वीर्य पोटात गेले – गर्भवती – साधूने हाकलून दिले – देवळात प्रसूत – पदराच्या तुकड्यात मुलाला ठेऊन निघून गेली – मुलगा राजपुत्र म्हणून वाढला – ती माळ्यावरी आश्रित – ती चिरतरुण – राजपुत्राशी विवाह – महालात पदराची चिंधी दिसली – भविष्य खरे म्हणून मुलीची आत्महत्या. (पुष्प २ – कथा १०)

ब) वेसकरपुत्र व पाटीलकन्या भावी पतिपत्नी हे भवितव्य – वेसकराने पाटलाला सांगितले - पाटील फार नाराज – वेसकरपुत्राचा काटा काढण्याच्या इराद्याने मुलगा मोठा झाल्यावर त्याला आज्ञा, – 'सटवीचा हारतुरा आण' – मुलाचे वाटेत खूप हाल – सटवीने दयाळूपणाने आपला हारतुरा दिला – वाटेने येताना मुलाला खूप धनप्राप्ती – परत येऊन पाटीलकन्येला मागणी – वैभवामुळे पाटलाने त्याला ओळखलेच नव्हते – खुषीने मुलगी दिली – विवाहानंतर सटवीचा हारतुरा दाखविला. (मराठवाड्यातील लोककथा – कथा १)

क) एका बाईने साधूला पोटभर जेवण दिले. त्याने तृप्त होऊन आशीर्वाद दिला. बाई निपुत्रिक होती. तिने आपले हे शल्य प्रकट केले. साधूने तिला सांगितले, 'मूल होणे दैवाधीन आहे' नशिबात नसेल तर कसे होणार? त्याने तिला आंब्याच्या झाडाला पुत्रवत् मोठे करण्यास सांगितले. (पुष्प २ – कथा ६)

विधिलिखित अटळ असते ही रूढ असलेली लोकश्रद्धा या सर्व लोककथांच्या मुळाशी आहे असे दिसते. लोकजीवनात रूढ असलेल्या समजुती, विश्वास, श्रद्धा या लोककथांतून प्रतिबिंबित होतात हेच या उदाहरणावरून स्पष्ट होते.

६) **जगत्कल्याणकारी देवता** – मृत्युलोक हा देवनिर्मित असल्यामुळे देवांना त्याबद्दल फार प्रेम वाटते. जगत्कल्याणासाठी सर्व देवदेवता झटत असतात. देवदेवतांच्या या स्वभाववैशिष्ट्याची ओळख त्यांच्या 'भूमिकापात्र' स्वरूपाचे विश्लेशण करताना तत्संबंधित प्रकारात सोदाहरण करून दिलेली आहेच. जगात कल्याणकारी व मंगल वातावरण भरून रहावे यासाठी त्यांची पराकाष्ठा चालू असते. त्यासाठी ते दु:खितांना मदत करून त्यांच्यावरील संकटे दूर करतात वा त्यांच्या आयुष्यांतील उणीव दूर करतात. दुष्टांचे निर्दालन करतात.

७) **भक्तप्रिय परमेश्वर** – 'मला भक्त फार प्रिय असतात' हे श्रीकृष्णाने गीतेमध्ये वारंवार काढलेले उद्गार मराठी लोककथांतही सार्थ झालेले आढळतात.

भक्ताला साह्य करणे, संकटातून त्याची सुटका करणे, भक्ताचे सत्त्व राखणे, भक्ताघरी वस्तीस जाणे अशा तऱ्हेची अनेक उदाहरणे यापूर्वीच्या प्रकरणांतून उद्धृत केलेली आहेत. अशा या दयाघन देवदेवतांची भक्ती माणसाने अवश्य केली पाहिजे अशी प्रबल प्रेरणा सर्वांच्या मनांत निर्माण व्हावी अशा तऱ्हेचेच अनेक भक्तांचे चित्रण या मराठी लोककथांतून आढळते.

### ८) सगुण व निर्गुण भक्ती

परंपरेने ईश्वरभक्तीचे दोन प्रमुख प्रकार मानले जातात. (अ) निर्गुणोपासना, (ब) सगुणोपासना. या सर्व प्रचंड विश्वाचा मूलाधार निर्गुण, निराकार असे परब्रह्म किंवा परमात्मा असून ही व्यक्त होणारी सृष्टी त्याने मायेने निर्माण केली आहे हे तत्त्ववचन हिंदू धर्माचे प्रमुख सार आहे. या तत्त्वाच्या आधारेच निर्गुण निराकार ब्रम्हाची उपासना व त्याच्याशी एकरूपता हे साधकाचे अंतिम साध्य मानले जाते. त्यालाच निर्गुणोपासना म्हणतात. तथापि ही निर्गुणोपासना अत्यंत अवघड आणि सर्वसामान्य माणसाच्या आवाक्याबाहेर असते. या निर्गुण परब्रह्माला विविध देवदेवतांचे स्वरूप देऊन, त्याला सगुण बनवून, त्यांच्या उपासनेद्वारे अप्रत्यक्षरीत्या परब्रह्माचीच उपासना करण्याचा मार्ग हा अधिक सोपा व सामान्य माणसांना जवळचा वाटणारा आहे. संसारत्याग न करता किंवा रानावनात न जाता आपली नित्यनैमित्तक कर्मे करता करता या मार्गाने भक्तजनांना ईश्वरप्राप्ती होऊ शकते. महाराष्ट्रात प्रभावी असलेल्या विठ्ठलभक्तिसंप्रदायाचा समाजावर झालेला परिणाम यावरून दिसून येतो.

मराठी लोककथांत ईश्वराच्या निर्गुण भक्तीचा उल्लेख अपवादानेच आढळतो फक्त विष्णूची कहाणी या व्रतकथेतील ब्राह्मणाने असा प्रयत्न केलेला दिसतो. सगुण भक्तीचे दर्शन मात्र प्रचुरतेने घडते. शंकर पार्वती, देवी, विष्णू, गणपती, विठ्ठल, लक्ष्मी, नारायण, राणूबाई अशा अनेक देवदेवतांची भक्ती केल्याचे उल्लेख बऱ्याच मराठी लोककथांत दिसून येतात. देवदेवता स्वर्गात वास करीत असल्या तरी त्या जवळजवळ प्रत्येक गावी आढळणाऱ्या देवळातील मूर्तींत अंशरूपाने वास करतात आणि वेळप्रसंगी आपले स्वत्व प्रकट करतात अशी सर्वांची श्रद्धा असते. गावोगावची देवळे ही या श्रद्धेची प्रतीके आहेत. महाराष्ट्रातील अशा बऱ्याच श्रद्धास्थानांबद्दलच्या अनेक दंतकथा प्रचलित आहेत. स्थानिक दंतकथांतून व्रतकथांतून व इतरही लोककथांतून अशा सगुण देवदेवतांची स्वरूपवैशिष्टये, स्वभाववैशिष्टये, उपासनावैशिष्टये प्रकट होताना दिसतात.

**शंकराची वैशिष्टये**

**भक्तशीलता :-** कधी स्वयंस्फूर्तीने; तर कधीकधी पार्वतीच्या इच्छेला विरोध

करीत का होईना, गरजवंताला शंकरांनी मदत केल्याची अनेक उदाहरणे त्यांचे भूमिकास्वरूप विशद करताना दिलेली आहेत.

**भोळेपणा** :– शंकराचे पारंपरिक ' भोळा शंभू हे रूप काही कथांत दिसून येते. पात्रापात्रतेचा सारासारविचार न करता ते कृपादान देऊन टाकतात असा त्यांचा लौकिक आहे. शंकराची भक्ती केली एवढेच नव्हे तर त्यास एखादी फुटकी कवडी दिली तरी तो प्रसन्न होतो. जसे–

सुदामदेव ब्राह्मण व त्याचा मित्र डुब्याराम वाणी अत्यंत कंजूष – दोघांनी शंकरांना फुटकी कवडी दान दिली – शंकर खूष – परतताना यमदूतांची गाठ – सुदामदेव व डुब्यारामाचे आयुष्य संपले म्हणून त्यांचा प्राण नेण्यासाठी यमदूत चाललेले - शंकरांनी दोघांचे आयुष्य सात महिने वाढवून यमदूतांना परत पाठवून दिले. ( पुष्प – ३ कथा ९६ ). अशा स्वरूपाच्या कितीतरी लोककथा महाराष्ट्रात रूढ आहेत ज्यांतून शंकराच्या भोळेपणाचे दर्शन घडते.

**शिवपिंडीत पुढचा जन्म दिसणे** – वेरूळमधील जगप्रसिध्द कैलास लेण्याच्या भव्य शिवपिंडीत पुढचा जन्म दिसतो अशी समजूत रूढ. ( पुष्प ३ – कथा ५५ )

**शिवपिंडीतून रक्तस्राव** – शंकराची मूर्ती म्हणजे मस्तकावर गंगा धारण करणारा अंगावर सर्प बाळगणारा, भाली चंद्र असलेला, नीळकंठ असे चित्र डोळ्यासमोर उभे राहते. तथापि आपल्याला देवालयांतून त्याचे दर्शन घडते ते दगडी शिवलिंगाच्या स्वरूपात. शिवलिंग जरी पाषाणाचे असले तरी त्यांतील शिवशक्ती तशीच जिवंत असते आणि वेळप्रसंगी तिचे दर्शन सर्वांना ती घडवते. शिवाच्या पिंडीतून रक्तस्राव होणे ही घटना त्यांच्यातील या शिवशक्तीचा प्रत्यय आणून देणारी आहे व काही मराठी लोककथांतून असा कथाभाग आढळतो.

१) गोरेगावच्या शेतकऱ्याचा नांगर अडला – रक्ताने माखला – आणखी खणले– शिवलिंग सापडले – फाळ लागल्यामूळे लिंगातून रक्तस्राव – लिंग पुन्हा पुन्हा धुतले तरी रक्तस्राव थांबेना – नारळ देऊन प्रार्थनापूर्वक शिवलिंगाची क्षमा मागितली – रक्तस्राव बंद – खडबडीत लिंगावर फाळाची अजूनही खूण. (पुष्प ३ – कथा ३)

२) नवशी गावचे कोकणे खोत – त्यांच्या गाईची कास रोज संध्याकाळी रिकामी – गाय शिवपिंडीवर दुधाचा अभिषेक करी लिंग खणून त्यांची स्थापना दुसरीकडे देऊळ बांधून करावी अशी इच्छा - लिंग खूप खुणूनही हलेना - लिंगातून रक्तधारा बाहेर–तेथेच देऊळ बांधले – कुदळीच्या घावाची लिंगावर अजूनही खूण. ( पुष्प ३ – कथा २९)

**शंकराची पूजा**

शंकराच्या पूजेसाठी आवश्यक असणाऱ्या विल्वपत्राचा उल्लेख शिवामुठीची कहाणी आणि पाच देवांचीं कहाणी या व्रतकथांत आहे. तसेच शंकराला प्रिय

असणाऱ्या दहीभाताच्या नैवेदाचा उल्लेखही त्या कहाणीत आहे. (कहानी भाग १) शिवभक्त गाई आपल्या दुधाचा अभिषेक शिवपिंडीवर करतात असा उल्लेख काही लोककथात आढळतो. (पुष्प ३ – कथा ५८), (कहाणी भाग २ – कथा ८) (पुष्प ३ – कथा २९)

**शंकराला रूद्रावर्तन प्रिय**

शंकराला रूद्रावर्तन प्रिय असते, त्यामुळे रुद्रावर्तन पूर्वक शिवपूजा केली जाते.

गोरेगाव येथील जनन्नाथपंत उपाध्ये यांचा नेम डोंगरमाथ्यावरील शंकराच्या प्राचीन स्वयंभू मंदिरात रोज जाऊन रूद्रावर्तनपूर्वक पूजा करावयाची – अशी पूजा झाल्याशिवाय ते अन्नग्रहण करीत नसत. (पुष्प ३ – कथा २)

शंकराला रुद्रस्तोत्रपठण अतिशय प्रिय असते हे खरे, तथापि रुद्रमंत्राचा उच्चार स्पष्ट, शुद्ध व यथायोग्यच व्हावयास हवा. शंकर ही देवता जितकी भोळी आहे तितक्याच कडक प्रवृत्तीचीही असते.

गोरेगावच्या विठ्ठलमंदिरात बाणरूपाने असणारा शिव रुद्रमंत्राच्या उच्चारणाबाबत फार कडक समजला जातो. एखाद्या ब्राह्मणाने रुद्रमंत्रांचा स्पष्ट व शुद्ध उच्चार न करता अभिषेक केला तर तो बाण स्वप्नात जाऊन त्याला ताकीद देतो. त्यामुळे जिव्हादोष असलेले ब्राह्मण मंत्र म्हणण्यास तेथे धजावत नाहीत. (पुष्प ३ – कथा २०) याच कथेत या बाणाच्या कडक सोवळ्या ओवळ्याचा व त्याला बाधा आल्यामुळे त्याने भिसे कुटुंबातील देव्हाऱ्यातून गोरेगावच्या विठ्ठलमंदिरात स्वतःचे स्थानांतर करवून घेतल्याचा कथाभागही आलेला आहे. वेदमंत्रांचा उच्चार शुद्ध व अविकृत करण्यात यावा यासंबंधी कटाक्ष पाळण्यात येतो. येथे हीच प्रवृत्ती कथारूपाने व्यक्त होते.

**शंकराचे वाहन नंदी**

नंदी हे शंकराचे वाहन असल्यामुळे शिवमंदिरात नेहमी नंदी हा असतोच आणि त्याचीही पूजा करण्याचा व दर्शन घेण्याचा भाविकांचा प्रयत्न असतो. कहाणी भाग १ मधील 'पाच देवतांच्या कहाणीमध्ये, पूजनीय पाच देवतांत नंदीचाही समावेश असून त्याला आघाडा वाहून, खिचडी तुपाचा नैवद दाखवावयाची सूचना पार्वतीने एका गरीब बाईला केली आहे. शंकराचे हे नंदीप्रेम लक्षात घेऊन काही गावांत एखादा विशिष्ट बैल महादेवाचा नंदी म्हणून सोडला जातो. तो गावातून स्वैर भटकत असतो. त्याला कोणीही हाकलायचे किंवा मारावयाचे नसते. (पुष्प ३ – कथा ३६) या कथेत एका उंच कड्यावर शेती करणाऱ्या माळ्याने आपल्या शेतात घुसलेल्या बैलास, तो देवाचा नंदी आहे हे न ओळखता

मारून हाकलले. नंदीने घाबरून उंच कड्यावरून उडी घेतल्याने तो मरण पावला. खाली खडकावर नंदीची पाऊले उमटलेली दिसतात.

### शंकरदर्शनाचे महत्वाचे दिवस

श्रावणी सोमवार, महाशिवरात्री हे दिवस शिवपूजन व शिवदर्शनाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असतात. व्रतकथांत श्रावणी सोमवारी करावयाची अनेक व्रते (शिवामूठ, फसकीची कहाणी) सांगितलेली आहेत. महाराष्ट्रात ठिकठिकाणी असणाऱ्या शंकराच्या देवलयात महाशिवरात्रीला मोठा उत्सव व जत्रा भरते असे उल्लेख स्थानिक दंतकथांत आढळतात. (पुष्प ३ – कथा ४२, ५२, ५८) (पुष्प ३ – ४२). या आणि अशा दंतकथांतून एकूण समाजात शंकरभक्तीचा प्रभाव कसा आहे हे दिसून येते.

### प्राण्यांची शिवभक्ती

शिवभक्तीचा महिमा केवळ माणसेच जाणतात असे नाही तर प्राणी देखील शिवभक्ती करतात. शिवभक्त गाई आपल्या दुधाचा अभिषेक शिवपिंडीवर करतात याचा उल्लेख केलेला आहेच त्याखेरीज वाघ, घार व वानरी यांनाही शिवपूजा प्रिय होती असे उल्लेख आढळतात.

१) घृष्णेश्वरच्या मंदिरात कळसावरील महादेवाची मूर्ती वाघावर आरूढ आहे. रात्री १२ वाजता सभामंडपातील दोन बोटे रुंदीच्या चिऱ्यातून वाघ महा–देवदर्शनास येतो. (पुष्प ३ - कथा ५८)

० एक वानरी शिवभक्त होती, ती रानातून उत्तम फळे गोळा करून आणून शकराला अर्पण करी. शंकर प्रसन्न झाल्याने तिला पुढील जन्मी राणीपद मिळाले आणि तिने अर्पण केलेल्या फळांची मुले होऊन मुलांच्या संगोपनाचे काम तिला मिळाले. (कहाणी भाग २ – कथा ८)

एक घारही शिवभक्त होती. ती दोन प्रहरी शिवलिंगाला ऊन लागू नये म्हणून त्यावर आपल्या पखांची छाया धरी. तिलाही या पुण्याने पुढील जन्मी राणीपद मिळाले व पतिसेवेचे काम मिळाले. (कहाणी भाग २ – सोमवारची कहाणी कथा ८)

### (ब) देवीची वैशिष्टये

देवीच्या भक्तीचा वारसा परंपरेने महाराष्ट्रात शतकानुशतके चालू आहे. गावोगावी देवीची देवळे दिसून येतात. अनेक मराठी लोककथांतून वेगवेगळ्या देवींच्या वैशिष्टयांच्या उल्लेख केलेला आढळतो. देवींची नावेही वेगवेगळी ठेवलेली आढळतात. ( उदा. पार्वती, जगुबाई, निमबाई, सोन्यारी आई, लक्ष्मी,

आक्काबाई वगैरे, त्यांच्या वैशिष्टयांचे स्वरूप थोडक्यात पुढीलप्रमाणे दाखविता येईल.

**लक्ष्मी श्रमाने प्रसन्न होते**

लक्ष्मीदेवता चंचलतेचे प्रतीक मानली जाते. एका ठिकाणी स्थिर राहणे हा तिचा स्वभावधर्म नाही. तथापि स्वत: लक्ष्मीने स्वत:च्या या अस्थिरतेचा दोष माणसांच्या स्वभावालाच दिलेला आहे.

एका दरिद्री ब्राम्हणाने आक्काबाई या देवतेच्या (लक्ष्मीची बहीण) प्रसन्न करून घेतले व तू माझ्याकडे वाकडया डोळयांनीही पाहू नकोस असा वर मिळविला. स्वाभाविकच त्याला दुर्दैवाची भीती न राहता लक्ष्मीची प्राप्ती करून देणे आक्काबाईला भाग पडले लक्ष्मी तेथे प्रकट झाली आणि म्हणाली 'लोक त्यांच्या स्वत:च्या आळशीपणाचे खापर माझ्या डोक्यावर फोडतात. दारिद्रय ओढवून घेतात" ( पुष्प ३ – कथा ५ )

एका गरीब मुलाची प्रेमभावना जाणून राजकन्येच्या हट्टाने त्याच्याशीच विवाह – गरीब जावई मिळाला म्हणून राजाराणी दु:खी परंतु नववधू आनंदी – तिचा पती आणि सहा दीर अत्यंत आळशी – राजकन्येने सर्वांना मोठया युक्तीयुक्तीने कामाला लावले – सर्वजण श्रम करू लागल्यामुळे लक्ष्मी त्या घरावर प्रसन्न – लक्ष्मीच्या वरदहस्ताने राजकन्येने फक्त आपल्या घराचेच नव्हे, तर सर्व गावाचे रूप पालटून टाकले. ( तीर्थांचे सागर - कथा १० )

**पापाचरणाने किंवा उन्मत्त झाल्यानें लक्ष्मी निघून जाते**

हैद्राबादला लक्ष्मीची वस्ती असल्याने समृध्दी – गावात पापाचरण वाढले – लक्ष्मीला निघून जावेसे वाटले – काही दिवस तिने पापाचरण कमी होण्याची वाट पाहिली परंतु निराशेने शेवटी जावयास निघाली – पहारेकऱ्याने अडविले – तो राजाला घेऊन येईतो वाट पाहण्याचे आश्वासन त्याला दिले – पहारेकरी राजाकडे गेला सर्व कथन – लक्ष्मी गावात कायम राहावी यासाठी राजाने पहारेकऱ्याचा शिरच्छेद केला. ( मराठवाडयातील लोककथा – कथा ११ )

हैद्राबादच्या 'चार मिनार' या प्रसिद्ध इमारतीतील एका खोलीत लक्ष्मीला अशा रीतीने कोंडून ठेवले आहे अशी वदंता होती. एवढेच नाही तर ती खोलीही दाखविण्यात येत असे असे म्हणतात.

लक्ष्मीला पापाचरण जसे आवडत नाही, तसेच उन्मतपणाही मुळीच आवडत नाही. तेथूनही ती पळ काढते. असे एका कथेतून दिसते. जसे–

गुराखी मुले लग्नाचा खेळ खेळत असता एका मुलाचे खेळातील लग्न लागले – भविष्यकाराने हात पाहून सांगितले, तुझे नशीब उजळले आहे. तुझं लग्न

खऱ्याखुऱ्या लक्ष्मीशी लागले. मात्र तिचा तुझ्या घरी अपमान झाला तर ती लगेच निघून जाईल, तेव्हा जपून रहा – मुलगा खूप श्रीमंत झाला – मुलगे कर्ते – सुना, जावई आले – तो सर्वांना सतत सांगायचा, उन्मत्त होऊ नका, कष्ट करा. माणुसकीने वागा – त्याच्या नातवाच्या लग्नात लक्ष्मी गरीब स्त्रीच्या रूपाने आली – परंतु पुढील पिढी उन्मत्त – तिचा अपमान करून तिला पानावर बसू दिले नाही – लक्ष्मीचा अपमान झाल्याने ती निघून गेली – नंतर सर्वांना पश्चात्ताप श्रीमंती गेली – पुन्हा गुराखीपण सर्वांच्या नशिबी. ( सुंबरान मांडीलं – कथा ११ )

**लक्ष्मीची हाक, 'मी येऊ'**

लक्ष्मीला जेथें जावेसे वाटते, ज्याच्यावर कृपा करावीशी वाटते त्यांच्याकडे ती स्वत: जाते. जाण्यापूर्वी बरेच वेळा ती संबंधित माणसाला त्याच्या मागून विचारते, मी येऊ ? त्या माणसाने होकारार्थी उत्तर दिल्यास ती त्याच्याकडे जाते व त्याला वैभव प्राप्त होते. पुढील लोककथांच्या उदाहरणांवरून हेच दिसून येते.

स्वत:च्या नशिबाने ' खाते ' असे राजकन्येचे मत – तिला मुद्दाम गरिबाघरी देण्यात आले – ती देवभक्त, सोशीक व उद्योगी – त्यामुळे लक्ष्मी प्रसन्न – मुलीला प्रश्न विचारला, मी येऊ ? राजकन्येने होकार देताच त्यांचे दारिद्रय नष्ट होऊन श्रीमंतीचा लाभ. (सांगीवांगी – कथा ८)

एका गरीब मुलाचा नुकताच विवाह झालेला, त्याच्या बायकोला शेताच्या रस्त्यावर रोज प्रश्न ऐकू येई, ' मी येऊ ? ' तिने सासूला सांगितले, सासूच्या आज्ञेनुसार तिने ' ये 'असे उत्तर दिले, तेथील वारवातून मोठा नागोबा बाहेर येऊन तिच्या डोक्यावर फणा ठेवून उभा राहिला. अपार धनही बाहेर आले. सून मात्र भीतीने मरण पावली. (अप्रकाशित कथा)
अशा लोककथांतून अप्रत्यक्षपणे उपदेश केलेला असतो.

**आक्काबाईचा फेरा**

लक्ष्मी व आक्काबाई या दोन्ही देवी बहिणी मानल्या जातात. (पुष्प ३ – कथा ३५) या कथेत त्यांचा या नात्याचा उल्लेख केलेला आहे. बहिणी असूनही त्यांचे काम मात्र पूर्णतया भिन्न किंबहुना दोन टोकांचे आहे. फक्त आमावस्येला दोघींची भेट होते असाही उल्लेख त्या कथेत आहे. लक्ष्मी सर्वांना हवीहवीशी वाटते तर अक्काबाई तिच्या तावडीत सापडेल त्याला दुर्दैवाच्या फेऱ्यात सतत अडकवीत असल्यामुळे कोणालाही नकोशीच वाटते.

एका ब्राह्मणावर अक्काबाईचा फेरा – हातात पैसा टिकतच नसे – मुलगी – उपवर पण विवाहासाठी पैसे नाहीत राजा विक्रमादित्याने उदारपणाने तीन वेळा पैसे दिले – तीनही वेळा पैसे अक्काबाईने पळवले – राजाने ब्राह्मणाच्या सुखासाठी आक्काबाईचा फेरा स्वत:वर घेतला ( फेरा असा हस्तांतरित करता येतो

ही सुद्धा लोकसमजूत मानावी लागेल. ) राजाच्या दुर्दैवाचे फेरे सुरू – स्वतःच्याच राज्यातून परागंदा व्हावे लागले. – चोरीचा खोटा आळ आला – हातपाय तोडले गेले - अशा दीन अवस्थेत उदरभरणासाठी तेलघाण्यावर काम करणे प्राप्त. ( सांगीवांगी – कथा १८ )

आक्काबाईच्या फेऱ्यामुळे संकटे येतात हे जाणून एका चतुर ब्राह्मणाने तिलाच प्रसन्न करून घेतले व वर मागितला, 'तू माझ्याकडे वाकड्या डोळ्यांनीही बघू नकोस - त्याला दुर्दैवाची भीती राहिली नाही – ऐश्वर्यप्राप्ती झाली. ( पुष्प ३ – कथा ७५ )

देवीच्या उपासनावैशिष्टयांचा उल्लेख मात्र फारसा कशातच आढळत नाही. नवरात्रात देवीच्या दर्शनाला खूप गर्दी होते असा उल्लेख पुष्प ३ - कथा ४७ या कथेत आहे. देवीपुढे रेडा बळी दिल्याचा ( तिच्याच आदेशानुसार ) उल्लेख पुष्प ३ - कथा ६३ मध्ये आहे. व्रतकथांत मात्र महालक्ष्मी, ज्येष्ठ गौरी अशा काही देवींच्या पूजनवैशिष्टयांचे उल्लेख आढळतात.

अशा लोककथांतून लोकदेवतांची स्वरूपवैशिष्टये व त्यांच्या उपासनापद्धती यांवर प्रकाश पडतो.

**९) देवदेवता नवसास पावतात**

देवाला नवस केल्यास इच्छित कार्य सिद्धीस जाते अशी श्रद्धा माणसाच्या मनात असते त्यामुळे संकटप्रसंगी किंवा भारी उणीव दूर व्हावी म्हणून देवाला नवस केला जातो.

एका अपत्यविहीन स्त्रीने देवाला नवस केला, 'मूल झाल्यास निंबसाडा नेसून दंडवत घालीत जाईन' निंबसाडा नेसून म्हणजे वस्त्राऐवजी निंबाचा पाला अंगावर गुंडाळून भर उन्हात अनवाणी रस्त्याने साष्टांग दंडवत घालीत देवीच्या दर्शनाला जावयाचे. (पुष्प २ – कथा ७)

पुत्रप्राप्ती झाल्यास शीतखडा खेळण्याचा देवीला केलेला नवस. (पुष्प ३ – कथा ७३)

पुत्रप्राप्ती झाल्यास नागनाथाच्या डोळ्यांत काजळ घालण्याचा व त्याला दूध पाजण्याचा नवस. (माला पुष्प ३ – कथा ८२)

पुत्रप्राप्तीनंतर मुलाला पाळण्यात घालून डोहातून फेरे देण्याचा नवस. (माला पुष्प ३ – कथा ९०)

**१०) नवस निःशंक मनाने फेडले पाहिजेत**

नवस निःशंक मनाने फेडला नाही तर संबंधित देवतेचा कोप होऊन अरिष्ट कोसळते. नागनाथाच्या पिंडीवरील कवचाच्या डोळ्यांत काजळ घालणे वा तेथे

दुधाचा नैवेद दाखविणे सोपे होते परंतु बाईची परीक्षा पाहण्यास नागनाथ नाग-रूपाने तेथे डोलू लागला. तेव्हा बाईचा धीर होईना शेवटी नागनाथाचा कोप झाला. तो फणा आपटून अदृश्य झाला व घरी बाईचा मुलगाही मरण पावला. (पुष्प ३ – कथा ८२)

पाळण्यातून मुलाला डोहात सोडल्यावर आईच्या मनात शंका निर्माण झाली. त्यामुळे देवी रुष्ट होऊन तिने पाळणा व मूल डोहात बुडविले. दुसऱ्या वेळेस निःशंक मनाने मूल सोडल्यावर दोन्हा मुले परत मिळाली. (पुष्प ३ – कथा ९०) अशी कितीतरी लोककथांची उदाहरणे सांगता येतील. येथे वानगीदाखल ही उदाहरणे दिली आहेत.

११) पापाचरणाने देवमूर्तीत बदल

कोठे पापाचरण घडले, विपरीत दृष्टीस पडले तर देवदेवता लोकांना त्याची अनेक तऱ्हांनी सूचना देतात. कधी मूर्ती नाकावर बोट ठेवते, कधी काळवंडते, कधी डोळ्यांतून अश्रू येतात तर कधी अशुद्ध द्रव अंगातून वाहू लागतो. देवतांकडून अशी सूचना मिळाल्यावर अनिष्टाचा शोध घेतला जातो. निवारण करण्यात येते व त्यामुळे मूर्ती पूर्ववत् होतात. पुढील लोककथा पाहाव्यात–

पाथर्डी तालुक्यातील वडगावच्या मारुतीचा रंग कर्तव्यात कसूर झाल्यास काळवंडून जातो. तेव्हा कोपून देव रानात गेला असे समजले जाते. ब्राह्मणांकडून देवाचा ठावठिकाणा काढण्यात येतो. तेथे वाजतगाजत जाऊन प्रार्थनापूर्वक मारुतीला प्रसन्न करून मिरवत परत आणतात. देव परत आल्यावर मोठा उत्सव करतात. (पुष्प ३ – कथा ३५)

पाप वाढल्यास वाघदेवाला (पाथर्डी तालुक्यातील वडगाव) वाईट वाटते. मूर्ती काळवंडते व देवाच्या अंगातून अशुद्ध द्रव बाहेर पडू लागतो. (पुष्प ३ – कथा ४०)

चंद्रम्मा नामक खाष्ट सासूच्या सासुरवासामुळे अर्धपोटी राहणाऱ्या नंदा नावाच्या सुनेने स्मशानातील विस्तवावर भाजून पोळ्या खाल्या तेव्हा तेथल्या देवळातील मारुती चकित झाला. कमरेवरचा हात काढून त्याने नाकावर बोट ठेवले. लोकांना कारण कळेना. प्रत्येकाने पाणी घालावे असे ठरले. नंदाने देवाला सत्यकथन करताच मारुतीने बोट काढले. तिचा सासुरवास संपला. (पुष्प ३ – कथा ६८)

१२) देवाला कौल

पाऊस पडेल किंवा नाही हे कळण्यासाठी पाथर्डी तालुक्यातील वडगावच्या मारुतीला कौल लावला जातो. घागरीच्या साह्याने मंत्रोच्चारपूर्वक कौल मागतात.

घागर आपोआप फिरते, घागर उजवीकडे फिरल्यास अनूकूल व डावीकडे फिरल्यास प्रतिकूल कौल मानला जातो. (पुष्प ३ – कथा ३५)

**१३) पावसासाठी देवाची आळवणी**

पाऊस पडत नसेल तर देवाची आळवणी करण्याच्या काही प्रकारांचे उल्लेख मराठी लोककथांत आढळतात. जसे– पाऊस न पडल्यास घरोघरच्या एकेका व्यक्तीने मारुतीस पाणी घालण्याची पध्दत वडगाव या गावी रूढ आहे. (पुष्प ३ – कथा ३५) वेरूळच्या परिसरात पाऊस न पडल्यास तेथील एका राजाने बसविलेली गुंडेश्वराची मूर्ती पाण्यात बुडवून ठेवतात. त्यामुळे पाऊस पडतो अशी लोकांची श्रध्दा असते. ( पुष्प ३ – कथा ५२ )

**१४) रजस्वलादोष**

रजस्वला स्त्रीचा स्पर्श त्याज्य मानला जातो. विशेषत: धार्मिक कार्यात तो कटाक्षाने टाळावा लागतो. काही देवता त्याबाबतीत विशेष जागरूक असतात.जसे

वडगावच्या साळसिदबाबा नामक नागदेवतेच्या पूजेसाठी पैठणहून गंगामातेचे व नागतळ्याचे पाणी कावडीने आणले जाते. कावडी आणणाऱ्या लोकसमूहात कोणी रजस्वला स्त्री असेल तर साळसिदबाबा नागरुपाने फडी काढून वाटेत कावडीला आडवा येतो. लोकांनी तेथेच ‘ साळसदिबाबा चांगभला ’ म्हणून त्याची पूजा केल्यावर नाग तेथे गुप्त होतो. ( पुष्प ३ – कथा ३७ ).

एका ब्राह्मणाच्या पत्नीने घरांत रज:दोष पाळला नाही त्यामुळे तिच्या पतीला पुढील जन्मी बैलाचा जन्म मिळाला, तिला स्वत:ला कुत्रीचा जन्म प्राप्त झाला व दोघांनाही आपल्या मुलाच्याच घरात राहून त्याची चाकरी करावी लागली. मुलाने ऋषिपंचमीचे व्रत करताच दोघांचा रजस्वलादोष नष्ट होऊन त्यांना स्वर्गप्राप्ती झाली. ( कहाणी भाग २ – ऋषीपंचमी कहाणी )

वडगावच्या मारुतीला कौल लावताना ज्यांना विटाळाची बाधा नसते अशी ५ लहान मुले कळशीसमोर बसवितात. ( पुष्प ३ – कथा ३५ )

अशा स्वरूपाच्या अनेक कथा रूढ आहेत. ज्यातून रजस्वला स्त्रीसंबंधीच्या समजुती दिसून येतात.

**१५) देवदेवतांनी घातलेले निर्बंध पाळावेच लागतात**

अनेक देवतांनी आपल्या भक्तांना काही निर्बंध घालून दिलेले असतात. ते निर्बंध पाळावेच लागतात अन्यथा त्या त्या संबंधित देवतांचा कोप होतो. उदा.–

अकलूजजवळील वज्रेश्वरीच्या देवलयासमोरील कुंडात खूप मोठे मासे आहेत पण कुणी पकडून त्यांचे कालवण केले तर त्यात एकही मासा न राहता फक्त रक्ताचा गाळ तेवढा राहतो म्हणून मासे कोणी पकडतच नाही. ( म. लो. सा. माला पुष्प ३ – कथा ९० )

पंढरपूरजवळील महाकुंगला अंबिका देवतेचे जागृत मंदिर आहे. तेथे देवीची समजली जागारी सुमारे १५०० ते २००० माकडे आहेत. ही सर्व माकडे घराघरातून चोऱ्या करतात, पण देवीच्या संतानांना कोण पकडणार ? कोणी पकडले तर त्याचा निर्वंश होतो अशी समजूत आहे. ( पुष्प ३ – कथा ८८ )

जगूबाई देवीच्या डोहातून वेळप्रसंगी मिळणारी सर्व भांडी काम संपताच तिला परत करावयास हवीच. एका बाईने एक काशाची वाटी चोरली म्हणून भांडी येणे बंद झाले. ( पुष्प ३ – कथा ४५ )

आपला खेळ सुरू करण्यापूर्वी डोंबाऱ्यांनी आपली पूजा करून दर्शन घ्यावे अशी म्हसोबाची इच्छा एकदा पूर्ण झाली नाही तर डोंबारी ढोल वाजवीत असताना त्यांच्या सर्व पाली व ते सर्वजण आपोआप आकाशात उडू लागले. ( पुष्प ३ – कथा ४८ )

**यज्ञ करणे पुण्यकारक**

आपल्या आर्यसंस्कृतीत यज्ञाला अपार महत्व होते. इष्टदेवतेचा यज्ञ करण्याने दैवता प्रसन्न होते व कार्यसिद्धी होते अशी श्रद्धा हजारो वर्षे येथील संस्कृतीत दृढमूल झालेली आहे. या यज्ञाविषयीचे काही उल्लेख मराठी लोककथांत सापडतात. जसे पुढील कथा पहा –

देव आणि ऋषी यांनी महाबळेश्वरच्या अरण्यात महान यज्ञ आरंभला होता. यज्ञ हा नेहमी दांपत्याने सोवळे नेसून आणि ठराविक मुहूर्तावरच सुरू करावयाचा असतो. या यज्ञात मुख्य यजमान होते ब्रह्मदेव आणि सावित्री. मुहूर्त जवळ आला तरी सावित्री सोवळे नेसून तयार नव्हती. ती लवकर बाहेर येईना. मुहूर्त टळायची भीती वाटून ऋषींनी ब्रह्मदेवाची दुसरी पत्नी गायत्री ही तयार असल्यामुळे तिला ब्रह्मदेवाबरोबर यज्ञाच्या पुण्याहवाचनास बसविले व यज्ञास सुरुवात केली. (पुष्प ३–कथा १९)

पांडवांनी केलेल्या अश्वमेध यज्ञाचा उल्लेख काही कथांत आहे. अश्वमेध यज्ञाच्या वेळी दिग्विजयासाठी सैन्यासह घोडा सोडला जातो. ज्या ज्या प्रदेशांतून तो घोडा जातो तो प्रदेश यजमानाच्या स्वामित्वाखाली येतो. जो घोडा अडवील त्याला युद्ध करावे लागते.

पांडवांनी अश्वमेध यज्ञाच्या वेळी अश्व सोडला. अश्वरक्षणाचे काम पार्थाकडे सोपवले होते. अश्व फिरत फिरत मणिपूर राजाच्या हद्दीत आला. तेथील राजा पार्थपुत्र बभ्रुवाहन याने घोडा अडविला. तेव्हा त्याचे आपल्या पित्याशी युद्ध झाले. पांडवसेनेचा व पार्थाचा पराजय झाला. (पुष्प ३ – कथा ३८)

१७) **यात्रा, वारी करणे पुण्यप्रद**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व धार्मिक जीवनांत तीर्थक्षेत्रांची यात्रा वा वारी करणे या गोष्टीला खूप महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्रातील लोकप्रिय भागवत धर्मसंप्रदाय पंढरपूर आणि आळंदीच्या वारीचा महिमा अनेक थोर संतांनी गायिलेला आहे. महाराष्ट्रातील सर्व प्रमुख संत वारकरी होते. ज्ञानेश्वर आणि नामदेव यांची एकमेकांच्या सोबतीने केलेल्या तीर्थयात्रा प्रसिद्धच आहेत. या भागवत धर्माचा प्रभाव मराठी लोककथांतही दिसून येतो. काशीयात्रा, पंढरपूर–यात्रा, जेजुरी-यात्रा यांचे उल्लेख काही कथांत दिसून येतात. पितृहत्येचा विचार करणाराने १२ वर्षे सेवाव्रत घेऊन तीर्थयात्रा केल्यास पाप नष्ट होते. (वैजयंती – कथा १३) इतके यात्रेचे पुण्य असते.

एक मनुष्य काशीयात्रेला निघाला – काशीयात्रेचे पुण्य आपल्यालाही मिळावे म्हणून त्याच्या विद्रुफा नावाच्या मुलीचा त्याच्याबरोबर जाण्याचा हट्ट – परंतु तिला नेण्यास त्याचा नकार – तिची इच्छा इतकी प्रबळ की पित्याने मनाई करूनही ती त्याच्या पाठोपाठ जाऊ लागली – 'कुठे निघालीस विद्रुफा' ? असे बापाने रागाने मागे वळून म्हणताच ती गुप्त होई व नदीरूपाने वाहू लागे – मधूनमधून नदीरूपाने प्रगट होई, गडप होत इतर नद्यांना ओलांडून ती पलीकडे निघाली व काशीच्या वाटेने गेली. (पुष्प ३ – कथा ४३)

काशी–यात्रेला गेल्यावर कुठल्यातरी खाण्याच्या वस्तूचा कायमचा त्याग करण्याची रूढी आहे.

शिरडीच्या साईनाथांचे गुरू नारायणमहाराज यांनी काशीला गेल्यावर आंबा सोडला होता. त्याच्या खाण्यात आंबा येऊ नये म्हणून त्यांना एका मलंगाने चांदोरी येथे नेऊन ठेवले. चांदोरीला आंबा न पिकल्याचा शाप – त्यामुळे आनंदीमहाराजांचा नेम मोडायचे कारण नव्हते. (पुष्प ३ – कथा ९३)

'मंगळागौरीची कहाणी' या व्रतकथेत अल्पायुषी पुत्र मामाबरोबर काशी–यात्रेला गेल्याचा उल्लेख आहे. ( कहाणी भाग १ - कथा ८ ) काशीयात्रा केल्याशिवाय मुलाचा विवाह करावयाचा नव्हता.

महाराष्ट्राच्या धार्मिक जीवनात पंढरपुरच्या वारीचे स्थान फार महत्वाचे आहे. अनेक भाविक वारकरी निष्ठेने आषाढी कार्तिकीची वारी करतातच, परंतु

दर एकादशीला पंढरपूरला जाणारे भाविकही असतात. असे काही भक्त मराठी लोककथांतही भेटतात. पंढरपूरप्रमाणे जेजुरीच्या खंडोबाची वारीही बरेच लोक करतात.

नारायण आणि माऊली हे दोघे बहीणभाऊ देवाचे अवतार – दर एका- दशीला पंढरपूरची वारी करीत – रात्रीतून पंढरपूरला जाऊन परत येत. (पुष्प ३ - कथा ६४)

कोळे गावचे घाडगे हे परम विठ्ठलभक्त होते. प्रत्येक एकादशीस पंढरपुरास चालत जाऊन विठ्ठल दर्शन घेण्याचा त्यांचा अखंड नियम होता. वृद्धपणी त्यांचा नियम मोडू नये म्हणून विठ्ठलच त्यांच्या घरी वस्तीस आले. (पुष्प ३ – कथा १८)

एका हरिभक्त म्हातारीला पंढरपूर-यात्रेला जावयाची खूप इच्छा – परंतु जवळ पैसा नव्हता – मुलांनीही पैसे द्यायचे नाकारले – तेव्हा जवळ होते तेवढे पैसे व शिधा घेऊन पंढरपुरास गेलीच.– तेथे तिच्यावर आलेली संकटे पांडुरंगाने निवारण केली. (सुंबरानं मांडील – कथा ३)

तिलोरे गावातील एका गवळ्याचा दरवर्षी चंपाषष्टीस चालत जेजुरीला जावयाचा नेम – म्हातारपणाने गात्रे विकल झाली तरी मन खंबीर – शेवटी वृद्धपणी त्याचे सत्त्वहरण होऊ नये म्हणून खंडोबाच त्याच्या गावी वस्तीस गेले. (पुष्प ३ – कथा २१)

**१८) व्रतवैकल्याने देवकृपा व भाग्यलक्ष्मी प्राप्त**

महाराष्ट्राच्या धार्मिक जीवनाचा एक भाग प्रचलित पारंपरिक व्रतवैकल्यांनी व्यापलेला आहे. वर्षभराच्या काळात वेगवेगळी व्रतवैकल्ये श्रद्धावान माणसे आचरीत असतात. व्रताचरणाने इष्ट देवता प्रसन्न होतात, इच्छित साध्य होते, संतती संपत्ती वाढते, विघ्ने दूर होतात अशी श्रद्धा शतकानुशतके येथे जोपासली जात आहे. या व्रतांचा तपशील व्रतकथांच्या प्रकरणात दिलेला असल्याने येथे फक्त निर्देश करीत आहे.

**१९) देऊळ बांधणे, देवळात घंटा बांधणे पुण्यकारक**

देवाच्या सत्त्वाचा वा अस्तित्वाचा प्रत्यय आला, अनुभव आला की तेथे देवाचे देऊळ बांधून देवस्थानाला कायमची सावली निर्माण करण्याची प्रवृत्ती भक्ताच्या मनात सहजच निर्माण होते. ठिकठिकाणी उभारली जाणारी देवळे या प्रवृत्तीतूनच निर्माण होतात.

गवळयासाठी तिलोऱ्याला वस्तीस येणाऱ्या खंडोबाचे देऊळ बांधले जाऊन शिलालेख कोरला गेला. (म. लो. सा. माला पुष्प ३ – कथा २१)

म्हैसमाळ जवळील कुशावर्त तीर्थावर अहिल्याबाई होळकर यांनी महादेवाची आठ देवळे बांधली. (पुष्प ३ – कथा ५२)

तुपाचा व्यापार करणाऱ्या तुपकऱ्याने आपले तुपाचे बुधले वाटेतील "रामसमुद्र" जंगलातील वेलीच्या चुंबळीवर ठेऊन आणले. त्याच्या बुधल्यात अक्षय्य तूप उत्पन्न झाले. कितीही तूप विकले तरी बुधला भरलेलाच. अखंड तुपाच्या विक्रीने तो खूप श्रीमंत बनला. परंतु ही सर्व नागनाथाची कृपा समजून त्याने नागनाथ देवळाचा (औंढा) परिघ व ओवऱ्या बांधल्या, पैसा परोपकारार्थ खर्च केला. (पुष्प ३ – कथा ८१)

काही वेळा प्रत्यक्ष देवता स्वप्नांत आदेश देऊन देवूळ बांधण्याचा आदेश देते.

विहीर खोदतांना एका शेतकऱ्याला शेंदुर लावलेले दगड मिळाले. त्याने ते देव्हाऱ्यात ठेवले. स्वप्नात त्याला दृष्टांत मिळाला, 'दगड सापडले तेथे देऊळ बांध, सुखाचे दिवस येतील ! त्याप्रमाणे त्याने देऊळ बांधले. (पुष्प ३ – कथा ७२)

देवळात बांधल्या जाणाऱ्या घंटेचा उल्लेख काही कथांत आढळतो.

घाटावर नेण्यासाठी आणलेली घंटा नेताना, वाटेत घंटावाहक गोरेगावच्या काळभैरवाच्या देवळात थांबले. निघताना घंटा हलेचना. त्याच देवळात ती बांधायचा संकल्प केल्यावर घंटा हालली तेथेच ती बांधली. (पुष्प ३ – कथा ३०)

## २०) विशिष्ट देवस्थानात अरिष्टाचे निवारण

भक्ताच्या मनात सर्वच देवस्थानाबद्दल श्रद्धाभाव असतो. परंतु काही विशिष्ट देवस्थानात अरिष्टनिवारण होते अशी विशेष श्रद्धाही दृढमूल झालेली दिसून येते. महाराष्ट्रातील काही अशा स्थानिक समजुती पुढीलप्रमाणे आहेत.

पाथर्डी तालुक्यातील बडगावच्या साळासिदबाबा या नागदेवतेच्या देवळात सर्पदंश झालेल्या व्यक्तीस आणून 'चांगभला' घोषणा केल्यास सर्पदंश उतरतो. सर्पदंशाने तेथे कोणीही दगावत नाही. सर्पदंश झालेला मनुष्य तर प्रदक्षिणा घालतोच, पण जनावरे सुद्धा प्रदक्षिणा घालण्यास चुकत नाहीत. (पुष्प ३ – कथा ३७)

संगमनेर जवळील ओझर येथील वैशिष्ट्य असे की विंचू चावल्यास मानमोड्या बाबाचे नाव घेऊन पाच पावले त्याच्याकडे चालल्यास विंचू उतरतो. (पुष्प ३ – कथा ४९)

सोलापूरजवळील मंजरेवाडी गाव कुत्र्याची वाडी म्हणून प्रसिध्द आहे. कारण तेथील गावचे स्वामी एका विहिरीतील पाणी मंत्रून कुत्रा चावलेल्या माणसाला प्यायला देतात.त्यामुळे कुत्र्याचे विष उतरते. याच गावी आणि याच ठिकाणी फक्त या पाण्याचा असा गुण येतो इतरत्र येत नाही. ( पुष्प ३ – कथा ९१ )

चिंचोली गणेशपूर मार्गावरील औदुंबराच्या झाडाजवळ, ज्याला मंत्रचेटकाने कवटाळले आहे तो तेथेच थबकतो, पुढे जायचे नाही. एक म्हातारा त्याला औदुम्बराकडे नेतो, पूजा करून घेतो, त्याच्या अंगचा मंत्र, चेटूक काढून घेतो व पुन्हा रस्त्यावर आणून सोडतो व गुप्त होतो. माणसाला पुन्हा त्रास होत नाही. ( पुष्प ३ – कथा ५७ )

## २१) भक्ती व धर्माचरणाबरोबर सदाचरणही महत्वाचे

भक्तीचा महिमा कितीही अगाध असला आणि धर्माचरणाचा मार्ग कितीही काटेकोरपणाने अनुसरला, तरी त्याला सदाचरणाची जोड मिळाल्याशिवाय आयुष्य खऱ्या अर्थाने सार्थ होत नाही. एकीकडे धार्मिकतेचा आव आणून दुसरीकडे दुराचरणाचा मार्ग चोखाळणे हे त्याज्यच मानले जाते. सदाचरणी माणूस देवाला प्रिय असतो व दुराचारी माणसाला तो शासन करतो अशी श्रध्दा माणसाच्या मनात असते आणि ही श्रध्दा लोककथांच्या द्वारा निश्चित जोपासली जाते. सद्गुण महिम्याची कितीतरी उदाहरणे मराठी लोककथातून वेचून काढता येतील. सद्गुणांच्या महत्त्वाचा ठसा श्रोत्यांच्या मनावर उत्तम तऱ्हेने उमटावा यासाठी त्यांचे महत्व वर्णन करतांना त्यांना बरेच वेळा अद्भुततेची जोड ही दिली जाते.

### दानधर्माचे महत्व

दानधर्माचे महत्व पूर्वापार चालत आलेले आहे. बळीराजा किंवा कर्ण यांच्या दानशूरतेचे गुणगान पूर्वापार केले जाते. मराठी लोककथांतून दानधर्माच्या श्रेष्ठतेचे वर्णन करणारी अनेक उदाहरणे आहेत.

दानधर्माच्या पध्दतीबद्दल साशंक असलेला बंडू प्रत्यक्ष धर्माच्या शोधार्थ निघाला. वाटेत भिल्लाने त्याला स्वतःचे जेवण देऊन व स्वतःची जागा झोपायला देऊन पाहुणचार केला - त्या भिल्लालाच रात्री वाघाने खाऊन टाकले - धर्माबद्दल बंडूच्या मनात अधिक शंका उत्पन्न – परंतु वाटेत त्याला भेटलेला आंधळा भुजंग जमिनीतील पूर्वजन्मी दान न केलेले धन दान केल्यावर डोळस झाला. नासके फळ येणाऱ्या झाडाने आपल्या खालील सात रांजण द्रव्ये दान केल्यावर त्याला चांगली फळे लागली. स्वतः दानधर्म न करणाऱ्या वडिलांच्याही धर्माच्या आड

आल्यामुळे पित्याचा शापाला बळी पडून अर्धे मत्स्यमानव बनलेल्या ऋषिपुत्राने आपल्या डोक्यावरील मौल्यवान हिरा दान केल्यावर तो शापमुक्त झाला. वाघाच्या मुखी पडलेला भिल्ल एका पाटलाच्या घरी जन्मास आला, तर बंडूचे आतिथ्य न करणाऱ्या भिल्लिणीला डुकरिणीचा जन्म आला. त्यामुळे बंडूला धर्माची महती पटली. ( एक होता राजा – कथा ९ )

व्रतकथांतील अनेक व्रतांची सांगता अन्नदान, वस्त्रदान, दक्षिणा यांनी करावी लागते.

**परोपकाराचे फळ**

परोपकाराचे फळ माणसाला कधी ना कधी तरी; कुठल्या तरी रूपाने मिळतेच असा दिलासा देणाऱ्या काही मराठी लोककथा आहेत.

एक सावकार पुत्राने तो देशांतरास गेला असता, स्वत:जवळ असलेले फक्त १०० रुपये देऊन एका प्रेताची त्याच्या ऋणकोकडून होणारी विटंबना थांबविली. ते प्रेत ज्या माणसाचे होते त्याचा मुलगा चोर होता. पण सावकार पुत्राची हकीगत कळताच सावकार पुत्राच्या उपकाराची फेड म्हणून सावकार पुत्राला नंतर त्याने त्याच्या प्रवासात केवळ सदैव साथच दिली असे नाही तर त्याचे सदैव रक्षण केले. चं रापासून वाचवले. लावसट स्वत: मारली परंतु त्याचे श्रेय सावकार पुत्राला देऊन त्याला राजकन्या व अर्धराज्य मिळवून दिले. (तीर्थाचे सागर ५, सांगीवांगी – ११)

तीन भावातील धाकट्या वसंताने मोठ्या दोन्ही भावांना क्रूर कर्मापासून परावृत्त केले. त्यांना मुंग्यांचे वारूळ फोडू दिले नाही, बदकांना मारू दिले नाही, मधमाशांचे पोळे काढू दिले नाही. नंतर मुंग्या, बदके व मधमाशा यांनी मदत करुन राजवाड्यांतील सर्व माणसा-प्राण्यांना मंत्राने दगडी बनवून टाकणाऱ्या राक्षसाची तीन कोडी सोडवावयास मदत करून राजवाड्यातील माणसा-प्राण्यांना पूर्वरूपात आणले. राणीच्या हारातील खड्डयात पडलेले १००० मोती मुंग्यांनी शोधून दिले. तळ्यात पडलेली किल्ली बदकांनी शोधून दिली तर तीन एकसारख्या राजकन्यातील मधप्रिय राजकन्या मधमाशांनी नेमकी शोधून काढली. (पुष्प १ – कथा ५)

**पतिव्रता–धर्माची थोरवी**

फार प्राचीन कालापासून आपल्या देशात पतिव्रता–धर्माची थोरवी गायिली जाते. अहिल्या, सीता, गांधारी, सावित्री अशा अनेक पतिव्रता स्त्रियांना आदर्श मानले जाते. मराठी लोककथाही पतिव्रता–महिमा वर्णन करतात.

राणीच्या पतिव्रता–धर्मामुळे राजाच्या छातीवरचा गुलाब सदैव टवटवीत राहिला. आपल्या अनुपस्थितीत राणीला पुत्रलाभ व्हावा अशी अवघड अट राजाने

तिला घातली होती. परंतु वेषांतराच्या मिषाने तिने पतीला भुलवून त्याच्याकडूनच पुत्रप्राप्ती करवून घेतली. (राजविलासी केवडा – कथा ७)

पतिव्रतेच्या हातातील मुसळ वरच्यावर अधांतरी तरंगते परतु स्त्री पतिव्रता नसेल तर ते तसे न राहता डोक्यात पडते. (अप्रसिद्ध कथा)

पतिव्रता सावित्रीचा यमदूतांनी स्वर्गात नेलेला पती (अग्निराजा) शंकराने जिवंत करून पुन्हा तिला परत दिला. (वैजयंती – कथा २०)

**आथित्य धर्माचे पालन**

आतिथ्य हा गृहस्थधर्माचा एक अविभाज्य भाग मानला जातो. दारी आलेल्या अतिथीचे स्वागत करून त्याला जेवावयास घालणे, वेळप्रसंगी त्याच्या राहण्याची सोय करणे हा पूर्वापार चालत आलेला गृहस्थी संकेत आहे. आतिथ्यधर्माच्या पालनामुळे कष्ट सोसावे लागतात, खर्चही करावा लागतो. तथापि त्याचे फळ हमखास मिळतेच अशी ग्वाही देणाऱ्या काही मराठी लोककथा आहेत.

महालक्ष्मीच्या सणाच्या दिवशी साक्षात महालक्ष्मी एका भिकारणीच्या वेषाने एका बाईच्या घरी आली. बाईने तिचा अव्हेर न करता तिला सन्मानाने घरात घेऊन जेऊ खाऊ घातले. झोपायला बिछाना घालून दिला. देवी प्रसन्न झाली. जेवताना तिने उरलेल्या अन्नकणांचे हिरे मोती झाले. ती झोपल्या जागी सोन्याचा पुतळा मिळाला. (अप्रसिद्ध कथा )

'संपत शनिवारची कहाणी' आणि, 'मारुतीची कहाणी' या दोन्ही व्रत-कथांत अतिथ्यधर्माचे पालन केल्याने झालेल्या देवकृपेचे चित्रण आहे. (कहाणी भाग १ – कथा १२, १३)

लाकूडतोड्याचा व्यवसाय करणारा कुलदीप जे काही मिळवी त्यांतील थोडे शिल्लक ठेवी व उरलेले आईजवळ देई. दिवाळीस शिल्लक पैसे खर्च करून गोड-धोड स्वयंपाक केला जेवायच्या ऐन वेळी एक गरीब भिक्षेकरी दारात हजर झाला. अन्न फक्त दोघांपुरतेच होते. कुलदीपने स्वतःचा सर्व वाटा भिक्षेकऱ्याला देऊन टाकला. आई रागावली. परंतु कुलदीप म्हणाला, 'आपण गरिबाला दिलं, तर देव आपल्याला देईल.' तरीही आईचा रोष कायमच होता. ती म्हणाली, 'जा तुझा देव देईल तेथेच खा.' तो देवाला भेटायला गेला व अमाप संपत्ती, राजकन्या मिळवून परत घरी आला. आथित्य वाया गेले नाही. (वैजयंती – कथा २१)

**मृत्यूसंबंधीत समजुती**

धर्माचरण आणि सदाचरण यांच्या योगाने इहलोकीचे जीवन सुखावह होण्यास मदत होते हे तर खरेच, तथापि त्यांच्या योगाने माणसाच्या मरणोत्तर जीवनाच्या

सुखाची तरतूदही आपोआप होते. अशी समजूत भारतीय समाजात दृढमूल झालेली आढळते. पुण्यवान माणूस स्वर्गात जातो व पापी नरकात पडतो असाच सर्वांचा विश्वास असतो. मृत्यू कसा होतो, मरणोत्तर माणसाचे काय होते, मरणासन्न माणसास कसे वागवावे याबद्दलचे जे अनेक संकेत समाजात रूढ आहेत त्यांचेही उल्लेख मराठी लोककथांतून आढळतात.

**१) पुण्यवान माणसे सदेह स्वर्गाला जातात**

पंचमहाभूतांच्या संयोगाने बनलेले हे मानवी शरीर मर्त्य असते. मृत्यूनंतर ते पुन्हा पंचत्वांत विलीन होते आणि आत्मा मुक्त होतो. ज्याच्या त्याच्या पाप-पुण्यानुसार स्वर्गप्राप्ती होते वा नरकवास भोगावा लागतो. तथापि जी माणसे खरोखरच अतिशय पुण्यवान असतात ती सदेह स्वर्गाला जातात. मृत्यूच्या यातना त्यांना सोसाव्या लागत नाहीत. अशा समजुती रूढ आहेत.

रजस्वला दोषामुळे एका स्त्रीला पुढील जन्मी कुत्रीचा जन्म प्राप्त झाला व तिच्या पतीला बैलाचा जन्म मिळाला. दोघे आपल्या मुलाच्याच घरी चाकरी करीत होते. त्यांच्या मुलाने ऋषिपंचमीचे व्रत करून त्याचे पुण्य या प्राणीरूपातील मातापित्यांना दिल्यामुळे दोघांना पुन्हा मानवरूप प्राप्त झाले. दोघे विमानात बसून सदेह स्वर्गात गेले. [कहाणी भाग २ – ऋषिपंचमीची कहाणी – कथा १२ ]

**२) यम हा मृत्यूचा देव, त्याचे वाहन रेडा, यमदूत प्राण नेण्यास येतात**

प्रचंड विश्वचक्र सुरळीत चालावे म्हणून देवदेवतांत कामाची वाटणी केलेली आढळते. ब्रह्मदेव हा माणसांना जन्माला घालतो आणि यमराज हा त्यांना आयुष्य-मानानुसार मृत्यूभेट घडवितो. त्याचे वाहन रेडा हे आहे. यम स्वतः किंवा त्याचे दूत माणसाचे प्राण हरण करण्यास पृथ्वीवर येतात.

एका राजपुत्राजवळ एक जादूची पिशवी होती. त्या पिशवीत भुताला कोंडून त्याच्याकडून राजपुत्राने हवे ते देणारी दुसरी पिशवी मिळविली. उत्तम आयुष्य उपभोगले. आयुष्य संपायचे वेळी यम प्राण न्यायला आला तेव्हा यमालाच पिशवीत कोंडून ३०० वर्षे आयुष्य वाढवून घेतले. ३०० वर्षात एकच छोटे पुण्यकर्म केले. (ब्राह्मणाला गाय दिली) म्हणून थोड्या वेळासाठी मिळालेला स्वर्गवास उपभोगताना यमाचाच रेडा मागून घेतला व त्याला यमाच्याच पोटात शिंग खुपसण्याची आज्ञा केली. (अप्रसिद्ध कथा)

सावित्रीचा पती अग्निराजा याचे आयुष्य संपताच काळयम शंकराच्या आज्ञेवरून त्याचा आत्मा आणायला गेला. सावित्री पतीला डोक्यावर घेऊन उभी होती तिने शव सोडल्याशिवाय त्याचा आत्मा नेता येईना. काळयमाने कावळ्यांकडून

सावित्रीच्या डोक्यावर चोच मारून त्याचे शव खाली पाडले व आत्मा काढून घेतला. (वैजयंती – कथा २०)

**मृताची शेवटची इच्छा पूर्ण करावी**

मरणोन्मुख झालेल्या व्यक्ती मृत्यूशय्येवर ज्या इच्छा व्यक्त करतात त्या कसोशीने पाळल्या जातात, किंबहुना त्यांची पूर्ती करणे हे कर्तव्य समजले जाते. फाशीच्या कैद्यालाही शेवटची इच्छा विचारली जाते.

एका मुलाने मृत्यूशय्येवर असताना सांगितले, ' मला आपल्या घरासमोरील वेळूच्या बेटात पुरा ' त्याची इच्छा पूर्ण केली गेली. (पुष्प १ – कथा ९)

सत्तेचा फायदा घेऊन गावकऱ्यांना जन्मभर रडविणाऱ्याने, आपल्या शेवटच्या इच्छेच्या साह्याने आपल्या मृत्यूनंतरही कसे रडविले याच्या लोककथा आढळतात.

पिंपळगावच्या कुलकर्ण्यांनी जन्मभर लोकांना रडवले व मरतानाही मुलाला काहीतरी कानमंत्र दिला व प्राण सोडला. मुलाने वडिलांची शेवटची इच्छा लोकांना सांगितली. ' आमच्या वडिलांनी सर्वांना जन्मभर छळले. त्यांना शेवटी पश्चाताप झाला. त्यांच्या अंगात खुंट्या ठोकून त्यांच्या देहाला शिक्षा केल्याशिवाय त्यांचा आत्मा मोकळा होणार नाही. ' गावकऱ्यांना बरेच वाटले. त्यांनी शेंब्या गोंडे वगैरे लावून मृतदेहात खुंट्या ठोकल्या. परंतु कुलकर्णीबुवांनी पूर्वीच वरिष्ठांकडे अर्ज केलेला होता. ' गावकरी माझे काय हाल करतील याचा नेम नाही. ' तशात मुलाने खबर दिली, ' माझ्या वडिलांना लोकांनी खुंट्या ठोकून ठार मारले. ' सर्व गावावर हे प्रकरण चांगलेच शेकले. (पुष्प ३ – कथा ९७)

**४) प्रेताची विटंबना करू नये**

'मरणान्तानि वैराणि' – असे एक संस्कृत वचन आहे. एखाद्या माणसाशी आपले कितीही वैर असले तरी त्याच्या मृत्यूनंतर ते संपले पाहिजे. युद्धातही शत्रुपक्षातील मृतदेहाचा यथायोग्य संस्कार केला जातो. मृतदेहाची विटंबना करणे माणुसकीला काळिमा लावते. पुढील कथा पहा–

एक व्यापारीपुत्र व्यापारासाठी परगावी जात असता वाटेत त्याला असे दिसले की दोन माणसे एका प्रेताची विटंबना करीत आहेत. प्रेताची इकडून तिकडे ओढाताण करीत आहेत त्याने चौकशी केली असता असे कळले की तो मृत माणूस त्या दोघांचा ऋणको होता. त्याने पैसे परत केले नाहीत व आता ती शक्यताही दुरावली असल्यामुळे त्याचा राग ते प्रेतावर काढीत आहेत. व्यापारी–

पुत्राने स्वत:जवळचे पैसे त्या दोघांना दिले व त्या मृतदेहाची विटंबना थांबवली. ( सांगीवांगी – कथा ४ )

तीर्थांचे सागर – कथा ५ यातील सावकारपुत्राचा कथाभाग अगदी याच स्वरूपाचा आहे.

**५) मृत्यूनंतरचे मर्तिकविधी**

माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या मृत देहावर जे अंतिमसंस्कार केले जातात त्यांचीही माहिती मराठी लोककथांत आढळते. तिरडी, चार खांदेकरी, पुढे अग्नी घेऊन चालणारा आग्या, अस्थिविसर्जन यांचे उल्लेख काही कथांत आढळतात. जसे–

म्हातारा-म्हातारीत पाच भाकरींच्या वाटयावरून भांडण – दोघेही झोपले- सामसुमीमुळे शेजाऱ्यांना संशय – दार फोडले – दोघे मरण पावले असा सर्वांचा गैरसमज – एकाच तिरडीवर दोघांना बांधले – चौघे खांदेकरी व पाचवा आग्या स्मशानाकडे निघाले – तिरडीवर समझोत्यासाठी दोघांची चर्चा – भीतीने तिरडी टाकून सर्व पळाले. ( खानदेशी लोककथा – कथा ८ ).

पत्नीच्या शापाने हाल हाल होऊन मरण पावलेल्या पदुबाईच्या अस्थी पावसाने समुद्रात वाहत गेल्या – भक्त माळीरायाने तप करून पदुबाईच्या अस्थी समुद्राकडून परत मिळविल्या आणि गंगेत विसर्जन केल्या. ( पुष्प ३ – कथा ७६ )

**६) श्राद्धाचे अन्न निषिद्ध**

मृत्यूनंतर दहाव्या दिवसापासून एखाद्या तीर्थक्षेत्री जाऊन श्राद्धविधी केले जातात त्यावेळी ब्राह्मणांकरवी मंत्रपठन करून ब्राह्मण, सवाष्ण यांना भोजन घालावे लागते. हे भोजन निषिद्ध मानले जाते. साधारणपणे त्याचा स्वीकार कोणी करीत नाही. तथापि त्यासाठी भोजनी बसणारे वेगळे ब्राह्मण व सवाष्णी मिळतात. या भोजनांचे दुष्परिणाम पुढील कथेत वर्णिली आहे.

मंत्रक्रिया करणाऱ्या नाशिकच्या एका ब्राह्मणाला कमाई चांगली परंतु १२ व्याचे निषिद्ध अन्न सतत सेवनात येत असल्याने त्याच्या संस्काराने त्याचा मुलगा वेडसर झाला होता. ( पुष्प ३ – कथा ९८ )

**७) श्राद्धसंस्कार आवश्यक**

श्राध्दसंस्कार का व कसा करावा याची माहिती गरूडपुराणात दिलेली आहे. घरात मृत्यू घडला तरच हे वाचले जाते. हिंदूसमाजात रूढ असणाऱ्या श्राद्धसंस्कारविधीवर या पुराणाचा प्रभाव पडलेला आहे. मृत्यूच्या ठराविक तिथीच्या दिवशी मृतव्यक्तीचे श्राद्ध करणे आवश्यक असते. त्यादिवशी ती व्यक्ती स्वर्गातून येऊन ब्राह्मण–सवाष्णीच्या मुखाने अन्नग्रहण करून जाते. अशी समजूत

रूढ आहे. म्हणून ब्राह्मणभोजन व मंत्रोच्चार ही श्राद्धविधींची महत्वाची अंगे असतात. त्यांचा उल्लेख मराठी लोककथांत आढळतो.

एका ब्राह्मणाच्या वडिलांच्या दरवर्षीच्या श्राद्धादिवशीच त्याची सून बाळंत होई व मूल जन्मतःच मरून जाई. घरात मृत्यू घडल्यामुळे श्राद्धासाठी आणलेले ब्राह्मण दरवर्षी तसेच उपाशी जात. ( पुष्प १ – कथा ४ ), (मराठवाड्यातील लोककथा – कथा ४)

एका ब्राह्मणाने चांभार स्त्रीशी विवाह केल्याने इतर ब्राह्मणांनी त्याला बहिष्कृत केले होते व श्राद्धासाठीही त्याच्याकडे कोणी जेवावयास येत नसे. म्हणून त्याने परगावचे ब्राह्मण श्राद्धासाठी आणले. ( पुष्प ३ – कथा १४ )

आपल्या आश्रयार्थ आलेल्या एका वनवासी राजपुत्राच्या सुंदर पत्नीचा लोभ करणाऱ्या राजाने, राजपुत्राला मारून टाकण्यासाठी, अशी आज्ञा केली, 'श्राद्धासाठी माझ्या आईवडिलांना स्वर्गातून घेऊन ये' (म.लो.सा.माला पुष्प १ - कथा ४४)

८) मृत्यूनंतरचा निवाडा

मृत्यूनंतर माणसाच्या आयुष्यभराच्या पापपुण्यकर्माचा निवाडा करण्यात येऊन त्यानुसार त्यांना स्वर्गात स्थान दिले जाते किंवा नरकात पाठवले जाते.

एका राजपुत्राने हवे ते देणाऱ्या पिशवीच्या बळावर जन्मभर (३०० वर्षे) सुखोपभोग घेतला. आयुष्यभर श्रीमंतीत सर्व पापकर्मेच केली. फक्त एकच पुण्य केले व ते म्हणजे एकदा ब्राम्हणाला एक गाय दान दिली तेवढ्या दान पुण्याच्या बळावर त्याला थोडा वेळ स्वर्गवास व नंतर नरकवास मिळणार होता. ( अप्रसिद्ध कथा )

मृत्यूनंतर माणसांना देवापुढे उभे करण्यात येते. बायकांनी गोंदलेले असले व पुरूषांनी गोंदे घेतलेले असले (स्वयंप्रेरणेने मनगटावर स्वतःच डाग घेणे) म्हणजे देव प्रसन्न होऊन स्वर्गसुखाचा लाभ करून देतो. गोंदे न घेता, (गोंदून न घेता) नुसतेच खाऊनपिऊन (अन्न चोंदून) गेल्यास नरकात रवानगी होते. (म. लो. सा. माला पुष्प – ३ कथा १७).

९) पुनर्जन्म कल्पना

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रवं जन्म मृतस्य चा हे गीतावचन प्रसिध्दच आहे. मृतदेहाच्या बाह्यकुडीचा नाश होतो, पण त्यातून मुक्त झालेला आत्मा पुन्हा जन्म घेतो, अशी ग्वाही श्रीकृष्णाने अर्जुनाला दिलेली होती. ही कल्पना मराठी लोककथांतही प्रकट झालेली आहे. हा पुनर्जन्म माणसाच्या पूर्वजन्म कर्मानुसार प्राप्त होतो.

स्वतः उपाशी राहून आतिथीला जेऊ घालणाऱ्या, आणि स्वतःच्या झाडा-वरचा एकमेव बिछाना त्याला देऊन स्वतः झाडाखाली झोपण्यामुळे वाघाच्या भक्ष्यस्थानी पडणाऱ्या भिल्लाला उच्च कुळात जन्म मिळाला. तर त्याच्या आतिथ्यात सहभागी न होणाऱ्या भिल्लपत्नीला डुकरिणीचा जन्म मिळाला. (एक होता राजा – कथा ९)

स्वतः अडचण सोसून किसनचा उत्तम पाहुणचार करण्याऱ्या माळ्यास राजकुळात जन्म लाभला (वैजंती – कथा ६)

**काही वेळा पूर्वजन्मातील वैशिष्टये नवीन जन्मातही कायम रहतात.**

एका राजाने एका दरिद्री ब्राह्मणाला एक बकरी दान दिली. तिच्या तोंडून माणिकमोती बाहेर पडत. कुजके धान्य खाल्ल्याने ती बकरी मरण पावली. परंतु ती त्या ब्राह्मणाच्या मुलीच्या रूपाने जन्मास आली. त्या मुलीच्या तोंडूनही माणिक-मोती पडत असत. ( अप्रसिद्ध कथा )

**धार्मिक समजुतींची उपयुक्तता**

आतापर्यंत आपण महाराष्ट्रीय हिंदुधर्मीय समाजाच्या धार्मिक समजुती मराठी लोककथांतून कशा व्यक्त होतात हे पाहिले. या समजुतींनी लोकमानसाचे केवळ दर्शन होते असे नव्हे तर त्यांतून लोकमानसाला योग्य वळण लावण्याचे फार मोठे कार्य साध्य होते. एकीकडे सर्वव्यापी, दयाळू देवदेवता सदैव आपल्या पाठीशी उभ्या असतात याचा फार मोठा दिलासा माणसाला मिळतो, तर दुसरीकडे त्यांच्या (देवदेवतांच्या) कृपेसाठी आपण त्याला अनन्यभावाने शरण गेले पाहिजे, त्यांनी घालून दिलेले नियम निर्बंध पाळले पाहिजेत, आणि त्याबरोबरच सदा-चरणाची वाटही सोडता कामा नये असा अकुंशही त्याच्या मनावर सतत ठेवला जातो. नैमित्तिक यज्ञकर्मे, नियमित वारी, व्रतवैकल्ये, नियमित देवदर्शन आदि साधनांच्या द्वारे मानसाला पुण्य मिळो वा ना मिळो परंतु एकूण आयुष्यालाच त्यामुळे आपोआपच नेमस्तपणा प्राप्त होतो आणि रोजच्या व्यवहारात त्याचा चांगला उपयोग होतो. प्रत्यक्ष मृत्यूची भीती, आणि मृत्यूनंतरच्या पापपुण्य-निवाड्याची व विशेषतः नरकवासाची भीती तर माणसाच्या आयुष्याचे एकूण रूपरंगच बदलून टाकते. पापाचरणाकडे वळण्याचे धाडस सर्वसामान्य माणसाला सहसा होतच नाही. प्रेताचीही विटबंना न करण्याचा दंडक हे तर आचार-श्रेष्ठतेचे गमक मानावे लागेल प्रत्यक्ष त्या मृत शरिराला विटंबनेचे काय क्लेश होणार ? परंतु मृतदेहाची विटबंना करण्यातून प्रकट होणारी प्रवृत्ती सर्वदा त्याज्य आहे असे लोककथा स्पष्टपणे सांगते. केवळ हिंदु-धर्मीय लोककथेतच नव्हे तर युरोपातही The grateful dead या कथाविशेषाद्वारे

देखील याचाच पुरस्कार केलेला आहे. मराठी लोककथेत प्रेताची विटंबना थांबवणाराला त्या मृत माणसाचा मुलगा उत्तरायुष्यात मदत करतो, तर युरोपीय कथाविशेषांत प्रत्यक्ष त्या मृताचा आत्माच शरीररूप धारण करून आपल्या उपकारकर्त्याचे ऋण फेडतो, आणि मुक्त होतो. लोककथांतील धार्मिक समजुती या अशा तऱ्हेने लोकमानसाला योग्य वळण लावून समाजाची प्रकृती निकोप राखण्यास मदत करतात.

## मराठी लोककथांतील सामाजिक समजुती

धार्मिक समजुतीप्रमाणेच सामाजिक वैशिष्टयांचे व समजुतींचे दर्शनही मराठी लोककथांतून कसे घडते हे आता पाहावयाचे आहे. सर्व मराठी लोककथांचे साकल्याने निरीक्षण केले, तर महाराष्ट्रातील समाजरचनेची दोन प्रमुख वैशिष्टये ठळकपणे दिसून येतात.

अ) समाजातील चातुर्वर्ण्य व्यवस्था

ब) पुरुषप्रधान संस्कृती आणि अविभक्त कुटुंब पद्धती महाराष्ट्रीय हिंदु समाजातील सामाजिक व कौटुंबिक वातावरणनिर्मिती या दोन वैशिष्टयांतून झालेली असल्याने त्यांचा परामर्ष घेणे महत्वाचे ठरते.

### अ) चातुर्वर्ण्य व्यवस्था

हिंदु समाजातील चातुर्वर्ण्यव्यवस्था फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. या व्यवस्थेबाबतच्या पारंपारिक कल्पना मराठी लोककथांतही दिसून येतात.

### जातिवर्ण व्यवस्था परमेश्वरनिर्मित

भगवान श्रीकृष्णांनी गीतेमध्ये स्पष्ट सांगितले आहे, 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्म विभागशः।' समाजाचे काम ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र या चार समाजगटांत वाटून दिलेले आहे. पुष्प ३ – कथा ५ या मराठी लोककथेतही 'देवाने जाती निर्माण करून कामे वाटून दिलेली आहेत.' असा उल्लेख करून जातिवर्ण–व्यवस्थेच्या उत्पत्तीचे कर्तृत्व परमेश्वराकडेच सोपवलेले आढळते.

परंपरेने मानलेल्या ब्राह्मणवर्णाच्या श्रेष्ठतेचा उल्लेख 'हरितालिकेच्या कहाणी' मध्ये आढळतो. पार्वतीने शंकरांना श्रेष्ठ व्रत कोणते ते सांगावयाची विनंती केल्यावर शंकरांनी सांगितले, चार वर्णांत जसा ब्राह्मण श्रेष्ठ तसे सर्व व्रतांत हरितालिका व्रत श्रेष्ठ आहे.' अनेक व्रतांची सांगता ब्राह्मणभोजन, ब्राह्मणाला दान देणे यांनीच होते. ही गोष्टही या संदर्भात महत्त्वाची आहे.

**ब्राह्मणांना वेदाधिकार**

पवित्र मानल्या जाणाऱ्या वेदवाङ्मयाचा अभ्यास करण्याचा अधिकार परंपरेने फक्त ब्राह्मणांनाच दिलेला आहे. ब्राह्मणाने स्वतः वेदाभ्यास करावा आणि फक्त ब्राह्मणांनाच शिकवावा असा दंडक मानला जात असे. व्रतबंध संस्कारानंतर ब्राह्मण मुले गुरुगृही राहून अभ्यास करीत.

एक ब्राह्मण अरण्यात राहून अनेक शिष्यांना शिकवीत असे. त्याचे शिष्य त्याच्याकडे राहात, कामे करीत, काही शिष्य गुराख्याचे काम करताना संध्यापठण करीत. (पुष्प ३ – कथा २४)

**इतर वर्णांनी ब्राह्मणांची सेवा घेऊ नये, त्यांना आश्रय देऊ नये**

ब्राह्मणवर्ण हा श्रेष्ठ मानला जात असल्यामुळे इतर कनिष्ठ वर्णांनी त्यांची सेवा घेऊ नये असे मत एका कथेत व्यक्त केले आहे.

भविष्यात वैधव्ययोग असणारी एक ब्राह्मणकन्या भावासह सोमा परटिणीकडे गेली ब्राह्मणकन्येचा वैधव्ययोग टाळण्यासाठी दूरवरच्या त्या सोमा परटिणीकडून सोमवती अवसेचे पुण्य आणावयाचे होते. भाऊबहीण सोमा परटिणीकडे पोचले. परंतु एकदम तिच्यापर्यंत न जाता रोज सकाळी तिचे अंगण साफ करू लागले. वर्षभर हा प्रकार चालू होता. सोमाला वाटले की, कोणीतरी आपलीच सून स्वच्छता करते. परंतु सुनांनी नकारार्थी उत्तर दिले. तेव्हा पाळत ठेवून भावा-वहिणीला पकडले, चौकशी केली. नंतर सोमाने सांगितले, " ब्राह्मणांची सेवा घेतल्यास आम्हाला पाप लागेल, तेव्हा आमचे अंगण झाडू नका." (कहाणी सोमवतीची भाग २ – कहाणी ७)

तुळशीला तिच्या पित्याने वनात नेऊन सोडून दिले. (गरिबीने गांजल्यामुळे) रानातून रडत रडत ती जंगलाबाहेर आली. एका शेतातील म्हातारीकडे तिने आसऱ्याची मागणी केली. परंतु तुळशी ब्राह्मणकन्या म्हणून म्हातारीने आसरा देण्यास नकार दिला. (पुष्प ३ – कथा ७७)

**ब्राह्मणपुत्रांची मुंज आवश्यक**

व्रतबंध-संस्कार वा मौंजीबंधन हा संस्कार ब्राह्मणात अत्यावश्यक मानला जातो. ज्ञानेश्वरादी भावंडांचे मुंजीसाठी झालेले हाल प्रसिद्धच आहेत. मुंजीच्या या आवश्यकतेचा उल्लेख एका लोककथेत आहे.

भिकंभट हा विद्वान पण कर्मदरिद्री ब्राह्मण होता. त्याला भैरवसिद्धाचा मंत्र ज्ञात होता. पण कर्म करावयाचे नाही अशा इच्छेने त्याचा कधी उपयोग करीत नसे. मुले मुंजीच्या वयाची झाली होती, पण जवळ पैसा नव्हता. एकदा गावातील

एका प्रयोजनाच्या वेळी त्याच्या मुलांना त्यांची मुंज झालेली नसल्यामुळे, पानावरून उठवले गेले. म्हणून भैरवसिद्धीच्या अनुष्ठानास तो तयार झाला. (पुष्प ३-कथा ९२)

**मराठी लोककथांत वैश्य, क्षत्रिय यांच्या कथांचा अभाव**

मराठी लोककथांत क्षत्रियांच्या कथा अभावानेच आढळतात. पराक्रमशून्यता हा लोककथांचा एक स्थायीभावच म्हणावा लागेल. राजेरजवाड्यांच्या कथांचे प्राबल्य असले तरीही त्यांच्या क्षात्रधर्मपालनाचे उल्लेख जवळजवळ नाहीतच. तसेच वाणी, व्यापारी अशी पात्रे मराठी लोककथांत वावरत असली तरी त्यांच्या वैश्यविषयक जीवनाची वैशिष्ट्ये कुठेच प्रकट होत नाहीत.

**पूर्वास्पृश्य महारांची अस्पृश्यता व कनिष्ठता**

पूर्वास्पृश्य महार जातीच्या अस्पृश्यतेचा दोष एका मराठी लोककथेत त्यांचा त्यांनाच लावलेला आहे.

देवाने जाती निर्माण करून कामे वाटून दिली. महारांची हुशारी पाहून त्यांना देवाने पालखीचा मान जाहीर केला व तो मानपान अर्पण करण्यासाठी दरबार भरविण्याचे ठरविले. महारांनी आळशीपणाने तबाखू चोळण्यात खूप वेळ घालविला. उशिरा दरबारात पोचले. महार गैरहजर असलेले पाहून देवाने पालखीचा मान पंडितांना देऊन टाकला. महारांना मात्र देवाकडून दारिद्र्याचा व अस्पृश्यतेचा कलंक दिला गेला. (म. लो. सा. माला पुष्प – कथा ५)

**पूर्वास्पृश्य महारांना वेदाधिकार नाही**

पूर्वास्पृश्य महारांना वेदाभ्यासाचा अधिकार नाही. हे बंधन पाळावेच लागते अशी एक समजूत एका मराठी लोककथेत प्रकट झाली आहे.

एका ब्राह्मण गुरूचे शिष्य गुरे चारताना संध्या पठण करीत. एका अनोळखी मुलाने शिष्यांना गुरे चारण्यात मदत करावी, त्यांचे वेदपाठ ऐकून वेद पाठ करावेत. त्याचे पठण ऐकून त्याला शिष्यांनी गुरुजींकडे नेले. गुरूजींनी त्याला शिष्य म्हणून आश्रमात ठेवून घेतले. त्याच्यावर गुरुजींची खूप मर्जी बसली. इतकी की, त्याला गुरूजींनी घरजावई करून घेतले. त्याला मुले झाली. परंतु ती मुले सतत हाडांशीच खेळत. त्यांना अनेक वेळा सांगूनही मुलांचा छंद कायमच राहिला. गुरूजींनी शिष्याची चौकशी करण्यास सुरूवात केली. शेवटी मी ब्राह्मण नसून महार आहे, अशी त्याची कबुली. ब्राह्मणाला तर खूप दुःख झालेच, पण त्याच्या मुलीलाही फारच वाईट वाटले. 'आपण सर्व पापी असून या पापाला देहांत प्रायश्चित्तच योग्य आहे' असा तिने दृढनिश्चय केला. सर्वजण झोपले असताना तिने झोपडी पेटवून दिली व स्वतःही त्यात उडी टाकली. सर्वजण जळून मृत्यू पावले. (पुष्प ३ – कथा २४)

महारांची कनिष्ठता, अस्पृश्यता व दारिद्र्य यांच्यामुळे बऱ्याच गावी त्यांची वस्ती वेगळी बसविली जात होती.

एका डोंगरी कोळी राजाने राजधानीचे तीन भाग पाडले. त्यात मांगवस्तीच्या भागाला 'मांगवाली' असे नाव दिले (पुष्प ३ – कथा २६)

**आंतरजातीय विवाह अमान्य**

समाजात चार वर्ण पडलेले असल्यामुळे, आणि त्यांच्यांतही श्रेष्ठकनिष्ठता मानली गेल्यामुळे आंतरजातीय स्तरावर एकत्र भोजन किंवा विवाहसंबंध यांचे स्वागत न होता त्यांचा निषेध केला जात आसे.

एका ब्राह्मणाला खणताना एक मोठा हंडा सापडला. त्याने हंडा उघडला तेव्हा त्याला त्यात विंचू दिसले. त्याने त्या विंचवांची माळ दाराला बांधली. सर्वांना जाता येता विंचू दिसत. एका चांभार स्त्रीला मात्र तेथे पुतळ्यांची माळ दिसली. त्या धनाच्या आशेने ब्राह्मणाने त्या स्त्रीशी विवाह केला. चांभार स्त्रीशी त्याने विवाह केल्यामुळे ब्राह्मणाला बहिष्कृत व्हावे लागले. (पुष्प ३ – कथा १५)

औंढ्याचे तुकाराम महाराज स्पर्शास्पर्श भेद मानीत नसत. कोणाच्याही हातचे खात म्हणून सनातनी मंडळींचा त्यांच्यावर राग होता. त्यांना एकदा भर पंक्तीतून उठवून लावले. एकदा देवळात कोंडून घातले. (म. लो. सा. माला पुष्प ३ कथा ८४)

**समाजगटांचे परस्परसंबंध**

समाजगटांच्या परस्परसबंधांचे मराठी लोककथांतून कसे दर्शन होते याचा विचार करण्यापूर्वी लोकसाहित्यातील समूहांतर्गत घटक (Esoteric facter in Folklore) आणि परकीय संबंधित घटक (Exoteric facter in Folklore) म्हणजे काय याचा परिचय करून घेणे आवश्यक आहे. एखादा लोकसमूह स्वत:ची अशी भिन्नता परंपरेने वर्षानुवर्षे टिकवून धरतो. त्यातील व्यक्ती एकाच समूहाच्या घटक असतात, आणि काही प्रथा, विधी, समजुती या त्यांच्या समूहापुरत्याच मर्यादित असतात. उदा.– डक्कलवार फक्त मातंग समाजालाच बसवपुराण सांगतात. इतरांना नाही. एखाद्या विशिष्ट जातीतच प्रचलित असणाऱ्या लोकसाहित्याच्या अशा भागाला समूहांतर्गत घटक ( Esoteric facter in Folklore ) असे म्हणतात. समाजातील इतर समूहांना बहुधा त्यांची माहिती नसतेच. उलट त्याबद्दल कुतूहल असते.

समाजात विविध गटसमूह किंवा जातिसमूह एकत्र राहतात. अनेक वर्षांच्या सहवासानंतर त्या समूहांची एकमेकांविषयी काही अनुकूलप्रतिकूल मते बनतात. ही मते त्यांच्या बोलण्याचालण्यातून तसेच लोकसाहित्यमाध्यमांतूनही प्रकट

होत असतात. लोककथा, लोकगीते, म्हणी, चुटके इत्यादी प्रकारांतून त्यांचा आविष्कार सहजपणे होत असतो लोकसाहित्यातील परकीय समूहासंबंधीच्या या घटकाला परकीयसंबंधित घटक (Exoteric facter in Folklore) असे म्हणतात.

मराठी लोककथांच्या संदर्भात या दोन्ही घटकांची तपासणी करावयास हवी. तथापि महाराष्ट्रातील एका विशिष्ट जातीचे लोकसाहित्य असे या लोककथांचे स्वरूप नसल्यामुळे समूहांतर्गत घटक पाहाणे योग्य ठरणार नाही. महाराष्ट्रातील प्रचलित धर्म आणि प्रमुख जातींचे परस्परसंबंध अशी त्यांची एकमेकांबद्दलची मते मात्र मधून मधून निश्चितपणे प्रकट झालेली आढळतात. तथापि या घटकांचे अस्तित्वही फार मोठे नाही.

या कथांत हिंदुधर्मीय दृष्टिकोन प्रबळ असल्यामुळे हिंदुधर्मीय तत्त्वज्ञानाची श्रेष्ठता वर्णन केलेली आढळते. अर्थात् इस्लामधर्माबाबतचे अनुकूल उल्लेखही आढळतात.

**अन्यधर्मीय समाजाशी संबंध**

फक्त इस्लामधर्मीय समाजाशी असलेल्या हिंदुधर्मीय लोकांच्या संबंधांचेच उल्लेख मराठी लोककथांत आढळतात हे पूर्वी नमूद केलेले आहेच. इस्लाम आणि हिंदु धर्म यांच्या तत्त्वज्ञानात मूलतःच खूप फरक आहे. या दोन धर्मातील लोकांचा परस्परसंघर्ष शतकानुशतके चालू होता आणि अद्यापही त्याचे अस्तित्व पूर्णतया नष्टप्राय झालेले नाही. या दोन्ही धर्मांतील विचारसरणींत जो भेद आहे त्याचे दर्शन काही मराठी लोककथांत होते. हिंदुधर्मीय दृष्टिकोनातून या कथा निर्माण झालेल्या असल्यामुळे स्वाभाविकच हिंदुधर्मीय तत्त्वज्ञानाची श्रेष्ठता त्यात वर्णिलेली दिसून येते. क्वचित इस्लाम धर्मीयांबाबतचे अनुकूल उल्लेखही आढळतात.

**इस्लाम देवाचे अस्तित्व मानीत नाहीत**

जितूरला मिस्किदखानाची मशीद – कट्टर इस्लामभक्त – धर्मविषयक ज्ञानाचा गर्व – इतर धर्म थोतांड मानी – दूरवर मैनावती देवीचे देऊळ – देवीची चेष्टा करी, 'मैनावती गयी जहन्नममे.' देवीला सामर्थ्य दाखविण्याचे आव्हान – क्षणार्धात वीज चमकली, जोरदार वादळ - नदीचा प्रवाह बदलून उलटा – देवीचे सामर्थ्य मान्य – नमाजाबरोबर शिवपूजा व्हावी म्हणून मशिदीशेजारी शिवलिंग स्थापन – मिस्किदखानाचा मिस्किदबुवा बनला – दोन संस्कृतींच्या संगमाचे प्रतीक बनला. (मराठवाड्यातील लोककथा – कथा २६)

एका मुसलमान राजाला कैलास लेण्याच्या शिवपिंडीत 'पुढचा जन्म डुकराचा येणार' असे दिसले. संतापाने लेणे जाळले. त्याला ताबडतोब डुकराचा जन्म प्राप्त. (पुष्प ३ – कथा ५५)

महंमद भाजीवाला -- जगात देव नाही असे ठाम मत-गणपतशी नेहमी वाद-महंमद एकदा म्हणाला, 'वेलाला गंगाफळाएवढी मोठी फळे व कवठासारख्या मोठ्या झाडाला लहान फळे ही देवाची केवढी चूक !' गणपत म्हणाला 'हे देवालाच विचार' – 'देव दाखव मला, विचारतो' - 'प्रत्येकाच्या हृदयात देव असतो' – महंमदला वाटले आपण वाद जिंकला – तेवढ्यात कवठाचे एक फळ डोक्यात पडले – गणपतने विचारले, 'कवठ गंगाफळाएवढे असते तर काय झाले असते ? -- महंमदाची कबुली, मी भगवानाची निंदा केली म्हणून मला शिक्षा झाली. आता कधी निंदा करणार नाही. भगवान कभी गलती नही करता ! (खानदेशी लोककथा – कथा ७)

गाईची हत्या आपल्या छायेखाली करू देण्यास वनातील सर्व झाडांचा एका यवनास विरोध – सागाच्या झाडाने अडवले नाही म्हणून वनदेवाचा त्याला शाप, 'पाने अपवित्र मानली जातील' – भोजनासाठी वापरणारा गोहत्येच्या पापाचा वाटेकरी होईल – गाईचे रक्त पानातून वाहील. (पुष्प ३ – कथा ३३)

**महाराष्ट्रीय समाजातील घटकांचे परस्परसंबंध**

**ब्राह्मण** :– देवदेवतांच्या खालोखाल ब्राह्मण वर्गाला मान मिळत असला, ब्राह्मण भोजन, ब्राह्मणांना दान, ब्राह्मणाची सेवा इत्यादी गोष्टी इष्ट मानल्या जात असल्या तरी सुद्धा ब्राह्मण समाजासबंधी काही प्रतिकूल मतेही मराठी लोककथांतून प्रकट होतात.

**दारिद्र्य** :– वेदाभ्यास करणारा, ज्ञानदान करणारा असा हा सरस्वतीपूजक ब्राह्मण अनेक मराठी लोककथांतून दरिद्री जीवन जगत असतो. लक्ष्मी आणि सरस्वती एकत्र नांदत नाहीत असा समज सर्वत्र रूढ आहे. ब्राह्मणांच्या दारिद्र्याचे प्रचुर चित्रण आढळते.

एका ब्राह्मणाकडे भयंकर दारिद्र्य असल्यामुळे त्याचे पत्नीशी कधी पटत नसे. शेवटी पत्नीने त्याला पैसे मिळविण्यासाठी घरातून बाहेर काढले. (अप्रकाशित कथा.)

एक गरीब ब्राह्मण, सूपभर मोती दान करणाऱ्या राजाकडे भिक्षेसाठी गेला. (सुंबरानं मांडील कथा १)

ब्राह्मण आणि त्याचा मुलगा यांनी मोठ्या युक्तीने एका शेतातील ऊस चोरले. या कथेत भिकभट्ट हे ब्राह्मणाचे नाव अगदी सार्थ झालेले आढळते. (पुष्प १ – कथा १९)

(पुष्प ३ – ९२) या कथेतील ब्राह्मणाचे नावही भिकंभट हेच असून

दारिद्र्यामुळे त्याला मुलांच्या मुंजी व मुलीचा विवाह करता येणे अवघड झालेले आहे.

एक गरीब ब्राह्मण द्रव्यार्जनासाठी परगावी गेला असता एका तेल्याकडे नोकरीस राहिला त्याने त्याच्या दाद्रिचाचे वर्णन पत्रातून घरी कळविले, अधांतरी गमन (घाण्यावर नोकरी), अखंडपात्री भोजन (एका पानावर), बहुतेक सर्व गाठीस, (वस्त्रे फाटली) - (मराठवाड्यातील लोककथा – कथा १३)

**लोभीपणा :–** लोभीपणा ही दारिद्र्याची एक अपरिहार्य परिणती आहे. लोभी ब्राह्मणांची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे दाखविता येतील.

धनप्राप्तीच्या आशेने गरीब ब्राह्मणाने विंचवाच्या जागी पुतळ्याची माळ दिसणाऱ्या चांभार स्त्रीशी विवाह केला, त्यापायी त्याला बहिष्कृत व्हावे लागले. (पुष्प ३ – कथा १४, १५)

म्हातारीने आपल्या मेलेल्या मुलीला दिलेले दागिने आणि त्याचा घोड्या–वरून पाठलाग करणाऱ्या तिच्या मुलाचे घोडे घेऊन ब्राह्मण मसणावर पळून गेला. (अप्रकाशीत कथा, दाते २ – कथा १३)

एक मूर्ख, लोभी ब्राह्मण होता. द्रव्यार्जनासाठी परगावी गेला असता एका श्रीमंताने त्याला भोजनासह भरपूर दक्षिणा दिली. तरी त्याचे समाधान नव्हते. दोघे एकदम प्रवासासाठी निघाले असता दक्षिणेतील एक पैसा पाण्यात पडला म्हणून ब्राह्मण हळहळला. फाटक्या उपरण्याचे दुःख व्यक्त केले. श्रीमंताने अंगा–वरचे नवे कोरे उपरणे दिले. श्रीमंत घोड्यावर होता. आता ब्राह्मण घोड्यासाठी हळहळू लागला. श्रीमंताला ब्राह्मणाच्या लोभीपणाची चीड येऊन त्याने त्याला गाढव दान केले. त्याचेही ब्राह्मणाला वैषम्य वाटलेले दिसले नाही. त्याचाही आनंद झाला, 'तुरू तुरू चालतं 'किती बर वाटतं.' नोकराने चाबूक मारताच मात्र गाढव उधळले व ब्राह्मणाने आपटी खाल्ली. (मराठवाड्यातील लोककथा – कथा १४)

**क्षत्रिय :–** समाजातील क्षत्रिय वर्ग, राजघराणे यांच्यांबद्दल काहीच उल्लेख आढळत नाही. राजघराण्याचे प्राबल्य आढळले तरी त्यातून क्षात्रधर्माचा स्फुल्लिंग अभावानेच तळपताना दिसतो. राजे वा राजपूत अनेक अवघड, कठीण कामे करतात तथापि त्यात स्वपराक्रमापेक्षा अदभुत मदतीचा वाटाच मोठा असतो.

**वैश्य :–** वैश्य वर्गाबाबतही फारशी मते मराठी लोककथांत प्रकट झालेली नाहीत. वाणी, व्यापारी यांना प्रतिनिधित्व असले तरी त्या कथा त्यांच्या व्यवसायाशीच निगडीत अशा नाहीत. त्यांतल्या त्यात सावकार या व्यवसायगटाविषयी काही

उल्लेख आढळतात. परंतु सावकार म्हणजे पैशांचा अतिलोभी, एकेका पैशासाठी जीव टाकणारा, लबाडी करणारा या पारंपरिक चित्राशी सुसंगत असा सावकार काही कथांत असला तरी दानशूर, परोपकारी सावकाराच्याही थोड्या कथा आहेत.

वनवासी राजपुत्र–राक्षसाशी लढाई –राजपुत्र जखमी – एका सावकाराकडे लाल ठेवून औषधपाणी – काही दिवसांनी पैसे परत करून लाल परत मागितला – सावकाराने पैसे घेतले परंतु लाल परत न देता त्याच्यावर चोरीचा आरोप ठेवून त्याला कैदेत टाकले – अवघड कामगिरीसाठी सावकाराला देशांतरास जाणे जरूर – राजपुत्राला सुरक्षिततेची ग्वाही देऊन मदतीसाठी नेले – राजपुत्राने पण जिंकून राजकन्या मिळविली तेव्हा धनी सावकाराची मागणी, 'राजकन्येचा विवाह तुझ्याशी होईल, पण ती माझी पत्नी होईल.' (पुष्प २ – कथा ५)

आपल्याकडे नोकरीस ठेवलेल्या नोकराला 'न रागावण्याची' अट घालून थोड्या पैशाच्या मोबदल्यात नोकराकडून जास्तीत जास्त काम करवून घेणारा सावकार. ( अप्रकाशित कथा )

'घोडा विष्ठेतून रुपये देतो' या ठकसेनाच्या बोलण्यावर विसंबून एका सावकाराने ३००० रुपये देऊन तो घोडा खरेदी केला. (वैजंयती, कथा १९)

**अन्य जाती –**

**सोनार** :– सोनार सोने चोरणारच हे सर्वांना मनोमन माहीतच असते. त्याच्या चौर्यकर्मकौशल्याची कथा फार रंजक आहे.

राजाचा सोनारावर 'सोने चोरतो' असा आरोप–सोनाराची वारंवार प्रामाणिकपणाची खात्री – राजाचा अविश्वास कायम – सोनार चिडला – राजाला आव्हान, 'खरा कारागीर, पहारा ठेवला तरी, आपले कसब दाखविणारच!, राजाचे आव्हान, 'पहाऱ्यातून तू सोने चोरून दाखविलेस तर तुला बक्षीस' – सोनारावर सक्त पहारा – एकदा सोनाराची बायको दारात येऊन चिडून ओरडली, 'ओली लाकडे पेटत नाहीत' सोनाराने आपली फुंकणी फेकली – नोकरांना हा प्रकार अगदी सहज व नैसर्गिक वाटला – दागिने बरोबर तोलून दिले – राजा प्रामाणिकपणावर खूष – बक्षीस देणार तेवढ्यात सोनाराने फुंकणीतून पळविलेले राजाचे सोने दाखविले – चातुर्याबद्दल इनाम. (पुष्प २ – कथा ११)

**४) चांभार :–** मराठी लोककथांत चांभाराची व्यक्तिरेखा नेहमी प्रतिकूल रंगात रंगविलेली आढळते. विशेषत: चांभार स्त्री अधिक दुष्ट रंगविलेली दिसते.

दहामळीच्या झाडाचे रहस्य चांभाराला समजले. राजकन्येशी विवाह – राजा–

कडून खूप दासदासी, सैन्य, सामान मिळाले. बिंग फुटू नये म्हणून चांभाराने दास-दासी, सैन्य परत पाठविले. (वैजयंती, कथा ४)

चांभार स्त्रीने विवाहित राजकन्येला विहिरीत ढकलून तिचा पोषाख आपण घातला व ती राणी म्हणून राजवाड्यात गेली. विहिरीतील राजकन्येची अनेक रूपांतरे – चांभार स्त्रीने तिच्या रूपांतराचा सुगावा लागताच त्याचा नाश करावा. ( अप्रकाशित कथा ) (पुष्प ४ – कथा ७)

**कुंभार, तेली, माळी** :– मराठी लोककथांत चांभार जातीस केवळ दुष्टच रंगविले आहे तर कुंभार, माळी, तेली यांना नेहमीच सुष्ट रंगविलेले आहे. विशेषत: परित्यक्त राजसंततीस आश्रय देण्याचे, जखमी राजसंततीस औषधपाणी करण्याचे काम हे लोक करताना आढळतात. परित्यक्त राजसंतती नेहमी गरिबाघरीच वाढावी असा लोककथांचा संकेत आढळतो.

– परित्यक्त राजसंततीला कुंभाराघरी आश्रय (पुष्प ४ – कथा २)
– सावत्र आईने राजपुत्रांना बगळे बनवून उडवून लावले व राजकन्या माळ्याघरी वाढली. (वैजयंती – कथा १७)
– थोटच्या सेतूराजाला माळ्याकडे आश्रय
– आक्काबाईच्या फेऱ्यामुळे संकटग्रस्त झालेल्या तुंड्याभुंड्या विक्रम राजाला एका तेल्याने सांभाळले. (सांगीवांगी – कथा १८)

**न्हावी** :– न्हाव्याच्या व्यक्तिरेखेबाबतची (बडबड्या, थापाड्या, तोंडपूजा, चुगलखोर) जी मते आढळतात ती पुढील कथांत दिसतात.

वनवासी झालेल्या आणि आपल्या आश्रयार्थ आलेल्या राजपुत्राला एका राजाने, न्हाव्याच्या चुगलखोरीमुळे राजपुत्राच्या सुन्दर पत्नीवर नजर ठेवून, खूप अवघड अवघड कामे करावयास सांगितली. (अप्रकाशित कथा)

वनवासात जन्मलेल्या राजपुत्राबरोबर लाजवंतीने विवाह केला. त्याला नोकरी देणाऱ्या राजाच्या न्हाव्याने राजाकडे वार्ता पोचवली, राजपुत्राने सुन्दर बायको आणली, तुम्हाला शोभेल ' राजाने राजपुत्राला सांगितले, ' राणीला सोनचाफ्याचे फूल आणून दे. ' कालवंतीची बहीण चाफावंती हिनेही फुले दिलीच, पण राजपुत्राशी विवाहही केला. राजपुत्राच्या दोन्ही सुन्दर बायकांची वार्ता न्हाव्याने राजाला सांगितली. १० तोंडांचा हत्ती देणाऱ्या हत्तीवंतीने (पहिल्या दोन्ही बायकांची बहीण) देखील राजपुत्राला वरले. आता राजाने राजपुत्राला सांगितले, ' श्राद्धासाठी माझ्या आईवडिलांना स्वर्गातून घेऊन ये. ' राजपुत्राने पत्नींच्या साह्याने भुयारातून स्वत:ची सुटका करून घेतली व राजाला सांगितले, ' तुमच्या

आईवडिलांची नखे केस वाढल्याने न्हाव्याला स्वर्गात पाठवावयास सांगितले आहे ' न्हावी जळून मेला. (म. लो. सा. माला; पुष्प १ – कथा ४४)

राजाच्या डोक्याला असलेल्या शिंगांचे गपित फोडण्यास त्यांचा न्हावीच कारणीभूत झाला (दाते; भाग २ - कथा ६)

एका जलमी राजामुळे राज्यातील प्रजा दु:खी होती. परंतु राजाने न्हाव्याला राज्याची हालचाल विचारल्यावर तो राजाला खूष करण्यासाठी खोटे सांगे की सर्वत्र आबादीआबाद आहे. राजा त्याला रोज ५ मोहरा बक्षीस देई. काही दिवसांनी न्हाव्याची खोड मोडण्यासाठी प्रधानाने त्याचे बक्षीस काढून घेण्यास सुरुवात केली. त्याबरोबर न्हाव्याचे उत्तर बदलले, ' दुनियेची परिस्थिती फार वाईट. ' (अप्रकाशित कथा)

**गुरव** :– गुरव हा देवळाची व्यवस्था पाहतो. देवापुढचे पैसे, देवाचा नैवेद्य याच्यावर त्याची उपजीविका चालते. त्यामुळे ' गुरवाचे लक्ष नैवेद्यावर ' अशी त्याची थट्टा केली जाते.

शिरवळला एका लग्नाचे वऱ्हाड एका मंदिरात उतरले. तेथील गुरवाने सांगितले, ' देवापुढे नैवेद्य ठेवा आणि मग झोपा. ' वऱ्हाडी मंडळींना वाटले की, गुरव लोभी आहे. म्हणून त्यांनी त्याची थट्टा केली ' गुरवाचे लक्ष नैवेद्यावर ' वास्तविक त्या वास्तूत एक पिशाचच होते. त्याला सकाळी स्नानास पाणी व खुंटीवर वस्त्र व नैवेद्य ठेवायची जुनी प्रथा होती. गुरव रोज संध्याकाळी ठेवायचा. गुरव वऱ्हाड्यांना सूचना देऊन गेला परंतु पाहुण्यांनी मनावर घेतले नाही. त्याचे फळ त्यांना भोगावे लागले. बिचाऱ्या गुरवाची मात्र उगीचच थट्टा झाली. (पुष्प ३– कथा ९९)

**सामाजिक समजुतीची मौलिकता**

हिंदूधर्मीय महाराष्ट्रीय समाजातील चातुर्वर्ण्यव्यवस्था, त्यातील वर्णांची श्रेष्ठकनिष्ठता, समाजगटांतील (भिन्नधर्मीय आणि समानधर्मीय) परस्परासंबंधीची मते आणि अन्य काही समजुती यांचा बोध मराठी लोककथांमधून कसा होतो हे आपण पाहिले. येथील चातुर्वर्ण्यवस्थेत आणि विशेषत: त्यांतील श्रेष्टकनिष्ठतेत समाजातील दुहीची अनेक बीजे आहेत हे तर मान्य करावेच लागेल; तथापि या दुहीची धार काहीशी बोथट करण्याचे काम लोककथांद्वारे केले जाते असे म्हणावयास हरकत नाही. मराठी लोककथांत चातुर्वर्ण्यव्यवस्थेची जबाबदारी प्रत्यक्ष परमेश्वरावरचं आणि पूर्वास्पृश्य महारांच्या अस्पृश्यतेची, दारिद्र्याची जबाबदारी त्यांची त्यांच्यावरच सोपवल्याने तक्रारीला फारसा वाव उरत नाही. ब्राह्मणवर्णाची श्रेष्ठता,

वेदाधिकार, याला समाजाची मान्यता सहजपणे मिळते. त्यांची सेवा केल्याने, त्यांना दान दिल्याने, भोजन घातल्याने परमेश्वराची नकळत सेवा घडते अशी दृढ भावना अन्य वर्णांत निर्माण होते. अर्थात बरेच वेळा केवळ ब्राह्मणकुलात जन्म मिळाल्याने अंगी विद्वत्ता नसूनही जी प्रतिष्ठा एखाद्याला मिळते त्याची असूया इतरांना वाटल्याशिवाय रहात नाही; आणि म्हणूनच ब्राह्मणाच्या दारिद्र्याचा, लोभीपणाचा उद्धार लोककथेतून करून त्या असूयेला जणू वाट करून दिली जाते. न्हावी समाजाच्या बडबड्या आणि विघ्नसंतोषी स्वभावामुळे जो उपद्रव होतो. त्याची चीड त्याची फजिती घडवून व्यक्त केली जाते.

निषेधपर सामाजिक समजुतींचे ( आंतरजातीय विवाह नको यांसारख्या ) दर्शन घडविणाऱ्या लोककथांचे साध्य दुहेरी स्वरूपाचे असते. एकीकडे या परंपरा-मान्य रूढीबद्दल काही समूहघटकांच्या मनात जी चीड असते. ती त्या रूढीचा भंग करून विचित्र प्रकार करावयाचा आणि दुसरीकडे त्या रूढीबद्दल त्याला काहीतरी शासन करून त्या रूढीच्या परंपरामान्यतेचे समर्थन करावयाचे त्यामुळे संस्कृतीत स्थिरता येण्यास मदत होते अशी समजूत दिसते.

**काही अन्य समजुती**

ज्यांना धार्मिक वा सामाजिक असे नेमके नाव देता येणार नाही अशाही काही समजुती समाजात रूढ असतात. अशा काही समजुतींचे दर्शनही मराठी लोक-कथांतून होते.

१) **दैवी शक्ती, दैवी दृष्टी** :- एखाद्याच्या शरिरावर दैवी खुणा असतात आणि एखाद्याला दैवी दृष्टी असते.

एका राजकन्येचा ( डाळिंबाराणी ) पण होता, 'पायावर पद्म असलेल्या माणसाशीच लग्न करीन ' पायावर पद्म असणाऱ्या राजपुत्राशीच तिचे लग्न झाले. ( अप्रकाशित – कथा )

पुरलेल्या हंड्यात ब्राह्मणाला व गावातील सर्वांना विंचू दिसत होते, परंतु एका चांभार स्त्रीला विंचवाच्या जागी मोहोरा दिसत होत्या. ( म. लो. सा माला; पुष्प ३ – १४, १५ )

एका ब्राह्मणाला पेटीत त्याच्या बायकोला नाग दिसला, तर ब्राह्मणाला त्यात धन दिसले. ( अप्रकाशित कथा )

२) **पायगुण** :- एखाद्याच्या पायगुणाने इष्ट गोष्टी घडतात वा एखाद्याच्या पायगुणाने अनिष्ट गोष्टी घडतात या समजुतीचे दर्शन मराठी लोककथांत घडते-

तुंड्याभुंड्या झालेल्या शनीवंतांच्या त्याला आश्रय देणाऱ्या तेल्याचा खूप फायदा झाला. ( एक होता राजा – कथा ७ )

ब्राह्मणावरील आक्काबाईचा फेरा स्वतःवर घेतल्याने विक्रमराजावर खूप संकटे आली. राज्य सोडावे लागले, चोर म्हणूण पकडला गेला व हातपाय तुटले. एका तेल्याने या अपंग राजाचा सांभाळ केला राजाच्या पायगुणाने तेल्याची खूप भरभराट झाली. ( सांगीवांगी – कथा )

महालक्ष्मीच्या व्रताचा भंग केल्यामुळे महालक्ष्मी देवीने पाटमाधवराणीला शाप दिला, त्यामुळे तिला वनवासात नेऊन सोडून देण्यात आले. हिंडत हिंडत ती एका नगरात गेली परंतु तिचा पायगुण असा होता की जेथे जेथे ती गेली तेथे तेथे काहीतरी अनिष्ट घडत होते. कुंभाराच्या आळीत गेली तर नव्या स्त्रीसाठी एकही कळस घडेना. तेथून मारून पिटून हाकलले. कासाराच्या आळीत एकही चुडा उतरेना सोनाराच्या आळीत एकही दागिना घडेना की साळ्याच्या आळीत एकही साडा उतरेना. सर्वत्र नवीन कोण आले याचा शोध घेतला जाई व ही सापडल्यावर वाईट पायगुणाची म्हणून तिला तेथून हाकलले जाई. ( कहाणी भाग २ – व्रतकथा १ )

३) **बळी दिल्याने शेत पिकते, पाणी लागते, संकट टळते :–** इच्छित प्राप्तीसाठी बळी देण्याची रूढी फार जुनी आहे. त्याचे पडसाद मराठी लोककथांत ऐकू येतात.

शेत चांगले पिकावे यासाठी शेतकऱ्याने शेतातील म्हसोबाला आपल्या पत्नीचा बळी दिला. (अप्रकाशित कथा ) (एक होता राजा – कथा २)

तळ्याला पाणी लागावे म्हणून, सासुसासऱ्यांनी सुनेला माहेरी पाठवून तिचा मुलगा जलदेवतेला बळी दिला. (म. लो. सा. माला पुष्प १ – कथा २०) (कहानी भाग २ – कथा ९)

एका राजपुत्राने अन्नछत्र चालविले होते. पैशासाठी बायकोला गहाण ठेवले. त्या दुःखाने ती मरण पावली. त्यालाही फारच दुःख झाले. त्याने आता एका जहाजावर नोकरी धरली. जहाज समुद्रात अडले. जहाज निघावे म्हणून कप्तानाने राजपुत्राचा बळी दिला. (अप्रकाशित कथा )

४) **प्रत्येकाचे स्वत.चे नशीब वेगळे असते :–** प्रत्येक जण जन्माला येताना त्याचे स्वतःचे नशीब घेऊन जन्माला येतो. त्यामुळे प्रत्येकाचे नशीब स्वतंत्र असते, वेगळे असते. त्याच्या आयुष्यात जे काय घडते ते त्याच्या स्वतःच्या नशिबावर अवलंबून असते.

स्वतःच्या नशिबाचा सार्थ अभिमान बाळगून ते सिद्ध करून दाखविणाऱ्या

मानी राजकन्यांच्या कथा या संदर्भात महत्त्वाच्या आहेत. (सांगीवांगी – कथा ८), (दाते भाग १ – कथा १०) (सुंबरान मांडीलं – कथा २१)
प्रत्येक कथेतील नायिकेने आपले वेगळे नशीब सिद्ध करून दाखविलेले आहे.

या रूढ समजुतीला धक्का देणारी एक अपवादात्मक कथाही आढळली ती अशी –

दोन भाऊ एकत्र राहात होते. दोन्ही भावांच्या मिळकतीत खूप फरक होता. एक होता वकील तर दुसरा भिक्षुक. वकील भावाला खूप पैसे मिळत, त्यामानाने धाकट्याची प्राप्ती पुरेशी परंतु बेताची असे. वडील भावजय सारखी कुरकुर करीत असे. शेवटी धाकटा भाऊ वेगळा राहू लागला. परंतु गंमत अशी की दोघे वेगळे राहू लागल्यापासून मोठ्याची मिळकत एकदम बंद झाली, तथापि धाकट्याची परिस्थिती मात्र पूर्ववतच होती. धाकट्या भावाच्या नशिबाने मोठा भाऊ खात असल्याने, जोपर्यन्त ते एकत्र होते तेव्हा मोठ्याचे दिवसही चांगले जात होते. (पुष्प १ – कथा ३७)

समाजात रूढ असणाऱ्या अशा समजुतींतील काही समजुती माणसाला नक्कीच उपद्रवकारक ठरू शकतात. लोकमानसावरील पायगुण कल्पनेची पकड एखाद्या व्यक्तीला अपशकुनी, पांढऱ्या पायाची ठरवून हेटाळणीचे लक्ष बनवू शकते तर बळी देण्याची प्रथा एखाद्या निरापराध माणसाचा प्राण हरण करू शकते, अर्थात हळूहळू, विज्ञानाच्या प्रगतीबरोबर माणसाचे मन अधिक बुद्धिनिष्ठ बनत चालल्याने अशा समजुतींचा पगडा कमी होत चालल्याचे आशादायक चित्र दिसू लागले आहे हे खरे. परंतु तरीही, बळीसारख्या प्रथेला कायद्यानेच बंदी आलेली असली तरीही, अनागर व विशेषत: वन्य लोकमानसातून अशा समजुतींचे उच्चाटन पूर्णतया झालेले नाही. तोपर्यंत अशा समजुतींचे पडसाद लोककथांतून असे अधून मधून उमटताना दिसणारच !

**मराठी लोककथांतील समाजाचे दुसरे वैशिष्टय – पुरूषप्रधान संस्कृती आणि अविभक्त कुटुंबपध्दती**

मराठी लोकथांत चातुर्वर्ण्य व्यवस्था, त्यातील वर्णांची श्रेष्ठकनिष्ठता, तदनुषंगाने उत्पन्न होणाऱ्या समजुती व समाजगटातील परस्परसंबंधित मते कशी प्रकट होतात हे पाहिल्यानंतर मराठी लोककथांत दिसून येणाऱ्या दुसऱ्या वैशिष्टयाचा परामर्श घेणे आवश्यक आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून सामाजिक वातावरणाची अधिक ओळख होते तर पुरुषप्रधान संस्कृती आणि अविभक्त कुटुंबपध्दती या दुसऱ्या वैशिष्टयातून कौटुंबिक वातावरणाचा अधिक परिचय घडून येतो. प्राचीन काळापासून मनूने स्त्रीस्वातंत्र्यावर घातलेला दंडक अजूनही दूर झालेला नाही. महारा–

ष्ट्रात अद्यापही बऱ्याच प्रमाणात प्रचलित असणाऱ्या पुरुषप्रधान संस्कृतीच्या खुणा मराठी लोककथांत ठायीठायी आढळतात. समाजात आणि कुटुंबात पुरुषांना प्राधान्य व स्त्रियांना गौणत्व दिलेले आढळते.

**मराठी लोककथांतील पुरुषांचे बहुपत्नीकत्व**

पुरुषांना मिळणारी बहुपत्नीकत्वाची सवलत ही पुरुषप्रधान संस्कृतीची अपरिहार्य परिणती आहे. हिंदू समाजातील पुरुषांचा हा अधिकार आज कायद्याने हिरावला गेलेला असला तरी शतकानुशतके तो चालूच होता आणि आजही क्वचित त्याची उदाहरणे आढळतातच. मराठी लोककथांत बहुपत्नीकत्वाची उदाहरणे प्रचुर प्रमाणात आढळून येतात. ब्रह्मदेव, कृष्ण, मल्हारी, शंकर त्यांच्यासारखे देव,अनेक राजे आणि शेतकरी, सावकार यांच्यासारखी सामान्य माणसेही बहुपत्नीक असताना दिसतात. पुरुषांना जसे बहुपत्नीकत्वाचे स्वातंत्र्य मिळाले तसे, द्रौपदीचा अपवाद वगळता, बहुपतित्वाचे स्वातंत्र्य स्त्रीला मात्र कधीही मिळालेले नाही. मराठी लोककथांतही अशी स्त्री आढळत नाही. बहुपत्नीकत्वाचे स्वातंत्र्य उपभोगूनही व्यभिचारी प्रवृत्तीचे पुरुष मराठी लोककथांत अधिक प्रमाणात आढळतात. त्यांत व्यभिचारी स्त्रिया चित्रित केलेल्या असल्या तरी तुलनेने त्यांचे प्रमाण बरेच कमी आहे.

**मराठी लोककथांतील स्त्रीच्या नशिबी आजन्म गौण भूमिका**

कुटुंबातील पुरुषप्रधानतेचा फटका स्त्रीच्या जन्मापासूनच तिला सोसावा लागतो. परंपरेने स्त्रियांना जे गौणत्वाचे स्थान दिलेले आहे त्याचे पडसाद मराठी लोककथांत सतत उमटलेले दिसतात. वास्तविक कन्यादानाचे पुण्य परंपरेने फार श्रेष्ठ मानलेले आहे आणि या पुण्याचा उल्लेखही मराठी लोककथांत आढळतो.

उदा. :- अत्यंत धर्मप्रवण राजा – रोज सव्वा मणाचा दानधर्म करी – तथापि त्याचा राजवाडा पुरा होत आला की काही भाग कोसळे – बंडू नावाच्या तरुणाने धर्मदेवतेला, त्याचे रहस्य विचारून उपाय सांगण्याची विनंती केली – धर्माने सांगितले, 'कन्यादान केल्याशिवाय राजाचा राजवाडा पूर्ण होणार नाही', (एक होता राजा – कथा ९) त्या कथेचे तात्पर्य असे की रोजच्या सव्वा मण दानापेक्षा कन्यादानाचे पुण्य मोठे आहे. एवढे मोठे पुण्य संपादन करण्याची संधी आयुष्यात कन्याप्राप्तीशिवाय कशी होणार? तथापि मुलगी व्हावी म्हणून कोणी नवस केला आहे, तप केले आहे असा प्रकार एकाही कथेत आढळत नाही. त्या गोष्टी फक्त पुण्यप्राप्तीसाठीच होतात. संसारात कन्येचे आगमन हे केवळ नैसर्गिकपणेच होते.

कन्याजन्मासाठी नवससायास होत नाहीतच, शिवाय कन्याजन्माचे स्वागतही होत नाही. पुत्रप्राप्ती आणि कन्याप्राप्ती यांतील फरक मराठी लोककथांत अगदी ठळकपणाने व्यक्त केलेला आढळतो. पत्नी गर्भवती असताना पतीला देशांतरास जावे लागले तर आपल्याला पुत्र झाला की कन्या हे त्याला कसे कळणार ? त्यासाठी त्याला एक संकेत सांगून ठेवलेला असतो – 'मुलगा झाला तर तो जेथे असेल तेथे रत्नांचा पाऊस पडेल, मुलगी झाली तर साधा पाऊस पडेल' (अप्रकाशित कथा) असाच प्रकार (सासुरवास – कथा ५) या कथेत आढळतो. नीळकंठ राजा पित्याच्या आज्ञेवरून १२ वर्षे वंजेला गेल्यावरही गरूड पक्ष्यांच्या साहृयाने पत्नीला भेटून जाई. पत्नी सुलकावती गर्भवती झाली. तिला पुत्रप्राप्ती झाल्यावर वंजेत नीळकंठ राजावर मोतीपोवळ्यांचा पाऊस पडला.

**मराठी लोककथांतील पुरुषांचा स्त्रीविषक दृष्टिकोण**

जन्मापासूनच स्त्रीच्या वाट्याला असे गौणत्व येते त्याचा परिणाम तिला सतत भोगावा लागतो. तिच्या बाल्यावस्थेपासून ते प्रौढत्वापर्यंत तिच्या भावनांची कदर सहसा कुणाकडूनच होत नाही. तिच्या आयुष्याशी नातेसंबंधाने बांधलेले पुरुषही तिच्याशी उदारपणाने वागत नाहीत आणि परपुरुषही बहुधा तिच्याकडे एक उपभोग्य वस्तू या दृष्टीनेच पाहतात पुरुषांच्या या स्त्रीविषयक अनुदार दृष्टिकोनाची अनेक उदाहरणे उद्धृत करता येतील.

**मराठी लोककथांतील पित्याची कन्येबाबतची अनुदारता**

मुलगी जन्माला येते आणि पुरूषांपैकी प्रथमतः जन्मदात्या पित्याशी तिचे आयुष्य जोडले जाते तथापि मुलगी झाल्याचा आनंद कुटुंबाला फारसा होत नाही याचा उल्लेख केलेला आहेच. मराठी लोककथांतील पात्रांचे भूमिकास्वरूप विशद करताना राजपित्याची राजकन्येबाबतची भूमिका वर्णन केलेली आहे. राजकन्येला पणाला लावून तो आपली कर्तृत्वशून्यता, पराक्रमशून्यता लपवतो. कधी कधी अगदी क्षुल्लक पण देखील लावतो, त्याच्या अहंकाराला आव्हान देणाऱ्या राजकन्येसाठी तो रोगी, दरिद्री पती शोधून काढतो. राजपित्याप्रमाणेच सामान्य माणसाची पित्याची भूमिकाही फारशी वेगळी वा उदार आढळत नाही

उदा. – तुळशी ही गरीब ब्राह्मणाची मुलगी – मुलगी मोठी झाल्यावर भिक्षा अपुरी म्हणून पित्याचा रागराग – तिच्या पत्रिकेवरून कळले की मुलीच्या नशिबी ब्राह्मण पती नाही - मुलीला ना रंग, ना रूप, बापाजवळ पैसा नाही – मुलीला रानात सोडून द्यावे अशी ब्राह्मणाची इच्छा – पत्नी राजी नाही – पत्नीची इच्छा डावलून त्याने तुळशीला रानात नेऊन सोडून दिले. (पुष्प ३ - कथा ७१)

पित्याबरोबर काशीयात्रा करण्याची विदुफाची इच्छा पित्याला अमान्य. (पुष्प ३ – कथा ४३)

**भावाचा बहीणविषयक बेजबाबदारपणा** – भाऊबहीण हे अत्यंत पवित्र व जिव्हाळ्याचे नाते. लहानपणापासून दोघे एकत्र वाढतात, खेळतात. भाऊ मोठा असेल तर त्याचा विवाह होतो. त्याच्या विवाहानंतर मात्र चित्र पालटू लागते. भावाचे प्रेम टिकून असले तरी भावजयीला प्रेम वाटेलच असे नाही, किंबहुना वाटत नाहीच. त्यामुळे पत्नीप्रेमाची सरशी होऊन बहिणीला पीडा होऊ लागते. मराठी लोककथांत अशी उदाहरणे जास्त आढळतात. अर्थात प्रत्येक वेळी भावजयच कारणीभूत असते असे नाही. अन्य काही प्रेरणाही भावाच्या बहिणीबद्दलच्या दुष्टतेच्या वा बेजबाबदारपणाच्या मागे असलेली आढळतात.
उदा – भाऊ, भावजय आणि बहीण यांचा एकत्र प्रवास – वाटेत नदी पार करणे जरूर – पत्नीला खांद्यावर घेतले, बहिणीचा हात धरला – पाण्यात दोघींना सावरणे कठीण – बहिणीचा हात सोडून देऊन पत्नीसह पैलतीरी पोचला – बहीण बुडून मरण पावली (दाते १ – कथा १६)

गोविंदाची बाळूला ही लाडकी बहीण – विहीर खणताना पाणी लागेना – गोसाव्याचा सल्ला 'बाळूलाचा बळी दे' – बंधुप्रेमावर लोभाचा विजय – बहिणीचा बळी दिला. (सासुरवास – कथा ३)

गर्भवती सुलकावतीला बदफैली ठरवून सासरच्या लोकांनी हाकलून दिले– माहेरी आली – चार दिवस सुखाचे – काही दिवसांनी सर्वांना सत्य कळले – गर्भवती बहिणीला हाकलून कसे द्यावे असे भावांना वाटले – परंतु त्यांच्या बायकांची स्पष्टोक्ती, 'कुळाला कलंक लागतो अरण्यात नेऊन ठार करा' – भावांना पटले – तिला गाडीत घालून एक भाऊ निघाला – गाडीत सुलकावती निद्रिस्त – भावाचा विचार, 'चांगली झोपली आहे, येथेच डोक्यात दगड घाला.' (सासुरवास – कथा ५)

**सासरच्या पुरुषांचा स्त्रीला होणारा जाच** – पित्याची व भावाची मर्जी सांभाळीत आणि त्यामुळे उत्पन्न होणारी सुखदुःखे मनाशी वागवीत मुलगी मोठी होऊन, विवाह होऊन सासरी येते. तिचा संसार सुरू होतो. तिच्या या हक्काच्या घरी सासरा, दीर, पती या रूपाने तिचे आयुष्य पुरुषांशी जोडले जाते. या नवीन वातावरणातही तिला बहुधा मोकळा श्वास क्वचितच घ्यावयास मिळतो. सासुरवासाचे दडपण सतत तिला वेढून राहते.

सासऱ्याना 'मामा' किंवा 'मामंजी' असे संबोधण्याचा रिवाज सुनेला त्यांच्याकडून माया मिळावी अशीच अपेक्षा व्यक्त करतो. परंतु मराठी लोककथा–

तील असा प्रेमळ सासरा अपवादानेच आढळतो. अर्थात सुनेला होणाऱ्या सासुरवासात कधीकधी तो स्वतःच सहभागी झालेला आढळतो. तर कधीकधी कुटुंबातील अन्य व्यक्तींकडून (विशेषत: सासूकडून) सुनेला जो सासुरवास होतो त्याला विरोध न करता त्या सासुरवासाला जणु मूक संमती देतो. उदा. सुनेने शेरभर नाचणे दळताना पीठ खाल्ले अशी शंका येऊन सासूने सुनेच्या डोक्यात पिठाचे भांडे घातले. सून जबर जखमी झाली तरी सासरा गप्प बसला. (पुष्प १–कथा १२)

सुनेची आई खूप आजारी – भाऊ माहेरी न्यायला आला – सासूने कारल्याचा वेल लावल्यापासून कडू भाजी खाईपर्यंत सुनेला डांबून ठेवले – एवढे होऊनही परवानगीसाठी सासऱ्याकडे पाठवले – पत्नीची अनिच्छा स्पष्ट दिसत होतीच – स्वत:वर बोल येऊ नये म्हणून सासऱ्याची आज्ञा, 'मला काय विचारतेस, मोठ्या दिराला विचार'. (सासुरवास – कथा २)

सावकाराची गुरूवर अनन्य भक्ती – गुरुची सावकाराच्या सुनेवर दृष्टी – ती बधत नाही हे पाहताच तिच्याविरूद्ध सासऱ्याचे मन कलुषित केले – तिला बदफैली ठरवले – सासऱ्याने सुनेला रानात नेऊन सोडण्याचे ठरवून ही कामगिरी गुरूवरच सोपवली. (अप्रकाशित कथा)

वडिलांच्या श्राद्धादिवशी ब्राम्हणाची सून प्रसुत होऊन मूल मरून जाई – श्राद्धाचे ब्राम्हण विन्मुख परत जात – सात वेळा हा प्रकार – सासऱ्याने सुनेला मृत मुलासह बाहेर काढले. (पुष्प १ – कथा ४) (मराठवाड्यातील लोककथा - कथा ४)

सुनेचे जीवन असह्य होण्यास इतरांना मदत करणारे आणि प्रसंगी स्वतःच तिचे जीवन उध्वस्त करणारे सासऱ्यांचे हे मराठी लोककथांतील नमुने त्याच्या कुटुंबप्रमुखत्वाच्या स्थानाला शोभा देणारे नाहीत.

सासऱ्याप्रमाणेच दिराचे (बहुधा मोठ्या) घरातील वर्चस्व सासुरवासिनीला सतत जाणवत असते. मराठी लोककथांत दीर भावजयीच्या कौटुंबिक संबंधांच्या कथा नाहीतच असे म्हटले तरी चालेल. दिराची भूमिका सुनेला सासुरवास करणाऱ्या 'अनेकांपैकी एक' अशीच आहे. तिला माहेरी जायला सासूसासरे परवानगी देत नाहीत तसाच दीरही देत नाही किंवा तिला साप चावला यावर इतरांप्रमाणे तोही विश्वास ठेवत नाही.

**मराठी लोककथांतील पतीचे वैचित्र्यपूर्ण चित्रण**

पती हाच स्त्रीच्या आयुष्यातील खरा महत्वाचा पुरुष त्याच्याच गुणावगुणांवर तिच्या आयुष्यातील सुखदुःखाची श्रेणी ठरते. पतिपत्नीच्या परस्परप्रेमावर, सहकार्यावर आणि सामंजस्यावर संसारसुख अवलंबून असते. मराठी लोककथांतील

पतीच्या चित्रणाचे स्वरूप पाहताना असे निश्चितपणे म्हणता येते की, पतीच्या स्वभावाचे विविध नमुने त्यात चित्रित केले असून प्रेमळ किंवा सद्गुणी पतींच्या तुलनेने दुर्गुणी, संशयी पतींची संख्या अधिक आहे. आपल्या स्वभावामुळे पत्नीला उपद्रव देणारांचे प्राबल्य आहे. पतीच्या अशा स्वभावाच्या विविध तऱ्हा दिसून येतात.

पतीची आंधळी मातृपितृभक्ती हा एक प्रकार होय. घरातील इतर सर्व माणसे जाच करीत असली तरी पतिप्रेम मिळत असेल तर तो जाच पत्नीला सहज वाटू शकतो. परंतु बरेच वेळा पतीही जाच करणाऱ्यात सामील होतो, किंवा निदान तटस्थ वृत्ती स्वीकारतो. पीठ चोरून खाल्ल्याचा आरोप करून सासूने सुनेच्या डोक्यात भांडे घातले. (पुष्प १ – कथा १२) किंवा सुनेला माहेरी पाठवून तिचा मुलगा बळी दिला, (पुष्प १ – कथा २०) तरी पतीला विरोध करण्याचे धाडस होत नाही.

बहुपत्नीक पतीची पत्नींत दुजाभाव करण्याची वृत्ती गृहकलहाचे मोठे कारण ठरते. मराठी लोककथांतील बहुपत्नीक पती हे बहुश: राजपदी विराजमान झालेले आहेत. त्यांच्या दुजाभावाचा निर्देश तत्संबंधीच्या प्रकरणात केलेला आहेच. सामान्य बहुपत्नीक माणूसही असा दुजाभाव करताना आढळतो.
उदा. सावकाराला दोन बायका -- एक आवडती, दुसरी नावडती – नावडतीला रोज फक्त निठवभर दाणे देण्यात येत. तेवढ्यावरच तिला भागवावे लागायचे. (सुंवरान मांडिलं – कथा १४)

उपरोक्त दोन सर्वसामान्य कारणांव्यतिरिक्त पतीच्या अंगी असणारे काही वैयक्तिक स्वभावदोष पत्नीच्या पीडनास कारणीभूत होतात. जसे –

**संशयी पती** – पती घरात नसताना पतीचा मित्र पाहुणा आला – पाहुण्याला वाढताना तिचा हात गरम भाताने भाजला म्हणून फुंकर घालण्यासाठी मित्राने तिचा हात धरला तेवढ्यात परत आलेल्या पतीने पाहिले – मित्राने हात धरला तरी पत्नी प्रतिकार करीत नाही यामुळे संशयात्मा जागृत - मित्र गेल्यावर पत्नीशी भांडण करून घरातून निघून गेला. (पुष्प २ – कथा २)

राजाला राणीविषयी संशय – तिच्या हातचे खात नसे (पुष्प ४ – कथा ५) अशा स्वरूपाच्या आणखीही कथा आहेत.

**हट्टी पती** – पोरक्या पत्नीजवळ शेतकऱ्याचा हट्ट, तुझे माहेर हरवले – तिने पुष्कळ समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा हेका कायमच – तेव्हा तिने त्याच्या-सह बैलगाडीत बसून दिशाहीन भटकंती सुरू केली. ( मराठवाड्यातील लोककथा – कथा २८)

राजाचे भलेमोठे शेत – एका दिवसात नांगरून दाखवील त्याला अर्धे राज्य देण्याचा राजाचा पण – हरणारास शिरच्छेदाची शिक्षा – बलदेव कुंभाराची प्रयत्न करण्याची इच्छा – राजाचा पण अघोरी व नक्कीच शक्तीबाहेरचा म्हणून त्याची पत्नी मृत्तिका हिचा विरोध – बलदेवाने हट्ट पुरा केलाच – शक्ती अपुरी त्यामुळे पण अपूर्ण – शिरच्छेद झाला. ( सांगीवांगी – कथा १३ ).

**संतापी पती** :– अत्यंत चिक्कू ब्राह्मण, धन, धान्य पुरून ठेवी – त्याला खूप तहान लागली म्हणून बायकोने साखर घालून पाणी पिण्यास दिले – पिण्याच्या पाण्यात साखर घालून ती वाया घालवली म्हणून संतापाने पाणी स्वतः न पिता एका बिळात ओतून दिले. ( अप्रकाशित कथा )

**निर्दय पती** :– शेतात चांगले पीक यावे म्हणून पत्नीचा बळी देणारा निर्दय पती. ( एक होता राजा – कथा २ ) ( अप्रकाशित कथा )

**कपटी पती** :– बानूचे मल्हारीला पत्र, 'भेटायला यावे' – मल्हारी तिच्या भेटीस उतावळा – पण प्रथम पत्नी म्हाळसा हिला काय सांगायाचे हा पेच – कपट – योजना तयार – म्हाळसेशी सारीपाटाचा खेळ मांडला – 'मी हरलो तर १२ वर्षे वनवासास जाईन' असे म्हाळसास आश्वासन – डावात मुद्दाम हार पत्करून वनवासाच्या मिषाने बानूकडे प्रयाण – ( सुंवरान मांडील – कथा २१ ).

मराठी लोककथांतील पतीच्या स्वभावातील उपद्रवी कारणांची यादी आणखीही वाढवणे शक्य आहे. आळशीपणा, अहंमन्यता, तऱ्हेवाईकपणा अशा आणखी काही कारणांनीही तो पत्नीचे जीवन दुःखी करतो

**मराठी लोककथांमधील कृतघ्न मुले** :– सासरची माणसे आणि पती यांच्या स्वभावातील गुणावगुणांशी तोंड देत स्त्रीचा संसार चालूच असतो. कालांतराने ती पुत्रवती होते. तिच्या अंतरीच्या अतृप्त आशा आता मुलावर एकवटलेल्या असतात. तो गुणी निपजावा म्हणून ती त्याच्यावर सुसंस्कार करते, अपार कष्ट करून त्याला वाढवते. परंतु तिच्या या कष्टांची प्रेमाची जाणीव मुले ठेवतीलच याची खात्री कोणी द्यावी ? दोन पिढ्यांचा संघर्ष ही देखील परंपरेने चालत आलेली वस्तुस्थिती आहे. केविलवाणी सून हा जसा अविभक्त कुटुंबपद्धतीचा एक अपरिहार्य पैलू आहे. तसाच दुर्दैवी वृद्ध माणसे हाही एक दुसरा पैलू आहे. मातृच्छळाच्या ( किंबहुना मातृपितृछळाच्याही ) या कथा बहुधा विवाहित, बाईलबुद्धी आणि लोभी स्वभावाच्या पुत्रांचे चित्रण करतात. सूनसासू संघर्षात मुलांच्या मातृप्रेमाची किंमत शून्य होते, किंवा स्वार्थापुढे मातृप्रेम मातीमोल ठरते. मराठी लोककथा अशा कृतघ्न मुलांच्या चित्रणाबाबत अपवाद नाही.

उदा. – हरिभक्त म्हातारीला पंढरपूरच्या यात्रेची ओढ – पोटच्या पोरांना पैसे मागितले – मुलांनी पैसे दिले नाहीत. ( सुंवरानं मांडीलं – कथा ३ ).

देवी लक्ष्मीने सोनुबाईला दिलेल्या कवडीमुळे घरात उर्जितावस्थेमुळे मोती व हिरा - वृद्धापकाळी आईवडिलांना नीट वागवितात – स्वतंत्र बिऱ्हाडे – आईवडील रोज खोलीत तेच ते पैसे पुन्हापुन्हा वाजवू लागले - मुलांना संशय त्यांच्याजवळ खूप संपत्ती – लोभाने दोन्ही सुनांमुळे मायेचे नाटक वठवू लागले – कवडीवर दरवर्षी धनत्रयोदशीला पहिले कापड न काढता, नवीन कापड गुंडाळावे लागे – त्यामुळे कापडाचे भलेमोठे गाठोडे तयार झालेले – दोन्ही मुलांना वाटे त्यात खूप मोठे डबोले – त्यासाठी मायेचे नाटक चालूच – आईने मरताना निक्षून सांगितले, ' गाठोडे उलगडू नका – त्यातच हित आहे. ' मुलासुनांनी गाठोडे उलगडले – आत फक्त एक कच्ची कवडी – पुन्हा दारिद्र्य आले. (खानदेशी लोककथा – कथा ४ ).

ध्यानसिंग डाकूचा दरोडा येणार अशी त्याची पूर्वसूचना – बायजाबाईची चारी मुले संपत्तीसह, मुलाबाळांसह जवळच्या डोंगरावर निघाली – प्रत्येकाच्या पाठीशी गाठोड, हाताशी एक पोर, खांद्यावर एक पोर – म्हातारीला पाठीवरून तर राहो, परंतु हाताशी धरून न्यायलाही कोणाचा हात रिकामा नाही – तिला एकटीला टाकून गेले – म्हातारीने युक्तीने ध्यानसिंगला पकडून दिले म्हणून राजाची बक्षीस देण्याची इच्छा – त्या बक्षिसावर मात्र मुलांचा डोळा – म्हातारीने ते बक्षीस ध्यानसिंगाला प्रत्यक्ष पकडणाऱ्या सेनापतीला देऊ करताच मुलांचा संताप. ( खानदेशी लोककथा – कथा ६ )

**मराठी लोककथांतील स्त्रीचा कुटुंबातील अन्य स्त्रीविषक दृष्टिकोन.**

मराठी लोककथांतील स्त्रीची कन्या, बहीण, पत्नी आणि आई म्हणून बव्हंशी कशी उपेक्षा होते याचे चित्र वरील सर्व उदाहरणांवरून स्पष्ट व्हावयास हरकत नाही. मराठी लोककथांतून प्रकट होणारा कुटुंबातील पुरुषांचा दृष्टिकोन हा या कथांतून दिसून येणाऱ्या कौटुंबिक चित्राचा एक विभाग झाला. कुटुंबातील स्त्रियांची परस्परदृष्टी व तदनुसार त्यांचे एकमेकींशी होणारे वर्तन हा या कौटुंबिक चित्राचा दुसरा विभाग मानावा लागेल, आणि तोही अत्यंत महत्त्वाचा आहे.

**मराठी लोककथांतील वत्सल कन्यामाता :–** समाजपरंपरेने स्त्रीला गौणत्व दिले गेले असल्यामुळे मातृत्वाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या कोणत्याही स्त्रीला आपण 'पुत्रवती' व्हावे असेच वाटणे स्वाभाविक आहे. तथापि कन्याप्राप्तीचा योग अनेक स्त्रियांच्या जीवनात येतोच. कन्याप्राप्तीसाठी आई उत्सुकता दाखवीत नसली

तरी मुलगी झाली तर दुःखी होणारी आई मराठी लोककथेत रंगविलेली दिसत नाही. तिचे मातृत्व जागृतच असते. त्यामुळे आई-मुलगी संबंध बव्हंशी प्रेम आणि वात्सल्याचेच दर्शन घडवितो.

उदा. – काळ्यासावळ्या आणि ठेंगण्या बांध्याच्या तुळशीवर पित्याचा राग - परंतु आईचे खूप प्रेम – दारिद्र्यामुळे भिक्षा मागून निर्वाह – रोज तीन मुठी भिक्षा मिळे – तीन वाटे करून खात – वाढत्या वयानुसार तुळशीला तिचा वाटा पुरेना म्हणून आई स्वतःचा वाटा देई – तुळशीला रानात नेऊन सोडून द्यावे असा पित्याचा आग्रह – मातृहृदय तुळशीच्या पित्याला सतत अडवी. (पुष्प ३ – कथा ७७)

म्हातारीची मुलीवर फार माया – मुलगी मरण पावली – मुलगी मसणात राहते असा तिचा विश्वास 'मसणात राहतो' अशी थाप मारणाऱ्या मसणभटाजवळ मृत मुलीसाठी तिचे दागिने पाठवून दिले. (दात २ – कथा ९) (अप्रकाशित कथा)

**मराठी लोककथांतील प्रेमळ कन्या :–** आई मुलीवर वात्सल्याचा वर्षाव करते त्यामुळे मुलीलाही आईबद्दल प्रेम वाटणे स्वाभाविक आहे. मातृप्रेमाची जाणीव मुलापेक्षा मुलीलाच जास्त असते ही वस्तुस्थिती आहे. आपल्या प्रेमळ व आज्ञाधारक वागणुकीने जणु ती मातृप्रेमाची परतफेड करू पाहते. मराठी लोककथांत कन्येच्या मातृप्रेमाचे नमुने आढळतात.

उदा – आई व मुलगी योगायोगाने एकाच वेळी गर्भवती - आईचा प्रसूतसमयी मृत्यू – मरताना नवजात पुत्र मुलीच्या स्वाधीन व 'याचा तू पुत्रासारखा सांभाळ कर' अशी विनंती – मुलीचे मरणोन्मुख आईस तसे वचन – मुलाचा व भावाचा एकाच मायेने सांभाळ – परंतु तिच्या पतीच्या मनात पाप – त्याचा 'नदीला परडी सोडण्याचा नवस' – मेहुण्याला नदीत सोडायचा बेत – प्रत्यक्ष नवस – विधीच्या वेळी मुलीने पाठीवर बांधलेला स्वतःचा पुत्र व पोटावर बांधलेला भाऊ यांची अदलाबदल करून स्वतःचा पुत्र बळी देऊन आईला दिलेले वचन पाळले. (तीर्थांचे सागर – कथा १)

दैववशात् कुत्रीच्या पोटी जन्मलेल्या दोन मानवकन्यांपैकी एक राणी बनली दुसरी प्रधानपत्नी बनली – राणीला श्वानमातेबद्दल अत्यंत प्रेम – श्वानमाता राणीकडे आली असता तिने आईचा उत्तम पाहुणचार केला. उत्तम भोजन देऊन निजावयास बिछाना घालून दिला. (पुष्प १ – कथा ४३) (तीर्थांचे सागर कथा २)

**मराठी लोककथांतील प्रेमळ बहिणी**

एकाच आईच्या पोटी जन्म घेतलेल्या बहिणी परस्परांवर बहुधा निरलस प्रेम करतात. एकाच घरात, एकाच वातावरणात वाढणाऱ्या, खेळणाऱ्या

या मुली जणु जिवाभावाच्या मैत्रिणीच असतात मराठी लोककथांत असे परस्पर प्रेम करणाऱ्या बहिणींचे चित्रण आढळते.

उदा. – तीन बहिणींचे एकमेकींवर फार प्रेम – तिघी मोठ्या श्रध्दाळू व देवभक्त – तिघींत कामाची वाटणी – एकजण पाणी भरावयाची – दुसरी रानातून सरपण आणावयाची व तिसरी घरी स्वयंपाक करावयाची, मोठी पाणी भरण्यास टेकडीवर गेली असता नामस्मरणात दंग होऊन ईश्वरार्पण – दुसरी सरपण आणताना रानात ईश्वरार्पण – दोघींची वाट पाहून पाहून घरी तिसरीही ईश्वरार्पण. (मराठवाड्यातील लोककथा – कथा १८)

शेतकऱ्याचा सूर्यनारायणाचा वसा – एक मुलगी राणी तर दुसरी प्रधानपत्नी – राणीने पित्याची कहाणी न ऐकल्याने तिला दारिद्र्य – प्रधानपत्नीने कहाणी मनोभावे ऐकल्याने तिला खूप ऐश्वर्य – राणीला आपले पुत्र प्रधानपत्नीकडे पाठवून मदतीची याचना करावी लागली – प्रधानपत्नीचे बहिणीवर खूप प्रेम – तिने वारंवार बहिणीसाठी मदत पाठविली व तिला मनोभावे वसा करण्याची विनंती केली. (पुष्प १ – कथा १) (कहाणी भाग १ ) ( आदित्यराणूबाईची कहाणी)

**मराठी लोककथांतील खाष्ट सासू**

मुलीचा विवाह झाला की सासरी आल्यावर प्रमुख संबंध स्त्रीशी येतो तो सासूबाईची सून म्हणून – सासूसून यांचे खडाष्टकाचे नाते तर प्रसिध्दच आहे. सासूबाईंना 'आत्याबाई' म्हणावयाची रीत त्या दोघींचे संबंध आत्याभाचीसारखे प्रेमाचे असावेत असेच सुचविणारा असतात. तथापि प्रत्यक्ष व्यवहारात मात्र हा हेतू क्वचितच साध्य होतो. प्रेमळ सासू ही अपवादभूतच मानावी लागते. मराठी लोककथांतील खाष्ट सासूचेच प्राबल्य दिसून येते. सुनेच्या रूपाने घरात आपल्याला एक आज्ञाधारक मोलकरीणच मिळालेली आहे असाच बहुधा सासूचा समज असतो. तिनेच घरातील सर्व कामे केली पाहिजेत, देऊ तेच व तेवढेच खाल्ले पाहिजे, आणि परवानगी दिली तरच माहेरी गेले पाहिजे असे अलिखित दंडक सुनेवर परंपरेने लादलेले आहेत. या दंडकांची अंमलबजावणी सुनेवर न चुकता केली जाते. पुत्रहीन सुनेच्या छळाला तर सीमाच नसते. मराठी लोककथांत सुनेवर होणाऱ्या सासुरवासाची अनेक उदाहरणे आहेत.

उदा. – नंदा सून व चंद्रम्मा सासू – नंदाला रोज शिळी भाकरी व अंबाडीची भाजी हेच जेवण व तेही पोटभर नाही. त्यामुळे नंदा चोरून खाण्यास प्रवृत्त होत असे. (पुष्प ३ – कथा ६८)

एक निपुत्रिक सून सासूच्या जाचास कंटाळून देवीच्या चरणापाशी आत्महत्या करण्यास घरातून निघून गेली. (पुष्प ३ – कथा ७३)

सून जनाई हिला सतत काम व शिळे अन्न – माहेर पूर्ण बंद – भावाच्या लग्नालाही पाठवले नाही – कालांतराने तिची आई अत्यवस्थ म्हणून भाऊ न्याव-यास आला – सासूचा आईच्या आजारपणावर अविश्वास – कारल्याची बी लाव-ण्यापासून वेलाला कारली येऊन त्यांची कडू भाजी खाईपर्यंत सुनेला माहेरी जाऊ दिले नाही – आईच्या अंतिम भेटीच्या आशेने ती कडू भाजीही घशाखाली घातली – नंतर सासूला परवानगी विचारताच तिचे उत्तर 'सासऱ्याला विचार' – घरा-तील सर्व वडीलधाऱ्या मंडळींना विचारीपर्यंत ती स्वतःच बेशुद्ध – शुद्धीवर येऊन माहेरी पोचेपर्यंत आई आधीच मरण पावलेली – दु:खातिशयाने जनाईही मरण पावली. (सासुरवास – कथा २)

सून गंगूलाचा भाऊ तिला माहेरी नेण्यासाठी आला – तो ओटीवर व गंगूला थेट आतल्या खोलीत – पाहुण्याचा आवाज ओळखीचा वाटतो पण बाहेर कसे जावे ? उत्सुकता स्वस्थ बसू देईना. धीर करून सासुबाईंना विचारले – 'पाहुणा कोण ?' सासूची आज्ञा 'घराची झाडझुड कर, मग सांगते' – एका मागोमाग दुसरे काम हजर पण पाहुणा कोण हे सांगितले नाही – गोवऱ्या थाप-ताना गंगूलाला साप चावला. हात काळा पडला, पण कुणाचा विश्वास नाही – बिचारी मरून गेली – भावाला बहीण कायमचीच अंतरली. (सासुरवास – कथा १)

**मराठी लोककथांतील दुष्ट भावजय** – मातृहीन नणंद भावजयीच्या तावडीत साप-डली तर तिला चांगली वागणूक मिळणे दुरापास्तच ! भावांना प्रेम वाटत असले तरी परक्या घरातून येऊन मालकीण बनलेल्या वहिनीला तसे वाटत नाही. नणंद विवाहित असेल तर चार दिवसच माहेरी येणार. तथापि तिचे स्वागतही प्रेमाने होत नाही आणि पाहुणचारही होत नाही. मराठी लोककथांतील भावजयीकडून नणंदेला मिळणारी वागणूक पूर्णतया अनुदार स्वरूपाची आहे.

उदा. – सात भावांची एकच लाडकी बहीण – आई असताना तिला झोपाळ्या-वर झुलवीत – तिच्या मृत्यूनंतर नणंदेला अशक्यप्राय कामे सांगितली जात – 'फुटके रांजण भर, तेलात बुडविलेले कपडे पांढरे स्वच्छ धू, उखळामुसळाशिवाय राळे कांड वगैरे' – बेडूक, बळी पक्षी, चिमण्या यांच्या मदतीने कामे पूर्ण केली तर तिच्यावर 'कौसाल' केल्याचा आरोप ठेवून मारहाण. (राजविलासी केवडा – कथा २)

घरात गरिबी व त्यात नणंदेचा व्याप गळ्यात – भावजयीने तिला खूप

छळावे, टोचून बोलावे - नणंद वैतागून घरातून निघून गेली. (सांगीवांगी - कथा १७)

विवाहित नणंद दारात पोचते न पोचते तोच भावजयीने सांगितले, 'बसाय जागा दिली असती तर वलो, आणि भाकर केली असती तर तवा वाळूनं खाल्ला' - बहीण त्याच पावली माघारी परत गेली. (सुंबरानं मांडीलं - कथा १७)

**मराठी लोककथांतील प्रखर सवतीमत्सर** :- बहुपत्नीकत्वाची रूढी अगदी अलिकडच्या काळापर्यंत आपल्या समाजांत प्रचलित होती. त्यामुळे घरातील सवतीसवतींचे भांडण हा नित्याचा रिवाज होता सासू-सुनाच्या नात्यात त्यांतील एकजण वयाने, मानाने, अधिकाराने ज्येष्ठ असते. परंतु सवतींमध्ये तसा ज्येष्ठकनिष्ठ भाव वयाने ठरविता आला तरी अधिकाराने ठरविणे अवघड असते. एकाच पुरुषावर त्यांचा समान अधिकार असतो. त्यामुळे त्यांच्या भांडणाची, द्वेषभावाची तऱ्हाही निराळीच असते. 'सवतीला बहीण मानून ऱ्हा' हा कण्वऋषींनी शकुंतलेला सासरी निघताना केलेला उपदेश प्रत्यक्ष आचरणात येणे फारच अवघड असते. मूळच्या बहिणी प्रेमाने नांदणाऱ्या सवतीचे अस्तित्व मराठी लोककथांत शून्यच आहे. जरी सवती बनल्या तरी त्यांच्यांत द्वेषाची, मत्सराची ठिणगी कशी पडते याची अनेक उदाहरणे आवडती व नावडती राणी यांच्या भूमिकापात्र स्वरूपात उद्धृत केलेली आहेतच. मराठी लोककथांत प्रखर सवतीमत्सराची आणखीही बरीच उदाहरणे आढळतात.

उदा - बारा वर्षांनी मल्हारी म्हाळसाकडे परत आला - पतिदर्शन होणार म्हणून म्हाळसा आनंदित - पण घोड्यावर मल्हारीच्या मागे बसलेली सवत बानू पाहताच ती एकदम क्रोधायमान - तडक डोंगरावर निघून गेली - ती परत आलीच नाही. (सुंबरानं मांडीलं - कथा २१)

शंकराच्या दोन पत्नी गौरी व गंगा - गंगा शांत व विचारी पण गौरी मत्सरी - गौरीने स्वत:ला चांगली फुले ठेवून सुकलेली गंगेकडे पाठविली - गंगा शांत पण स्वाभिमानी - चांगल्या फुलांची वाटणी द्यावयाची विनंती - गौरीने गंगेच्या छातीवर, दातावर लाथ मारली - तरीही गंगा शांतच - गौरी रजस्वला झाल्यावर गंगेने जगातील सर्व पाणीच लपवून ठेवले - गौरीला स्नान करायला पाणी नाही. गौरीचा पुत्र वीरभद्र पाणी शोधून थकला - पिता दक्ष याने स्नानासाठी दहीदूध पुरविले पण त्यामुळे डासमुंग्या चावून गौरी हैराण - शंकराचा गौरीला गंगेची क्षमा मागण्याचा सल्ला - गौरी नाइलाजाने गंगेकडे - गंगेला मुलगा, सून, साड्या, दागिनें द्यायची कबुली पण गंगा पाण्याचा पत्ता देईना - शेवटी आपले सर्वस्व 'शिव' देण्याची कबुली - अनेकांना साक्षीस ठेवून गंगेने पाणी मुक्त

केले – अशी ही सवतीमत्सराची तऱ्हा. (मराठी लोककथा – बाबर – कथा १)

विठोबाचा अनाथ तुळशीला आश्रय – रूक्मिणीस राग – विठोबाने तुळशीला फळांची टोपली पाठवावयाचे ठरविल्यावर रूक्मिणीने ती जबाबदारी स्वतःवर घेतली – टोपलीतील फळे काढून त्यात साप भरून टोपली तुळशीच्या दारात ठेवून ती परत आली. (पुष्प ३ – कथा ७७).

दोन किंवा अधिक सवतींमध्ये जी अधिक गुणी असते ती दुर्दैवाने अनेक फेरे फिरूनही आपला भलेपणा सोडत नाही. सवतीमुळे अनेक संकटे सोसावी लागली तरी तिचे वाईट चिंतीत नाही, तिला सहसा शिक्षा होऊ देत नाही. अर्थात गुण्यागोविंदाने एकत्र नांदणाऱ्या सवतीचे एकही उदाहरण मराठी लोककथांत आढळत नाही हेही तितकेच खरे.

**मराठी लोककथांतील जावांच्या संघर्षाचे चित्रण अत्यल्प**

एकत्र कुटुंबपद्धतीत सासूसून संघर्षाप्रमाणेच जावाजावांचा संघर्षही अटळ असतो. परंतु त्याची फारशी दखल मराठी लोककथांनी घेतलेली आढळत नाही. क्वचित एखाद्याच कथेत त्याचे चित्रण आढळते.

उदा.– मोठी जाऊ उर्मट, घमेंडखोर, जहांबाज – धाकटी जाऊ नम्र, सोशीक – मोठी सासुसासऱ्यांशी भांडून वेगळी झाली – धाकटी त्यांच्याजवळ गुण्यागोविंदाने नांदते हे पाहून मोठीचा जळफळाट – सासरा व धाकटी जाऊ यांच्या संबंधांबाबतच्या अफवा पसरविण्यासही मागेपुढे पाहिले नाही. (तीर्थांचे सागर – कथा १२)

**मराठी लोककथांतील नणंदेचे त्रुटित चित्रण**

सासरी सासुबाईप्रमाणेच स्त्रीचा संबंध येतो तो नणंदेशी. नणंद ही बहुधा भावजयीची समवयस्क असते. मोठी वा लहान असली तरी वयांतील अंतर फारसे नसते. दोघींत मैत्रिणींचे नाते असावयास हवे. परंतु समाजात परंपरेने नणंदेचे चित्रण आहे 'ठेंगणी, ठुसकी, चहाडखोर' अशा तऱ्हेचे मराठी लोककथांत आढळणारे नणंदेचे चित्रण फारच त्रुटित आहे. नणंदेवर कुरघोडी करणारी भावजयच प्रकर्षाने रंगविलेली असल्याने तिच्या दबावाखाली राहणाऱ्या नणंदेचेच चित्र अधिकतम कथांत दिसते. नणंदेने केलेल्या भावजयीच्या छळाचा प्रकार फारसा आढळतच नाही. सुनेला घरात जो सासुरवास होतो त्याला ती फक्त मूक संमती देते. सुनेला साप चावला यावर घरातील इतर माणसांप्रमाणे तीही विश्वास ठेवीत नाही एवढेच.

**मराठी लोककथांतील सुनेचा खाष्टपणा**

सासू सुनेचा छळ करते, परंतु सासूचा कर्तेपणा किती दिवस चालणार ? 'चार दिवस सासूचे चार दिवस सुनेचे' ही म्हण तर प्रसिद्धच आहे. कालांतराने

सासू वार्धक्याकडे झुकते, सुनेचे प्राबल्य वाढते. आपल्याकडे कर्तृत्व आले तर आपल्या कर्तेपणाचा इंगा सूनही सासूला दाखविल्याखेरीज नक्कीच राहात नाही. मराठी लोककथांतही अशा खाष्ट सुनांचे नमुने आढळतात.

उदा. – जयरामची बायको व आई यांचे एकदा खूप भांडण – जयराम शेतातून घरी आला तर आई दारात बसलेली व बायको खाटेवर झोपलेली – बायकोची खोटी तक्रार, 'मला सासूने मारले. तिला शेतावर नेऊन बांधून घालाल तरच मी उठणार, नाहीतर अशीच झोपून राहणार'! (तीर्थांचे सागर – कथा ३)

सुनेचा सासूवर खूप राग – नवऱ्याला सांगितले, भर्तारा, या सासूला घे आणि दहापंधरा गवताच्या मोळ्या पेटवून जाळून टाक! (तिर्थांचे सागर - कथा ४)

सदाचारी दांपत्य – दोन सुना – मोठी दुष्ट, घमेंडखोर – नवऱ्याला फितवून वेगळी राहिली – वाटणीचा पैसा उधळला – सणाच्या निमित्ताने घरी येऊन सासूसासऱ्यांना जेवायला वाढले – जेवणानंतर त्या दोघांचा तडकाफडकी मृत्यू. (तीर्थांचे सागर – कथा १२)

**स्त्रीचा कुटुंबातील पुरुषविषयक उदार दृष्टिकोन**

पुरुषप्रधान संस्कृतीत पुरुषाचा स्त्रीविषयक दृष्टीकोन अधिक महत्वाचा असला आणि स्त्रीच्या पुरुषविषयक दृष्टीकोनास गौण महत्व असले तरी हा दृष्टीकोण पूर्णतया दुर्लक्षित करता येत नाही. त्याची दखल घेणे तितकेच महत्वाचे ठरते.

मराठी लोककथांतील स्त्रीच्या कुटुंबातील पुरुषविषयक दृष्टिकोणाचा शोध घेतल्यास असे आढळते की त्यांत मुलगी – पिता, सून – सासरा अशा काही नात्यांचे चित्रण फारसे नाहीच. बहीण – भाऊ, आई – मुलगा, पती – पत्नी या भावसंबंधांचे दर्शन मात्र अनेक कथांतून घडते. विशेष म्हणजे स्वतःकडे गौणत्व असूनही कुटुंबात विविध नातेसंबंधांनी वावरणाऱ्या या स्त्रीचा पुरुषविषयक दृष्टिकोण तिचे व्यक्तिमत्व उजळून टाकणारा व तिला आदरणीय बनविणारा असल्याचे दिसून येते.

**मराठी लोककथांतील प्रेमळ बहीण**

बहीण – भावाचे प्रेम परंपरेने अत्यंत पवित्र, उत्कट मानलेले आहे एकमेकांच्या सहवासात त्यांच्या आयुष्याची बरीच वर्षे व्यतीत होत असल्याने त्यांच्यांत प्रेमाचे दृढ भावबंध सहजीच निर्माण होतात. मराठी लोककथांतील भावावर उत्कटतेने प्रेम करणाऱ्या बहिणींचे प्रमाण अधिक आहे.

उदा. स्वत: भुकेला असूनही स्वत:च्या वाटणीचा लाडू भावाला खायला दिला. (दाते १ – कथा १)



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.
ग्रंथ शाखा (नौपाडा प्र.)

बगळ्याचे रूप घेऊन रानोमाळ हिंडणाऱ्या आपल्या सात भावांसाठी, अतोनात कष्ट सोसून, बहिणीने कोट विणले व त्यांना पुन्हा मानवरूप प्राप्त करून दिले. (वैजयंती – कथा १७)

बायकोने चिथावणी दिल्याने भाऊ आपला घात करावयास आला आहे हे अंतर्ज्ञानाने जाणूनही बहिणीने भावाचे योग्य आदरातिथ्य केले. (सुंबरान मांडिलं – कथा २)

मातृहीन भावाचा मुलासारखा प्रतिपाळ केला. (तीर्थांचे सागर – कथा १)

**मराठी लोककथांतील पत्नीचे प्रभावी व्यक्तिमत्त्व**

पुरुषप्रधान संस्कृतीत पत्नीला बहुधा पतीच्या कलानेच वागावे लागते. स्वतःकडे गौणत्व घेऊन पतीच्या विचारांना, मताला मान द्यावा लागतो. असे असूनही पत्नीनिष्ठ पुरुषांच्या तुलनेने पतिनिष्ठ स्त्रीचे प्रमाण मराठी लोककथांत अधिक आढळते. स्त्रीच्या पातिव्रत्याचे आणि पतीप्रेमाचे पोवाडे या मराठी लोककथांनी मुक्तपणे गायिले आहेत. त्यांतील बव्हंशी स्त्रिया पतिनिष्ठ तर आहेतच, शिवाय बऱ्याच कथांत पत्नीचे व्यक्तिमत्त्व पतीपेक्षा प्रभावी स्वरूपाचे रंगविलेले आहे. आपल्या अंगच्या चातुर्याने कधी ती पतीचे परिवर्तन करू शकते किंवा क्वचित त्याच्यावर मातही करू शकते. अशा पतिव्रता वा चतुर स्त्रियांची अनेक उदाहरणे उद्धृत करता येतील.

उदा.– हिरण्यकश्यपूच्या वधानंतर कयाधूचे मन फार उदास - तिने जिवंत राहण्यापेक्षा नदीरूपाने वाहात राहणे पसंद केले. (मराठवाड्यातील लोककथा – कथा २५)

विवाहानंतर राधा कृष्णावरोबर सासरी निघाली – तिची परीक्षा पाहण्याच्या हेतूने कृष्णाची विंचू इंगळ्यांच्या पुरात उडी – कृष्णाच्या पाठोपाठ विंचू इंगळ्यांच्या पुरात राधेने बेधडक उडी घेतली. (अप्रकाशित कथा)

राजाच्या छातीवरचा गुलाब राणीच्या पातिव्रत्यामुळे सतत फुलता, उमलता राहिला. (राजविलाशी केवडा – कथा ७)

पतीने गहाण ठेवल्यावर पतिविरहाने मृत्यू पावणारी त्याची पत्नी (अप्रकाशित कथा)

पतिव्रता स्त्रीचे अधांतरी राहणारे मुसळ. (अप्रकाशित कथा)

'ती' (भूक) नाही म्हणून न जेवणाऱ्या पतीच्या खट्याळपणाला पत्नीने 'तो' (वारा) नाही म्हणून झोप येत नाही असे उत्तर दिले. (खानदेशी लोककथा - कथा १३)

पै पै चा हिशेब मागून त्रस्त करून सोडणाऱ्या पतीला पत्नीने भल्या मोठ्या काव्यात हिशेब सागून फजीत केले. पुन्हा त्याने हिशेबीपणा दाखविला नाही. (पुष्प २ – कथा ११)

**मराठी लोककथांतील प्रेमळ आणि कर्तव्यतत्पर पुत्रमाता**

पुरुषप्रधान संस्कृतीत पुत्रजन्माचे महत्व किती मोठे असते याची चर्चा केलेली आहेच. पुत्रप्राप्ती झाली की स्त्रीला आयुष्य सार्थकी लागले असे वाटू लागते. वंशाचे नांव आणि सातत्य पुढे चालविणाऱ्या मुलाच्या जन्माबाबत आईला ओढ वाटणे अगदी स्वाभाविक आहे. मुलाचा आणि आईचा सहवासही अनेक वर्षे घडत असल्याने दोघांचे नाते खरोखरच अत्यंत जिव्हाळ्याचे असते. मुलाबद्दल आईला अतीव प्रेम तर वाटत असतेच, शिवाय त्याला योग्य ते वळण लावण्याची मोठी जबाबदारीही प्रामुख्याने तिच्यावरच असते. पुत्रप्राप्तीबद्दलची आईची ओढ, त्याच्यावरील तिचे उत्कट प्रेम, त्याला योग्य वळण लावण्याची तिची धडपड, पुत्रविरहाबद्दल वाटणारे दुःख अशा आईच्या अनेक भावच्छटांचे चित्रण मराठी लोककथांत दिसून येते. विशेष म्हणजे सबळ कारण असेल तर प्रसंगी पुत्रत्यागास तयार होणारी आईही काही कथांत दिसते.

उदा. – एका तहानलेल्या, भुकेल्या साधूला पाटीलबुवांच्या पत्नीने पाणी दिले, पोटभर जेऊ घातले. साधूने तृप्त होऊन आशीर्वाद दिला, तेव्हा तिने आपले पुत्रहीनतेचे शल्य त्याला कथन केले. (पुष्प २ – कथा ६)

एका निरापत्य म्हातारीने वेलाला लागलेल्या भोपळ्याचेच पुत्रवत् पालन केले. (तीर्थांचे सागर – कथा १३).

राजहंस बनलेल्या जाईने रस्त्याने चाललेल्या पतीमुलाच्या रथावर सतत सावली धरली राजधानीत पोचल्यावर एका परटाला ती रोज पतीचे, बाळाचे कुशल विचारी. (एक होता राजा – कथा २)

अंगणात झोपलेला म्हातारीचा मुलगा खाटेसकट वाघाने उचलून नेला. मुलाने पारंब्यांना धरून अलगद स्वतःची सुटका करुन घेतली – वाघ निराशेने खाटेसकट मुलाच्या अंगणात – खाट रिकामी पाहून म्हतारीला वाटले, वाघाने मुलाला खाऊन टाकले – पुत्रशोकाने ती स्वतःच खाटेवर जाऊन झोपली व तेथेच तात्काळ मरण पावली. (पुष्प १ – कथा ७)

सावकाराच्या मुलाजवळ फक्त शंभर रुपये – प्रवासाला निघाला – ते सर्व रुपये देऊन टाकून प्रेताची चाललेली विटंबना थांबविली – निष्कांचन अवस्थेत घरी

परत – आईने त्याच्या सत्कृत्याबद्दल पाठ थोपटली. (तीर्थांचे सागर – कथा ५) (सांगीवांगी – कथा ११)

उडाणटप्पू चंदनने नदीत स्नान करणाऱ्या अप्सरेचे पैंजण पळवून आणले व आईजवळ दिले – आईने पैंजण न घेता निक्षूण सांगितले, 'जेथे होते तेथे नेऊन ठेव. आपल्याला कुणाचे शिव्याशाप नकोत'. (सुंबरान मांडिलं – कथा ८)

अनेक संकटांतून राजपुत्राला पार करणारा वाणीपुत्र शिळारूप होऊन पडला असता, त्याला मानवरूप प्राप्त होण्यासाठी राजपुत्राचा बळी देणे आवश्यक – राजपुत्राचे मन माघार घेत होते परंतु राजपुत्राच्या पत्नीने पुत्रबळी देण्यासाठी त्याचे मन तयार केले. ( अप्रकाशित कथा ) (वैजयंती; कथा ९)

**सर्व नातेसंबंधांतील अपवादांची मराठी लोककथेला जाणीव**

मराठी लोककथांतील पतीचे स्वरूप विशद करताना, लोकमानसातून निर्माण होणारी ही पात्रे बव्हंशी भूमिकास्वरूप व सांकेतिक कशी असतात याचा परामर्श तत्संबंधित प्रकरणात घेतलेला आहे. लोकमानसात अशी सांकेतिकता प्रभावी असली तरी लोकमानसाला व्यक्तिवैचित्र्याची जाणही असते असे लोकमानसाचे वैशिष्टही त्या प्रकरणात नमूद केलेले आहे. त्यामुळेच बरीच पात्रे 'बव्हंशी' भूमिकास्वरूप असतात. पूर्णपणे भूमिकास्वरूप सहसा नसतात. मराठी लोककथांत प्रतिबिंबित होणारे कौटुंबिक नातेविषयक उपरोक्त सर्व भावसंबंध हे अशाच तऱ्हेचे म्हणजे ' बव्हंशी ' दिसून येणारेच आहेत, ' एकमेवाद्वितीय ' अशा स्वरूपाचे निश्चित नाहीत. मराठी लोककथांना असणारी व्यक्तिवैचित्र्याची जाण या भावसंबंधांच्या चित्रणांतूनही दृष्टीस पडते. कारण जवळजवळ सर्व भावसंबंधांतील अपवादांची नोंद त्यांनी केलेली आढळते. अशा अपवादस्वरूप भूमिकांची उदाहरणे ही बाब स्पष्ट करतील.

**प्रेमळ पिता :–** सामान्यत: पित्याला कन्याजन्माची ओढ नसली, पित्याकडून कन्याजन्माचे स्वागत होत नसले किंवा भावनांची पित्याला कदर नसली तरी मुलीवर माया करणारा प्रेमळ पिताही लोककथांत आहे.
उदा. :– संसारात मुलगी हवीच, त्याशिवाय सर्व वैभव उणे अशी या पित्याची भावना – मुलीसाठी कष्ट करण्यात आनंद. ( खानदेशी लोककथा – कथा १० )

एका चांभारकन्येचे नदीपलीकडेच सासर – सहजपणे माहेरी येऊन भेटता येई - दरवर्षी गौरीच्या सणाला माहेरी येई – एकदा मुसळधार पावसाने येणे अशक्य, कारण नदीवर पूल नाही – पुन्हा असे होऊ नये म्हणून चांभाराने एका रात्रीत बिनघडलेल्या दगडांचा पूल बांधला. ( पुष्प ३ – कथा ११ ).

**प्रेमळ भाऊ** :- पत्नीवरील प्रेम प्रभावी ठरल्यामुळे, तर कधी स्वत:च्या स्वार्था-पायी बहिणीशी बेजबाबदारपणे वागणाऱ्या भावाप्रमाणेच बहिणीवर उत्कट प्रेम करणारा भाऊही मराठी लोककथांत भेटतो.

उदा -दोन भावांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून बहिणीला तिच्या राक्षसपतीच्या तावडीतून सोडवून आणले ( अप्रकाशित कथा)

आपल्या बहिणीच्या काळजीने, भावाने मरणोत्तर विविध रूपाने ( मासा, मोर, पोपट वगैरे ) जन्म घेऊन बहिणीच्या पोटापाण्याची सोय केली. ( दाते - कथा १ )

**सद्गुणी अनन्यनिष्ठ पती** :- दुर्गुणी पतीचा वर्ग संख्येने मोठा असला तरी सद्-गुणी. पत्नीवर अनन्य निष्ठा ठेवणाऱ्या पतीचीही बरीच उदाहरणे मराठी लोक-कथांत सापडतात. आपल्या दुर्गुणांनी तो पत्नीचे जीवन अशक्यही करू शकतो आणि अनन्यनिष्ठेने, प्रसंगी तिचा सल्ला शिरोधार्य मानून तिच्या आयुष्याचा स्वर्गही बनवू शकतो.

उदा. - शिवा व चंपा अत्यंत गरीब परंतु परस्परांवर फार प्रेम - शिवा नशि-बाच्या शोधार्थ रानात - दगडांना अनन्यभावाने देव मानले - दगडांनी देव बनून खरोखरच खूप धन दिले - चंपाच्या ओढीने ते वारंवार घरी येई - त्यांच्या परस्परप्रेमाने प्रत्यक्ष भगवान विष्णू प्रसन्न. (राजविलासी केवडा - कथा ४)

राजकन्येसाठी विवाहपण 'जो' राजकन्येला बोलायला लावील त्याला राजकन्या व ' अर्धे राज्य ' - एका गरीब ब्राह्मणाने पण जिंकला - अर्धे राज्य स्वीकारले परंतु राजकन्या मात्र नाकारली कारण त्याचे पत्नीवर फार प्रेम. (सुंबरानं मांडील - कथा ६)

सासऱ्याच्या शापामुळे सून जयंती हिला एका सरोवरात शिळारूप - पती विजय अतीव दु:खी - विष्णूस्पर्शाने तिचा उद्धार होणार होता - तप करून विष्णूचा करस्पर्शाचा दिवस जवळ आणावयाचा त्याचा निर्धार - सरोवराकाठी कठोर तपोसाधना. (वैजयंती - कथा १)

देवीचे देऊळ बांधण्याचा नवस पूर्ण होईपर्यंत अन्नपाणी वर्ज्य करणाऱ्या राणीबरोबर स्वत:ही अन्नपाणी वर्ज्य करणारा राजा - देऊळ लवकर व्हावे म्हणून जोरात काम सुरू. (राजविलासी केवडा - कथा ३)

आपल्या संगीतकलेने व पराक्रमाने, पती कुरूपतेमुळे माहेरी निघून गेलेल्या पत्नीला जिंकणारा कुरूप राजपुत्र. (अप्रकाशित कथा)

**कृतज्ञ मुले** :- आपल्याला वाढविण्यासाठी आईने केलेले कष्ट विसरून आणि बहुधा पत्नीच्या तालावर नाचणारी किंवा आईजवळच्या पैशावर नजर ठेवणारी कृतघ्न मुले जशी मराठी लोककथांत आहेत तशीच तिच्या उपकारांची वा प्रेमाची जाण ठेवणारी कृतज्ञ मुलेही मधूनमधून पाहावयास मिळतात.

उदा. जगदेव राजपुत्र अत्यंत मातृभक्त – स्वत:चे आईच्या व सावत्र आईचेही रोज दर्शन घ्यायचा त्याचा नेम होता. (एक होता राजा – कथा ३)

वैराळरूपाने कंसवध करणारा कृष्ण (सुबरानं मांडील – कथा १६)

निराधार निरापत्य म्हातारी – भोपळ्याचे पुत्रवत पालन – तिचे प्रेम पाहून प्रत्यक्ष सूर्यनारायणाची त्यात वस्ती – राजकन्येचा हट्टाने भोपळ्याशी विवाह – भोपळ्यास कायम मानवरूप – राजवैभवातही त्याला आईची आठवण कायम – लग्नात व नंतरही 'वरमाय' म्हणून म्हातारीची उत्तम बडदास्त. (तीर्थांचे सागर – कथा १३)

**दुष्ट सख्खी आई** .– 'दुष्ट आई' हा शब्दप्रयोगच जणू विरोधाभासासारखा आहे. प्रेमळपणाची मूर्ती समजली जाणारी आई दुष्ट कशी असेल ? परंतु एका मराठी लोककथेत सख्खी आई ही दुष्टपणाची कमालमर्यादा गाठताना आढळते.

उदा. – मुलीच्या तोंडून माणिकमोती पडत – मुलीचा विवाह – धनात वाटेकरी आला म्हणून मुलीच्या आईचा जळफळाट – मुलगी जावयाच्या मृत्यूसाठी तिने अनेक कट केले. मारेकरी घातले, सापविंचू मडक्यात भरून पाठवले, विषप्रयोगाचा प्रयत्न केला. (अप्रकाशित कथा)

सासरहून अपमानित झालेली जौतुला माहेरगावी पोचली – अंगावर नाही दागिने, कपडेही फाटलेले – दासींनी ओळखले, पण आईने ओळख दिली नाही – दासी म्हणून आश्रय. (सासुरवास – कथा ६)

**दुष्ट कन्या** :- आईला दुष्टपणाने वागविणारी मुलगी एकाच कथेत आढळते.

श्वानमातेच्या कन्यांपैकी एक प्रधानपत्नी बनली – वैभवामुळे गर्विष्ठ – तिच्या घरी जेवण चालले असता श्वानमाता तेथे जाऊन हजर – आईला ओळखले नाही – जेवणाच्या ऐन वेळी दारात कुत्रे पाहून तिचे पित्त खवळले – दासीकरवी जळते लाकूड आणून पेकाटात घातले, हाकलून दिले. (तीर्थांचे सागर – कथा २), (पुष्प १ – कथा ४३)

**प्रेमळ सावत्र बहिणी** :- सावत्र बहिणींचे प्रेम वर्णन करणारी ही कथाही अपवादभूत स्वरूपाची आहे.

सावत्र बहिणी असूनही एकमेकींवर खूप प्रेम – सावत्र आईने मुलीला घराबाहेर काढले – सावत्र बहीण खूप दुःखी – विवाहसमयी सावत्र बहिणीची तीव्र आठवण – लग्नाला तिने यावे अशी फार इच्छा – दैवी कपिला गायीच्या कृपेने तिची इच्छा पूर्ण – दोघी बहिणी परस्परप्रेमाने भेटल्या. (सांगीवांगी – कथा ३)

**प्रेमळ सासू** :– आपल्या खाष्ट व दुष्ट स्वभावाने सुनेचे दैनंदिन जीवन नीरस व कष्टमय करून टाकणाऱ्या सासूचे अनेक नमुने पाहता, सुनेवर मुलीसारखी माया करणारी सासू निश्चितच प्रशंसेस पात्र ठरते. अगदी क्वचित उदाहरणांत का होईना, परंतु अशी प्रेमळ सासूही मराठी लोककथेने रंगविलेली आहे.

रूक्मिणी कृष्णाला 'मिठासारखी प्रिय' – रूक्मिणी फारच नाराज व उदास – देवकीने खूप समजावले, 'तूच वडील श्रेष्ठ सून' बाकी सोळा सहस्त्र तुझ्या दासी' – तरी रूक्मिणीची पूर्ण समजूत पटेना – देवकीची युक्ती – सर्व सुनांना मेजवानी – मिठाविना सर्व पदार्थ बेचव – रूक्मिणीचे श्रेष्ठत्व सर्वांना पटले. (राजविलासी केवडा – कथा ९)

बाळूलाचा भाऊ तिला माहेरी न्यावयास आला – त्याचा तिला बळी देण्याचा इरादा - सून बाळूला सासरी सुखात – सासुरवास नाही – भाऊ माहेरी न्यायला आला – खूप अपशकून म्हणून बाळूला जाण्यास नाराज – सासूजवळ अनिच्छा व्यक्त – सासूने अनेक अडचणी सांगून (पती परगावी, मुलाला ताप वगैरे) तिचे माहेरी जाणे टाळण्याचा प्रयत्न केला. (सासूरवास - कथा ३)

**भावाची अनुदार बहीण** :– भावाशी प्रेमाने वागणारी बहीण जशी दिसते तशी अनुदार बहीणही मराठी लोककथांत दिसते.

राक्षसाशी विवाह करू इच्छिणारी राजकन्या – भावाच्या नाराजीची भीती – त्याचा काटा काढण्याच्या इराद्याने राक्षसाकरवी अनेक अवघड कामे भावाला सांगितली. (पुष्प १ – कथा ४५)

व्यभिचाराचा आळ आल्याने जगदेवाला हद्दपारीची शिक्षा – वाटेवर बहिणीचे घर – तिने त्याला घरातही घेतले नाही – घरात पुत्रजन्मोत्सव चालू असूनही पत्रावळीवर जेवण वाढून बाहेरच झाडाखाली पाठवून दिले. (एक होता राजा - कथा ३)

सात श्रीमंत बहिणींना एकच गरीब भाऊ – पाहुणा म्हणून आला तर एकीनेही त्याला जेवावयास वाढले नाही – प्रत्येकीला वाटले, दुसरीने घातलेच

असेल – सात बहिणींचा भाऊ पण उपाशीच परत गेला – पुन्हा बहीणींकडे न जाण्याचा त्याचा निश्चय. (सांगीवांगी – कथा १९)

**दुर्गुणी पत्नी** :– आपल्या पातिव्रत्याने, चतुराईने पतीला सतत साथ देणाऱ्या अनेक स्त्रिया मराठी लोककथांनी रंगविलेल्या असल्या तरी व्यभिचारी, तोंडाळ, हट्टी, लबाड पत्नींचे नमुनेही पाहावयास मिळतात.

नागनाथ मूळचा नाग मनुष्यरूपाने राजगृही राहात होता – नाव न सांगण्याचे त्याच्यावर बंधन – पत्नीचा नेमका तोच हट्ट – खूप समजूत घालूनही हेका कायम – नांव सांगितले – नागरूपाने नागलोकी निघून जावे लागले – पतिविरह नशिबी. (पुष्प ४ – कथा ३)

नवऱ्याच्या नाकाला चुना लावून पळून जाण्याची 'प्रतिज्ञा करणारी' राणी तिला एकांतात ठेवूनही भुयारमार्गाने प्रियकराकडे पळाली. (अप्रकाशित कथा)

पाटलाची सून महापतिव्रता म्हणून प्रसिद्ध परंतु ती होती मात्र व्यभिचारी – घरच्या गड्याशी अनैतिक संबंध – देवीच्या देवळातही कुकर्म करण्यास मागेपुढे पाहिले नाही. (पुष्प १ – कथा २१)

थोडक्यात, भावजयीचा आणि सावत्र आईचा दुष्टपणा किंवा सवतींचा कलह असे काही थोडे अपवाद वगळता अन्य सर्व कौटुंबिक भावसंबंधांची दुसरी बाजूही लक्षात घेऊन मराठी लोककथांनी महाराष्ट्रीय हिंदू समाजातील कुटुंबसंस्थेचे शक्यतो पुर्ण चित्र उभे करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**मराठी लोककथांतील काही रूढ कौटुंबिक समजुती**

वरील सर्व विवेचनावरून मराठी लोककथांच्या द्वारा महाराष्ट्रीय हिंदु समाजातील कुटुंबव्यवस्थेला व्यापून असणाऱ्या वातावरणाची चागली कल्पना येऊ शकते. कुटुंबात आणि तसेच समाजात रूढ असणाऱ्या काही समजुतींचा उगम याच वातावरणातून अपरिहार्यपणे झालेला आढळतो आणि अशा समजुतींचे दर्शनही मराठी लोककथांतून घडते.

**पुत्र आवश्यक** :– हिंदु समाजाच्या पुरुषप्रधान संस्कृतीत या समजुतीचे मूळ सहजपणे शोधता येते. समाजात पुरुषवर्गाला मिळणारी मानमान्यता पाहून प्रत्येकाला पुत्रप्राप्तीची निकड भासणे अपरिहार्य आहे त्यामुळेच अनेक निपुत्रिक दांपत्ये पुत्रप्राप्तीविना तळमळतात, त्यासाठी साधना करतात, नवससायास करतात. वास्तविक वात्सल्यभावनेचे समाधान मुलीवर माया करूनही लाभणे सहजशक्य आहे. तथापि वंशवृद्धीसाठी, कुळाचा उद्धार होण्यासाठी, मातापित्यांना परलोकी गती मिळण्यासाठी पुत्रप्राप्तीची निकड परंपरेने मानलेली आहे व तिचा आविष्कार मराठी लोककथांतून झालेला आढळतो.

उदा. – अवंती नगरीचा विक्रम राजा – दोन राण्या पण पुत्र नाही – प्रधानाची वेषांतर करून राज्याची पाहणी – राज्यात सर्व ठीक परंतु राजा पुत्रहीन म्हणून प्रजा नाराज – निपुत्रिकाचे तोंड पाहणे अपशकुनी असा त्यांचा समज – राजाला फार दुःख – शंकराची कठोर आराधना करून पुत्रप्राप्तीसाठी प्रसादफळे मिळविली. (एक होता राजा - कथा २७)

**मातापुत्रसंबंध त्याज्य** :- माता-पुत्र हे नाते अत्यंत पवित्र मानले जाते. या पावित्र्याला काळिमा आणणाऱ्या माता-पुत्रसंबंधाचा धिक्कार मराठी लोककथांनी एकमताने केलेला आहे.

सटवीकन्येच्या कथेच्या चारी पर्यायांत आपले पुत्राशी विवाह होण्याचे भविष्य खरे ठरले हे कळताच सटवीकन्येने देहत्यागाचा निर्णय घेतलेला आहे. (पुष्प २ – कथा १०) (पुष्प ३० – कथा ८०) (मराठवाड्यातील लोककथा - कथा ६) या तिन्ही पर्यायांत विवाह झाला तरी संबंध प्रत्यक्षात घडलेला नाही. (पुष्प ३ – कथा ७९) या पर्यायात मात्र घटना पुत्रप्राप्तीपर्यंत पुढे गेलेल्या आहेत.

सुलतावतीला वनवासात झालेला पुत्र जन्मतःच पळवला गेला – राजपुत्र म्हणून वाढला - मोठा झाल्यावर सुलकावतीशी विवाह करण्याचा त्याचा हट्ट – विवाह ठरला – पार्वतीने महादेवांना ध्यानातून जागृत करून सांगितले, ' पृथ्वीवर अनर्थ होतो आहे. मुलगा आईशीच लग्न करायचा हट्ट करतो आहे ' – गायगोऱ्हा रूपाने दोघे पृथ्वीवर – दोघांची प्रणयक्रीडा सुरू – राजपुत्राने हे पाहताच 'मात्रा-गमनी' म्हणून गोऱ्ह्यास मारायला धावला – पार्वतीने अडवले, ' आम्ही तर जनावरे, पण तू माणूस असून आईशी विवाह करू पाहतोस?' राजपुत्र हे ऐकून चकित झाला, दुःखीही झाला. (सासुरवास – कथा ५).

**बहीणभाऊ संबंध त्याज्य**

एकाच मातापित्याच्या पोटी जन्म घेणाऱ्या बहीण-भावाच्या अनिष्ट संबंधाचा निषेध करणाऱ्या काही मराठी लोककथा आढळतात.

उदा.– बहीण जैतुला वनवासी अवस्थेत माहेरी आश्रित – माहेरच्या लोकांनी ओळखलेच नाही – ती दृष्टीस पडल्यावर दोन्ही भावांना तिची अभिलाषा व तिच्या प्राप्तीसाठी दोघांत भांडण – जैतुलाने दळण करताना गाण्यातून स्वतःची ओळख पटविली. अनिष्ट निवारण झाले. (सासुरवास – कथा ६)

हर्ष–जीण बहीणभाऊ – परस्परांवर खूप प्रेम – भावजयीचा जीणवर खूप राग – जीण घर सोडून निघाली – भाऊ हर्ष समजूत घालण्यास धावला – खूप आश्वासने पण जीणची माघार नाही – जीणला सर्वात क्लेश देणारी गोष्ट अशी

होती की, भावाबहिणीत अनिष्ट संबंध आहेत असा भावजयीने आळ घेतला होता- दोघे तपश्चर्येसाठी उद्युक्त - दोन डोंगरांवर एकमेकांकडे पाठ करून तपश्चर्येस प्रारंभ - (वैजयंती - कथा १४)

**मातृ-पितृ-ऋण फेडणे आवश्यक**

आईवडील मुलांना जन्म देतात व त्यांचे जीवन घडविण्यात कष्टाचा वाटा अनेक वर्षे उचलतात. त्यांच्या या प्रेमाची, कष्टाची माणसाने सदैव जाणीव मनात जागृत ठेवली पाहिजे आणि त्यांच्या ऋणाची फेड करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मातृपितृ ऋण फेडणे ही जीवन सार्थक होण्याबाबतची एक अत्यावश्यक बाब परंपरेने मानलेली आहे. या आवश्यकतेचा उल्लेख एका मराठी लोककथेत आढळतो.

जसे- एक ज्योतिषी - विवाहास सदैव नकार - विवाहासाठी त्याची विचित्र अट 'मूल झाल्यास जन्मतःच नाळ न कापता मूल त्याला आधी दाखवावयाचे' - अट मान्य होऊन त्याचा विवाह - त्याने दहा मुले जन्मतःच मारली - पत्नीला खूप दुःख होई परंतु कोणाला सांगणार ? - अकरावे मूल जिवंत ठेवले - पत्नीने आता दहा मुले मारण्याचे कारण विचारले - त्याने सांगितले, 'पहिली मुले अल्पायुषी होती, त्यांना मातृपितृ - ऋणातून मुक्त होण्यासाठी पुरून टाकले.' हे त्याला आधीच माहीत असल्यानेच तो विवाह करीत नव्हता. (मराठवाड्यातील लोककथा - कथा ८)

**मराठी लोककथांतील व्यक्तींची कुटुंबपरिघाबाहेरील परस्परदृष्टी**

महाराष्ट्रीय हिंदू कुटुंबांचे मराठी लोककथांत दिसून येणारे चित्र त्यातील व्यक्तींच्या त्रिविध प्रकारच्या (पुरुष-स्त्री, स्त्री-पुरुष, स्त्री-अन्यस्त्री) परस्पर - संबंधांतून कसे स्पष्टपणे दिसते याचा परामर्श येथपर्यंत घेतला गेला. तथापि केवळ तेवढ्यामुळे एकूण समाजदर्शन होते असे नव्हे - त्यासाठी कुटुंब ज्या एका समाजाचा घटक असते त्या समाजातील अन्यव्यक्तींशी त्यांचे वर्तन कसे असते, किंवा एकूणच समाजातील व्यक्ती आपल्या कुटुंबपरिघाबाहेरील व्यक्तींशी कशा तऱ्हेने वागतात हे पाहणेही आवश्यक असते.

माणूस हा एक समाजप्रिय प्राणी आहे हे एक प्राचीन काळापासून सिद्ध झालेले ऐतिहासिक सत्य आहे. समाजात राहावयाचे तर समाजाचे काही नीतिनिर्बंध अपरिहार्यपणे त्याला पाळावेच लागतात. मराठी लोककथांतील व्यक्ती हे निर्बंध पाळतात का हे पाहण्यासाठी देखील पुरुष-परस्त्री, स्त्री-परपुरुष, आणि स्त्री-परस्त्री अशा त्रिविध दृष्टींची दखल घ्यावी लागेल.

**मराठी लोककथांतील पुरुषांची परस्त्रीविषयक आसक्ती**

कामभावनेचा योग्य उपशम व्हावा आणि समाजात व्यभिचार वा अनीति

फैलावू नये हा विवाहसंस्थेचा प्रमुख हेतू आहे. मराठी लोककथांतील पुरुषांना तर बहुपत्नीकत्वाचे स्वातंत्र्यही मिळालेले आहे. तरीही त्यांच्या परस्त्रीविषयीच्या दृष्टीकोनात कामासक्ती प्रभावी आहे असे आढळून येते. पुरुषांच्या परस्त्रीविषयक दृष्टीकोनात थोडीफार विविधता असली तरी तिच्याकडे एक उपभोग्य वस्तू म्हणून वैषयिक आणि कामासक्त दृष्टीने पाहणाऱ्या पुरुषांची संख्या तुलनेने अधिक आहे. काही उदाहरणांत ती स्त्री अविवाहित असेल, कधी दुसऱ्याची वाग्दत्त वधू असेल, तर काही प्रसंगी ती विवाहित देखील असेल.

उदा.- एका माळीपुत्राने स्त्रीवेषाने राजकन्येशी मैत्री केली – राजपरिवारातील सर्व माणसांना खाण्याच्या पदार्थांतून मोहिनी घातली – नंतर मोहिनीग्रस्त राजकन्येचा उपभोग घेतला. (अप्रकाशित कथा )

दैवगतीमुळे राजपुत्राला एका सावकाराकडे नोकरी करण्याची पाळी – राज पुत्राने उत्तम गाणे गाऊन एका राजकन्येचा विवाहपण जिंकला – धनी सावकाराची अट, ' राजकन्येशी तुझे लग्न लागेल तरी ती माझी बायको होईल. ' (पुष्प २ – कथा ५)

मित्रपत्नीजवळ उघडपणे सोबतीची मागणी करणारा माणूस. ( पुष्प २ – कथा २ )

स्वतःच्या मेहुणीच्या उपभोग घेणारा अंकुमराजा ( पुष्प ४ – कथा १३ )

कोळीपुत्राच्या सोनेरी केसांच्या पत्नीवर आसक्त होऊन कोळीपुत्राचा नाश करू पाहणारा राजपुत्र. ( सांगीवांगी – कथा १४ )

राजपुत्र जगदेवाच्या पत्नीला ( वीरमतीला ) कोतवालपुत्राने गणिकेच्या मदतीने पळवून माडीवर एकांतात ठेवले व रात्री कामांध होऊन तो माडीवर तिच्याकडे गेला. ( एक होता राजा – कथा ३ )

कामांध पुरुषांची अशी आणखी अनेक उदाहरणे उद्धृत करता येतील. परपुरुषांच्या फक्त कामवासनेचाच उपद्रव स्त्रियांना होतो असे नाही. उपद्रवाचे अन्य प्रकारही दिसून येतात.

उदा. – एक ठक आणि महाठक यांची मैत्री जमून दोघांनी संगनमताने एका म्हातारीला ठकवण्याचा प्रयत्न केला. ( सांगीवांगी - कथा १२ )

मथुरा परोपकारी वृत्तीची. तिची जादूची कळशी सर्व काम करी. लोकांनी मथुरेला चेटकी ठरवून राजाकडे तक्रार केली. सैनिक तिला पकडण्यास आले. ( पुष्प १ – कथा ३५ )

## मराठी लोककथांतील कामांध परपुरुषांची फजिती करणाऱ्या चतुर स्त्रिया

मराठी लोककथांत व्यभिचारी स्त्रियांची काही उदाहरणे निश्चितपणे असली तरी त्यांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेने खूपच कमी आहे. उलट आपल्या चातुर्याने कामांध परपुरुषांची फजिती करणाऱ्या स्त्रियांची संख्या जास्त आहे. व्यभि-चाराला त्यांच्याकडून उत्तेजन सहसा मिळतच नाही, किंवा स्त्रियांचा तोलही ढळत नाही.

उदा. – सावकाराने राणीचा चंद्रहार चोरला – चंद्रहार नेण्यासाठी तिनेच स्वतः यावे असा त्याचा आग्रह – तिच्या भेटीसाठी तिच्या महालापासून स्वतःच्या घरा-पर्यंत भुयार तयार – भेटीची वेळ ठरवली – सावकार उत्सुकतेने वाट पाहात बसला – राणीने मुद्दामच उशीर केला – वाट पाहून पाहून तो निद्रिस्त – तेवढ्यात राणी हार घेऊन परतून गेली. ( अप्रकाशित कथा )

प्रधानपत्नीवर राजाची नजर – प्रधानाला हेतुपूर्वक कामगिरीवर दूर पाठविले – राजा प्रधानपत्नीकडे आला – तिने त्याला नरकवासाची भीती घातली – राजा निराशेने परत. ( अप्रकाशित कथा )

चोराने राजकन्येला पेटीतून पळवले – दुसऱ्या एका राजपुत्राच्या मदतीने राजकन्येऐवजी पेटीत अस्वल – चोराची फजिती. ( अप्रकाशित कथा )

गवंडीकन्येच्या लोभाने राजाकडून गवंड्याला अशक्यप्राय कामाची आज्ञा. ( वरचा मजला आधी बांध, बैलाचे दूध आण वगैरे ) – गवंडीकन्येने राजाला चतुराईने निरुत्तर केले. राजाला पहिले दाणे नंतर मोजायला सांगितले. पित्याला मूल झाल्याचे सांगितले. ( अप्रकाशित कथा )

## द्वेष, मत्सर, दुष्टता यांनी ग्रासलेल्या मराठी लोककथांतील स्त्रीस्वभाव

समाजातील अन्य स्त्रियांशी वागताना मराठी लोककथांतील स्त्री ही बऱ्हंशी तिला जोडल्या गेलेल्या परंपरामान्य गुणांची ( किंबहुना अवगुणांची प्रचीती आणून देते. दुसऱ्या स्त्रीच्या घरी अधिक सुबत्ता दिसली की तिच्या मनात मत्सराचा प्रादुर्भाव होतोच. धनलोभ कोणाला सुटला आहे ? लोभाला बळी पडून इतर स्त्रियांचा घात करण्याकडे सहजच त्या प्रवृत्त होतात, किंवा दुष्टपणापायी दुसऱ्या स्त्रीचे जीवन उध्वस्त करून टाकतात.

नागाला लाकूडतोड्याने पुत्रवत् पाळले – खूप गरम दूध पाजल्याने नाग मृत – पण मरताना त्याचा नवरत्नहार बनला – लाकूडतोड्याची बायको हार घालून बाजारात गेली – प्रधानपत्नीला तो हार हवा – प्रधानाने विकत घेतला – राणी बेचैन – राजाने विकत घेतला. ( पुष्प ४ – कथा )

शेजारणीकडे अक्षय्य लाडू देणारी वाटी – याचा बाईला हेवा ( अप्रकाशित कथा )

राणीची मुले पळविण्यात द्रव्यलोभाने दासीची मदत. (पुष्प १ – कथा ४२)

राजकन्येजवळची जादूची अंगठी माळणीने परराजाला नेऊन दिली. ( पुष्प २ – कथा ३ )

अन्नपूर्णेला विहिरीत ढकलून तिचे कपडे, दागदागिने घालून राणीपद मिळ–विणारी चांभारकन्या ( पुष्प ४ – कथा ८ )

पोरक्या जाईला खड्ड्यात ढकलणारी शेजारीण (एक होता राजा – कथा २)

**कुटुंबपरिघाबाहेरील परस्परदृष्टीतील अपवादांची नोंद**

मराठी लोककथासृष्टीची व्यक्तिवैचित्र्याची जाण उपरोक्त त्रिविध दृष्टींच्या संदर्भातही स्पष्टपणे प्रतीत होते. या तिन्ही दृष्टींत उपरोक्त वैशिष्ट्ये प्रभावी असली तरी त्या त्या संबंधांतून दिसून येणारी अन्य काही स्वभाववैशिष्ट्येही काही कथांतून प्रकट होतात.

**उदारदृष्टी पुरुष** :– पुरुषांच्या परस्त्रीबद्दलच्या वैषयिक आणि अनुदार दृष्टीची उदाहरणे तुलनेने अधिक असली जरी उदारहृदयी, मदतशील पुरुषांचे चित्रणही मराठी लोककथांनी वर्ज्य मानलेले नाही.

उदा. – ' स्वतःच्या पुत्राशीच विवाह होण्याचे ' स्वतःचे भविष्य खोटे ठरविण्याच्या इराद्याने सत्वीकन्या जंगलात जाऊन राहिली – रानात एका साधूने तिला उदार अंतःकरणाने आश्रय दिला – पुत्र झाल्यानंतर तिला एका माळ्याचा आश्रय. ( पुष्प २ – कथा १० )

ब्रह्मदेवपत्नी सावित्री हिच्या शापाने देव, ब्राह्मण अंशतः नदीरूप झाले. ब्राह्मणांच्या प्रतिशापाने सावित्रीलाही नदीरूप – बाकी सर्वजण पूर्वेकडे निघाले तर सावित्री पश्चिमेला निघाली – पश्चिम समुद्र अपवित्र, त्याला तिने जाऊन मिळू नये म्हणून शंकरांनी तिला अनेकवेळा विनवले – तिचा बेत बदलत नाही – ठिकठिकाणी आडवे पडून त्यांनी तिला अडविण्याचा प्रयत्न केला. (पुष्प ३ – कथा १३)

भक्त माळीरायाचे आतिथ्य न करण्याबद्दल मिळालेल्या पतीच्या शापाने पदूबाईची वाताहत – तिच्या प्रेताचीही विटंबना – अस्थी समुद्रात वाहून गेल्या. हे सर्व माळीरायाला कळताच तो फार दुःखी – पदूबाईच्या मुलीला बहीण मानले – समुद्राकाठी तप करून पदूबाईच्या अस्थी परत मिळवून गंगेत सोडल्या –

अस्थींचे कमल – विठोबारायाने ते तोडताच त्यातून पदुबाई बाहेर – बाळीरा–यामुळे पतिपत्नींची पुनर्भेट. (पुष्प ३ – कथा ७६)

**व्यभिचारी, कपटी स्त्रिया** :– पुरुषप्रधान संस्कृतीमुळे आणि स्त्रियांचे वास्तव्य बहुधा बरेचसे घरातच होत असल्यामुळे सहसा त्यांचा परपुरुषांशी संबंध येण्याचे कारणच पडत नाही. तथापि काही स्त्रियांची व्यभिचारी वृत्ती त्यांना वाममार्गाकडे कशी वळवते याची उदाहरणे पत्नीपती संबंधांच्या विवेचनात उद्धृत केलेली आहेतच. तसेच काही स्त्रिया कपटाने एखाद्या पुरुषास फसवू शकतात.
उदा. – राजपुत्र, ज्या पिशवीच्या साह्याने सतत सात दिवस पैसे मोजण्याचा विवाहपण जिकावयास बसला होता, ती पिशवीच राजकन्येने, पण जवळजवळ पूर्ण होत आला असताना पळवून नेली. (अप्रकाशित कथा)

एका राजपुत्राने कळाशीच्या घोडयाच्या साह्याने विवाहपण जिंकला परंतु तो झोपला असता त्याच घोडयाच्या साह्याने राजकन्या पळून गेली. (अप्रकाशित कथा)

शिकविलेल्या मांजराच्या साह्याने एका कलावंतीनं सर्व तरुणांना सोंगटयांच्या डावात जिंके व कैदेत टाकी. (एक होता राजा – कथा ७)

**सद्‌गुणी स्त्रिया** :– सर्वच स्त्रिया इतर स्त्रियांशी लोभीपणाने, मत्सरी वृत्तीने वा दुष्टतेने वागतात असे नाही. सद्‌गुणी, उदारहृदयी, सल्लागार, आश्रयदात्या, अशा प्रकारच्या स्त्रियांनाही मराठी लोककथांत स्थान मिळालेले आहे.
उदा. – कामासक्त दिवाणजीच्या तावडीतून सुटलेल्या सावकारस्नुषेला अणिकेने आश्रय दिला व लेकीसारखे मायेने वागवले. (सुंबरानं मांडील – कथा ७)

बायकोच्या नथीतून तीर मारणाऱ्या कोळयाला स्वतःच्या शक्तीचा खूप गर्व – पत्नी त्रासून गेली – शेजारणीचा सल्ला, 'त्याला असे चिडव की तुमच्या–पेक्षा शक्तिमान खूप आहेत.' - पत्नीने त्या सल्ल्यानुसार नवऱ्याची अस्मिता दुखावली आपल्यापेक्षा शक्तिमान कोण याच्या शोधार्थ हिंडून आल्यावर त्याला स्वतःपेक्षा शक्तिमान असे अनेक लोक, अगदी स्त्रियासुध्दा आहेत हे ध्यानात आले. त्याचे पुरते गर्वहरण झाले. (पुष्प ४ – कथा ७)

**मराठी लोककथांत पुरुषांच्या परस्परभावसंबंधांना गौण स्थान**

मराठी लोककथांतून होणाऱ्या कौटुंबिक वा कुटुंबबाह्य भावसंबंधांचा परा–मर्श घेतांना जी एक बाब ठळकपणे नजरेत भरते ती अशी की पुरुषपात्रांतील, कौटुंबिक वा कुटुंबबाह्य, परस्परसंबंधांना या कथांत अत्यंत गौण स्थान दिलेले आहे. ना त्यांच्यामधील प्रेमाचे, ना तणावांचे. याचे प्रमुख कारण कदाचित हेच

असावे की पुरुष सतत एकमेकांच्या सहवासात क्वचितच राहतात. त्यामुळे त्यांच्यांतील भावबंध (अनुकूल वा प्रतिकूल) तितकेसे उत्कट नसावेत. तणाव असलेच तरी त्यांना उग्र स्वरूप सहसा येत नाही. स्वाभाविकच पुरुषापुरुषांमधील परस्परसंबंध हे अगदीच नगण्य नसले तरी कथासूत्राच्या दृष्टीने फारसे प्रभावी ठरत नाहीत. अगदी थोड्याच कथांत कुठेतरी त्यांचे अस्तित्व जाणवते.

**भावाभावांची तेढ :-** मराठी लोककथांत पिता – पुत्र – प्रेमाचे वा संघर्षाचे चित्रण अभावानेच आहे असे म्हटले तरी चालेल. एकत्र कुटुंबपद्धतीमध्ये सासू – सुनेची, जावाजावांची तेढ जशी अपरिहार्य निर्माण होते तशी भावाभावांची तेढही निर्माण होऊ शकते. विशेषत: वडिलोपार्जित संपत्तीच्या आशेने त्यांच्यांत तेढ वा वैर उत्पन्न होणे हे व्यवहारात नेहमी दिसून येणारे उदाहरण आहे. तथापि अशा तऱ्हेची एकही मराठी लोककथा आढळत नाही. सावत्र भावाच्या वाग्दत्त वधूवर नजर ठेवणाऱ्या भावाचे चित्रण राजपरिवारात मधूनमधून आढळते. अशा प्रकारच्या अन्य काही कथांत भावाभावांच्या तेढीला मात्र कुटुंबातील स्त्रीच कारणीभूत झालेली आढळते.

उदा. – दोन भाऊ – मिळकतीत खूप फरक – मोठा वकील तर धाकटा भिक्षुक – मोठ्या भावजयीची सारखी कुरकुर – स्वतंत्र बिऱ्हाडे. (पुष्प १ – कथा ३७)

या दुसऱ्या एका कथेत मात्र भावाभावांत तेढ उत्पन्न होण्यास एक भाऊ स्वतःच कारणीभूत झालेला आहे.

दोन भावांचे एकत्र कुटुंब – स्नेहपूर्ण संबंध – मोठ्या भावाने बाजारातून ऊस आणला – मुलांना तुकडे तोडून देण्यास बसला – एका बाजूला मुलगा, दुसऱ्या बाजूला पुतण्या - तुकडे देताना मुलाच्या बाजूच्या हातात ऊसाच्या वाढ्याची बाजू तर पुतण्याच्या बाजूला चांगला तुकडा – हाताची अढी घालून चांगला तुकडा मुलाला दिला - धाकटा भाऊ समोर बसलेला – त्याचा संताप – वाटणीची मागणी – खूप समजूत घालण्याचा प्रयत्न – मुलाचे म्हणने, 'त्याने हाताची अढी घातल्याने माझ्या मनातही अढी, मला एकत्र राहावयाचे नाही.' (खानदेशी लोक-कथा – कथा १)

**एकाच स्त्रीबद्दलचा मोह किंवा वैभवाचा मत्सर :-** एकाच स्त्रीबद्दल दोन पुरुषांना वाटणारी अभिलाषा वा एकाच्या वैभवाबद्दल दुसऱ्याला वाटणारा हेवा वा मत्सर ही दोन पुरुषांतील तणावांची आणखी दोन प्रमुख कारणे आहेत. एकाने दुसऱ्याची वाग्दत्त वधू वा पत्नी पळवून नेणे, एकाजवळ असणाऱ्या जादूच्या भांड्यासारखे

भांडे स्वतःही मिळविण्याचा प्रयत्न करणे अशासारखी उदाहरणे मधूनमधून उद्धृत झालेली आहेतच.

**मदतशील वृत्तीचे पुरुष** :– एकमेकांशी वैरभाव धरणारे पुरुष जसे आढळतात तसेच मदतशील वृत्तीचेही काही पुरुष मराठी लोककथांत आढळतात.
उदा. – राजपुत्रावरील आगामी संकटे प्रधानपुत्राला आधीच समजली. त्याने त्या सर्व संकटांतून राजपुत्राला पार पाडले. (दाते १ - कथा ७)

राजपुत्राला स्वप्नात दिसलेली राजकन्या शोधण्यासाठी त्याच्या मित्राने पराकाष्ठा करून त्याला राजकन्या मिळवून दिली. (अप्रकाशित कथा)

पित्याच्या प्रेताची विटंबना थांबवणाऱ्या सावकारपुत्राला सर्वतोपरी मदत करणारा चोरांचा नायक. (सांगोवांगी कथा ११) (तीर्थांचे सागर – कथा ५)

**मराठी लोककथांत आढळणाऱ्या सर्व भावसंबंधांतील वास्तवता**

मराठी लोककथांतून व्यक्त होणाऱ्या आणि या प्रकरणात आतापर्यन्त चर्चिलेल्या सर्व भावसंबंधांचे एक ठळक वैशिष्टय असे सांगता येईल की हे चित्रण अत्यंत वास्तववादी स्वरूपाचे असून त्यांतील अनेक भावसंबंधांची मुळे महाराष्ट्रीय हिंदू समाजात अद्यापही चांगलीच घट्ट रुतलेली आहेत, कन्याजन्माचे स्वागत अद्यापही होत नाही, 'मुलगी झाली हो' अशी किमान नाराजी तरी व्यक्त होतेच. सासुरवासाचा बळी होणाऱ्या सुनांची अवस्था अजूनही दयनीयच असून त्यांची संख्याही कमी झालेली नाही. सूनमुलांकडून होणाऱ्या म्हाताऱ्या माणसांच्या उपेक्षेतून वृद्धाश्रमसंस्थेची कल्पना आपल्या समाजात फैलावू लागली आहे. तसेच आईवडील हयात आहेत तोवरच माहेरवास हे मुलीच्या मनाला पक्के ठाऊक असते. या सर्व विषयांची दखल आधुनिक ललित साहित्याला देखील घ्यावी लागत आहे. हाच त्यांच्या वास्तवतेचा ठळक पुरावा आहे. प्रेमाचा त्रिकोण हा भावसंबंध तर फारच पूर्वापार चालत आलेला साहित्यविषय आहे व तो कधीही न संपणारा असाच आहे. त्याचे चित्रण लोककथांतही प्रचुरतेने आढळणे स्वाभाविकच म्हणावे लागेल. प्रत्यक्ष व्यवहारात प्रचुरतेने आढळणाऱ्या कौटुंबिक व सामाजिक संघर्षांना प्राधान्य देऊन व त्याचबरोबर व्यक्तिपरत्वे बदलणाऱ्या काही अन्य स्वभावछटांनाही मधुनमधून स्थान देऊन मराठी लोककथांनी व्यक्तिवैचित्र्याची व वास्तवतेची जाण यथायोग्यपणे प्रकट केलीं आहे असे म्हणावयास हरकत नाही.

**मराठी लोककथांतून प्रकट होणारी निकोप समाजनीतीकल्पना**

एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोककथांतून त्या समाजात प्रचलित असणाऱ्या धार्मिक समजुती, सामाजिक समजुती, रूढी, कुटुंबव्यवस्था यांचे दर्शन कसे होते हे

आपण मराठी लोककथांच्या उदाहरणांवरून पाहिले. या सर्व लोककथांच्या निर्मितीच्या मुळाशी लोकमानसाची प्रेरणा असते याचा ऊहापोह या प्रकरणाच्या सुरुवातीस केला आहे त्यामुळे या कथांच्याद्वारे, महाराष्ट्रीय हिंदू लोकमानसाला अभिप्रेत असणाऱ्या समाजनीतिकल्पनेची यथार्थ कल्पना सहजपणे येऊ शकते. या प्रदेशातील लोककथांद्वारे प्रकट होणाऱ्या एकूण सांस्कृतिक वातावरणाचे निरीक्षण केल्यास असे निश्चित म्हणता येते की येथील लोकमानसाची समाजनीतिकल्पना अत्यंत उच्च प्रतीची व निकोप स्वरूपाची आहे, कारण या सर्व लोककथांनी व्यभिचाराचा वा दुराचाराचा एकमुखी निषेध केलेला आहे.

**व्यभिचारी व्यक्तीस सदैव शासन** :— मराठी लोककथांत व्यभिचार हा सदैव गर्हणीय व त्याज्य रंगविलेला आहे. त्यातील कामांध पुरुषांची वासना फारच क्वचित पूर्ण झालेली आहे आणि क्वचित पूर्ण झालीच तरी त्याला घोर अपराध झालेच. कठोर शासनही मिळते. व्यभिचारी स्त्रियांचा व्यभिचारही उघडकीस येतो व त्यांनाही शिक्षा होतेच.

**बहीण — भाऊसंबंधाच्या निषेधाची प्राचीनता व सार्वत्रिकता**

बहीणभावाच्या संबंधाचा निषेध तर वेदकालापासून आपल्या समाजात चालत आलेला आहे. ऋग्वेदातील यमयमीच्या संवादात यमाने या निषिद्ध संभोगाचा निषेध केलेला आढळतो. ही सवलत फक्त आदिपितरांनाच मिळाली असा उल्लेख दुर्गा भागवतांनी केला आहे. जगात जलप्रलय झाल्यानंतर फक्त दोन भावंडेच उरली. तेव्हा प्रजोत्पत्तीसाठी त्यांच्यांत कामभावना निर्माण होणे आवश्यक ठरल्याचे अनेक देशांच्या लोककथांत वर्णिलेले आहे. नंतर मात्र या संबंधाचा जवळजवळ सर्व जातीजमातींनी निषेध केला आहे. मातृसत्ताक पद्धतीत मामा हा कुटुंबप्रमुख असतो आणि भाऊ — बहीण संबंधावर फार कडक बंधन असते. त्यांना एकमेकांपासून दूर ठेवतात. एकमेकांच्या नावाचा उल्लेखही इतरांना धक्कादायक वाटतो अशी माहिती 'असंस्कृत समाजातील लैंगिकता' या अनुवादित ग्रंथात दि. धो. कर्वे यांनी दिली आहे. ( मूळ ग्रंथ ब्रॉनिस्ला मालिनॉस्की यांचा आहे. ) मातृसत्ताक कुटुंबपद्धतीत भाऊ — बहीण आकर्षणाचा सुप्त मनोगंड तयार होतो व तो कधीकधी लोककथांतून प्रकट होतो आपल्या समाजात तशी कुटुंबपद्धती नसल्याने तसा मनोगंड सहसा निर्माण होत नाही तथापि त्याचा निषेध नोंदवणे ही गरज आहे आणि ती भारतीय समाजाने प्राचीन काळापासून पूर्ण केलेली आहे. मराठी लोककथांतून या निषेधाचे प्रकटीकरण कसे होते याची उदाहरणे उद्धृत केलेली आहेतच भारतातील अन्य प्रांतीय लोककथांतही हा निषेध आढळतो.

**इडीपस मनोगंडातून निर्माण होणाऱ्या माता-पुत्र संबंधाचा निषेध** :- मातापुत्रसंबंधाचा निषेध आपल्या समाजात फार प्राचीन कालापासून रूढ झालेला आहे. आधुनिक काळात मनोविश्लेषणसशास्त्राचा उदय झाल्यानंतर या अनिष्ट संबंधाची शास्त्रीय मीमांसा फ्राइड या मानसशास्त्रज्ञाने केली, व ती मीमांसा जगभर मान्यता पावली आहे. फ्राइडच्या मते पितृसत्ताक कुटुंबपद्धतीत कुटुंबात पित्याचे ( बहुधा जुलमी, कठोर) सर्वस्वी वर्चस्व असते. त्यामुळे मुलाच्या मनात पित्याबद्दल द्वेष, असूया असते. मुलाच्या मनात पित्याला मारून आईशी संबंध ठेवण्याची इच्छा सुप्त रूपाने असते. या मनोगंडाला इडीपस मनोगंड असे नाव दिलेले आहे. माणसाच्या मनातले सुप्त मनोगंड लोककथांतून प्रकट होतात. मराठी लोककथाही त्याला अपवाद नाही. मातापुत्रसंबंध सटवीकन्येच्या कथेतून प्रकट करताना त्याला स्थानिकतेचा रंग भरलेला आहे. अर्थात या संबंधाची निषिद्धता मात्र कठोरपणाने व ठामपणाने प्रतिपादन केलेली आहे. प्रत्येक कथेत पुत्राशी विवाह झाल्यावर सटवीकन्येने मृत्यूचाच आसरा घेतलेला आहे.

इलेक्ट्रा मनोगंडातून प्रकट होणाऱ्या पिता-कन्या संबंधाची कथा मात्र मराठीत आढळत नाही. एका कथेत पिता-कन्या जरी नाही तरी सासरा-सून संबंधाच्या अनिष्टतेचा ओझरता उल्लेख केलेला आहे. (तीर्थांचे सागर – कथा १२)

अशा तऱ्हेने व्यभिचार, माता-पुत्र संबंध, बहीण-भाऊसंबंध अशा अनिष्ट प्रवृत्तींचा कडक निषेध करून, त्यांना पूर्णतया त्याज्य ठरवून मराठी लोककथेने समाजाच्या नीतीचा स्तर उंचावण्याचा प्रयत्न निश्चितच केलेला आहे. एरवी समाजात अनैतिकता माजून त्याची घडी विस्कटण्याचीच शक्यता जास्त ! मराठी लोककथांतून घडणारे हे महाराष्ट्रीय हिंदू समाजाचे लोकमानसदर्शन अत्यंत सुखकर व हितकर आहे, मनाला दिलासा देणारे आहे. अप्रत्यक्षपणे समाजाला नीतिशिकवण देण्याचे हे लोककथांचे कार्य फार मोलाचे आहे यात संशय नाही. शिवाय ही अमोल कामगिरी पार पाडताना लोककथा रुक्षतेचा आश्रय कधीच घेत नाहीत. उलट लोकमानसातील लोककल्पनाशक्तीची अनावर ओढ या लोककथांत अत्यंत रोचक, रंजक स्वरूप प्राप्त करून देतात. त्यायोगे श्रोत्यांची मनसोक्त करमणूकही होते त्यांना अतृप्त इच्छांची काल्पनिक का होईना तृप्ती झाल्याचे समाधानही मिळते आणि त्याबरोबरच सदाचाराची बोधप्रद शिकवणही लाभते. मराठी लोककथांच्याद्वारे लोककथांचे जवळजवळ सर्व हेतू साध्य होतात असे म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

# संदर्भ टीपा

प्रकरण १ ले

## लोककथा एक सर्वाधिक लोकप्रिय लोकवाङमय प्रकार

1) Kenneth & Mary Clark – ' Introducing Folklore ' Page 2
Folklore is as universal as climate and can be studied systematically and like the weather, it has a profound effect on our lires.

2) E. S. Hartland – Science of Fairy Tales - Page 2
It is the outcome of an instinct implanted universally in all human mind.

3) Linda Degh – Folklore and Folklife Page 53
(Editor -- Dundes)
The impuls to tell a story and the need to listen to it have made narrative the natural companion of man throughout the history of civilization.

४) कालेलकर/चोरघडे – साहित्याचे मूलधन पृष्ठ ८५
५) मालतीबाई दांडेकर – लोककथा कल्पलता पृष्ठ २४
६) दुर्गा भागवत – लोकसाहित्याची रूपरेखा पृष्ठ २५७
७) शं. ग. दाते – मराठी लोककथा भाग १
८) डॉ. सरोजिनी बाबर – मराठी लोककथा
९) दुर्गा भागवत – लोकसाहित्याची रूपरेखा पृष्ठ ९७
१०) दुर्गा भागवत – लोकसाहित्याची रूपरेखा पृष्ठ ९९
११) डॉ. प्रभाकर मांडे – लोकस हित ाचे स्वरूप पृष्ठ १९१
१२) दुर्गा भागवत – लोकसाहित्याची रूपरेखा पृष्ठ १०३

प्रकरण २ रे

## मराठी लोककथांचे वर्गीकरण आणि त्यांचे ठळक विशेष.

1) Kenneth & Mary Clark – Introducing Folklore Page 13
1) Collection of specimens of oral traditions. 2) Classification to study in an orderly manner, 3) Conclusion clearly unwanted by the honest evaluation of the material.

2) Kenneth & Mary Clark - Introducing Folklore Page 26
A myth is a narrative dealing with gods, demigods, or culture

heroes. It is concerned with creation of the world, the establishment of the present order, the origin of a people, tribe or culture trait.

३) मालतीबाई दाडेकर – लोककथा कल्पलता पृष्ठ १८

4) Wiliam Bascom - Contributions to Folkloristics. Page ﾉ8
Myths account for the origin of the world, of mankind, of death, or for characteristics of birds, animals, geographical features, and the phenomena of nature. They may recount the activities of deities, their love affairs, their family relationships, their friendehips and enmities their victories and defeats.

5) E. S. Hartland – The Science of Fairytales Page 18
under the influence of religious feeling, the most mobile of races become conservative and hence traditions of a sacred charactor are handed down unchanged from father to son.

6) E. S. Hartland - The science of Fairytales. Page 5
Some people require the stoy tellers of relate their stories in the very words in which they have been conveyed from time immemorial, and allow no deviation. They preserve their tradition with the least possible blemish and the least possible change.

7) E. S. Hartland – The science of Fairytales Page 18
The dislike of voluntury change forbids amendment even of formularies which have long ceased to be understood, and have often become ridiculous because their meaning have been lost.

8) Alexander Krappe – Science of Folklore Page 1
By ' fairytale ' we mean a continued narrative generally of a certain length, practically always in prose, serious on the whole, though humans not excluded, centring on one hero or heroin usually poor or destitute at the start, who after a series of adventures in which the supernatural element plays a conspicuous part attains his good and lives happily everafter.

9) Stith Thompson – The Folktale Page 8
This form of tale purports to be an account of an extraordinary happening believed to have actually occured.

10) Linda Degh – Folklore and Folklife Page 72
(Edited by Dorson)

(लिंडा डेग्र यांनी उद्धृत केलेले ग्रिम यांचे मत)

The fairytale flies, the legend walks, knocks at your doors .. it is localized, dawn to earth and has historic validity.

11) Linda Degh - Folklore and Folklife, Page 74

12) Linda Degh - Folklore and Folklife, Page 74
This catargory includes complex tales of cliveres nature having in common their realistic tendency. The novella has the same composition of the magic tale, but the fantastic element plays a lesser role.

13) Kenneth & Mary Clark – Introducing Folklore Page 25
A fable is a short tale usually involving animal characters which express either implicitly or explicitly a moral principle.

14) Alexander Krappe - The science of Folklore Page 45
By marry tale, we mean a short narrative, in prose or verse, relating an episodic event or series of events culminating in a humo ous situation, the subject matter is taken from every day life. The occurance of supernatural element is rare and even then serves only to create the basis underlying the situation not the situation ifself.

15) Linda Degh - Folklore and Folklife. Page 72
The narrator of the farmula tale does not pay attention to and concern for the content but rather expects emotional response to the stylistic device he employs.

१६) दुर्गा भागवत - लोकसाहित्याची रूपरेखा पृष्ठ ४०९

## प्रकरण ३ रे

## मराठी लोककथांतील कथाविशेष आणि कल्पनाबंध.

1) Stith Thompson - The Folktale Page 415
A type is a traditional tale that has an independent existance. It may be told as a complete narrative and does not depend for its meaning on any other tale. It may intend happen to be told with another tale, but the fact that it may appear alone attests its independence. It may consist of only one motif or of many.

2) Stith Thompson – The Folktale Pege 415
A motifs is the smaller element in a tale having a power to

persist in tradition. In order to have this power; it musr have something unusual and striking about it.

3) Stith Thompsom - The Folktale Page 416
A type-index implies that all versions of a type have a genetic relationship; a motif-index makes no such assumption.

4) Stith Thompson – The Folktale Page 424
In that it resembles a library classification. where books good and bad old and new large and small appear togther on the shelves. All that matters is that the items belong to the same division and subdivision of human knowledge.

### प्रकरण ४ थे

## लोककथांच्या रचनानुसारी अभ्यासाची एक दिशा

1) Vladimir Propp. – Morphology of Folktales Page 14
Just as all rivers flow into the sea all questions of folktale study must lead to the solution of the highly important and as yet unsolved problem of the resemblance of folktales throughout the world for this, morphological study is essential.

2) Valdimir Propp, - Morphology Folktales Page 18
The names of the dramatic personae change, as well as the attributes accorcing to each, but neither action nor functians change.

3) Vladimir Propp. - Morphology of Folktales Page 10
Types do exist, not on the level outlined by Aarne, but on the level of the structural properties of folktales.

### प्रकरण ५ वे

## मराठी लोककथांतील पात्रांचे सांकेतिक स्वरूप

१) दुर्गा भागवत – लोकसाहित्याची रूपरेखा पृष्ठ ४१३

२) दुर्गा भागवत – लोकसाहित्याची रूपरेखा पृष्ठ ४१३

### प्रकरण ६ वे

## मराठी लोककथांतील संकेतपालन

1) Stith Thompson – The Folktale Page 125

It is normally true that all tales of this kind the youngest child is also especially unpromising, either because of appearance shiftless habits or habitual bad treatment by others. But even though such qualities are emphasised in the narrative, it is never forgotton that the distiaguishing qualities of these heroes and heroins is the fact that they are the youngest.

प्रकरण १० वे

## मराठी लोककथांतून घडणारे समाजदर्शन

१) डॉ. प्रभाकर भा. मांडे – लोकसाहित्याचे स्वरूप पृष्ठ ८२

REFBK-0025427

## संदर्भग्रंथ


1) Alexander Krappe — The Science of Folklore
2) Stith Thompson — The Folktale
3) Richard Dorson — Folklore and Folklife
4) E. S. Hartland — The Science of fairrytales
5) Kennetn & Mary Clark — Introducing Folklore
6) Vladimir Propp. — Mythology of Folktales
७) श्रीमती दुर्गाबाई भागवत – लोकसाहित्याची रूपरेखा
८) डॉ. प्रभाकर मांडे – लोकसाहित्याचे अंत:प्रवाह
८) श्रीमती मालतीबाई दांडेकर – लोककथा कल्पलता
९) कालेलकर – चोरघडे – साहित्याचे मूलधन
१०) डॉ. प्रभाकर मांडे – लोकसाहित्याचे स्वरूप
११) डॉ. सरोजिनी बाबर – मराठी लोककथा
१२) कथासरित्सागर
१३) अरेबियन नाईटस्
१४) महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला – पुष्प १
१५) महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला – पुष्प २
१६) महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला – पुष्प ३
१७) महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य माला – पुष्प ४
१८) मराठी लोककथा भाग १ सं. शं. ग. दाते
१९) मराठी लोककथा भाग २ सं. शं. ग. दाते
२०) मराठवाड्यातील लोककथा – सं. डॉ. यू. म. पठाण
२१) एक होता राजा – महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती प्रकाशन
२२) राजविलासी केवडा – " " " " "
२३) तीर्थांचे सागर – " " " " "
२४) सांगोवांगी – " " " " "
२५) सुंबरानं मांडीलं – सं. डॉ. सरोजिनी बाबर
२६) खानदेशी लोककथा – सं. य. भि. पाटील
२७) सासुरवास – राम काळे
२८) वैजयंती – महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती प्रकाशन भाग २३
२९) सचित्र कहाण्या – भाग १ व भाग २

प्रस्तुत ग्रंथात लेखिकेने आतापर्यन्त संकलित आणि प्रकाशित झालेल्या मराठी लोककथांच्या आधारे विविध लोककथाप्रकारांची स्वरूपलक्षणे स्पष्ट केली आहेत. त्यांतील कथाविशेषांचे तसेच कल्पनाबंधांचे स्वरूपही विशद केले आहे. लेखिकेने लोककथांचे केवळ रचनातंत्र स्पष्ट केले नाही तर त्यांतील चल आणि अचल घटकांचीही चर्चा केली आहे. मराठी लोककथा-तील सांकेतिक पात्रे, त्यांतील संकेतपालन यासंबंधी आवश्यक तेथे इतर प्रांतांतील लोककथांशी तुलना करून मर्मग्राही विवेचन केले आहे. मराठी लोककथांतून येथील समाजजीवनाचे दर्शन कसे घडते याचीही विस्ताराने चर्चा केली आहे,

मराठी लोककथांची रचना, त्यांतील सांकेतिक पात्रे, कल्पनाबंध इत्यादी विशेषांच्या दृष्टीने त्यांत विश्वात्मकता आढळत असली तरी त्यांतून घडणाऱ्या प्रादेशिक जीवनाच्या दर्शनातून प्रदेशविशिष्टताही आढळते हे सप्रमाण दर्शविले आहे

## मराठी लोककथा : स्वरूपमीमांसा

## सौ. वैदेही कोळेकर

सविता प्रकाशन
औरंगाबाद

युनिव्हर्सल ऑफसेट प्रिंटर्स,
बायजीपुरा, सिडको रोड,
औरंगाबाद-४३१००१.

# मराठी व्रतकथा वा कहाण्यांतील परीकथासदृश रचनेचा आराखडा.

| व्रतकथेचे नाव | उणीव | खलपात्रे | मार्गदर्शक | अतिमानवी मदत | उणीव निरास |
|---|---|---|---|---|---|
| **कहाणी भाग १** | | | | | |
| १) गणपतीची कहाणी | -- | -- | -- | -- | -- |
| २) आदित्यराणूबाईची कहाणी | गरिबी (ब्राह्मण)<br>दारिद्र्य ( राणी ) | स्वतः (कहाणीचा अवमान) | नागकन्या,देवकन्या<br>प्रधानपत्नी बहीण | आदित्य राणूबाई | ब्राह्मण श्रीमंत, मुली राजगृही पडल्या.<br>राणीचे दारिद्र्य दूर वैभवप्राप्ती |
| ३) शिवामुठीची कहाणी | राजाच्या सुनेला घरात नावडतेपण, गुराखीपण | सासरची माणसे | नागकन्या, देवकन्या | शंकर | नावडती सून आवडती,<br>पिंडीभोवती देऊळ निर्माण |
| ४) सोमवारची कहाणी १ | गावातील सर्व दुधानेही शंकराचा गाभारा रिताच | राजाज्ञा | म्हातारी | शंकर | खुलभर दुधानेही गाभारा भरणे |
| ५) सोमवारची कहाणी २ | शिष्यपत्नीला माहेर नाही | -- | -- | शंकर | वेळूच्या बेटात अर्धघटकेचे माहेर निर्माण |
| ६) फसकीची कहाणी | गरिबी | -- | -- | शंकर, नंदी | ऐश्वर्य प्राप्ती |
| ७) सोमवती अवसेची कहाणी | ब्राह्मणकन्या गुणवंतीला वैधव्ययोग<br>सोमेच्या घरची माणसे मृत | दुर्दैव<br>पुण्य संपले | ब्राह्मण<br>-- | सोमा परटीण<br>विष्णू, पिंपळ | मुलीचा मृत पती जिवंत<br>सोमेच्या घरची माणसे पुन्हा जिवंत |
| ८) मंगळागौरीची कहाणी | अल्पायुषी पती | दुर्दैव | आई | मंगळागौर | पतीवरचा मृत्युयोग टळला |
| ९) बुध-बृहस्पतीची कहाणी | दारिद्र्य, पती देशांतरास | स्वतः (दानधर्म न करणे) | भिकेकरी,<br>मामाभाचे | बुध-बृहस्पती | पुन्हा ऐश्वर्यप्राप्ती, पती राजपद मिळवून पुन्हा घरी परत |
| १०) शुक्रवारची कहाणी १ | पुत्र जन्मताच पळवला जातो | राणी, सुईण | -- | जिवतीदेवी | पुत्राची पुनर्भेट |
| ११) शुक्रवारची कहाणी २ | दारिद्र्य | भाऊ | शेजारीण | देवी | ऐश्वर्यप्राप्ती, भावाशी समेट |
| १२) संपत शनिवारची कहाणी | दारिद्र्य | -- | -- | शनिदेव | ऐश्वर्यप्राप्ती |
| १३) मारुतीची कहाणी | दारिद्र्य | -- | -- | मारुती | ऐश्वर्यप्राप्ती |
| १४) धरित्रीची कहाणी | -- | -- | -- | धरित्रीदेवी | -- |
| १५) गोपद्मांची कहाणी | सुभद्रेवरील संभाव्य संकट पाठीचा कुकर काढला जाणे | -- | श्रीकृष्ण | गोपद्मव्रत | सुभद्रेवरील संकट टळणे |
| १६) पाच देवांची कहाणी | गरिबी,<br>पार्वतीचा क्रोध | पार्वती | -- | गणपती विष्णू नंदी, शंकर, पार्वती | ऐश्वर्यप्राप्ती |
| **मराठवाड्यातील लोककथा कथा २** | | | | | |
| ऋषी आदितवाराची कहाणी | वाघाशी विवाह | वाघ | शेजारीण | नारायण | वाघपतीला मनुष्यरूप प्राप्त |

| व्रतकथेचे नाव | उणीव | खलपात्रे | मार्गदर्शक | अतिमानवी मदत | उणीवनिरास |
|---|---|---|---|---|---|
| **कहाणी भाग २** | | | | | |
| १) महालक्ष्मीची कहाणी | नंदनंदनेश्वर राक्षसाचा जाच | नंदनंदनेश्वर | देवकन्या,नागकन्या | महालक्ष्मी | राक्षस मृत,नवलवाटाला अर्धराज्य |
| | चिमादेवराणी नावडती | राजा | नवलवाट | महालक्ष्मी | चिमादेवराणी आवडती होणे, |
| | पाटमाधवराणीला वनवास | स्वत: महालक्ष्मी व्रतखंड | ऋषी | महालक्ष्मी | सन्मानाने पाटमाधवराणी पुन्हा घरी |
| २) दिव्याच्या अवसेची कहाणी | सुनेवर व्यभिचाराचा आळ, घराबाहेर जावे लागणे | सासरची माणसे | -- | दीपक | आळ जाऊन सन्मानाने घरी परत |
| ३) ज्येष्ठागौरीची कहाणी | गरिबी | — | स्वत: ज्येष्ठागौर | ज्येष्ठागौर | ऐश्वर्यप्राप्ती |
| ४) सोळा सोमवारांची कहाणी | गुरवाला शापाने कोड | पार्वती | अप्सरा | शंकर | कोड गेले |
| | पार्वतीपुत्र कार्तिकेय दूर गेला होता. | — | गुरव | शंकर | कार्तिकेय येऊन भेटला |
| | कार्तिकेयाला मित्रभेट हवी होती. | -- | पार्वती | शंकर | मित्रभेट झाली |
| | ब्राह्मणास विवाहेच्छा | -- | कार्तिकेय | शंकर | ब्राह्मणाचा राजकन्येशी विवाह |
| | ब्राह्मणपत्नीस पुत्रप्राप्तीची इच्छा. | — | पती | शंकर | पुत्र प्राप्ती |
| | ब्राह्मणपुत्रास राज्य-प्राप्तीची इच्छा | -- | आई | शंकर | ब्राह्मणपुत्रास राज्यप्राप्ती |
| | राजकन्येस वनवासदशा सर्वत्र हकालपट्टी. | स्वत: व्रतभंग केला | गोसावी | शंकर | वनवास संपून पुन्हा घरी |
| ५) नागपंचमीची कहाणी १ | माहेरचे कुटुंब नागदंशाने मृत. | नागीण | -- | नागदेवता | माहेरचे कुटुंब पुन्हा जिवंत |
| ६) नागपंचमीची कहाणी २ | मुलीस माहेर नाही. | — | -- | शेष भगवान | ब्राह्मणरुपाने मुलीस माहेरपण, संपत्ती दान |
| | नागबंधूचा रोष. | नागबंधू लाडोबा पुंडोबा | -- | लाडोबा, पुंडोबा | राग गेला, नवरत्नहार दान |
| ७) वर्णसठीची कहाणी | गरीब रोगग्रस्त पती, नंतर वैधव्य. | पिता | शिवपार्वती | शिवपार्वती | पती जिवंत व अव्यंग, निरोगी |
| ८) सोमवारची कहाणी | राजाच्या घरात सवतीकलह | -- | वसिष्ठ ऋषी | — | कलह मिटला |
| ९) शिळासप्तमीची कहाणी | तळ्यास पाणी नाही. | — | — | जलदेवता | तळ्यास पाणी आले |
| | मुलगा बळी दिला गेला. | सासरा | -- | जलदेवता | बळी दिलेला मुलगा परत |
| १०) पिठोरीची कहाणी | मुले जन्मत: दगावत म्हणून सून घराबाहेर | सासरा | नागकन्या, देवकन्या | पिठोरीचे व्रत अप्सरा | मुले सजीव परत, घरी पुनरागमन |
| ११) हरितालिकेची कहाणी | विष्णूऐवजी शंकर पती हवा | पिता | सखी | शंकर | शंकराशी विवाह |
| १२) ऋषीपंचमीची कहाणी | रजस्वलादोषामुळे पती बैल व पत्नी कुत्री, मुलाच्या घरी चाकरी | पत्नी | ऋषीचा मेळा | ऋषीपंचमीचे पुण्य | रजस्वलादोष नष्ट, मातापित्यांना मुक्ती, स्वर्गात जाणे |
| १३) ललितापंचमीची कहाणी | गरिबी | — | गुरु | ललितादेवी | ऐश्वर्य प्राप्ती |
| | ब्राह्मण मृत | — | -- | ललितादेवी | ब्राह्मण जिवंत |
| | पती मृत | आई | -- | ललितादेवी | पती जिवंत |
| | व्रतखंडाने पुन्हा दारिद्र्य | स्वत:चा व्रतभंग | मोठा भाऊ | ललितादेवी | पुन्हा ऐश्वर्यप्राप्ती |
| १४) वसुबारसेची कहाणी | वासरे मृत | सून | -- | देव | वासरे पुन्हा जिवंत |
| १५) विष्णूची कहाणी | महाविष्णूच्या भेटीची ओढ | -- | कपोतकपोती | विष्णु | विष्णूशी भेट, एकरूपता |
| १६) बोडणाची कहाणी | सून नावडती | सासरची माणसे | देवी | देवी | नावडती सून आवडती, हिरेमोती प्राप्त |